hananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-012564

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

# २९

# पेशवा माधवराव—उत्तरहिंद

(१७६१—१७७२)

[किंमत—६ रुपये ११ आणे किंवा १० शिलिंग ९ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

12564

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३३

V·2315, L:8n, N3
G1.29
12564

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

## *AFFAIRS OF NORTHERN INDIA : PESHWA MADHAVRAO I (1761–1772)*

This selection deals mainly with the efforts made by Madhavrao I to retrieve the situation created by the catastrophe at Panipat. The first few letters give an illuminating picture of the actual state of the country when the Marathas, after their crushing defeat at the hands of the Abdali, had evacuated Hindustan and retired to safer positions beyond the Chambal. One remarkable fact which stands out prominently in these papers is, that the victory of 14th January 1761 availed the Abdali king comparatively little. For three years he negotiated for the friendship of the Marathas from beyond the Indus and ultimately ratified a formal peace with them in 1764. The Maratha chiefs in Bundelkhand lost no time in regaining their original position and once more pushed their conquests beyond the Jumna as soon as the Afghan army had evacuated the Punjab. The Peshwa's conflict with his uncle, and the various phases through which it subsequently passed, seriously hampered Maratha interests in the North, whence repeated but fruitless requests for military help and financial support appear to be pouring into the Deccan almost from day to day.

The correspondence here printed is so eloquent that it hardly needs any introduction. Its fascination is enhanced by the variety both of style and detail, coming as it does from the pens of more than a dozen different writers with some of whom the reader is not already familiar. The Jats, the Rajputs, the Rohillas, and ultimately the Imperial Court of Delhi, contribute their share to these papers, which make essential additions of incident and detail to the scanty knowledge we have so far possessed of the subject. The rise of Mahadaji Sindia, his flight from the wrath of Raghoba, the contemporary movements of the English, always on the look-out for an opportunity to checkmate Maratha efforts for supremacy and conquests, and the development of events in various quarters of India,—these and other points are graphically described, and culminate in the instalment of the Emperor by the Marathas on his ancestral throne at Delhi towards the end of 1771. In the midst of these glorious achievements came the premature death of the brilliant young ruler whose unremitting labours had so greatly contributed to secure them. A few papers for the years 1773-74 are included in order to show how that tragic event quickly ended almost all the good work that had been accomplished.

At the end are given some letters and some important entries extracted from the Peshwas' Diaries, giving various useful details of an expedition against Delhi despatched by the Peshwa Madhavrao I under the joint command of Ramchandra Ganesh and Visaji Krishna supported by Tukoji Holkar and Mahadji Sindia. The expedition started from Poona in October 1768 and the Maratha armies after humbling the Bhonsles of Nagpur in the early months of 1769 proceeded to the North in the summer. They defeated the Jats, captured Delhi, overcame the Rohillas and having brought the Emperor Shah Alum from Allahabad,


placed him on the Imperial throne. This was the crowning triumph of Madhavrao's regime, which came to an end by his death in November 1772 and which necessitated the return of the Maratha forces to the Deccan in 1773 after the murder of Peshwa Narayanrao became known to them.

Many useful details of this five years' period are discernible from the Peshwas' Diaries which the student of Maratha history will love to learn. How money was raised and spent, how diplomacy was carried on, who were the principal agents that were employed on various missions, how mutual jealousies often frustrated the main object of the expedition—these and similar topics will be found well illustrated in these extracts. Presents of animals, dresses and other articles will be found scrupulously credited to the Government; many letters and dispatches are now and then quoted and many fresh names are come across, thereby throwing new light on individual exploits. This paper is thus intended to serve as a sample of what a Maratha expedition was like.

The following itinerary of Ramchandra Ganesh will be found helpful in studying the campaign conducted by him. The Peshwas' Diaries give his daily movements with dates and halts; but if they were to be printed *in extenso*, they will occupy many printed pages and are hence omitted :—


| | |
|---|---|
| 8th May 1769 | .. Ramchandra Ganesh reached Burhanpur. |
| 25th May 1769 | .. Nerbudda south bank. |
| 16th July 1769 | .. At Arun in Malwa. |
| 22nd August 1769 | .. At Raghavgad, Malwa : halt for two months. |
| 12th December 1769 | .. At Lakheri in Bundi. |
| 26th December 1770 | .. At Lalsot in Jaipur. |
| 28th March 1770 | .. At Kumbher in Jatvada. |
| 12th May 1770 | .. Crossed the Jumna near Muttra. |
| 24th June 1770 | .. On the Ganges in the Doab. |
| 22nd July 1770 | .. At Kol near Aligad. |
| 17th December 1770 | .. At Itawa in the Doab. |
| 5th February 1771 | .. At Patpatganj. |
| 18th March 1771 | .. Crossed the Jumna into Delhi and halted there upto January 1772. |
| 24th January 1772 | .. Crossed the Jumna back into the Doab. |
| 12th February 1772 | .. At Ghosgad against the Rohillas. |
| 4th March 1772 | .. At Pathargad against the Rohillas. |
| 17th June 1772 | .. Near Moradabad. |
| 5th December 1772 | .. Back to the south of the Jumna. |
| 21st December 1772 | .. Halt at Delhi. |
| 18th February 1773 | .. Back into the Doab at Ramghat. |
| 23rd March 1773 | .. Back to the south of the Jumna at Agra. |
| 4th April 1773 | .. On the Chambal. |
| 21st July 1773 | .. At Sironj. |
| 13th August 1773 | .. On the north bank of the Nerbudda. |
| 1st September 1773 | .. Near Burhanpur. |
| 20th September 1773 | .. Reached Poona. |

No. 150




Facsimile of the handwriting of Manaji Sindia. *(Died in April 1800)*

No. 191



Facsimile of the handwriting of Chin to Vithal Rairikar. *(Died in June 1783)*

No. 265



Facsimile of the handwriting of Mahadaji Ballal Guruji.

No. 1] [7-2-1761

श्री

राजश्री बाळाजी पंत नाना फडनीस
गोसावी यांसी

ℰ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेो सटवोजी जाधवराव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन परम समाधान जालें. सोबतीनें जावयाचा मजकूर लिा तरी बहुत उत्तम आहे. आमची ठाणीं परगणियांतील कायम आहेत. आम्ही बिदा व्हावयास ठाकूर सुरजमलजी याजकडे येऊं तेव्हां तुम्ही आम्ही समागमेच येऊन सोबतीनेंच परगणियात जाऊन. चिंता नाहीं. सर्व गोष्टी आपले घरच्या आहेत. दुसरा अर्थ नाहीं. कळलें पाहिजे. राा छ ३० माहे जमादिलाखर. बहुत काय लिहिणे ! लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Satvoji Jadhav writes to Nana Fadnis agreeing to escort him back to the Deccan after the disaster at Panipat.*

---

No. 2] [5-6-1761

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब स्वामीचे
सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गुंडो कासी मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन सिर सां नमस्कार विज्ञाप्ति. येथील वर्तमान ताा छ १ माहे जिल्कादपावेतो साहेबाच्या कृपावलोकणेकरून येथास्थित असे विशष. येथील वर्तमान यैसजे. छ २८ माहे शवाल तिसरा प्रहरा राजश्री चिंतोबा दिा जनकोजी सिंदे याचें पत्र निंबाबाई सिंदे याजला आलें. मथुरेचें मुकामचें पत्र होतें. त्यांत मजकूर यैसा जे, राजश्री जनकोजी सिंदे मलकापूर प्रांत जाटाचा तेथे आहेत म्हनोन वार्ता आहे, यैसे पत्र आलें. छ २९ माहे शवाल टोकियाहून श्रीमंत राजश्री नानासाहेब यांचे पत्र बलवंतराव गोपाल सेनवाई याजला आले. हुजूर बोलाविले आहे, सबब जे राजश्री रामचंद्रबावा सेनवाई याची ठेव सात लक्ष रुपये गोपाल शंकर याजकडे होतें, त्यासी गोपाल शंकर याणी सिंदियाचा आश्रये करून राहिले यास्तव त्या गोस्टी राहिल्या होत्या. सांप्रत्ये सदासिव रामचंद्र यानी पेसजीचे पैसुन्यें

काहाडून श्रीमंतास विनंती करून बळवंतराव गोपाळ याजला हुजूरचे पत्र पाठऊन आनविलें आहे ; व श्रीगोंदे येथीलहि मामलतीचा काही जौबसाल मारिनिलेकडे आहें ; यास्तव बोलाविलें आहें. सेवेसी श्रुत्ये होय हे विज्ञापना.

*¶Gundo Kashi to Dadasaheb regarding Chintoba's letter to Nimbabai to the effect that Jankoji Sindia is at Malkapur. He also mentions the letter of Nanasaheb to Balvantrao Shenvi regarding the deposit of the money of Ramchandra Baba with one Gopal Shankar.*

---

*No. 3*] [*11-6-1761 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब

स्वामीचें सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गुंडो कासी मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञाप्ति. येथील वर्तमान ताा छ ७ माहे जिलकादपावतों साहेबाच्या कृपावलोकणेकरून येथास्थित असें विशष. निबाबाई सिंदे याजकडें मौजे अरणगाव दलवी याचें व हिवरें वगैरे दाहा बारा गौची मामलियेती व पाटिलक्या वगैरे होत्या. त्या गावाची जफती राजश्री नारो बापुजी यांचे पुत्र माहादाजी नारायेण यानी केली. सिंदे मजकूर याचे अमलदार व पागा गाव परगावच्या उठोन आल्या. सेवेसी श्रुत्ये होये. श्रीगोंदियात निंबाबाई सिंदे व बलवंतराव गोपाल व पोतनीस व बक्षी व मुजुमदार वगैरे कोन्ही मातबर कुलें होतीं. त्यानी यैवज व चांगली घोडी व वस्तभाव मातबर यैसी रोज दररोज लांबवीत आहेत. येथे ठेवीत नाहींत. येथील धर सुटला आहे. भयचकीत जाली आहेत. जेथे ऐवज तेथें भये आहे यैसे जाणून यैवज जिकडील तिकडे लांबवितात. सेवेसी श्रुत्य होये हे विज्ञापना.

*¶Gundo Kashi reports to Dadasaheb the confiscation by Mahadaji Narayan of the Patilki rights belonging to Nimbabai Sindia, wife of Ranoji. Both this lady and Chimabai, Mahadji's mother, are alive after Panipat.*

---

*No. 4*] [*23-6-1761*

छ १३ जिल्काद

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक अज्ञाधारक गुंडो कासी मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञाप्ति. येथील वर्तमान ताा छ १९ माहे जिल्कादपावेतों साहेबाच्या

कृपावलोकणेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री जनकोजी सिंदे याचा बक्षी सिऊबा सेनवाई हा हिंदुस्थानचे लढाईत मयेत जाला. त्याजला पुत्र संतान नाही. येक कन्या मात्र आहे. तिचा भ्रतार सिऊबाचे घरी आहे, व सिऊबाची स्त्री यैसी आहेत. घरात द्रव्य बहुतसे आहे. त्याजला धनी कोन्ही नाही यैसा प्रकार आहे. सेवेसी श्रत्यें होये. राजश्री जणकोजी सिंदे याजकडील मुत्सदी दोन तीन असामिया व येक दोन साहुकार यैसे आहेत. ते द्रव्यानें थोर आहेत. द्रव्य बहुत आहे, म्हनोन गावात वार्ता बहुत आहे. रोज दररोज द्रव्य लांबवितात. मये निर्मान त्याजला साहेबाकडील जाले आहे यास्तव लांबवितात. मथुरे-कडून पत्रे राजश्री चिंतोपंत याची निंबाबाईस येतात की जनकोजी सिंदे पाणपता-नजीक आहेत; परंतु ठिकान लागत नाही. मणुशे शोधास पाठविली आहेत, यैसी पत्रें येतात. राजश्री बलवंतराव गोपाल हेहि भयाभीत बहुत आहेत. श्रीगोंदियात वार्ता यैसी जे, चिमाबाई सिंदी पुण्यात आहे तिने श्रीमंतास विनंती करून जफतिया उठविल्या. राजश्री रवलोजी सिंदे तुकोजी सिंदे याचे पुत्र याच्या बावाला राजश्री जणकोजी सिंदे याचा सरंजाम श्रीमंत करनार यैसी वार्ता बहुतसी आहे. सेवेसी श्रृत्ये होये हे विज्ञापना.

¶*Gundo Kashi, who appears to be an informant, suggests that the estates of one Shivba Shenvi, Sindia's Bakshi, be confiscated as he was killed at Panipat and has left no male-issue. The writer refers to the presence of Jankoji Sindia near Panipat—as mentioned in a letter to Nimbabai by Chintopant.*

---

*No. 5*] [*25-6-1761*

छ २८ जिल्काद

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसीं

विनंती. सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता जेष्ठ वद्य ८ स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा कीं सुजाउदौले याणी पत्र लिहिलें कीं सरकारची ठाणी बसवावी. त्यावरून त्यास थैली पाठविली आहे. तुम्ही याउपरी अंतरवेदीत ठाणी बसवणे म्हणून आज्ञा. त्यास अंतरवेदींत उतरल्याचे व ठाण्याचे बंदोबस्त केल्याचें शेवेसी दोनच्यार पत्रीं लिहिलेंच आहे. अंतरवेदीत उतरल्यावर रोहिले पठाण याचे दोन ठाण्यासी मात्र जुंज जाले. तेथे स्वामीचे प्रतापेकरून नक्षच

जाला. वरकड ठाणी रोहिल्यानी पठाणानी सलुखानेच सोडिली. सुजाउदौला याणीहि सलुखानेच सोडिली. येक गाजीपूरचा किला सुजाउदौलाकडील फौजदाराने खिचरास दिल्हा. त्यामुळें खिचरानें मातबर सरंजाम करून बसला आहे. वरकड तमाम जमीदार गढीबंद जाले आहेत. रयेतचे घरांत पैसा राहूं दिल्हा नाहीं. मुलुक काही पठाण रोहिले याणी लुटला. बाकी जमीदारानीं पैसा खाऊन गढ्या बलकाऊन बसले आहेत. येकाद्याचें पारपत्य करावे त्यास राजश्री मल्हारजी बावाचे फौजेचा शह या प्रांतातून ढलला, यामुले फिरोन रोहिले याणी लबाडी करून आलीकडे उतरले. हाफीज रहमत, दुंदेखा वगैरे आंबल्याहून कूच केले. पुढें फौज आलीकडे आली. सकुराबादेचे ठाणे त्याणी बसविले. आम्ही येथून फौज पाठविली आहे. जमिदारांसी तूर्त स्नेहच करून थोक थोक हातीं घेतले आहेत. अहमदखान आम्हासी बाह्यात्कारे श्नेह दाखवितो; परंतु अंतरी लबाड आहे. आम्हास कुमक कोणाकडील व्हावी तो अर्थ राहिला नाही. स्वामीचे प्रतापेकरून आमचे वस्तु होईल तेथवर बंदोबस्त करीतच आहो. रा गंगाधरपंत तात्या मथुरेस आहेत. सुरजमल जाट याणे आगरेयाचे किल्यास मोर्चे लाविले. किलेदार मजबुदीने झुंजत आहे. नजीबखान व पारचे रोहिले येकमते सर्व आहेत. अलीगोहर यासी आणावयाच्या विचारात आहे. सुजाउदौला जीवनपुरास दाखल जाला. अलीगोहर पटण्यातून तीन मजली अलीकडे आला आहे. फिरंगियाचे स्वाधीन आहे. मागाहून येईल वर्तमान सेवेसी लिहीत जाऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Govind reporting his efforts to restore Maratha prestige in the North.*

---

*No. 6*] [*27-6-1761*

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबकराव नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत ज्येष्ट वद्य १० पर्यंत आपले कृपेकरून येथास्थित असें विशेष. प्रस्तुत आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं, तर निरंतर पत्रीं परामृष करीत जावा. इकडील वर्तमान तर सर्व आपण पाहून गेलेच आहेत. अलीकडे आम्ही अंतरवेदींत उतरल्यानंतर मंगलपूर फफुंद दोन जागा पठाण व

रोहिल्यांसी जुंज जालें, परंतु श्रीमंत स्वामीचे प्रतापेंकरून नक्षच जाहाला. वरकड ठाणीं रोहिले पठाणानीं सलूखेंच खाली करून दिलीं. कुरा व कडा येथें नवाब सुज्यातदौले याणीं ठाणीं बसविलीं होतीं तींहि सलूखेंच खाली जाहालीं. येक गाजीपूर मात्र वेणीबाहादर याणी कांहीं लोभावर नजर देऊन खिचराच्या हवाला किल्ला केला. तेथें रूपराव खिचर मातबर सरंजामानिशीं राहिला आहे. या प्रांतीं राजा कुशलसिंग व पंचमसिंग वगैरे तमाम जमीदार गढ्या बांधोन फिरोन राहिले आहेत. रयेतेचें घरीं दाणा अगर पैसा राहूं दिला नाहीं; सर्व मुलूख लुटून जालोन खराब केला. कसब्यांतून मात्र सरकारी ठाणीं बसलीं आहेत. येखादे जागां गढ्यास लागोन जमीदारांचे पारपत्य करावें तर रोहिले फिरोन दंगा करावयाचे विचारावर आले. गंगातीरानें जागांजागां फौजा येऊन राहिल्या आहेत. कांहीं फौज सोरेमचे घाटीं उतरून सकुराबादेस आली. त्यास तिकडील सर्व जमीदार सामील होऊन सरकारी ठाणें ऊठविलें. येथूनहि फौज सकुराबादेकडे रवाना केली आहे. सकुराबादेस रोहिले आले. येणेंकरून तमाम माहालांत जमीदारांनीं दंगा करावयाचा विचार केला आहे. आम्हास कोणाचा उपराळा नाहीं. श्रीमंत स्वामीच्या प्रतापें जेथवर बंदोबस्त होईल तो करीतच आहों. मागाहून होईल वर्तमान तें लेहून पाठऊं. वरकड तीर्थस्वरूप राजश्री बाबूराव काका यासीं लिहिले आहे तें आपणांस विदित करतील. वरकड सर्व प्रकारें भरवसा आपला आहे. सदैव पत्रीं सांभाळ करीत असिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असो दीजे हें विनंती.

¶*Balaji Govind and Gangadhar Govind are attempting to restore order in the Doab after the disaster of Panipat.*

---

*No. 7*] [*29-6-1761*

## श्री

### श्रीमंत राजश्री महिपतराव दादा गोसावी यांसी

स्नेहपूर्वक चिमणाजी रंगनाथ कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ २९ जिल्काद मुाा पाहाडी प्रांत झासी सुखरूप असो विशेष. तीनचार वेळां पत्रें पाठविली परंतु पत्राचें उतर येकहि न आलें. तेणेकरून चित सापेक्षित असे. तरी येसें न पाहिजे. सदैव पत्र पाठऊन तोषवीत जावे. राजे खेतसिंग याचा मजकूर तरी पूर्वी सरकारांत येकनिष्टेता दाखविली. लढाईचा प्रकार झाल्यास पूर्वीच्या बुधीस ठिकाणा राहिला नाहीं. तेंसमई राजे हिंदुपत जागाहि काही

देत होता परंतु ते समई भेटला नाही. दिलीकडील प्रकार जाल्यास कितीका प्रकारचा ध्यानांत आंदेशा आणून उभयेता बंधु येकत्र जाले. राजानीं खर्चास कांहीं एक दिल्हे नाहीं. येथें लोकांचे कर्जदार जालो. देसी जावे तो मार्ग फुटत नाहीं. रा। गणेश संभाजी यापासीं आहो. राजकी वर्तमान तर श्रीमंताच्या पत्रीं सविस्तर व राज्याकडील साद्यंत विस्तार लिहिला आहे. आपण आम्हास आश्रे आहेत दुसरा कोन्ही नाहींत. श्रीमंतास पत्र पाठविलें आहे ते आक्षरशा वाचून दाखवावे आणि जाब सत्वर लेहून पाठवावे. पुढे जैसी आज्ञा येथें राहावें कीं देसी श्रीमंतापासीं यावें. ज्याप्रमाणें आपण लेहून पाठवितील त्याप्रा। वर्तणूक करीन. कासिदास मार्गाकरितां खर्चास त्यानीं थोडी घेऊन गेले. त्यास सरकारातून खर्चास देवावे म्हणजे मार्गाची त्याची बेगमी होईल. बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

¶*Chimanaji Ranganath writes to Mahipatrao that he has been detained in the camp of Ganesh Sambhaji owing to the unsafe condition of roads. He further adds that the news of the defeat of the Marathas at Panipat has encouraged the Bundela chiefs Hindupat and Khetsing to throw off Maratha allegiance.*

---

*No. 8]* *[June 1761 ?*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री चिंतोपंत दाजी
स्वामीचे सेवेसी

पौ। गोपालराव गणेश सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रा। जाहाले. लिहिले वर्तमान सविस्तर कलो आले. त्यास पत्रे आज आम्हास व राजश्री गणेशपंत आणास आली. तेथे लिहिले आहे जे अबदाली आपल्या देशास गेला. सुज्यातदौला लखनूस पलोन गेला. नजीबखान व गाजदीखान दिलींत आहे. त्याजकडून वकील सद्नखास आले आहेत. त्यास दिलीकडील बंदोबस्तास राजश्री गंगाधरपंत तात्यास पाठविले आहे. सद्नख सत्वरच होऊन दिलीचा बंदोबस्त करितो. आम्ही रायेपुरास येणार होतो. परंतु दिलीकडेस जावयाची जलदी जाहाली आहे. आम्ही जातो. तुम्ही व राजश्री बालाजी गोविंद व राजश्री गणेश संभाजी अंतरवेदींत उतरोन बंदोबस्त करणें. कमावीसदारांसहि

पत्रे पाठविली आहेत म्हणून सुभेदारानी लिहिलें होते ती पत्रे बजिनस रामाजीपंत याणी पाहिली आहेत. त्यास तुम्ही आजपावेतो धीर धरून नक्षोनसी राहिला. त्यास संवछर प्रतिपदेच्या मुहुर्ते येमुनापार प्रस्तान काढून उतरत आहो. तुम्ही आम्ही येकत्र होऊन अनुक्रमे तुम्हापासोन ठाणी बसवीत जाऊ. बाळाजीपंत पार उतरत आहेत किंवा उतरले असतील. तुम्ही सिजेपावेतो राहिला, पुढे निवे-पावेतो उतावळी न करावी. याजउपरी अंतरवेदींतील ठाणी पार उतरताच खाली होऊन गंगापार जात आहेत. आपण चिंता न करावी. आकबरपूरांत पाच चार दिवसांत जाऊन बसाल. द्वितीयेस आम्ही रायेपुरास जाणार आहो. तेथे गेल्यास तेथूनच उतरावयाचा विचार ठरल्यास आपणास लिहून पाठऊन. येका दोन रोजात येथेच तजवीज ठरल्यास त्याजसारखे आपणास पत्र पाठऊ. कळले पाहिजे. आपण मोठा इस्तकलाल[१] केला. मोठी गोष्ट गेली. आता तर फलादेश आहे. सत्वरच पार उतरून. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा करीजे हे विनंती.

¶*Letter from Gopalrao Ganesh to Chintopant describing how earnestly he was trying to re-establish Maratha influence at Delhi after the disaster of Panipat.*

---

*No. 9]* *[1-7-1761*

पैा छ ९ मोहरम श्रावण

श्री

श्रीमंत राजश्री महिपतराऊ दादा स्वामी गोसावी
यासी

श्नो सदासिव खंडेराव आसीर्वाद विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ २७ जिलकाद पावेतो आपले कृपेकरून अमदाबादेस कुशलरूप असो विशाष. बहुत दिवस स्वामीकडील वर्तमान कळत नाही. तेणेकरून चित उद्विग्न आसे. तर यैसे न पाहिजे. सदोदित आलिया वार्तिकासमवेत कृपापत्र पाठऊन चितास आनंदवीत व सांभालीत असिले पाहिजे. यानंतर आपण व श्रीमंत राजश्री नाना व सर्व मंडळी हिंदुस्थानातून सैाा पार्वतीबाई समवेत स्वास्तिक्षेम आला हे वर्तमान श्रीमंत राजश्री नानानी आम्हास पत्र लिहिले त्यात मजकूर लिहिला तो वाचून परम आनंद जाहाला. आपले भेटीचा लाभ घ्यावा हा हेत बहुत आहे. परंतु ह्या

---

१ महत्त्व, दबाव.

प्रांती दंगा येंदा हिंदुस्तानचे हगामाकरिता जाला तो आपल्यासी व श्रीमंत राजश्री नानास पूर्वी पत्री मजकूर लिहिला होता त्याजवरून सर्व वर्तमान अवगत जाले असेल तेच वर्तमान अद्यापिपर्येत आहे. काहीसे जाले म्हणोन येता न ये येसेहि करून येऊं परंतु राजश्री आपाजी गणेश सुभेदार येऊ देणार नाहीत. बरे जे दिवसी भेटी होईल तो दिवस सुदिन असे. आम्ही पदरचे आसो. सदोदित कृपापत्री सनाथ सांभाल करीत जावा. विदित असे. वरकड वर्तमान श्रीमंत राजश्री नानाचे पत्रावरून सर्व अभिप्राये श्रवण होईल. पत्राचें प्रत्योतर पाठवणें. आपले कुशलतेचें व दरबारी राजकी नवल कीं हिंदुस्थानांतील वगैरे सर्व वर्तमान तपसीलवार लिहिलें पाहिजे. बहुत काये लिहिणें. कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Sadashiv Khanderao congratulates one Mahipatrao on his safe return from Panipat and expresses a desire to meet him.*

---

*No. 10]* *[Recd. 2-7-1761*

छ २८ जिल्काद इसने

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसी

विज्ञापना. सकुराबादेस रोहिल्याची फौज दाखल जाली. त्यांचे बल विशेष आहे. नजीबखान दिलीहून बाहीर निघणार. आगरेयास जाटानें मोर्चे लाविले. सबब दिलीहून साहजादे यास बाहीर काढून हंगामा करावा हा हेत त्याचा आहे. जाटासी पेच आहे. गाजुदीखान जाटाजवल आहे. रोहिले दंगा करावया तयार आहेत. राजश्री गंगाधरपंत तात्यास आम्ही लिहिले आहे. त्याजकडून काही सलुखाचा प्रकार सुरजमल याचे विद्यमाने जाला तर उतम; नाही तर सकुराबादेचे ठाणे त्याचे बसले. पुढेहि यावयाचा विचार करितील. हाफीज रहिमत वगैरे अलीकडे उतरणार. ते उतरल्यावर भारी होईल. आम्ही सकुराबादेच्या मोहोरावर फौज रवाना केली आहे. मागाहून होईल ते सेवेसी लिहून पाठऊं. सागर प्रांती जमिदारानी मोठा हंगामा करून हटयास मोर्चे लाविले. तमाम ठाणी दमोई तेजगड रहिली बसविली. आम्हास अंतरवेदेचे शहामुळें फौज तिकडे पाठविता नये. राजे प्रीथिसिंग याणीहि बदनियत करून दुंडी केली. सागरास मोर्चे लावावयाचा विचार आरंभिला. तेव्हा राजश्री जानोजी भोसले यांस सागर प्रांती आणिले आणि हटयाचे मोर्चे उठविले. जमीदाराचेंहि पारपत्य केलें तों

राजश्री मल्हारजीबावा रामपुऱ्याकडे लांबले; व राजश्री जानोजीबावाहि नागपुराकडे जाऊं लागले. तेव्हां बुंदेल्यासी कळलें त्या रितीने सद्वख केला. राजे प्रीथिसिंग यांसहि तूर्त मायेत घेतले. जाणोजीबावा जाणार यामुळे तेजगड अभान वगैरे ठाणीं येणार नाहींत. झासीकडेहि गुजरानी दंगा आरंभिला आहे. चौकडे दंगाच तूर्त दिसतो. या प्रांती फौज मातबर येईल त्याचा बंदोबस्त होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Govind reports the movements of Najibkhan, the Jat, Holkar and Rohilla chiefs in the North. The letter also refers to disturbances in Bundelkhand and the Doab.*

---

*No. 11*] [*2-7-1761*

छ १ जिल्हेज इसने

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गुंडो कोसी[1] मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञाति. येथील वर्तमान ता। छ २८ माहे जिल्कादपावेतो साहेबाच्या कृपावलोकणेकरून येथास्थित असें विशेष. छ २५ माहे जिलकाद साहेबाकडून राजश्री आबाजी माहादेव येऊन संध्याकाळी दाखल जाले. राजश्री बलवंतराव गोपाल यांची भेट घेतली. छ २७ माहे जिल्काद प्राथकाली निंबाबाईचे भेटीस गेले. भेट जालियावर साहेबाच्या आज्ञेप्रमाणें निंबाबाईसी बोलले. वर्तमान ऐकताच निंबाबाई रागास आली. राजश्री नारोबा सेनवाई दिवान याच्या वाडियावर चौकी पाठविली; सबब जे तुम्हीच सरकारात कुषमांडे करीता, हा विचार ध्यानास आणून रागास आली. संध्याकाली राजश्री आबाजी माहादेव याजला निंबाबाईनी बोलाऊन बोलले जे आमचे अकारीक रा। साबाजी सिंदे व चिंतोबा यैसे हिंदुस्थान प्रांतात आहेत. ते चाकरीवर आहेत. ते आलियावर पुढें आनखी फौज ठेवणे ते ठेविली जाईल; परंतु माहादाजी सिंदे याचे अनकूल पडत नाहीं यैसे पष्ट बोलली. रा। आबाजी माहादेव याजला पागोटे १ व सेला १ यैसी वस्त्रें २ देऊन रुकशात केले. सेवेसी श्रुत होय छ २८ माहे जिल्काद. राजश्री जाणूजी निंबालकर यानी बरकंदाज ३०० तीनसे श्रीगोंदियासी

---

१ सिंद्यांचा कारकून, श्रीगोंद्यास.

बंदोबस्तीस मदत पाठविले होतें ते तीन दिवस होतें चौथे रोजी मागारे गेले. जे वेळेस अगत्य लगेल ते वेळेस मागती येनार आहेत. छ २६ माहे जिल्काद. उजनीहून राजश्री चिंतोबा याचा पुत्र श्रीगोंदियासी आले. राजश्री जणकोजी सिंदे जिवंत आहेत म्हणोन वार्ता मात्र सांगतात. राजश्री जाणूजी निंबालकर करमालियाहून रातोरात पुण्यास साहेबाच्या भेटीस येऊन मागारे गेले, यैसी वार्ता श्रीगोंदियात बहुतसी आहे. सेवेसी भृत्ये होये हे विज्ञापना.

¶*Gundo Kashi writes to Dadasaheb from Shrigonda describing an interview between Abaji Mahadev and Nimbabai Sindia who did not accept the proposal regarding Mahadaji Sindia's succession but promised to raise a larger force on the return of Sabaji and Chintoba from the North. The letter incidentally refers to rumours that Jankoji Sindia is living.*

---

*No. 12*] [*12-5-1761*

छ २४ जिलकाद इसने
सितैन

**श्री**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान**
**स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक गोपाल केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ६ माहे शवल मुकाम भांडेर प्रांत झासी राजश्री बाबूराऊ कोनेर याजसमागमे आपल्या प्रतापेकरून सेवकाचे वृत्त येथास्थित आसें विशेष. पाा उचडचे वृत सेवेसी विनंती लिहिली होती. आज्ञापत्र सादर जाले कीं राजश्री मल्हारराऊ सुभेदार व राजश्री नाना पुरंदरे याजला निवेदन करणे, ते सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करणें. आज्ञेप्रमाणें उभयेतांचे सेवेसी आपाजी मैराल कारकून पाठविला. महिना दीडमहिना समागमें राहिले. सर्व सरदारांस पाा मजकुरचे वर्तमान सांगितले कीं दुसाला मिळून कमजाद तीन लक्ष रुा घेणे. त्यापैकीं पाऊण लक्ष रुा वसूल, सवादोन लक्ष हमी घेणें. जमीदार दरोबस्त बदलले आहेत. पैसा देत नाहींत. पारपत्य करावे अगर दोन हजार फौज द्यावी; परंतु कांहीं केल्यानें दोनी विचार घडून न आले. प्रस्तुत तों फौजा देशास गेल्या. सालबाईचे ठाणे राजश्री विठलरायानी नरवरकरास दिले. त्यावरून पछोरकर जाट गोहदेंसी बलजू जाटाकडें गेला. उचडकरहि दरोबस्त बलजू जाटानें बोलाऊन नेले. सर्व जाट येकत्र जाले आहेत. दतियेकरासी व

नरवरकरासी बिघाड करणार. आजीपरयंत उचड परगणियात भरोलीस गढी आहे, ते जतन केली आहे. दोनसे माणूस व सरंजाम पोख्त केला आहे. कसबियात माझे व सिलेदार मिळून संभर राऊत सेदिडसे माणूस ठेविले आहे. याउपर कसे ठरतील ते पाहवे. झासीस कर्जे घेऊन त्याजला खर्चास देतो. कोण्या गावास माणूस जाऊ पावत नाहीं. साल मजकूरची रसद दिलीस नेऊन दिली. त्यापैकीं येक रुपया प्राप्त नाहीं. याप्रमाणे वर्तमान आहे. पुढे आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल. राजश्री गोपाळराऊ बापूजी झासींच्या मदतीस आले होते. येक मास जाला तो आहिरानी आहिरवाडा पूर्वीच हस्तगत केलाच आहे. गढाउडिरा दोन किले पूर्वी सरकारात होते ते राजश्री राघो गोविंद यानी पाडिले. प्रस्तुत तेथे आहिर जाऊन बसले आणि किले बांधितात आणि गोपाळरायाकडील भोरासे वगैरे माहाल आहेत तेथे आहिरानी धामधूम करून गढ्या घेतल्या. राहिल्या त्यास मोरचे लाविले आहेत, यास्तव हे कूच करून त्या प्रांतास गेले. झासी प्रांती वोडसेकराचा वगैरे रजवाडियाचा दंगा बहुत आहे. कांहीं फौज या प्रांतास छावनीस राहिली असती तर इतका दंगा न होता. आपल्या प्रतापेकरून होईल ते खरे. विशेष काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Gopal Keshav, from Bhander in the province of Jhansi, writes to the Peshwa news about the Jats and other petty chieftains who have turned rebellious and are creating trouble.*

---

*No. 13*] [*24-8-1761*

छ २३ मोहरम
इसने.

**श्री**

शेवेसी भगवंत विष्णु विज्ञापना येसीजे. वारानसीहून साहुकारियात पत्र आले की सुजायेतदवला शाहजादियास बंगालियातून घेऊन जेष्ठ वद्य सप्तमीस कासीस दाखल जाले. तेथून कूच दरकूच दिलीस जाणार आहेत; परंतु त्याचे मनसबे सिधीस जानार नाहीत. माहराजास मुलुक काबल खंदारपर्यंत श्रीजीने दिधला आहे; परंतु त्याची वर्मे समजलियास सर्व मनसबे सिधीस जातील. माहराज म्हनतील की ती वर्मे कोनती तर जेव्हां ब्राम्हनाचे राज्ये जाले तेव्हा सहजच सत्ययुग लागले. जेथपरियेंत कल्युगचा संचार आहे तेथपरियंत

ब्राह्मनाचे राज्य आहे; परंतु थोडकेशे राज्ये श्रीमंताणी सोडविले. परंतु जितके राज्ये सोडविले तितकियाचा बंदोबस्त सत्ययुगाचे धर्माप्रमाणे जाला नाही. याजकरिता पुरता मुलुक सर जाला नाही. स्वामी म्हनतील की सत्ययुगचे धर्म कोनते त्याचा विस्तार लिहिल्यात येत नाही. माहाराजाचेहि संग्रही कोन्ही तत्वव्येत असतील त्याचे विचारे वर्तणूक जालियास सर्व मुलुक सर होऊन माहराजाचे मनोदयानरूप मनसबे सिधीस जातील. स्वामी म्हनतील की तत्वव्यता काशावरून जानावा, त्याची वलख कैसी जानावी; तर तत्वव्यत्याची परीक्षा ऐसी आहे की ज्या दंडदीपाच्या आष्ट दिशा आहेत तेथे जे दिशेची मोहीम योजून आलियास तिकडे त्याचे विचारे पाठऊन ज्यास सांगितले त्याची उभारनी करून सत्वर रवाना करावे. तिकडील बंदोबस्त जालियावर ज्या ज्या दिशेची मोहीम योजून आलियास त्याचे विचारेच पाठऊन अष्ट दिशेचा बंदोबस्त करून जे दिशेचा बंदोबस्त जाला तेच दिशेस सतयुगाचे धर्माप्रमाने मर्यादा बांधोन दुसरी दिशा सर करावी याचे प्रमाने मुलुक सर जालियास त्याचप्रमाने सतयुगचे धर्म चालवावे. ऐसे जालियावर सर्व बंदोबस्त आपले मनोदयानरूप घडोन येईल. या दिशेची मोहीम योजून आलियास सेवकासहि लिहून पाठविले पाहिजे. स्वामीचे अन्नाचे प्रतापे जो मनसबा सुचल तैसे लिहून सेवसी पाठऊन. रा जानोजी भोसले सेनासाहेब सुभा त्याचे बातमीचे वर्तमान येथून कोन्ही मातबर माणूस व वकील येसे माहराजाचे सेवेसी पाठविनार आहेत. येथील विचार आपले आज्ञेविरहित नाहीत. परंतु सरदारी येथील बोढगस्त आहे. परंतु याचे णिष्ठेत सांप्रत तर काही आंतर आपले ठाई नाही. याचे हते कितेक बंदोबस्त सिधीस जातील. आपनहि सर्वजान आहेत. मायेत घेतील. आम्ही सेवक लोकानी ल्याहावेसे नाही. बहुत विस्तार करोन लिहिला म्हनऊन सेवकावर विश्याद न करावा. सेवसी विज्ञाप्ति.

¶*The writer states, inter alia, that Shuja-ud-daula along with the Shahzada has left Bengal with the intention of marching on Delhi, but opines that he will not reach his objective.*

---

*No. 14*] [*15-10-1761*

पो छ १६ रबिलावल

**श्रीगजानन**

**श्रीमंत राजश्री रावसाहेब**

**स्वामीचे सेवेसी**

आज्ञांकित त्रिंबक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ १६ माहे रबिलावल जाणोन स्वकुशल लेखन करीत गेलें पाहिजे

विशेष. इकडील वर्तमान तर रावराजे यांचा मुकाम आज सागरीं केला आहे. यांची नजर ठिकाणी नाहीं, पजनसिंग वगैरे याची भेट येथेंच होणार. आपले तालुकियाचे गांवगना चिठ्या केल्या आहेत. कोणा गावास शंभर कोणा गांवास दोनसें याप्रमाणें आहे. यांचा मनसुबा कीं आवघे भाऊबंद येके ठिकाणी जाले म्हणजे सागरी ठाणें बसवावें. याप्रमाणें वर्तमान आहे. तर पत्र पावतांच यांजला सरकारांतून येकपत्र रावराजे यांस व येक पत्र राजश्री तीर्थाजीपंत यास लिहावें की, तुम्ही सागरीं मुकाम केला तर हे गोष्ट कार्याची नाहीं ऐसें यांस पत्र सत्वर पाठवावें. नाही तर आम्हीं याजला येथून उठऊन देतों. परंतु आपली आज्ञा व उभयेतांस येक पत्र ऐसें सत्वर पाठवावें. पुढें जमाव जालिया मग कठिण. यास्तव विनंती लिहिली जाते. व राजश्री चिमणाजी मोरेश्वरहि आपले जवलच आहेत त्यासहि सत्वर महूस रवाना करावें. यांचा मनसुबा विपरीत दिसतो. येकायेकींच सागरास खरगापुरीहून दोन दिवसांत आले व ठहरोलीकरांचे भाऊबंद प्राणसिंग विजनावाले तेहि समागमें आहेत. आज येथून पत्रें टहरोलीस व चिरगांवास गेलीं कीं तुम्हीं सागरीं भेटावयास येणें. त्यास यांस पत्र सत्वर पाठवावें व चिमणाजीपंताची लवकर रवानगी करावी. यांची भीडभाड जमाव थोडकाच आहे. तर येवडियांतच यांचें पारपत्य करावें. हे मोठे भले माणूस आहे. भीड जमाव जालिया आटोपणार नाहींत यास्तव आज्ञा लिहितों. पत्रोत्तर सत्वर पाठवावें. रातोरात जाबसाल देविला पाहिजे. बहुत काय लिहिणें? गढीचा बंदोबस्त येथास्थित आहे. गढीची चिंता न करावी. विनंती सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Disturbances in Bundelkhand are reported to Vishvasrao Lakshman and immediate succour is solicited in order to nip the trouble in the bud.*

---

*No. 15]* *[18-10-1761*

पो। छ १९ रावल

## श्रीगजानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामींचे सेवेसी

आज्ञांकित त्रिंबक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ १९ माहे रावल मुकाम ठाणें सागर स्वामीचे प्रतापे सुखरूप

4135

असों विशेष. इकडील वर्तमान तर रावराजे व तीर्थराजपंत आज कूच करून येथून जाणार. तीर्थराजपंत तर वोंडशास जातात व राजे राव सुजानपूर वोंडशानजीक सतारा येथें कूच करून जातात. त्यास माहाराजाचे पुण्येकरून याजला साफ सांगितलें कीं सागरीहून कूच करून जाणे. नाहीं तरी तुम्हांसी व झासीहून स्वार आलेत त्यांसी कजिया होईल. त्यास त्यानी विनंती केली कीं आम्हीं येथून जातों. येथें राहात नाहीं. त्यास ते आज येथून कूच करून जातात. हे गेलिया आज्ञा होईल तर ब्राम्हणुब्याचे तालुक्यांत ठहरोलीकराचीं माणसें गांवगना बसलीं आहेत, आज्ञा होईल तर तिकडे जाऊन उठऊन देऊं व किर(कोळ) बुंधेल आहेत याचे पारपत्ये थोडक्यांतच होईल. याची काये आज्ञा ते करावी व धमणावाले ठाकूर यानी आमचा गांव मौजे चपलोटा दरोबस्त लुटून पस्त केला. आणखी जमाव म्हणावा तर दाहा तुबका जमा आहे यास्तव आज्ञा होईल तर पारपत्ये करूं. फौज आलीकडे उतरऊ. विना फौज येथें राहिल्यावांचून समीपील बुंधेल्याचें पारपत्ये होणार नाहीं. याची आज्ञा देवावी व राव राजे येथून जाते परंतु जेव्हां फौज पैलतीरीं आली तेव्हां गेले ऐसें वर्तमान आहे. सिष्टाचारी बहुत करितात, परंतु याजसारिख भले हेच आहे. यांची कोणी भरवसियावर राहील म्हणजे यानी त्याजला दबकाविलें याप्रमाणें वर्तमान आहे. तर च्यार दिवस फौज सागरींच राहूं द्यावी. भक्षावयासहि आज्ञेप्रमाणें कर्ज करून देत जातों परंतु या किरकोल बुंधेल्याचें पारपत्ये आपले पुण्येकरून करितों याची परवानगी सत्वर लिहून पाठवावी. येथून तरकारी हरजिनसी डालिया २ पाठविल्या आहेत पावतील. बितपसील परवरे १२० दोडके १० भोपले २ तोंडाली ८८॥ साखरनिंबें पाठविलें आहे पावेल. सरसेंब्याकडे पजनसिंगानें मोठी धूम आरंभिली आहे. जमाव तों शंभर प्यादा व पंचवीस स्वार आहेत. परंतु बुंधेल्याची दहशत मोठी गावास आहे यास्तव बाम्हणुब्याकडे गेलिया तेहि दबावाखाले येतील. यास्तव विनंति लिहिली जाते याची आज्ञा खामखा करून पाठवावी. आणखी स्वार आम्हां नलगे. येवढी स्वारीनसी ठहरोली देखील भयाभीत होईल. आपण पुण्यवान आहे. मोठें अरिष्ट भगवतें शम केलें, त्यावर हे गरीब काये करणार ! येंदा देशच्या फौजा आल्या म्हणजे या भशागढीचे चिरगाव टहरोली याचे पारपत्य अगत्यरूप करवावे. ज्याप्रमाणें बडेगांवची गत जाली याप्रमाणें त्यांचीहि करावी हें आमचें मानस आहे. आपण पुण्यवान आहेत. आमचें मानस ईश्वर पार पाडील. यांची बुंधेल्याची मर्जी ठिकाणी नाहीं. हे मोठे भले माणूस आहेत ! तर या पत्राचें उत्तर सत्वर पाठवावें. सेवेसीं विनंती श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Immediate help is requisitioned to put down disturbances in Bundelkhand.*

**No. 16]** **[27-10-1761**

छ २७ राखर इसने

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक बाळाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २८ माहे रबिलावल मुकाम नेणवें स्वामी साहेबांचे कृपाकटाक्षें येथास्थित असों विशेष. इकडील वर्तमान तो पूर्वी तपसिलेंकरून अजुरदार जोडीसमागमें विनंती केलें. आ * * जाहलें असेल. सांप्रत स्वामी-कडील आज्ञापत्र छ * [पत्राचा पुढील भाग तुटला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.] * जबरदस्त आहे. यापुढे कांही पुरुषार्थ कोणाचाहि चालत नाही. गिलजीहि अटकेस पावला म्हणोन वदंता. बातनी ठीक आली नाहीं. आली म्हणजे सेवेसी विनंती केली जाईल. वरकड वर्तमान पुर्वणीवरून श्रुत होईल. बहुत काये लिहिणें ? कृपा लोभ केला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Balaji Govind informs Dadasaheb that the Gilchas have penetrated as far as Attock.*

---

**No. 17]** **[27-10-1761**

छ २७ राखर इसने

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. राजे बिजेसिंग यांचे कूचाची आवाई जोधपुराहून मेडत्यासी येणार म्हणोन आहे; यास्तव की राजे माधोसिंग यानी राजे रामसिंग याचा अभिमान धरला आहे. चांपावतानी बोलाऊन सांभरेंत ठेविलें, आणिकहि रजपूत रुसवा करून राजे माधोसिंगजवळ येणार म्हणोन वंदता आहें. निश्चयात्मक बातनी * * * तिकडेहि बातनीस्तव जोड्या

(यापुढील पत्राचा भाग फाटून गहाळ झाला आहे.)

¶*Balaji Govind to Dadasaheb, informing him that Bijesing is proceeding to Merta from Jodhpur and that Madhosing has espoused the cause of Ramsing.*

**No. 18]** **[27-10-1761**

छ २७ राखर इसने

**श्री**

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसिजे. सेवकासी राजियांकडूनहि रोजमरा मिलत नाहीं. याकरितां स्वामीसहि वारंवार विनंती दोनच्यारदां लिहिली; परंतु येकदा तो आज्ञा पावली की तिकडे राजश्री मल्हारजी होलकर आहेत त्याजला लिहिणें. ते थोडी बहुत बेगमी करणें ते करतील. तेथोन ऐवज पाठवावया * सुरक्षित पोहचणार नाहीं. अगर अगत्य अगत्य खर्चापुरते * दोनशे मेलऊन मजला इकडे देविले तर सरकारातून * * * कोणी सावकार मिलत * (पत्राचा पुढील भाग फाटून गहाळ झाला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.) * * याकरिता विनंती * * * सेवकांचा निर्वाह लस्कर * * * स्वामी खावंद आहेत. सेवकांचा प्रतिपाल करणार साहेब समर्थ आहेत. कासिदांच्या जोड्या स्वामीजवल जातात त्याजला दिवसगत लागते. विनंती की लवकर जाब सरकारातून जाहलियां सेवकासी तिकडील खबरदारी राहत जाईल. सर्व प्रकारे प्रतिपाल करणार स्वामी साहेब समर्थ आहेत. बहुत काये लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Balaji Govind to Dadasaheb, complaining that the Raja of Jaipur has not paid him any remuneration and requesting him to send some money.*

---

**No. 19]** **[27-10-1761**

छ २७ राखर इसने

**श्रीशंकर**

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. राजे माधोसिंग यानी दवलतसिंग चत्रभुजोत याजसमागमे सरंजाम देऊन बादशाहजाद्यासी बोलावयाकरितां नजीबखानाजवल पाठविलें. तो जाऊन दिलीस पावला. नजीबखानासी भेटी जाली. * प्रहरपावतो येकांत केला. तदनंतर तोरें २ व रकम जवाहिर १ दवलतसिंगासी दिली व समागमचे

लोकांसी तोरे दिले. हा कालपावेता * जाणतच आहेत. बादशाहाचे घरांत काही बाकी * * * * गोष्टी तो बसले. ठिकाणी कांही—(यापुढील पत्राचा भाग फाटून गहाळ झाला आहे.)

¶*Balaji Govind to Dadasaheb, informing him that Madhosing has deputed Daulatsing to Najibkhan to confer with the son of the Emperor.*

---

*No. 20*] [*27-10-1761*

छ २७ राखर इसने

**श्रीशंकर**

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २८ माहे रावल मुकाम नेणवें स्वामी साहेबांचे कृपाकटाक्षें येथास्थित असों विशेष. येथील मजकूर तर पूर्वी अजुरदार जोडीसमागमें विनंती पत्रें (पाठविलीं) आहेत, त्यावरून श्रुत जाहलें असेल. सांप्रत इकडील प्र * * * नासी व ब्रम्हपोता यांनी केशवरायाचे * (पत्राचा पुढील भाग फाटून गहाळ झाला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.) * * अनायासे उपायाने शत्रूस कमजोर करून टाकावे. राजश्री मल्हारजी होलकरासी पत्र पाठवणार साहेब समर्थ आहेत. तीन दिवसपावेतो मनसबा राहिला. दिवाण नंदलाल यांजला हुकूम केला कीं तुम्ही बमैफौज सुरतरामाजवल जाऊन शामील व्हा. यावरून नंदलालानी अर्ज केला कीं तिवडियासीं आम्हांसमागमें द्या. तिवडियानी राजियासीं म्हटलें कीं माहराज माझे तो काम जुजात जावयाचे नाहीं. दिवाणच जातील. राजियानीं नंदलालासी आज्ञा केली कीं तुम्हीं नेणवियाची फते करून पाटणासी जा. दिवाणासी रुखसत केलें; तेहि दिवसा येका दोंमधे येथें येणार. आलियावर जे वर्तमान होईल ते सेवेसी विनंती केलें जाईल. वरकड कितेक वर्तमान पुर्वणीवरून श्रुत होईल. बहुत काये लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Govind to Dadasaheb, informing him that the Raja has deputed his Diwan Nandlal to proceed with an army to Nenave and capture it.*

No. 21] [27-10-1761

छ २७ राखर इसने

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. दोन तीनदां सेवेसी विनंती लिहिली कीं राजे माधोसिंग याजकडून खर्चास रोजमरा पूर्वी मिळत होता तो गिलजी या प्रांतास आला व श्रीमंत भाऊसाहेबासी व त्यासीं जुंज जाले त्या तागाईत रोजमरा राजियांकडून मिळत नाहीं. याहीवर सेवकाजवळ खर्च बहुत, श्रीमंताचे आज्ञेनसार दहा जोड्या * * बातनीस सेवकाजवळ राहतात. जागजागा * * * करितो त्याचाहि रोजमरा (पत्राचा पुढील भाग फाटून गहाळ झाला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.) * * चिटी आम्हावर पाठवणें. सर * * पोहचते केले जातील तर तसा सावकार कोणी मिळत नाहीं; आणि साहेब तेथोन पाठवितील तर मार्गात पोहचणार नाहीं याजकरितां संदेह. यास्तव विनंती की इकडे राजश्री मल्हारजी होलकर आहेत यांजला पत्र सादर होये की राजश्री बालाजी गोंविंद यांसीं खर्चासी याप्रमाणें पावतें करणें. इतके पत्र सादर जाले म्हणजे होलकरांजवळ पाठऊन खर्चाची नेमणुकी करून कासिदासी आजपावेतो ऐवज चुकवून देऊं. आजपावेतो कासिदासी आज्ञेप्रमाणें ठेविलें. आतां आज्ञा येईल तर ठेऊ; नाहीं तर दूर करूं. दोनीतून येक आज्ञा. व परामृश घेणार साहेब समर्थ आहेत. बहुत काये लिहिणें. कृपा केली पो हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Govind complains to Dadasaheb that he has not been receiving his remuneration from Madhosing who has stopped paying it since Bhausaheb's encounter with the Gilchas. He requests him to write to Holkar to make payment to him so that he can pay the wages of the several messengers in his service. Otherwise he will have to discharge them.*

---

No. 22] [13-11-1761

पौ छ २२ जावल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराम फडणीस सुभा कालपी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ रबिलाखर मुकाम नजीक मुकुंदबारी येथें राजश्री

मल्हारजी होळकर यांचें लष्करांत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री गणेश संभाजीकडे मामलत आज दोन वर्षे जालीं त्यापासून फडनिशीचें काम येकंदर न घेतलें. येविशी दोनच्यार विनंतीपत्रीं सविस्तर वर्तमान लिहोन पाठविलें त्यावरून विदित जाहालेंच असेल. येशास राजश्री बाबूराव कोन्हेर यांणीं झांशीचा किल्ला हवाला केल्यावर केवळच बदमामलीवर नजर देऊन झांशी शहरापासून येक लाख तीस हजार दंड घेतला व आणखी गांवांतील राजश्री केशवराव हरकारे यांचा पुत्र वगैरे दक्षिणी ग्रहस्त बावन आसामी लिहोन कैद करून दंड घ्यावा ऐसा विचार केला. राजश्री माधवराव वेंकटेश याकडे नारो शंकर याणी झांशी संस्थानच्या सनदा पाठविल्या त्या मशारनिलेनीं दाखविल्या. परंतु अमल न दिल्हा. उलटें गांवांतून काढून दिल्हा. सुज्यातदौलाकडे गोसावी याचे विद्यमानें चाकरीचें सूत्र लाऊन वकील पाठऊन ठीक केलं. सेवक सरकारांत विनंतीपत्रें लिहितो हें वर्तमान पुण्याहून मशारनिलेचा वकील सदाशिव बल्लाल व त्याचा भाऊ गोपाळ संभाजी यांणीं लिहोन पाठविलें त्यावरून सेवकांस कैद करावें असा विचार योजिला. तेव्हां येकायेकींच गणेश संभाजी बडेगाव नजीक झांशी दोन कोंस येथें होता व सेवक झाशींस होता तेथून भाद्रपद वद्य द्वादशीस सर्व वस्तभाव व कागदपत्र सोडून कारकून न ठेवतां निघोन लांब लांब मजली करून नरवरावरून शिरोंजेस आलो. पुढें सोबत पाहून वरकड घांट बंद, याकरितां इंदूरचे वाटेनें आलों तों सेंधव याचा घाट राजश्री मल्हारजी होळकर यांणीं बंद केला. याकरितां इंदुराहून येक मजल कूच करून उजनीचे वाटेवर सुभेदाराचा मुकाम होता तेथें भेट घेऊन सविस्तर वर्तमान विदित केलें. इतकियांत सुभेदारास स्वामीचें पत्र आलें कीं तुम्ही हुजूर येणें. त्यास राजे माधोसिंग यांणीं नेणव्यास मोर्चे लाऊन माळव्यांतील अंमल उठवावा म्हणोन फौजसुद्धां चमेलीवर आला. त्याचें पारपत्य न करावें तरी माळवा राहाणार नाहीं. याकरितां सुभेदार दरमजल कूच करून येथें आले. पुढें राजश्री गंगाधर येशवंत सडे फौजेनिशी रवाना केले आहेत. आठा पंधरा दिवसांत राजे माधोसिंग माघारां जैनगरास गेला तरी उत्तम, नाहीं तरी युद्धप्रसंग होईल. परंतु यापाशीं फौज थोडी आहे. देशीं लोक नालबंदी घेऊन गेले ते आले नाहींत. शिंद्याकडील खानाजी जाधव वगैरे दोन हजार आहेत ते उजनीस आहेत, अद्यापवर पोहोंचले नाहींत. लौकर फौज येऊन पाहोंचल्ये तरी उत्तम आहे. बिजेसिंग व कोटेवाले व बुंदीवाले याचे वकील (आले) आहेत. येक सुभेदाराची हिंमत व स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून शत्रूचा पराभव होईल. माधोसिंग उन्हेलावर होता. तेथून कांहीं फौज

नेणव्यास व केशवराव पाटणे येथें ठेऊन आपण दोन मजला मागें जैनगरच्या रोखें गेला म्हणोन वर्तमान आलें आहे. ईश्वर सर्व उतमच करील. गणेश संभाजीनें सरकारआज्ञा न मानून बुंदेल्यांशीं बिघाड केला व झांशीस येऊन बोंडसे दतियावाले वगैरे यांशीं बिघाड केला आहे आणि सुज्यातदौलाकडे चाकरी ठीक केली. शांहा आलम पातशाहाचे परवाने आणिले. कागदींपत्रीं गणेशराव बाहादर लिहितात. केवल यैवनमये जाले. सेवक निघोन आल्यावर राजश्री केशवराव हरकारे यांचा पुत्र बद्रीनाथराव यांस कैद केलें. तीन लाख रुपये मागत आहे. आपलें घरीं बोलाऊन बसविला. दोन दिवस अन्न खादलें नव्हतें. तिसरें दिवशीं भोजन कैदेंतच केलें. रुपयाचा ठराव जाहला नव्हता, सर्वस्व घेऊन मला जाऊं देणें ऐसें म्हणत होता म्हणोन मशारनिलेचें पत्र सुभेदारास घेऊन काशीद आला तो जबानी सांगत होता व पत्रीं लिहिलें आहे. येविशी बद्रीनाथराव याचें पत्र स्वामीसहि आलेंच असेल. दुसरें पाणिपताहून आल्यानंतर राजश्री सुभेदारांनीं व राजश्री त्रिंबकराव सदाशिव नाना यांणीं किल्ले भिंड प्रांत भदावर येथें जगन्नाथ धोंडाजी म्हणोन ग्रहस्थ ठेविला होता; त्यास अश्विन शुद्धांत भदावरचे राजानें मोर्चे लाविले; पंधरा दिवस जुंजला. गणेश संभाजीस कुमकेविशीं बहुत पत्रें पाठविलीं परंतु कुमक न केली. शेवटीं तग धरवेना तेव्हां ठाणें सोडून जगंनाथ धोंडाजी झांशीस आला. त्यावर लटकें निमित्य ठेऊन लुटून घेऊन झांशी किल्लयांत कैद केलें आहे. त्यापाशीं प्रतापशा निसर कारभारी तो सांगतो तैसें करितो. आज दोन वर्षें काल्पी वगैरे तालुका दुसालां चौवीस लाख व बुंदेलखंडची जप्ती मिळोन कमकसर पंनास लाख व झांशीचे संस्थानांत दांड वगैरे मिलोन दाहा बारा पावेतों इतका पैसा घेऊन लटका खर्च वाढऊन नास केला व आपलें घर केलें. सरकारांत सितैनमध्यें पुण्यांत लोकांपासून रसदा घेऊन च्यार लाख सरकारांत दिल्हे, त्यांपैकी ज्यास मामलती सांगोन पैसा घेऊन आपण खादला, त्याचा तसाच दोन लाख ऐवज राहिला तेव्हां सरकारांत दोन लाखच पावलेसें जाले, व इहिदेत दिल्लीत वराता वगैरे मिलोन पावती साडेतीन पावेतों बरकड वरातास ऐवज पावला नाहीं. शेब्याची वरात व किल्ले ग्वालेरचे बेगमीची वरात यांस पैसा पावला नाहीं याप्रमाणें सितैन व इहिदेची गत. या सालची रसद सरकारांत दिल्ही नाहीं. यैवज वसूल घेऊन उडव * * * * बुंदेलखंडची जप्ती तशीच आहे. विना गणेश संभाजींचे पारपत्य केल्याखेरीज रजवड्यांशीं सलूख होऊन पूर्ववतप्रमाणें अमल चालोन सरकारांत ऐवज येणार नाहीं. याकरितां राजश्री सुभेदारानीं सेवकास समागमें ठेऊन घेतलेच. त्रिंबकराव शिवदेव यांचें नांवें काल्पी

वगैरें माहालची कमाविशीची सनद पाठऊन द्यावी म्हणोन स्वामीस विनंतीपत्र लिहून सेवकांजवळ दिल्हें तें सेवेसी पाठविलें आहे; पावोन सर्व अर्थ ध्यानांत येईल. विना सुभेदार ते प्रांतें गेल्यावांचून बंदोबस्त होत नाहीं. झांशी चाळीस लाखाचें संस्थान व बुंदेलखंड राजश्री बाळाजी गोविंद यांकडे आहे. त्यासुद्धां तीस लाख व ग्वालेर वगैरे पांच सात लाख रुपयाची जागा राहात नाहीं. सुभेदार गेल्यानें इतकी जागा राहोन अंतरवेदी गेली आहे तेथीलहि बंदोबस्त होईल. परंतु राजे माधोसिंग याचा शह वारून ते प्रांतें जाऊं याची सुभेदारास आज्ञा जालियास जातील. सेवेसी सविस्तर विदित व्हावें म्हणोन लिहिलें असे. आज दोन वर्षें गणेश संभाजीपाशीं कर्ज खाऊन राहिलों व हल्लीहि येथें कर्ज खात आहे. सेवकास आज्ञा येईल तदनुसार वर्तणूक करीन. राजश्री बाबूराव कान्हेर याची सरकारांतून तहेंगिरी[१] होऊन आठ नव महिने जाहाले. लोक सर्व उठोन गेले. संस्थान राहाणें कठीण जाणून सरकारचें आज्ञापत्र गणेश संभाजी पाठऊन आपण जाऊन झांशीस आणिलें. कुमकी पथकाप्रमाणें राहेना, उठोन जाऊं लागला, किल्ला हवाला करणें तरी राहेन म्हणोन गणेश संभाजीनें आड घातला; याकरितां झांशी किल्ला हवाला केला. त्याजवर बाबूराव यासी बदमामली करून कैद करावेंसें केलें. येविशी मशारनिलेचें पत्र सेवकास व राजश्री कृष्णराव गोविंद यास पत्र आलें तेच बजिनस पाठविलें आहे त्यावरून विदित होईल. बाबूराव कान्हेरे यांचा शोध बहुत केला परंतु दुसरा विचार नाहीं. सरकार चाकरींत येकनिष्ठ आहेत; परंतु गणेशपंताचे पेचांत आहेत. वरकड वर्तमान राजश्री कृष्णराव गोविंद वकील यांणी विनंतीपत्र लिहिलें आहे त्या वरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Trimbak Ram Fadnis reports to the Peshwa the mischievous activities of Ganesh Sambhaji in Bundelkhand, Jhansi and other Maratha possessions and requests the addressee to mete out severe punishment to the offender for his disloyal conduct. Madhosing's irruptions in the Maratha territory are also referred to.*

---

*No. 23*] [*17-11-1761*

पौ छ ३० साबान इसने

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत प्रधान
माधवराव स्वामींचे सेवेसी

पोष्य राव बदरीनाथ केशव साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत १९ माहे रबिलाखर जाणून स्वानंदलेखन आज्ञा कीजे. विशेष. आपलें कृपापत्र

१ तगीरी, बडतर्फी.

सविस्तर पावलें, लेखनार्थ कळों आला. दक्षणचें कामकाज जाल्यावर फौजा हिंदुस्थानास रवाना होतील. ऐशियास हाहि विचार उत्तमच आहे. आतां कां(हीं) तिकडील निवाडा होण्यास विलंब लागणार नाहीं. आजपावेतों कामकाज सिद्धीतें पावलें असेल, फौजा रवाणा जाल्या असतील. इकडे फौजेचें येणें आगत्यच आहे. दाहा पंधरा (हजार) फौज झांशीपावेतों येऊन पावली तर आवाईनें काम बहुत होईल. राजश्री मल्हारराव सुभेदार यांस माधोसिंगाकडीलहि काम आगत्यच आहे. पूर्वपश्चमचें अंतर आहे. दोहीकडील काम सांभाळलें पाहिजे. पातशाहा आजपावेतों जाजमऊजवळ होते, आतां कूच केलें. कालपी-जवळ उतरणार, दिल्लीकडे जाणार हे वदंता आहे. सुजाउदौलानें सर्व आपली सामोग्री लखनौंतून काहाडली, प्रयागचे किलियांत नेऊन ठेविली. आपण समागमें पातशाहाचें दिलीस जाणार. दिलीचे हवेलीची तयारी त्याणें करविली आहे, व नजीबखान दिल्लींत होता तो कूच करून हिसार प्रांती बंदो(बस्ती करावयास) गेला. जाटासी त्यासी सुलेहचा जाबसाल * * * * प्रसंग कांहीं दिसत नाहीं. नजिब [ पुढील सुमार तीन ओळी फाटल्या आहेत ] तालुका आपलें स्वाधीन करून घ्यावा. दर * * दालीचें चापर म्हणजे सजावले राजे नागरिमल * * आले आहेत. सुरजमल जाटाची मामलत व * * * ची मामलतेचा पैका मागावयास आले आहेत. * * * * * * जे नागरमल दिलीहून जाबसालाकारणें जाटाजवळ येणार आहेत. चापर बोलत आहेत कीं, अबदालींची फौज पिशावरेपावेतों पावली, सिखांहीं लाहोर प्रांतीं हगामा केला आहे. त्या (पार)पत्याकारणें येणार व जाटानें पैका न पाठविला तर माघमासपावेतों आपण शाहा येणार आहे. सत्य मिथ्य तेच जाणेत. कळलें वर्तमान आपले सेवेसी विनंती केलें असें. आमचें वर्तमान तर आम्ही कोठवर लिहावें ! परस्परें माहाराजांसी विदित जालें असेल. आम्ही सविस्तर चिरंजीव राजश्री राव मुकुंदराव आमचे बंधु देशीं आहेत ते सविस्तर सेवेसी विनंती करितील. * * वा तर आपलें राज्यांत आजपावेतों नीत, व मर्यादा व धर्मन्याय व दया व प्रजापालन व दुसऱ्याचें दुख ऐकणें व त्याचें पारपत्य तात्काळ करणें यथास्थित आहे. येणेंकरून जय व प्रताप विशेष आहे, व पुढेंहि होईल. येथें अविचार कर्म केलें परिणाम न विचारला. शासन व नीत माहाराजाची विस्मरण करून अल्पबुद्धीनें करणें तें केलें. सर्व प्रकारें आपण न्यायें निष्ठुर व शासने व नियंते आहेत, मुलाजा कोणाची करणार नाहींत. विशेष काय ल्याहावें हे विनंती.

¶*Badrinath Keshav sends news from the North and speaks of the activities of the various potentates—Najibkhan, Shuja-ud-daula and others.*

4144

*No. 24*] [*17-11-1761*

पौ छ ३० साबान इसने

**श्रीकृष्णोजयती**

**श्रीमंत माहाराज राजेश्री**
**रघुनाथरावजी दादा स्वामींचे सेवेसी**

पोष्य राव बदरीनाथ केशव साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ १९ माहे रबिलाखर जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. माहाराजाचें कृपापत्र छ २९ मोहरमचें पावलें. लेखनार्थ कळों आला कीं, सातारियास जाऊन पेशवाईची वस्त्रें व हस्ती घोडे सिरपेच व तुरा मोत्याचा व पथक व तलवार व ढाल व बाजे बहुमान पेशवाईचे पदाचे श्रीमंत माधोरावजीस देवऊन तेथून पुण्यास स्वारी येऊन फौज लक्ष जमा केली. बंदोबस्त करून हिंदुस्थाना(स) ये(ऊ) ऐशियास महाराज प्रतापवान आहेत. वडील पूज्य सर्वांस आहे. येथायोग्य होतें तें केलें. सामोग्री विपुळ घरची सिधच आहे. आपल्या तपोतेजेंकरून सर्व पादाक्रांत होतील. आल्पबुधीनें वर्तनूक ज्याने केली असेल त्यास सिक्षा त्वरीतच होईल. आपले आपुनच सर्व लयातें पावतील. माहाराजाचे सर्व करतलामल आहे. आपला पराक्रम व दर्प सर्वांस बरें प्रकारें विदित आहे. आबदालीसहि आपलेंच भय विशेष आहे. त्यानें येकदां आपले तेज अनुभविलें आहे कीं, आटकपावेतों त्याचा उछेद केला होता. त्या भयास्तव आतां वरच्यावर याकूब अलीखानास पत्रें पाठवीत आहे कीं, हरप्रकारें सलुक करून सरहद मुकरर करणे * * * कांहीं होणार नाहीं. यैसें * * * इकडील वर्तमान तर * * * मऊ जवळ फार दिवस सुजा-उद्दौलानें आपलीं मुलें मानसें व खजिना वगैरे सरंजाम * * * मुनका (?) बांधून श्रीप्रयागाचे किल्यात पा * * * घेणे तो घेतला. आतां पातशहास व * * * यास्तव तेथील हवेलीचीहि तयारी करविली आहे. कोणत्या घांटी उतरतील तें पाहावें. जमिदाराचे मनांत कीं, काल्पीच्या घांटें उतरून बुंदेलखंडांत आपला आमल बसोन दिलीस जावें. पाहावें काये ठहरतें. दिलीहून नजिबखानानेंहि कूच करून बंदोबस्ताकारणें हिसार प्रांती गेला. त्याणे वकील अबदालीकडे पाठवणें मुकरर केलें आहे कीं, त्याजपासोन लाहोरची सुबेदारी व सिरहंदचा तालुका आपले स्वाधीन करून घ्यावा. परंतु प्रस्तुत अबदालीचे चपर म्हणजे सजावल राजे नागरमलाजवळ दिलीस आले आहेत. सुरजमलाची मामलत व गाजुदीखानाची मामलतेचा पैका मागावयास आले आहेत.

4145

यास्तव राजे नागरमल दिलीहून जाबसालाकारणें जाटाजवळ येणार आहेत. चापर म्हणत आहेत कीं, आबदालीची फौज पशावरेपावेतों, सिखांही लाहोर प्रांतीं हगामा केला आहे त्याचे पारपत्यास जाणार व जाटानें पैका न पाठविला तर माघ मासीं आपणच शाहादाखल होईल. सत्य मिथ्य तेच जाणेत. कललें वर्तमान आपलें सेवेसीं विनंती केले आसे. झांसीचें व आमचे वर्तमान तर परस्परें माहाराजास विदित जाले असेल. चिरंजीव राजश्री राव मुकुंदरावजी आमचे बंधू देशीं आहेत ते सविस्तर सेवेसी विनंति करतील, आम्हीं काय ल्याहावें. आपले राज्यांत आजपावेतों नीत व मर्यादा व धर्म व न्याय व दया व प्रजापालन व परदुःख येकणे व त्याचें पारपत्य तात्काल करणें यथास्थित आहे. येणेंकरून जय व विपुल प्रताप आहे व पुढेंहि वृध होईल. येथें आविचारित कर्म केलें परिणाम न विचारला. शासन.व नीत माहाराजाची विस्मरण करून आल्पबुद्धीनें क्षुलक कर्म करूं नये तें केलें असो. * * * येकनिष्ट व शासते व नियंते आहेत. मुला * * * * करतील. विशेष काय लिहावे. हे विज्ञापना.

¶*Badrinath Keshav draws a graphic picture of the North after the Panipat disaster had banished Maratha influence for the time being. With the Sikhs in revolt the Abdali had no peace in the Punjab and was pressing for some sort of understanding with the Marathas. Shuja-ud-daula had occupied Prayag and was casting a covetous eye upon Bundelkhand. As regards Najibkhan, he was active in Hissar and trying to secure for himself the Subhedarship of Lahore and Sarhind from the Abdali.*

---

*No. 25*] [*22-11-1761*

पो छ १४ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित त्रिंबक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत छ २४ माहे रबिलाकर जाणोन स्वकुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तों हा कालवर बुंधेल्यांची दुंडी मिटत नाहीं आणि पोत्यांचें काम चालू होत नाहीं. सेवेसीं विनंती दाहापांचदां केली परंतु ब्राम्हणुव्यास स्वार राहिल्यानें बंदोबस्त होईल तर स्वारांची रवानगी

करावी. जल्द आलिया पुढें उन्हारीची जोतपातं[१] होईल. नाही तर उन्हारी पडेल, यास्तव वारंवार पत्र लिहितो तर राजश्री बालाजी गोविंद यांची रवानगी जल्द करावी आणि ब्राम्हणुव्यास राहिलें म्हणजे बंदोबस्त होईल, नाहीं तर होणार नाहीं. मौजे बिंझारे येथील महतिया जिवें मारून टाकला. च्यार माणसें मारलीं गेलीं, याप्रमाणें बुंधेले हरामखोरी करितात. सेवेसी विनंती श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Trimbak Vishvanath to Vishvasrao Lakshman stating that the riots in Bundelkhand make it impossible for him to realise revenue from the district.*

---

*No. 26*] [*26-12-1761*

पौ छ १ जमादिलाखर

## श्री

### श्रीमंत राजश्री रावसाहेब साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक रामचंद्र दरोगे व पुंजाजी कृतानेक सां नमस्कार आण सां दंडवत विनंती विज्ञापना. सेवक लोकाचें वर्तमान ताा छ २८ जोवल मुाा दमुत्रा साहेबाचे प्रतापेकरून येथास्थित असे विशेष. साहेबाची आज्ञा घेऊन स्वार जालो ते छ मजकुरी लस्करदाखल जालो. राजश्री भाऊची भेट जाली. उपरांतिक खासबरदार आा वीस तोफा बरोबर दिल्हे. त्यापैकी पाव आसामी ठेऊन घेतल्या. बाकी पंधरा आसामी याची रवानगी केली. ते सेवेत येऊन पोहोचतील. उदईक कूच करून महूमोहनीस राजश्री भाऊ जाणार. आम्हीहि समागमेच आसो. सेवेसी श्रुत होये. विशेष काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*The writer one Ramchandra Daroge informs Vishvasrao Lakshman that he has interviewed Bhausaheb (the pretender) and will accompany him as far as Mahumohani.*

---

*No. 27*] [*Recd. 30-12-1761*

छ ३ जमखर

## श्री

### श्रीमंत राजश्री राऊसाहेब पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक धनसिंग साष्टांग दंडवत विज्ञापणा येसी जे. सेवकास मारवाड प्रांतीं राजा बिजेसिंगाकडे पाठविलें होतें तेथें जाऊन श्रीमंत कैलासवासी-

---

१ लावणी, मशागत.

जीची आज्ञाप्रमाणें जाबसाल केला. उंटाची फरमाविसविसीं सांगितलें. ते सर्व तजवीज त्याणी केली होती. इतकियांत श्रीमंत कैलासवासीजीचें वर्तमान आलियावर ते सर्व तजवीज मोकुफ जाली. आम्हास व राजश्री गोविंदराम महतास आपलाकडोन वकील यैसे रवाना केले ते उजेनीस आले. ते येक तर मार्ग बंद चालत नाहीं. दुसरे सरिरास बरें वाटत नाहीं. खर्चाची विपत विशेष आहे. येथें कोन्ही वलखीचा नाहीं की कर्जवाम देईल. सर्व भरंवसा स्वामीचे पायांचा आहे. त्यासी कृपाळु होऊन कांहीं खर्चास पाठविनार स्वामी धनी समर्थ जाहेत. नाहीं तर येथील कमाविसदारास येक आज्ञापत्र सेवकाचे विसई सादर होये कीं आम्हांस खर्चास देऊन स्वामीचे सेवेसी पावते करून देणें, यैसें आज्ञापत्र सादर केलें पाहिजे. यानंतर राजकी वर्तमान यैसे जे राजश्री मल्हारराव सुभेदार दरकूच कोव्यास जाऊन कोटेकराची फौज समागमे घेऊन कछवायेची फौज चमल उतरून आली होती त्यासी जाऊन बुडविली. राजसिंग घोडचव्या जखमी होऊन व पलाली फौज यैसे खोपरास जाऊन लपाली आहे. मागें राजश्री सुभेदारहि जाऊन खोपरास लागले आहेत लोकांचे कर्जाखाले फसून राहिलों आहों. त्यासी कृपालु होऊन खर्चाचा प्रमृश करनार स्वामी धणी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Dhamsing informs the Peshwa that Malharrao Holkar after combining his forces with those of the Chief of Kotah has crushed the army of Jaipur which had crossed the river Chambal.*

---

*No. 28*] [*1761-62?*

[ पहिले चार बंद गहाळ ]

५

श व होलकर सिंदे पांच हजार याप्रमाणे पाठवावे. नजिबखान याची फौज तिकडे आहेच. त्याणी याणी मिळून धामधूम करावी याप्रमाणे नेमणूक जाली आहे. मामलत जालियास फौज जाणार नाहीं. नवाब गाजदीखान आले. त्याचे मनसबे, आपल्यास वजिरी द्यावी वगैरे राजकारणे होती. परंतु प्रस्तुत कांहीच कोणी मान्य न करीत जाणून त्याणी निरोप घेतला आणि सिंद्याचे सेजारी राहिले आहेत. आंमदखान याचा वकील आलियामुले राहिले आहेत, परंतु जातील. नजीबखान समागमेच आहेत. उभयता सरदार व सरकार मिलोन च्यार ठिकाणे. येकादा नवीन मजकूर करणे तर आपले घरीं करून सरदारांस सांगोन त्याचा जाबस्वाल घेऊन नजीबखानास सांगोन ठीक करावे तर

आठ रोज लागतात. मग सेवटास जाणे तर जाईल अथवा कोणाचा गुढगा बसोन राहेल असा होये विचार आहे. जाले वर्तमान सेवेसी श्रृत असावे म्हणौन लिा असे. सेवेसी श्रृत हे विज्ञापना.

¶*This paper, which contains the concluding portion of a letter, the first four sheets of which are missing, refers to some joint activity in the North of Sindia, Holkar and Najibkhan and further speaks of Ghazi-ud-din as trying to win for himself the office of the Vazir-ul-Mulk.*

---

*No. 29*] [*1761-62*

(पहिला बंद गहाळ)

पडोन संकोच्याते पावले येदर्थी संदेह नाही. खासा स्वारी देशास गेली. सरदार इंदूर उजन प्रांती राहिले. राजश्री विठलराऊ सिवदेव ग्वालेरीहून देशास गेले. इकडे मातबर फौज नाही. सुने रान पाहून जाटाने पाय पसरोन सर्व आकर्षण करून केवल आरूढ जाला आहे. जैनगरवाल्यास व बिजेसिंग यांस लेहून पाठविले कीं दक्षणिया * * मुलुक सर्व घेतला तमाम ठाणी उठविली. तुम्ही उजनप्रांत जप्त करणे तोपर्यंत आम्ही इकडून बंदोबस्त करीत येत असो गेमे प्रकार जाटाने योजिले आहेत. त्याच शत्रुने येखादे मातबर स्थल हस्तगत करून घेतल्या येणे कठीण पडेल. आम्ही श्रीमंतास व सरदारास पत्रावरी पत्रे पाठवीत गेलो परंतु आद्याप फौजेचे आगमन दिसत नाही. बरसातीकरिता आनमान किंवा काये मनसबा आसेल तो न कले. येथील प्रसंग तो लिहिता येत नाहीं. आम्ही साहेबकामास प्राणसंकल्प केले आहेत. तथापि उपराळा जाला पाहिजे. येसियास आपणहि मुजरत सरदाराकडे व श्रीमंताकडे पत्रे पाठऊन ताबडतोब फौज येऊन पोहोचे ते करावे. मुख्य गोष्ट श्रीमंत स्वामीचे कल्याण आसल्या सर्वास * * * झासी करेरा लाहान जागा नाही. मालव्यातील मोठा नाका आहे. हा राहिल्या अमित्र पुढे येऊ पावणार नाही. याजकरिता इकडील साहित्य होऊन बंदोबस्त राहे ते करावे श्रीमंतास तपसीलवार लेहून इकडे फौज सत्वर येई ते करावे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे. सदैव पत्र पाठवीत आसावे हे विनंती.

¶*The writer advises that the danger arising from the Jat's attitude has taken an aggravated form and must be dealt with firmly and immediately.*

4149

No. 30] [10-1-1762

नकल

श्री

राजश्री विष्णु माहादेव कादार प्रा

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रो मल्हारजी होलकर व जनकोजी[1] सिंदे दंडवत सुा इसने सितैन मया व अलफ. श्रीमंताकडून मालवे प्रांतच्या बंदोबस्तास राजश्री विश्वासराव लक्ष्मण आले आहेत. यासी खर्चास तुम्हाकडून रुपये १३००० तेरा हजार देविले आसेत. तरी सदरहू तेरा हजार रुपये प्रा मार येवजी मारनिलेस पावते करून कबज घेणे. पा मजकुरचे येवजी तुम्हास मजुरा पडतील. जाणीजे छ १४ जमादिलाखर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Vishwasrao Lakshman has been appointed to administer the province of Malwa.*

---

No. 31] [10-1-1762

नकल

श्री

राजश्री सदासिव कृष्ण कादार पा सिऊरदुऱ्हाये गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो मल्हारजी होलकर व जनकोजी सिंदे दंडवत सुा इसने सितैन मया व अलफ. श्रीमंतानी राजश्री विस्वासराव लक्ष्मण मालवे प्रांतच्या बंदोबस्तास पाठविले आहेत. तरी यास खर्चास तुम्हाकडून रुपये १०००० दाहा हजार देविले असेत तरी सदरहू दाहा हजार रुपये पा मजकुरचे येवजी मारनिले पावते करून कबज देणे. तुम्हास सरकारातून पा मारचे येवजी मजुरा पडतील. जाणीजे छ १४ जमादिलाखर हे विनंती.

¶*An order upon Sadashiv Krishna from Malharrao Holkar to deliver to Vishvasrao Lakshman the amount of rupees ten thousand to enable him to meet his expenses.*

---

No. 32] [1-2-1762

छ २८ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता माघ शुध ७ मुकाम सागर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित

---

१ शिंद्याच्या दौलतीवर नवीन माणसाची नेमणूक होईपर्यंत जनकोजीच्या नांवें कारभार चालला असें दिसतें.

असे विशेष. इकडील वर्तमान दोनचार पत्री सेवेसी लिहिलेच आहे. हाली वर्तमान तरी सुजाउदौला पातशाहा काल्पीस आलियाउपरी राजश्री गणेश संभाजी भेटले. आम्हासहि भेटीस बोलाविले होते. परंतु दग्याचा प्रकार आढलल्याउपरी आम्ही न गेलो. शेवटी त्याची फौज चालोन मुकाबला जाल्यावर त्याचे सामान फार यामुले आम्ही बुनगे सुधा सर्व संभाळून झासीस आलो. तेथील करऊन राजश्री बाबूराव कोनेर करारेयासी राहिले तेथीलहि बंदोबस्त जालियावर सिरोंजेस आलो. तो लोकानी फार गवगवा केला. रोजमरेयाकरितां यास्तव व माळव्यातील कामदार सर्व उठोन जाऊं लागले. हटे वगैरे जागा तमाम दंगा जाला. सर्व माळवा जातो जाणून कांहीं फौज रा। वासुदेव संभाजी बरोबर उठोन गेली. राहिली ती व रा। धोंडो दत्तात्रेय पथकसुधा आम्हाबरोबर आले. हे घेऊन इकडे आलो. सुजाउदौला झासीस मोर्चे लाऊन आहे. येथून पाचसा मजलीवर आहे. झासी घेतल्यावर इकडे तो आला तर टिकाव होणे नाहीं. तमाम जमीदाराची सूत्रे त्यांकडे आहेत देखील रोहिले माळव्याचे. यास्तव जर जलदीने खासा स्वारी अथवा फौज मातबर पुढे रवाना होईल इकडे येईल तरीच स्थित राहील नाहींतर राहिले किले हेहि जातील. सविस्तर वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री बाबूराव काका विनंती करितील. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Govind reports to the Peshwa that being outnumbered by the large force of Shuja he fell back upon Jhansi. From thence he moved on to Sironj where the discontented troops threatened him for their arrears. Shuja has advanced upon Jhansi and the writer says Jhansi cannot hold out long unless succour is sent.*

---

*No. 33*] [*16-2-1762*

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री विश्वासराव यांसी प्रति नारो शंकर आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ २१ रजब मुकाम पाटोदे येथास्थित असे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. लि। अर्थ सविस्तर अवगत जाहाला. पत्रोत्तरे येथून वरचेवर पाठविली आहेत त्याजवरून कळलेच असेल. राजश्री मल्हारराव सुभेदार यांच्या व आमच्या उदईक भेटी होतील. तदनंतर सविस्तर मजकूर तुम्हास लिहोन पाठऊ. याउपरी इकडे गुंता किमपि नाही. मजल दरमजल त्या प्रांते येत असो. तुम्ही कोणेविसी चिंता न करावी. झासीकडील बातमी वरचेवरी लिहोन पाठवावी. बहुत काये लिहिणे आसीरवाद.

¶*Naro Shankar writing to Vishvasrao Lakshman says he is meeting Malharrao Holkar the next day and thereupon proceeding to the north.*

4151

*No. 34*] [*26-2-1762*

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री विश्वासराव यांसी प्रति नारो शंकर आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ १ साबान मु॥ मलगाव यथास्थित असे विशेष. तुम्ही माघ वद्य द्वितीयेचे पत्र पाठविले ते पावलें व आणखी तीन च्यार पत्रें पाठविली व झासी मात्र शुध ७ शत्रूस वश जाहली याचें पत्र पाठविलें तें व कमावीसदारांची पत्रें तुम्हास आलीं ती तुम्ही बजिनस आम्हाकडे पाठविलीं ती पावलीं. तिकडील वर्तमान विस्तारयुक्त लिहिलें तें साद्यंत अवगत जाहाले. आमच्या व राजश्री सुभेदाराच्या भेटी नांदगाव साकोरे याचे मुकामी होऊन येथे आलो. पुढें मजल दरमजल त्या प्रांती येत असो. याउपरी इकडील गुंता किमपि उरला नाहीं. सत्वर येतो. कोणेविसी चिंता न करावी. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद. तुम्हापासी ऐवज जमा असेल तों आम्हाकडे रवाना करावा व फौजेचा खर्च भारी त्यांप्राते येईल त्यास दोन च्यार लक्ष रुपये जमा करून ठेवावें. आम्ही सत्वर येतो हे आसीर्वाद.

¶*Naro Shankar acknowledges receipt of the letter giving news of the loss of Jhansi and writes that he is returning to the north to relieve the situation.*

---

*No. 35*] [*26-2-1762*

श्री

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री चिमणाजीपंत**
**व खंडोपंत स्वामी गोसांवी यासी**

पो। नारो शंकर कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असावे विशेष. तुम्ही पत्रे पाठविली ती पावलीं. झांसी गेलियाचे वगैरे वर्तमान तपशीलवार लिहिले ते अवगत जाहाले. ऐसियासी कालानुरुप होणे ते होतच आहे. आमच्या व राजश्री सुभेदाराच्या भेटी जाहल्या. याउपरी इकडेस गुता नाही. मजल दरमजल त्याप्रांते येत असो तुम्ही वरचेवर वर्तमान लिहोन पाठवीत जाणे. रा। छ १ साबान बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shankar acknowledges receipt of the letter giving news of the fall of Jhansi.*

No. 36] [26-2-1762

पौ छ ६ साबान मुा महुखेडा
प्रा कायेथे बुधवार दोन घटका
रात्र

श्री

श्रियासह सहस्रायु चिरंजीव विजईभव राजश्री विश्वासराव यासी नारोशंकर कृतानेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता छ १ साबान गुरुवार मुा ठाणे मळगाव सुखरूप असो विशेष. तुम्ही पत्रे दोन येक छ २१ रजब दुसरे छ २३ रोजचे पाठविलीं तीं पाऊन सकल लेखनार्थ अवगत जाला. झांशी वगैरे हिंदुस्थान प्रांतीचें वर्तमान लिहिलें ते सर्व तपशीलवार अवगत जालें. तुम्ही डाक बशिवली म्हणून लिहिले तर बहुत उतम केले. वरचेवर जाले वृत लिहित जाणें. पनासा हजाराची हुंडी पत्रें सुमार १३ पाठविली ती यादीप्रमाणें पावलीं. शहरीं रवाना केलीं आहेत. येवज पावलियांचे जाब आलियावरी तुम्हास लिहूं. पेशजी पंचाशीं हजारांच्या हुंडिया आल्या त्याहि पाठविल्या आहेत त्या खर्ची होऊन जाब आलियानंतर तुम्हास लिहूं. पेशजीच्या व हालीच्या हुंडियाच्या पेटा घेऊन पाठऊन देणे. नेमिला येवजाचे निमे पदरी पडला. त्यापैकी दोही रवानग्याच्या चिठिया पाठऊन बाकीच्या हुंडिया गडबडीमुळें न होत म्हणून येवज सराफियात अनामत राहिला म्हणून लिहिले. त्यास येथे आम्हाजवल येवजाची खतूट आहे तर कळेल तशी तजवीज करून हुंडी पत्रांही ताबडतोब येवज येथे पावता होई तो अर्थ करणें. आम्ही ताबडतोब हिंदुस्थानांत येत असों. रा मल्हारजी होलकर या प्रांतात आले म्हणून त्यांचे भेटीगोष्टीमुळे आठचार दिवस लागले. आतां अविलंबेच येत असो. तुम्ही बहुत खबरदारीने राहात जाणे. याउपर सुज्यातदौलाने लबाडी केली. वरकड पातशाह व नजीबखान याचे मनात इतका अर्थ नाही. परंतु माधोसिंग राठोड सुज्यातदौला यानी लबाडी केली. याचा परिणाम सुधा होणार नाही. आम्ही दरमजलीने मालविया प्रांते लौकर येतो तोपर्यंत पाचलाख भरणा साहुकारास सत्वर पावता करणे. बाकी वसूल दाहपैकी होईल तो * * * रोजमरियासी पाहिजे याची फिकीर असो देणे. अवंदा फारच कठीण गोष्टी जाल्या. या प्रांती मोगलाचे मनात मागती बिघाड करावा यैसे मानस परंतु खर्चास नाही याजमुले बिघाड करणार नाही. असो होणार ते होईल. आवंदा झासीची रसदेतील लाख दीड लाख सुरोज देऊन तुमचे चाकरी केली ते वृथा जाली. या खेरीज फौजेस खर्च दोनचारपर्यंत जाला आणीकहि होणार. सिंदे

१ स्वीकारलेली पण न पटवलेली.

याची सरदारीत चित्रडा दिसतो. पेसवे बदमामली (करितात) भेटीनंतर सविस्तर सांगू. तुम्ही तूर्त पंतप्रधान याचा भरणा सत्वर करणे. फौज बरानपूरपर्येत आली नाही तो येवज लिा प्राो रवाना करणे. जासूद तुम्हाकडील सा रोजानी पावले. त्याचा कराराप्राा मजुरा देणे. पुढे येवज परभारे औरंगाबादेस रा‌ा करणे. कासिदास खबरदारी सांगणे की कागदपत्र दुसरियासी नेमल नाही तरी आम्हाकडेंच पाा परंतु लस्करात आम्हासीच गांठ घालून पत्रे प्रविष्ट होये ते करणे. येसी ताकीद पत्रे अणनारास करणे. प्रकार फारच बारीक जाला असे. सूचनार्थ लिहिला असे. दाह लाखचा तगादा करून येवज वसुलास येते करणे. हाती सर्व उजनीस आणने. फौजाहि लौकरच येतील. मग जैसा विचार करणे तो केला जाईल. तुम्ही उजनीस राहिलिया फारच कार्याची गोष्ट जाली. खर्च आटोपून करीत जाणे. तुम्ही शाहाणेच असा. सावधपणे राहात जाणे. वरचेवर वर्तमान लिहित जाणे बहुत काये लिा आसीर्वाद.

राा खंडोपंत व राा चिमणाजीपंत स्वामीस नमस्कार लिा

¶*Naro Shankar's letter to his nephew Vishvasrao Lakshman discussing plans to be pursued after his arrival in the North. He concludes with a demand for funds to be remitted to Poona.*

---

No. 37] [28-2-1762

छ २८ शाबान

**श्री**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक त्रिंबक राम कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २ साबान मुकाम नर्जीक संगनेर राजश्री सुभेदाराचे लस्करात स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी दोनच्यार विनंतीपत्रें सेवेसी पाठविली. परंतु उतर न आले व कासीदहि माघारे न आले. मार्गी मारले किंवा काये जाहालें हे ईस्वर जाणे. त्यास इकडील वर्तमान तरी राजश्री गणेश संभाजीचे वर्तणुकेचा आर्थ पूर्वीपासोन सेवेसी लिहीत गेलो व परस्परे विदित जाहलाच आहे. गणेश संभाजीमुळे सरकारचा करोड रुपयाचा मुलुक गेला. * * * * जाहला आहे. शाहाजादा काल्पीत आहे व सुज्यातदौला झासीस आहे. किला जु * * * आहे परंतु कोणी * * * * त नाही. राजश्री नारो शंकर वगैरे सुभेदाराचे भेटीस आले होते. सेवकाचीहि

भेट जाहाली. आद्याप खानदेशातच आहेत. कोणाची हिमत दरमजल जाऊन पोचतीलसी नजरेने पाहिली नाही. येक स्वामीचे पुण्यप्रतापें काही दिवस झासी राहील तरी कळेंना. नाहीतरी ठीकता दिसत नाही. गणेश संभाजीकडे झासी होती परंतु राजश्री बाबूराव कोन्हेर याणी छल करून हस्तगत केली. तेथील बंदोबस्त करून आपण कन्हेरा किला येथे आहेत. गणेश संभाजीचे कुटुंब व येक पुत्र व भाऊ वासुदेव संभाजी यास घेऊन राजश्री बालाजी गोविंद सिरोंजेस येऊन आपण सागरास गेले. धोंडो दत्तात्रेय गणेश संभाजीची माणसे घेऊन देसी येत आहेत. आठदाहा दिवसात पुण्यात येतील. राजश्री नारो शंकराकडील विस्वासराव लक्ष्मण झासीस म्हणोन गेले. परंतु रा। सुभेदारास जखम लागली तिणे बहुत जेर होऊन माघारे फिरले याकरितां तें उजनीतच आहे. * * * * * सुभेदारास आजपावेतो आरोग्य नाही. बहुत क्षीण. तीन महिने स्नान नाही. शरीर बहुत तुटले. परंतु स्वामीचे पुण्ये आरोग्य होईल. सुभेदार इकडे आले यामुले सर्वांचा धीर सुटला. दुसरे गणेश संभाजी जाऊन सुज्यातदौलास भेटला. घरचा मुदई तग निघेना. म्हणोन बालाजी गोविंद आले. किला गेल्यावर पुढे श्रम बहुत लागले. दिवसेंदिवस शत्रु भारी होत जात आहे. स्वामी पुण्यवान प्रतापी आहेत. पुढे सर्व उतमच होईल. प्रस्तुत जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. गणेश संभाजीपासून निघोन यावेसे नव्हते. जीवाचा ग्राहीक होता. परंतु स्वामीचे कृपेकरून सर्व वस्तभाव व कागदपत्र सोडून जीव घेऊन सडा सुभेदारापासी आलो. त्याणी ठेऊन घेतले म्हणोन आज सा महिने समागमेच आहे. सेवेसी कलावे म्हणून विनंती लिहिली आसे. आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करीन. भृत होये हे विज्ञापना.

¶*Trimbakram informs the Peshwa that Jhansi has been attacked and cannot be expected to hold out long as the besieged are not being supported. Ganesh Sambaji is reported to have joined the ranks of Suja. The letter also refers to the illness of Malharrao Holkar.*

---

*No. 38*] [*3-3-1762*

**श्री**

श्रीसहश्रायु चिरंजीव राजमान्य राजश्री विस्वासराऊजी यास नारो शंकर कृतानेक आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता। छ ६ माहे शाबान मुकाम किले मलगाव सुखरूप जाणोन स्वकीये लेखन करणे विशेष. तुम्ही छ २९ रजबाची पत्रे पाठविली तें छ मजकूर पाऊन त्या प्रांतातील दिलीपासोन उजेनपावेतो जाले वर्तमान मुलकातील व खानाजी जाधवराऊ याजकडील पत्राचा मजकूर दुसरे

पारसी पत्राच्या नकला पाठविल्या ते प्रविष्ट होऊन सविस्तर विदित जाले. त्यासी झासीचा प्रकार होणें तो भगवतसत्तेन जाला. पुढे होणार ते होईल. तुम्ही बहुत खबरदारीने बातमी राखून फौजसुधा संस्थान उजेनचा बदंबस्त राखून उत्तम प्रकारे सावध असणे. झासीचा कारभार तुम्हास सांगितला त्याचा प्रकार ऐसा जाला. पुढे उजेनची सुभेदारीचा कारभार दरोबस्त तुम्हाकडेच सांगितला आहे. तरी तेथील मामल्याच्या बंदबस्त राखून ऐवज तुम्हापासी जमा जाला आहे तो हुंडीपत्राने आम्हाकडे पाठऊन देणे. या कामास विलंब सहसा न करणे. हुंडणावळ आणा दोन आणे आधिक पडले तरी मुजाका नाही. इतके दिवस तुम्हापासी ऐवज जमा असोन आजपावेतो तुम्ही रवानगीची पैरवी न केली हे गोष्ट तुम्हापासोन दूर आहे. देशकाल मुलकातील तुम्ही पाहत असतात गाफिली केली आणि करीता हे आपूर्व. अथःपर लिहिल्याप्रमाणे साहुकाराचे विद्यमाने हुंड्यापत्रे हरतजवीज करून लौकर मार्गस्त आम्हाकडे करणे. हुंडीपत्रे पाठविल्यावरी मागाहून पेटाहि सदरहू ऐवजाच्या पाठऊन देणे. सारांश ऐवजाचा निकाल करून देशी आम्हास पावता होये या तरतुदीस सहसा न चुकणे संस्थान उजेनची सुभेदारी तुम्हाकडे आहे. पुढेहि जो पैसा वसुलात येईल त्याचीहि पैरवी करून आम्हाकडे पाठऊन द्यावा. इकडून चिरंजीव त्रिंबकराऊ आवचितराऊ पांडुरंग शंकर फौज देऊन त्या प्रांतास रवाना केले आहेत. याचे हाती येक पैसा लागू न देणे, आम्हाकडे हुंड्या करून पाठऊन देणे. तुम्हापासी कामास येणार नाही. फौजेची उस्तवारी उत्तम प्रकारे राखून बहुत खबरदारीनें असणे. फौज त्या प्रांतास मातबर रवाना केली आहे. श्रीकृपेनें सर्व गोष्टीचा बंदबस्त उत्तम प्रकारे होईल. तुम्ही कोणे गोष्टीची चिंता न करणे. याउपर बाबाजीपंताचे पनास हजार रुपये घेतले आहेत व रा धोंडोपंत कढे याचे पनास हजार हर तरतूद करून सुरोंज आहीरवाडियाचे येवजी अथवा दरयेक येवजीयात करणे. हे काम करणे जरूर असे. याउपर येवजाची रवानगी सत्वर करणे. तुम्ही उजनेप्रांतीच राहून पैका लौकर वसूल करणे. परभारा साहुकारीत येवज जमा करून दस्तायेवज आपले नावे घेणे. हुंडिया वरीचे वर रवाना करणे. मागाहून फौजहि लौकर त्या प्रांते येतील. फौज रुपये तुम्ही देणे. माहलचा येवज जमा करून कर्जदारास पावला पाहिजे. फौजेस (अपूर्ण)

¶*Naro Shankar while regretting the loss of Jhansi instructs his nephew to guard his position at Ujjain against further advance of the enemy and remit to Poona collections from Districts under his administration.*

---

\+ येथून अक्षर वेगळें.

No. 39] [19-12-1735 ?

छ १६ रमजान

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक आज्ञाधारक नारो सिवदेऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून ता। छ १९ साबान मु॥ लस्कर नजीक मेडते सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. वार्तिकासमागमे आज्ञापत्र आले ते छ २ साबानी सादर जाले. आज्ञेप्रमाणें सविस्तर आर्थ माहाराजे अभयसिंगजीस विदित केला. थैली त्यास होती ते दिल्ही. जबानी कितेक मजकूर सांगितला. त्याजवरून यानी उतर दिल्हे जे हे मातबर मनसबा आहे. ये गोस्टीचा जाबसाल येका दिवसात होत नाही. प्रस्तु(त) कूच दरकूच मेडतियास जातो. तेथे गेलिया-नंतर ये गोस्टीचा पोख्ता मनसबा करून जे गोस्टीने राजश्री रायाचे कर्जाचा परिहार होय आणि फौजेची उस्तवारी होऊन महद येश पदरी पडे तो आर्थ करून, येविषी तुम्ही आपले समाधान आसो देणे. इतके दिवस दिगत लागली त्याचा विचार तुम्ही जाणता याजवरी ढील होणार नाही. मेडतियास गेलियानंतर कार्याचा निश्चय करून तुम्हासहि आज्ञा देऊन. याजप्रकारे जाबसाले जाला. सेवेसी विदित होय. स्वामीचे पत्रांपूर्वीच माहाराजे आभये-सिंगजीनी पत्र स्वामीस लिहीले होते तेच पाठविले आहे. प्रविष्ट होईल. सरकारचे जासूद आम्हासमागमे होते. त्यारा येक जोडी पूर्वीच बिदा केली. हाली येक जोडी राहिली ते सेवेसी पत्रे देऊन बिदा केली आसे. विदित होय हे विज्ञप्ति. मेडतियास गेलियानंतर पांच सात रोज राहोन पुढे आजमेरस जाणार. कमरुदीखान याजकडून येक ग्रहस्त पत्रे घेऊन आला आहे याजकरितां पुढे जरूर जाणार. विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Naro Shivdev writes to the Peshwa that Abhaysing promises to relieve the Peshwa of his debts.*

---

No. 40] [25-4-1762

छ २४ जिलकाद इसने सितैन

श्री

राजश्री मल्हारजी बावा होळकर सुभेदार

गोसावी यासीं

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री बाळाजी गोविंद आशीर्वाद विनंती. येथील कुशल ता। वैशाख शु॥ १ पर्यंत आपल्ये

कृपेकरून यथास्थित असे विशेष. या प्रांताचे वर्तमान आपणास दोन च्यार पत्री लिहिलें, त्याजवरून विदित जाहलेच असेल. अंतर्वेदीत सर्व जागा कनोज आदिकरून ठाणी सरकारची बसविली. एक गार्जीपूरचा किला रूपराय व कीरतसिंग खिचर याणे घेतला. तेथें त्याचा जमावहि जाला आहे. त्यास्थली मेहनत पडेल. वरकड ठाणीं कसब्यांत मात्र बसली. परंतु तमाम गावगना जमींदार गढ्या बांधोन फिरोन राहिले आहेत. रबीचा अमल खाऊन जुजायाची तयारी करून बसले आहेत. त्याचे परिपत्यास दिसगत लागेल; सालमारी तो पैसा मिळणे नाहीं, खळ्यांत दाणा एक ठेविला नाहीं. येक तालगावी तीनसे गढी जाहली. याप्रमाणे वर्तमान आहे. पुढें यथास्थित जाहल्यास पारपत्य सर्वांचे होईल. प्रस्तुत आम्ही सलुखानेंच त्यासी आहो. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे. हे विनंती.

¶*Balaji Govind to Malharrao Holkar, reporting risings in the Doab on the part of the Jamindars.*

---

*No. 41*] [*25-5-1761*

छ २४ जिलकाद इसने सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसी.

विनंती सेवक चिमणाजी रंगनाथ. कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता छ १९ माहे सवाल मुा उमरगड[1] स्वामीचे पुन्यप्रतापेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबीं राजे खेतसिंग राजे हिंदुपतीचा धाकटा भाऊ याजकडे हुजूर न्यावयाकरितां पाठविले. त्यास राजे यास कितेका प्रकारें समजोन सांगत गेलों, तेव्हां कार्ति(क) मासापासून हुजुर येयाचे तरतुदीत होते. आपले स्थळीहून कूच करून राजश्री गणेश संभाजी यापासी आले. आठा दहा रोजांत दिलीकडे यावें तो तिकडे लढाई जाली. तेव्हां पंत मारनुलेपासून राजे मार आपले माघारे ठिकाणास गेले. मीहि त्याबरोबर गेलों. पांच महिने राहिलों; परंतु त्याची नजर पूर्वत प्रा न राहिली. परस्परे दरबारचे वर्तमान कले कीं मी येथें न राहावें ऐसा त्याच्या चितांतील

---

१ जिल्हा ईटावा, जलेश्वरजवळ.

मनोदय देखिला; आणि दरबारचाहि रंग त्याप्रकारचा पाहिला. तेव्हां हुजूर यावयाकरितां आज्ञा मागू तेहि देईनात. समागमें सिबंदी खर्च बहुत; खर्चास पैसा देईनात. राजश्री गोविंद बलाळ याचे तर्फेने तहसिलीस राघो विष्णु होते यामुळें स्वामीचे पुण्यप्रतापेकरून सेवकाची खर्चाविषई स्थित राहेली. तहसीलीस पंत मारनुले होते त्यास रो देईनात तेव्हां ते उठोन आपले यजमानाकडे गेले. बुंधेल्याचा कारभार लबाडीचा, त्यास स्वामी पूर्वीपासून जाणतच आहेत. तेव्हा मीहि त्यापासून रो गणेशपंतापासीं आलों. राजे पहाडसिंग याकडे स्वामींनी रो कृष्णराव गोविंद यास पाठविले होते. त्यास सरकारचे आज्ञाप्रो .पंत मारनुलेस कितेका प्रकारें उमजोन सांगितलें; परंतु त्यानी न येकिलें. याकरितां येथून श्रीमंत राजश्री सुभेदार याजकडे जावयासी पंत मारनुले आले. त्यासमागमे मीहि आलों. त्याकडे जावे तो मार्ग फुटत नाहीं. स्वामीपासीं एकासी मार्ग चालेना. एसा प्रकार जाला आहे. समागमे खर्च बहुत मार्ग चालेना सबब राजश्री बाळाजी गोविंद यापासीं आहे. याजला आज्ञा खर्चविशई लिहिल्याने देतील. पंत मारनुलेनी पहिली ठाणी काही बसविलीं, कांहीं राहिली आहेत तेहि बसतील. कितेक तपसीलवारें राा कृष्ण गोविंद यांही लिहिले आहे त्यावरून सविस्तर अर्थ स्वामीस निवेदन होईल. जैशी सेवकास आज्ञापत्र येईल, तैसी वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Chimnaji Rangnath to the Peshwa from Umargad, requesting orders for the payment of his troops. He reviews the position of the various Maratha chiefs in the Doab and Bundelkhand.*

---

*No. 42]* *[28-9-1762 ?*

पौा छ २३ रजब.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक माहादजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील सेवकाचें वृत तागायेत छ ९ माहे रबिलोवल मुाा प्रांत जैपूर नाा फागी स्वामीचे आसीर्वादे येथास्थित असे विशेष. गुलराज व नंदराम हे उभैता शाहाकडून राजश्री पुरुशोतम माहादेव याजबराबरी आले ते आम्हाजवल येऊन कितेक वृतांत सांगितला त्यावरून कललें. येशास मशारनिलेचा सन्मान बहुता प्रकारे करून येथून बिदा

महाराजाचे सेवेसी केले असे. हे कितेक अर्थ तेथे आल्यानंतर सेवेसी शृत करितील. त्यावरून विदित होईल. तदोतर याजवरी कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

*¶Mahadaji Sindia informs the Peshwa that Gulraj and Nandram, two ambassadors, have been dispatched by Ahmedshah Abdali to settle terms of peace.*

---

*No. 43]* *[20-12-1761*

नकल

श्री

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंद कल्याण स्वामी गोसावी यांसी**

सो नारो शंकर नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २२ जमादिलावल मुाा पेडगाव भीमातीर जाणून स्वकीय लिहिणे विशेष. तुम्ही वरचेवर पत्राचा पूर केला. सिरोंज आहीरवाडा येथील मामलतीविसी वारंवार लिहीत गेला. त्याजवरून दोन लाख रुाा रसद करार करून मामलत करून घेतली. याजउपरी पत्रदर्शनी दोन लाखाच्या चिठ्या पुण्याच्या तुम्ही पाठऊन देणे. तुम्हाकडून विलंब लागल्यास सरकारात येवजाचा वोढा फार याजकरिता दुसरे हरकोणापासून येवज घ्यावा लागेल. मग आम्हाकडे शब्द न ठेवणे. पैकियाची निकड बहुत आसे. पहिली तुम्हास पत्रे लिहिली आहेत ती पावलीच आस्तील. हाली हें पत्र लिाा आहे. क्षणाचा विलंब न लाविता पत्रदर्शनी दोन लक्षाच्या चिठ्या रवाना करणें. चिरंजीव राजश्री रावजीची रवानगी केली आसे. इजतखान सुज्याखान त्यासमागमे दरोबस्त फौजेनसी रवाना करणे. आहिरासी सलुख करून आहीरहि रावजीसमागमे देऊन भारी जमावानसीं झासीस जाऊन तेथील बंदोबस्त येथास्थित होऊन झांसी व किले कन्हेरा यांचा बंदोबस्त जाल्यानंतर वरचेवरी कागदपत्र पाठऊन वर्तमान लिहोन पाठवणे. सिरोंज आहीरवाडा येथील मामलतीचा बंदोबस्त तुम्ही करणे. पैका रसदेचा दोन लाख रुपये लौकर पाठऊन देणे. तिकडील नवल विशेष लिहून पाठविणे. इकडील सविस्तर चिरंजीव राजश्री रावजीचे पत्रावरून कलो येईल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

*¶Naro Shankar instructs Govind Kalyan to send to Poona revenue collections from the provinces of Sironj and Ahirwada.*

4160

No. 44] [Recd. 1-7-1761 ?

पो छ ९ जिल्हेज

**श्रीशंकर**

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री महिपतरावजी
स्वामींचे सेवेसी

सेवक महिपतराव गोविंद कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. पत्र पा। ते पावले. लिा सावधपणे राहणे चिंता न करावी. झासीहून दारूगोळी व संभर गारदी पा। आहेत ते पोहचतील. त्यास आम्ही बहुत हुशार आहो. खावंद आहेत उपराळा करतीलच. आज रोहिलेयाची फौज हजार स्वार आले आहेत. गस्त देऊन बाजारात उभे राहिले आहेत. त्यास आम्हासी मोहरा जुडलियावर ईस्वर साहे होईल, चिंता नाही. श्रीमंताचे प्रतापेकरून सर्व उतमच होईल. उदईक त्याची सारी फौज येईल. आम्ही बहुत खबरदारीने आहो. चिंता न करावी. श्रीमंत राजश्री राजश्री रावसाहेबाकडे वर्तमान पोहचाऊन देणे. कळले पाहिजे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

(पुढील चार ओळी मजकूर गैरउपयोगी सबब गाळला.)

¶*Mahipatrao Govind writes to Mahipatrao at Jhansi that he is ready for the attack of the enemy reported to be one thousand strong, and thanks the latter for the reinforcements sent by him.*

---

No. 45] [21-3-1763 ?

छ २१ रमजान

**श्री**

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेसी.

विनंती सेवक कासी नरसी, कृतानेक साष्टंग नमस्कार विज्ञापना. तागाइत छ ९ रमजान, मुक्काम कालपी, स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर जालें. तेथें आज्ञा कीं, नरसिंगडच्या जाबसाला-विशीं हुजूर येणें व राजश्री चिंतो अनंत यांणीं लिहिलें कीं, नरसिंगड तालुका गणेश संभाजी यांजकडून बापूजी नारायेण यांजकडे होता त्यास पाठीशीं घातला होता म्हणोन हुजूर जाबसालास येणें, यैसी आज्ञा जाली आहे. त्यास राजश्री गणेश संभाजी पेशजी हुजुरून मामलत करून आले. त्याउपर या प्रांतीं

धामधूम जाली. पातशा(हा) व सुजातदौले येमुना उतरले, तेव्हां गणेश संभाजी त्यांस भेटोन मोठीं मोठीं कामें केलीं. कोणी मामलेदार ठाणें राहूं पावले नाहीं. तमाम प्रांताच्या सनदां पातशाहापासून घेऊन मुलूक लुटून पस्त केला. दीड वर्ष चाकर आविंदाचे जाले. तेथें ठीक न पडे. तेव्हां राजश्री माहादजी शिंदे यांजकडील संताजी वाबळे वगैरे सरदार आले, त्यांजला भेटोन सागराकडे आले. येऊन आमचे तालुक्यांतील गाव राहिले होते, त्यासच लुटूं लागले. यास्तव सांगोन पाठविलें कीं, आपण सरकारचे माहाल कां लुटितांत? या प्रांतीं यावयासी कारण काये? तेव्हां पंत मशारनिल्हेनीं जाबसाल केला कीं, नरसिंगडचे बंदोबस्ता(स) जातों. तेव्हां गणेशपंत पातशाही चाकर होते. स्वामींचे आज्ञे-शिवाये फिरोन प्रांतांत जाऊन गांवजागा लुटतील. आम्हांकडील तालुक्याची जागा लुटली जाईल. बापूजी नारायेणहि आम्हांकडील ठाणीं राहिलीं, याच आसरेयानें राहिलें. जागा रक्षिली. राजे जगतराज यांजकडील कुवरमण याणें नरसिंगड तीन वेळ घेतला, जागा सर्व लुटली. तेच गत आमचेही जाग्याची जाली. बापूजी नारायेण यांचा बच्याव होणार नाहीं म्हणोन तेच आगोदरच गणेश संभाजीच्या भयानें देवरीकडे गेले. आम्ही च्यार गोष्टी पंत मशारनिल्हेस सांगितल्या. वरकड नरसिंगडच्या रुपया व हिशेब आम्ही घेतला नाहीं. बापूजी नारायेण हिशेब घेऊन पुण्यास गेले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Kasi Narsi explains to Raghunathrao that he is in no way responsible for the Narasinggarh affairs. It was all the work of Ganesh Sambhaji.*

---

*No. 46*] *[21-3-1763 ?*

पो छ २२ रमजान

**श्री**

**श्रीमंत राजश्री दादा साहेब स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक बाळाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ रमजान मुकाम कालपी स्वामीचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर आलें तेथें आज्ञा कीं काशी नरसी यास हुजुर पाठवणें व राजश्री चिंतो अनंत यांणीं लिहिलें कीं नरसिंगड तालुका गणेश संभाजी याजकडून बापूजी नारायण याजकडे होता, त्यास काशीपंतांनी पाठीशीं घातला. त्याचा जाबसालास पंत मशारनिलेस हुजुर पाठवणें म्हणोन अज्ञा जाली

आहे. त्यास राजश्री गणेश संभाजी हुजुरून मामलत करून आले. तदोत्तर दुंडी[1] जाली, तेव्हा गणेश संभाजी याही मोठींमोठीं कामें केलीं; कोणी मामलेदार राहूं पावले नाहीं(त). तमाम प्रांताचा इजारा नवाब सुज्यादौला याजकडून करून घेतला. पातशाही चाकर जाले, दीड वर्षपर्यंत चाकरी केली, तेथें ठीक न पडें. तेव्हां राजश्री माहादाजी बावा शिंदे याजकडील संताजी वाबळे वगैरे सरदार आले. त्यांजला भेटोन सागराकडे आले. तिकडे आमचे तालुक्यांतील गांव राहिले होते त्यांसच लुटों लागले. यास्तव तीर्थस्वरूप राजश्री काशीपंतीं सांगोन पाठविलें कीं आपण सरकारचे माहाल कां लुटतां? याप्रांतीं यावयास कारण काय! तेव्हां पंत मशारनिलेनीं जाबसाल केला कीं नरसिंगडचे बंदोबस्तास जातों. तेव्हां काशीपंतीं विचार केला कीं गणेशपंत पातशाही चाकर होते. स्वामीचे आज्ञेशिवाय फिरोन प्रांतांत जाऊन गांव जागा लुटूं लागतील. आम्हांकडील तालुक्याची जागा लुटली जाईल. बापूजी नारायणहि आम्हाकडील ठाणीं राहिलीं याच आसरेयानें राहिले. जागा रक्षिली, तीन वेळ नरसिंगड राजे जगतराज याजकडून कुवरमणानें घेतला. जागा लुटली, आमचेहि जाग्यांत तेच गत जाली. बापूजी नारायण याचा बच्याव होणार नाही, यास्तव पंत मशारनिलेस च्यार गोष्टी सांगितल्या. मशारनिले अगोदरच गणेश संभाजी याचें दर्पानेंच देवरीकडे गेले, त्याजकडील रुपया हिशेब काशीपंतीं घेतला नाहीं. हिशेबकितेब बापूजी नारायण घेऊन पुण्यास गेले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Govind tries to explain why Kasi Narsi befriended Bapuji Narayan, a servant of Ganesh Sambhaji who has turned disloyal.*

---

*No. 47*] [*28-5-1763*

पौ छ १९ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री विश्वासरावजी स्वामीचे
सेवेसी

विनंती सेवक त्र्यंबक कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता छ १४ जिलकाद मंदवासर प्रातःकाल मु॥ भरोली येथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही राजश्री

---

१ दुंडी–दंगा.

बाळाजी गोविंद याचे लस्करात फौज आणावयासी गेलो होतो. त्यासी तेथील प्रकार पाहिला तर सारा गोगा होता म्हणून तेथून उठोन आलो. पेशजी चिरंजीव राजश्री बाळाजीपंतानी राजश्री यादवराऊ यास विनंती केली की जाठ गरविष्ट फार जाहाला आहे. त्यास तुम्ही या प्रसंगी राजश्री सुभेदाराचा उपराळा करावा यैसे बहुत प्रकारे सांगितले, परंतु त्याचे मर्जीस न आले. सांप्रत्य सेवेसी विनंतीपत्र पाठविले आहे. त्यास पाचसातसे राऊत चांगले निवडक सरंजाम उतम करोल यैसे नेहमी असेल ते आम्हाकडे पाठऊन द्यावे. त्याचा रोजमरा येथातथ्य जो असेल तो लेहून पाठवावा. जैसे आपणाजवळ बसोन खात आहेत तैसे इकडेच पाठऊन च्यार दिवस राजश्री सुभेदाराचा उपराळा करावा यात महद येश येईल आणि श्रीमंताजवळ लौकीक होईल. जाटहि पंचमाहालाकडे आला आहे. त्यासी आम्ही सिमथारवालेहि नेमस्त केले आहे. आणि आपणहि चिती धरून जे स्वार पाठवावयाचे ते पाठवावे म्हणजे सिमथरकर व आपले स्वार यैसे येकत्र होऊन जमावासी गालेरीस जाऊ. तुम्ही संस्थानी सरदार विसा कोसावर आसता गालेरीस हा गोहदकर गुलाम उपद्रव देतो, उपराळा न होये, आश्चर्य आहे. दक्षणी लोकास काळच पाठीस लागला. मागे श्रीमंत राजश्री नाना श्रीमंत विठलराऊजीचा उपराळा करीत होते. भीमसिंग मारला तेव्हा राजश्री चिमणाजीपंत आठ महिने फौजसुधा आपले पदरचे खाऊन गोहदेस मोरचे लाविले होते. विठलराऊ कितिक वेळ कामास त्यास आले. आता तो प्रकार नाही. तोतयाचे वेळेस आपले देहाल्याचा कटा केला. घोडी पडली. खिना-रियावर आमचे पागेचे भले माणूस पडले. घोडी पडली. काही तरी ध्यानास आणावे. रावसाहेब, प्रसंग राहाणार नाही. आमचा येत्न आम्ही केला. कोन्ही साह्ये व्हाना, हे थोरपणास योग्य नाही. सेक इमाम वगैरे पाचसे स्वार तरी पाठवावे. किल्याचे दक्षणेस जाठ आला आहे. आमची फौज पाठोपाठ आहे. यैसिया प्रसंगी मानपान पाहावा यैसे नाही. रावसाहेब, परस्परे आगत्यवाद न धरावा, विहित नाही. यैशा प्रसंगी खासा कंबरबस्ती करून कोन्ही न ये तर आपणच यावे. गोविदपंत सुभेदार बहुत थोर आहेत, याचे साहित्य करावे. ईश्वराजवळ मजरा आहे. सिंदेच्या कडेस येऊन यादवराऊ माघारे गेले, पंधरा कोस गोलेरीस न गेले. आसो याउपरी तरी कृपा करावी. लोभ कीजे हे विनंती. देसीहून काही वर्तमान कागदपत्र आला असेल तरी लिहून पाठवावे हे विनंती.

¶*A touching appeal to Vishvasrao Lakshman of Jhansi by Trimbak Krishna (Kanitkar) requesting him to send help to Govindpant Subhedar and the Holkar against the aggression of the Jats. The writer also reminds him of past occasions when the Peshwas helped their sardars and thus impressed on him the necessity of supporting the Deccanis in general.*

4164

No. 48] [19-9-1763

पौ छ ११ रावल

## श्रीमोरया

शेवेसी विज्ञापना. राजश्री माहादजी सिंदे यासी हुजूर यावयाकरितां पत्रे पाठविली; परंतु त्याचा यावयाचा प्रकार न दिसे. तों सखूबाई हुजूर अली म्हणून मशारनिलेहि येऊन भेटले. त्याजला आज्ञा केली कीं सखूबाईची कृपा संपादून घेणे. परंतु हे त्याजला अनकूळ न पडले. तेंव्हा सखूबाईचे मर्जीस्तव राजश्री मानाजी सिंदे यासी सरदारीची वस्त्रे देऊन राजश्री माहादाजी गोविंद कारभारी करून दिल्हे. येका मासांत दाहा हाजार फौजनसी तुम्हापासीं पोंहचतील. माहादजी सिंदे यासी चौ हजारा फौजेची सरदारी देत होतो तें अमान्य करून उठोन तिकडे आले म्हणून विस्तारे करून आज्ञापिले. यैसियासी आपणास सखूबाईचे श्रम न देखवत. यास्तव साहेबी राजश्री मानाजी सिंदे याजवर कृपाळु होऊन पूर्ववतप्रों स्थापना करून सरदारीची वस्त्रे दिधली. बहुत उत्तम. खावंदाची मर्जी ते मान्य आसे. स्वामीचे आज्ञेविरहित कोण आहे? राजश्री माहादजी सिंदे उजनीस दाखल जाहाले. स्वामीचे खानाजाद सरदार खावंदाच्या पायांखेरीज कोठे जातील! सर्व बडवार खावंदाच्या पायांपासी जाली आहे. इकडे बोलाविले आसेत. सर्व उर्जित करणार खावंद समर्थ आसेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.+

*¶Gangadhar Yashvant writes that as Mahadji Sindia could not settle matters amicably with Sakhubai Sindia, the robes of honour were conferred on Manaji Sindia, at which Mahadji took offence and went back to Ujjain. The letter is perhaps addressed to Raghunathrao.*

---

No. 49] [End of 1763

## श्रीमोरया

चिरंजीव राजश्री बालाजीपंत व राजश्री गंगाधरपंत यांसी प्रति गंगाधर यशवंत आसीर्वाद उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीय कुशललेखन करीत जाणे विशेष. तुम्ही सर्व सरंजामानसी सुरंजच्या मलात आला म्हणोन येकिले. देशासी जाणार येसियासी देशी मोगलाने हतवीर्य होऊन नवी जागीर श्रीमंतास देऊन सला केला.

---

+ पत्र गंगाधर यशवंताचें रघुनाथरावदादांस असावें.

तिकडील गुंता उरकला. झाडून फौजा रवाना जाल्या. दरमजल येतात. येथून राजश्री तुकोजी होलकर फौजसुधा ते प्रांतच्या बंदबस्तास रवाना केले ते व राजश्री विश्वासराव लक्ष्मण मिलोन येतील. तुम्ही त्यासी सामील होऊन ते प्रांतचा बंदबस्त होये ते गोष्ट करणे. दुरंदेशी घ्यानात आणून तूर्त देशी जावयाचे न करावे. सविस्तरे येजमान पत्रावरून देसी सलुख जाहाला. दरबारी बेगमी केली पाहिजे. येथूनहि फौज रवाना केली आणि राजश्री नारोपंत नाना व राजश्री विठलराव तात्या मातबर फौजनसी येत आहेत. तुम्ही व चिरंजीव राजश्री विस्वासराव वगैरे दम धरून पूर्ववत करार करून च्यार पैसे खावंदास जागा जाहाली म्हणिजे स्वामिसेवा उतम आहे. सर्व तुम्हास कलत आहे. विस्तारे काये लिहिणे लोभ असो दीजे हे आसीर्वाद. मुखवचने राजश्री चिमणाजी-पंत आपा सांगतील ते धानास धरून व राजश्री जनार्दनपंत बावा सांगतील ते येकून उत्तम दिसेल ते करावे हे आसीर्वाद.

¶*Gangadhar Yashvant writing to Balaji Govind and Gangadhar Govind informs them that the campaign against the Nizam resulted in a great victory for the Marathas. The forces thus relieved will soon march to the north under the command of Vishvasrao Lakshman. Tukoji Holkar, Balaji and Gangadhar are advised not to leave the north where their presence was indispensable.*

---

*No. 50]* *[1764*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञाप्ति ऐसीजे. पातशाह व सुज्यातदौले फौजेसुधा पटण्याआलीकडे पस्तीस कोस जाऊन मुकाम केला. पटणियाकडून फिरंगी अले. अगोधर जाबसाल सलुकाचा फिरंगियानी लाविला होता, त्याचा मातबर माणूस पातशाहपाशीं आला कीं मुलाजमतीस येतात; मामलत करूं. त्यावरून सुज्यातदौले यानी विचार केला की फिरंगी हरामजादे आहेत, भरवसा नाही म्हणोन पातशाह व बुणगे ऐसे माघे ठेऊन बारा कोस आणिक पुढें पंचवीस तीस हजार फौजेनसी सडेच गेले. तिकडून फिरंगी दहापंधरा हजार फौजेनसी आले. पहिला प्रहर पावेतों सलुखाची गोष्टमात होती. कोसा दोकोसाचें अंतर राहिले होते. तेथेंच लढाई मातबर सुरू झाली. तरवारी तरवार जाली. संध्याकाळ जाला. फिरंगियाकडील तीन

हजार माणूस ठार जाले व धरले आले. जखमी बहुत जाले. राहिले ते पळोन गेले. सब्या फौजेचे बुणगे मागे होते त्यावर माघारे दुसरी टोळी फिरंगियाची येऊन पडली. बुणगे लुटले. मागती युध्य जाले. सुज्यातदौलाकडील शुज्या-कुलीखान व बेणीबाहदर याकडील गुलाम कादरखान ऐसे दोघे सरदार ठार झाले. रात्र बहुत जाली. शुज्यातदौले फौजेसुधा शिकस्त खाऊन माघार निघोन कूच दरकूच येत होते, तो सुवर्णभद्रात[1] दाहा बारा हजार माणूस बुडोन मेले; वस्तभात्र गेली आता राहिली फौज घेऊन वाराणसीस दाखल जाले. बुणगे व पातशाह मागे होते तेहि मागून येतात. फिरंगी जेथे होते येथेच आहेत. पुढें पाहावे निदर्शनास येईल ते सो विनंती लिहूं. बेणीबाहदर याने अयुधेकरास म्हटलें कीं बेहिमत न होणे, नवी फौज ठेवाल त्यास करोड रुपयाचा सरंजाम करून देईन. या प्रो करार करून फौज नवी ठेवितात +हे विनंती.

¶*The battle of Baxar between Shuja-ud-daula and the English and the losses that it entailed on the former are described in this letter addressed to Dadasaheb.*

---

*No. 51*] [*Just after 9-4-1758*

श्री

सेवेसी राजाराम गोविंद विज्ञाप्ति ऐसी जे. पूर्वी सेवेसी विनंतीपत्रें पाठविली आहेत त्याजवरून वृत श्रुत जाहाले असेल. हालीचे वर्तमान; नवाब वजीर व या उभयता सरदाराच्या फौजा व याचे सरदार ऐसे छ ३० रजबी फरुकाबादेहून कूच करून बाहीर डेरे दाख(ल) जाहाले. येथून कूच दो चौ दिवसात होऊन मजल दरमजल जगमनपूरचे घाटास येमुना उतरावयासी येतील. त्यास तेथे नावा पाहिजेत. तर कृपा करून रा बालाजी गोविंद यास येक पत्र पाठवले की नावा पंचवीस जगमनपूरचे घाटास पाठवीत म्हणजे लस्कर लवकर उतरून सो हाजर होये ते करणार स्वामी समर्थ आहेत. वजिरानी सांगितले जे, आम्ही कोणे स्थली येऊन पोहोचावे? उतरी सनाथ करिणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Rajaram Govind informs Dadasaheb that the Vazir accompanied by the Rohilla chiefs has started for Delhi.*

---

१ शोणभद्र नदी. + येथून अक्षर वेगळें.

No. 52] [February 1765

पो छ २९ साबान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक राघो निळकंठ सां। नमस्कार विज्ञापणा ऐसीजे. ता। छ साबान मु॥ पुणे जाणोन स्वामीचे कृपेकटाक्षेकरून सुखरूप असो विशेष विज्ञति ऐसिजे. सेवेसी येऊस बारा महिनियांत रोजमरा एक रुपये २०० दोनसे सरकारातून पावलेत. बाकी दीड हजार रुपये लोकांचे कर्ज घेऊन कालक्षेप केला. त्याचे देणे गुंतामुळे खासी स्वारी बरोबरहि येणे न जाले. श्रीमंत राऊ साहेबाची स्वारी निघोन गेली, त्या समागमेंहि जाणे न जाले. कर्जदाराचे तगादामुळे पुण्यातच फसून बसलों आहो. येथें तर कोन्ही मायेच स्नेही कोन्ही नाहीं. स्वामीचे पायाखेरीज आणि उपाय नाहीं. स्वामी धणी समर्थ आहेत. कृपा केलिया आबरू राहत आहे; नाहीतर स्वामीचे शेवेसी अंतरतो. घरसंवसारातूनहि जातों. वीस बावीस वर्षें सेवा करून स्वामीचे पायांखेरीज एक पैसा घरीं व येथें कर्जा-सिवाय असला तर शिवनिर्माल्य असे. मिथ्या विनंती सेवेसी असली तर आपले कुलस्वामिनीची सप्त असे. त्यासी विज्ञति ऐसीजे. एक पत्र रा॥ नाना फडनीस यांसी कृपा करून पाठविलें पाहिजे कीं पुण्यांत राघो निळकंठ यांसी कर्जदाराणी अडविलें आहे; तर त्यासी ताकीद करणे कीं तुमचा कर्ज देणे आहे तर आतां मा॥ईलेणी कोठून द्यावें? सोयेणे तजवीज करून देतील ऐसी कर्जदारास ताकीद करून मा॥ईलेस हजूर रा॥ करणे, ऐसी आज्ञापत्र व रा॥ बाळाजी गोविंद यांसीं ताकीदपत्र कीं तुम्हाकडे सरकारची वरात एक हजार तीस रुपयाची मा॥ईलेची असून तुम्ही आपले हजार रुपयेचा तगादा करता तर हे गोष्ट कारियाची नाहीं. सरकारची वरात तुमचे नावी आहे ते मा॥ईले नावी खर्च लिहून मा॥ईलेपासून हजार रुपयेचा रोखा लिहून घेतला आहे तो माघारे देणे; येविसई स्वामीही ताकीद-पत्र द्यावयाची आज्ञा रा॥ कुकाजी सिवरायासी आज्ञा केली; परंतु हस्तगत न जाली. त्यासी आतां हे ताकीदपत्र व रा॥ नाना फडनीस यांसी पत्र ऐसी दोन पत्रे कृपा करून पाठविलें पाहिजे म्हणजे येथील निकाल पाडून सेवेसी येईन. नाहीतर स्वामीचे पायाखेरीज मुरबी वसिला दुसरा कोन्ही नाहीं. स्वामीचे पाय अंतरतात. संवसारातून गेलो. पुढें स्वामी धनी समर्थ आहेत. यानंतर हिंदुस्थान प्रांतीचे वर्तमान श्रीकासीहून कर्जदाराची कासीद जोडी येक महिना पांचा रोजाची आली. पत्रांत वर्तमान लिहिले होते कीं जाफर महंमदखान सुबा बंगालाचा, त्याची फौज

4168

व फिरंगी व प्यादे तेलंगी वगैरे मिळोन विशेक हजार पटणाहून अलीकडे पंनास कोस श्रीकासीहून पंचवीस तीस कोस मोहणीया जागा आहे तेथें पडली आहे. मीरकासम अलीखान सुभा बंगालाचा होता तो पळोन सुजावदौला व अली गोहर याजपासीं आला. जगतसेटाचे दोघे पुत्र कैदीत घेऊन आला. दोन हजार स्वार, च्यारपांच हजार प्यादा तेलंगी, हजार फिरंगी, ऐशी फौज व दाहा करोडाची मालियत घेऊन आला आहे की वजीर व पातसाह यांची व याचे मारफत रा मल्हारराऊ होळकर व सिंदे वगैरे फौज दक्षणियांची करारमदार करून तिकडे घेऊन जाऊन मीरजाफर अलीखानाचे पारपत्य करून बंगालाचा बंदोबस्त करावा या येराद्यावर कासम अलीखान वजीराकडे आला आहे. त्यासी तूर्त बुंदेला अनुपगीर गोसावी दिाा वजीर याणी लुटून घेतले होते म्हणोन बुंदेले याचे पारपत्या-करितां अलीगोहर व वजीर, व कासमअलीखान ऐसे मळोन कालंजरगडास येऊन मोरचे लाविलेत. बुंदेलाचे मुलकांत मोगलाई अमल बसविला. फौज तीस चाळीस हजार आहे. बुंदेले फार दिक जाले आहेत. मामलत चुकवितील. इजतखान वगैरे यांची लिहिली नवाब मजकुरास जात असतात याप्राा वर्तमान आले होते ते सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवकाविसई दोन पत्रे राजश्री नाना फडनीस व राजश्री बाळाजी गोविंद यासी अगत्य कृपा करून पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिने हे विज्ञाप्ति.

¶*Ragho Nilkanth solicits Raghoba's favour to enable him to pay off his debts. He further sends him news of the revolution in Bengal which he gathered from the letters of his creditors. Mir Kasim has been defeated by the English and seeks an alliance with Shuja-ud-daula and the Marathas in order to make an attempt to win back his province.*

---

*No. 53]* *[15-3-1764*

छ १६ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे सेवेसी

प्रतिपूर्वक सखूबाई[१] सिंदे दंडवत विज्ञापना. येथील कुशल ताा फाल्गुण सुध्य १२ जाणून येथास्थित आसे. याउपरी चिरंजीव माहादजी सिंदे यासी आपण येथे पाठविले. साहेबीं पाठविले म्हणून आम्हीं त्यासी कोणे गोष्टीचे

---

१ जयाप्पा सिंद्याची स्त्री सखूबाई रघुनाथरावदादाकडे महादजीबद्दल तक्रार करिते. हिचा मुकाम बहुधा जांबगांवास असावा.

द्वैत न धरिता त्याचे (लोका)स व त्यास वाडियातच ठेविले. दोन तीन महिने आम्हापासी होते. सांप्रत्य कजिया करून दुसऱ्या वाडियात जाऊन राहिले. आम्हास आनेक प्रकारचे उपद्रव अरंभिला आहे. चहुकडोन बेतंग केले आहे. आमच्या जवलील माणूस देखील आम्हापासी येऊ देत नाहीं. सेतेपोते आमच्या पोटापाण्याची होती ते झाडून बंद केली. ब्राम्हण येक दोघे जवल होते त्यासी पीडा करितात. आमची अन्नावस्त्राची विपत्ये आहे. आणखी उपद्रव आम्ही कोठेवर ल्याहावें? आम्हावर ईश्वर गहजब केला कीं येकायेकी येकदाच मृत्य पावले. आम्हास कोठे उभे राहावयासी जागा नाहींसी जाली. दुखाचे परवत जालें आसता माहदजी सिंदे पाठी लागले आहेत. येक खावंदाचा भरवसा, त्यासी साहेबहि परामृश (घेत) नाहींत. यैशा मणुशाकडून आमची आबरू घेवितात तेव्हा आम्ही उपाय काय करावा? साहेबापासी वर्तमान ल्याहावयासी चोर जालो यैशा गती जाल्या आहेत. दासीचे दाशत्व आम्ही करावें यैसे साहेबाच्या मर्जीस येत आसले तरी सुखरूप करावें; परंतु ईश्वरास ह्या गोष्टी मानत नाहींत. साहेबाच्या चितात आमची विपत्ये करावी यैसे आसले तरी तैसेच लिहून पाठवावें. विश भक्षून सर्वत्र प्राणत्याग करू. दुसरा उपाय नाहीं. हे जाचणूक आमच्याने सोसवत नाहीं. दौलत साहेबी त्याच्या हवाली केली. आज च्यार महिणे येथे येऊन बसले आहेत. येक राऊत आद्यापि ठेविला नाहीं. पागेची बंदोबस्ती आगर शागीर्द (ये) कोणे गोष्टीची तरतूद तिलमात्र नाहीं. सारा बखेडा चहूकडोन जाला आहे. कोणी पाठऊन परामर्ष करावा. पुढें आमच्या संसाराचा कांहीं बंदोबस्त करून देतील तरी आमची जगणूक होईल. माहदाजी सिंदे याच्या जाचणुकेपासोन सोडवावें. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Sakhubai Sindia, wife of Jayapa Sindia, complains to Raghunathrao against the ill-treatment of Mahadaji Sindia and pathetically appeals to Raghoba Dada for help.*

---

*No. 54*] [*31-3-1764*

पौ छ ६ सवाल सन
आर्बा चैत्र

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पौ रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. राजश्री पुर्षोत्तम माहादेव वकील याची रवानगी शाहा अब-

१ घावरे.

दली याजकडे व जवाहिरसिंग जाटाकडे केली असे. त्यास वस्त्रें बहुमान न्यावयास येणेप्रमाणें पोशाख

वस्त्रे सिरस्तेप्रमाणे पोशाख
३ शाहा अबदली
२ खाशास
१ शाहावलीखान
३ जाटास
२ खास बंधु
१ रूपराम कटोर
यास सनगे २ यो
———
३
———
६

हती नग
२ शाहा अबदली
१ खासा
१ शाहावलीखान
———
२
१ जवाहिरसिंग यांस
———
३

येकूण साहा पोशाख सिरस्तेप्रमाणे व तीन हत्ती देविले असत. तर सदरहू-प्रमाणे याचे स्वाधीन करून याची रवानगी लवकर करणें. रा छ २७ रमजान सुरू अर्बा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

*Purushottam Mahadev Hingne is sent on an embassy to the Abdali. The letter is addressed by Raghunathrao to Nana Fadnis.*

---

*No. 55*] [*Apr. 1764*

२

श्री

पुरवणी साहेबाचे शेवेसीं

हेमराज कवेर याचे पुत्र परसुकजी याजलाहि पाठविले. त्याजला हलचंद दिवान याचे कबिल्याविषई सांगितले. त्याजवरून कबिले जोहारमल जाट यानी सोडून दिल्हे. राज्यापासी पाठविले. ते जयेपुरास दाखल जाले. हलचंद याचे पुत्र चौवे याची मुलाजमत हुजूर जाली. कामकाज त्याजवरी आहे. राजे माधोसिंगजी बहुत सावधानीनें तरतुदीनें चालत आहे. सिकार बहुत खेलतात. स्वारी नित्या होत आहे. जाटाची नजीबखान रोहिले याची लढाई जाली. यावरी नजीबखानाकडे बहुत नवाजीस सिस्टाचार देऊन मुनसी रामकिसन याजला

पाठविले होते. ते दिलीपलीकडे जाऊन रामड्याचे घाटीं नबाब नजीबखान यासी मुलाजमत घेऊन सिरपाव घोडे बक्षीस मोत्याची माला सिरपेच जो सरंजाम दिल्हा होता तो प्रविष्ट करून बहुत श्नेहवाद संपादून दहा पांच दिवस राहून मुनसी रामकिसन याचा बहुत सिस्टाचार वस्त्रे बहुमान घोडा देऊन विदा केले. ते चैत्र शु॥ ३ जयेपुरास दाखल जाले. राज्यांची मुलाजमत जाली. नजीबखानासी आंत्र बहुत ममतेनें राखिले आहे. सिखाचा उपद्रव दिलीपलीकडे बहुत जाला. याजकरितां नजीबखान यानीं जाटाकडील मनसुबा सोडून सिखाकडे जाऊन पैगाम लाऊन अका लक्ष रुपये मामलीतीचे ठराऊन सला मामला करून उपद्रव मिटविला. सीख माघारे गेले. जाटाचा उपर सिखानीं बहुत केला. मुलुक वाचविला. नजीबखान रामड्याचे घाटीं आहे. दिलीस येणार. जाट जोहारमल मथुरेस आहे. फौज पार पाठविली आहे. त्यानीं तमाम आपल्या मुलकाची ठाणी कायेम केलीं. नजीबखानाची फौज वान्हा (?) कड उतरली होती, ते मारोन घेतली. जाटाचा बंदोबस्त जाला. पुढें जो विचार होईल ते लिहीत असो. दिलीस पातशाहजादा नजीबखानाचा पुत्र आहे. बंदोबस्त उत्तम आहे. पठान आबदाली माघारे गेला. आपल्यामध्ये फिसाद फार जाला याजकरितां उठोन गेले. सिखाचाहि दबाव पडला. सिखानीं लाहोरांत ठाने बसविले. तमाम बंदोबस्त सिखाचा जाला. आलीगोहर पातशहाकडील वर्तमान तरी पातशहा व सुजावतदौले काशीसंनिध पावले, पटण्यास जात आहे, तिकडील मनसुबा पडला आहे. कासमआलीखान बराबर आहे. त्याचा बंदोबस्त करून घ्यावा, हा विचार आहे. प्रस्तुत कासीसंनिध आहेत. पुढें जे वर्तमान येईल, ते साहेबाचे सेवेसी लिहीत असो. वरकड राजेरजवाडे आपल्या आपल्या जागाच आहेत. गुलराज वकील व नंदराम मुनसी शाहकडील कोव्यात होते ते सांप्रत जयेपुरास दाखल जाले. राजे माधोसिंगजी याची मुलाजमत जाली. प्रस्तुत राहतील. हवेली (अपूर्ण)—

¶*Letter reporting news to the Peshwa from the North. The Jats with the help of the Sikhs are holding out against Najib. Mir Kasim is marching back upon Patna with his new allies, Shuja-ud-daula and the Emperor. The Abdali has withdrawn from the Punjab owing to risings in his own country.*

---

*No. 56]* *[12-6-1759*

श्री.

वडिलाचे सेवेसी सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ १९ शौवाल मंगलवार दीड प्रहर दिवस सकालचा मुकाम मेरठे सुखी असो विशेष. शुक्रतालचे पत्र

आले ते बजिनस पाठविले आहे. पावेल. रा बाबास पत्र लिा आहे. विचारास आल्या द्यावे. सारांश फौजाचे पुढे कूच होऊन आल्यास आमचा येथील बंदोबस्त राहेल; आणि इकडे फौज पाठवावयाची ते पाठवावी. वारंवार काय लिहू, होणे जाणे ईस्वराधीन. आम्ही आल्यापासून लिहिता थकलो; परंतु कोणी एक स्वार मागाहून येक म्हणतो. सेयाजी गाईकवाड पालखीसुधा काल आले दुसरे कोणी आले नाही; तरी पतके फौजे पाठवावी; व फौजाचे कूच लौवकर होये ते करावे तरच इकडील ठाणी वाचतील, नाही तर कलतच आहे. हालीमाजीचा समये, कितीक गोष्टी ध्याना आणौन दादास विनंती व रावजीस करणे ते करावी. फार काय लिहू. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*The writer asks for the immediate despatch of contingents to retain Meerut and other places captured recently.*

---

*No. 57*] [*29-4-1767*

पैा छ १० जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामी चे सेवेसी

विनंती सेवक गोविंद रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल वैशाख शुध १ बुधवार मुा ना झोकर जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. छ १९ जिलकादचे पत्रे पाठविली ते पावोन वर्तमान विदित जाहले. रा रावजीची पत्रे रावजीस दिल्ही. त्यानी उतर केले की, येकदा फडनिसाची पत्रे सालसीची आल्या मग सर्व जाबसाल श्रीमंत दादासाहेबापासी करीन. दिकत कारकुनाची काहडीतात. आमच्या मर्जीप्रा वर्तत नाहीत याजकरिता विनंती लिहीत गेलो. दुसरे वडिलानी पत्र लिहिले त्याचा भावगर्भ ध्यानास आणून जपत उतम. त्याप्रा उतर ल्याहावे. पत्रे परभारा न पाठवावी. आम्हापासी पाठवीत जावी. चिंता नाही. मधे त्याजपासी आज्ञा मागितली परंतु न दिल्ही. उतमच जाहले. दाहा हजार राची हुंडी पाठवणे म्हणून लिहिले. त्यासी रा यादवरावभाऊनी बारा हजार राची निशा रा गंगाधरपंत याची करून * * * रावजीस पाठविले. बहुत उतम जाहले. कारकुनाची पत्रे जरूर पाठवावी. राजकी वर्तमान होलकराचा श्रीमंता(चा) आद्यापि तह ठरला नाही. दादासाहेबाचा आग्रह नवी जाहगीर द्यावी सिवाय नजर द्यावी. त्याचे मानस पंचवीस लाख रा पावेतो नजर कबूल करितात परंतु जाहगीर न

देऊं. नित्य जाबसाल होतात. रा अत्रचितरावहि त्यांत आहेत. होळकराचा ठराव जाहाला म्हणजे होळकराची व सिंदे याची रवाणगी हिंदुस्तानात होणार आहे. भोसल्यासहि पाठविणार. काय ठराव होईल तो पाहावा. रा विठल सिवदेव याची पत्र नित्य श्रीमंतास येतात की, जाटाची फौज व रोहिल मिळोन दाहा पंधरा हजार भिंड कछवाधार येथे आली. गोसावी पळोन गेला. रा बाळाजी गोविंद डंघाईत गेले. कोचेस फौज येणार. जर मातबर फौज येती तर मुलुक राहातो. नाहीं तर जाठ, रोहिले येकत्र होऊन मुलुक घ्यावा यैसे त्याचे मानस यैसी वार्ता आहे. त्यासी लोक श्रीमंताच्या कह्यात नाहीत. सरदार मात्र बेदील. आम्हास मोठी आपली चिंता. कुटुंब समागमे आहे. आपण बहुत सावधता राखावी. आम्हास खर्चास रा गोपाळराव यानी लिहिले कीं हुंडी करून पाठविली ते घेणे. पत्रीमात्र लिहिले. हुंडी नाही. येक रुा नाही. यैसे लटके लिहिल्याने आमचे कैसे चालेल? आमची येथीलच निश्चंति नाही. तेव्हां घरचा प्रकार काय ल्याहावा? तथापि स्वामीस न ल्याहावे तर कोन्हास ल्याहावे? अंगीकाराचा अभिमान धरून सांभाळ करावा. हाहि प्रकार न लिहितो. म्या सर्व वर्तमान सेवेसी येक दोनदा निवेदन केले होते. इतके लिहिले म्हणून राग न करावा. धनी मायबापसारखा आहे म्हणून लिा. आपली आज्ञा कीं, मजला लिहिल्यावाचून स्मरण होत नाही. याजकरिता येक दोनदा लिहीत गेलो. आता लिहिणार नाही. वरचेवर आपल्याकडील वर्तमान लिहीत जाणे. आपण येक डौलें पुढील कमाविसीचे दुसरे मल्लाचे (अपूर्ण. दोन बंद गाहाळ)

¶*An incomplete letter from Govind Raghunath to Vishvasrao Lakshman (Raosaheb) reports that an agreement has not yet been reached about the succession to the Holkar's estates. The writer further informs that the Jats have been joined by the Rohillas and have captured several outposts near Gwalior.*

---

*No. 58*] [*Recd. 10-5-1764?*

पैा छ ८ जिलकाद

## श्रीभवानीशंकर

श्रीमंत राजश्री दादा साहेब

स्वामींचे सेवेसी

सेवक गोविंद यादव दोन्ही कर जोडून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञाति यैसी जे. स्वामींनी कृपाळु होऊन पत्र पाठविलें तें पावोन वाचून बहुत संतोषातें पावलों.

१ शिक्याचा कागद.

तें पत्र बजिनस नवाब दरगाहकुलीखानास वाचून दाखविलें व नवाब दरगाह-कुलीखानानी पुसलें कीं आम्हांस पत्र लिहिलें कीं नाहीं ? आम्ही उत्तर दिल्हे मागून पत्र येणार. दरगाहकुलीखानाची ममता साहेबाचेठायीं फार आहे.

जगजीवनराऊ पोवार याजला पांच लक्षा रुपयाची जागीर दिल्ही. याचा दिवान आपाजीपंत नासिककर ग्रहस्त आहे व येक साहुकार यैसे आले आहेत. आमील धुंडितात. कोन्ही परगणे कबूल करीत नाहीं. बदमामली दुसरे तुम्हां-कडील संसये याकरितां रीघ (?) करीत नाहीं. आमाजी परगणे देतात परगणेची यादी लिा पाा.

सदाशिव रामचंद्र धारुरावर व हैदरयारखाहि समागमेच आहे. बापूजी करंड्याची फौज मधें पडली होती, याकरितां पुढें गेले नाहीं. धारूरीहून सदाशिव रामचंद्राने निजामआलीस आर्जी लिहून पाठविली. मदत पाठविता तर लस्करास पोंहाचणें होतें.

लस्करांतून लटकी वार्ता आली कीं मुरादखानास बसविले. निजाम आलीखान बेदरच्या किल्यांत गेला तेव्हां नवाबाचे समागमे मुरादखान वगैरे लाहान मोठे सरदार गेले. सर्व सरदारांस रजा देऊन येकला महमद मुराद-खानास नवाबानीं आपल्यापासीं ठेविलें. त्यावरून लोकांनी हें तुफान रचिलें. हे गोष्ट नवाबाचे कानीं गेली. दुसरे दिवशीं नवाब व मुरादखा येके हवद्यांत बसून किल्यांतून लस्करास दाखल जाले. तेंच फरमाविलें मुरादखानास कीं दाहा बारा हजार स्वार व बाण व तोफा जानोजी व खंदारचा राजा वगैरे यांजला समागमें घेऊन जाऊन बापूजी करांड्यास तंबी पोंहचाऊन सदाशिव रामचंद्रास घेऊन येणें. हुकूम निघतांच मुरादखानानें सांगितलेप्रमाणें सरंजाम घेऊन रातोरात चाढून करांड्यावर छापा घातला. दोन हजार स्वारानसी करांड्या पळाला. वराडाकडे गेला. मुरादखान रेणापुरावर आहे. सदाशिव रामचंद्र मुरादखां भेटले; कळले पाहिजे. निजामआलीचा रूख पहिला जानोजी भोसल्याकडे जायाचा होता. जानोजी भोसल्यानें आपला वकील पाठऊन जवाब सवाल केला, कांहीं पैकाहि देऊं केला, आंतस्त येक आहे. जानोजीविशंई रामचंद्र जाधव जवाबसाल केला. कितीक वर्तमान येसू जुबानी सांगतां कळो येईल. जानाजी भोसल्याचा इतबार[१] न धरणें.

निजाम आलीखानापासीं वकील हैदरनायेकाचा दुसरा आला कीं माझी मदत करा, खरचायास मी देतों. हैदरनायेकाकडे जायाचा रूख आहे. नवाब

---

१ विश्वास.

कलबुर्गाकडे आहे. जनवार्ता आहे कीं आदोनी रायचुरास जातो, मोगल आपले कावूंत आहे. छावणीची वार्ता आहे कीं धारुरावर करावी. सर्वाचा मनसुबा हाच आहे.

अबदालीच्या लस्करांत बहुत महर्गता, खर्चायास नाहीं. आपल्याआपल्यात कजिया जाला. अबदाली जिवंत आहे. फौज थोडीसी, आंगचा जोरा फार; हार येऊ सकना. तो आपल्या मुलकाकडे गेला.

रोहिल्यासी व जाटासी कजिया होता, नजिबखानानें जाटास सांगून पाठविले कीं जे होणार तें जालें; तुझा बाप युद्ध केल्यानें जिवंत होत असला तर युद्ध आम्हांसी कर. तुझा कांही मुलुक घेतला नाहीं; उगाच कां हैराण होतोस? येश अपेश भगवानाचे हातीं आहे, इतकी गो(ष्ट) बोलून नजिबखा जमना उतरून पलीकडे आहे. जाटासी चौघाही समजाऊन कागदीपत्रीं येक जाले.

राजे माधोसिंग आपल्या मुलकांत आहेत. जाटाकडेहि फौज पा। रोहिल्याकडे फौज पाठविली. हा दुतरफा आहे.

मल्हारजी होलकर * * आहे जैरामपंत वकील शहरांस हिमतखांपासी आला भेट घेऊन तो नवाबाचे लस्करास गेला. येसू जासूद जुबानी सांगतां कळों येईल. जेरामपंतासी बहुत घरोबा आहे कळावे.

¶*News-letter giving tidings to Raghunathrao about the progress of events at the court of the Nizam and news about the Rohilla, the Jats, and others.*

---

*No. 59*] [*20-5-1764?*

श्री

श्रीमत माहाराज राजश्री दादासाहेब
साहेबांचे सेवेसी

चेरणरज चिमाबाई सिंदे साष्टांग दंडवत. अर्ज विनंती विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १९ रोज माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण चिरंजीव माधवराव शिंदे याजला वाटें लावावया-बदल गंगातीरपावेतों गेलों. गंगास्नान करून माघारें साहेबाचे पायांपाशीं यावें ऐसा आपला मनोदये होताच, तों आपलीं पत्रें चिरंजिवास अलीं कीं, मातोश्रीस

समागमे घेऊन न जावे म्हनवून अज्ञा. त्याजकरून चिरंजिवास हिंदुस्थानाकडे वाटे लाऊन आपन परगणे अंबड येथील मुकामीहून स्वार होऊन, छ १७ रोज माहे जिलकाद वैशाख वद्य ९ शेनवारी श्रीगोंदास येऊन दाखल जालों; साहेबास श्रुत्ये व्हावें. पुढें आपले खर्चावेंचाची वगैरें राहावयाची बंदोबस्ती जैशी साहेब करून देतील त्याजप्रमाने वर्तनूक केली जाईल. आपल्यांस राहावयासी स्थल कोनते नेमून द्यावयाचें तें कृपा करून नेमून द्यावें; व राजश्री अवचितराव तेहि तेथें आहेत तरी साहेबीं आमची खर्चवेंचाची व राहावयाची बं(दोब)स्ती करून द्यावी. आणि राजश्री अवचितराव त्यासी चिरंजिवाकडे कृपा करून सत्वर वाटें लावावें. सदैव पत्र पाठऊन सांभाळीत असावें. पेडगावची सनद आपलें नांवाचीं कृपा करून तेवढी पाठऊन द्यावी. आपणांस साहेबाचे पायांशिवाय जोड काय आहे? आपण सर्वप्रकारें येकनिष्ठ साहेबांचे पायांपाशीं आहेत, साहेबीं कृपावृद्धि करावी. विशेष काय लिहिणें हें विज्ञापना.

¶*Chimabai, mother of Mahadaji Sindia, requests Raghoba to assign a Jagir for her residence and maintenance.*

---

*No. 60*] [*7-9-1755*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वा-

मीचे सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ जिलकाद मुाा लालेर नजीक जिगनी प्राा गालेर येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. पूर्वी स्वामीस पत्रे लिहिली की, राणा भिमसिंग जाठ गोहदकर याणे हरामखोरी करून आमचे गालेरचे मोरचे उठऊन दिल्हे आणि किला घेतला. आम्हाजवल फौज नाही. दिलीस फौज अटकली. रांगडे सामान मेलऊन किला जेर केला. गडावर अन्न नव्हते. येका दो रोजात किला येणार, पेगाम आले तों जाटाने लबाडी केली. त्याजवर त्याचे अमचे जुंज जाले. पहिलियाने त्यास मोडून शहरात घातले. दुसरे वेलेस आम्ही युद्धास गेलो तो रांगडे सामान पलोन गेले. त्याजवल अगीचे बल रेकले जेजाला फार, याजमुले आमची फौज निघाली. हे वर्तमान सेवेसी लिहिलेच होते. त्यासी आम्ही अंत्रीत येऊन राहिलो. सर्व जमीदार कुल फिरले.

ठाणियास आमच्या लागोन दोन ठाणी घेतली. अवघा मुल्हकच फिरला. आमची कुमक कोणी केली नाही. आमची फौज श्रीमंत राजश्री दादासाहेबाजवल, आम्हाजवल पाच सातसे श्वार. त्यास सिरा माणूस कुल जाया जाले. घोडी से पनास पडली. माणूसहि खासे खासे ठार जाले. कोणी धर न धरी. जाठाने तो फार शोकी केली. जिंगणीचे ठाणियास मोरचे लाविले त्यास नवी सिबंदी ठेऊन मोरचे मारून काढले. त्याजवर जाठाने सुरजमल त्याजकडे आपला फतेसिंग पाठऊन तेथून कुमक पाचसे स्वार, दोन हजार प्यादा पाठविला. त्यास मागती ठाणी घ्यावयास उदेग जाटाने केला. आम्ही फौज पाठविली. गोविंदराव सिवदेव याजबा हजार स्वार दोन तीन हजार प्यादा नवी सिबंदी ठेऊन रा केले. परंतु बारा हजार बंदुख, तीन हजार स्वार, परंतु जाठ भारी. त्यास आम्ही अंत्रीहून कूच करून आलो. गोविंदरायाजवलचे सामान व आपले सामान येकत्र करून बढोखरावर (?) गेलो. त्याची फौज बढोखेरावर होती. त्यासी तेच दिवसीं आपल्यास काहिली जाली होती. फौजेचे युद्ध होऊ लागले. परंतु जाट भारी तेव्हां कुलस्वामीचे व स्वामीच्या चरणाचे स्मरण करून घोड्यावर बसलो आण तैसीच हला केली. त्याची फौज मोडून ताराज केली. रेकले दोन घेतले. घोडी दाहा वीस उंटे दाहा नगारा निशाण घेतले. सरदार फतेसिंग यास जिवे मारिले आण डोचके खिजमतगारापासून उरूबरू कापविले. दोनतनिसे माणूस ठार केले. से दोनसे जखमी. फौज कु (अपूर्ण)

¶*Vithal Shivdev reports to the Peshwa the details of his victory, despite heavy odds, over Bhimsing Jat. The concluding portion of this letter is printed as No. 45 of Selection 2.*

---

*No. 61*] *[17-6-1764*

पो छ मोहरम.

श्री

श्रीमंत राजश्री राऊ साहेबाचे सेवेसी

विनंती सेवेसी नारो श्रीनिवास कृतान्यक सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा ज्येष्ठ सुा ४ मुा भांडेर जाणोन स्वकुशललेखनास आज्ञा झाली पाहिजे विशष. येथील वर्तमान येसज. काल भिंडेहून माणूस आले ते सांगत होते की जाटाची फौज अटेरीजवल अकोडीस लागली आहे म्हणून सांगतो. दुसरे कोचेहून बेपारी आले ते सांगत होते की कोचेची पेट गडबडली आहे येस

सांगत होता. सेवेसी कलावे. आमचे खासगी वर्तमान येथील मामलेदार निघून स्वामीपासी गेले मणून गावात गडबड जे, कोणी येथ नाही. अणि काही सिबंदीहि नाही. दुसरे अणियेक प्रकारे फिकीर करतात. सेवेसी कलावे. तरकारी डाली पा। आहे. विशेष लिहिणेस की नवे. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Naro Shrinivas reports that the Jats have advanced as far as Ater and are threatening Konch.*

---

*No. 62*] [*2nd June 1764*

पौ छ ९ दोन प्रहर रात्र
मु॥ धामणगाव पा॥ मेहुणबारे

**श्री**

**राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**त्र्यंबक नारायण व अंबादास बलाल**
**स्वामीचे सेवेशी**

सेवक नारो कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहावें विशेष. राजश्री माहादजी सिंदे याची सरदारी दूर करून मानाजी सिंदे याजकडे सांगितली, त्यामुळें श्रीमंताची आज्ञा न घेतां पळोन गेले, ते मजल दर मजल मालवियांत जातील, त्याचें पारपत्य जालें पाहिजे म्हणून रुबरू येविसी कितेक प्रकारें सांगितलें. त्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे व आपले निसबत तैनाती पथकें आहेत त्या सरदाराचे नांवें सरकारचीं पत्रें अलादा आहेत ती पो असेत. तुम्हीं व सर्वांनी येविसीचा अर्थ ध्यानांत आणून, रात्रीचा दिवस करून, माहादजी सिंदे याचें पारपत्य करावें. हें पत्र पावतांच मार्गाची बंदोबस्ती मेहेनत करून करावी. ही वेळ स्वामिकार्याची मेहनत करून करावयाची आहे. येक घटकेचा विलंब, हरयेक सावधता करावयाचा नव्हे. तापीस पाणी असेल. ज्या ठिकाणी उतरावयाचा मार्ग असेल तेथें तरदूद करावी. तुम्ही सत्वर बऱ्हाणपुरास जाऊन जागा जागा नांवा असतील त्या झाडून येके जागां गोळा करून बंदोबस्तींत ठेवणें आणि नाकेबंदी करून सावध राहणें. हुजुरून राजश्री कुकाजी सिवराम रवाना जाले आहेत, ते तिकडे येतील. तुम्हांस येविसीं व हरयेक बंदोबस्ताविसीं लिहितील त्याप्रमाणें त्या घटकेस फौजसुधां तुम्ही जातींनसी जाऊन पोहचणें. ज्याप्रमाणें कामकाज सांगतील त्याप्रमाणें करावें. याजला यखादा दिवस अधिक उणा मार्गी लागलियास तुम्हांजवळ हे पत्रें अगोधर पावतील. तुम्ही

खबरदारी चांगली करणें. तुम्हीं शाहाणें खबरदार आहां. खानदेशांत होळकराकडील जागाजागा कमाविसदार आहेत, त्यांजला पत्रें गेलीं आहेत. तुम्ही सर्वांस ताकीद करून साहेब नक्ष करणें. हे कार्य तुम्ही कराल हा भरंवसा जाणोन आम्ही आलों नाहीं. सरकारचा शब्द आम्हांकडे न ये तें करावें. हरयेक ठिकाणी अडचणीची जागा पाहून त्या ठिकाणी गाठून पारपत्य करावें. मुख्य गोष्ट तापी उतरोन यावत जागा जागा नाकेबंदीचें काम पोख्त करून खबरदारी करणें. तुम्ही तापी उतरून उत्तर तीरीं राहावें. चांगदेव वगैरे ठिकाणी नावा असतील त्या दरोबस्त येके जागा गोला करून, तुम्ही फौज सुधां, ज्या ठिकाणी उतरावयासी येतील, तेथें मुकाबलियासी परतीरी उभें राहून ज्या ज्या ठिकाणी उतरावयाचा मनसुबा करितील त्या ठिकाणी तुम्ही जावें. कदाचित वराडचा रोख त्याणी धरला तर तिकडे आडवें व्हावें. झाडून माहालो-माहालीं येविसींची ताकीद करून तुम्ही खबर(दार) राहाणें. हे गोष्टीचे श्रीमंतास जरूर आहे. याजकरितां आम्हांस बहुत प्रकारें सांगितलें आहे कीं, जसा प्रसंग पाहाल तसी तरतूद करून बंदोबस्त करणें, म्हणून आज्ञा केली आहे. मशारनिलेबराबर स्वार तीनसें आहेत. सरंजाम कमीच आहे. तुम्हीं हिमत धरून सावधता केलियास हें येश तुमचें पदरीं पडेसें दिसतें. थालनेर वगैरे होळकराकडील माहालकरी यासी सरकारचीं पत्रें व आम्हीं पत्रें येथून परभारी पाठविलीं आहे. रनाल्याकडील तापी किनारियाचा बंदोबस्त माधवराव कदम यांस सोपिला आहे त्याप्रमाणे करितील. माहादजी सिंदे याचा येक रोख कासारबारी उतरोन थालनेराकडे जावयाचा आहे. येक बुराणपुरासनिध होऊन जावें यैसे आहे. तुमचे लत्यातून[१] चोपड्यापासून बराणपुरापावेतों, अटकाव कराल हा भरंवसा आहे. तें न जालें तरी नामोसी पुर्तेपणें आपले माथां येईल, यैसें न करणें. थालनेराकडून जाऊं लागल्यास तुम्ही परतीरानें त्यांचा होळ-कराकडील कमाविसदारांचा व बांध्याचा उपराला करणें. ऐसेंहि करितां येकादे जागा तापी उतरून पार जालें तर अशेरचे किल्यावरील लोक वगैरे व बराण-पूरचे लोक व भिलाण आणून, धूलकोट वगैरे घाट व नाक्याचा बंदोबस्त करून, तेथें त्यांस आडवें होऊन, पारपत्य करणें. बहुत सावधता करून त्यांस तापीपार होऊं न दिलियास तुमचें ऊर्जित होईल. अंबादासपंत व तुम्हीं निराले असाल तर पत्र पावतांच येकवट होणें. एके घटकेची सुस्ती न करणें. बातनीस दाहा जोड्या व राऊत पाठऊन बातनी वरचेवर आणवीत जाणें. त्यासुमारें बंदोबस्त येथास्थित करणें. माहालोमाहाल रोख्यावर राऊत गेले असतील

१ बाजू.

ते रातोरात जमा करून जथून राहणें. तिकडील वर्तमान दिनचर्येचें वरचेवरी लिहीत जाणें. इकडून पत्रें वरचेवर तुम्हांकडे पाठवीत जाऊं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Defying orders not to quit the capital Mahadji Sindia left Poona for his territories in Malwa. Naro Krishna Subhedar of Barhanpur instructs his officers as to how Mahadji Sindia's march into the North was to be circumvented at various strategic points on the different routes he was likely to take.*

---

*No. 63*] [*1-7-1764*

पौ छ ९ मोहरम

**श्री**

**श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक महादाजी विश्वनाथ सा। नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता। छ १ मोहरम जाणोन स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. चिरंजीव राजश्री चिमणाजीपंत स्वारीस बुंधेल्याच्या पारपत्याकरिता आज च्यार दिवस नदीपार मुकाम करून राहिले आहेत. बुंधेल्यानी शोकी चहुकडून फारच केली आहे. धण्याच्या प्रतापेकरून बंदोबस्त होऊन येईल. यानंतरी इकडील सविस्तर वृत राजश्री महिपतराव सेवेसी निवेदन करितां सेवेसी श्रृत होईल. आपण स्वामीची सेवेसी श्रृत येकनिष्टपणे जाणतो. दुसरा अर्थ जाणत नाही. सेवेसी श्रृत होये विज्ञाप्ति.

¶*Vishvasrao Lakshman is informed that Chimanajipant is leading an expedition against the rebellious Bundelas.*

---

*No. 64*] [*4-7-1764*

पौ छ १७ मोहरम

च्यार घटका दिवस

१ राहता.

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री त्रिंबक**
**नारायेण व अंबादास बल्लाळ स्वामीचे सेवेसी**

सेवक नारो कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लि॥ विशेष. राजश्री माहादजी शिंदे श्रीमंताची आज्ञा न घेतां पळोन

हिंदुस्थानांत चालले; त्याचें पारपत्य करावें म्हणोन आज्ञा जाली आहे. येविशीचा मजकूर तुम्हास सोमवारचे दोन प्रहर रात्रीस मुजरद जासूदजोडी दुसरें दिवशीं तुम्हाजवळ पोहोंचावें असा करार करून रवाना केलें तीं पत्रें पावोन त्यांप्रमाणें बंदोबस्त केलाच असेल. शिंद्याचा मुकाम सो(म)वारीं निफाडेजवळ होता. काल मंगळवारीं बारीखाली मुक्काम जाला. येथून श्रीमंतांनीं त्याजकडे भानगडी करितां पा। होतें, त्याची त्याची भेट जाली; न आइकत. निघोन मजल दरमजल चालले. गृहस्थ फिरोन श्रीमंताकडे आजच दोन प्रहरीं आले, त्यावरून हें पत्र जलद तुम्हाकडे पाठविले आहे. तुम्ही आपली फौज दरोबस्त येकें जागां करून तापी परतीरीं उत्तरेकडे गट करून झाडून नावा परतीरीं आडचणी जागा नेऊन नाकेबंदी चांगली करून ते ज्या ठिकाणीं तापी उतरावयासी येतील ते बातमी राखोन मुकाबलियास उभे राहून काम साधावें. ही वेळ बहुत कामाची आहे. आपले सरदारांस हुजुरचीं पत्रें वगैरे निसबत * * * यांस पा। आहेत. मेहनत करावयाचा समय आहे, न चुकावें. बातमी राखून नदीस पाणी आलें आहे याजमुळें तुमचा डाव फावेल ऐसें आहे; परंतु बातमी राखून मुकाबला तापी किनारियावर पाडला पाहिजे. निदानीं उतरू न पावत इतकें तर केलेंच पाहिजे. चोपडे बेटावदापासून माजरोदपर्यंत घाट नावा असतील तितक्या बंद करून उत्तरतीरीं तुम्ही फौजसुद्धां ते जिकडे उतरावयास जातील तेथें उभे राहून मुकाबला कराल म्हणजे उतरूं पावणार नाहींत. सारांश विशेष लिहावेंसे नाहीं. हें काम गांठ पडून लांबत चाललें तर दाहापांच हजार रुपये शिबंदी खर्चहि पडल्यास करावा ऐशी श्रीमंतांची परवानगी आहे. जर हें गोष्टी कळेल तैसी तर्तूद करून साधितां तर मोठा नक्ष आहे. माहादजी शिंदे याजबराबर सरंजाम थोडके पांचशें राऊत चांगले आहेत. दशाअवधान करून कार्य साधावयाचे प्रसंग आहे. माधवराव बांडे यांसहि थालनेराकडील मार्गास अवरोध करावया-विषयीं सरकारचीं व आमचीं पत्रें गेलीं आहेत. तिकडीलहि बातमी तुम्ही राखून होईल बंदोबस्त तो करावा. सारांश अकस्मात हें कार्य प्राप्त जालें आहे. याची सर्वसहा (?) जालियास फार कसबाची परीक्षा आणि पराक्रम आहे. नद्या भरल्या आहेत. याजमुळें उतरणार दोन सहस्र आणि बंद करणार दोनशें बराबर आहेत. तुम्ही पांचसातशें हजारपर्यंत समयास मिळवावें. साहेब-काम करून दाखवावें ऐसें आहे. बहुत लिहावें ऐसा पदार्थ नाहीं. पत्रदर्शनीं पेशजीच मुस्तेद होऊन त्याचे सुमारें बातमी राखून गेलेच असाल. तुमचा फौजेचा त्यास भ्रम फार आहे त्याजप्रमाणें दबावानेंच काम होईल. पोंहचले

मात्र पाहिजे. येदलाबादेस देखील नांवा वगैरे बंदोबस्त केला पाहिजे. तुम्हास सुचेल तें करणें. रवाना छ ४ मोहरम बुधवार दीड प्रहर दिवस (दिवस) बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हें विनंती.

¶*Naro Ballal reiterates his orders to intercept Mahadaji Sindia's march.*

---

*No. 65*] [*19-7-1764*

छ २४ मोहरम

**श्रीशंकर**

यादीपत्र

१ मानाजी सिंदे यास पत्र की दताजी सिंदे याचे कालकीर्दीचे मलकापुरचे घासदाणियाबाा नारो शंकर याचे विद्येमानची चिटी रूाा ६५८१ पास्टश येक्यांयशीची आहे. येविशई पेशजी महादजी सिंदे याजकडे सरदारीचा कारभार होता. त्याजला पत्र दिल्हे होते. हली याजकडे सरदारी जाली आहे. सबब माहादजी सिंदे याचे पत्राप्रमाणे याजला पत्र द्यावयाची आज्ञा.

महादजी सिंदे याचे नांवे सरकारचे पत्र सोबत आहे त्याप्रमाणें मनाचिटी देणे म्हणून पत्र.

१ माहादाजी गोविंद यास पत्र की मानाजी सिंदे यास पत्र आहे त्या पत्राबमोजिब याची चिटी यास देणे म्हणून पत्र.

येणेप्रमाणे पत्र.

---

२

सदरहू प्राो येकूण दोन पत्रे.

छ १९ मोहरम आषाढ

खमस सितैन

¶*Orders issued to Manaji Sindia for the payment of ghasdana dues.*

---

*No. 66*] [*4-8-1764*

पोा छ ५ सफर

श्रावण मास सन खमस

**श्री**

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक केदारजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील सेवकाचें वृत तागायेत छ १ माहे मोहरम माहाराजांचे असीर्वादें येथास्थित असे विशेष.

4183

स्वामीचें आज्ञापत्र छ २ मोहरमचें आलें तें प्रविष्ट जाहालें; तेथें आज्ञा कीं, हुजूर दर्शनास येणे. हुजूर आलियावरी जो बंदोबस्त करणे तो केला जाईल म्हणून आज्ञा लिहिली. यैशास स्वामीचे सेवेंत तीर्थरूप राजश्री नानाबावा आलेच आहेत, त्यांसच जे माहाराजांनी आज्ञा करणे ते केली पाहिजे. आम्हींहि त्यांचे आज्ञांकित असो. स्वामीच्या आज्ञेप्रमाणेच जे चाकरी करणे ते सर्वेहि सेवा चाकरी करून. तीर्थरूपांत व सेवकांत कांहीं द्वैतार्थ न जाणावा. विदित जाहलें पाहिजे. सेवेसी ख्यात होये हे विज्ञाप्ति.

¶*Kedarji Sindia informs Raghunathrao that whatever commands are to be communicated, should be delivered to Mahadji with whom the writer has no difference ; since, he adds, Mahadji is with the addressee, there is no need of the writer's presence there.*

---

*No. 67*] [*16-8-1764*

पौ छ २४ मोहरम
सन खमस.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक आज्ञाधारक नारो बलाल भुसकुटे कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ १७ मोहरमपावेतो तालुके मजकूर व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर नारायेणजी मोरे याजबराबर आज्ञापत्र रवानगी छ ४ रोजी जाले ते छ ९ मोहरमी दोहो प्रहर दिवस चढता पावले. तेथे आज्ञा की माहादजी सिंदे येथून गेले आहेत. यासी बढव्याचे घाटे आले तरी नाव बंद करून उतरू न देणे, व ठाणेयाचा बंदोबस्त करणे. त्यावरून घाटाचा बंदोबस्त केला तो छ १३ मोहरमी माहादजी सिंदे महेस्वरचे घाटे उतरोन पार जाले. कूच दरकूच महेश्वराहून उजनीस जातात. आपल्या घाटे आले नाही. इकडील वर्तमान तरी बढवेकर राजे याचा तूर्त लावणीचा हंगाम जाणोन सलुक केला आहे. सलुक न करावा तरी रयेतीस धीर पुरोन लावणी होत नाही. हे लावणीचे दिवस निघोन गेलियासीं पुढे माहाल कमती बहुत येतो. पुढे निर्वाह करणार स्वामी धनी समर्थ आहेत. हांडे सरकारात खेमा गोंड याचे लेकाने

लबाडी करून कसबे हांडे येथील गुरे नेली आहेत. त्याचे पारपत्य केले पाहिजे. तिकडे आठा दिवसी जातो. पो खांडवे येथे रामपुरे व मकराइकर व धारडी व सिलाणीकर मवास बहुत उपद्रव देतात यार्कारिता मवासाचे तोंडावरी तीन ठाणी मुस्तकीम ठेऊन मुलुकाचा बंदोबस्त करून लावणी केली आहे. ठाणेयामुळे सिबंदी जाजती लागली आहे. सरकारच नक्ष राखिला. पुढे निभाव करणार स्वामी समर्थ आहेत. यंदा या मुलकातून सटवाजी गाईकवाड निाा मल्हारराऊ होळकर याचा पथक्या गेला. त्याणे प्रगणयात बहुत धामधूम केली. मागाहून सिंदे गेले त्याची पथके आजपावेतो जातच आहेत. धूम बहुत करितात. मनमाने-सारिख्या भेटी वगैराये घेतात. त्यामुळे व मुलकात आरदानीमुळे बाकी रूपये वीस पंचवीस हजार वसूल करून साहुकाराचा यैवज रसदेस घेतला आहे, त्याचा भरणा करणे आहे तो करून, सारे माहालचा हिशेब घेऊन भेटीस येतो. भेटीनंतर बढव्याचे राजेयाचे सलुकाचे व मुलकाचे वर्तमान सविस्तर निवेदन करील. पुढे माझा निर्वाह करणार स्वामी समर्थ आहेत. नारायेणजी मोरे यासी सिंदे याचे बंदोबस्ताकरिता आजपावेतो ठेऊन घेतले होते. आज रवाना केले असेत. इकडील सविस्तर वर्तमान निवेदन करितील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ballal reports that Mahadaji Sindia eluded his attention by crossing the Tapte at the Maheshwar ford. He further refers to his difficulties in realizing revenue in Khandesh.*

---

*No. 68]* *[22-8-1764 ?*

## श्रीपांडुरंग

### श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक सखूबाई सिंदे दंडवत विज्ञापना तागाईत छ २३ सफरपर्यंत साहेबाचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्तित असे विशेष. साहेबाची आज्ञा घेऊन स्वार जाहलो तो श्रीगोंदयास दाखल जाहलों. धण्याच्या आज्ञेप्रमाणे वर्तणूक करितों. फौजेचे वगैरे कामकाज चाली लाविले आहेत. माहाराजांच्या कृपेकरून सिध्धीस जाईल. आम्हास सर्व गोष्टीनें लोभ करून उर्जित करणे त्याचा परिणाम खावंद लावितील हा पूर्ण भरवसा आहे. त्या अभयेकरून स्वस्थचिते वर्तणूक करितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sakhubai Sindia to Raghunathrao reporting her safe arrival at Shrigonda.*

No. 69] [14-9-1764

पौ छ १८ रावल सनवार

मुा तळेगांव

**श्री.**

**राजश्रियाविराजित राजमान्य**

**राजश्री अंबादासपंत स्वामीचे शेवसी.**

सेवक नारोकृष्ण सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीये लेखन करणे विशेष. तुम्ही पाा ते पावले. किले देहरचे+ राजकारणाचा मजकूर लिाा तो कळला. ऐशास किला हस्तगत युक्तीने आणि लौकर होत असिला तर राजकारण करून, यामुळे हजार दोन हजार पावेतो खर्चहि पडला तर लौकर स्थळ हस्तगत करणे. श्रीमंताची स्वारी जलदीने निघणार. राऊत हजूर बोलवावे लागतील यास्तव त्वरा करून कार्यभाग स्वाधीन करून घेणे. तुमचे पत्राचे सविस्तर उत्तर व जफ्तीच्या संदा मागाहून रवाना करूं. सूचनार्थ हे पत्र लिहून मुजरद पाा आहे. याउपर विलंब न करणे. उत्तर सत्वर पाठवावे. राा छ १७ रावल सुाा खमस सितैन मया व अलफ. दौलताबाजकडून लक्ष्मण कोन्हेर याजकडील कांहीं लोक किल्याखालते आले होते तो अर्थ तुम्ही काहीच लिाा नाहीं, आणि तुम्ही किल्यापासून दूर आहां ऐसी त्याजकडील कारकून बातमी दरबारी सांगत असतो. त्याजकडील लोकांनीं किला हस्तगत करावयाचे राजकारण केले होते ते बिघडलें. पुढेहि ते उद्योगात आहेतच असे बोलतात. यास्तव तुम्हास पत्र लिाा असे तर कळेल तैसे कसब करून किल्याचे सूत्र करून हस्तगत होयसा असिला तर करणे. दुसरेयाकडील काम करतील तुम्ही पाहत राहाल यास्तव लिाा असें. फार दिवस बसतां बननार नाहीं. मोर्चेहि समीप बसवितां मसलत पडते. मोगलाचे निसबतचा किला यास्तव ठीक पडणार नाही. गडबडीत झटपट काम जालियासच मात्र सोईस पडेल यास्तव काय मजकूर तो लिहून पाठवणे. देहर चाळीसगावचे अमलाचा बंदोबस्त कराल तर चिंता नाहीं. तूर्त फिसादच पडली आहे. माहाल कांही राजश्री आबाचे सरंजामात नाहींत. मागाहून सविस्तर पत्रे पाठवितो. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Krishna asks Ambadas Ballal to forestall the attempts of Lakshman Konher for the capture of the fort of Deher and to effect its capture on his behalf by whatever means possible.*

---

+ खानदेशांत.

*No. 70*] [*16-9-1764*

पौ छ ६ रजब

असल बमोजीब नकल.

श्री

राजश्री मानाजी सिंदे गोसावी

यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्य श्रो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. बाा देणे रदकर्ज गुाा त्रिंबक विठल मालपूरकर साहुकार यासी रुपये ४६७१६७ च्यार लक्ष सतसष्ट हजार येकसे सतसष्ट रुपये देविले असेत. यासीं हतेबंदी साले बाा रूपये

११६७९१।।। सन आर्बा सितैन साल गुाा

११६७९१।।। सन खमस सितैन साल मजकूर

११६७९१।।। सन सीत सितैन

११६७९१।।। सन सबा सितैन

४६७१६७

येणेप्रमाणे दरसाल येक लक्ष सोळा हजार सातसे पावणे ब्यानव प्राा चौसाला मिळोन च्यार लक्ष सतसष्ट हजार येकसे सतसष्ट पेशजी राजश्री केदारजी व माहादजी सिंदे याजकडून सरदारी दूर करून तुम्हास सांगितली, सबब तुम्हाकडून देविले असेत; तर सदरहू हतेबंदीप्रमाणे दरसाल स्वारीत सरकारचा यैवज जमा होईल त्या ऐवजी पावते करून पावलियाचे कबज घेणे. जाणीजे छ १९ रबिलोवल सुाा खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

बार.

¶*The Peshwa orders Manaji Sindia to pay off the debts of Malpurkar by fixed instalments as he has been recognised lawful claimant to Sindia's estates.*

*No. 71*] [*Recd. 10-7-1757*

पौ छ २२ रावल

श्री

विनंती उपरी, बुधवारीं तिसरे प्रहरीं पाऊस मात्र उघडला. रात्रीस पाऊस उघडतो तरी प्रात:काली कूच करून रा तात्या आम्ही आठ कोस जातों. अंतर नाही. दर कूच जातो. रा सुभेदाराची पत्रें ३ सोमवारचे मंगलवारचे रविवारचे दो दो दिवसाची आली. जगहाजखान गंगापार फरकाबादेच्या सुमारेच आहे. इकडे उतरत नाहीं. गडमु(क्ते)श्वरी येऊ पोचत नाही. आमची आवई गेली कीं, गडमुक्तेश्वरापर्यंत फौजानी घाट बांधले. आता जगहाजखानाची बंदोबस्ती तरी इकडे नाही. परंतु नजीबखानाच्या कबिल्या खजिनियाची खबर स्वामिनी लिहिली. तरी आम्ही तरी जातच आहो. परंतु मध्ये पाऊसाची झड जे दिवशी लागेल ते दिवशी विलाज नाहीं. व ज्यास खजिना बायका लावणे ते काही बेवकूफ नाहीत. गनीमच तेहि नाहीत. दो दिवसात चाळीस कोस निघोन गंगापार आपल्या ठिका(णा)स जातील. मध्ये कैसे राहतात? असो. आम्ही आज्ञेप्रमाणे जातो. आपण राजे नागरमलाचे मारफातीने वजिरास वरचेवरी बोलाऊ पाठवावें. परंतु त्रिंबकपंत सुभेदार आहे, त्याची काही तरी मालुमात लिहीत जावी. केवळ निर्मोल्य नसावे. त्याचे नावच कागदीपत्री नसले तरी काय करावे? याचा विचार काय! तरी आम्ही तरी, इकडे स्वामी पत्रे पाठवितील, त्यात सुभेदारास पत्र व वजिराचे पत्री त्याची मालुमात ल्याहावी. आपणहि लौकर यावे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Report addressed probably to Raghunathrao about Maratha activities and the enemy's movements in the Doab across the Jumna.*

---

*No. 72*] [*28-9-1764*

होळकरास पत्र.

श्रीहेरंब

जाटाची व नजीबखानाची आदावत पडोन उभयेतात फारच कलह वाढला आहे. दोघेहि लढाईची तरतूद करितात. तुम्हास सामील करून घ्यावयाची साधने दोघेहि करीत असतील. वकील आले असतीलच. त्यास आपणास जो मनसुबा युक्त आणि सरकारकामाचा दिसेल तोच करितील. जाटाची नेकी

सरकारात कैसी आहे हेहि तुम्ही जाणतच आहा. नजीबखा कोणेप्रकारे सरकारात रुजू आहे तेहि जाणता. त्यास सर्वथैव जाटाचे साहित्य करणे. यात त्याचे निष्ठेचे स्मरण व मनसुबास उपयोग आणि नफाहि आहे. यास्तव जाटाचे ठिकाणी ममता धरून याचे साहित्य करावे. इकडील मर्जी व तुम्हासहि याच आन्वयाचे आगत्य आहे व उपयोगी प्रकार हाच आहे. कामाची आणि चांगली तऱ्हा करावी. छ १ रबिलॊवल सुाा खमस आस्विन.

¶*Holkar is advised to support the Jat should his assistance be solicited by either of the two, Najibkhan or Jawahirmal between whom deadly hostilities have sprung up.*

---

*No. 73]* *[7-10-1764*

**श्रीवेंकटेश**

**श्रीमंत माहाराज राजश्री दादा-**
**साहेब स्वामी राजाचे सेवेसी**

सेवक कृष्णराव भास्कर हरकारे पादशाही रिकाबसा आदत व सुबे आवरंगाबाद साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ११ माहे रबिलाखर जानऊण स्वामी राजाही निजानंदवैभव लेखकास आज्ञा करीत गेले पाहिजे विशेश. पूर्वी दोन तीन विनंतीपत्रे येथील सविस्तर वर्तमानाची सेवेसी पाठविली. सांप्रतचे वर्तमान छ मार परियेंत ऐसेजे, पृथवीपति प्रधानासहित छ २९ रबिलोवल परियेंत कसबे बालासरांत मुकामात आहेत. सवाल जेबाब मामलत सुलहचा ज्याफर अलीखान सुबदार बंगाला व फिरंगियाकडूण आहे. वजीर निगोदास्तसिपाह करितात, व सुरजमल जाटाचा पुत्र जवाहरसिंग तीस पसतीस हजार स्वार प्याद्याचे जेमियेतेनें जोधगडाहून कूच करून बलंबगडाआलीकडे तीन कोस येऊण मुकाम केला. तेथून अमरागीर चेला गोसावी व रामकृष्ण महंत वगैरे सरदारास पुढे मुरशदाबादेपासी पाठविले. तेथे त्यास कायम करून आपन मागती बलंमगडास जाऊण बलंमगडची मजबुती उत्तम प्रकारे केली. आपले समागमी तोफखान्याचे सरदार विस्वासुख गडमजकूरचे निगेबानीसाठी ठेविले. तदनंतर तेथून कूच करून फरिदाबादेस आले. तळ्यावर स्नान करून दानधर्म ब्राम्हणास करून फरिदाबादेस उजवे टाकून येमुनातिरावर येऊण उतरला मकान युधे करायाचा पाहून तोफखाना जिनसी तेथे उतरविला. हे वर्तमान नवाब नजीबखान बक्षिजीस पावतांच याही नासीरखान दराती रोहिल्यास बैंजमियत स्वार प्यादे

---

१ रबिलाखर असावें. २ फौजभरती. ३ बंदोबस्त. ४ सैन्यासह.
५ अवजड तोफखाना.

खिजराबादेस पाठविले व आनीक सरदार रोहिले त्यास लिहिले की, खानमजकुराची कुमक करणे व नवाब मजकूर हा दिलीकडे नजदीक मडई नमक ? जाऊण उतरले. नवाब नजीबखानाचो फौज मातबर तीस चालीस हजार स्वार व या वेगला तोफखाना जमा जाला आहे. जाटासी व नवाबाचे फौजेसी फासला एक मजलेचा राहिला आहे. नवाब मजकूरहि आपले ठाई बलवंत आहे. युधेप्रसं(ग) एका दो दिवसा होनार व मल्हारराव होळकर सुबेदाराचे वर्तमान आले की, जोगनेर सांभराजवळ आहेत. राजे माधोसिंगासी जावसाल सुलहचा दरमियान आहे व शाहा आबदाली याचे वर्तमान आले कीं, शाहा मजकूर कंधारेत आहे. मेघराज वकील नवाब नजीबदौला जेमूचे पाहडांत पोहोचला. आबदालियापासीं जाबस्वालास गेला आहे. सांप्रत सिखाचे सरदार चेलागुरू संस्थानास गेले आहेत. दिपवाली जालियावर मागती लाहोर प्रांतास येणार. वरकड वर्तमान यथास्थित आसे. माहाराजाही विनंतीपत्राचे उत्तर पाठऊन तोशवीत गेले पाहिजे. सेवक पदरचा आहे. राो बाबूराव सेवकाचे नायेब आवरंगाबादेस हरकारगिरीचे कामावर आहेत त्यावर कृपा असो द्यावी. त्याचे विनंतीप्रमाने साहित्य पुरविले पाहिजे. विशेश काय लिहीन. कृपा निरंतर असो द्यावी हे विनंती.

¶*Krishnarao Bhaskar sends news from Delhi about the preparations being made by Najibkhan and Jawahirmal the Jat for a severe struggle.*

---

*No. 74*] [*18-11-1764 ?*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री खंडोपंत व राजश्री चिमणाजीपंत स्वामी गोसांवी यांसी**

सेवक नारो शंकर सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २३ जमादिलोवल मुकाम पेडगाव भीमा दक्षणतीर जाणून स्वकीयें लिहिणे विशेष. इकडील वर्तमान सविस्तर चिरंजीव राऊजीचे पत्रीं लिहिलें असें. त्याप्रमाणें तुम्ही जलदीनें झासींस जाऊन दोन्ही स्थले हस्तगत करून मालव्याचा बंदबस्त उतम प्रकारे करणे. सिरोंज अहीरवाडा येथील मामलतीची सनद सरकारची पाठविली असे तेथील बंदबस्त करणे. पा। इंदोर पा। कदवा ? पा। अथई खेडा तिन्ही तालुके राजश्री विठलराऊ तात्या याणी आपल्या जिमेस केले आहेत. तेथे शाहणा माणूस ठेऊन बंदबस्त करणें. गणेश संभाजीने बखेडा केला आहे तरी तुम्ही इजेतखान सुज्याखान व अहीर ऐसा जमाव भारी करून वोडसेवाले दतियेवाले वगैरे मदनसिंग यास सामील करून घेऊन जबरदस्ती पोहचाऊन

---

१ फासला = अंतर.

4190

स्थले हस्तगत करून घेणे. गंगापुरी गोसावी यास तजविजेने हाताखाली घेऊन जमायेत गोऊन आपला मतलब करून घेणे. उपरांतिक त्याचे वर्तणुकेप्रमाणें तुम्ही करावयास न चुकणें. राजश्री गोपाल केशव व चिरंजीव राजश्री माधवराऊ याचे समाधान करणें. माधवरायास सेवढे याचे काम सांगणे. आपल्याकडील वर्तमान वरचेवरी लिहोन पाठविणे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shankar instructs Khandopant and Chimanajipant to attack Jhansi.*

---

*No. 75*] [*8-11-1767*

पौ छ १ रजब

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
विस्वासराऊजी स्वामींचे सेवेसी

पों रामचंद्र सामराज कृतानेक सां नमस्कार विनंती. येथाल कुशल ताा छ १५ जमादिलाखर मुाा सिवपुरी जाणून स्वकीये कुषल लेखनाज्ञा करीत गेले पाहिजे विशेष. आपणाकडील सांप्रत पत्र येऊन परामर्ष होत नाही तरी यैसे न करावे. निरंतर पत्र पाठऊन सांभाळ केला पाहिजे. यानंतर वेदशास्त्रसंपन्न राजश्री प्राणनाथ पुराणिक कासीकर आम्हाजवल दोन तीन वरसे होते. सांप्रत श्रीकासीस जातात. याजसमागमें कालपीपर्यंत दोस माणसे देऊन पोहचते केले पाहिजे. कालपी व रायेपूर डभुवा येथील ठाणी जाटाची उठोन गेली. राजश्री बालाजी गोविंद याची व आपली ठाणी पूर्ववत्प्राा काईम जाली म्हणौन गालेरीहून लिहिले आले. हा नक्षच जाला. जाट सांप्रत: पुष्कराकडे चालिला आहे. राजे बिजेसिंग रा(ये)ठोर याची भेटी घेऊन मातबर मनसुब्रियाच्या विचारात आहेत. पुराणिकबावास छेत्रपूर कालपीकडे सुभेता आसेल उतम मार्गे राा करावे. लोभ आसो दीजे हे विनंती.

पो धोंडो पद्माजी कृतानेक सांा दंडवत विनंती. बहुत दिवस पत्री सांभाल न जाला यैसे नसावे. आम्ही पदरीचे आसो. सदैव पत्री सांभाल करीत आसावे. सर्व भरोसा आपला आहे. बहुत काय लिहिणे ? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Ramchandra Shamraj requests Vishwasrao Lakshman to arrange for the safe journey as far as Kalpi of one Prananath Puranik proceeding to Benares and refers to the evacuation of Kalpi Raipur and other posts by the Jat. He further adds that Jawahirsing is on march to Pushkar.*

*No. 76]* *[18-12-1764*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यांसी.

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. राजश्री दमाजी गायकवाड शेनाखासखेल समसेरबाहादर याजकडे साल मजकूरचा यैवज सवापाच लक्ष रुो येणे त्यापौ यैवजाची नेमणूक जिकडील तिकडे होऊन बाकी अजमासे सवादोन लक्ष रुो येणे. त्यास खासा स्वारीचे फौजेस नालबंदीस यैवज पाहिजे याजकरिता सदरहू यैवज हजूर आणविला असे तर या यैवजावर तुम्ही गायकवाडावर वरात कोणाची न करणे. येथे कागद गड्याचा तोटा आहे. त्यास सांडणीस्वार पाठविला आहे तर कागद गड्या

१० थोर कीर्दीच्या
१० मद गड्या

येकून वीस गड्या कागद सत्वर गाठऊन देणे रा छ २४ जमादिलाखर सुा खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

*¶Raghunathrao receives money from Damaji Gaikwad for his army expenses and therefore asks Nana Fadnis to write it off the account.*

---

*No. 77]* *[1764 ?*

पो छ २४ रोवल

श्री

पुा श्रीमंत राजश्री साहेबाचे सेवेसी

विज्ञापना येशीजे माहादजी शिंदे यानी केदारजी सिंदे यास पुढे पाठविले. ते-समई त्यानी माहालोमाहाली घासदाण्याचे रोखे केले येसे राजश्री नारो कृष्ण दवे सांगतात. कोठे काये घेतले हे ठिकाण लागत नाही. यागी होऊन त्याची संख्या माणसात आहे येसे नाहीं. गुदस्ता राजश्री आंताजीराम माजी कामदार पाा येदलाबाज याजपासून सातहजार रुपये वैशाख मासी घेतले आसोन सांप्रतकाले धावचा देशमुख व पाटील यासी मसाले करून परगण्यात दंगा मांडला आहे. बराणपुरास धरून नेहले आहेत. परगण्यात राऊत पाठविले आहेत. त्याजमुले

परगणा उज्याड होतो. आखेर धण्याचा माहाल उपद्रव लागल्याने खराबी होईल. त्यांच्या राबतासी व आमच्यासी कटकट होईल. खावंद शब्द लावितील तरी मारनिलेस ताकीद करावी जे परगण्यास उपद्रव दिल्हा तरी तुम्ही जाणा येविसी निक्षूण आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय. राजश्री नारो कृष्ण दरवे यासी ताकीदपत्र सरकारचे येदलाबादेविसी देवावे जे यैवज घेतला आसल तो माघारा देणे. फिरून परगण्याच्या वाटे न जाणे म्हणोन आज्ञा आसावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Peshwa's orders restraining Naro Krishna are solicited.*

---

*No. 78]* *[1764 ?*

श्री

पुा विज्ञापना. राजकी वर्तमान रा अवचितराव द्वादशी शुक्रवारी येथे दाखल जाहाले. प्रथम श्रीमंत नानासाहेबाची[१] भेटी घेऊन मग श्रीपतराव साहेबास भेटले. मग तेथून वाडीकडे येऊन त्याचेच घरी राहिले. बराबर कारकून मंडली व दोनतीनसे स्वार कारखाना सर्व नदीपलीकडे राहिला. रावजी सडे जातीने येथेच वाडीला जी वसरीवर खोली होती ते दिवसी तेथे राहिले. भोजन-स्नान सर्व येथेच होत आहे. रा महादजी सिंदे व केदारजी सिंदे घोडनदीवरी सोडून हे पुढे आले. ते सोमवारी येथे येणार. मुहूर्त भेटीचा सोमवारी काहडिला आहे. अजी कोरगावचा मुकाम, उदईक येथे येणार. रावजीची भेटी आम्हीही घेतली. वर्तमान (सविस्तर निवेदन) करावे तर त्यासी आवकाश नाही. दुपारे नानासाहेबाचे घरी राहिले. फार येकांती बोलावे तर कार्यात पडत नाहीं. संधि पाहून सर्व निवेदन करू. दुसरे रावजीच्या बोलण्यांत भाव दिसतो कीं माहादजी सिंदे आम्ही येकचित आहो. बाजी[२] नरसिंह याजला राजी नाहीत. त्यासी माहादजीबावा येथे आल्यावरी काय ठरेल ते पाहणे. बाजी नरसिंह याने पाच लाख रुा नख्त भरले. श्रीपतरावसाहेबास अभिमान बाजी नरसिंह याचा आहे. मग सिंदे आल्यावरी कोणास हाता धरून दिवाणगिरी सांगतात पाहणे, माहादाजीबावा ज्याजला हाती धरतील त्याजला दिवाणगिरी सांगावी येसे सरकारचे मानस. रावजी दैववान अहेत मागाहून काय निश्चयात येईल ते लिहूं. मुख्य गोष्ट रावजीचे कल्याण असावे. रा. गंगाधरपंत तात्या व नानासाहेब

---

१ नारोशंकर हा सिंद्याचा कारभारी कांहीं काळ होता. २ महादजीचा कारभारी.

दोहीकडेहि वाजवयासी सिध आहेत. जिकडे सरकारचा डौल पडेल तिकडे हात लावितील, अभिमानी पुरुष नाहीत, दामुष्यायेणी आहेत. येथे सिंदे आल्यावरी रवाणगीहि सत्वरीच होईल. फौजा फाल्गुण मासी माळव्यात येतील. आम्ही आपल्याविशयी रा बापूस विनंती केली, त्यानी उतर केले कीं तुम्हाकडे रा नारो शंकर राजेबहादर याचा काहीं वरातेचा लढा असिला तर तितका मात्र तुम्ही वारणे. मग तुम्हास काही चिंता नाही. त्यासी ताकीद करणे ते केलीच आहे. मागती रा तात्यास व सिंदे यासी करू. नानाचा कजिया ठेविला तर ते कजिया करितील. जर त्याजला तुम्हाकडून रुो पावले असतील, मग ते कजिया करितील तर येथून ताकीद करून तुम्ही त्याचे समाधान करणे तसे करावे वरकड मामलतीचा प्रकार तुमचा तुम्ही केल्या गुंता (नाहीं)! येसे भाषण जाहालें. तुम्ही सतोटीस उतरल्या किमपि दुसरा अर्थ होणार नाही. मोटेविशंई+ विनंति केली. त्यानी उतर दिल्हे कीं, पहिले श्रीमंत दादासाहेबी येलचेत जाहागीर दिल्ही तेव्हा मोट जाहागिरीत लाऊन दिल्ही ते परिछिन कागदपत्र पाहिले. गोसावी सिरत होता त्यासाठी तुम्ही राखिली, उत्तम केले. आता त्यासी देणे. सिबंदी जे पडली असेल वाजवी ते देतील. तुम्ही जाहीगिरीपैकी येवज घेतला असेल तो माघारे देणे, दुराग्रहात न पडणे. आम्ही विनंती जे करणे ते केली. उतर केले की वडिलासी केवळच बिघडावे यैसे नाही. त्याची कृपा संभाळून घ्यावी, यात तुमचे कल्याण. याप्रकारचा जाबसाल जाहाला. वरकड मागाहून सविस्तर लिहूं. हुंड्यांचे वर्तमान निश्चयात आले नाही. मागाहून येईल त्याप्रो लिहूं. आपण पनास हजाराच्या हुंड्या जलद पाठविल्या पाहिजेत. दरबार खर्चाचाहि येवज पाठवणे हे विज्ञापना.

¶*The writer gives news about Avachitrao arriving in Poona, Mahadji Sindia settling the question of appointing a Diwan. The letter shows that Mahadaji was getting gradually powerful at the court of the Peshwa at Poona.*

---

*No. 79]* *[1764 ?*

**श्री**

आमचे तर्फेनें श्रीमंत राजश्रीरघुनाथपंत याजपासी जाऊन त्याची व सखारामपंत त्यांचे दिवाण यांच्या भेटी घेऊन आमचे तर्फेनें सांगणें कीं तुमचा

---

+Near Jhansi.

4194

आमचा भाईपना कदीम व पागोटें बांधले याची शरम उभयपक्षीं आगत्य आहे. भाऊसाहेब व जनकोजी व दत्ताजी याणी आम्हासी गरसलुक केला म्हणून काम या थरास पोहचले. ईश्वर तुम्हास सलामत राखो. तुम्ही अम्हासी स्नेह पहिलेपासून एकसारिखाच आजवर चालवीत अहां. पहिले तुम्हास अबदाली व आली गौहर व नजीबखान याच्या ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्या तुम्हासी स्मरण असतील. परिणाम तदनुसार घडोन आला. त्यांची कर्मे दगाबाजीची प्रसिद्ध आहेत. सांप्रत्ये सुरजमण याजला नजीबखान यास कौल दिलासा देऊन बोलाऊन मारून टाकिले. आतां हिंदोस्तानांत तुमचा स्नेही व हिंदु आम्हावेगळा व सुरजमणाचे पुत्रावेगळा आणिक कोन्ही नाहीं. आम्ही पूर्वे स्नेहावर व भाईपनावर द्रिष्ट ठेविली आहे व सुरजमनाचे पुत्र यासी वर्णाश्रम विचारें तुम्हां यास श्रेष्ठ व सपूज्ये अहा व शत्रूचे पारिपत्यहि तुमचे साहेतेन होणार याची पूर्ण निष्टा तुमचे ठाई आहे विशेष. दक्षणेचे सरदार दगाबाज व फुंदी तुम्हासी सदैव शत्रुत्व चालवितात. दरसाल दक्षणेची मोहीम तुम्हास पुरवती. फार दिवस जालेत की या मुल्कांतील आमल व बंदोबस्त उठला. चार वर्षे जालीत कीं मुबदला न जाला. यामुळें मुदई दिवसानदिवस अधिक जोर धरितात. निर्भर जालेत. जर दक्षनेचे कामाविषयीं तुमची खातरजमा असली तर तुम्ही मातबर फौजेनसी इकडे येणे. सुरजमन याचे पुत्राजवल खजाना फार आहे तेहि देतात व हाफीज रहिमतखान व सुरजमनाचे पुत्र व नवाब अहमदखान बहादर गालीबजंग हे आमचे रफीक[1] आहेत. अपणासी भेटल्यावर उत्तम प्रकारें बंदोबस्त हिंदोस्तानचा तुमचे चित्तानरूप घडोन येईल. अबदाली वगैरे याचे मनसुबे आपणापासी फार आहेत. अबदाली कांहीं मुजाहीम होणार नाहीं. श्रीकृपेकरूण हा जिमा आपला असे. अबदाली एकीकडे राहिल्यावर हे सरदार व आपण एकत्र जालियास सहजांत नजीबखान व सुजायेतदवले याचे पारपत्य होईल. अगर दक्षणेविषयीं तुमची खातरजमा नसल, आम्हास आपणाजवल बोलावाल तर येऊन लौकरच मुदयाचे पारपत्ये करूण. श्रीकृपेकरूण हिंदोंस्तनचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करूं. दक्षणेचा बंदोबस्त तुमचे चितानरूप जालिया पुढें तुम्हास चिरकालवरी सौख्यें विश्रांत आहे. उपाध बाकी राहात नाहीं. आम्हास बोलावाल तर येविषयीं शाहावलीखान याचे लिहिले दस्तावैज बाहित्याक्तारचे अगत्य आसल तर श्रीकृपेकरूण आपुले स्वाधीन असे.

---

१ स्नेही.

कासम आलीखान बंगालेवाला याजपासी आठ करोड रुपये खजाना आहे. पैकीं तीनसें हत्तीवर खजाना व पंधरा हजार फौजेनसी वारानसीजवल आला आहे. त्यासहि आपणाजवल बोलावाल तर तोहि येईल.

¶*This fragmentary letter contains the instructions of some Hindu Prince who has sent his envoy to the Peshwa's court. Suggestions are made that the Marathas could easily reassert themselves in the North against Najibkhan and Shuja-ud-daula if they agree to act in concert with Jawahirmal, son of Surajmal, and the writer.*

---

*No. 80*] [*13-6-65?*

पौ छ २९ जिल्हेज

## श्रीपंढरीनाथ

विनंती पोष्य बाजी बलाल सा नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ २३ जिल्हेज मुकाम झाशी शुक्रवार प्रहररात्रीपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविलें तें पावोन परम संतोष जाहाला. स्वामीनी दुर्गाचा समयावर बंदोबस्त केला. श्रीसांबदयेने व दृढप्रयत्ने स्वामीस येश आले. परम उत्तम जाहाले. पुढें निष्किल्मिष राहें ते असावे. स्वाम सर्वज्ञ आहेत तेथे विस्तार किमर्थ? मसुदे आपल्या पत्रापूर्वीच आपणाकडेस राजश्री आपाहा पाठविले ते पावलेच असतील. श्रुत होय कृपा वर्धमान करा हे विज्ञापना.

¶*Baji Ballal congratulates his master for the latter's prompt action in defending Jhansi.*

---

*No. 81*] [*May 1765*

(*First sheet missing.*)

## श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी

तरी उणियारवाला सरदारसिंग नरुके यासी कजिया पेसजी लागला होता. त्याजवरोन त्याच्या तालुकियात राजसिंग चव्हाण गाव उज्याड करावयासी च्यार

हजार फौजेनसी बिदा केले होते. ते मुलकात धूम करून होते. त्यांजकडील सलुखाचा पैगाम काहीच न ये. याजकरिता दिवान नंदलाल पाच हजार फौजेनसी पुढे बिदा केले. त्यामागून आपणच तोफखाना बाहेर काढोन वैशाख शुध १२ लग्नसिधि रतलामकर राजे येथ आहेत त्यासी सेरीरसमध करून ते दिवसीच कार्यसिधि करून कूच करून सांगानेरास दाखल होऊन मुकाम केला तेथून अजी झिलायेस जाणार. दोन तीन मेजमानिया तेथे होतील. तेथून पुढे उणियारेस जावे दबाब द्यावा पैगाम न आला तरी मोर्चे लाऊन घ्यावे हा विचार आहे. त्यासी सरदारसिंगजी याजकडून काली काही पैगाम लागला येसे वर्तमान आहे. पुढे जों जाबसाल होईल ते लिहीत असो. प्रस्तुत उणियारीवरी शेह दिल्हा. पुढें तेथून रणथंबोर किल्यास जाणार. रामपुऱ्याकड जावे हा विचार आहे. किला पाहून जे तरतूद करतील ते लिहीत असो. सोपारकर इंद्रसिंग येऊन सामील जाला तो बराबर आहे. त्याजवरी कृपा बहुत मसलतीत सामील. बुंधीचे हाडे येऊन सामील जाले. कोटे करोली खेचिराऊ याचे येऊन सामील होणार. पुढे चाल करावी हे मानस आहे. राजश्री मल्हारजीबावा सुभेदार गांगरोणगडास मोर्चे लाऊन मुकाम करून आहे. कोट्यावरी शह घातला आहे. रांगड्यानी बहुत अधिक विचार आरंभिला होता. परंतु रामपूरा सरकारच्या फौजानी घेतला. हजारपाचेसे माणूस मारले. याजवरोन दबाव बहुत पडिला. सुरतराम राम पोता इगलजगडाकड बिदा केला होता तो शेह भारी देखोन मुकुंदबारीपासोन माघारे सिरोन कोटियासी येऊन मुकाम करून आहेत. सांप्रत राजे बाहेर निघोन उणियारेयावरी चाल केली आहे. पुढें जो विचार ध्यानास येईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहित जाऊ. राजे रामसिंग जयेपुरी आहेत. यासीहि बोलाविले आहे. दोचौदिवसानी कूच करून सामील होणार. राजे विजेसिंगजी जोतपुरी आहेत. लाला * * * यानी सर्व मारवाडचा बंदोबस्त केला आहे. मेडत्याजवळ फौज ठेविली आहे. सांबरेचाहि बंदोबस्त करणार आहेत. राजश्री गोविंद कृष्ण अजमेरीचा बंदोबस्त उतम प्रकारे करून आहेत. नेणवियात राजश्री सदासिव गोपाल आहेत. ते हा कालवरी मजबुतीने आहेत. तेथे पैगाम (अपूर्ण).

¶*Letter from Malhar Tukdeo, the beginning and the end of which are unfortunately missing, reports situation in Rajputana where heavy fighting appears to be going on between Madhosing and one Sardarsing of Uniyar. Malharrao Holkar is active, investing Kota.*

No. 82] [27-1-1766?

**श्रीनरहरिवरद**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री माहादाजीपंत**

**स्वामींचे सेवेसी**

पो आपाजी माहादेव सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १९ माहे साबान मुा झासी येथे आसो विशेष. आपण बहुता दिवसी स्मरणपूर्वक पत्र पाठविले तें पावले. श्रीमंत रा रामचंद्रपंत तात्या ग्वालेरीस आले होते. येथून रा रघुनाथ हरि याणी प्रहस्त विसाजीराम ग्वालेरीस पाठविले होते. वस्त्रे सरदारीयोग्य सेलापागोटे किनखाप दोन महमुद्या याप्रमाणे पाठविली होतीं. झांसीवरून आणावे येसा विचार होता. परंतु तेच आले नाहीत. तेथे मुकाम बहुत होते. मागून रा लक्ष्मणपंत येणार यास्तव त्यांची वाट पाहात राहिले होते. आलियावर दसरियास निघोन दरमजल देशास गेले याप्रमाणे वर्तमान. दुसरे वोडसे येथील ठाणे रा रघुनाथ हरि याणी घेतले. तेथील भेद लागला होता. स्वारी पाठऊन ठाणे खाली केले. तेथे पजनसिंग ठहरोलीकर होता तो घेऊन झासीस आणून ठेविला आहे. ठाणे आपले बसले यामुले अष्टभया बुंदेले याणी दुंडी आरंभिली आहे. त्यानंतर येथून फौज घेऊन कारभारी गेले आहेत. येथे कोणी बुंदेला राजा जाहलियाखेरीज बुंदेले * * डो देणार नाहीत. याविशी श्रीमंत राजश्री दादासहि पत्रे पाठविली आहेत व पुण्यास पत्रे पाठविली आहेत. जेसी आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. मल्हारजी होंलकर याणीं राजा हटेसिंग बसविला तो दतियामध्ये आहे त्यास कोणी अष्टभया राजी नाहीत कोणी आहेत. दुसरा प्राणसिंग लुधोरावाला तोहि राजा होईन म्हणतो. त्याणे दुंडी आरंभिली आहे. तिसरा पजनसिंग वोडशामध्ये होता. तो झांसीस आणून ठेविला आहे. याउपरी श्रीमंत राजश्री दादा यांची आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. उतरे येतील त्याप्रमाणे वर्तणूक करितील. श्रीमंतास पत्र लिहिले आहे. पावते करावे. देशीहून पत्र वीस रोजाचे आले होते. श्रीमंत रावसाहेब उभयता कचेश्वरानजीक गंगातिरी दक्षिणातिरी आहेत. नाना फडनीस वगैरे सर्व कारभारी समागमेच आहेत. रा तात्या व रा संपतराव त्रिंबकराव समागमेच आहेत. श्रमिंतास आराम चांगले जाहले म्हणोन वर्तमान आहे. रा बाबूरावजीस पत्र पाठविले आहे. पावते करून सदैव कृपा करीत असावे. याप्रमाणे विनंती करावी. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Apaji Mahadeo reports disturbances in Bundelkhand.*

4198

*No. 83*] [*10-2-1765*

पो छ ३० सफर श्रावण
सन सीत सितैन.

## श्रीराम

श्रीमंत राजेश्री दादासाहेबाचे सेवेसी

सेवानसेवक किंकर गोविंद भिकाजी कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तिमान माघ वद्य ९ परयेंत मुकाम मकसुदाबादेत स्वामीच्या कृप्य करून सुखरूप असे विशष. येथील वर्तिमान पुरवी कासीद अजुरदार समागम्य सर्व समाचार लेहून पाठविल आहेत. सेवेसी पत्र पावली असतील किंवा पावतील. सांप्रत येथील वर्तिमान तर हे सर्व पटन्यची लढाई फात्ख (?) करून सर्व सईन ठेऊन आपन जरिदा स्वार होऊन तांब्रमुखीन बालाऊन पाठविले होत यास्तव हे मजलदरमजल कलकत्त्यास गेले. ते च्यार महिनेपरयंत राहिले होते. कितीक गोष्टीचा जाबसाले होता. तो सर्व फाइसल केला. बंदोबस्त जाहाला. येक ला(ख) परयेंत रुपये कबूल केले. मग समसुदवला तांब्रमुखी याजपासून बिदा होऊन इलाइतीस गेला. कलकत्यात दुसरा साहेब जाहाला आहे. येथील अधपतिचे सर्व मालीक तांब्रमुखी आहेत. हे नावाचे मात्र धनी आहेत. येथील समाचार सर्व याजप्रकारचा आहे. त्यास जसा रावनास ग्रव जाहाला होतो त्याचा ग्रवप्रहार श्रीरामचंद्रजीनी क्षिनमात्र करून लंका इजय करून अईध्यस पट अभिशाक होऊन राज्यधीस जाहाले त्याजप्रमान इस्त्रान इकडील सर्व पदाधीश आपन आहेत. आम्ही लोक जसा चातक प्रजनाचा मार्ग लक्षीत आहेत त्याजप्रमान आम्ही आपले सेवकजन रात्रंदिवस इश्वरापासी प्रार्थना करून निजध्यास करीत आहे. ईश्वर आम्हा लोकाची कामना कधी सिधीस पावईल तो दिवस सुदीन जानू. विशष काये लेहू? परंतु हे काही आपनापुढे पदार्थ नाहीत. परंतु दूरचा डोंगर सौभित्रंत दिसत आहे. याजप्रमान सर्व वर्तमान स्रुत होये. राजेश्री जाणोजीबावा याजकडून वकील मामलतीस राजेश्री रघुनाथपंत आले आहेत. चार पाच महिने जाहले. अदेप कांहीं मामलतीचा बंदोबस्त जाहाला नाही. सांप्रत वीस पंचवीस हजार रुपये मात्र अलला (?) हिसाब दिल्हा आहेत. लाऊन मात्र ठेविल आहे. सांप्रत त्याजला तांब्रुमुखीसी येवज बहुत देन आहे. त्याजपुढे याची मामलत किसगनतीत आहे. त्यास उगच लाऊन ठेविले. परंतु कांहीं लक्षन मिलायाचे दिसत नाही. जर काही आपला हिंदुस्थानात दबाव जाहल्यास काही प्रपत हाविले[१] नाहीतर प्रपत

---

१ प्राप्ति होईल.

होता दिसत नाही. स्वामीच सेवेसी श्रुत होय यास्तव विनंती लिहिली आहे. विशष अईध्यवाल्याचा सर्व समाचार आपणास इदित जाहला असल किंवा राजेश्री धोंडोपंत याच्या पत्रावरून सर्व निवेदन होईल विशष.

¶*Bhikaji Govind from Murshidabad writes how completely the Nawab Muzafar has been overshadowed by the English and requests Dada to send an expedition to Bengal.*

---

*No. 84*] [*11-3-1768*

पौ छ २९ सवाल जाबसूद.

श्री

श्रीमंत+ राजश्री विस्वासरावजीप्रति

आश्रित अग्निहोत्री बाल मुकुंद वृत निरोप बहुतां दिवसापासून कृपापत्र आलें नाही तरी चिंता अस्ते. कृपापत्र पाठवूनि चिंता दूरि करावी. श्रीकाशीहूनि आमचे येथे पत्र आले. तीर्थरूप श्रीवास करीत होते. त्यास मुक्ति प्राप्त माव शुद्ध सप्तमीस झाली म्हणोनि सपिंडी करावयास श्रीविटेश्वरी आलो आहे. विशेष. पूर्वी या प्रांताहूनि जाटाचा अमल पौशमासी उठला. तत्क्षणीच आपणाकडे दोनी माणसे वर्चेवर पाठविलीत. हें लिहिले होते की पत्रदर्शनी फौज या प्रांती सत्वर रवाना करावी. ते त्या समई सत्वरता न झाली. मग आम्ही हे लिहलें की सनदा भदावर कछवाए घारच्या आपल्या येथे आल्या आहेत त्या कच्च्या कीं पक्क्या लिहा. आपण हे लिहिले कीं सनदा बहुत पक्क्या आहेत इतकेहि आपण लिहिले. पण फौज थोडीसीहि न पाठविली तो पावेतो बालाजी गोविंद फौजेसहित कछवाए घारेत आलेत. मागूनि यादवरावजी आलेत तो पावेतो बालाजीपंताही सरसईचे तालुक्यात पांच शत स्वार पाठविलेत. काशीपंत पाठविलेत ते सर्वाप्रकारची खातरजमा आमचे अधिकारी प्रहस्तांची करूनि घेऊनि गेलेत. कछवाएचे रावराजे आलेत. सर्वाची खातरजमा केली. कमबेश सर्वांची मामलति केली. त्यासमई आमचे अधिकाऱ्याहि मला दोनी चारिदां पत्रे पाठविलीत बोलाविले. यादवरावजीचेहि पत्र आले. पण मी अटेरिहूनि न गेलो. आमचे प्रहस्तांची काहीक प्रतीति बालाजीपंताकडे विशेष म्हणोनि मी या प्रसंगात न पडलो. श्रीमंत राजेबहादुराचा प्रसंग जेथे नाही

---

+ सर्व पत्र बाळबोध लिपींत आहे.

4200

तेथे आमसी प्रयोजन नाही. आपण समई फौज न पाठविली तोपावेतो सिंध्याच्या सनदाहि बाळाजीपंतायचे येथे आल्यात. इथूनि क्रिया राज्यापासूनि ऐसी केली होती. ज्यांत आमचे ग्रहस्तासी बाळाजीपंतासी वणवन होय इतकें केलेहि. पुढेहि बहुत प्रकार कर्तो तोपावेतों त्यहांस सनदा आल्यात. यादवराव कूच करूनि गेलेत. त्यानंतर आपणाकडील वर्तमान कांहींच कळत नाही म्हणोनि दुश्चित्त आहो. यानंतर पश्चिमेकडील वर्तमान ऐसे जे राजे माधवसिंहाची फौज काम्यास आहे. जाटाची फौज पाच कोस डीगेकडे आहे. पाचा कोसाचे अंतर. सिखांची फौज दहाहजार जाटाने बोलाविली ते ठेविली आहे. फाल्गुण शुद्ध १२ सोमवारी एक युद्ध झाले. त्यांत जाट हारलेत. च्यार शत माणस जाट मारले गेलेत. दानसाहि चेथे तीराचा घाव आहे. सिखासुधा जाट पळलेत. माधवसिंघजीची फौज भारी आहे. काही पंध्रा सोळा सहस्र आपलेहि सैन्य आहे. आणखी सिंधे होळकर दरमजल येतेत हे आइकतो. हे वर्तमान आपण लिहाल तिव्हां निश्चय वाटेल. जटवाड्याचे युध्याचे वर्तमान तर सर्वतो-मुखी याप्रमाणेच आहे. लिहिले नाही आले. हरकारे गेले आहेत ते दों चौ दिवसात आल्यावर लिहू. देशचे वर्तमान राजेबहादुरांचे व आणखी सर्दारांचें या दिवसांत लिहिलें आलें असेल ते लिहावें. हा समय उद्योगाचा आहे. बसूनि राहायाचा नाही. बहुत दिवसापासूनि कृपापत्र आले न होते म्हणूनि माणस पाठविले असे. किंव्हा मिती चैत्र वदि ८ शुक्रे मुकाम श्रीवटेश्वर.

आश्रित जयरामपंत कृतानेक आशीर्वाद कृपा असे हेच अपेक्षा आहे.

¶*A priest Balmukund reports the hotly contested battle between Madhosing and Jawahirmal in which the latter's forces were routed.*

---

*No. 85*] [*23-2-1765*

श्री

पुरवणी रामकिसन महंत यास बलगडी जावयास सांगितले आणि तोफखाना त्याजबराबर होता त्याबराबर मनुलाल यास सांगाती देऊन निराला जमणाचे किनारे बलगडी पाठविला. याजप्रमाणे ते निघाले. दरमजल गेले. यानंतरी नजीबखान रोहिले रामेरयाचा ( रामघ्याचा ? ) घाट उतरून येमुना पार गेले. त्यास शाहाची पत्रे फिरोन आली की खजिना घेऊन लोकर येणे म्हणौन रोहिले यांस पत्रें आलीं. त्यावरून रोहिले पार गेले. याजप्रमाणे येथे वर्तमान आले.

तदनंतर आज गंगाप्रसाद राधाकुंडी गेले आहेत. जाट किलेयाची तयार करू लागला आहे. रोहिला येकायेकी जात नाही. किरपाराम वगैरे गेले आहेत. त्याची व यांची बोलणी होऊन जो मजकूर ठरणे तो ठरे. तशाहीमध्ये सिक लागले आहेत त्याचे कार्य होईल व जाटाकडील वगैरे याजकडील मजकूर ठरयाल (त्या?)वर जाणार तर जाईल. याजप्रमाणे रोहिले याचा मजकूर आहे. याजप्रमाणे वर्तमान आले आहे. यानंतरी जाट याणी आपले कासिदाचे मिर्ध्यास ताकीद केली की, मराठे याचे बातमीचे पत्र दिवसास येत का नाही याजप्रमाणे चौकसी केली. माहाराजास कलावे. रा छ २ रमजान.

¶*Supplement to a letter informing that hostilities are likely to break out between the Jat and Najibkhan.*

---

*No. 86*] [*24-2-1765?*

पो छ २९ सफर (मोहरम?)
श्रावण शुा १

श्री

तीर्थरूप राजश्री दादा साहेब वडिलांचे सेवेसी.

अपत्यें धोंडो खंडेराव चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील सेवकाचें वर्तमान तागाईत फाल्गुन शुद्ध ५ पंचमी पावेतों स्वामीचे आशीर्वादेंकरून श्रीकाशीमध्यें सुखरूप असें विशेष. स्वामीनी कृपाकरून अशीर्वाद पत्र पाठविलें तें श्री शिवरात्रीस येथें पावलें. गोविंद दादाजी याचे जबानी निरोप पाठविला तो सर्व तपशीलवार त्यांणीं सांगितला, त्यावरून मला बहुत पश्चाताप जाला तो पत्रीं लिहितां पुर्वत नाहीं. स्वामीची येथें भेटी होईल ते समयीं विदित करीन. मी सर्वप्रकारें अपराधी आहे. स्वामीस वाईट लिहिलें त्याचें फल मला येथें श्री विश्वेश्वरानें फिरंगी व गारदी यांजकडून उत्तम प्रकारें देविलें! ते जीवेंच मारीत होते; परंतु आपलें नांव पदरीं होतें म्हणोन वांचविले! ते समयीं सर्वांनी दंड रुपये दीडहजार रुपये देखीलव्याज पावेतों पडला तो देविला. आणखीहि दंड रुपये मागतात. मी लपत फिरतों; ती आपत्ति पत्रीं कोठवर ल्याहावी.? वेदशास्त्रसंपन्न राजश्री भृतिधरभट पुराणिक येतील ते सांगतील. सर्व मातबर ब्राम्हणांवर कष्ट बहुत जालें तें पत्रीं कोठवर ल्याहावें! मागती सुज्यातदौला दिल्लीस गेला आहे तो राजश्री मल्हारजी होलकर व

जाट व रोहिले यांसी घेऊन येतों. सत्वरच येईल ऐसें आहे. यास्तव मागती मोठी गडबड येथें आहे. ये समयीं घरें व जवाहीर कोण विकत घेतों?. जवाहीर सोनें रुपें याचें नांव घेतलें म्हणजे फिरंगी लुटतील. राजा बलवंतसिंग येथील मातबरास दाऊन देतों, याचें भयास्तव कोण्ही बाहेर निघत नाहीं. आपण धर्म अवतार आहां, कर्णाप्रमाणें श्रीकुरुक्षेत्रीं रुपये वाटिलें, बलिराजाप्रमाणें आपण उदार, अर्जुनाप्रमाणें पराक्रमी आहेत; सर्व सेवकांस व सर्वांस विदित आहे. मजकडून जे अपराध जाले असतील ते सर्व माफ करावे; अतःपर कधीं वाईट लिहिणार नाहीं. आपले चरणांची शपथ असें. मजवर कृपा आपल्यासारखी कोण करील.? मजला आपल्यासारखा कोण्ही रक्षिता नाहीं. आपण उपेक्षा केलियाणें माझा प्राण राहणार नाहीं. वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्रभटास हिशेब दाखविले; त्याचे मतें सर्व लबाड कारभार आहे. ते कांहीं माझी अबरू ठेवीत नाहींत, तो विस्तार कोठवर लिहावा.? येथें स्वामीच्या आज्ञेवरून सरकारचे वाड्यांत आहे; सर्व लोक हेंच जाणतात कीं स्वामीचा पुत्र आहे, त्यास रुपयास काय कमी? माझें घरीं तरी मजला अन्न वस्त्र मिळत नाहीं, तृण-काष्ठहि नाहीं, पुत्र मुंजीचा जाला आहे. सर्व आपत्ति बहुत आहेत. कर्जदार बहुत उपास पाडतात. रामचंद्रभट आपले आज्ञेखो येक कवडी देत नाहींत. म्यां कर्जदारांस येक गाहाणाचें घर व्याजामध्यें दिल्हें, व येक गाहाणाचें घर मुदलामध्यें दिल्हें. बाकी वीस हजार कर्ज राहिलें, व पोटखर्च दांड वगैरे शिबंदी मिलोन पंचवीस तीस हजार रुपये कर्ज राहिलें. आपण कृपा करतील तरी कांहींच नाहीं. आपण उदार दानशूर आहेत. पूर्वीं राजश्री गणेश संभाजी याजवर तिसा हजारांची वरात पाठविली होती तेच रुपये राजश्री बालाजी गोविंदाकडून देववावें. अथवा राजश्री मल्हारजी होळकर याजकडून हरयेक ऐवजीं देववावें, म्हणजे सर्व कर्ज फेडून मी निश्चिंत होईन; हें आपल्यांवांचून माझा उद्धार कोण करील.? आपण क्षमाशील दाता आहेत, आपली तारीफ म्यां पत्रीं कोठवर ल्याहावी.? येक दोन घरे घेतलीं तीं बहुत उत्तम आहेत, निर्दोष अंतरगृहीं बाहेर आहेत; श्री गंगातीरीं आहेत. याप्रमाणें घरें श्रींत आणखीं नाहींत. येक स्वामीकारणें व येक छत्र घालावयासी ब्राम्हणभोजनास पाहिजे, यास्तव घेतलें असें. याचा मनोरथ आपल्यांवाचून कोण माझा पुरवील? अद्यापि पुरती खरेदीं जालीं नाहींत. च्यार दिवसा जाले नाहींत तों मागती विकावीं हा अर्थ उत्तम नाहीं. आपण राजश्री रामचंद्राप्रमाणें, मी आपला किंकर आहे. ज्यांचा वंश नसतो तेहि श्रीकाशींतील घरें विकीत नाहींत.

यास्तव सेवकानें तपशीलवार लिहिलें असें. येकदां मजला कर्जदारांपासून मुक्त करावें. आपण कृपा करितील तरी सर्व होईल. अत:पर आज्ञेशिवाय कर्ज करणार नाहीं व आज्ञेशिवाय घरेंही घेणार नाहीं. हीं घरें कोणांस देऊं नयेत. घरें थोर थोर आहेत. ब्राम्हणांस दान घरें देणें तरी सेवकास लेहून पाठवावें, चौ पांचा हजारांत घरें बहुत मिलतात. नवीं घरें घेऊन ब्राम्हणांस आज्ञेप्रमाणें देईन. हीं घरें दोन सरकारांत ठेवावीं, बहुत उत्तम आहेत. पत्रीं कोठवर ल्याहावें.? राजकी वर्तमान पारशी पत्रीं लिहिलें आहे त्यावरून सर्व विदित होईल; त्याप्रमाणें सेवकाविशी शिफारसपत्रें पाठवावीं. राजश्री मल्हारजी होलकर व माहादजी शिंदे व राजश्री बाळाजी गोविंद यांसी माझेविशी पत्रें शिफारशीचीं पाठवावीं कीं धोंडो खंडेराव राजकारणी मजकूर लेहून पाठवील त्याप्रमाणें सरकार किफायेती असल्यास करणें. ऐशीं पत्रें सेवकाकडे सत्वर पाठवावीं. येथें राजकारणें सेवकापाशीं स्वामीचें नांवास्तव बहुत येतात यास्तव जरूर पारशी येवनास व सर्वांस पत्रें पाठविणार स्वामी समर्थ आहेत. मागील वेदशास्त्रसंपंन्न राजश्री बालकृष्ण दीक्षित याजकडील ऐवज आला होता त्याचा खर्च पूर्वीं कोन्हेर भटाबराबर पाठविला होता, हल्लीहि पाठविला असें. मागाहूनहि राजश्री गोविंद दादाजी व भोजराज शंकर कारकून यांजबराबर मागती पाठवीन. तूर्त आज्ञेप्रमाणें येक कावड पाठविली आहे. आरधें श्रीत्रिवेणी जल व अर्धे श्रीमणिकर्णिकाजल असें. त्यासी वीस रुपये द्यावें. आणखी रुद्राक्ष व हिरडें व गंगावन वगैरें शंखोदर गोल्या पाठवाव्या तरी मजपाशीं रुपये नाहींत. रामचंद्रभटास पुसावें तरी ते म्हणतात की तुम्हास या कारभारांवाचून काय पडलें आहे? जे समयीं त्यांचे विचारास येईल तेव्हां पाठवितील. सेवकास स्वामीचा आशीर्वाद व कृपा मात्र पाहिजे, व आज्ञेप्रमाणें सेवा करावी हा मात्र मनोरथ आहे. रामचंद्रभट बहुत उदास होतात, पत्रीं लिहिता पुर्वत नाहीं. तेहि मी गुरुच मानितों. म्या पूर्वीं जवाहीर व सोनेरुपें स्वामीचे जयास्तव संकल्प घातला कीं सर्व धर्म करावा तो मनोरथ पूर्ण करणारे स्वामी कर्णावतार आहेत. स्वामी-वाचून या जगतांत कोण उदार आहे.? माझे पूर्वील सर्व अपराध क्षमा करावें, रुपये पाठऊन कर्जापासून मुक्त करावें. स्वामी वाचून माझी अबरू कोण ठेवील? बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*This is a letter of one Dhondo Khanderao from Benares supplicating Raghoba's mercy. He informs that the English have driven Shuja out of Benares and are mercilessly plundering the city. Shuja has fled to Delhi to raise another force and try his luck once more.*

4204

No. 87] [31-5-1765

श्री

सेवेसी नरसिंगराऊ राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा ज्येष्ट शुध येकादसी मुाा उदेपूर येथे माहाराजाचे कृपावृधि करून शेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. शेवकावर कृपा करून आज्ञा केली की तुम्हास जाऊन सा महिने जाहाले. यैवजाची तरतूद करून सत्वर पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास येथे येऊन पांच महिने जाहाले परंतु आद्यापि प्रथम दिवस आहे. आम्ही जो उपाये आपणाकडून आहे तितका करितो परंतु काही सिधीस जात नाही. उपास केले, गोटातूनहि निघोन गेलो, लांब जाऊन राहिलो, तरी काही येथील मतलब कलत नाही. बाजी नरसी कारभारी होते ते दुखण्यानी आजपर्यंत हैराण होते. येथून बरे व्हायाकरितां उजनीस जात होते. तेथे वाटेस मंदोसरी ज्येष्ठ शुध चतुर्थीस बुधवारी मृत्य पावले. येथे राघोबा पोतनीस आहेत. सरदाराचा मजकूर काये आहे तो कलत नाही. काही गोष्ट बोलावी ती प्रमाणात नाही. करभारी मातबर म्हणावा तरी दुसरा कोणी नाही. जे आपले मरजीस येईल ते खरे. यैवजाविसी निकड फार केली. त्यास दोन लाख रुपयाच्या हुंड्या आठ दिवसानी करून पाठवितो म्हणून करार केला आहे. येतील तेव्हां खरे. येथे खरी गोष्ट काही आढलत नाही. आजपावेतो भरोसा फार वाटत होता की सरदार चांगला बोलतात हे खरेच आसेल परंतु आपणास भरोसा पुरत नाही. चितात काये आहे हे कलत नाही. उदेपूरचे कामकाज थोडक्यावर आले आहे. मेहनत फार न करिता शहरातील लोक बाहीर निघोन आले. धारण दोसेराची आहे. पायेदल पांच हजारपावेतो शहरात आहे. ज्या दिवसी पाटीलबावाचे मरजीस येईल ते दिवसी शहरावर चढाई करितील त्या दिवसी हस्तगत होईल. वाबल्यानी दाहा लाख रुपयाची निशा सरकारात दिडा महिन्यांत रांगड्याकडून करारी करून सरकारात माहाराजाचे नावे खत लिहून घेतले. आम्हापासी रुपयाची निशा करून घ्यावी त्यास करार ठरविला आहे त्याप्रमाणे सरदारकडून कोणती गोष्टी सिधीस गेली नाही. मुदत भरत आली. रुपयाचीहि तरतूद केली आहे. वाबल्याचा निश्चये आहे की मुदतीस रुपये पावते करून देऊ परंतु ज्या गोष्टीनी रुपया मागावा तो आर्थ काही दिसत नाही. तोफा लागू करीत नाही. मोरचे लावीत नाही. उदेपूर घेऊन राजे रतनासिंगास गादीवर बसवावे ते काही नाही. रुपयाचा मात्र तगादा करितात. याप्रमाणें जानराव व येस्वंतराऊ वाबले बोलतात. सरदाराचीहि कृपा नाहीसारिखी दिसते. वाबल्याकडे सिकाकडील वकील आले आहे. चालीस हजार

4205

फौजेनिसी तुम्हास सामील होतो. जाट व नजीबखान दोघाचे पारपत्य करू. रांगड्या लोकामध्ये व राजेरजवाडियात उभयेता वाबल्याचा इतबार फार आहे. आपले सरकार उपयोगी आहेत. धण्याची चाकरी करून दाखऊ येैसे म्हणता सध्या दिसोन आली आहे. सरदाराची कृपा विशेष नाही याजकरिता भरोसा पुरत नाही तरी उभयेतास सरकारची पत्रे दिलदिलासा देऊन समाधा(ना)ची पाठविली तरी उपयोगी फार पडतील. उदेपूरचे कामात मातब्र तेच आहेत. येथील कची बातमी लिहितो. रागा न यावे. मर्जीस आले तरी सेवेसी लिहून पाठवीन. येथे कासीदजोड्या सरकारच्या येतात. जाब मिलत नाही. महिना दोन महिने उगेच राहात काही काम होऊन येत नाही. पत्रे पाठवितो ही चौकीपार होता की नाही हे कलत नाही. येथील चोकी देहवरीचे (?) बाहेर आहे. तेथे कागदाची चौकसी होऊन मग आला तर ये नाहीतर येत नाही. सर्व वर्तमान मुखजबानी कासीद सांगितील. शेवेसी श्रुत होई हे विज्ञापना. येथे मिरजा रहीमबेग याची मातबरी पाटीलबावापासी फार आहे. कोणते काम सिधीस जाऊ देत नाही. कलावे याचा उपाये केला पाहिजे हे विज्ञा(पना).

¶*Narsingrao Ram explains his difficulties in getting the promised amount from Mahadaji Sindia who at this time is investing Udaipur.*

---

*No. 88*] [*April-May 1765*

[पहिला बंद गहाळ आहे.]

* ष्ट राजश्री मल्हारजी होलकर याचा व फिरंगी याचा तहनामा जाला आहे, त्याची नकल आलाहिदा सेवेसी पाठविली आहे त्याजवरून सेवेसी विदित होईल. पंचवीस फिरंगी याविशई आपली आज्ञा होती. त्याचे उतर त्यानी सांगितले कीं तूर्त कोन्ही फिरंगी जमाव टाकून फुटत नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*This mutilated letter refers to a treaty between Malharrao Holkar and the English.*

---

*No. 89*] [*Just after 13-4-1771*

श्री

येथील वर्तमान पातशाहाकडील सैफुदी महंमदखान समागमे आहेत. त्याणी मामलतीचा करार केला. जुमाबक्ष पातशाजादे हाली वलीहत करितो. यास

बाहेर काडून मुजरा करावा. चहुकडून वर्तमान पातशाहास जातील. खुसी मानून यात्रयाची तयारी करील. त्यावरून वलीहद यास छ ४ जिल्हेजी बाहेर काडून नजरा करून सारे सरदार जाऊन मजुरे करून आले. सैफुदीमहंमद-खानाने मामलतीचा करार करून दिल्हा. चालीस लाख रुपये द्यावे. मेरट वगैरे आठ माहाल द्यावे. पातशाहास दोन महिनेयात येथे आणावे. कडाकुरा सोडावा; ते न होई तर मुबलक मुलुक दिलीजवल द्यावा. चालीस लाख रुो पैकी तूर्त शहरचा अमल आपले स्वाधीन करावा. वीस दिवसात दाहा लाख रुा द्यावे म्हणजे किला स्वाधीन करावा, तो पातशा येतील. ते आलियावर जतीचे माहाल सोडून तेथील यैवज मजुरा देऊन पंधरा लाख द्यावे. बाकी पंधरा लाख साता महिनेयात द्यावे याप्रो याद करून वलीहदाची मोहर करून दिल्ही. वाइदा जाहला. तूर्त दाहा लाख यावे, त्यापैकी दोन लाख प्रयागाहून पातशाहाने हुंड्या दोन लाखाच्या पाा. तीन लाख मागाहून पाा म्हणोन लिा आहे. पातशाचे छ २७ जिल्हेजी प्रयागाहून कूच जाले. दिलीस येतात याप्रमाणे वर्तमान आहे. प्रस्तुत शहरचा अमल सैफुदीमहंमदखान याजकडे कराराप्रमाणे दिल्हा. किल्याचे पहिल्याप्रो सरकारात बंदोबस्त करून राजश्री माधवराव सिवदेव तेथे पहिल्याप्रो आहेत. दाहा लाख रूपये आले म्हणजे किला त्याचे स्वाधीन करावा. इतकियांत पातशाहा यावेसे आहेत. जाब्तेखान शुक्रतालास आहेत. कल्लमल्लून गंगापार आहेत. त्याचा कटाक्ष लागला आहे. जाब्ते-खानास दोहीकडून पायेबंद; आशात त्याणे काहीं सलुख करावा तर आपलेकडील मातबर आश्रा यामुले सलूख करीत नाहीं. मुलकाची जती जाली, परंतु पेंढारी याणी मुलुक मारून सत्यनास केला. जतीचा पैका यात्रासी बाकी राहिली नाहीं. जाटाचा सलूखच तूर्त राखिला आहे. पुढे काये होते ते पाहावे.

¶*The news of an agreement with the Emperor and of his having started towards Delhi under Maratha protection is reported to the Peshwa.*

---

*No. 90*] [*June-July 1765*

(पहिले दोन बंद गहाळ.)

प्रयागाचे किल्यात चारसे गोरा आहे. या देसचे माणूस कमी आहे. जेथे नाजूक जागा आहे तेथे आपले जातीचेच माणूस ठेवितो. किल्यात सता दुसरियाची नाही. जेणेप्रो पातशाहास सांगावे तेणेप्रो करावे. सुज्यातदोल याचे चिरंजीव जाले आहेत. जे इंग्रज सांगेल तेणेप्रो करावे. दुसरे या प्रांती

कोणी नाहीं. पाच माहाल सुज्यातदौलेयास इंग्रजाने दिल्हे आहेत तितके खाऊन बसावे इतके त्याचे स्वाधीन आहे. कलकत्यास पासून यमुनापावेतो अमेल इंग्रजाचा मधे, दुसरा कोणी नाहीं. पातशाहास चालीस लाख रुपये द्यावे ते कसकसे तरी बंगाल्याचे चोवीस, बाकी कुरा वगैरे प्रयाग मिलोन सोला याजप्रमाणे द्यावे. बाकी काही नाहीं. सर्व आपण खातो. सुज्यातदोल व मल्हारबा वगैरे सर्व सरदार मिलोन कुऱ्यास आले. फौज लाख पावेतो होती. तेथे नज्यफअली-खान व फिरंगी गोरा पाचसे व या देसीचे तीन हजार व तोफा होत्या पाच सात हजार फौज याजप्रमाणे याचा सरंजाम कमी असता लाख फौज मोडिली. याजकरिता इंग्रजास मराठे म्हणजे काही नाही असे हावभरी जाला आहे. परंतु बाजतबरसाद देसीहून सरंजाम चांगला आणून दिलीस जावे हे आहे. बाजारआवई प्रयाग देणे घेणे हे कठीण आहे. इंग्रज येक पाऊल जागा साधावी हे करील परंतु देणे हे त्याच्या वस्तु कठीण दिसते. येथील गंगेच्या उदकास विपर्यास रामनवमीचे दोन प्रहरापासून उदक हिरवे जाले. आत काही अनीक विपर्यास दिसतो. अस कधी जाल नाही म्हणून संभर बरषाचे माणूस येकादों आहे ते सांगते. बगाल सारा इंग्रजाचे स्वाधीन. सर्व हिकडे याचे, दुसरे काही मध्ये कोणी नाही. जे आहे ते ते याचे स्तापित आहेत. या मुकामावरून प्रयाग सोला कोस येथून लस्कर ठेऊन पुढे जातो. येथे लस्करावर मी दाहा रोज आहे. याजवली येथे बारीक मोठे वर्तमान कळले. आम्हाकडील माणूस आहे ते वर्तमान सविस्तर सांगते. सर्व तिकडे यावयास उमेदवार बहुत आहे हे लिहिणे याचा अंदेशा तेथे माझे स्नेही कोणी असतील ते म्हणतील की निलोपंताची देसी लिहिणे तरी त्यास न कलत पते लाऊन मी लिहिणे आहे. सुभेदाराकडील वकील येऊन फजीत पडून गेला असे न जाले. येक गोष्टीने तरी वकिलावरी सरफराजी केली आणि बाहेर जाहीरण्यात मराठ्यासी सल्लक झाला याजप्रमाणे इंग्रज येथे आहे आणि दुसरे मराठ्यासी ठीक केले असे आपले काम ठीक केले असे. येथे कारभारी मुनीर-द्दवला आहे. मारनिलेस खर्चास नाही म्हणून श्रमी होत होते. येथे कर्ज मिलत नाही. आणि दरबारखर्चास दोनसे पावेतो लागले. याखेरीज राऊतास वगैरे खर्च भारी सर्व विकत घ्यावे (लागते?). सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The occupation of Prayag by the English and the abject surrender of the Emperor and Suja-ud-daula to their authority is reported. The letter further refers to the defeat of Malharrao Holkar.*

4208

**No. 91]** **[15-7-1765**

पौ छ ९ रावल सन सीत शितैन भाद्रपद.

**श्रीमोरया**

**श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी**

विनंती शेवक गंगाधर येशवंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता आषाढ कृष्ण त्रयोदसी मुा आलमपूर नजीक सेंवढे स्वामीचे कृपाकटाक्षें येथास्थित आसे विशेष. छ ९ जिल्हेजचे आज्ञापत्र सादर केले ते छ १४ मोहरमी प्रविष्ट होऊन संतोषावाप्ति जाली. दिवाण देणियाचा यैवज देणे तो मुदतीप्रमाणे पावला नाही. तुम्ही परभारे गेला. इकडे आह्मी यैवज माहालातून घेतला म्हणून राजश्री मल्हारजी होळकर यानी (सी) कितेक प्रकारे लिहिले. त्यास मल्हारबा वाजबी सरकार देणियासी दिकत करतील हे होणे नाही. तुम्ही समजाऊन सांगितल्यास गुता पडणार नाही. तूर्त यैवज देविला तो सत्वर ताकीद होऊन सरकारात पावे ते करावे म्हणून आज्ञा. यैसियासी यैवजाविसी देसी आस्ता यैवजाची विनंती केली त्याप्रमाणे पैसा पावला पाहिजे. या आशये स्वामिकार्यावर द्रिष्ट देऊन इकडे आलो. राजश्री सुभेदारास सविस्तरे विदित करून यैवजाची रवानगी केली त्यास मार्गी पावता च्यार दिवस आधिक उणे लागले. पुढेहि रात्र दिवस बोलून खावंदाचे लक्ष राखावें याअन्वये होतो तो परभारे देसी यैवज घेतलियाचे वर्तमानें परस्परें आली. हे गोष्ट लोकोपवाद पाहता अनुचित जाणून सुभेदार चितात बहुत खिन्न जाले. त्याचा परिहार विनंतीपत्री काये ल्याहावा? धण्यानें आजपर्यंत लौकिकांत प्रताप वाढवून लोकविरुद्ध प्रकार न घडला त्याप्रमाणे खावंदानी कृपा करीत जावी. सेवकानी चाकरी (सी) अंतर न करावें. आम्ही येथे नानाप्रकारें बोलावयासी कमी न केली. त्याचा विस्तार किती लेखन करावा? अस्तु आपण कायावाङ्मन:पूर्वक स्वामिकार्यावरी लीन आसो. दुसरा पदार्थ विशेष जाणत नाही. कृपा करणार साहेब समर्थ आहेत. यैवजाविसी वारंवार बोलून उदेपूर यैवजी साहा पावते करावयासी अगोदर लिहिले होते. आणीक च्यार येकूण दाहा सिवाये पथ्या घा बाकी येणेप्रा निक्षुण्ण ताकीदपत्रे पाठविली आहेत. जाटाकडील यैवज तूर्त येत नाही. सरकारांत निकड जाणून प्रस्तुत हरतजवीज कर्जवाम करून त्या यैवजी यैवज द्यावा यैसा निकाल काढून राजश्री सुभेदारानी गंगाजलनिर्मल अहिल्याबाई याजला लिहिले आहे, त्याप्रा यैवज पावेल. आम्हास स्वामिसेवेसिवाय रात्रंदिवस चिंतन दुसरे नाही. फलदाता श्री असे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Gangadhar Yeshvant to Raghunathrao begs to be excused for the little unavoidable delay in sending the stipulated amount. There was, he adds, no sufficient excuse for the addressee to realize the amount direct from Holkar's provinces. Pleading for the inability of the Holkar to pay off the Government dues. He however promises to arrange for an early payment.*

4209

No. 92] [3-8-1764

पौ छ १३ सफर
खमस श्रावण

श्री

श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ माहे सफर पावेतो प्रां मजकुरचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. यानंतरी राजश्री माहादाजी सिंदे महेस्वरचे घाटे उतरोन उजनीस गेले. तेथे गेलियावर प्रा बढवे येथील किला व घरगावचे ठाणे घ्यावे. जासूद जोडी बातमीसहि आली होती की किलेयात स्वार प्यादे किती ते निघोन उजनीस गेली. इतकियांत आमचा ग्रहस्त उजनीस आहे, त्यासहि सिंदे याचे दरबारची बातमी पुर्ती लागली की दगा करून बढवे याचे ठाणे घ्यावे. त्यावरून त्या ग्रहस्ताने तावडतोब पत्र पाठविले त्याची नकल सेवेसी करून पाठविली आहे त्यावरून विदित होईल. बढव्यात सिबंदीची नेमणूक स्वामीनी पाच हजार रुपये करून दिल्ही त्याचे शंभर प्यादे होतात. तितक्यानें किलेयाची व शहरची रखवालीहि होत नाही; तेव्हा मी जाजती दुसरे शंभर प्यादे व पंचवीस स्वार ठेऊन आजपावेतो प्रगणेचा बंदोबस्त केला, ही बातमी येताच दुसरे दोनसे प्यादे व पंचवीस स्वार नवे ठेऊन बढव्यास पाठविले आहेत; परंतु च्यारसे प्यादे व पनास स्वाराच्यानें ठाणे राहणार नाही. सिंदे दोन हजार स्वार व येकाधी तोफ काही प्यादे पाठविणार; तरी स्वामीनी तीनसे च्यारसे स्वार पत्रदर्शनी पाठवावे, व प्यादे दुसरे च्यारसे पाचसे ठेवावयासी परवानगी पाठवावी. सात आठसे प्यादे ठेवावे तेव्हा किला व शहर राहील. नाहीतरी ते ठाणे घेतील. आपण रागे भरतील यास्तव विनंती लिहिली आहे. केरोजी पवार पथक होते ते निघोन गेले हे सविस्तर पहिले सेवेसी लिहिले आहे. येथे राऊत पाठवावे ते नामांकित पथक मातबर पाठवावे. येथे प्रगणा राखोन राहातील यैसे पाठवावे. किलेयाची येकेक च्यार साडे च्यारसे हात यैशा च्यार भुजा बुरूज सिवाये किलेयासी दरवाजे दोन यैसा किला अफाट, सिवाये शहरपना प्यादे बहुत रखवालीस लागतात; यास्तव याची आज्ञा लौकर पाठवावी. किलेयात दारू दाहा मण व सिसे सा मण यैसे खरेदी करून ठेविले आहे. काही गला वगैरे

4210

जिनस बेगमी केली आहे; परंतु राऊतासिवाये व प्यादेयासिवाये बंदोबस्त होणार नाही. याची आज्ञा स्वार प्यादे यावयासी ढील लागल्यास ठाणे राहाता कठीण आहे; यास्तव त्वराच जाल्यास उतम आहे. हा बखेडा जाहला तरी मजला दोन मइने यावयासी कामास येणार नाही. याची आज्ञा तेहि ल्याहावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ballal Bhuskute requests Raghunathrao to reinforce Barwha without loss of time as the place is threatened by Mahadaji Sindia.*

---

*No. 93*] [*4-7-1767 ?*

श्री

**राजश्री दमाजी गायेकवाड सेनाखासखेल समशेरबहादर गोसावी यांसी**

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो रघुनाथ बाजीराव आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. खासा स्वारी मातबर मोहिमेस हिंदुस्थानात आली असता समागमे आपण पांच हजार फौजेनसी यावें ते गोष्ट घडली नाही. राजश्री सयाजी गायेकवाड समागमे होते ते गेले तेव्हां राजश्री रामचंद्र बसवंत तीन च्यार महिने होते. हाली आपणाकडील फौज म्हणावी तर आहे ती समजलीच आहे. गुदस्तांपासून फौजेस कर्ज रुपये दिले त्याचे ठिकाण नाही. सालगुदस्तांचे सवापाच लक्ष रुपये येणे त्याची निर्गत केली म्हणून आपले पत्री मात्र लिहिलें आलें; परंतु येवजाचे वसुलास हुजरून रा। केसो बहिरव आहे त्याचे पत्र आले नाही. त्यास येवजाची रवानगी सत्वर करावी. राजश्री आपाजी गणेश येथून गेले त्यांचे मामलतीचे बंदोबस्ताचा मजकूर फार आगाध नव्हता. परंतु त्या कार्यास बहुत दिवस लागोन मागती कोणताहि मजकूर सेवटास गेला नाही. त्यास आत:पर त्यांचा आमल यथास्थित होये ते कार्य सत्वर करून श्रावण अखेर-पावेतो आपण तयारी करून फौजसहवर्तमान यावे. रा। रामचंद्र बसवंत यांस निरोप दिल्हा ते वेलेस येवज आणावयाकारिता हुजरून माणको वासुदेव कारकून दिल्हा आहे. त्यासमागमे येवजाची रवानगी करावी. रा। छ ७ सफर बहुत काय लिहिणे हे विनंती. गोपालरायाचे पारपत्य अद्यापि होत नाहीं हे अपूर्व आहे. हरतजवीज करून गोपालरायाचे पारपत्य करणे. मुलकाचा वसूल आपाजी गणेशाकडे चालल्यास शहरात किती दिवस दम धरील, शिबंदीस काये

देईल ऐसे तजविजेने हातास येईल. शहरातहि भेदाभेद केला तरी होइसा आहे. तुम्ही वाकीफ आहा. तुम्हास येथून ल्याहावेसे नाही. चार रुपये खर्चहि भेदास पडला तरी सरकारात कबूल असे. परंतु गोपाळराव गणेशाचे पारपत्य उतम रितीने जाहालेच पाहिजे. तुमच्याने नच होये तरी खासा स्वारीस यावे लागेल. सरकारचा ऐवज तरी पाठविला असेलच परंतु हिंदुस्तानचा बंदोबस्त बहुत उठला आहे. खासा स्वारीहि बहुता दिवसी आली यास्तव तुम्ही हुजूर येऊन शेवा करून दाखविल्यास उतम आहे. येविसी रामचंद्र बसवंताचे जबानी-वरून कलेल. छ मजकूर बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao orders Damaji Gaikwad to send forces to quell disturbances of Gopalrao Ganesh.*

---

*No. 94*] [*29-7-1765 ?*

## श्रीशंकर

### श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विस्वासराव लक्षुमण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ १० सफर मुा किले कन्हेरा स्वामीचे प्रतापेकरून येथास्थित आसे विशेष. या प्रांतिचे वर्तमान तरी तीन वर्षे जाहाली. किले मजकुरास आलो तो रा बाबूराव कोनेर याणी किला शुष्क येक सेर धान्यदेखील नसता स्वाधीन केला. मुलकाची अवस्था म्हणावी तर तीन वर्षे राज्याणी व जमी-दारानी येक रुा कोणास न देता स्थल बलकाऊन बसले आहेत. मातबर सरदार फौजसुधा कोन्ही येता तर रुजू होते तो प्रकार न जाहाला. गतवर्षी रा माहादजी सिंदे मारवाडप्रांतास आले. त्याजला बंदोबस्ताविशई कागदाचा खेत केला. निदानी रा संताजी वाबले पाच सात हजार फौजेनिसी पाठविले. त्याणी येऊन मुलुकात लुटफाट करून कोन्ही आडवे न येता भये खाऊन गछ करून गेले. त्याबरोबर आमची फौज दोन हजार उठून गेली. आम्ही त्याजबरोबर यावे तर सरकारचे स्थल कैसे सोडोन यावे ? खावंद शब्द ठेवितील यास्तव हजार राऊत दोन हजार प्यादेयानिसी राहाणे प्राप्त जाहाले. तदनंतर सविस्तर वर्तमान श्रीमंत पंतप्रधान स्वामीस व तीर्थस्वरूपास विनंतीपत्र लिा तेथून अज्ञा आली की दोन च्यार महिर्णे दम धरून राहाणे. मागाहून सरदार त्या प्रांताच्या बंदोबस्तास येतील. त्याजला तुमचे मामलतीच्या बंदोबस्ताविशई उतम प्रकारे सांगितले जाईल ते आज्ञेवरून सरदारांची मार्गप्रतीक्षा करीत राहिलो

तो रा मल्हारराव सुभेदार आले ते प्रभारे जैनगरच्या मुलकांत गेले. मागाहून रा माहादजी सिंदे येणार हे वर्तमान आईकोन रा विठल जानराव आगाव उजनीस पा की कदाचित हेहि त्याजकडेस जैनगरास गेले तर आपला बंदोबस्त होणे कलतच आहे. बकसी मारनिले येकमासपर्यंत उजनीत राहून मार्गप्रतीक्षा केली. त्यास रा माहादजी सिंदे याचा प्रकार होणे तो हुजुरच जाहाला. फौज आणावयासी बकसी गेले म्हणून मुलकात व राज्यासी दबाव होता. त्याजला दिवसगत लागल्याणे इकडील दबाव सुस्त पडला. आम्ही तीन वर्षे कर्ज खाऊन लोकाचा दंगा सोसून राहिलो त्याचे फळश्रुत काहीच न जाहाली. आता कोन्ही कर्जहि देत नाही. मागल्या कर्जाचा तगादा सावकार करितात आणि सिलेदार व किल्याचे लोक वगैरे रोज उठोन हंगामा करितात. कोन्ही दिवस धरणीपारणी केलियाविरहित जात नाही. निमित्य खावंदास विनंती लिहिली आहे की इकडील बंदोबस्ताविशई ज्यास आज्ञा जाहाली असेल त्याजला समक्ष आमचे उपरालियाची आज्ञा करावी अथवा त्याजला साहित्यपत्रे पाठवावी की त्याचा बंदोबस्त आधी करून देणे म्हणजे सेवकाचे राहिल्याचे सार्थक व सावकाराचे व लोकाचे देण्यापासून मुक्तता होईल. खावंदावेगले कोण परामृश करणार यास्तव विनंतीपत्र सेवेसी लिहिले आहे. कृपावंत होऊन जेणेकरून सेवकाचा आब राहे तो अर्थ खावंद करणार समर्थ आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Vishvasrao Lakshman appeals to Dadasaheb to send troops to restore order in his districts.*

---

*No. 95*] [*3-8-1765?*

श्री

राजश्रियाविराजत राजमान्य राजश्री रावजी स्वामीचे सेवेसी

पो महिपतराव विश्वनाथ कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १९ माहे सफर मुा कसबे वारणावा येथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लेखनार्थ अवगत जाहला. पाच हजार रुपयेची वरात करीत होतो. परंतु राजश्री नानानी[1] रदबदली करून राहविली आहे. त्यास रुपये सत्वर पाठवणे म्हणून आज्ञा.

---

१ नारो शंकर.

यैसियासी ठाणी उठली. येवज जमा जाहला होता तो पाठऊन दिल्हा. आम्ही लस्करांत बसलो आहो. येथे येवज कोणता आहे? लस्करांत रात्री चोरांची हुलड याजमुळे होता येवज तो पाठऊन दिल्हा. तूर्त ठाणी बसवावी म्हणून सरकारचीहि आज्ञा आणि येथील सरदारानी सांगितले त्याजवरून छ १२ सफरी राजश्री दामोदरपंत समागमे पनास स्वार व शंभर प्यादे देऊन ठाणेस पाठविले. जमीदारासी सलुकच होता. ठाणे बसले. रोहिल्याचे दाहावीस प्यादे होते ते उठोन गेले. परंतु प्रगणेत बेतालिसी गांवात तेरा गाव वाचले आहे. त्यांत पाच गावचे जरीबे[१] केले होते. केवलच धाकटी (?) परवानगी वस्तीस राहून सेते करितात. त्याचा दाणा करार करून काही घेतला आहे. काही त्याजकडे राहिला आहे. घेतला दाणा तो घरात भरून ठेविला होता. निघावयाचे गडबडीत जेसा गेला तेसा दोन तिनसे रुपयेचा दिल्हा. बाकी तेसाच राहिला. त्याची गत काये जाहिली ते पाहवी. दाहावीस ठाणेत प्यादे न्यामतसिंगाचे होते. गेला राहिला दाणा कळेल. बाकी गावकर आहे. ते परगावी राहतात. गाडे पाठऊन देऊ. गला दिल्हा तरी उतम न दिल्हा तरी जबरदस्ती आसावी. तो विचार दाहा हजार फौज येथ आहे, परंतु यांचेनेहि काही होत नाही. तेरा गावापैकी पांचा गावची येसी वाट आहे. सात गाव व कसबा, त्यास कसबा तो अगदी मिलका आहेत, खालसा पाच सातसे रुपये रबीचे बसतात, त्यापैकी कांही वसूल जाहला आहे. बाकी राहिली आहे. ती माहाल हे बाकी करील तेव्हा आम्हासीहि घेणे. गावच्या रबीचा पैसा नाही. आम्ही जवल म्हणून निमे दिल्हे. आतां सर्व बरोबरी घेणे. हा त्याचा स्वालजाब सात गाव जे राहिले ते पके गढीबंद आहेत. या फौजेसहि मानीत नाहीत. तोफा आसत्या तरी मानीते. आम्हापासी त्यांच्या बोली होत्या तेव्हाहि बोलीची अस्ता सोडली म्हणून बोलत होते. आता तो बोलीहि त्याच्या सुटल्या(ची) चिठी देऊन स्वार पाठविले होते. गावांत घेत नाहींत येथून तीन कोसावर दोघट म्हणून अजाचे प्रगणेचा गाव आहे त्याजवल मोकम करावयाविसी राजश्री त्रिंबक भास्कर व बगाजीपंत व अणखी सरदार आहेत. त्यास विनंती केली. परंतु त्यास अनकूल पडत नाही. तो गाव कांहीं तोफाविरहित बंधत नाही. त्या गावची गुदस्ताचे रबीची जमा साडेसात हजार आहे. सालमजकूर पाच सातसे रुपये मात्र दिल्हे आहेत. पुढे वसूल विचार विचारे करीतच होतो. तोफा फौजेने आब तोडला. आता फिरोन गोष्ट सांगतात. त्याचप्रमाणे साती गाव गढीबंद आहेत. वसुलास

---

१ मोज्दाद.

हजार बारासे तीन हजार पावतो आहेत. दोघट तो भारी आहे. परंतु बिना जबरदस्ती पैसा देत नाहीत यास उपाय काय करावा? ठाणे मात्र बसले. आम्ही येथे लस्करात अहो. येथून फौजेचे बले गावास तसदी करावी, जमीदार अणावे, या अन्वये बसलो. परंतु त्या गोष्टी येथे अगदीच नाहीत. बेतालीस गावात सात गाव जमेचे राहिले, त्याची वाट येसी आहे. आणि स्वामी तो म्हणतात जे पाच हजार रुपये देणे. त्यास येवज कोणता आहेत? गाव तेच सालसुदीने पैसा देते तरी दाहा हजार रुपये सरकारांत पाठऊन देता. प्रस्तुत आमच्या अनोपाय जाहाला आहे. ठाणेत जाऊन सिबंदी मात्र वाढवावी. वसुलाचे काम बंद ज़ाहाले. तोफा आल्यातरी वसूल होईल, दबाव बसल. आणखी ठाणी राहिली आहेत ती बसतील. बुढाणेत ठाणे पोवाराचे आठ दिवस गेले आहे. परंतु गढीत रोहिलेचे प्यादे बसले आहेत ते निघत नाहींत. त्यास जबरदस्तीने काढावे तेहि विचार संकटातच आहे. कोठेहि दबाव बसेनासा जाला आहे. याजमुले गढीबंद गाव आहेत, ते बधत नाहीत. सारांश तोफा आल्यातरी काही कामकाज चालीस लागल. नाहीतरी काहीच होत नाही. ठाणी माघारी येतील. स्वामीस कलावे याजकरिता लिहिले असे. राजश्री त्रिंबक भास्कर यास आमचे साहित्याविसी सरकारचें पत्र अगत्यरूप पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mahipatrao Vishwanath, an officer of Naro Shankar, writes to Vishvasrao Lakshman of Jhansi, about difficulties in realising the revenue.*

---

*No. 96*] [*3-8-1765*

पौ छ २४ सफर.

**श्रीगजानन.**

**श्रीमंत माहाराज राजेश्री दादासाहेब**
**स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक खंडेराव रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १९ माहे सफर मुा अवंतिका क्षेत्र माहराजाचे प्रतापेकरून सेवकाचे वृत यथास्तित असे. यानंतर इकडील मजकूर तर रो माहादाजी सिंदे यासी व सकूबाईसी भेट जाली. यानंतर फौजेची नालबंदी द्यावेयाचा करार उजेनीत होता. यासी यैवज मालव्यातील प्रगणेयाची पुढले सालाची रसदेचा जमा करून नालबंदी दिली. परंतु फौज मोठी व यैवज थोडका याजकरिता

4215

जितकी फौजेची समजाईस जाली तितक्यानसी रो माहदजी सिंदे व सकूबाई पुढे कूच करून कोव्या प्रांती अले. रो बाजी नरसिह व राघोराम व अच्युतराव दिवान यानी माघे राहून लोकाची कर्जे घेऊन समग्र लोकास समजाईस करून लस्करास जाणार होते. इतकियात रो माहादाजी गोविंद याजला तीन लक्ष रुपये देत होते ते न घेऊन इंदुरांस गेलेत व रो त्रिंबकपंत अबा व गोविंदराव हे उजेनीत होते व बाईची मोजमी याजला होती. यास्तव याजला माघारे घेऊन जायास्तव रो माहादाजी गोविंद हे मावारे उजेनीस अले व रो अबा व गोविंदराव याजला बरोबर घेऊन जावे. इतकियात गावकरासी व बिनेचे मनुशासी कजिया जाला. त्यास गावकर येऊन या त्रिवर्गाजवल फरियाद जालेत. यानी त्या गोष्टीची सनद करून गांव मारले व लुटल्याचे नाव करून त्याजवरून आर्धरात्र समई दग्याने जाऊन खासिरापेटी[१] खजान्याची त्यावर जाऊन पडले. लूट पुजकल हाती लागली व रो माहदाजी गोविंद याजला चार जखम लागले व परिनाम शांत जालेत. काही जुज जाले नाही व मग जाऊन हे त्रिवर्ग सिंद्याचे लस्करात गेले व कोव्याची मामलत पंधरा लक्षावर चुकली. त्यापैकी तूर्त पत्रणे साहा लक्ष नगद व पोण लक्षाची हती घोडे वगैरे द्यावे याप्रा करार होऊन यैवज द्यावयास्तव राघो शंकर वगैरे मातबर गेले अहेत. यैवज वसूल जालियावर राजा खुद भेटावयास येणार व श्नेह भाऊपण करनार व राजेश्री मल्हारजी होळकर सुभेदार मोटेचे गडीस मोर्चे लाऊन बसले आहेत. फोज सात अठ हजार अहे. वडसेकरानी घेतली याजकरिता दबाव देत अहे. राजा मात्रागमनी आहे, यैकत नाही, सिंद्यासीहि वरचेवर बोलावतात व त्यास हेहि जाणार आहेत. मारवाडेची [अपूर्ण].

¶*Khanderao Raghunath informs Raghunathrao of the scuffle in which Mahadji Govind Kakde was killed.*

---

*No. 97]* *[23-8-1765*

**श्री**

**राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा**
**गो यासी.**

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो रघुनाथ बाजीराव आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत

---

१ राहुटी.

 १२५६४

असिलें पाहिजे विशेष. आपण पत्राची उत्तरें पाठविली ती पावलीं. श्रावण वद्ये येकादसीस डेरे दाखल होऊन फौजेचा गाहा करितों म्हणोन विस्तारें लिहिलें ते कललें. ऐशास श्रावण मासी निघावयाचे जालेंच असेल. याउपरी गंगाथडीस टोक्याचे सुमारे अविलंबे यावे. खासा स्वारीहि सत्वरच येत असे. सविस्तर राजश्री दिवाकर पुरुशोत्तम याचे पत्री लिहिले असे त्याजवरून कलेल. रा छ ९ रोवल.

¶*Raghunathrao asks Janoji Bhonsle to join him in his campaign in the North.*

---

*No. 98*] *[25-8-1765*

पौ छ ७ रावल

### श्रीमोरया

शेवसी विज्ञापना. नवाब सुज्यातदौला यानी येऊन आनुपशहरचे मुकामी बहुत बाजीद होऊन दारमदार केला आणि फिरंगी याच्या पारपत्यास चलावे, आमचे साहायेकरून पातशाही बंदोबस्त सर्व तुम्ही आम्ही मिळून करावा याप्रमाणे ठहराऊन गेले. (या)प्रमाणे आम्ही थोर मनसबियावर नजर दे(ऊन) इटावियाचे वगैरे काम सर्व येकीकडे ठे(ऊन) त्याचेच कामावर गेलो. रोहिले पठाणास * * * सामील करितो ते न आले. आपण मात्र येऊन सामील जाले. बिटुरींहून कूच करून जाजमहूस नेले. तेथून कुरा नजीक नजफखांन फौजसहवर्तमान त्यास तंबी करणे प्राप्त जाणून त्यासी गाठून हास्तगत केले. त्याउपरी मुकाम कुरियांसीच होते. प्रयागाकडून फिरंगी आलियावर लढाईचा प्रसंग पडला. करारप्रा पैसा येणे तो न आला. रोहिले पठाण येऊन सामील न जाले. सेवट कालपीस बुनगे पावले तोपावतो बराबर आले. तेथे आम्हासी करार केला की मी फरोकाबादेस जाऊन पैसा आणितो आणि पठाण रोहिले याजला तुमचे सामीन करितो. आठा दिवसात फिरून येईन. आम्ही उचित जाणून त्यास आज्ञा दिल्ही. ते फरोकाबदेस गेले. तेथे आहांमद-खांन पठान हाफिज रोहिले होते. त्यानी काही त्याचा सन्मान आगर जाबसाल सुधा न केला. सेवट त्यानी परिणाम जाणून याजकडील लक्ष सोडून * * शाहासच शरण गेले. तेथे इंगरेज वगैरे * * * * मारफातीने मुलाजमत केली. पातशा(हानी) सर्व त्याचा आन्याये माफ करून सर्फराजी

---

+ पत्र होळकराकडील.

केली. यानीहि नजरन्याज देऊ करून आपला प्रांत खेरीज प्रयाग चरनाल व कासी दरोबस्त सोडून घेतला. त्यांची मनुशे बरे * * हाफिजाचे जवल होती तेहि त्यांनी आपल्या सुम्यांत. नेली. येकूण रोहिल्याचे त्याचे आंतर शुध नाही. त्याजकडील त्रिंबकदास खत्री वकील आम्हापासी आहे. त्याच्या विद्येमाने कागदपत्र येतात की मी त्याजवेगळा नाही. त्यासी बोल्याप्रमाणे वर्तणूक करीन ऐसी मिष्ट भाशेण मात्र करितात. तूर्त आम्ही इकडे छयावणीस आलो. दोन तीन महिने बरसांत तोपावेतो सारा भाव निदर्शनास येईल. त्याप्रमाणे बादजबरसात उपयोगी मनसबियांची योजना हो(ई)ल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Chandrachud reports the development in the North particularly the abject surrender of Shuja-ud-daula to the English.*

---

*No. 99*] [*11-11-1765 ?*

श्री

रामचंद्र तुकदेव जयनगर कार्तिक वा १३ रोज (गुा)

पादशानी डेरे बाहेर दिल्हे. सुज्यातदौले अयोध्येहून आलियावर ते व अमदखान वगैरे एकत्र होऊन आगरियास येणार. १

दिलीत पादशाहाजादा व जाबतेखान रोहिले आहेत. १

अनरुधसिंगाचा भाऊ रतनसिंग कानोडेस आहे. त्यानें रोहिल्याकडे पैगाम लाविला सबब माधोसिंगानें बक्षी वगैरे रा केले की त्यास तंबी देणे. नोकर सरकारचा पैगाम[२] लावीत फिरतो. सा १

सीख सरहंदेहून पुढे आले. कांही बुढ्या सारंगपुराकडे उतरले. जोहरमल जाट व सीख एक होणार. पैगाम आहे. १

फरासिसानें कलकता व मकसुदा[१]बाद घेतली. रोहितास गडास कजिया पडला आहे तो गड घेऊन काशीस येणार. इंग्रजावर दबाव पडला आहे. १

नजीबखान दहा हजारानसी हसीहसाराकडे येऊन भोवानी शहर मारिले. प्रस्तुत तेथेच आहे. नारनालेकडे दबाव दिल्हा आहे. मुलकाची खंडणी करितो सबब सिखाचा कजिया होणार. ते भारी आहेत भटनेरचा राजा व आला जाटाचे पुत्र रोहिल्याकडे येणार. १

माधोसिंग तरतूद करितात. चतूर (?) बोलाविले आहेत. १

अच्युतराव याणी उदेपूरची मामलत विल्हेस लाऊन पुढें आले आहेत

---

१ मुर्शिदाबाद. २ बोलणें, सूत्र.

4218

हजरीस येणार. जोतपूरची मामलत करारात आणून बिजेसिंगाकडील निकाल जाला तर उत्तम नाही तर मारवाडांत धूम करणार. १

माधोसिंगाकडेहि पत्रें पाठविली कीं बाकीचा ऐवज देणें; नाहीतर धूम करितों. त्याणी उतर लिहिले कीं सुभेदाराकडे समजावणे. १

रहिमतखां तुभतीजी (?) नवाब दाऊदखां पाा जाफराबाद येथें अर्डाच गांव दोन हजार तनख्याचे आहेत. थोडा आबाद, बाकी उज्याड असे. १

आपले वडिलानी आमचे वडिलांचे नावावर चालविले. हालीहि बुजेर-[१]गाचे नावावर नजर देऊन चालविले पाहिजे.

खेडियाचा ऐवज चौथाई बाबती सरदेशमुखी मात्र करून सनद बक्षीस कीजे. १

रांडा वगैरे पाचसे माणूस उपासी मरते, ते दुवा उपर दराजी करितील (?) १

¶*Ramchandra Tukdev sends his daily report from Jaipur, about events in various places.*

---

*No. 100*] [*14-11-1765*

पौ छ ३ रजब सुाा सीत

* * पौष्य

## श्रीमोरया

### श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक मलारजी होळकर कृतानेक विज्ञापना येथील क्षेम तागाईत मार्गश्वर शुध १ प्रतिपदा जाणून साहेबाचे कृपादृष्टिकरून येथास्थित आसो विशेष. राजश्री गणेश संभाजी या प्रांती सरकारतर्फेने होते. त्याउपरी नानाप्रकारे प्रसंग पडले. सेवट दुंडीमुळे केवल खराबीत आले. आम्ही ये प्रांती आलियावरी येऊन भेटले. त्याचा पुत्र राजश्री विस्वासराव गणेश देशास आले आहेत. ते साहेबाचे दर्शनास येतील. त्याचा गौर करणार स्वामी समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Malharji Holkar requests Dadasaheb to entertain in his service Vishvasrao Ganesh, son of Ganesh Sambhaji.*

---

१ बुजरग = मोठे, थोर.

No. 101] [17-12-1765 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ४ माहे रजबपावेतो स्वामीचे प्रतापेकरून सेवकाचे व प्रांत मजकुरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रे आली त्यात आज्ञा की प्रगणे नेमावर येथील बंदोबस्त करणे आणि वस्तीहि करणे व होलकराकडे निमे तरफ आहे त्याचीहि जफ्ती करणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे प्रगणेमजकुरची होलकराचे तरफेची जप्ती केली. सरकारतर्फेची लावणी आबादीचे डौल केले आहे. दाहातीस गाव नवे अबाद होतील, होलकराचे तर्फेचीहि अबादीचा डौल करितो. होलकर याचे तर्फेची जमा तूर्त सवा दोन अडीच हजाराचा आकार आहे. सरकारतर्फेचाहि बामेपाणी तपा मिळून पाच हजार पावेतो होईल येसा प्रकार आहे. प्रगणा बहुत चांगला आहे. पिकांस उतम येसा प्रांत आहे. परंतु चोरामुळे वस्ती होऊ पावत नाही. चोराचे पारपत्य सिबंदी वेगले होत नाही. सिबंदीची नेमणूक पहिली सिंद्याकडील तर्फ सरकारात घेतली ते समई पनास प्याद्याची करून दिल्ही होती. अतां दोन तर्फा जाहल्या. याचा बंदोबस्त पनास माणसानी होत नाहीं. इतकी माणसे तो कसबेयाचे ठाणे आणि जकातीचे नाके यावरी व तहसिलेस प्रगणातील लागतात. ठाणेबंदीस लोक राहात नाहींत. तस्कराचा तो बंदोबस्त ठाणेबंदी करून पारपत्य केल्याविना अबादी होत नाही. रयेत वसवास चोराचा खाते यास्तव सिबंदी पाहिजे. त्याची व ठाणेबंदीची यादी आलाहिदा पाठविली आहे. याप्रमाणे सिबंदी असल्याविना चोराचे पारपत्य होऊन लावणीचे डौल होत नाहीं. सांप्रत्य चोरानी उपद्रव मांडिला आहे. मौजे बासद्या पा। मजकूर येथील पाटील यासी धरून नेला आहे. यास्तव याप्रमाणे ठाणेबंदी करून बंदोबस्त करीतो. याची आज्ञा पाठविणार स्वामी समर्थ आहेत. तपे पाणीकाटा फो ड हा त पा सिंद्याचे तर्फेत होता. परंतु सिंद्यानी, प्रगणे उचोद हा माहाल त्याकडे मालव्यातील घाटावर आहे, तिकडे वसुलास सनिध म्हणोन लाविला होता येविसी पूर्वी विनंतीपत्रे सेवेसी लिहिली होतीं त्यावरून तेथील जमीदारास आज्ञापत्र सादर जाहाले त्याजवरून तेथे आमल बसविला. हाली सिंद्याकडील कमाविसदार उचोदास नवे आले. त्याणी राजश्री माहादजी सिंदे याच्या संदा आणिल्या आहेत आणि तपे मजकुरी माणसे पाठऊन खटखट करीतात सरकारचे

4220

सनदेस मानीत नाही यामुळे रयेतीस बेरजा वाटतो. तेणेकरून वस्ती कैसी होती? यास्तव विनंतीपत्र लिहिले आहे. तरी येविसी सिंद्यास ताकीद होऊन त्याचे कमावीसदारास पत्र त्याचे येसे कीं तुम्ही तपे पाणियाची दखलगिरी न करणे. सरकारचे तर्फेने नारो बलाल अमल करितील त्यासी करू देणे. येसे पत्र त्याचे आल्याविना खटखट मिटत नाही व जमीदारास पत्र येसे कीं तपे मजकुरचा अमल सरकारचे तर्फेने नारो बलाल यासी सागितला असे. त्यास तुम्ही रुजू राहून कामकाज मारनिलेचे विद्यमाने करीत जाणे. सिंद्याचे कमावीस-दाराकडे येकंदर न जाणे. गेलिया मुलाजा होणार नाही येसे पष्ट समजोन सरकारचे अमलदारास रुजु राहणे येसे सरकारचे आज्ञापत्र येकूण दोन पत्र पाहिजे. याची आज्ञा करणार धनी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाति.

¶*Naro Ballal reports to Dadasaheb the administration of Nemawar newly taken over from Holkar and Sindia.*

---

*No. 102*] [*19-12-1765*

छ १ शाबान उर्फ माघ
सन सीत.

## श्रीशंकर

### श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक रामचंद्र तुकदेव चरणावरी मस्तक ठेऊन सां। नमस्कार विनंति विज्ञापना. येथील क्षेम ता। पौश शुध ८ आस्टमी परियेंत साहेबाचे प्रतापेकरून मु॥ सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर साहेबी कृपाळु होऊन आज्ञापत्रे * * * ८ सफरचे मितीची सादर * * * * * सेवकास मार्गेस्वर वद्य ९ प्रविष्ट जाली * * * * बहुत आनंद जाला. पत्री आज्ञा सादर जाली की भारी फौज मातबर तोफखानियानसी त्या प्रांते खासा स्वारी जलद येत असे. तुम्ही तिकडील वर्तमान वरचेवरी लिहून पाठवीत जाणे म्हणोन आज्ञा सादर जाली. त्यासी येकोन चितास बहुत आनंद जाला. साहेब या प्रांते येणार हा दबाव या मुलकात बहुत पडत चालिला आहे. साहेबाचे प्रतापेकरून सर्व गोष्टी होऊन येतील. साहेबाचे आज्ञेप्रमाणे इकडील वर्तमान वरचेवरी लिहून सादर करीत असो. सांप्रत या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री मलारजी बावा सुबेदार व राजश्री माहदजी सिंदे पाटील साहेब सर्व फौजेनसी एका विचारे

होऊन झासी प्रांतीचा बंदोबस्त करून दतिया बोडशाची मामलत ठराऊन तेथील निशापात होत आहे. तेथून पुढे भिंड गोहदप्रांते कूच जाले म्हणोन वर्तमान निश्चये आहे. जाट नारहरसिंगजी बराबर आहे. त्याचा बंदोबस्त करून द्यावा हा करार जाला आहे. याजकरिता जोहरमल जाट याजवरी शेह दिल्हा आहे. जाबसाल लागला आहे. पैकियाचा निकाल करून दिलियास सलुख राहील. नाहीतर मुलकात सिरोन धूम करीत असो. त्याजवरोन जाट जोहरमल आपल्या जागा मनसुबियात आहेत. सिखांसी त्याचा पैगाम लागला आहे. गुरुचे सीख सरहिंद प्रांताकडून उतरले होते * * * * * फौज घेऊन पुढे पानिपताकडे * * * * * सीख चालोन आले. याची त्याची लढाई मातबर झाली. उभयेताकडील माणसे बहुत पडली. नजीबखान जागाच आहेत. सीख पार उतरोन गेले. ते जमाव येका जागा करीतात. भारी जमाव करून जाट आपण येक होऊन भारी मनसबा करावा हा विचार त्याचा आहे. जाट जोरमल आगरियात आहेत तेथ सर्व विचार होत आहे. राजश्री सुभेदारसाहेब पातशाह येक होऊन आगरियासी जाणार हा विचार आहे. पातशाह अलीगाहरं याजकडून सहफुदीमहमद आले होते ते करारमदार राजश्री सुभेदारसाहेब यांसी करून पातशाहकडे गेले. येका जागा जालियावरी विचार पका करून पातशाह अलीगाहर यानी प्रयागीहून कूच करून दाहा बारा कोस आलीकड साहाराणपुरास आले. तेथूनहि पुढे कूच जाले. कुरा जाहानबादेस दाखल होणार. तेथून भारी मनसुबा करावा हा विचार आहे. नवाब सुज्यायतदऊले लखणुस आहेत व अहमदखान बंगस सर्वाकड पैगाम गेले आहेत. राजश्री सुभेदारसाहेब याची पातशाहची भेटी जालियावरी काये मनसबा होतो, सामील कोठे होतात, ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. राजश्री सुभेदार साहेब याचे कूच जाले म्हणोन वर्तमान आहे. निश्चये अर्थ अलिया सविस्तर लिहीत असो. विशेष पा(तशाह) जादा आहे. जाबतेखान सर्व बंदोबस्त * * * * * कड जाणार. जाटानी आपली फौज दिलीकड पाठविली आहे. रतनसिंग जाट ( ) राजे माधोसिंगजी याचेहि सरदेत धूम करीतात याजवरोन याच्या चितातहि त्यासी कजिया करावा येसे आहे. यानी आपली फौज दुलेराये बक्षी व जयेचंद व खानसामा याजबराबर आठ दाह हजार येका जागा करून कानोडेकडे पाठविली आहे. तेथे ठाकूर आनरुधसिंगजी याचा भाऊ रतनसिंग खंगारोत आहे. त्यानी बदमामली दाखविली त्याजवरोन त्यासी कजिया करोन तेथ आहे. जाटाचेंहि सरदेवरी दबाव देऊन आहेत. पाहवे काये मनसुबा पुढे होईल. राजे माधोसिंगजी

आपले जागा विचार मनसबा आहेत. राजे हरसाहेजी व ठाकूर राजसिंग हमीरदेव दिवान बलचंदचा वर्ग बहुत पेश आहेत. सर्व कारभार त्याजवरी आहे. राजश्री सुभेदाराकडील मामलतीचा जाबसाल भट राजे सदासिवजी ठाकूर शामसिंग हमीरदे याचे विद्यमाने आहे ते निकाल फडशा करितात. साहेबाकडीलहि दबाव उतमप्रकारे पडत चालिला आहे. आज्ञापत्राचा अर्थ हुजूर जाऊन माहराज राजे माधोसिंगजी याचा मुनसी रामकिसन याचे विद्यमाने निवेदन केला. सत्वर येणार त्यासी राजे माधोसिंगजी बोलिले की आम्ही सर्व प्रकारे मनसुब्यास सादर असो. राजश्री सुभेदार यासी सलुख केला हलकिस्तीचा येवज पावता केला. बाकी साहुकाराकड राहिली. त्याचाहि निकाल करून द्यावयाचा ताकीद ? * * * * * घरोबा सर्व प्रकारे सुभेदारासी * * * त्यासी स्नेहाने आसो. श्रीमंत साहेबाचे शेवेसी ल्याहावे म्हणून आज्ञा केली. त्याप्रमाने साहेबाचे त्याचे सांगितल्याप्रमाणे अर्थ लिहिला आहे. राजे माधोसिंग याचा विचार सर्व प्रकारे ममता संपादून घ्यावयाचा आहे. सर्व विचार साहेबाचे प्रतापाचा आहे. प्रतापेकरून सर्व होईल. राजश्री आचुतराव गणेश व राजश्री खानाजी जाधव दाह हजार फौजेनसी किसनगडानजीक मुकाम करून आहेत. वरकड उदेपूर शाहपुरा रूपनगर येथील मामलत चुकविली. निशापात होत आहे. किसनगडवाला बदमामली करीतो. त्याच्या गावावर दंगा आरंभिला आहे. किसनगडचा बंदोबस्ती पहवरसिंग करून आहे. त्यासी कजिया लागला आहे. गावे मारीतात. त्याजकडील तह बसल्या राजश्री पाटीलबावाकड जातील. मारवाडचा करार दाहा आलाकर्णी चारण करार करून गेले त्याप्रमाणे राजे बिजेसिंगजीनी कबूल केले. सलुखात आहेत. निकाल करून द्यावयाची तरतूद होत आहे. राजश्री अवचुतरावजी अजमेरीस बंदोबस्त करून याजकड दबाव देणार. येक दोन पत्रे आज्ञाधारकास पाठविली. त्यासी राजे माधोसिंगजी याजकडील कारभारी यानी राजश्री सुभेदार याजकड लिहिले आहे. त्याजकडील आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तनूक करीन * * * * * * येवजा तगादा करीता वर जाला * * . * * * * * सिष्टाचार संपादून घेतील येसे वर्तमान होईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. जाट नाहरसिंगजी यानी आपले कबिले ढवलपुरी होते तेथून काढोन जयेपुरास पाठविले आहेत. राजश्री सुभेदारसाहेब यानी सरकारतर्फेने राजश्री जगनाथरावजी तेथे होते त्याजसमागमे राजे माधोसिंगजी यासी पत्रे देऊन पाठविले आहेत. कबिले त्याच्या ठिकानी बदनपुऱ्यात ठेऊन गौरसी करावी मनसुब्यास सादर व्हावे , त्याजवरोन जगनाथरावजी जाटाचे कबिले घेऊन जयेपुरास

आले आहेत. कबिले दाखल आलियावरी सर्व अर्थ लिहीत असो. राजश्री जगन्नाथरावजी याची मुलाजमत जाली. भेटी घेऊन नारहरसिंगजी याचे कबिले बासईसनिध आले. तेथून घेऊन यावयासी गेले आहेत. राज्याची भेटी जालियावरी काये सला विचार याजकडील भावगर्भ सर्व लिहीत असो. वरकड लाहोराकडील वर्तमान तरी लाहोरात सिखांचा बंदोबस्त आहे. पठाण खंदारात आहे. तेथ विचार मनसबा करीत असे. सिखांचा बंदोबस्त सरहिंदपावतो उतम जाला. पुढेहि धूम करीत चालिले आहेत. पुढे जे वर्तमान ध्यानास येईल ते लिहीत आसो. आज्ञाधारकास राजश्री सुभेदाराकडून येवज खर्चास देविला त्याचा * * * * * * त्याजकडून येवज पदरी पडे ते करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. आज्ञाधारक आज्ञेप्रमानेच वर्तणूक करील. श्रुत जाले पाहिजे. विशेष काय लिहीणे. राजश्री जाणोजी भोसले याजकडील वकील आनंदरूप सिष्टाचार घेऊन आले होते. त्यासी सिष्टाचार संपादून राज्यानी माघारे वाटे लाविले. आम्हास बोलाऊन सांगितले की सिष्टाचार मात्र त्यासी वरकड विचार काही नाही ते लिहिले असे. कुफिया अर्थ ध्यानास आल्या लिहीत असो. साहेबाचे शेवेसी विज्ञाप्ति.

¶*The political situation in the North is the subject-matter of this lengthy letter from Malhar Tukdeo at Jaipur to Raghunathrao starting Northward. Reports of the invading Maratha army have greatly enhanced Maratha prestige. Jhansi and Orcha have been reoccupied and the army under Sindia and Holkar, who are happily in complete accord has advanced upon. Gohad and propose to join issue with Jawahirmal Jat. The Jat's position being thus jeopardised there is likelihood of his seeking assistance from the Sikhs. The Emperor has expressed a desire to be reinstated in his capital with Maratha help. The Princes of Jaipur and Marwad also happen to be favourably inclined towards the Marathas.*

---

*No. 103]* *[1765?*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**मोरोपंत दादा स्वामीचे शेवेसी**

पोष्य विठलराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान

श्रीमंताचे पत्री लिहिले आहे त्यावरून ध्यानास येईल त्याप्रमाणें पुढील तरतूद हिंदुस्तान राहे ते करावे. नाहीतर सर्व घेतला मुलुक जाऊन माळवा राहाणे कठिण जाले आहे. याची पैरवी श्रीमंतास सांगून करवावी. आम्ही सर्व प्रकारे आपले आहो. विस्तार ल्याहावा ऐसे नाही. विशेष कार्ये लिहीणे कृपा आसो दीजे हे विनंती.

¶*Vithal Shivdev requests Moropant Dada Phadnis to tender sincere advice to the Peshwa on the grave situation in the North.*

---

*No. 104*] [*1765*

पुा २

(पहिला बंद गहाळ.)

पंचवीस हजार रुपये सरकाराचे कारकुनाचे हवाला केले. बाकी पंच्याहत्तर हजार विसा दिवसानी सरकारचे कारकुनाचे पदरी पडतील व दोन लक्षाच्या हुंडी जलदीने येतात. अवरंगाबादेच्या जाल्या आहेत. तो येवज आनंदवलीस पावता करवावा. आम्ही त्रिवर्ग मजलदरमजल जाऊन सुभेदारांची व महादजी सिंदियाची भेट घेऊन येतो. गुता नाही. हे वर्तमान ज़ुजाचे लिहिले हे येकून हजूरची मंडळी लटकेच म्हणोन नानाप्रकारचा मजकूर समजावितील इतराजी स्वामी करतील यामुले दुरुखा शह सरदारावर पडतो. तिकडून परचक्राचे जुज इकडून इतराजी खावंदाची त्यास पुढे नक्षाचा कोण? पूर्ण ईस्वरी क्षोभ तर येसे न करावे. या सरदारांवर कृपा करावी. परचक्राकडून कल्यान इछावे याजमधे नक्ष खावंदाचा असे. सुभेदाराकडून किमपि तिलमात्र लक्षात अंतर नाहीं व माहादजी सिंदियाचे लक्ष पूर्ण रक्षावे हेच सुभेदार वडीलपण बोध करीतात. अनमानहि नाही. जलदीने खासा स्वारी कुमकेस यावे तो अर्थ खावंद करनार. रा॥ नारोशंकराचा प्रकार व सर्व वर्तमान रा॥ विष्णुपंत बाबाजी व रा॥ अन्याबानी विनंतीपत्रे लिहिली आहेत त्यावरून श्रुत होईल. कृपा करनार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञास.

¶*The writer assures Raghunathrao (?) to place confidence in Mahadaji Sindia and Holkar whose loyalty, he says, is above suspicion.*

4225

*No. 105*] [*December 1765*

+आमचा मुल्क खराब होतो त्याजवरोन राजश्री सुभेदारसाहेब यानी बहुत समाधानपूर्वक खातरजमा केली आम्ही इकडून जाटाचा मुल्क मारितो. फौजा रवाना केल्या. राजश्री अच्युतराव गणेश व खानाजी जाधव आठ दाहा हजार फौज किसनगडासनिध धूम करून होते. त्यासी ताकीद वरचेवरी पाठविली की तुम्ही जलद राजे माधोसिंगजी याचे फौजेस सामील होऊन बंदोबस्त राखावा. त्याजवरोन अचुतराव गणेश यानी खानाजी जाधव यासी मारवाडचे सरदेवरी ठेऊन आपण याच्या साहित्यास दरमजल इकडे आले. इकडील दबाव भारी देखो(न) जोहरमल जाठ यानी आपला वकील (फाटले) देऊन राज्याकडे पाठविले * * * जाली राजे हरसाहे व ठाकूर राजसिंगजी * * * * माने जाबसाल स्नेहवाद संपादून नवल * * * * खावत यासी घेऊन जाटाकडे गेले दबाव उत्तम प्रकारे देखोन जोहरमल जाट यानी गुरुचे सीख माघारे विदा केले. आपण काही फौज पाच सात हजार समागमे घेऊन कुंभेरीस गेले. गुरुचे सीख आपल्या मुलकास गेले. नवलसिंग याचे विद्यमाने कारभार विल्हे लागला. राजे माधोसिंगजी याची फौज कानौड नजीक मुकाम करून आहे. येथहि नगदी फौज ठेवावयाचा विचार जाला होता. राजश्री अच्युतरावजी फौजसहवर्तमान फागाई सनिध आले होते. त्यासी सीख मावारे गेले. त्याजवरोन ठाकूर राजसिंगजी याजबराबर हथी, घोडे, सिरपाव, जवाहीर, रकम सिस्टाचार काही मेजमानी पाठविली. तेथूनच सिस्टाचार करून माघारे वाटे लाविले. पुढे भेटीस बोलाविले होते परंतु लस्कर अनिवार, मुल्कात धूम करीत रबी चारितात त्याजवरोन तेथून निरोप देऊ(न) मार्गस्त केले. ते अच्युतरावजी टोंकेसनिध होऊन इंद्रगडाकडे गेले. करोलीहोऊन राजश्री पाटीलबावास सामील होतील. राजश्री सुभेदार साहेब व पाटीलबाबा फौजासहवर्तमान ग्वालेरीपलीकड पंधरा विसा कोसावरी आहेत. गोहदच्या गढ्या च्यार पाच घेतल्या. फौजा सव्या आगऱ्यापरियेंत धूम कारितात. मुल्क मारितात. जाटाचा मुल्क खालशा करावा. नाहरसिं(ग) याचे साहित्य उत्तम प्रकारे करून त्या * * * * * * बस्त करून * * * * विचार आहे. चमेल उतरोन * * * * * फौजसहवर्तमान सुरजेकडून आलीकड * * * * सत्वर फौजेस सामील होणार. त्याच्या राजश्री सुभेदारसाहेब याच्या भेटी जाल्यावरी सविस्तर आर्थ लिहीत आसो. जाठ

---

+ पत्र रामचंद्र तुकदेव यांचें.

4226

जोहरमल आपल्या जागा तरतूद करीत असे. फौजा ढवलपुराकडे पाठविल्या आहेत. आगरियाचा बंदोबस्त केला. इकडे आपल्या मुलुकात फिसाद पडल याजकरिता माघारे इकडून गेला. पुढे काय तरतूद आर्थ ध्यानास येईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत आसो. राजे माधोसिंगजी याच्या मुलुकात बहुत बखेडा गुरूच्या सिखाचा पडला होता. साहेबाचे प्रतापे करून प्रस्तुत दूर जाला वरकड (अपूर्ण)

¶*Ramchandra Tukdev's letter referring to a battle between Jawahirmal Jat and Madhosing in which Maratha aid was solicited by Madhosing.*

---

*No. 106*] [*1765 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. काल आज्ञा जाली त्याप्रा विस्वासराऊ लक्षुमणविठल सिवदेव यांचे गोटास गेले. तेथून कारकून मध्यस्त किल्यात गेले. त्याचे जाबसालाकरिता मार्गप्रतीक्षा केली. अद्याप जाबसाल आला नाही. परभारी हला करावा तरी बेमानी दिसेल यास्तव करतां नये म्हणून हला आजचा दिवस राहिली. मुहुर्ताचा समयहि टलला. याउपरहि जैसी मर्जी असेल तैसे स्वामीचे आज्ञेप्रा होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The note refers to an assault on a fort in Malwa.*

---

*No. 107*] [*1765 ?*

श्री

[ पहिले दोन बंद गहाळ. ]

**पुरवनी साहेबाचे शेवेसी.**

पातशाहकडील वर्तमान तरी पातशाह अलीगोहर कुन्यानजीक घाटपूर तेथ मुकाम करून आहेत. फिरंगी पाच हजार बराबर आहेत. आनखी फिरंगी येणार त्याची मार्गप्रतीक्षा करितात. नवाब सुज्यायदउले आपल्या सुब्यात लखणऊस आहेत त्याचा यावयाचा विचार काही नाही. मातबर सरंजामासिवाये

पुढे कैसे यावे याजकरितां तेथ मुकाम करून आहेत. राजश्री सुभेदार साहेब यासी पेगाम आहे तो आहे. जाबसाल मात्र आहे. फिरंगी सामील जालियावरी पुढे (कू)च करावे हा विचार मात्र आहे. आहमदखान बंगस आपल्या जागाच आहे. सुभेदारासी घरो(बा) बहुत आहे. राजे माधोसिंगजी यासीहि घरोबा बहुत आहे. कागदीपत्री मात्र वरकड प्रसंगी आनकूल येकासी येक हा विचार घडत नाही. वरकड मारवाड प्रांतिचा विचार तरी राजे बिजेसिंगजी आपल्या जागाच आहे. राजश्री खानाजी जाधव यानी नाव गाव मातबर होता तो मारला. पुढे धूम आरंभिली आहे. पाच सात हजार फौज जमा केली आहे. आजमेर राजश्री गोविंद कृष्ण याचे हवाला केली. त्याचा बंदोबस्त जाला आहे. मारवाडची मामलीत निकालात आली नाही. खानाजी जाधव पुढे सिरले आहेत. पुढे काये बंदोबस्त होईल ते लिहीत असो. येथील मामलितीचा विचार तरी हालाकिस्त केली होती त्याप्रा रोख तनखा हुंड्या दिल्हा त्याचा निकाल करून देत आहे. ताकीद दिवान मुसदी यासी बहुत जाली आहे. राजश्री सुभेदारानी साहित्य केले त्याजवरोन विशेष ममता संपादून घ्यावी, कारभार विल्हे लाऊन द्यावा हा विचार आहे. साहेबाचाहि दबाव बहुत पडला आहे. राजश्री माहादजी सिंदे पाटीलबावा यानी बाकीचा तगादा लाविला त्याजवरोन त्याच्या यैवजाची हुंडी पाठविली आहे. त्याचाहि यैवज निकाल करून द्यावयाची तरतूद लागली आहे. मुख्य सलुखे वर्तावे हा विचार आहे. दीर्घसूत्री कारभार. होऊन येईल ते खरे * * * * * सीद होते चरससिग आटक * * * जाऊन. त्यानी धूम केली तेथ * * * लढाई उतम घेतली चरससिंग कामास आला. हे वर्तमान आजी दरबारी यैकिले ते लिहिले आहे. सविस्तर पके वर्तमान तिकडील ध्यानास आलिया साहेबाचे शेवेसी लिहीत असों. साहेबी कृपाळू होऊन यैवज राजश्री सुभेदाराकडून देविला तो हातास येत नाही. साहेब कृपाळू होऊन सांभाळ करावयासी धणी साहेब समर्थ आहेत. लग्नामुले कर्ज जाले. त्याची वोढी बहुत. सर्व प्रकारे सांभाल केला पाहिजे. बगसिंग चंदले साहेबाचे तरफने येथ खलिता घेऊन आले त्याची भेटी राजे माधोसिंगजी याची करऊन सिस्टाचार सिरपाव देऊन बिदा केले. येथून पुढे जाठाकड जाणार. येका दो रोजात कूच करून गेलियावरी साहेबाचे शेवेसी लिहीत असो. विशेष काय लिहिणे ? कृपा वरधीमान केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*This news-letter describes the situation in Northern India giving movements of various powers—the English, Jats, Rajputs, Sindia, Holkar, and Khanaji Jadhav. It also refers to a skirmish in which one Charassing lost his life.*

4228

*No. 108]* *[End of 1765*

श्री

सेवेसी विनंती विशेष इकडील वर्तमान तर श्रीमंत बराणपुराहून कूच करून हांडेयाचे घाटावर नर्मदातीरी आले. मकडाईचे ठाणे हस्तगत केले होते. फिरोन कालीभीत मकडाईवाल्याची व निमे मुल्क ऐसे सरकारात घेऊन मकडाईचे ठाणे फिरोन त्याचे त्यास दिल्हे व जुगराज म्हणोन नर्मदेतच ठाणे चिरेबंदी चांगले मजबूद मिलांकडे होते ते घेऊन सरकारांत ठेविले. राजश्री माहादजी सिंदे याणी नर्मदातीरी भेटी यावे ते आले नाही. राजश्री नारोशंकर याणी पांचलक्ष रुपयाचा भरणा सरकारांत केला. तो ऐवज त्यांस द्यावा तो दिल्हा नाही. नारोशंकर येथे करारमदार करून गेले त्याप्रमाणे माहादजी सिंदे यानी चालावे तेहि जाहाले नाही. त्यावरून सिंद्याचे मुलकाची जप्ती करावयास राजश्री खंडेराव बंलाल याजबराबर पांच हजार फौज देऊन रवानगी केली, तों मल्हारजी होलकर यांचे पत्र आले कीं इकडे मोठी मोठी कामे करावयाचीं आहेत, लाहानसाहान कामासाठी गुंतो पडतां तर न पडावे. जवाहीरमल जाट याणे मल्हारबासी लबाडी केली. त्याचे पारिपत्य करणे जरूर. अनयासे माधवसिंगाचा त्याचा बिघाड होता. लडाई परस्परे जाहाली. जाटाची फौज मोडिली. त्यावरून यांसहि थोडेसे बल फावले. त्यास महादजी सिंदे व मालजी होलकर यांस पुढे फौज देऊन जाटावर पाठवावे लागतात. भेटीस नर्मदातीरी पाठवावे तरी इकडील मोठे मसलतीची कामे बुडतात. स्वामहि जवल आल्याने जसी मर्जी असेल त्याप्रमाणे भेटतील. स्वामीबराबर मातबर फौज तोफखाना यांचा खर्च असेल याजकरितां येथेहि खर्चाची निकडच. परंतु सावकाराची मैनोती[1] करून कर्ज तीन लक्ष रुपये घेऊन सिरोंजेस भरणा करविला आहे. तेथे स्वार पाठऊन घ्यावे. आणखी उदेपूरवाल्याकडून पांच लक्ष रुपये देविले आहेत तेहि लवकरच प्रविष्ट होतील. त्यावरून मर्जी थोडेसी फिरली. राजश्री विष्णु महादेव व सदासिव गंगाधर व सर्व कारभारी याणी अर्ज करून तूर्त जप्ती राहविली (अपूर्ण)

¶*The letter reports that Raghunathrao who has started north, has been asked to press onward with all possible speed, as hostilities have broken out with the Jats.*

---

१ रोख पैसे देतांना केलेली कपात.

No. 109] [1-1-1766

पौ छ १९ रजब सन सीत

श्री

विनंती उपरी. श्रीमंत राजश्री सुभेदार साहेबाचे कूच्य माघ वद्य ९ बुधवारी जाले. सिंदनदीचे तीरास मुा आहे. राजश्री मालजी होळकर मुा मजकुरी येऊन दाखल होनार; आम्ही समागमे आहोत. प्रस्तुत सरदारासी गोहद्चा शह आहे. पांच येऊन रदबदली करितात. रांगडे अंगासी अंग लागल्याखेरीज देहावर येत नाहीत. थोडकियाच रोजात गोहदेचा प्रकार उरकल. उपरांतिक भदावर कछवावारचा बंदोबस्त कर्तव्यांत आहे. प्रसंगानरूप घडून येईल. तुम्ही झासीचा बंदोबस्त उतम रीतीने राखून बहुत सावधपणे असणे. बुरजाचे काम किती जाले, राहिले किती हे तपसीलवार लिहिणे. हवेलीचे काम पडले झडले नीट करावयाबदल समक्ष सांगितले होते. कारखाना भारी आहे. हवेलीची मरंमत[2] येथास्थित करून पूर्ववतप्रमाणे सिध करणे. आनखी जागा लाखलिंप करावयाची ते करणे. शहरची चौकी पाहाराची खबरदारी व दिवसाची मार्गाची चौकी ठेऊन मार्ग सुरळीत चाले. दिवसेंदिवस झासींचे वस्तीची मोठी भरभर आहे. रात्रंदिवस जपून चौकी पाहरियासी कोठे नून्य न पडे तो प्रकार केला पाहिजे. वोडसेकराकडील वर्तमान आणोन लिहीत जाणे. वोडसे झासीमधे वाटेस खतरा जाला. त्याची तहकिकात खंगारासी सांगोन ठिकाणीं लावावी लागते. शोध पुर्ता करून ठिकाणीं लागे ते करावे. होमाच्या साहित्याविशाई पूर्वी तुम्ही लिहिले होते, त्याप्रमाणे साहित्य तुम्ही केले असेल. कदाचित काही साहित्य करणे राहिले असेल तर पत्र पावताच होमाचे साहित्य यादीप्रमाणे करून होमहवन करून उरकून घेणे. दिवसेदिवस गोष्ट मागे पडते, ऐसे न करणे. आधी उरकून घेणे. से पनास रुपये दोनशा वरते जरी करेल तरी करून सांग नीटनेटके विध्य होय ते करणे. सामग्री साहित्य आहेच. दक्षणा तूप तील वरी लागतील ते लाऊन तीनशामधे करणे. लक्ष्मणभट तात्या समक्ष सांगणे ते सांगितलेच आहे, त्याप्रो करणे, चुना करावयाची चाके दोन तीन लावणे. येक दुसरे वोडशाहून आलेच असेल. येखादे तुम्ही तयार करणे. काम ज्यारी करणे. बुरुजाचे वगैर तपसीलवार वर्तमान लिहून पाठवणे. शंकर किल्याचा बुरूज भरीव करणे. मोरजंग्याची उतम ठेवणे. काम पुख्त करणे. छ १८ रजब. जे जे काम नवे केले ते आपन सांडस्वार यासी दाखवणे. शहर आबाद लौकर होये ते करणे. चौकी पाहारा स्वारी सिकारी करवीत जाणे हे विनंती.

¶*This appears to be the order of Vishvarav Lakshman to the Governor of Jhansi. He orders some sacrificial fire to be worshipped.*

१ दक्षिणेंतील पौष वा ५. २ दुरुस्ती.

4230

*No. 110*] [*3-1-1766*

श्री

सेवेसी धोंडो खंडेराव विज्ञापना ऐसीजे. येथे गतवर्षी पातशाने व फिरंगियाणी सर्वांपासून दंड रुा घेतले. ते समई सेवकापासून व समस्त ब्राह्मणापासून जबरदस्तीने रुा घेतले. हे सर्व वर्तमान सेवेसी लेहून पूर्वी तपसीलवार पाठविले होते. सांप्रत येथे फिरंगी आहेत. फिरंगियाकडून नवाब सुज्यातदौला आहे व राजे बलवंतसिंग सर्व मुलुकात अमल करितात. सर्व वसूल करून रुा फिरंगियांसी देतात. श्रीकासीयात्रेस सर्व लोक तिकडून येतात त्यापासून च(व)की व जकात जिलाची (?) बहुत दर असामीस घेतात व बहुत श्रम देतात. ती आपत्य पत्री लिहितां पुर्वत नाही. सर्व कासीद सरकारचे यांसी विदित आहे. चवकी पाहारा वगैरे उपद्रव बहुत देतात. यास्तव कृपा करून सर्वांस थैल्या पाठवाव्या कीं यात्रेचे निकासीविसी रा धोंडो खंडेराव सांगतील त्याप्राा यात्रेस उपद्रव न लागता सुखरूप जाऊ येऊ देणे. हरयेकविसी सरकारचे वाडियांत राहतात. जे कार्य सांगून पाठवितील ते करून देणे. कोणे गोष्टीविसी उपद्रव लागो न देणे. दंड रुा सर्वांपासून घेतले ते याचें वियमाने फिरोन देणे. याप्रमाणे पातशाहास व फिरंगियासी व सुज्यातदौला यासी व राजे बलवंतसिंगास याप्रमाणे सिफारसपत्रे पाठविणार स्वामी समर्थ आहेत. खासा स्वारी वराड प्रांती आली म्हणौन येथे अवाई बहुत पडली आहे. राजकारणे सर्वांकडील येऊन सेवकापासी रुजू जालीं आहेत. सुज्यातदौला व राजे वेणीबाहादूर त्याचे दिवाण यांणी स्वामीस थैल्या दिल्ह्या त्या रा गोविंद दादाजी व भोजराज शंकर व आत्माराम रंगनाथ त्रिवर्ग कारकुनासमागमे पूर्वी सेवेसी पाठविल्या आहेत. सेवेसी पावतील. फिरंगियाखेरीज सर्व राजेरजवाडे येऊन सेवकापासी रुजू जाले आहेत. वरचेवर सेवकास मनातील मनोदये लेहून पाठवीत जावा त्याप्रो सर्वांसी बोलले जाईल. फिरंगी कलकत्त्यात पूर्वी होते. सांप्रत समुद्रातन फरासीस जाहाजे घेऊन व तोफा घेऊन वीस तीस हजार जमेतसुधा येऊन दाखल जाले आहेत. त्यासी यांसी कजिया लागला आहे. फरासीस लडावयासी जबरदस्त आहेत. फिरंगियाणी मुलूक फार घेतला आहे. सुभे दोन मारून गारत केले आहेत. यास्तव फिरंगियासी बहुत गर्व जाला आहेत. अशात सत्वर खासास्वारी आली तरी उभयेतापैकी येकास हातीं धरून बंगाला सहजात घ्यावा ऐसा मनसुबा सेवकास दिसोन आला. तो लिहिला असे. आथवा नवाबास हती धरून पातशाही बंदोबस्त करावा. पातशाहांत जोर तिलमात्र नाही. आपण दिली तख्त घ्यावे हा योग दिसोन येतो. परंतु आधी बंगाला

सर करावा मग दिली प्रांती जावे. बंगाल्यात सर्व भ्रममात्र आहे. चहूकडून त्रिवर्ग कारकून सांगतील त्याप्रा फौजा बंगाल्यात सरकारच्या आलियावर सहजात बंगाला हातास लागेल. आधी काही फौज कटक प्रांती भोसल्याचा अमल आहे तेथे सिवभट साठ्या त्याजकडून आहे. त्याजपासी वीस हजार फौज सरकारची पाठवावी. खासा स्वारी श्रीकासीचे रोखे यावी. अंतरवेदीतून होळकर सिंदे यांणी यावे म्हणजे सहजात बंगाला हातास लागतो. येथे सेवकास कर्जदार निकड बहुत करितात व चिरंजिवाचा व्रतबंध जरूर केला पाहिजे. या संकटापासून दूर करणार स्वामी समर्थ आहेत. रा पौश वद्य ७ शुक्रवार हे विनंती. कर्जदार बहुत दिक करीत होते म्हणौन सरकारचे कासीद ठेवले होते. रा हुंडी हातास आलियावर कासीद रवाना केले. सेवेसी कळावे हे विनंती.

*¶Dhondo Khanderao reports to the Peshwa the extortion to which the pilgrims at Benares are being subjected by the English, Shuja and Balvantsing and requests him to undertake the conquest of Bengal and Delhi.*

---

*No. 111*] *[Written on 25-12-1765*
*[Despatched on 3-1-1766*

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब
वडिलांचे सेवेसीं

आपत्ये धोंडो खंडेराव चरणावर मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विनंती. येथील सेवकाचे वर्तमान ता पौश शुध्य १३ त्रयोदशी मंगलवारपावेतो श्रीकासीमध्ये स्वामीचे आसीर्वादेकरून सुखरूप असे विशेष. कृपा करून आनंदवली नजीक नासिक येथून आसीर्वादपत्र मुजरद कासीद जोडीबरावर सेवकास पाठविले ते श्रीमध्ये मार्गसीर्ष शुध्य पौर्णिमेस पावले. हुंडीपत्र निवल रुो सत्रासे सतर याची हुंडी पावली व पूर्वी रा नागोराम भागवत व वो रो कोनेरभट अयाचित याचे विद्यमाने पत्रे पाठविली तीहि पावली. त्याचे कलमवार जाबसाल कलमे सुमार.

हुंडीचे रुो सतरासे सतर मुदती प्रा सेवकास पावले परतु सावकारानी कर्जाचे व्याजामध्ये नले. बहुत साव-

राजकी वर्तमान सर्वत्र फिरंगी याचा अमल आहे. पातशाहाकडे माणिकपुरी आहे. गाडदी फिरंगी

कारानी मला व ब्रो रा धनराज दीक्षितास श्रम बहुत दिल्हे ते पत्री लिहिता पूर्वेत नाही. सेवटी सर्व रुो व्याजात नेले. बाकीचे तीस हजार रुा कर्ज मागावयासी निकड केली ते पत्री कोठवर ल्याहावी? सर्व अजमास देऊन यात्रेसमागमे रा गोविंद दादाजी व भोजराज शंकर व आत्माराम रंगनाथ तिघे कारकून सेवेसी सर्व अजमास हिसेब देऊन पाठविले आहेत व कितेक राजकारणी पत्रे व औशधे कासिराम व्यास वैद्य याची पाठविली आहेत. सेवेसी मागाहून येऊन पावतील. सकल येथील कचेपके सेवकाचे वर्तमान विदित करतील. चिरंजीव साता वर्षाचा जाला आहे त्याचा व्रतबंध जरूर केला पाहिजे. येथे सरकारची आश्रित मंडली बहुत. ब्राह्मण भोजनास व किरकोली दक्षेणस रुो बहुत लागतील. तीस हजार येथे ब्राह्मण आहेत. च्यार पैसे दक्षणा दिल्ही तरी बहुत रुा लागतील. याखेरीज भोजनखर्च वगैरे खर्च बहुत लागेल. कर्जदार श्रम बहुत देतात व लोक निराले हसतात की सत्वर व्रतबंध कां करीत नाहीत? यास्तव पहिले सेवकाचे अनंत आपराध क्षमा करून सकल संकटापासून दूर करणार स्वामी समर्थ आहेत. कर्जापासून मुक्त करावें व व्रतबंधास जरूर खर्चास पाठविणार स्वामी समर्थ आहेत. सरकारचे वाडियात याकडील तीन हजार आहेत. तुरकश्वार तीन च्यार हजार आहेत. फिरंगियाचे कैदेत आहे. श्रीप्रयागी किलेयात अमल फिरंगियांचा आहे. कुरा ज्याहानाबाद वगैरे येथील मुल्लकमात्र पातशाहास फिरंगी याणी भक्षावयासी दिल्हे ते घेऊन बाहवल्याप्रो पातशाहा आहेत. वरकड अंतरवेदीत रोहिले पठाण आहेत. दिलीकडे पातशाहा जाणार म्हणौन अवाईमात्र आहे. पुढे जाऊ देत नाहीत व फिरंगी जाऊ जाऊ मात्र म्हणतात परंतु इतका जोर नाही. होलकर व सिंदे वगैरे यांणी झासीचा किला घेतला. वरकड बुंदेलखंडातील मामलती करून तिकडेच आहेत. बालाजी गोविंद कालपीस आहेत. कोण्ही अंतरवेदीत येत नाहीत. सर्व मार्ग खासास्वारीचा पाहातात. सुज्यातदौला आयोध्या प्रांती आहे. त्याचे दिवाण बेणीबाहादूर व राजा बलवंतसिंग सर्व फिरंगियाचे दहशतीने आपल्या जागे धरून बसले आहेत. राजा तरी फिरंगियासी पैसे देतो. नवाब आयोधे प्रांती आहे. बाहेर सर्व फिरंगियांपुढें कांही चालत नाही. मनातून स्वामीची इछा करितात. फिरंगीखेरीज करून सर्वांची सूत्रे सेवकापासी आली आहेत. मागाहून त्रिवर्ग कारकून सर्व थैल्या घेऊन येतील. ते विनंती करतील त्याप्रा राजकारणे सेवकाकडे पाठविल्याने

स्वामीचे नाताची मुंज होईल सर्व राजेरजवाडे येतील यास्तव खर्च बहुत लागेल. प्रथम नाताची मुंज आहे. मर्जीस येईल ते पाठवावे कलम १

सरकारकिफायत उतम होईल. सर्व येश येणे, हे स्वामींची कृपामात्र पूर्ण पाहिजे. वरचेवर मनातील मनोदये सेवकास लेहून पाठविला पाहिजे त्याप्राा सर्वासी बोलेले जाईल कलावे कलम १

—दोन कलमे लिहिली आहेत मागाहून सर्व तपसीलवार विनंतीपत्रे त्रिवर्ग कारकून घेऊन सेवेसी येतील. त्याचा सांभाळ करणार आपण धणी वडील समर्थ आहेत. सर्व तपसील कोनेरपंतास लिहिला आहे त्यावरून निवेदन होईल. सकल संकटापासून दूर करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे हे विनंती. फरासिस बंगाल्यात समुद्रातून आले आहेत. त्यासी व फिरंगियांसी लडाई लागली आहे. काये होईल हे न कले. अशात लस्कर येणे होईल तरी उतम आहे. राा पौश वद्य ७ शुक्रवार हे विनंती.

¶*Dhondo Khanderao to Raghunathrao, asking for more money for his son's thread ceremony which, he says, will be much expensive owing to the large number of Brahmins at Benares. The news about the growing power of the English in Bengal and the submissive attitude of the Emperor, Suja and Balvantsing is also communicated by the writer.*

---

*No. 112*] [*Recd. 5-1-1766*

पौ छ २१ रजब सनसीत

पैाषमास.

श्री

विज्ञापना स्वामींनी पत्रे पाठविली ती पावली. भेलशांच्या वराता जाल्या यामुळे शब्द लाऊन लिा त्यास श्रीमंतास विनंती केली. परंतु आज्ञा जाली कीं ऐवज जाला तर देतील, नाहीतर नाही. त्यावरून केल्या. आता विठल सिवदेव येथें आले आहेत. निशा कसी होते ते जालियावर लेहून पाठवीन.

राजश्री बज्याबाचा मजकूर आपाचे सरंजामाचे गाव पाा भामेर येथे आहेत त्यापेकी तीनगाव जप्त, तीन हजार रुपयाचे करून हणमंतराव तमाजी कारकून सरकारचा पाठविला. आपा आल्यावर काय होईल ते लिहून पाठवीन.

4234

एकूण तीस हजार चुकले, येविसी स्वामीनी लिहिलेल्यावरून उतर पा। ते पावलेच असेल. चुकले खरे; परंतु सरासरी पाहता तोटा येणार नाहीं. शागीर्दपेशाने बाद देणे त्याची वरात याउपरी पुण्यास होत नाही. कळावें.

कोकण बराणपु(र)चे मजकुराची पत्रे श्रीमंतानी पाहून उत्तरे लिहिली आहेत त्यावरून कळेल.

नीळकंठ महादेव याचा काल जालियाचे वर्तमान लि। ते कळले. सरंजामाचे वगैरे कांही तूर्त घालमेलीचा मजकूर तूर्त काही नाही. बाजद लढाई होईल ते पाहावे.

कृष्णराव पारसनीस सावकाश नाहीं म्हणोन शहरास गेले. तेथें काल जाला असे वर्तमान येथे ऐकिले. चांगला माणूस राज्यांतील गेला. सर्व प्रकारें घरच बुडाले. श्रीसत्ता प्रमाण. हे विज्ञापना.

चिटको मल्हार याचे असामाच मजकूर लिहिला तो कळला. विनंती करून मागाहून लिहून पाठऊं. श्रीनिवासाचार्ये रोजमरेयांचा मजकूर लिहिला तो कळला. मागाहून विनंती करून होईल तें लिहून पाठऊं.

बाबा मोघे याचे वरातेचा मजकूर विनंती करून लिहून पाठवीन.

महिपतराव चिटनीस याचा संरजाम थोरल्या श्रीमंतानी जप्त केला. फौज नाही आली सो इतराजीत आहेत. सर्फराजीहि होईल. तूर्त पेचात आहेत. आमोदचे रुा त्याजकडे येणे ते पुण्याचे खर्चास आहेत. मागाहून काय ठरेल ते लेहून पाठऊ.

¶*Haripant explains to Nana Fadnis remittances of money due from Bhelsa. He also mentions some other items—the death of Krishnarao Parasnis and the confiscation of the Saranjam of Mahipatrao Chitnis.*

---

*No. 113*] [*6-1-1766 ?*

श्री

राजश्रिया विराजित राज-
मान्य राजश्री बाबूरावजी
स्वामीचे सेवसी.

पोष्ये गोपाल मुकुंद कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील ता। पौष वद्य १० पावेतो मुकाम जयपूर येथे सुखरूप असो विशेष. आपणापासून आम्ही निरोप घेऊन येथे आलो. त्यास येथे सर्वास भेटलो. वर्तमानहि सरदाराकडील सांगितले. कागदपत्रहि दाखविले त्यावरून येथे जाबसाल सर्व आपल्याकडील

फकीरबावा करितात. हे राजश्री धोंडो गोविंद याच्या मर्जीस येईना तेव्हां त्याणी भटजीकडील व बोहाराजीकडील सर्व सोडून व आम्हासहि टाकून पेरोजखान येथे मुसाहेब जाहाला आहे त्याकडेस लाविला आणि आम्हासी तफावत ठेऊ लागले. तेव्हा हे वर्तमान भटजीस कळले. ते आम्हास पुसो लागले. आम्ही यास पुसो लागलो. हे न सांगत तेव्हा आम्ही व बावानी विचार केला की कोणीकडून तरी जाबसाल होऊ. परंतु येथे पाहातां धोंडोबानी आपला मतलब करून घ्यावा आणि सरकारी जाबसालास ठिकाण नाही. तेव्हां आम्ही येथे (आज)पर्यंत बसोन खराब होऊन दोनी नाहीतसी दिसते. यास हे वर्तमान श्रीमंत राजश्री दादास लिहोन पाठवावे ते पाठऊ. परंतु तूर्त येथे जवळ सरदार असतां लांब पा(ठ)वावे म्हणोन तुम्हास लिहिले आहे. येथील अधिकारी याच्या विचारे जो जाबसाल आम्ही बोलून आलो आहो त्याप्रमाणे या सरदाराच्याच विद्यमाने श्रीमंताकडेहि जाबसाल करणे तो करावा व सरदारहि राजी राखावेसे आहे. त्यास तुम्ही लिहाल त्याप्रमाणे येथे बंदोबस्त करू. याविसीचे वर्तमान राजश्री बापूजी नाईक सेव्यास आम्हीहि लिहिले आहे व राजश्री आपाजीपंतानीहि लिहिले त्याप्रमाणे बंदोबस्त करावा. तेणेकडून सरकारी जाबसाल पटतो. कळावे. सेव्याबाबत रुपये व उंटापौ आम्ही तेथे द्यावे याप्रमाणे बोलून आलो तेव्हा येथेहि त्याप्रमाणे फकीरबावा व आम्ही मिळोन भटजीस व बोहोराजीस पल्यावर आणून रुपये द्यावे व याप्रमाणे केले असतां हा उतकर्ष साहावेना तेव्हां वकिलानी हा बखेडा केला. मग आम्ही काय करावे? आम्ही येथे आल्यावर रुपये च्यार हजार आपल्या खर्चास घेतले व आम्ही तुम्हाकडे आलो होतो तेव्हा दोन हजार रुपये फकीरबावानी देविले होते. यैसे सारे सा हजार रुपये घेतले आणि जाबसालाचा विचार पाहातां या रितीचा आहे. वरकड याविसीचे वर्तमान तपसीलवार राजश्री आपाजीपंतानी उभयता सरदारास लिहिले त्याप्रमाणे आपणहि बोलून बंदोबस्त करून पाठऊन द्यावा म्हणजे त्याप्रमाणे येथे फकीरबावा व आम्ही उभयता जाबसाल करून घेऊ आणि सर्वहि बंदोबस्त सरदाराच्या मर्जीनरूप व श्रीमंताच्या आज्ञेप्रमाणे बंदोबस्त करू. कळावे बहुत काये लिहिणे. आपणास लिहिले आहे. या जाबसालास आळस करू नये. कृपा लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

सेवेसी आपाजी नारायेण कृतानेक साष्टांग न          निलेनी लिा आहे
याचा बदोबस्त          विनती.

कागद चिटणीसाकडे कळू देऊ नये.

¶*Gopal Mukund to Baburao (Phadnis?) writing from Jaipur complains against Dhondo Govind, Peshwa's agent at the same place. The actual point in dispute is not clearly mentioned; nor can the letter be properly dated.*

4236

No. 114] [24-1-1764

पौ छ २८ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १२ माहे साबान स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून येक दोन पत्रे पाठविली होती त्याची उत्तरे आली कीं येदाचे साल स्वारी करून येणे. याप्रसंगी राहाणे योग्य नाही. त्यावरून दौलतीस उपयोगी व स्वामीची मरजी जाणून राहिलो. जे सेवा धण्याच्या पुणे होईल ते खरे. परंतु गतवर्षी मोगलावर सेवा जाली ते स्वामीस विदित आहे. आमची सरफराजी करावी ते उलटा सरंजाम काढला. मग चाकरीमेहेनत कोणी करावी येसे नवते. परंतु दौलतेवर पेच स्वामी चिरंजीव रक्षावी येसे जाणून सेवेस आलो. गतवर्षाचा भरतीस येदांचा येवज गेला. कर्जहि मिलत नाही. तरी फौज जमा जाली ते परस्परे सेवेसी विदित होईल. तीन हजार निवड फौज जमा जाली. गैरवलणे रोजमन्यास पैसा नाही. स्वामीची कृपा असल्यास ईश्वर प्रांतै[1] लाविला पुढ पाये दृष्टीस पडतील तो सुदीन असे. चिरंजीव नरसिंगराव स्वामीपासी आहे. स्वामी कृपा करीतात त्याहावे येसे नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vithalrao Shivdeo pleads his inability to undertake a new expedition as he has not been fairly treated.*

---

No. 115] [5-2-1766 ?

श्री

श्रीमंत राजश्री बावा स्वामीचे सेवेसी.

स्नो सदाशिव बलाल साां नमस्कार विनंती येथील. कुशल ताा माघ वाा १० बुधवार मुाा फरुखाबाद येथास्थित असे. स्वामीची आज्ञा घेऊन उदेपुरी कर्ज येणेबदल स्वामीची ताकीद राा गोविंद कृष्ण याचे नावे व प्रधानाचे नावे नेली होती. त्यास राा गोविंद कृष्ण तर तेथे नवते. प्रधानास पत्र देऊन येक आसामीवर तीस हजार रुपये होते, पैकीं दाहा हजार त्याणें

---

१ शेवट.

देऊं केले. त्यामधे नकद व जिनस मिलोन रुपये ३००० रोख दिल्हे; व सात हजार रुपयाकरितां येक राऊत त्याणी ठेऊन घेतला. आम्ही जलदी करून नवाब कायेमखाजीकडे आलों. मागून चिरंजीव वासदेव स्वामीचे शेवेसी येऊन ताकीद दुसरी रा। गोविंद कृष्ण यांचे नावे पाठविली होती. इतकें वर्तमान आले. त्याउपरी उदेपुरीहून येक रुपया न आला. पंनास हजार रुपये मुदल येणें; परंतु याप्रकारचे वर्तमान तेथील आहे. स्वामीस विदित व्हावे याजकरितां लिहिले आसे. दुसरे वर्तमान स्वामीनी व राजश्री पंत प्रधान स्वामीनी नवाबास पत्रें लिहिलीं. त्यामध्यें शेवकाची सोयरेधायरे यैसी पूर्वी लिहिली होती; त्याप्रो राजश्री नारो शंकर याणी लिहिले कीं श्रीमंताचे सोयरे आहेत त्यावरून दोनशे स्वारांचे दोन आमीर येमुनापावेतो नगारा शुत्री[1] व अस्पी[2] येसे सामोरे आले. शेवकानेही जरूर जाणोन पंनास साठ राऊत नवे चाकर ठेऊन, नगारा अस्पी व निशान भगवे करून नव गाऊ येमुनापार आपले अंमलात आहें, तेथून येमुनेचे दक्षणतीरी त्यांची भेटी जाली. त्याउपरी च्यार पांच मजल आमचे तैनातीमधे फरुखाबादपावेतो आलों. दोन कोश शहर राहिलें. तेंव्हा प्रधान बक्षीश श हजारी मनसबदार त्याचा भाऊ व सलाबतखान व्याही येसे दोघे आणीक सामोरे आले. त्यास प्रथम दिवशी महमूदखान कुल अखतियार दिवाण आहे त्यांची भेटी जाली. मेजमानी निराळी आली. त्याउपरी वसंत पंचमीस उतम मुहूर्त होता, ते दिवशी नवाबाची भेटी जाली. तेव्हा नवाबहि उठोन भेटले. बहुत कृपा करून सर्व वर्तमान पुसिले. त्यास शेवकाने स्वामीचे जुबानी सांगितले की मोठा वास्ता येथे यावयाचा, श्रीमंत राजश्री बाबाहीं तुमचे येखलास वृद्धि व्हावी बदल येजमानास विनंती करून पाठविले. त्यावरून स्वामीसी बहुत खूश जाले. तेच दिवशीं मेजमानी नवाबाची आली. आता कांहीं खर्चाची तजवीज त्याणी केली आहे तेही आज उद्या येईल, त्याउपरी लिहिले जाईल. परंतु स्वामीकडील मुनशीनें कांही अधिक उणे आमचा मरातब लिहिला होता, त्यास हस्तदोश सांगून गोष्ट उडविली. आतां मसवदा पाठविला आहे त्याप्रो लिहिलें पाहिजे कीं श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे लिहिल्यासी व स्वामीचे लिहिल्यासी येकवाक्यता दिसोन येईल. पहिले स्वामीनी शमशेरखानाचे नावे पत्र सरकारचे देविले होते, त्यास शमशेरखान आता घरीं बसले. कारभार कुल अखतियार महमूदखानाचा आहे. स्वामीचे येक पत्र नवाबास व येक पत्र महमूदखानाचे नावे यैसी दोन थैलीत घालून लाखोट्यावर मोहर करून खुलाच पाठविला पाहिजे.

---

१ उंटावरचा २ घोड्यावरचा, (फारसी) अस्प=अश्व.

4238

डीग येथे वाचून पाहून लाऊन देऊं. परंतु दोनही पत्रे खुलींच पाठविलीं पाहिजेत. व चिरंजीव वासदेवपंत रायाजी पवार याजपाशीं होते ते गंगेकडेस आहेत कीं स्वामीचे शेवेसीं आहेत हे लिहिलें पाहिजे. विशेश काये लिहिणे कृपा वृधि केली पाहिजे हे विनंती.

¶*Letter from Sadashiv Ballal, who appears also in the regime of Bajirao and who is mentioned as being related to the Peshwa by marriage and who is sent on a mission to the Bangash Nawab of Farrukhabad. The paper mentions the hospitable reception given to the embassy by the Nawab. The addressee Bawa may be Gangadhar Yashwant Chandrachud.*

---

*No. 116*] [*10-2-1766*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री गोपालराव गणेश कादार
पा नेमावर स्वामी गोसावी यासी

सेवक नारो शंकर कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तुम्हाकडून पा मजकूरचा ऐवज येत नाही म्हणौन विदित(जाहाले) तरी साल गुाची बाकी सनवात(?) बाकी सुधां साल मजकूरचा ऐवज झाडियानिसी चिरंजीव राजश्री विश्वासराऊ याजकडे भरणे. याउपरी दिरंग लाविलिया उतम नाही. रा छ २९ साबान बहुत काये लिा हे विनंती.

¶*Naro Shankar asks Gopalrao Ganesh Barve to pay off the dues to Vishwasrao Lakshman without any delay.*

---

*No. 117*] [*Date of Receipt 12-2-1766*

पो छ रमजान सन सित
फाल्गुन अशेरचा मुकाम

श्री

शेवेसी विज्ञापना. मनसबियांचे प्रकार अगोधर शेवेसी लिहिलेच आहेत. स्वकार्य साधून पैसा मिलणे आणि बंदोबस्त होणे. मनसबे तीन, येक पातशाहास अपल्यापासी आणून दिलीस तख्तावर कायम करावे, मग जाटाकडील

रोहिल्याकडील वगैरे मुलुख खालसा आहे तो सोडऊन मुलुक पैसा मिळेल तो निमेनिम घ्यावा, आपला मुलुक साबीक दस्तुर सोडवावा हे काम थोर व लौकिकाचे आहे त्याची तजवीजहि केली असे. मोगलाई कारभार सुस्ती बहुत, दिवस थोडे राहिले, बनोन येईल त्यास चुकत नाही. परंतु तूर्त पैसा नाही व आपली कामे डौलाखाली होतील ते मात्र करावी वरकड, बंदोबस्त जालिया सहजात होतील. दुसरे कार्य आहमदखान बंगस व हाफीज उभयेतास नतीजा देऊन आंतरवेद सोडवावी. आर्थसाधन होईल ते करावे. हे कार्य जरूरीचे आस्ताहि बुंधेलखंडचे कामामुळे आजपर्यंत गुता जाला. प्रस्तुत ग्वालेर प्रांतात गोहदेनजीक आलो. पछोरचा निर्गम केला. गोहदकराचा जाबसाल लागला आहे. येथील व भिंडेचा मजकूर उरकोन हरयेक मनसबा कर्तव्य. हांगामाचे दिवस घरच्याच कामात गेले. हेहि करणे आगत्य जाणून सरकारी मुलुक कमबेश येका क्रोडीचा सुरलित जाला. उभे राहावयासी आपल्या लोकास ठिकाणे मुस्तकीम जाली. झासी मोट व किरकोली व मजबुत ठाणी उपयोगी बहुत सुटली. काही तहाने आली. कोण्ही बदमामली केली त्यासी तोफा लाऊन पारपत्य पुरते करून स्थल हस्तगत केले. यणेप्रमाणे तमाम बंदोबस्त देखील डंघाईचा जाला. श्रीनगरचे ठाणे मात्र हस्तगत होणे तेथेहि प्रस्तुत राजश्री गंगाधर गोविंद त्याजसमागमे तोफाची रवानगी केली आसे. बुंधेलखंडात छावणी व आलीकडे साल आखरीस आले तेव्हा जागा कायेम होऊन सरकारच्या मामलेदाराचा आमल करून दिल्हा. येवजाचाहि दारमदार त्यांचे मारफातीनें ठहराऊन जिमा यांचा केला असे. आम्ही यावछक्ति श्रमसाहास करून पूर्ववतप्राा जागा सोडऊन देखील ठाणे जात सुरलित करून दिल्हे. यावर मनास आणून बंदोबस्त करणे. कराराप्रमाणे पैसा घेणे येख्तियार खावंदांचा आहे. या कार्यामुळे आंतरवेदचे बंगस वगैरे कामास दिवसगत लागली. आत:पर गोहदचे काम करून हरयेक थोर मनसबा करावा या तजविजींत असो. तिसरे काम जवाहीरसिंगाचे. तूर्त तोच रूख आहे. आणि पैशाचीहि जागा याप्राा दुसरी नाही. येविसी राजे माधोसिंग यांची पत्रे वारंवार येतात. ते आनकूल व नजीबखानास तो फारच इष्ट त्याचे सरलभाव पहिल्यापासून आहेत. येकदोन वेला विनंती पत्री लिहिली आसे. नाहरसिंग आपल्यापासी. हे त्यांचे घरातील मूल व सर्व जाट यांसी राजी राजकारणे राखितात. उपयोगी आहेत. त्याजकडून आपला येवज कराराचा येणे. पुढे ही पैशास ठिकाण जाला पाहिजे. या लक्षावरी तिकडून पातशाहाकडील जाबसालहि तेथेच आणविला. त्याजला आंगरे हस्तगत करणे यहुकडून तजवीज करीतच आसो. गोहदेचे काम करून चमेल उतरता म्हणजे

सर्व निदर्शनास येईल त्याप्रमाणे जाटाचे पारपत्याची तजवीज केली जाईल. पैशाची जागा यासारखी दुसरी नाही. जसे नेट पडेल तसा पैसा आकारून येईल. येकूण तीन मनसबे आहेत. सरकार कामामुळे इकडे गुंता पडून दिवस थोडे राहिले. श्रीइछेने व खावंदाचे पुण्यप्रतापेकरून राहिल्या दिवसात यावछक्ति होईल त्यांत आंतर होणार नाही. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Gangadhar Yeshwant explains the three objects that directed the policy of his master, Malharrao Holkar, in the North after the disaster of Panipat. The first, that has now been achieved, was the reconquest of Bundelkhand which offered a sure basis to strike further North. To reduce the growing power of the Jat and punish the treacherous Rohillas are the other two aims which now engage his attention.*

---

*No. 118*] [*Recd. 12-2-1766*

पौा छ २ रमजान सन
सीत सितैन फाल्गुन मुा अशेर

श्री

सेवेसी विज्ञापना. खासा स्वारी दो महिनिया अलीकडे हिंदुस्थानात येते, खर्चास लौकर असिरीच्या सुमारे पाठवावे, आम्ही छावणी कोठे करावी, च्यार रुपये आकार कोणे ठिकाणी होऊन सविस्तरे ल्याहावे. सारांश आर्थसाधन होऊन कासी प्रयाग व सांबीक[१] मुलुक हस्तगत व्हावा, मातबर तोफखाना जंगी सामान आहे. आपली पत्रें न आल्यामुळे तिकडील मजकूर ध्यानास येत नाही अथ:पर सर्वदा पत्र पाठवीत जावी म्हणौन आज्ञा. ऐसियासी खासा स्वारी जलद यावयाचे विदितच होते. आत:पर दिवस राहिले नाहीत. भोसल्याकडील वगैरे ते प्रांतीचे गुंत्याकरितां फालगूण मास लागेल. पुढे छावणी कर्तव्य नर्मदे-अलीकडे येमुनाचेमलपावेतो जागा आपली कौलीच आहे. कोण्ही किरकोळी राहिले असतील ते येताना सरल होतील. चितास येईल तेथें छावणी करावी. देशीहून गुंता उरकल्यासारखे सोईप्रमाणें छावणीचीहि योजना होईल. ऐवजाचा मजकूर तर एक दोन वेळा सेवेसी लिहिला आहे. आल्यादिवसापासून लढाई खेरीज आठवडा लाटला नाहीं. फौजा व तोफखानियाचा खर्च भारी.

---

१ पूर्वील.

माहालाचा ऐवज व कांहीं स्वारीपैकी मिलोन स्वारीखर्च पुरी पडता प्रयास जाले. मागील देशी नालबंदीबाबद येवज लोकाचा देणे. सिवाय हलीं बुंदेलखंडात छावणी करून अलीकडे साल अखेरीस आले. केवळ कर्जासी संमध. एक स्वामीकार्यावर दृष्ट देऊन नाना प्रकारच्या आफती सोसून मुलुक जागा कायम केल्या. संस्थानिकाकडे कांही दारमदार केला. त्यापैकीं घासदाणियाचा मात्र ऐवज घेऊन वरकड जिमा मामलेदाराचा करून देत गेलो. खाईखती दंड समान यामुळें पैसा कारस्थानीने कराराप्रमाणे देतील. निकस करावयासी कमी केली नाहीं. पैसा उत्पन्न होऊन रवाना करणे यापेक्षां विशेष काय ? यावर मामलेदारांनीं निकड करून कराराप्रमाणें ऐवज घेऊन सरकारात पावता करावा येविसी ताकीद केली आहे व हाजुरीहूनहि व्हावी. वरकडहि तजविजीस अंतर जाले नाहीं. सर्व खावंदाचे ध्यानांत आहे. उदेपूर येवजी दहा लक्ष देविले. त्यापैकीं एक लक्ष रुपये सरकारांत रवाना जालियाची पत्रे आली. फिरूनहि ताकीद करीतच आहो. आगमागे त्या ऐवजास खता नाहीं. शह दूर पडल्यामुळे येवज निपजतो तो परभारेंच जातो. सकारांतूनहि ताकीद असावी. गोविंदपंत सरकारचे मामलेदार सालस जाणोन त्याजवर इतबार दिल्हा. इकडून कोण्ही ठेविल्यानें फितूर होईल या अंदेशे बोल्ड लागल यास्तव त्याच्या मनोगतानरूप नेमणूक वगैरे करून देऊन रवानगी केली. सर्व फरशा करोन घेतो म्हणून करार केला आस्तां परिणाम या प्रकारचा जाला. त्याचे पुत्र हुजूर आले ते तो ऐवज आम्हाकडे दिल्हा म्हणतात. त्यास आमचा प्राा पुढे व रामपुरियाचे तालुके त्याजकडे इजारा त्याचा ऐवज दरसालचा झाडून द्यावा, त्याची बाकी दाहा रोजांत निर्गम करून द्यावयाचा करार करून गेले असतां निमे पैसा दिल्हा नाहीं आणि हली नजरेच्या ऐवजातून पैसा वसूलात न आला. लाख रुपये मात्र सरकारांत पाठविले. सारांश त्याजवर शह पडल्याने पैसा येईल. वरकड थोर मनसबे घडोन आलिया मुलकाचा वगैरे बंदोबस्त होऊन पैश्यास जागा होईल. मातबर तोफखाना जंगी सामान सहवर्तमान स्वारी हिंदुस्थानांत येणे विहि(त)च आहे. इकडील वृत पैदरपै शेवेसी लिहीत गेलो. पुढेहि जाले वर्तमान वरचेवर विनंती पत्रें रवाना होतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Gangadhar Yeshvant in reply to Raghunathrao says that he may encamp anywhere in the North upto the Chambal as the whole province has been brought under subjection and that he (the writer) has issued instructions to all Mamledars to collect the revenue dues and to pay them into the Government treasury.*

4242

*No. 119*] [*19-2-1766*

श्री

शेवेसी त्रिंबक कृष्ण दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. बातमीचे वर्तमान तरी जवारसिंग जाठ छ ६ रमजानीं कुंभेरीहून कूच केले भरतपुरी आलेयानंतरी भरतपुरचे बागांत वाग होता त्याची सिकार करून वाग मारला आणि सायंकाळीं किला दाखल जाहला. किल्याचा बंदोबस्त करविला आणि छ ७ रोजीं दीडप्रहर दिवसास कूच करून कुंभेरीस गेले. सबब की मुल्नामोर्साम याची बिदा केली नवती आणि वागाचे सिकारीकरिता जलद आला. वागास मारून माघारा गेला. हतीची लडाई करणार होता. याजकरितां माजोरी हती तयार करून आणिले परंतु लडाई केली नाही. जलद गेले. आणि येक जोडी हतीची मात्र थोडीशी लडविली, नी गेलेत. शिकार खेळत वाटेन गेले. सायंकाळीं दिवस मावळतां कुंभेरीचे किलेयांत दाखल जाहले. लोकांचे मजुरे होऊन दोन घटका बसोन जणानखानेयात गेले. ते सकाळचे तीन घटका दिवसास उठले. रात्रीस गिलज्याकडील बातमीचे पत्र आले तें प्रात:काळीं वाचिले. त्याचा मजकूर की गिलज्या बियास नदीवर आहे. सीक लागले आहेत. आणि शहानें नजीबखान रोहिल्यास खलते पाठविले कीं सात वर्षांचा पैका घेऊन येणें. त्यास नजीबखान याणे आपले जागां विचार करीतां पैका तो नाहीं आणि रिकामे जातां बरें होणार नाहीं. याजकरिता रामेरेयाचे घांट येमुनापार थोडीसी फौज मात्र उतरली आणि शहास लिहिले की येतों. याजप्रमाणे तेथील वर्तमान आले आहे. जाठाचे वकील दिलीस पावले आणि महंत शडुल पडवल येथें आहे. याजप्रमाणें तिकडील वर्तमान आहे. यानंतरी जवारसिंग सकाळीं उठोन घोडी फेरली आणि दरबार जाहला. दानसाहा वगैरे मजुरेयांस आले. मजुरे होऊन जाठाने किलेयाची मरामत जलद करवितो आहे. आणि किलेयात घांसदाणा वगैरे सरंजाम जलद करविला आहे. याजप्रमाणें साहेबांस कळावें. शेवकाजवळ कासीद नाहींत तरी पाठवावयाची आज्ञा करावी, आणि खर्चासही नाहीं तरी साहेबीं पाठवावयास आज्ञा करणार धणी समर्थ आहेत. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ति. रा छ ९ रमजान.

¶*Trimbak Krishna Kanitkar, the Peshwa's agent at Bharatpur, quoting a diary kept by Javahirsing Jat, describing his favourite pastime of hunting. Incidentally the writer reports the contents of a letter from the Abdali to the Jat Raja.*

*No. 120*] [*22-2-1766*

पैा छ १२ रमजान सन सीत

श्री

विज्ञापना श्रीमंत राजश्री दादासाहेब हिंदुस्थानांत गेले. पूर्वी लिा आहे. श्रीमंताच्या व मोगलाच्या भेटी याच तलावर जाल्या. काल येकादसीस श्रीमंत मोगलाचे डेन्यास गेले होते. आज नवाब येथे येणार. परस्पर रसायण चांगले जाले. पंधरा लक्षांची जागीर मोगलास दिल्ही. माहाल मागाहून लिहून पां. दोन च्यार मुकाम येथे होतील. तदोतर घाट चढोन वरती फौज येईल. श्रीमंताचे मानस विसाजीपंत बिनी याजसमागमे फौज लाऊन आपण गंगाति(रा)स जावे. कोकणात वसईकडे जावे असे आहे. घडेल ते लिहून पाठऊ. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes about an interview between the Peshwa and the Nizam and the departure of Raghunathrao to the North.*

---

*No. 121*] [*28-2-1766*

पो छ २७ सवाल.

मुा

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे शेवेसी

विनंती. सेवक रामचंद तुकदेव चेरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता फाल्गुण वद्य ४ चतोर्थीपरियेंत साहेबाचे प्रतापेकरून मुा सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर * * * * आज्ञापत्री * * * * * * *. बहुत होतो. त्यासी परस्परे वर्तमान आले कीं राजश्री जाणोजी भोसले येऊन भेटिले. इकडील बंदोबस्त उतम जाला येकोन चितास बहुत आनंद जाला. साहेब पूर्ण प्रतापी आहेत. साहेबाचे प्रतापेकरून सर्व गोष्टी होऊन येतील. या प्रांती यावयाचा दबाव बहुत पडत चालिला आहे तर कृपाळु होऊन सविस्तर अर्थ लिहून सांभाळ करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. वरकड या प्रांतीचे वर्तमान तरी गुरुचे सीख दसासिंग व तारासिंग व शामसिंग येसे चार पाच सरदार यानी पंचवीस हजार फौज जमा

---

+ संबंधपत्र हरीपंत फडक्याचे हातचें.

करून पाणिपतासनिध नजीबखान रोहिले यांसी युध्यप्रंसग करून त्यासी दबाऊन थोडीबहुत मामलत करून पुढे दिलीकडे आले. जाट जोहरमल याजकडील पैगाम त्यासी होताच रामकीसन अहीर पुढे पाठऊन फौजेस खर्चास द्यावयाचा करारमदार करून पुढे येऊन येका विचारे मनसुबा भारी करावा हा डौल धरून त्यासी घरोबा केला. त्याजवरून गुरुचे सीख फौजसुधा दिली प्रांती धामधूम करून पुढे रेवाडीकड येऊन रेवाडी खालशा केली. खनते लाऊन गाव खानोन लोकाचा बहुत तसनस केली. राजे नागरमल बहुत दुख पावले. त्याची जाहगीर, काही उपाये चालिला नाही. येथून पुढे जयेपूर प्रांतात सिरोन धूम केली. * * * * * येऊन सामील जाले. याच्या त्याच्या भेटी * * * * * * * * * * व जयेचंद खानसामा पंधरा हजार फौजेनसी * * स लागले होते. त्यानी इकडील दबाव पडला त्याजवरोन पटाईत ठाकोर रतनसिंग खंगारोत यासी पैगाम लाऊन त्यासी आपलेसे करून गड्याचा असरा धरून मोर्चेबंदी करून सिखाचे फौजेवरी शेह देऊन त्याच्या मुकाबिल्यास सात आठ कोसी होते. सिखाची फौज भारी त्यानी मुलखात धूम बहुत केली. त्याजवरोन राजे माधोसिंगजी यानी राजश्री सुभेदारसाहेब व राजश्री माहादजी सिंदे पाटील साहेब याजकड पैगाम लाविले.

*(Incomplete)*

* * * *

¶*Ramchandra Tukdeo reports that the Sikhs defeated Najib and have advanced as far as Delhi, pillaging Madhosing's territory round Rewadi on the way. The Rajputs while strengthening themselves in their forts have called in Sindia and Holkar to their succour.*

---

*No. 122*] *[19-3-1766*

पौ छ ९ सवाल

श्री

सेवेसी सदासिव गंगाधर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल चैत्र अधिक शुध्ध ९ पर्यंत मुकाम सिरोंज स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते मजल दरमजल मुकाम मजकुरी आलो. येथूनहि दर मजल राजश्री माहादजी सिंदे यास आणावयासी जात असो. ऐसियासी सिंद्याकडून रा सिवाजी विठल आले ते मुकाम मजकुरी भेटले. यानी तेथील मजकूर सांगितला कीं श्रीमंतानी जसी केली होती ते तेथ कळली नाही. परंतु सिंद्याचा भाव सर्व प्रकारें श्रीमंताच्या लक्षाव्यतिरिक्त नाहीं.

क्षेपनिक्षेप भेटीस येत होते. त्यास राजश्री माहादजीबावाचे लग्न फाल्गुन वद्य ९ स जाले. उपरांतिक यावे तो जाट तीस हजार फौजेनसी रूपहासावर अल्याचे वर्तमान आले. रा सुभेदाराकडून तावजी कदम दोन तीन हजार फौजेनसी बातमी करिता गेले होते. त्यासी जाटासी गाठ पडली. त्यानी कदमास सारिले. सेदोनसे माणूस पडले. त्यावरून सुभेदारानी तीा राजश्री तात्या व सिंद्याकडून बाजी नरसी यासमागमे बारा तेरा हजार फौज देऊन रवाना करून आपणहि गोहदपासोन पाच सा कोस पुढे गेले. राजश्री माहादजीबावास आत्याग्रहे राहाविले कीं आठा रोजात जाटाकडील मजकूर कैसा घडोन येतो त्याजसारिखी तुमची श्रीमंताकडे रवानगी करू यैसे बोलून राहविले त्याजवरून राहिले. सुभेदारांचे लक्षहि स्वामीचरणी विशेष. श्रीमंतानी सत्वर यावे येसे बोलतात म्हणून कितेक तपसिले सांगितले. त्याहीवर आम्ही भारी मजला करून दिवस न लागता सत्वर जाऊन पोहचतो. तेथे गेल्यानंतर स्वामीचे पुण्यप्रतापेकरून सिंद्याकडील व राजश्री सुभेदाराकडील जाबसाल अमलात आणून सिंद्यास सेवेसी घेऊन येतो. वरकड वर्तमान राजश्री विष्णुपंतानी विस्तारे लेखन केले आहे त्याजवरून ध्यानास होईल. स्वामी अवताररूप पुण्यवान तेजाने दाबाने मनसबे चितात धरले ते सेवटास जातात. स्वामीनी आज्ञा केली त्या प्रा जाऊन राजश्री मल्हारजी बावाची मर्जी स्वामीसी ठीक राखितो आणि सिंदे घेऊन येतो. दुसरे आम्ही आज्ञिप्रो आहो. कोणी काही वाकडे समजावितील तेणेकरून मर्जी फिरेल त्यास वाकडे समजावितील ते चितात न आणावे. सेवक पदरचे असोन जेणेकरून मर्जी प्रसन्न राहे आणि दाबाने कार्य होये येसी चाकरी बज्याऊन आणू. शेवेसी शृत होय हे विज्ञाप्ति.

¶*Sadasiv Gangadhar writes to Raghunathrao of a set-back given by the Jats to a Maratha contingent in consequence of which another strong army has been dispatched without delay to the spot.*

---

*No. 123*] [*19-3-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ७ सवाल पावेतो साहेबाच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष.

4246

साहेबी दोन तीन आज्ञापत्रे सादर केली की जलद येऊन खासा स्वारीस सामिल होणे, आणि सिंदे येत आसिले तरी घेऊन येणे आणि नसिले येत तरी तैसेच येणे. त्या आज्ञेप्रमाणे निघून मोगलसराईस दाखल जाहालो तो राजश्री मल्हारजी होलकर याजकडून भिकाजीपंत कारकून व सिंदे याजकडून बाबूराव राम यैसे उभयेता न्याहावयासी आले. त्याजवरी राजश्री विष्णू महादेव आपली आज्ञा घेऊन आजीच मुकाम मजकुरी आले. त्याजपासीहि जावयाची आज्ञा होती, त्याजवरून माारनिले व आम्ही कुच्ये करून उभयेता सरदार याजकडे गेला. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Shankar to Raghunathrao informing him of his arrival at Mogalsarai according to his orders.*

---

*No. 124]* *[21-3-1766*

पौ छ ९ सवाल

श्री

श्रीमंत रा दादासाहेब समर्थांच्या पदांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृष्णराव गोविंद सा नमस्कार विज्ञापना. ता अधिक शुध ९ सिरोंजीहून कूच करून पुढे गेलो जाणोन येसिजे. स्वामीची आज्ञा घेऊन त्रिवर्ग शणवारी स्वार जालो तो मजल दरमजल अष्टमीस पावलो. मार्गी भुपालवालियाचा मुलक वैरान, गिरासियाचा हगामा फार. समर्थांचे पुण्यप्रतापेकरून येथवर सुखरूप पावलो. पुढे जे अद्रुष्टि आसल होईल ते लिा जाईल. रा सिवाजी विठल सिंदियाकडून आले त्यानी सविस्तर वर्तमान पा माहादजी बावाचे वर्तनुकेचे सर्व सांगितले की माहादजी सिंदियाचे लक्ष स्वामीचे पायाविरहित दुसरे नाही. च्यार दिवस माहादजीबावानी लग्न केलेयामुले अटकाव जाला. लग्न जालियावर रा मालजी पा होलकर व गंगाधरपंत तात्या याजला समागमे देऊन माहादजी सिंदियासी सुभेदाराने रवाना केले. येक मजल कूच करून आले दुसर रोजी कूच करावे तो ठाखर ? फौज सुभेदाराकडून जाटाचे फौजवर गेली होती ती फौज जाटानी माघारे घातली दोन तीनसे माणूस मेले व जखमी जाले. हे वर्तमान आलियावर पंधरा हजार फौज सुभेदाराकडील रवाना जाली. रा गंगाधरपंत तात्यास फौज देऊन बाजी नरसिंह सिंदियाकडून फौज घेऊन गेले. हलदीचे अंग माहादजी सिंदियाचे म्हणोन सुभेदारनी जाऊ न दिल. स्वामीच्या पुन्यप्रतापेकडून हे वेल फार करनी गंगाधरपंतास येश येईल म्हणजे सर्व बंदोबस्त हिंदुस्थानचा सिंदे व होलकर व स्वामीचा आहे. स्वामीनी आसीर्वाद व कृपा अवलोकनेने

लक्ष या वेळेस या सरादाराविशई श्रीत्रिस्त्ररापासी ममतेपुरस्कर ध्यानात मागावे. तेणेकडून फते होईल. येत्रज सिंदियाकडील पाच लक्षाची तजवीज झाली. पैकी सवा लक्ष सुभेदाराकडून कर्ज घेतले. पावणेच्यार लक्ष रुपये उजिनी वगैर महालावर नेमुनिक केली. येकून पाचा लक्षाची निशा कागदी विष्णुपंत बाबाचे गुमास्तियासी लेहून पाठविली. त्यास विष्णुपंताचा गुमास्तियाची निशा ठीक जाली व पत्र ठीक आले म्हणजे साडेतीन लक्ष रुो विष्णुपंतानी सरकारात दोन नगद व दिढाची वरात दिधले ते वजा होऊन दीढ लक्ष रुपये बाकी सरकारात विष्णुपंत देतील. परंतु या येत्रजाचा निकाल माहादजी सिंदियाचे भेटी आती नेमस्त होईल. गुंता नाही. पाच लक्ष रुपये रा नारो शंकर नानासहि देतात. माहादजी अन्येन शरण असेत. सुभेदाराचे माहादजी सिंदियाचे मानस की श्रीमंतानी जलर्दीने कुमक करावी. खावंधेच्या पुन्यप्रतापेकरून येश येईल. तर खावंदानी कूच दरकूच लांब मजलीने कुमक करावी. यावेळेस उपेक्षा न करावी. तीन लक्ष रुपये सुभेदारानी सिरोंजेवर जमा करविल. येथे गेवज न पटला म्हणोन दोन लक्षाची हुंडिया इंदुराहून अवरंगाबादेच्या आणविल्या व येक लक्ष रुपये सिरोंजवर देविले. त्यापैकी ( अपूर्ण )

¶*Krishnarao Govind assures Raghoba of Mahadaji's fealty.*

---

*No. 125*] [*21-3-1766?*

श्री

**श्रीमंत माहाराज राजश्री दादा**
**साहेब स्वामीचे शेवेसी**

विनंती सेवक आपाजी गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील ता आधिक शुध दशमी मुकाम नजीक वींसनगर माहाराजाचे कृपावलोकनेकरून सुखरूप आसो. विज्ञापना ऐसीजे. इकडें आल्यातागाईत जाले वर्तमान वरचेवर सेवेसी विनंती लिहिलीच आहे. प्रथमपासून आमचा विचार की सरकार सनदेप्रमाणे रा गोपालरायानी वर्तणूक केल्यास, आपल्यापासून अंतर पडो न द्यावें म्हणोन राजश्री सेनाखासखेल समशेरबाहादूर याची पत्रे आली कीं गोपालराव आमदाबादचे जाबसालास येतात, तुम्ही येणे. त्यास आम्ही इकडे आलों. मागे त्यानी महमदाबादचे मुकामी आमचे फौजेवर घालविलें. त्याजवर त्यास अहंता जाली की याचे पक्षपाती गायेकवाड आहेत. त्यासीच कंबर बांधल्यास आपले कार्य जाले येसा कोता अंदेशा करून, वीसनगरास येऊन

बाबीस सामील जाले. त्याजकडील सलुख अगोधर जाल्यात आला होता. इतक्यांत त्याजला भर भरिला की गायेकवाडास येथून उठऊन देतो. याजप्रकारें येक मास काढिला. आज लढाईस येतो, उदईक येतो ऐस्याप्रकारें कोटाचे आश्रयानें आहेत. काही भानगडीचाहि जाबसाल घालितात; परंतु बोलण्यात विश्वास पडोन तहास येत नाही. बाबीस ज्याअर्थे सामील जाले तोहि अर्थ नाही. सालमाारचा वसूल झाडून नेला. शहरची खराबी बहुता प्रकारे केली. बाबीसी त्यासी रहष्य राहाते ऐसे नाही. मास पक्षात तहास येतील, परंतु मामलतीची खराबी जाली. सरकारात रसद भरणा केला तो पैसा वसुलात न आला. अलीकडील हस्ते दीड लक्षाचे सरकारात यैवज देणे तो यैवज इकडील अमल दखल न जाल्यानें न पावला. सेवेत अंतर दिसोन येईल म्हणोन सेवेसी विनंती लिहिली असे. गोपालराव बोलतात, अंतस्ताची पत्रे आम्हास आहेत की यास अंमल न द्यावा. राजश्री सेनाखासखेल यानी पत्रें पाहाण्यास मागितली परंतु पाठविली नाहीत. आम्ही फौजसुधा येथेच आहो. सिबंदीचा पेच भारी. विस्तार लिहिता परिहार दिसेल. मासपक्षास माहाराजाचे प्रतापे गोपालरावहि तहास येतील. सर्व प्रकारे निर्वाह करणार माहाराज समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Ganesh exposes to Dadasaheb the treacherous conduct of Gopalrao Barve, who had colluded with Babi, thereby ruining the Peshwa's interest.*

---

*No. 126*] [*23-3-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक रामचंद्र तुकदेव चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता चैत्र अधिक शुध १२ द्वादसीपरियेंत साहेबाचे प्रतापेकरून मुा सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर बहुत दिवस जाले. आज्ञापत्र सादर होऊन सांप्रत आज्ञापत्री सांभाल न जाला. याजकरिता चिंतातूर असो. तरी सदैव कृपालु होऊन आज्ञापत्री कुशलवृत लिहून सांभाल करावयाविसी साहेब धणी समर्थ आहेत. वरकड या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री सुभेदारसाहेब यानी सरकारच्या फौजा राजश्री सुलतानजी लांबहाते व मकाजी लांबहाते व राजश्री संताजी वाबले पंधरा सोला हजार फौज जाटाचे मुलकात धूम करावयासी पाठविले होते. नजीबखान रोहिले याणी मनसबा करून त्याचीहि

फौज येका जागा मेळऊन पारचा मुलुक बंदोबस्तात आणावा या विचारावरी फौजा रवाना केल्या. त्यानी मुलकात सिरोन आगऱ्यापरियेंत धूम केली. ज्याटास ढवळपुरापलीकडून डीगेपरियेंत गावे मारिली. ढवळपुराजवळ जमाव करून होते. मुलकाचा उपद्रव देखोन जाट जोहरमल यानी सिखाची फौज सात आठ हजारं आपल्याजवळ ठेऊन घेतली होती त्याची खातरजमा करून खर्चाची बेहबुदी केली. बुनगे त्याचे बेढ्या च्या (?) सहागडानजीक ठेऊन सड्या फौजा करून काही तोफखाना बराबर घेऊन भरतपुरीहून फौजेच्या मुकाबिल्यास आले. ढवळपुरापासोन सात आठ कोसावरी याचा सरकारचे फौजेचा मुकाबिला जाला. सिखाची फौज पुढे मुकाबिल्यास नमूद जाली. त्याजवरी सरकारच्या फौजानी चालोन घेतले. सिखाची फौज मोडिली. सेपनास माणूस ठार जाया सिखाचे जाले. सीख पाठमोर होऊन काढाव काढोन तोफखानियावरी जोहरमल जाटाचे नजीक निघोन आले. सरकारच्या फौजा निघाले जाणून चालोन आले. त्यासी सीख आड बाजूस जाटाचे होऊन तोफखानियाचा मुकाबिला जाला. जाटाची फौज सीख येक होऊन तोफखानियाचा मार मुकाबिल्यास देऊन चालोन घेतले. तोफखानियाचा मार उतम दिल्हा. तेथे लढाई उतम जाली. अस्तमान होयास आला. मार तोफखानियाचा भारी देखोन सरकारच्या फौजा निघाल्या. निघते वेळेस (अपूर्ण).

¶*The first part of a news-letter by Ramchandra Tukdev reporting to Dadasaheb a battle between the Jats and the Marathas near Dholpur. [In continuation of this read the following letter.]*

---

*No. 127*] [*March 1766*

(पहिला बंद गहाळ.)

+श्री

पुरवनी साहेबाचे शेवेसी

जाटाचे फोजेने दाटी केली याजकरिता सरकारची फौज काही ढवलपुराकड आली ते उतम. राजश्री सुलतानजी लांबहाते यासी जखम काहीसी लागली. इकडे फौज निघाली ते सांभाळून मजुबुतीने आली. काही फौज तिकड चेमलकड चालचूक होऊन निघाली त्याचा थोडाबहुत गलाटा जाला. बेहडमधे फसली ते जमीदारानी दाटी केली. दोनचारसे घोडे गेले. दोनशे च्यारसे माणूस ठार जाया झाले. फौज सांभाळून ढवलपुरानजीक आहे हे वर्तमान राजश्री सुभेदारसाहेब यांसी श्रुत होताच त्यानी गोहदनजीक मुकामीहून कूच केले.

---

+ Concluding portion of letter No. 126.

4250

पुढे फौजा राजश्री माहदजी सिंदे पाटील साहेब याणी व राजश्री गंगाधरपंत तात्या भारी फौजेनसी स्वार होऊन जलद गेले ते जाऊन पावले असतील. राजश्री सुभेदारसाहेब याचा कान दुखतो याजकरिता मागे आहेत हेहि दरकूच जातील. याची त्याची लढाई मातब्रर होईल. साहेबहि दरकूच येतात हाहि दबाव बहुत पडला. पुढे लढाईचा काये मनसुबा होतो ते सविस्तर वर्तमान साहेबाचे शेवेसी लिहीत असे. चैत्र आधिक शुध ३ तथा चतोर्थीस युध्य प्रसंग जाला. जे वर्तमान ध्यानास आले ते पके अर्थ मनास आणून शेवेसी लिहीत आहे. पुढे जे वर्तमान वरचेवरी येईल ते सविस्तर लिहीत असो. साहेबाचा अगमणाचा विचार ध्यानास आणून माहराज राजे माधोसिंगजी यानी सविस्तर स्नेहचे भावगर्भ मनास आणून लिहून खलिता साहेबाचे शेवसी आपल्या वाकेच्या कासीदजोड्याबराबर त्यानी आपल्या वकीलाजवळ पाठविला आहे तो प्रविस्ट होईल. सविस्तर अर्थ निवेदन होईल. साहेबाचा दबाव उतम पडत चालला आहे. पुढे याजकडील भावगर्भ जे मनास येतील जे बोलतील ते सविस्तर लिहीत असो. सारांश राजे माधोसिंगजी मजपासी बहुत पेश. राजे हरसाहेजी व ठाकूर राजसिंगजी व राजश्री सुभेदाराकडील कारभारात भट राजा सदासिवजी आहेत व दिवानी कारभार नैनसुख दिवान नवे मुतसदी उभे केले त्यासी सांगितला आहे. त्याजवरी सर्व येख्तियार आहे. बक्षी दुलेराये कानोडेनजीक होते ते राज्याची फौज सर्व जयेपूर दाखल जाली. पुढे याजकडील जे वर्तमान ध्यानास येईल ते लिहीत असो. गुरुचे सिखाचे वकील येथहि आहेत. त्यासी करार जाला त्याचा तगादा करितात. गुरुचे सिखाची फौज माघारे गेली ते सरहिंद उतरोन गेली. त्याच्या दबावाकरिता नजीबखान रोहिले दिलीहून नोरलाची सरायेवरी पडले होते ते खासे मागे रामब्याचे घाटास गेले तेथ त्या प्रांती आपल्या जमावानसी आहेत. दिलीत पातशाहाजादा आहे. पातशाह अलीगोहर घाटपूर ? पडले आहेत तेथच मुकाम करून आहेत. दाहाबारा हजार फिरंगी समागमे आहेत. तेथच त्याचा विचार मनसुबा करून आहेत. वरकड मारवाडप्रांतीचे वर्तमान तरी राजे बिजेसिंगजी याची फौज पिधावा नजीक आहे. राजश्री खानाजी जाधव अजमेरीनजीक आहे. सारांश आपल्या आपल्या जागास आहेत. राजश्री आचुतराव हडोती नजीक होते ते दरमजल फौजेकडे गेले. पुढे जो अर्थ ध्यानास येईल ते सविस्तर लिहीत असो. मुलाचे लग्नाचे काये योजून आले ते वर्तमान पेसजी साहेबाचे शेवेसी लिहिले आहेच. राजे माधोसिंगजी यासीहि वर्तमान सांगितले. त्यानी मान्य केले आहे की लग्नाचे साहित्याची सिधता करून देतो. साहेबाचे प्रतापेकरून जे कार्य होऊन येईल ते

लिहीत असो. वैशाखमासी जरूर कर्तव्य. पुढे सिहस्त याजकरिता कृपाळु होऊन काही खर्चाचा गौर होये लग्नसिध करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. विशेष काय लिहिणे. कृपा वृधिमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

*¶Ramchandra Tukdeo's letter to Raghunathrao: refers to the defeat suffered by a contingent of the Maratha army at the hands of the Jat. Sindia and Holkar immediately moved on towards Gohad to retrieve the position. The Rajput princes are quite friendly to Maratha interests and may be relied upon in a campaign against the Jat.*

---

*No. 128]* *[2-4-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रामचंद्र तुकदेव चेरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता। चैत्र अधिक वद्य ७ सप्तमी परियेंत साहेबाचे प्रतापेकरून मु॥ सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर बहुत दिवस जाले आज्ञापत्र सादर होऊन सांप्रत आज्ञापत्री सांभाल न जाला याजकरिता चिंतातूर बहुत असो. काली अस्तमानी चेनराये कायेत माहराजाकडील त्याची पत्रे आली. तेथ वर्तमान ध्यानास आले की खासा स्वारी सुरजेसनिध दाखल जाली. दरकूच पाठवावयाचा विचार जाला. त्यासी हे वर्तमान माहराजास श्रुत जालियावर साहेबाचे शेवेसी टिका व सिष्टाचार बहुमान पाठवावयाची ताकीद बहुत विशेष जाली. साहेब या प्रांते सनिध येत चालिले असोन या दिवसात आज्ञापत्री वरचेवर सांभाल होत नाही तरी राजदरबारी * * * * * * * * * * * * * जन कैसे धरतील? येथील * * * * * * * * * साहेबाकडील गौरसी * * * * * * * * साहेब कृपाळु होऊन यासी दबत्रारी पडल. साहेब सनिध असोन पत्रद्वारे सांभाळ होत नाही याजकरिता चिंता बहुत लागली आहे. तरी कृपाळु होऊन सविस्तर भावगर्भ लिहून सांभाल करावंयासी साहेब धणी समर्थ आहेत. वरकड याप्रांतीचे वर्तमान तरी राजश्री सुभेदार साहेब ग्वालेरीनजीक मुकाम करून आहेत. कानास वेथा फार जाली याजकरिता श्रमी होते. सांप्रत काही समाधान आहे. बुनगे ग्वालेरीस ठेऊन येका दो रोजात फौजेत जाणार येसे वर्तमान आहे. राजश्री माहदजी सिंदे पाटील साहेब व राजश्री गंगाधरपंत तात्या सर्व सड्या फौजा घेऊन जाटाचे

मुकाबिल्यास गेले आहेत. ते चमलेपासोन दोन तीन कोसावरी कवारी नदीवरी मुकाम करून आहेत. काही फौज ढवलपुरी आहे. जाट जोहरमल व गुरूचे सीख ढवलपुरापासोन दो कोसावरी आपल्या फौज तोफखानियानसीं मुकाम करून आहे. जाटाची फौज काही चमेल उतरोन आलीकड आली होती. ते वरचेवरी माघारी फिरोन गेली. त्याचा विचार चमेल उतरोन आलीकड यावे हा होता. परंतु दबाव भारी पडला याजकरिता तेथच मुकाम करून आहेत. फौज त्याजपासी तीस हजार गुरूचे सीख मिळोन आहे. चमेलचा घाटाची मजबुती करून असावे या विचारात आहे. सरकारच्या फौजा अलीकड बसोन आहेत. पुढे जो विचार लढाईचा मजकूर ध्यानास येईल ते वर्तमान सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. साहेब दरकूच येत आहेत हे ~~वर्तमान दाटी~~ आहे. इभरत भारी बसली आहे. साहेबाचे प्रतापेकरून सर्व गोष्टी होऊन येतील. वरकड येथील वर्तमान तरी राजे माधोसिंगजी आपल्या जागा विचार मनसुब्यांत आहेत. जाटाचा याचाहि आपणामधे बखेडाच आहे. फौज याजपासी जमा जाली ते तैसीच आहे. येक समरू फिरंगी हजार बारासे लोकानसी होता ते याजपासोन गेला. ~~बहुत मकारे समाधान केले परंतु~~ राहिला नाही. कानोडेकडे फौज होती तेहि याजपासी आली. आपल्या जागा सावधानं मजबुती करीत आहेत. प्रस्तुत याजपासी कारभारी राजे हरसाहेजी व ठाकूर राजसिंग उभयेता बहुत पेश आहेत. राजश्री सुभेदाराकडील कारभारात भट राजे सदासिवजी आहेत. दिवानी कारभारास नैनसुख दिवान * * (नवा) उभा केला त्याजवरी सर्व कारभार आहे. बक्षी मुलेराये त्यावरी फौजेचा कारभार आहे. वरकड मुत्सदी आपल्या आपल्या कामावरी जे आहेत तेसे आहेत. प्रस्तुत राजे विचार तरतुदीत बहुत आहेत. सिखारीचा इस्क जो आहे तोच आहे. नित्य सिकारीस जात आहेत. राजे बिजेसिंगजी जोतपुरी आहेत. त्याची फौज अजमेरीपलीकड दाह कोसावरी पिधावन येथ मुकाम करून आहे. राजश्री खानाजी जाधव अजमेरीसनिध आहेत. राजे माधोसिंग याजकडे पैगाम राजे रामसिंग याचे विद्यमाने लाविला आहे. दोघ भले माणूश मानिकराव मकाजी चव्हाण पाठविले आहेत ते रामसिंगजी राजे याजपासी उतरले आहेत. धातुपोशन करीतात. पुढे मनसुबा ध्यानास येईल ते लिहीत असो. राजे बिजेसिंगजी याजकडील जाबसाल लागला आहे. काये ठराऊ होईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. वरकड राजेरजवाडे आपल्याआपल्या जागाच आहेत. दिलीकडील विचार तरी नजीबखान रोहिले पानिपतानजीक रामड्याचे घाटी मुकाम करून आहेत. तिकडील पैका वसूल कारितात. पातशाह आलीग्वार आपल्या

जागाच आहे. हफीज रहिमत, दुंदेखान आपल्या मुलुकात आहे. जाटासी त्याचा पैगाम आहे. ते पातशाहास सामील होत नाही. दबाव पडल्या पाहवें. अहमदखान सुज्यादऊले आपल्या सुब्यात आहे. पातशाहचे पैगाम सर्वासी आहेत. परंतु कोन्ही मनसुब्यांत तन देत नाहीत. फिरंगी येणार. त्याजपासी लाला साहेबराये आहे. तो पटन्यास आला म्हणोन वर्तमान आहे. फिरंगी कांहीं पटन्यास आले. पुढें येणार. फिरंगी सामील जालियावरी काये मनसुबा करतील ते सविस्तर लिहीत असो. गुरूचे सीख माघारे गेले, ते आपल्या मुलकास गेले. पाचसात हजार फौज जाटापासी आहे ते मात्र आहे. राजे माधोसिंगजी याजपासी भले माणूस बखतसिंग घासदाणा ठराविला त्याचे वसुलास आले ते याजपासी आहेत. काही निकाल करून देविला. निरोप त्यासी जालिया सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. साहेबाचे दबावावरी जो अर्थ ध्यानास येईल ते वर्तमान वरचेवरी साहेबाचे शेवेसी लिहित असो. आज्ञाधारक साहेबाचे आहे. आज्ञेप्रमाणेच वर्तणूक होईल. मुलाचे लग्नाचे योजून आले. चैत्र वद्य १० लग्न करणे जरूर त्यासी राजे माधोसिंगजी यानी काही साहित्य करून देविली आहे. त्याचा निकाल करून सत्वर येथून निरोप घेऊन शेवेसी येत असो. याजकडील सिष्टाचार टिका याची तयारी होत आहे. लग्नसंधि समीप आली. त्यासी साहेबाची आज्ञा सादर होईल त्याप्रमाने वर्तनूक होईल. विशेष काये लिहिणे. लोभाची वृधि करावयासी साहेब धणी समर्थ आहेत हे विज्ञाप्ति.

¶*An important news-letter from Jaipur written by Ramchandra Tukdev to Raghunathrao, reviewing the position and activities of the various chiefs beyond the river Chambal and communicating the same for the information of the addressee who was proceeding to the North and who was then encamping near Sironj.*

---

*No. 129*] [*5-4-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक मलारजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम तागाईत आधिक कृष्ण १२ द्वादशी साहेबाचे कृपादिष्टीकरून येथास्थित आसे विशेष. स्वामीकडून पत्र आले ते * * सवाली पावोन लिहिला अभिप्राय सविस्तर आवगत जाला. भेट व्हावी तुमचे आमचे विचारे मनसबियाची योजना होऊन

उचित तेच ठरलें म्हणून पत्री आज्ञा. येसियासी खावंदाचे मर्जीसिवाये विशेष जोड कोणती! मनोदयाप्रमाणेच सर्व गोष्टी होऊन येतील. राजश्री गंगाधर * * * * * * * * उदईक येतील. आम्ही सुरजपुरचे मुकामीहून कूच करून आज मंदवारी केणचेसराईस आलो. सत्वरीच भेटीचा लाभ होईल. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar to Dadasaheb that he is encamped at Keneche Sarai and will be glad to discuss future projects in a personal interview with the latter.*

---

*No. 130*] [*17-3-1763?*

श्री

विज्ञापना. सविस्तर कालचे पत्री लिहिले आहे. रा सिदापासेट याची भेटी घेतली. आपले पत्र त्यासी दिल्हे. सविस्तर वर्तमान, मायेममतेची भाषणे केली. त्यानी उतर दिल्हे कीं रसदेचा भरणा आम्हांपासी * * * करा यैसे करिता चालीस पनास हजारापावेतो मदत करू. आम्हीं लाखापावेतो कार्य करावे लागेल, यैसे युक्तीने भाषण केले; तेव्हा उतर दिल्हे कीं तुमचा भरणा आमचे हते जाहला; काम आडू देणार नाही. आपणासी बहुत श्नेह करितो. उश्रमा केला कीं नानासाहेब असता हे संततर का करितात, त्याचा पर्या सांगणे तो सांगितला. उदईक त्याचा जाब घेऊन पाठवितो. रा अविचतराव यानी आपणास व रा जिजाबास लिहिले आहे कीं हुंडी करून पाठवणे. हुंडणावळ रावसाहेब देतील. जैसे आपल्या विचारास येईल तैसे करावे. दुसरे पुढील मामलतीचा आजमास ध्यानात आणून रा बाजीपंत फडनीस याचे हाती लिहून पाठवणे. मक्ता करणे अथवा कमावीस करणे दोन्हीहि डौल पाठवावी. येविशई रावजीनीहि लिहिले आहे. कारकुनाचे हते कचपके काम घेतात यैसे सालसीचे पत्र आधी पाठवणे. रावसाहेब त्याची भीड येथे व श्रीमंत पंत प्रधान दोहीहि दरबारी आहे. दोहीहि * * पुढे कामकाज पडेल. तूर्त दादासाहेबाची मर्जी रा * * * बहुत पत्री लिहीत गेलो. कारण दरबारचा रंग पाहिला. आपला दिवस प्रथम आहे. येकदा सालसी (?) पडल्या दोन कामात अंतरहि केले तर चालते यैसे आहे. उंबरावगिरीची रवाणगी जाहली. आपणासहि श्रीमंत नानासाहेबी पत्र लिहिले कीं येक विचार चालावे; ठाणे त्याचे स्वाधीन करावे. त्यासी परभारा रा

बालाजी विस्वनाथ याजकडे आहे. त्याजला जैसे लिहिले असेल तैसे करितील. खलासी तालुकाची साल आइंदेपासून कमावीस किसनप्रसाद निा उमरावगीर याजकडे सांगून तुम्हांस पत्र दिल्हे आहे. जो च्यार रूा रसदेचा भरणा करील, त्याची कमावीस. असो ते गोष्टी पुढेच आहे. रोहिले जाटाची दाटी फारसी येथे आहे; तर सविस्तर वर्तमान लिहिले पाहिजे. होलकराची याची बीद येका दो रोजानी * * दादासाहेब होलकर सिंदेची रवाणगी त्या प्रांती करून आपण देशास जावे. आठादाहा दिवसात पडशा होऊन देशास मजल दरमजल जातात. रा केदारजी सिंदे यासी सरदारीची वस्त्रे व सिके पहिले दिल्हे; त्यासी दिवाण पाहिजे. केदारजी सिंदे रा अविचतराव यासी मागतात. दादासाहेब देऊ म्हणतात. मागे रविवार गेला ते दिवसी वस्त्रे रावजी द्यावी. वस्त्रे आणावयासी जामदारखानी पंत पाठविले. मागती दादासाहेब म्हणाले की आजी मुहूर्त नाही. मग तैसेच राहिले. दादासाहेबाचा मतलब कोन्हासहि कलत नाही. रावजीचे घाटत आहे. माहादजी सिंदे यानी वडीलपणें राहावे तो कैसा राहतो ? रा गंगाधरपंत तात्याचा येक ठराव जाहला म्हणजे हा काय करील न कले. माहादजी सिंदेचे, होलकर तात्याचे येक चित यैसे वर्तमान आहे. रावजीची धालमेल दोन च्यारदा जाहली. समई दादासाहेब मागे घेतात. अगोधर अवघे कबूल करितात, यैसा रंग येथील आहे. रा गोपालराव गो(विंद) अमदाबादेस होते. रा आपाजी गणेश याजपासून साडेसात * * रूा घेऊन मामलत गुजरातची व ठाणी सर्व देऊन आ(पण) मजल दरमजल नासिकास आले. तेथे राहिले हे वर्तमान दादासाहेबास कलल. त्यानी येथून कारभारास लिहून गोपालराव यासी कैद केले. त्याचे भाऊ गोविंदपंत चुलतेसह कुटुंब कैद केले. घोडी उंटे हती वस्तभाव लुटून घेतली. गोपालराव यासी धोडपच्या किलेवरी घातले. वरकड नाशकात कैद आहेत. लक्ष्मण दिगंबर इकडे येत होते. मार्गात लुटले गेले. आता उदेपुरी आहेत. काल फिरल्या काही राहात नाही. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. देशास जावयाची सोय नाही. अजून आपले चरण धरले की चाकरी करून अन्न घेऊन मग जावे. ते तर न जाहले. देशास जाणे प्राप्त जाहले. आपली आज्ञा शिरसावंद्य याची शरम असल्यास आजहि आम्हीं आज्ञांकित आहे हे विज्ञापना. मिती. चैत्र सुध २ गुरूवासर.

¶*The letter reports that Raghunathrao was proposing to dispatch soon Holkar and Sindia on to the fight, himself returning to the Deccan. Kedarji has been appointed to Sindia's estates. Gopalrao Barve who submitted to Apaji Ganesh has been confined and his baggage confiscated.*

4256

No. 131] [13-4-1766

श्री

विनंती सेवक विष्णु माहादेव व सदासिव गंगाधर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। चैत्र शुध्ध ४ भानुवासर च्यार घडी दिवस असतां मुकाम करहरी नजीक झासी दोन कोस स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सांडणीस्वारासमागमे आज्ञापत्रें पाठविली तें मुकाम मजकुरी मुकाम होतांच पावली. पत्रीं आज्ञा कीं राजश्री सुभेदारांस आज रविवारी भेटीचा मुहूर्त आहे तर घेऊन येणे. ऐसियासी आजची मजल दाहाबारा कोसाची जाली. मजलीस येतां दिवस थोडा राहिला. त्याजवर बोंडसे येथून समीप नाही. सा कोसी पला, याकरितां उदईक भेटीचा मुहुर्तहि आहे. अगाऊ राजश्री माहादजी सिंदे दर्शनास येतील. तदोतर राजश्री सुभेदारहि भेटीस येतील. मुहुर्त उतमच आहे. त्याजवर स्वामीची आज्ञा येईल तदनुसार वर्तणूक केली जाईल. राजश्री सुभेदाराच्या कानास तिडिक बहुत आहे. शरीर स्वस्थ नाहीं. फौजेत उभे राहून भेट घ्यावी येैसें शरीरी सामर्थ नाहीं. यास्तव त्यांचा भेटीचा प्रकाराविसी रा। चिंतोपंत तात्यास लिहिले ते विनंती करतील, त्यावरून आज्ञा करावी. सांडस्वार फिरोन माघारे जलद रवाना करावयासीं आज्ञा करावी. शेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vishnu Mahadeo and Sadashiv Gangadhar fix the day of the meeting of Mahadji Sindia and Malharrao Holkar with Raghunathrao.*

---

No. 132] [13-4-1766

पौ छ २९ जिल्काद सीत चैत्र.

श्री

श्रीमंत राजश्री दादा

साहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक नारो बलाल भुसकुंटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ३ माहे जिलकादपावेतो सेवकाचे व प्रगणे याचे वर्तमान यथास्थित असें विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सेवकास आले ते सिरी वंदिले. तेथे आज्ञा

की प्रगणे बढवा सिंदे यांजकडे होता तेसमई सिंद्याकडून रा बाजी अनंत यांजकडे मामलत होती तेव्हां पाऊण लाख असी हजारपावेतो सिबंदीसुधा वसूल होत होते. सेवकासहि ठावका आहे. त्यांस रामचंद्रबावा व राणोजी सिंदे यांणी बढवे याचे राज्य घेतले तेसमई राजा किसेरसिंग होता. त्याणें दंगा केला होता. प्रगणा दोन तीन वरसे उज्याड केला परंतु रामचंद्रबावा यांणी प्रगणेयाची आशा सोडून तीन वर्षें राज्याचे पारपत्य केले. जेथे गेले तेथे त्या प्रगणेयांचे पारपत्य केले तेव्हां राजे खराब जाले आणि सिबंदीं तीन वर्षें आंगावर देऊन नक्ष केला. तेव्हां राजे गाव खाऊन राहात होते. अता श्रीमंत नानासाहेब कैलासवासी जालियापासून येके गावचा पाटीलदेखील अमलासी गोष्ट सांगतो. बडवेकर रजपूत राजे यांणी शंभर राऊत व प्यादे दोनसे याप्रमाणे राज्यापासी सरंजाम तूर्त आहे आणि सरकारचे कमाविसदार यापासी पनास पाऊणसे प्यादे व पांच सात राऊत राहातात याप्रमाणे बढवे याचे जाले आहे. बाजी अनंत याच्या वेळेस राजे हात बांधून राहात होते ते वेळेस तेरा हजार रुपये सिबंदी खर्च रामचंद्रबावासारिखा चवकस त्याणी नेमून दिल्ही होती. आता पांच हजार सिबंदी साल तमाम नेमणूक आहे. त्यात सेवकाने काय करावे ? येविसी सेवकाने अनंतवलीस विनंती केली होती की बढवे व खांडवे येथे सिबंदी कमी आहे तेव्हां आज्ञा जाली होती की त्या प्रांती आलियावरी नेमणूक पाहून तेथील मजकूर मनास आणृन नेमणूक करून देऊ. त्यास स्वामीनी हा प्रांत सर्व पाहिला आहे. बढवे यास तों पहिली सिबंदी राजश्री रामचंद्रबावाचे वेळेची आहे त्याप्रमाणें जालियास थोडा बहुत बंदोबस्त होईल. आता स्वामीनी राजेयाचे हक करून दिल्हे आहे. आतां सालमजकुरी प्रगणे बढवे वस्थी होत आहे. स्वामीचे प्रतापे पांच वर्षें येक जप्त असलियास वस्ती होऊन प्रगणा आबाद राहील. गुदस्ता रा गोपालराऊ याच्या अमलात पो बडवे व खांडवे येथील रयत आफरातफरी जाली त्यामुले प्रगणें खराबीखाली आले होते. आता सेवकाने मागती आबादी उतम केली आहे. पो मजकुरी दोन्ही माहाल मिलोन नव्या आसाम्या पाचसे घरे नवे आणिले आणि पों कानापूर तो दरोबस्त उज्याड जाहाला होता त्यांस आता सालमजकुरी चोवीस गाव वस्ती केले आहेत. येक अमल असलियाणें जमाबंदीहि उतम होईल आणि प्रगणेहि आबाद राहातील. सेवक तो आता वस्तीस आणि चोराचे पारपत्यास लागलो आहे. स्वामीचे प्रतापे आबादी होईल आणि चोराचेहि पारपत्य होईल. स्वामीनी सर्व सेवकाचा बंदोबस्त करून दिल्हे. वरकड पो पुनासे व सिकणीमध्ये मोठे चोराचे घर आहे. हा प्रगणा सरकारांत घेतल्यास चोराचे पुरते पारपत्य होईल आणि सिबंदीहि कमती लागेल

असे आहे. मी सेवेसी विनंती केली होती. त्यास आपली आज्ञा जाली की तूर्त होत नाही. सिंदे यांची भेट जालियावरी करून घेऊ म्हणून आज्ञा जाली आहे. यास्तव सेवेसी विनंती लिा आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापि.

¶*Naro Ballal Bhuskute narrates to Raghunathrao his difficulties at Barwaha, reminding him of the former arrangements made by Ramachandra Baba and Ranoji Sindia and requesting him to adjust them suitably to the times.*

---

*No. 133*] [*14-4-1766*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित गोविंदराव कोनेर च्येरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता चैत्र शुध ५ पंचमी मुकाम नजीक झांसी धर्मप्रताप साहेबाचा जाणून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. काल राजश्री सुभेदार यानी बारा कोसाचे कूच करून मुकाम मजकुरास आले की साहेबाची भेट सोमवारी घ्यावी. त्यास साहेबाचे आज्ञापत्र आले की कूच करून पुढे गेलो. तर तुम्ही राजश्री सुभेदारास सांगून मुकामास येणे. त्यास काल मुकाम भारी जाला म्हणून गाजोदीखान याचा आटाला व बाजार तो आला नाहीं. मागे गडीबदल तोफखाना व फौज राहिली तेहि आले नाहीत. तदनंतर राजश्री सुभेदाराचे शरीरास समाधान नाही. यास्तव रा कृष्णराव गोविंद यांनीं विनंती करावयासाठी राजश्री सुभेदारानी साहेबाचे सेवेसी पा आणि साहेबी कूच केले त्याजवरून राजश्री सुभेदार बहुत श्रमी जाले कीं आम्ही खावंदाजवल आलो. तदनंतर शरिरास समाधान नाही. दुसरे कूच भारी केला आणि खावंदानी कूच केला तर तेच धणी आहेत, कृपाच करतील. तर साहेबी कृपाळू होऊन राजश्री सुभेदारास समाधानाचे पत्र पाठवावे कीं लवकर येणे. तुम्हासाठी मुकाम केला असे आज्ञापत्र साहेबी सादर करावे. राजश्री सुभेदारानी राजश्री कृष्णराव व रा सदासिव गंगाधर आम्हास बोलाऊन सांगितले की तुम्ही येताच खावंदाचे आज्ञेवरून कूच दरकूच खावंदाकडे आलो असता साहेबी कूच केले. याजवास्तव कष्टी बहुत जाले तर साहेब समाधानाचे पत्र पा धणी समर्थ आहेत सेवेसी श्रुत हो हे विज्ञापि.

¶*Govind Koner requests Raghoba to halt until Holkar catches him up as the latter is hurt at being left behind.*

No. 134] [15-4-1766?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
साहेबाचे सेवेसी.

विनंती सेवक बालाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापन्हा. ताा छ ५ जिलकाद मुाा वोडसे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पाा मजकूर तपशीलवार वर्तमान राा सित्रापानी लिहिले आहे त्यावरून सेवेसी श्रृत होईल. सारांश गोस्ट हेच झासीवाले डोहाणा करितात. मी झासीस गेलों. स्वामीचे आज्ञापत्र त्यास दिल्हे त्यावरून बहुतसा आमचा आदर केला आणि गोड गोस्टी बोलिले. आपण सर्व प्रकारे साहित्य करू. धण्याची आज्ञा आम्हास मस्तकी आहे यैसे सिस्टाचार बोलिले. तुम्हा कामकाज पडेल तेव्हा आपणास लिहिणे जे सामान, स्वार, प्यादे लागतील ते देऊ. त्यास सांप्रत त्याणी या प्रकारचे फंद माडिले तरी काये चिंता आहे ! स्वामीचे पुण्यप्रतापे सर्व गोस्टी होतील. जे लबाडी करितील त्यांचे पारपत्य स्वामी करितीलच. झासीकराच्या मते आपणास मुदई जाहाले आहेत. यासी येथे राहो न द्यावे. राजा आजी येक महिना बाहीर निघाला आहे. पुण्यास येऊन स्वामीच्या हाते आपला बंदोबस्त करून घ्यावा. त्यास झासीकरानी अटकाविला आहे. तेथे गेलियाने आपणास बाधक होईल. सेवेसी श्रृत व्हावे यास्त(व) विनंती लिहिली आहे. आतां राा नारो शंकर तेथे आहेत. त्यास उतम प्रकारे ताकीद करावी आणि त्यांचे पत्र त्याच्या कारभारियासी ये ते गोस्ट जाहाली म्हणजे सर्व स्वामीचे आज्ञेप्रमाणे कामकाज घडोन येईल. येथे पाच सातसे माणसे व से दोनसे स्वार ठेविले. पुढेहि ठेवीत आहो. परतापसा मिसर याणे येक गाव जालिला तें चालीस पनास गुरे जलाली व माणसे दाहा वीस जलाली. पुढेहि गावगना सें दोनसे यैसे खालशाचे गावी घेत आहे. या(ज्या ?)स्त सिबंदी ठेवणे जरूर जाहाले. बहुत काये लिहू. सेवसी श्रृत होये विज्ञाप्ती.

*¶Balaji Krishna to Raghunathrao, describing how he was received at Jhansi and further saying that though temporary trouble has arisen there he would set it right. He requests the addressee to write to Naro Shankar in that connection.*

4260

No. 135] [17-4-1766

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक बाळाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ७ जिलकाद स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रे पेसजी सादर जाहाली कीं तुम्ही येकजण सत्वर हुजूर येणे. त्यावरून चिरंजीव राजश्री गंगाधरपंत याची रवानगी स्वामीकडे केली आहे. उदैक येथून कूच करून सेवेसी येऊन पावतील. सविस्तर निवेदन करितील. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Govind sends Gangadharpant to Raghunathrao and informs him accordingly.*

---

No. 136] [21-4-1766

पौा छ ११ जिलकाद
सोमवार मध्यमरात्र

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो शंकर सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. कृपाळुपणे स्वकीय लेखनास आज्ञा करीत आसावी. यानंतर स्वामीची आज्ञा सुक्रवारचे रात्रीस घेऊन स्वार जालो. दिवस उगवता रा। सुभेदाराचे मुा। नजीक आलो. तेथूनहि कूच होऊन ब्रिमरी नजीक् मुा। जाला. दुसरे मजलीस सिंदू नदी पार जाणार तों शनवारी प्रहर रात्रपर्यंत लस्करात दाखल जालो. रा। सुभेदारास वर्तमान कळलिया दुसरे रोजीं रविवारी मुा। करून संधाकाळपर्येत दरबार जाला. रा। गंगाधरपंत तात्यानी बहुताप्रकारे बोध करून आम्हीहि आज्ञेप्रमाणे बोलणे ते बोलिलो. तेव्हा निश्चये केला की कूच करून माघारे यावे. दुसरे रोजी सोमवारी कूच करून मोजे चिरोळा नजीक दतिया येथे मुा। जाला. उदईक मंगळवारी कूच करून येथून आबलीपाहीकर आथवा कामद येथे याचा मुा। होईल. तेथून भांडेर कोस पाचसा राहील. सरकारचा मुा। भांडेरीसच व्हावा. तेथे भेटीचा योग जालियावरी मग मनसबा करून जिकडे कूच करणे ते करावे. उभयेता सरदार आपले आज्ञेप्रमाणे लांब

4261

मजलीने सेवेसी येत आसे. आमची फौज जुज्यातीवरी होती. आम्ही सडे से दोनसे स्वारानसी लस्करात आलो. फौज वैरणीयाचेमुळे ठेविली होती. सरकारचे फौजेच कूच जालियावरी सत्वरच येऊन सेवेसी हाजर होतील. येथून ताकीद फारच केली आहे. सिंदियानी काहीच पैका न दिल्हा याजमुले खर्चाची वोढी ते श्री जाणे. दोन आडीच महिने रोजमरा फौजस व शागिर्द पेशास नाही. सिंदियाचा यैवजाचा भरवसा मोठा की तूर्त काही तरी देतील. परंतु त्यानी निष्टुरता फारच फारच केली. ईस्वर स्थित कैसी राखील हे न कले. सर्व संकट स्वामी चरणे दूर होतील. भेटीस तेथेच भांडेरीस यावे किंवा मधे योग घडल याची आज्ञा करावा. त्याप्रमाणे योग घडल. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Naro Shankar informs Raghunathrao how he persuaded both Sindia and Holkar to meet Raghoba near Bhander and how they readily consented to it. He, however, complains against Sindia for not paying the dues which the writer required for the expenses of the campaign.*

---

*No. 137*] [*21-4-1766*

श्री

साहेबाचे सेवेसी गोविंदराव कोनेर च्येरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता चैत्र शुध द्वादसी सोमवार मुकाम चिरोला येथे सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशष. साहेबाची आज्ञा घेऊन निघालो ते रविवारी राजश्री सुभेदाराजवल पावलो. वर्तमान सर्व राजश्री सुभेदारास सांगितले. तदनंतर राजश्री नारो शंकर व राजश्री विष्णु माहादेव येसे राजश्री गंगाधर येशवंत यास घेऊन रा सुभेदाराजवल जाऊन निश्चय केला कीं उदईक सोमवारी कूच करून सा सात कोस जावे त्यास आज मुकाम मजकुरी आले. उदईक कूच होऊन साहेबापासून तीच कोसावर राहतील. साहेबाच्या आज्ञावरून वर्तणूक करतील. परंतु राजश्री सुभेदाराजवल आज्ञेवरून वर्तमान सांगितले याजवरून संतोश पावले की साहेबाचा रूख गोहेदेकडे जाणा येणेकरून शेत्रु भयाभीत होईल. सर्व गोष्टी घडतील. श्रीमंतास येश येईल. चिंता नाही. सेवेसी श्रुत होये.

¶*Govind Koner reports the proposed meeting between Malharrao Holkar and Raghunathrao.*

4262

No. 138] [24-4-1766

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

शेवक राजा बद्रीनाथराव कृतानेक सा॰ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॰ छ १४ माहे जिलकादपर्वेतो माहाराजांचे कृपाकटाक्षेकडून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर पातशाहाचे कूच होऊन प्रयागास गेले. फिरंगियाही आनखी समुदाये बंगाल्याहून आनविला आहे. तो आलियावर जे होणे ते होईल. हाफिजरहमत पुत्राचे बोलाविलियावरून पातशाहकडे गेले. मुलाजमत केली. नर्जीबखानाविशई बहुता प्रकारें अर्जमारूज+ केली. आनीकाही येकांत च्यार घटका पावेतो पातशाहास सांगितले कीं दिल्लीस चालावे, रोहिले पठाण सर्व चाकरीस हजर होतील. फिरंग्याकडे डौल न द्यावा, आम्हाकडे पाहवे, त्यांचे मसल्हतीवर न जावे, आमचा हात धरावा, सर्व खर्चवेच व सलतनतचा बंदोबस्त चालऊ, ऐसे बहुता प्रकारें विनविले. पातशाहानी त्याचा विश्वास न केला. पितापुत्रास रुखसत केले. आपण दरकूच प्रयागाकडे गेले. फिरंग्याही पातशाचे बहुतप्रकारें समाधान केले आहे कीं आम्ही वर्शाकाल प्रयागी करितो तों वर बंगाल्याहून आनखी फौज येत आहे. प्रस्तुत आपण तेथेंच बसावे. नवाब वजिरासहि बोलावणे गेले आहे. त्यांही पुरातन लोकास आस्रा देऊन नवे लोक ठेवितात. समुदाये आलियावर हजूर येईल. प्रस्तुत मालीक मुल्क माहराज आहेत जे चित्तावरी धरतील ते सहजांत होईल. स्वामीचा प्रताप थोर आहे. दुस्टाचा संव्हारच होईल. शेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा वृद्धि केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Badrinath informs Dadasaheb of an interview between the Emperor and Hafij Rahmat in which the latter requested the Emperor to rely on him and Najibbkhan for support and to return to Delhi. The Emperor rejected it and went to Allahabad to seek protection from the English.*

---

No. 139] [21-4-1766

श्री

शेवेसी विज्ञापना. स्वामीचे आज्ञापत्र रविवारचे दिवसीच स्वामीनी रा केले ते सोमवारी दोन प्रहरा दिवसा मुकाम चिरोला नजीक दतिया येथे पावले. तेथ

---

+ शिफारस श्रुत केली.

आज्ञा की राजश्री सुभेदारास घेऊन लौकर यावे. त्यास आज्ञेप्रमाणे राजश्री सुभेदारास व राजश्री माहादजी सिंदे यासी घेऊन सा कोस मुकाम मजकुरास आलो. उदईक मंगळवारी आबली पाबीकर आथवा कामद प्रांत भांडेर येथून सांत कोस तेथे मुकाम होईल. तेथून भांडेर च्यार कोस राहाते. तदोतर स्वामीची आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Gangadhar Yashvant communicates to Raghunathrao his arrival at Chirola near Datia with Mahadji Sindia and the Holkar.*

---

*No. 140*] [*22-4-1766*

श्री

सेवेसी विष्णु महादेव व सदासिव गंगाधर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. स्वामीनी रविवारचे दिवसचे आज्ञापत्र पाठविले त्यात आज्ञा कीं वोडश्यावर बहुत मुकाम जाहले. यास्तव वैरण लांब गेली. दोन्ही लस्करें येक जालियां वैरणीचा पेंच पडेल. सबब वेत्रवतीच्या पाणियावरच मुकाम नेमिला. तेथें अवघ्यांनीं यावें, यैसी पत्रीं आज्ञा. ऐसियास राजश्री सुभेदारांचे शरीरी वेथा कानास तिडीक बहुत यैसेहि असतां खावंदास भेटावे यास्तव बिल्हेरीहून बारा कोसाचे कूच केले. सोमवारी मुहूर्त आहे ते दिवसीं भेटावें. त्यास बारा कोसाचें कूच केले. त्या श्रमाने बहुत हैराणगत जाली. कान बहुत तिडकूं लागला. पूर्वीपासून या सरदाराची रीत यैसी कीं जवळ आल्यास भेटी व्हावी. मग कूच मुकाम मनसबा जे करणे तें करावें. त्यास वैरणीच्या पेंचामुळें स्वामीनी कूच केले, लांब कूच यांचे जालें. शरीर स्वस्थ नाहीं. थोर कुचामुळे काहाली अधिक जाली. यास्तव येथें आज मुकाम झांसीनजीक जाला. सरदारांचे भेटीचा विस्तार सविस्तरें राजश्री कृष्णराव गोविंद यांसी विनंती करावयास्तव शेवेसी रवाना केले. रात्रौ ते पावले अस्तील. विनंती करितील त्यांवरून मनन होईल. बिल्हेरीकरांनी झासीचा व कन्हेरियाचा रस्ता कर्द दिल्हा नवता आणि थोडासा मुलुक सरकारचा दाबिला, ताकीद केलीया न सोडला. यास्तव दहा हजार फौज थोर तोफा चिरंजीव राजश्री कृष्णराव गंगाधर याजबराबर देऊन गढीस रवाना केले. गढीस मोर्चे दिल्हे तें काम सरकारचेंच. त्याचा शह फार लांब पडल्यास च्यार दिवस अधीक लागतील. हे काम सरकारचे आस्तां राजश्री सुभेदारांचे नेट यास्तव ते गांव घेणेच आहे. स्वामीच्या प्रतापें लौकर येईल. रा। कृष्णरायानी विनंती केली असेल त्याची उत्तराची आज्ञा सत्वर करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Vishnu Mahadev and Sadashiv Gangadhar (son of Gangadhar Yashvant Chandrachud) report to Raghunathrao the illness of Malharrao Holkar who in spite of ill-health hurried to meet his master.*

No. 141]

पौ छ २२ जिल्काद सीत

चैत्र मुा सिमथर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसी जें. जुगा किला घेतला, सरकारांत ठेविला, शिबंदीची वगैरे नेमणूक करून दिल्ही; परंतु किल्याचा येक बुरूज निपट पडिला आहे, त्यासी बांधिल्याविना किल्यास दगा आहे. बांधावयासी सरकारची आज्ञा तों नाहीं; परंतु कार्याकारण कामकाज पडेल तें केलेंच पाहिजे; यास्तव तूर्त काम चालतें केलें. यैवज कमबेश दोन हजार लागतील त्याची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. बुरुजाचें काम किती म्हणावें तरी लांबी साडेवीस हात व उंची साडे-पंधरा हात व रुंदी सवातीन हात या प्रमाणें काम आहे. किल्यास दारू सिसें व गला नेहमी जकिरा ठेवावयाची आज्ञा हजार रुपयाची जाली होती, त्याप्रमाणें दारू व शिसें व गला किल्यांत भरून दिल्हा व शंभरपावेतों रुपये नेमणुकेशिवाय लागले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. किले निसबतीचा मजकूर सविस्तर राजश्री येसाजी शंकर यांणीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हें विज्ञाप्ति.

¶*A request to Dadasaheb for funds to put the fort of Juga in a state of defence, is made in this letter.*

---

No. 142] [2-5-1766

पौ छ १८ जिल्हेज सायंकाळ

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

विश्वासगवजी स्वामींचे शेवेसी

पो चिंतो विठल व आबाजी महादेव व चिंतो आनंत कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २२ जिलकाद मुा जनस्थान आपले कृपेकरून येथास्थित असे विशेष. आपण एकदोन पत्रे पाठविली ती पावोन सर्व अर्थ

ध्यानांत आला. आपणाकडील राजश्री गोविंदपंत पहिल्याने आले ते वेळेस उभयता श्रीमंताची गाठ घालून दिल्ही आणि आतांहि मारनिले तेथे आहेत त्याचे साहित्यास अंतर करीत नाहीं. हिंदुस्थानाचा प्रकार आपण लिहिला, त्यास श्रीमंतानीं सिंदे होळकर याची रवानगी केली आहे. उजनीस इंदुरास आठा पंधरा दिवशी जातील. मग तेथून तयारी करून हिंदुस्थानात येतील. आपले ठाई उभयता श्रीमंताची कृपाच आहे. रसदेचा प्रकार आपण थोडाबहुत निकाल काढला. आपणास तेथील प्रसंगामुळें बोढच आहे. त्यामुळे चाळीस पंनास हजार रुपये आपणाकडे आहेत त्यास त्यासाठीं गोविंदपंतास तगादा करितात ऐसे आहे. त्यास युक्तीने पाहतां फौजा तिकडे नसतां आपण बंदोबस्त राखिला आहे हे फार आहे. परंतु दरबारी मदार प्रस्तुत रुपयावरी आहे. याप्रो मजकूर आहे. बहुत काय लिहिणे? लोभ करावा हे विनंती.

¶*Vishwasrao Lakshman is informed by Chinto Vithal and two others that Sindia and Holkar have been ordered to proceed to the North by the Peshwa. He is assured by the writers of the full confidence in him of both the Peshwa and Raghunathrao.*

---

*No. 143*] [*17-5-1766*

पौ छ १९ जिल्काद

श्री

श्रीमंत माहराज राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी शेवक राजा बद्रीनाथराव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ ७ माहे जिलकाद पावेतो माहाराजांचे कृपाकटाक्षे आनंदरूप असे विशेष. दोन पत्रे मयेआखबरात[1] शेवेसी पाठविलीं होती; पावली आसतील. प्रत्योतरें सरफराज[2] न जालो. निरंतर आज्ञापत्री सनाथ करीत असिले पाहिजे. पातशाही फर्मान शेवेसी पाटविला असे. कासीद मार्गीत आजारी असतां पावयास देर जाली. आतां प्रतिउत्तर आले म्हणजे आज्ञेप्रमाणे वर्तणूक होईल. तेथून पातशाहानी शेवकास आज्ञापिले आहे कीं निरंतर श्रीमंतजीचे वर्तमान व पुढें आमचे सलतनतेचा बंदोबस्त त्यांजवांचून कोण करणार, काये तरतूद करणार हे सर्व लिहित जाणे. आम्ही तर आजपावेतो त्यांचेच भरवसियावर असोंत. यैसे निरंतर स्वामीचे निजध्यास राखून विस्तारपूर्वक येथील बातनी येत असे. स्वामी केवल सदासिव आवतार

---

१ बातमीपत्राबरोबर. २ भाग्यवान.

4266

आहेत. सर्व दुष्टाचे पारंपत्य होऊन धर्मराज्य करतील. पातशाह कुऱ्याजवळ ज्येरीदे मुकाम करून आहेत. छावणीचा निश्चये प्रयागचा जाला. फिरंग्यासी रात्रंदिवस माहाराजांकडील सलाहि येतचीं मसलहत असे. इकडून सरकारचे वकीलहि लवकरच मुलाजमत हासील करतील. नवाब वजीर आपले मुलकांत असे. सिखानी नजीबखानावर चढाई केली असे. जाटाकडे सीख होते यांजला जयसिंगाची पत्रे आली कीं तुम्ही इकडे राहून काये केले? रोहिल्याचे पारपत्या-निमित्य तुम्हास वारंवार लिहिले ते न केले; येसियास आतां आम्ही इकडे आलो. तुम्ही याचे मुलकांतून होत येणे. नजीबखां सरहंदचे जिल्ह्यांत असे. सीखासी लडाई भारी आहे. बहुत पेचांत असे. सुलतानखानास व आपला आसेबाब[2] दिल्लीस जो होता तो सर्व बोलावून घेतला. पातशाहास लिहून पाठविले कीं प्रस्तुत मजला जिवाचे येऊन पडले आहे. तुम्ही आपले मातुश्री व पुत्र व सलातीन व किला वगैरेचा बंदोबस्त करणे. आमासी दिलीस संमध नाहीं. त्याजवरून पातशाहानी मुसवीखानास दोन हजार मोगल व कांहीं श्वार प्यादे देऊन रवाना केले. मातुश्रीस खर्चास व बंगल्याहून सोन्यारुप्याची पात्रें आनिली व्होती व कांहीं ज्यवाहीर वस्त्रें वगैरे पाटविली. मातुश्रीस लिहून पाटविले कीं प्रस्तुत छावणी प्रयागची मोर केली असे. स्वामीचे आगमनाचा प्रकार लिहिला आहे कीं सलतनतेचा[3] बंदोबस्त पुढें कोन्हे रीतीने करितात हे पहावे येसे लिहील आहे. हाफीजरहमत व आहमद-खानाही मुलाजमत हासील केली. जाटाकडून वकील पातशाहकडे जाऊन कैरनील[4] नामक फिरंग्याचे विद्यमाने मुलाजमत केली. नजरन्याज जे पाटविली होती ते त्याचेच माने गुजरली. याणी लिहिले होते कीं आतां आम्हास काय आज्ञा आहे. भावार्थ लिहिल्याचा येकिल्यांत येतो कीं फिरंग्यासी येक्यता करून पातशाहसह वजीर व फिरंगी आपले पत्यावर असावे येसो दिसोन येते. तेथून ज्यबाब जाला नाहीं. रोहिल्याचे पारपत्य परस्परेच होत असें. स्वामीचे शेवेसी तकलीफ होणारच नाहीं. शेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे. वरकड सविस्तर वर्तमान रो गंगाधर विश्वनाथ वकील हजूर विनंती करतील हे विज्ञापना.

¶*Badrinathrao writes to Dadasaheb that full reliance was placed in the addressee by the Emperor. The writer also refers to an encounter between the Sikhs and the Rohillas in which the latter were thrown into confusion and their leader Najibkhan was obliged to leave his protege the Emperor to his fate.*

---

१ सडे. २ चीजवस्त. ३ दौलतीचा. ४ कार्नेक.?

No. 144] [June 1766 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी समर्थांच्या पादांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृष्णराव गोविंद, साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. राजश्री आन्याबास फौज शुद्धां असमाधान शरीर स्वस्थ नसतांहि रवाना करून कितेक कामकाजें बाकी राहिली होतीं म्हणोन, इदुरीं राहून कार्याची निर्गम करून मजल दरमजल अन्याबास सामील बाकी फौज सुद्धां जालों. दाहा हजार फौज समागमें असे. परंतु मार्गी अन्याबाचा फारच वाखा जाला. निराशाच जाली होती. परंतु समर्थांच्या पुण्यप्रतापेंकडून आराम जाला म्हणोन कूच दरकूच मजला करून चापनेरास आज शनवारीं पावलों. मार्गी चापानेरकरानें लोकांस फारच पीडा केली म्हणोन शहे दिधला. वरचेवर पारपत्य करून लौकरच हजूर येऊन पोंह(च)तों. मुलाज(मत) जालिया सर्वप्रकार निवे(द)न केला जाईल. खावंदाचे मर्जीप्रमाणें वर्तणूक केली जाईल. राजश्री मालराव होळकरहि उजिनीस फौजसुद्धां आले, मागाहून कांहीं लोकांची बाकी समजावीश राहिली म्हणोन अटकाविले. तेहि निर्गम करून लौकरच फौजेंत येऊन सामील होतील; आणिक यजमानासहवर्त(मान) हजूर सरफराज होतील. सेवेसी श्रत होय हे विज्ञापना.

¶*Krishnarao Govind writes to Raghunathrao that he is marching with all possible haste to effect a junction with the main army.*

---

No. 145] [After the middle of 1666

नकल

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री गोविंद शामराव व विठलराव सिवदेव बालाजी गोविंद यांची नित्ये पत्रे येतात कीं याउपर फौज लौकर येऊन आमची कुमक होत नाही तर किले राहात नाहीं. अमल उठेल. सरदाराची रवानगी करावी तर भोसले सिंदे यांचे घरी रोज उठोन लोकांचा दंगाच आहे. होळकराची सरदारी तर नवाच बंदोबस्त होणे आहे. त्यावरून तूर्त छावणीस बुदलखंड अगर जाटवाडेयांत जयनगरचे मार्गे जाऊन छावणी करावी ही आवाई घालून कोथ्यावर शह देऊन तूर्त माघारे कूच केले. फौजेचा प्रकार म्हणावा तर सिंदे भोसले गवगवा.

हुजरातीस दोन वर्षें नालबंदी नाही. तमाम लोक उठोन जातात. जातील ते जातील; राहातील ते राहातील. दोन वर्षे पैसा नाहीं. याउपर लोकावर सख्ती चालत नाहीं. छावणीस पैका म्हणावा तरी भोसले सुधा चाळीस पंनास पाहिजेत. तूर्त मिळण्याचा प्रकार कलतच आहे. जर होळकराची फौज लवकर आठ च्यार दिवसांत जमा होऊन छावणीस गेली तर पाच सात मजली माघारे जाऊन फिरोन देसी येतील. नाही तरी इकडे छावणीच होईलसे दिसते. छावणी याउपर जाहाल्याने खराबीच आहे. मागाहून होईल वर्तमान ते लेहून पाठवीन. भोसले यास खर्चाचा ताण मोठाच. सरकारांतून थोडे बहुत देतात त्याणे गुजरान होत नाहीं. माघारे फिरल्यामुळें त्याची फौज राहाणार नाहीं. उठोन जातीलसे दिसते. कळावे हे विज्ञापना.

¶*The writer complains about the monetary difficulties of the Maratha Sardars. "The Sindia and the Bhonsle are in no way better", he adds. "They are always pressed for money by the army."*

---

*No. 146*] [*20-6-1765*

श्री

श्रीमंत् राजश्री दादासा-

हेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माहादाजी सिंदे कृतानेक विज्ञापना ता छ १ मोहरम मुा नजीक मकुंदबारी स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले, तेथे आज्ञा कीं खासा स्वारी नर्मदाउतरतिरी दाखल जाली म्हणजे तुम्ही हुजूर रिकाबेत हजीर होणे म्हणौन. ऐसियासी खासा स्वारी इकडे येणार त्यावरून बहुत संतोष जाहाला. स्वारी कधी येणार हे आज्ञापत्रीं लिहिले पाहिजे. स्वारी इकडे आल्यानंतर आज्ञा होईल त्याप्रमाणे सेवेसी हजीर होऊं. वरकड इकडील कितेक वर्तमान राजश्री नारोपंत नाना यास लिा आहे. सविस्तर सेवेसी निवेदन करतील त्यावरून श्रुत होईल. राजश्री नारोपंत नाना व विष्णु माहादेव विनंती करतील ते मान्य करून बंदोबस्त करून देणार स्वामी धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadji Sindia to Raghunathrao, promising that he is preparing himself for a campaign and would soon join him.*

No. 147] [9-6-1766

पो छ २ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री राऊ साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवेसीं नारो श्रीनिवास कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत जेष्ट सुध २ मुकाम भांडेर जाणोन स्वकुशललेखनास आज्ञा जाली पाहिजे. वरकड येथील वर्तमान तर काल भिंडेहून वाणी आले ते सांगत होते कीं जाटाची फौज भदावांत उतरली. पिनाट येथें ठाणें घातलें यैसें सांगत होते. दुसरे जाटाचे कागद गुजरास आले त्याजवरून गुजराकडून भगवंतसिंग जाणार यैसे वर्तमान आहे. सेवेसीं कलावें. दुसरे येथील ग्रहस्त काल पिंपरव्यास कूच करून गेले. आज येथें येतील कलावें. सायरेचा मजकूर स्वामीस दोन च्यार वेळां लिहिला आहे. प्रस्तु अ म या नी च्यारपांच रुपये येतात हें खरें लटकें राजश्री अपाजीपंत येथील फडणीस विनंती करितील त्याजवरून कलेल. सेवेसीं तरकारी पाठविली बितपशील.

| | |
|---|---|
| ८८७ वांगी वजन | ८८२ भाजी वजन |
| २५ काकड्या सुमार | ८८॥. मिरसेंगा |
| व फुलें कमल | २० खरबुजें |

येणेप्रमाणे सेवेसीं पाठविलीं आहेत सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The occupation of some Maratha outposts by the Jats is reported by Naro Shrinivas to Vishwasrav Lakshman.*

---

No. 148] [3-7-1766

पो छ २५ सफर सन सबा
मुा नजीक गोहद

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक आज्ञाधारक दादो उधव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ २५ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून

शेवकाचें व तालुके हायचे वर्तमान यथास्थित असे विशेष. [पुढील किती ओळींचा मजकूर फाटला कळत नाहीं.]

किले सोलापूरची आजपावेतों मसलतच पडली होती. आलीकडे राजश्री बाबूराव सदासिव यांचा तहरह टरला आहे. किला लौकरच हस्तगत होईल म्हणजे राजश्री रामचंद्र त्रिंबक याची रवानगी किल्यास करितो. मारनिल्हेनी रामचंद्र त्रिंबक यास सोलापुरास न पाठवावे म्हणून मुदा सारे मुद्यांत शिरे घातला आहे. याचा निकाल दरबारी कोणे रीतीचा होतो तो मनास आणून शेवेसी लेखन करीन, परंतु आज्ञेप्रमाणे रामचंद्र त्रिंबक यांचीच रवानगी होईल. कलम १

किले पुरंधरास वस्तवानी होती त्यापैकी आनंदवलीस आणावयाचा ठराव पेशजी जाहला आहे त्याप्रमाणे वस्तवानी आला नाही म्हणून श्रीमंत रावसाहेबास येक दोन विनंतीपत्रे लिहिली होती. हाली वस्तवानी रवाना करणार. लौकरच येईल म्हणून रामचंद्र त्रिंबक याचे पत्र आले आहे. कलम १

प्रो आमोद येथे भडोचकर मोगलाने दंगा फार केला. मुल्क तमाम उजाड जाला म्हणोन वर्तमान आले आहे. येविषईचा मार सेवेसी पूर्वी लिहिलाच आहे. व विठल हरि याजकडेस दीड लक्ष रुपये रसद करार केली होती त्या प्रो मजकुरी दंगा जाहला व बंद पडली. आकार कमी

राणोजी सिंदे हवालदार किले सातारा यासी देवाज्ञा जाली. येविषईचा व पुढील बंदोबस्ताचा सविस्तर मजकर पूर्वी शेवेसी लेखन केलाच आहे. सांप्रत मारनिल्हेचे पुत्र धोंडजी सिंदे याचे नावे पुणियाहून श्रीमंत राजश्री रावसाहेबी किल्याचे बंदोबस्ताविसी सनद पाठविली आहे. म्हणून किले सातारा येथून पत्र आले होते व शेवेसीहि किलेमारीहून पत्र आली ती शेवेसी रवाना केली आहेत त्यावरून विदित होईल. कलम १

किले पुरंधर राजश्री नारो आपाजी यांचे स्वाधीन श्रीमंत राजश्री राऊसाहेबानी करून वस्त्रें दिल्ही; आणि रामचंद्र त्रिंबक यांस समाधानाचे पत्र पाठविले होते की तुम्ही चिंता न करणें, लोक सुधा तुम्हास सोलापुरास लौकरच रवाना करितों म्हणून. परंतु सोलापूरचा किला हस्तगत जालियावर मारनिल्हे आज्ञेप्रो तेथे चाकरी करितील तों पावेतो पुरंधरीच चाकरी करीत आहेत त्याप्रो घ्यावी म्हणून श्रीमंत रावसाहेबास शेवकाने विनंतीपत्र लिा आहे व याचअन्वये रामचंद्र त्रिंबक यासहि लिहिले आहे. लक्ष प्रकारें सदरहू अन्वयेंच घडोन येईल. उतरहि मागाहून जालियावर शेवेसी सविस्तर लिहून पाठवीन. कलम १

जाहला व भामेर परगणियाची जमाबंदी पर्जन्याचे आफ्तीमुळे कमी आली, सबब ऐवज द्यावयास मारनिल्हे मागे सरले- यास्तव हरदू माहालचा आकार मनास आणून त्या अजमासे रसद घेऊन विठल हरीकडे मामलत सांगावी न सांगावी येविषईची आज्ञा जाली पाहिजे म्हणून पूर्वी विनंतीपत्रें शेवेसी पाठविली आहेत त्याची उत्तरे पाठ- विणार स्वामी समर्थ आहेत. कलम १

गंगापूरचे मुकामी तालुके हाये येथील बेगमीस इतलाख ऐवज द्याव- याचा नेमिला आहे तो द्यावा म्हणून श्रीमंत राजश्री रावसाहेबास विनंती केली होती. ते समई आज्ञा जाली की प्रो आमोद व प्रो भामेर येथील रसदेचा ऐवज तालुकियास द्यावासा पूर्वीच ठराव जाहाला आहे म्हणून आज्ञा जाहली. त्याजवरून विनंती केली कीं हरदू परगणियाचा ऐवज आनंदवलीस द्यावा व किल्यास स्वामीकडे विनंती करून नेमणुकेप्रो ऐवजाची बेगमी करून द्यावी ऐसी मजला आज्ञा आहे म्हणून विनंती केली. त्याजवरून पुणियास गेलियावर बेगमी करून देऊ म्हणोन आज्ञा केली. अलीकडेस पुणि- याचे मुकामीहून विठल हरि टकले यास पत्र सादर जाहाले आहे की प्रो आमोद व भामेर येथील भरणा करा- वयास तुम्ही हुजूर येणे. त्यावरून फिरोन विनंतीपत्र पुणियास लिहिलें शेवकासमक्ष आज्ञा जाली होती की सरकारचे जासूद आशेरीस आहेत, त्याजकडेस पत्रे पाठवीत जाणे तेथून हुजूर येतील. त्याजवरून आजपावेतो दाहाबारा पत्रे आशेरीस रवाना केली व दोन जोड्या साविस्तर लेहून मुजरद हुजर पाठविल्या, परंतु उतरे येत नाही. शेवकलोकास खावंदानी कृपा करून पत्राची उतरे पाठविलियास सर्वावर दबाव पडोन कामकाजाचे बंदोबस्तास संशय राहात नाही, तरी कृपा करून उत्तरें पाठविणार स्वामी समर्थ आहेत.

कलम १

किले भामेर राजश्री महिपतराव आवजी चिटणीस याजकडून छ १ जिल्हेजी सरकारात येऊन राजश्री बालाजी बाबूराव याचे स्वाधीन जाला. तेथे लोकांचा भरणा तालुके मुल्हेर प्रो पनास माणूस व येथून नामजाद पाउणसे माणूस येकूण सवासे माणूस नेहमी रवाना केले व हवालदार व सबनीस फडणीस कारखाननीस दफ्तरदार यांची नेमणूक करून किल्यास * * * * स्त चांगला केला आहे. शेवेसी श्रुत होय. कलम १

इकडील तालुकियाचा बंदोबस्त यथास्थित करून आषाढमासी पुणियास जाऊन सन सीतचा इतलाख ऐवज तालुके हायेचा येणे तो व पेस्तर साल सन सबा सितैनचा नेमणूक ऐवज द्याव- याचा ठरेल त्याप्रमाणे श्रीमंत राजश्री

---

+ नकी, पृथक्.

4272

आहें. उत्तर आलें नाहीं. सारांश श्रीमंत रावसाहेबांची मर्जी हरदू माहालचा ऐवज किले हायचे बेगमीस देवावा ऐसी दिसत्ये. येंविषईची आज्ञा येईल त्याप्रो वर्तणक करीन. कलम १

रावसाहेबाजवळून नेमून घेऊन ऐवज वसूल करून आणऊन आज्ञेप्रों आनंद-वलीस पावता करितो. कलम १

येणेप्रमाणे नव कलमे शेवेसी लिहिली आहेत. याची उतरे पाठविणार स्वाम खावंद आहेत. किले हाये येथील तालुकदारास बंदोबस्ताविषई सरकारची आज्ञापत्रें सादर जाहली ती रा। केसो गोविंद याणी परभारी रवाना करून उतरे आणऊन शवेसी रवाना केली आहेत, वरकड सर्व तालुकदाराही किल्याचा बंदोबस्त यथास्थित राखोन सावध आहेत. रा। गणेश विठल याणी सातारियाहून पत्रें पाठविली ती सेवेसी रवाना केली आहेत, त्याचीहि उतरें सादर होवयास आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A full and explanatory news-letter by Dado Udhav to Dadasaheb, answering nine items of dispute referring more or less to the estrangement between the Peshwa and his uncle.*

---

*No. 149*] [*29-7-1766?*

पौ छ २१ सफर

श्री

श्रीमंत राजश्री राव

साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक महिपत शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २१ माहे सफर दोन प्रहर दिवस स्वामीकृपेकरून येथास्थित आसे विशेष. जवाहिरसिंग यानी रामपुरियाची आवाई घाढून राजश्री बालाजी गोविंद याजवर दाहा पंधरा हजार फौज दगा करून पाठविली आहे. आगोधर जवारसिंगाने राजश्री बालाजीपंतास लि॥ होते कीं फौजसुधा चाकरीस येणे. त्यास ते न आले म्हणून दगा करून फौज पाठविली म्हणून बाजारी वर्तमान आहे. कोंचेस पत्र आज वर्तमान यैकिल्यावर पाठविले. तेथून तथ्य वर्तमान् आलियावर सेवेसी लेहून पाठऊ. यैकिले वर्तमान लि॥ आसे. बहुत काये लिहिणे? सिमथरीहून पत्र बजिनस आले आहे त्याजवरूनहि कलेल. फौज बालाजीपंताची घेरली आहे. हे तहकीकच आहे. कोंचेत ठाणे बसले. लढाई दोही फौजेची होत आहे. कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Mahipat Shankar reports to Vishvasrao Lakshman the treacherous attack of Jawahirsing against Balaji Govind Kher.*

No. 150] [6-8-1766 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब साहेबाचे
शेवसीं

विनंती शेवके मानाजी सिंदे दंडवत विज्ञापना तागाईत छ २९ सफरपर्यंत साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे. यानंतरे आज्ञापत्री सादर जाहाले बहुत संतोष जाहाला. येथे माहादजी सिंदे याजकडील सेवा घडावी तो प्रकार लिहिला, ऐसियासी कार्ये करणे तो विचार धणियाणी ध्यानात आणिलाच होता. दोन वर्षे काम केले, आज्ञेत राहिले(लो) ते जगप्रसिद्ध आहे. आम्हापासून सेवा घडणे त्यास दोन मास जाहाले. भाषणात मनस्वीपण करावे तरी ईश्वर परिणाम लावील, धण्याचे पुण्य उपयोगी पडल तेच खरे. आम्ही आपले चितात दृढनिश्चय येकच केला आहे. खावंदाचे चेरणापासी येकनिष्ठता आहे तरी माहाराजाच्या वरदहस्तेकरून कार्येभाग सिद्धीस जाईल. फौजेची तरतूद आजपर्येत पाच सात हजारपर्येत जाहाली आहे. पुढें करीतच आहो. येवढ्या आठा दिवसात प्रस्थान करावे हे मानस आहे. राजश्री बालाजी गोविंद व बहिरो अनंत व विस्वासराव लक्ष्मण व आन्यत्रास स्वामी आज्ञापत्रे सादर जाहालीच आहेत, ते सामील होऊन वर्तणूक करतील. आम्हीहि पत्रे त्याजकडे वरचेवरी रवाना करीतच आसतो. राजश्री जनार्दन विठल बराणपुराच्या रोके गेले. राजश्री बालाजी गोविंद ते येकत्र जाहाले. वरचेवरी आम्हीहि पथके रवाना करितो. माहादजी सिंदे उज्यनीस आहेत. पागा माहालोमाहाल चारणीस पाठविल्या आहेत. बारगीर नाहित. माहालकरी जमीदार रुजू जाहाले नाहीत. च्यारसे रावतानिसी शेहरात आहेत. लोक गपा फौजेविसी मारितात. आमची बातमी येणेप्रो आली. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Manaji Sindia assures Raghunathrao of his full support and informs him of his preparations and those of Balaji Govind, Bahiro Anant and Vishvasrao Lakshman whom he expects to join at once.*

---

No. 151] [8-8-1766 ?

पौ छ १ रौवल

श्री

यादी कामाची येणेप्रो विनंती करून करावे.—

१ सरदारास व देसीं पत्रें लिहिणें लवकरच येत ऐसे.

4274

१ जाटाकडे बातमीस माणसे पाठवावी. दिनचर्येचे वर्तमान आणवणें. खर्चास द्यावें. विलंब न करावा.

१ लोकांस रोजमुरा द्यावा. तूर्त स्वारी पाठवावी अथवा पायची माणसे कुंभेरां[1] पाठऊन रामनगरकर गत्र (?) मोकुमसिंगानें जाळले; गढियास वेध आहे, दूर करावा. त्याचीं माणसें एके दो गांवी असतील ते मारिल्यानें दुंडी[2] मिटेल.

१ रा. चिमणाजी मोरेश्वर यास पत्र ल्याहावें. चंदेरावगैरे कोठेल्याकडील बोभाट मिटे ऐसे करावे.

१ वोडसेकर देवीसिंग भटाचार्यास वस्त्रें द्यावीं. मतलबाचा कागद द्यावा. येक कारकून देऊन निश्चय करून आणवावा. कारकून नेहमी वाकफकार तेथें असावी. खबरदारी वाईट कळल.

१ तूर्त गलबलीचा प्रसंग आहे, याकरितां जमीदार हाताखाले घ्यावे. रोजमुरा द्यावा. चाकरी घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| उदगावकर | जिबनेकर | नानरेकर चाकर सिवाय |
| १ | १ | रायसिंग हणजीतसिंग |
| बुदसिंग धंदेरे | अजितरायास | १ |
| आबरकर | व पदमसिंगास | पहिलासिंग |
| १ | पत्र ल्याहावें | १ |
| | मयापूर | |
| | १ | |

सदरहू चाकरीस बोलाऊन वोलें[3] बर्तरीक[4] पोटास देऊन ठेवावे.

१ सरदार सर्व बोलाऊन खातरजमा करून घ्यावी. किल्यात ठेवणे. त्यांची नेमणूक याद करून ठीक करावी. किल्यांत कतवार[5] असेल ते दूर करावे. नेहमी ठेवणे ते करार करून सरदाराचे लोक येकूण नेमणूक करून पकी करून ठेवावे, म्हणजे खातरजमा जाली.

लोकाचीं कुटुंबे शहरात आपले आज्ञेची वाट पहात बसली आहेत. त्यास सेपंनास स्वार माणूस देऊन घाटावर पोहचवावी. क्षणक्षणाचा गुंता वारावा. उपेक्षा न करावा. समयास या गोष्टी घडोन येणार नाहींत. विनंती करावी, करणे न करणे येख्तियार स्वामीचा. जाट येतो याचा निश्चय गिरमाजी पंताच्या पत्रावरून कळलाच असे. बुधीस वैर न करावे.

---

१ कुंभेर (?). २ दुंडी=दंगा. ३ वोल = जामीन. ४ यथामार्ग.
५ एक जात.

१ किल्यांत जकीरा[१] यादीप्रो करावा. लाकूडफाटे व तृण सिसे वगैरे जिनस कांही सुभेत आहे तो जमा करावा, आईते वेळेस काही होणार नाहीं.

१ माणसे जदीद[२] ठेवावी. त्यास पोटास द्यावयास अविछिन पैसा पाऊन दिलखुलाशीने चौकीपाहारा स्वारीसिकारीस हुशार राहतील, तैसेच आपले सिलेदार व पागा वगैरे सर्व लोक दोन महिने अछरजी पवार वगैरे यास पैसा पावला नाहीं, याचा शोध मनास आणून, आज्ञा करावी. सुभेतीमधे[३] दिल्हे न दिल्हे, दोन दिवस अधिक उणे जाले त्याचे कठिण नाहीं, असां देताच सर्व गोष्टी कामाच्या असेत. तुम्हापासी आहे वा नाहीं हे सिबंदीस म्हटलेयानें माणूस बेहिमत होते, राहावे न राहावें, संदेह प्राप्त होतो. हे गोष्टींचा बंदोबस्त केला पाहिजे. आधी हे गोष्टी व किल्याचा जकीरा करावा. उपेक्षा नसावी.

१ एक एक काम ध्यानास आणून याजवर एकएक ग्रहस्त नेमून सरबरा करणे ते करावी.

१ श्रीमंत राजश्री त्र्यंबकरावमामा याचीं पत्रें आली. त्यांचा सरंजाम करावा. पत्राचे जाब डंघाईतून पाठवावा.

१ राजश्री बाळाजीपंताचे खबरीस माणसे पाठवावीं.

१ करेरियाची मजबुती करवावी. गिरमाजीपंताचे पत्राचा भाव ध्यानात आणून कर्तव्यता करावी. जाटास पोकळच अजी ता़ा सापडले. ज्या गढ्यांचा भरवसा त्यानी आपणच गोळी न वाजवितां ठाणी कायम करीत आला. रामपुरा गोपाळपुरा, इंद्रूखि, बिलाव, आमायेन, जालौन, कोच, आंकोडी वगैरे जागा कालपीदेखील सुटली. आश्चर्यच जाले. सिकू (?) त्याचा बसून चुकला. जमीदारानी मरावें, जमीन न द्यावी, त्यानी शस्त्रे सोडिली, ऐकून अपूर्वच वाटतें. आपण मजबुतीस प्रेत्नास चुकों नये. श्री उत्तम करील. सावधानीस आळस नसावा.

१ दरवाजापुढील रेवंणी[+] खरखरी करवावी. जागा कार्याची असे.

१ समयास खर्चास मागेपुढें घेतल्या काम नासेल. विनंती केली; रागास न यावें.

सदरहू मतलब तूर्त आठवले ते विनंती केली. परिसोन योग्य वाटेल ते करावें. न वाटे ते न करावें.

¶*A memo of important and comprehensive suggestions made (probably to Raghunathrao) during his expedition against the Jats in 1767. The paper explains several imperfections of Maratha garrisons in Bundelkhand.*

---

१ सांठा. २ नवी. ३ सुबत्तेंत. + किल्ल्याच्या दरवाजापुढील मातीचा उतरता ढीग पाय न निसरेसा करावा.

No. 152] [Recd. on 19-8-1766 ?

पौ छ १२ रोवल बंद ३

श्री

ताजाकलम. वर्तमान लिहिल्यावरी जाटास गुजर व दतियेवाल्याकडील ध्यानतराय दिवाण भेटून जवाहीरसिंगास दभो व असमपूर येथें मुाा करऊन जमीदाराच्या चितात यांचा अमल उठऊन द्यावा याअर्थे बाह्यात न दर्शवितां ठाणेयास उपद्रव मांडला असे. जमीदार भर हाच देतात कीं, झासी घेतल्यावर आपणच ठाणी सुटतील. या मजकुरास्तव च्यार दिवस मुाा केला असे. आजी उद्यां मनसबा दृढ करून येणार. या प्रांतचे दंडी तितके जाऊन भेटले असेत. सरदारांस रामकिसन महंत चेमल उतरला चैत्रमासीं, त्या दिवसादारभ्य पत्रांचा सेतु केला परंतु यावयास प्रथम दिवसच असे. ते आश्विन कार्तिक मासीं येणार तों इकडें दरोबस्त अमल जाट करितो. कालपी प्रांत व कछ्वाधार व भदावर व तोंवरधार व सिकरवार, दंडरोली, खितोली कुल जाटाचा अमल जाला. कोण्ही उपराला न करी. त्यास सांप्रत मोकले रान पाहून प्रसर दिवसेंदिवस करित येतो. येका दों दिवसीं आम्हांसी गांठ घालितो. माहाराजांचे प्रतापेकरून त्यासी झुंज होईल, ते परस्परें श्रवण होईल. कस्त महन(ती)स चुकणार नाही. उपराला जाला पाहिजे. सामान सरंजाम सर्व नवीन प्रसंगानरूप केला आहे. पहिल्या सरंजामाप्राा नाही. खर्च तोफांचा बहुत आहे. असो; आपला प्रताप समर्थ असे. उपेक्षा हिंदुस्तानची न करावी. मातबर स्थळें ग्वालेर झासी नामी जागा राहिल्या. पुन्हा आपणास पूर्ववतप्रमाणें अमल करावयास, राज्यास शासन करावयास अशक्य नाही. जाटाचा दुराग्रह स्थळांचाच बहुत असे. ताल मनसबा लिाा म्हणोन क्रोध न करावा. यास मागें पायबंद असता तर इकडे पाय न ठेविता. निरांकुश गर्वारूढ अतिशय उन्मतपणें या प्रांतात असे. दाहा वीस हजार फौज सरदार येते तरी जाटास विचार पडता, तो प्रकार कांहीच त्याच्या नजरेस येईना. राा बालाजीपंतास इतबार दर्शऊन दगा केला. ते टलोन व्यत्रवतीपार राज्यांचे आश्रय गेले. आम्हांस आश्रय स्वामीचे चरण किंवा ईस्वर (ईश्वरावर !) भार देऊन स्थल खावंदाची जागा राखून असों. उपराला करावयास स्वाम समर्थ असेत. प्रांतात जमिदारानी कुल दुंडी केली. अमलास कोण्ही पुसत नाही. ठाणी आजीताा रक्षून कर्ज खाऊन खावंदाचा नक्ष राखिला असे. पुढें राहणे स्वामीचे प्रतापच असे. दुसरें जाणत नाही.

¶*This is a postscript of a letter addressed to Raghunathrao which is unfortunately missing. The writer gives some idea of the preparations that he had made to conduct operations against the Jats in the North. The writer feels confident of vanquishing them.*

No. 153] [28-10-1766 ?

छ २३ जौवल

श्री

श्रीमंत स्वामीचे शेवेसी

विनंती. उतु(डि?)ण्यांची गढी घेऊन फौज दभव्याकडे गेली म्हणौन लिहिलें, त्यास स्वामी दैववान आहेत. दभवा महुमोहनी सर्व माहाल सुटतील. चिंता नाही. जाटाचा रेच पुर्ता माधोसिंगाने मोडिला हेहि ॥ अव्याक्षेपो भविष्यंत्या: कार्यसिद्धेर्हि लक्षणं ॥१॥ ऐसे आहे. दोनी संतोषाची वर्तमाने राजश्री बाळाजीपंतबाबा याजला लिहावी. हे विनंती.

¶*The writer reports the defeat of the Jats at the hands of Madhosing of Jainagar.*

---

No. 154] [Recd. 2-12-1766

पो छ २९ जाखर

श्री

श्रीमंत स्वामीचे शेवेसी

पोष्य उभयतांचे साष्टांग नमस्कार विनंती ऐसी जे. राजश्री सिंद्याकडून भदावर कछवाधार दोन्ही संस्थानच्या सनदा स्वामीस आल्या हे संतोषाचे वृत्त स्वामींनी कृपा करून स्मरणपूर्वक लिहिले त्याजवरून बहुत आनंद जाहाला. दोन्ही आनंदाचे प्रीतिसंगमी मानस मज्जनोन्मज्जन पावले असे. बहुत काये लिहिजे? कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनंती.

¶*The writers express their delight on hearing of the submission of the two provinces Bhadavar and Kachhvadhar by Sindia to the Peshwa.*

---

No. 155] [19-12-1766

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
कृष्णराव बलाल गोसावी यासी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार. सुा सबा सितैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविलें ते पावलें. श्रीमंत रावसाहेब स्वामीकडील लक्ष फार राखितात.

फौज व ऐवज काही स्वामीकडे पाठवावा हे याचे मानस होतें. परंतु थोडी फौज पाठविल्यानें हिंदुस्थानी फौज थोडी आली म्हणतील व ऐवजाची सोये आहे नाही ते स्वामीस कलत आहे, म्हणून विस्तारें लिहिलें ते विदित जाले. ऐशास चिरंजीव इकडील कालजी करितात हे उचितच आहे. ती दौलत व ही दौलत निराली नाही; येकच आहे. इकडे थोडासा मसलतचा प्रकार बनला होता. खर्चाची वोढ च्यारपाच लक्ष पावेतों चिरंजीवानी पाठवावे, परंतु तेथेंहि वोढीचा प्रकार. त्यास त्यांचा इलाज कायें? प्रस्तुत इकडील वर्तमान तरी, गोहदेहून कूच केलियाचे पेशजी लिहिले आहे. तेथून कूच करोन जाटाचे शहावरी आलो. त्याचे राजकारण सलुखाचे लागले. केवल बिघाड करावा तरी दुतर्फा खराबी. यास्तव इकडूनहि सलुखाचाच प्रकार केला. त्याजकडील महंत रामकिसन व उमरावगीर गोसांवी हुजूर येऊन मुलाजमत केली. तोहि भेटेल. प्रांतीचा विचार काही नाही. चाकरी करीन म्हणतो. लाख पंनास हजार रुपयाचे वित्त, जवाहीर, हाती, घोडें वगैरे मात्र नजराणा येईल. सरकार मनसब्यासहि उपयोगी पडतील. यामागें काही मसलतीमुले वोढीचा प्रकार जाला होता. पुढें श्रीकृपेकरून काही तऱ्ही सोये पडेल. जाणिजे छ १६ रजेब.

¶*Raghunathrao writes to Krishnarao Ballal that he is pleased to hear of the great regard shown to him by the Peshwa. He encloses his programme in the North and refers to the negotiations which he was holding with the Jats.*

---

*No. 156*] [*20-12-1766 ?*

श्री

सेवेसी आज्ञाधारक बालाजी गोविंद कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। मार्गसीर्ष वा। ४ पावेतो येथास्थित आसे विशेष. पा। भेलसे वगैरेच्या सनदा तयार जाल्या त्या सनदा रा। खंडो माहादेव याजवळ पाठविल्या आहेत. सिके करून द्यावयास आज्ञा करावी. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Govind sends sanads for Bhilsa and other places and requests the Peshwa to issue them.*

---

*No. 157*] [*23-12-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक मालराव होळकर कृतानेक विज्ञापना. येथील कुशल तागाईत मार्गशीर्ष वद्य ७ मुकाम इंदूर येथास्थित असें विशेष. छ १८ जमादिलाखरचे

आज्ञापत्र सादर जालें तें उत्तम समयीं प्रविष्ट होऊन संतोषावाप्ति जाली. जाते-समयीं फौज रवाना करितों, आम्हीहि मागाहून सत्वरींच येतों म्हणून बोललें असतां जलद फौज येत नाहीं. जाट ढवलपुरास आला हें प्रसंगी तुमची फौज तुम्ही असावें म्हणून जलद फौज यावयासी आज्ञा केली. ऐशियास आम्ही साहेबापासोन आज्ञा घेऊन दरमजल इंदुरास आलों. येथें आलियावर आधीं स्वामीशीं ऐवजाचा करार करून आलों. धनी मोहीमशीर. समयोचित ऐवज पावला पाहिजे, यामुळें आठपंधरा दिवस त्या तजविजीस लागले. कोण्हेही प्रकारें ऐवज वाटें लाऊन फौजेचे रवानगीस लागलों. सरंजामी फौजेवर सोयीस नाहीं. इतलाखी शिवाय भरणा न होय. निकडीचे समयीं स्वामीपाशीं फौज पाठवणें तें मनांत भरून सेवाचाकरी घडे ऐसी पाठवणें. यामुळें नवी फौज ठेविली. मागील लोकांचा राडा, येक दिवस चैन नाहीं. तशांत आठपंधरा दिवस राजश्री गंगाधरपंत तात्यास समाधान नाहींसें जालें. चहूंकडून येक प्रकार मागील लोकांचीं तीन सालें जालीं. त्यांचा हिशेब करून समाधानाप्रमाणें देणें. त्यांसीं करोड रुपये पाहिजेत. घर पाहतां माहलचा ऐवज स्वारींत नेऊन भाक्षिला. कांहीं चांदवड नालबंदी वगैरे खर्च सावकारी कर्ज घेऊन केला त्याचें रदकर्जी पावला, बाकी मागील सावकारांची देणें. पुढें तीन सालां समजावीस व हली फौज रवाना करणें. त्यांची नालबंदी व नवी फौज बा स्वारीची येणें. जुनी नवी त्यासी नालबंदी येकूण मुबलग पैसा पाहिजे. ती वर्षीचें ओझें येक समयीं पडलें. या काळांत तीर्थस्वरूपांस कैलासवास जाला. ईश्वरसत्ता प्रमाण. त्यानीं आम्हांविशी सर्वप्रकारें स्वामीस निरऊन समक्ष हातीं देऊन आपण निधन पावले. ते येकनिष्ट स्वामीसेवा यावच्छक्ति केली. पुण्यवान प्रतापी, खावंदांनीं त्यांचें ठायीं अकृत्रिम लोभ केला, त्यांचा आशीर्वाद आमचे पदरीं आणि सर्व प्रकारें स्वामीचें अभय पूर्णत्वें मग आम्हांस चिंता काय आहे? बहुत दिवसांचे राड्यामुळें च्यार दिवस बखेडा जाला. तथापि आम्ही सर्व निकडी सोसून रवानगीची फौज देशींची उत्तम निशा पडे ऐशी ठेऊन त्यास नालबंदी देऊन राजश्री सदाशिव गंगाधर यांची रवानगी केली. एथून सुमुहूर्तें स्वार जाले. अत:पर दरमजल सेवेसी अविलंबें येतील. वरकडहि लोकांचे मागील निर्गत बहुतेक झाली. कांहीं राहिली तेहि होईल. ज्याची समजोती पडली त्यासी नालबंदी देऊन आज्ञा दिल्ही. जलद फिरोन यावयाचे करार केले आहेत ते सत्वरीच श्रीइच्छेनें येऊन पावतील. खांवदांचे पुण्यप्रवाहे तीर्थस्वरूपांचे आशीर्वादें यावर कांहीं अगाध न पडतां फौज तों अतिसत्वरच येऊन पावती आणि आमचे स्वारींचेहि योजनेंत लागलों. यंदा लोकांचा बखेडा फार जाहला, त्याचा विस्तार काय

लिहावा? लोकांनीं कांहीं विचार ठेवला नाहीं. प्रस्तुत स्वामीचे कृपेकरून फौजेची रवानगी होऊन पुढील कामहि चालीस लागलें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Malrao Holkar assures Raghoba that he is making every effort to send his strong and well equipped contingent to the addressee, the delay having been due to various domestic and financial causes.*

---

*No. 158*] [*23-12-1766*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना. ताजा कलम वदंता ऐकिली कीं खासी स्वारी चमेलीजवळ जाऊन जोहरमल जाट याजकडील वकील येऊन सेवेंत शरण येऊन राजश्री नारो शंकर राजेबाहादर यास घेऊन जाऊन सख्य करून राजश्री सुलतानजी लांभाते वगैरे सरदार सोडून आणिले. त्यास मार्गशीर्ष वद्य ७ राजश्री मालेराव होळकर यांणीं खुशालीचा तोफखाना ज्यारी केला. त्याजवरून त्याजकडील लोक वगैरे संतोष पावले कीं श्रीमंत साहेब या प्रांतीं आले म्हणोन सर्वाची स्थीत राहिली. नाहीं तर या मुलकांत दुंडी होती. परंतु श्रीमंत साहेब पुण्यवान येशस्वी; येणेंकरून सर्व पादाक्रांत संस्थानिक होऊन शरण आले. येणेंकरून आनंदमय सर्व जाहाला. माझी वकिली जोहारमल जाट याजकडे सरकारांतून आहे. त्यास तिकडील कामें-काजें पडलीं आहेत. सेवेंत चाकरी करून दाखवितों. सांप्रत हेहि साहेब-चाकरी आहे. मजला उजूर नाहीं. त्यास साहेबी मजवर कृपा करून उर्जित करावें; आणि प्रस्तुत राजश्री सेव्याजी ऐतोले यास ताकीदपत्र पाठवावें. पृथ्वींत लौकिक जाहाला कीं साहेबी सरकार बिज्यागड येथील मोकासा सरकारांत खालसा ठेऊन कमावीस सांगितली. त्यास साहेबी सेवकाचा बंदोबस्त करून द्यावा, तदनंतर मातबर कामें घ्यावी. पूर्वी हिंदुस्थानांत मातबर कामें घेऊन चालविलें. पुढेंहि साहेब ऊर्जित करणार धनी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञाप्ति.

¶*The writer, a Maratha Vakil with the Jats, bestows fulsome congratulations upon Raghunathrao for the success of his expedition which had in reality proved ruinous.*

No. 159] [1766 ?

श्री

सेवेसी विज्ञापना यैसीजे. जाटाकडील आज बातमीचे वर्तमान आलें. त्यास रूपराम[१] यास आपले साधनानिमित्य रवाना केलें आहें. त्यास निक्षूण ताकीद केली आहे की त्वरेने जाऊन श्रीमंतांचे साधन करावें. दानसाहा त्याजवल होता त्यासीहि कजिया होऊन त्यास निरोप दिल्हा. याप्रो गोसांवी यांकडे वर्तमान आलें, त्यावरून सेवेसीं लिहिलें असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter reports that the Jat Raja has sent Rupram to negotiate a peace with Raghunathrao, having expelled Danasha, the main source of trouble.*

---

No. 160] [1766

श्री

अपत्येंसमान मोरो बाबूराव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. गोहदकर राणे याजकडील मामलतीचे जाबसालाच्या करारामदारास्तव वकील हुजूर बोलवावा म्हणोन पेशजी पत्रे आली होती; व हाली त्याचे बोलणें कीं प्रस्तुत या प्रांती धामधूम आहे. या प्रसंगी सरकारचाकरी करून धन्याची मर्जी संपादून घ्यावयाचे हेच दिवस आहेत; तर वकील हुजूर पाठवावा म्हणौन आज्ञापत्र आलियासी वकील शेवेसी रवाना करूं. करारमदार ठरेल त्याप्रेाा फौजसुधां आज्ञा होईल त्यासमागमे येकनिष्ठेने चाकरी करूं. या प्रांतातील इतर स्थलाच्या फौजा चाकरीस येतात त्यांचें बंदोबस्त करून दिल्हे आहेत त्याप्रमाणे आम्हावर कृपा करून, करारमदार करून दिल्यास शेवाचाकरी करूं व नजरनियाजहि जीवनमाफक आज्ञा होईल त्याप्रमाणे बंदोबस्त स्वामीच्या मर्जीनरूप करूं म्हणौन माारनिल्हे याचा संकेत आहे; व सदासिव गोविंद याचे मुखजबानी वर्तमान यैकोन त्याचे वकिलास बलावणेयाचें पत्र सरकारचे दिल्यास उतम आहे. पालेगार हाताखाली आलियाने सरकार उपयोगी आहेत. माारनिलेकडील कारकुनानी आपणास पत्र द्यावें म्हणून सागितले, त्यावरून पत्र लिहिले आहे. उचित दिसेल ते करावें. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Moro Baburao writes about the submission of the Rana of Gohad and his desire to send his envoys to effect an agreement with the Marathas.*

---

१ कटारी ?

No. 161] [1766

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गणेश संभाजी सो। नमस्कार विज्ञापना. ता। छ २६ माहे सेवाल मो। लस्कर * * * * दाखल असे विज्ञापना येसीजे. हुजूर येणे येशास * * * * * * * फौज समागमे * * * * * * * होते. स्वारी * * * * * * * तेव्हाच * * * * * * कामगारी गळी * * * * * * * याजकरिता गुतोन * * * याजपासी दीड वर्ष आहे. काम सांगितले तें करावे लागलें. त्याचे कर्ज मागे घेतला येवज तो देणे तैसाच राहिला. हेंहि सरमंदगी.+ कार्यास पाठविलें तिकडे जाणे प्राप्त जाहालें. यामध्ये साहेबसेवा घडोन येते; यास्तव इकडे आलो. नाही तरी मालव्यात चरणापासी हाजीर जाहलो असतों. गुता गली पडिला होता याचा बंदोबस्ताकरिता गुतलो होतो. हाली याच्या लस्करास सामील जाहालो आहें. काजकाम जाहाले ते यांस समजाऊन देऊन यांचा निरोप घेऊन सेवेसी सत्वरच हाजीर होतो. मजविसी साहेबास कितेक सांगणारानी सांगितले असेल त्यास मी आपले कितेक वृत सेवेसी सविस्तर विदित करीन. साहेब धणी मायेबाप माझा निवाडा करणार स्वामी समर्थ आहेत. जबरदस्तीने ठेऊन घेऊन तिकडे पाठविले. माझा उपाये काये ? केव्हा चरण पाहेन ही मजला उत्कंठा * * * * * हे कागदपत्र यांस समजा * * * * पोहोचतो. पहिले आज्ञा * * * * * * * सवाली येका * * * * पावले श्रुत * * * * विज्ञापना.

¶*Ganesh Sambhaji who had gone over to Shuja-ud-daula after the disaster of Panipat is seeking to regain Raghunathrao's favour by offering his submission.*

---

No. 162] [1766 ?

३

(सुरवातीचे बंद गहाळ)

पार पाडणार धणी समर्थ आहेत. सेवकलोकीं आलें वर्तमान लिहावें. फौजा पाठऊन परचक्र निवारण स्वराज्याचे पालण करणे येख्तयार खावंदाचा आहे. निदान जाणून लिा असे. वरकड सविस्तर आर्थ रा। गोविंद रघुनाथ सेवेसी श्रुत करितील.

---

+ लज्जा, संकोच.

२.

तपसिले ! असो. दुसरे जवाहीरसिंग जाट पुष्करावर जाऊन बिजेसिंग राठोड मारवाडकर याच्या त्याच्या भेटी होऊन येक जाले. राजे माधोसिंग यासीं खेरकशा[1] प्रथम जाटाने केला. परंतु सांप्रत तिकडील सल्लख करावे, सर्व येक जागा होऊन दक्षणी मुलकाची जप्ती करावी, माल्वा सुधा हस्तगत करावा, य प्रांती गोहदकर यास पत्रे लिहिली आहेत, इकडील प्रांतात येकंदर परिल्वो[2] त्याचा जालाच होता. राजेरजवाडे त्यास पत्रे लिहून मागती गोहदकर सुधा फौज इकडे येणार हा परिछिन मनसबा आहे तथ्य बातमी आली आणि सांप्रत मुलकातील द्रिष्टोत्पतीत अनुभवसिध वर्तमान आहे ते सेवेसी लिा आसे. धण्याचे प्रतापे संकट निवारण होईल तेव्हा खरे. फौजेच्या व सिबंदीच्या खर्चाखाले येऊन पुढे सुभेता नाहीसा जाला, यामुळें संकट मोठे प्राप्त आहे. लिहिता विस्तार. आम्ही कायवाङमनेकरून येकनिष्ठ सेवेस आंतर करीत नाही.

¶*News-letter informing of Jawahirsing's march to Pushkar, his meeting with Bijesing of Marwad and the general rising of the chiefs against Marathas.*

---

No. 163] [1766-67?

पौ छ २७ सफर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे सेवेसी

विनंती. सेवक महिपत शंकर कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. एथील कुशल ता छ २७ माहे सफर स्वामीकृपेकरून येथास्थित असे विशेष. कोटरियास माणूस खबरीसाठी पाठविले होते, तेथील वर्तमान याप्रो आले जे. राजश्री बालाजीपंत सुखरूप जलालपुरी आहेत. सुज्यातदवला मुसानगर घाटमपूर येथे आलियाचे वर्तमान आहे. येरामडोरियास ठाणे गुजराचे गेले होते. तेथील लोकानी ठाणे बसून दिल्हे नाही. बहुत काये लिहिणे ! राजश्री गोविंद शामराज याजकडील सोधा (?) खबरीस गेला होता तो येथे आला. त्याणे वर्तमान सांगितले कीं सुज्यातदवला व फिरंगी सा पलटणे येसी आली आहेत. राजश्री त्रिंबकरावमामाहि त्या फौजेबराबरी आहेत म्हणून सांगितले. दुहिरी वर्तमान आले म्हणून सेवेसी लिा आहे. कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Mahipatrao Shankar writes to Vishvasrao Lakshman that Shuja is reported to have reached Musanagar with six platoons of English troops and that the attack of the Gujars on Yeramdori has failed.*

---

१ कज्या, तंटा. २ प्रसार.

No. 164] [1-2-1767

पो छ ९ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबक कृष्ण करंदीकर सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता. माघ शुा ३ मुा कसबे भडगाव प्रां खानेदश. स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्तित जाणून स्वकीये कुशललेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही आलियापासून कृपापत्र येऊन सांभाळ न जाला. तरी ऐसे न करावें. सदैव पत्री सांभाल करावा. आम्ही कुटुंबाखेरीज नाही. राजश्री धोंडाबा नो गोगले याजकडे प्रां भडगाव येथील बाबतीचा रसदेचा यैवज रुपये २२०० बाविससे आम्ही ठेवून आलो होतो. तो येवज त्यानी सेवेसी प्रविष्ट केलाच असेल. जाब त्यानी घेतला असेल. नसला घेतला तर देविला पाहिजे. गालेरची पत्रे पौष शु २ ची आली. श्रीमंत राजश्री दादासाहेब गोहदेचे मोरचे राजश्री महादजी सिंदे याचे विद्यमाने सलुख ठराऊन उठविले. पलीकडील जाठ जव्हारसिंग ढोलपुरास चमेलीपरतीरी आले. त्याचे मोहऱ्यावर अलीकडे चमेलीच्या श्रीमंत राजश्री दादासाहेब मुकाम करून राहिले. राजश्री उमरावगीर गोसावी याचे विद्यमाने व राजश्री नारो शंकर याचे विद्यमाने भेटी व्हाव्या यैसे ठरले होतें. परंतु जाठाचे चितांत कोण्ही संशये घातला कीं गोसावी श्रीमंतास भेदला आहे. तुम्हास दगा आहे. त्याजवरून येक दिवस रात्रौ जाटाने गोसावियाचे पथकावर हाला केली. फौज झाडून लुटली. जूज जाहाले. पाच सातसे माणूस पडले. गोसावी अमरावगीर, अनुपगीर, मीरजागीर येसे तीघे सरदार तीनसे स्वारानिसी पलोन श्रीमंताचे लस्करात चमेल उतरून आले. हा प्रकार मार्गसीर वद्य ७ सप्तमी अष्टमी इतका जाला. हे अलीकडे आले म्हणोन जाट दुसरे दिवसी कूच करून भर्तपूर येथे गेला. श्रीमंतानी कूच केले ते करोली (अपूर्ण)

¶*Trimbak Krishna reports to Nana Fadnis that Dadasaheb gave up the siege of Gohad and came to an understanding with the Rana. A meeting arranged between Jawahirmal and Dada was ineffective owing to the former's suspicion of the fidelity of his Gosavi allies who were routed and who had taken shelter with the Marathas.*

4285

No. 165] [2-2-1767

श्री

सेवक गोपाल चक्रधर विज्ञापना यैसीजे. अठाविसाव्ये साबानी जवाहिरसिंगानी वृंदावनाहून कूच केला ते गोवर्धनावर येऊन लस्करचा मुकाम जाहला. आपण निंबगावास सासुरवाडीस मेजमानीस गेले तेथें भोजन केले. बिजेराम सालेयाने पांचशत रुो व कापड रुपेयाचे ताटांत ठेवून जाटास नजर केले. जवाहीरसिंगानी घेतले नाही. रात्रौ निंबगावीच राहिले. साले याचे बाईकोवर कृपा फार केली. सदैव करीत असतात. तेथून येकूणतिसाव्ये साबानी कूच केला. लस्कर सुधा दीढ प्रहर दिवसी डीग दाखल जाहाले. उपरी रतनसिंग वृंदावनी राहिले होते तेहि डिगेत दाखल जाले. लस्कर सायरी[1] कुंभेर दरवाजियावर पडले आहे. आपणहि डिगेहून दोहूंचहूं दिवसी बाहेर निघणार. उपरी गिलच्याची बातनी तर बित्रा(या) नदीवरच आसे. परंतु याची बातनी मधून येत असत्ये. ठिकाणी नाही. माहाराजानी करून घ्यावी. उपरी जाटानी तबेलियाचे घोडे पाहिले. येक घोडा भुपालसिंग बाहादूरसिंग वैरवाला याचे लेकास दिला. वेरवाला व मुसेखान फरुखनगरवाला हे दोघे डिगेचे पके किलेयात कैद आसेत. उपरी स्वामीचे लस्करची बातनी जाटास आली जे लस्कर खिचीवाडेयास गेले, ते समई गोहदकराचा येक ब्राह्मण होता त्यास इषारा जाली जे काम करणे, तरी स्वामीनी ग्वाल्हेर जिल्हेयात फौज चांगली दाहा हजारपर्यंत ठेवावी. नाही तर गोहदकर प्रांतात दंगा करील जाणावे. उपरी जाटाने आपले खलबती लोकांस मटले जे श्रीमंत व माधवसिंग वगैरे सर्वासी मी बिगाड केला. आतां अबदाली आला तरी रोहिलेयासी मी येकवाक्यता करितो, जे रोहिले याची व आमची येकत्र मामलत चुकेल आणि हरकोणी येकासी सलूखहि ठेवावा तो यासीच ठेऊ असे मटले. परंतु चितातून दगाबाजीच आहे. रोहिलेयाचीहि दगाबाजी आहे. उपरी सीख आपणामध्ये फुटले. मयासिंग शाहस भेटला व चरसासिंग डोंगरास गेला. जसासिंग पळाला या जखमी आहे असी खबर सिखाची आहे. उपरी जवाहिरसिंग पहिले रमजानी स्वारीनसी पके किलेयांत गेले. गिरदनवाई[2] किला पाहून उपरी शहरपना ह गिरदनवाई पाहिला. जागजागा मरंमत करावयास सांगितली आणि मुलना मोसम नवलखा बागेंत उतराला, त्याचे येथे जाऊन घटिका येक बसून मग स्वारीनसी येऊन वाडेयांत दाखल जाले. मुलना मोसमाने जाटास नजर यक हती व येक घोडा पोषाक आठ यैसे नजर केले. याणी घेतले नाही. उपरी जाटानीहि मुलन्यासाठी हती १

---

१ लष्कराची रांग. २ तटबंदी.

व पालखी १ व घोडा १ यैसे तीन द्यावयास तयार केले आहे. बिदा-करिता वेलेस देणार. येकादाहू दिवशी बिदाहि करणार जाणावे. उपरी रणजितसिंग किशोरीचा लेक कुंभेर तालुकेयाचा डिगेत दाखल जाला. गंगा-प्रसाद राधाकुंडी होता तो डिगेस आला. उपरी शाहकडून पुंर्जा आला जे बियास व सतलुज दोहू नदी याचे दुआबेयात मछिवाडे याजवल दाहा कोसावर आहे. फौज मछिवाडेयावरती आहे. उपरी सीख काही भेटले. काही पलाले आहेत. ते शाहचे पाठीवर आले आसेत. मार्गे उपद्रव फार करितात सबब शाहास पायबंद बसला आसे. नजीबखानहि काही फतुरांत आहे आसी बातनी येथे आली. उपरी महंत येमुना पार जवरटपरावर आहे व तोफखाना येमुना आलाड महंताचे बराबरीने जात आसे. बलमगडावर तोफा राहतील. उपरी जाट डिगेंत पंचमी करून शष्टी या सप्तमीस कूच करून कुंभेरीस जातील. तेथून मुलेनमजकुरास बिदा करितील. जाणावे. उपरी दक्षणी देशास गेले म्हणून या मुलखांत आवई पडली आहे, तरी माहाराजानी सडी फौज पनास हजारपर्यंत सरहदेवर आसो द्यावी. समयावर उतरून तडाका द्याया यावर आसो द्यावी. उपरी नजीबखानाचा तोफखाना येमुनापार उतरला. रोहिलाहि जमा झाला आहे तोहि उतरणार. त्यावर गिलच्या दाव भारी करितो आहे. जाणावे. माहाराजानी तिकडील मामलती घेऊन स्वामीनी गनीमी कावा घालून येखा दिसा मुलूख झोडावा. तमाम रुजू होतील जाणावे. सारांश मर्जीस येईल तसे करावें. सेवेसी श्रुत होय हे विनंती. रा छ २ रमजान सोमवार प्रातःकाल मुा डीग.

¶*Gopal Chakradhar gives a report detailing the activities of the Rohilas and the Jats and the advent of Abdali into the Punjab and the harassment he has suffered from the Sikhs.*

---

*No. 166*] *[5-1-1767 ?*

पौ छ ६ साबान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे

सेवेसी

विनंती सेवक अपाजी मैराल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ४ माहे साबान मुा काा दमुवा महाराजांचे प्रतापे येथास्थित जाणोन स्वकीये निजानंदलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान इंदरुखीस येथून कायेत व च्यार माणसें पाठविली होती त्याचें काल प्रातःकालचें पत्र लिहिले ते आस्तमिती पावलें. त्यांत आर्थ दानसा साहाजार फौजेनसी इंदरुखीचे पेलतिरीं

+पत्र.

अहे. येलतिरीं दोन्से स्वार आहेत. फौजेत बोलवा हेच की काहारेवर जावे. पुढे जावे. परंतु आलीकडे जरूर येतील. माणसे स्वार पो त्यासाठीं नदीचे गांवी व काहारेस आले आहेत. काहारवाल्या राजानें लढाईचा सरंजाम केला आहे. रामपुरेकर राज्यास व गुजरास बोलावणी आली आहेत. याप्रमाणे तूर्त वर्तमान आहे. आसपास पाचापाच सात सात कोस लुटितात, तेनेकरून गांव उज्याड जाले आहेत. आपले तालक्याचे गांव तसि बतीस उज्याड जाले आहेत. तमाम लोकानी दहशते खाली आहे. जाटाकडील वकील रूपराम कटारी याचा पुतण्या रो गंगाधरपंतबाबाजवळ आला आहे. जाबसाल की पहुजयांतिरीं तुम्ही असावें, त्या तिरी आम्ही असांवे. तुमचा आमचा सलुक. याणी जाबसाल केला कीं सिंदपार तुम्ही राहाणें आलीकडे आम्ही राहूं येसे जाबसाल आहेत. ठरावात येईल ते मागाहून सेवेसी लिहूं. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Appaji Mairal informs Vishvasrao Lakshman of the inroads made by Jat Dansa and the ruler of Kahar. The terms of agreement provisionally proposed by both are also given.*

---

*No. 167*] [*7-1-1767?*

श्री

सेवेसी गोपाल चक्रधर विज्ञापना येसीजे. समरू व दानसा ऐसे व छत्रसिंग मलकापुरियाहून कुंभेरीस रवाना केले. मनुलाल व छत्रसिंग चवाण व किरपाराम पुरोहित भरथपुरास गेले. सिवनाथ पिनाहटेस गेले. बालानंद बैरागी बिदा होऊन आपले भिक्षाटणास गेले. फौज फार करून बतर्फ केली व गैरफौज आपलेले घरास लोक लागले. जव्हाहिरसिंग सडे सात-हजार फौज व काही तोफखाना जलेबी येसे जमातेनसी आहेत. आदितवारी सिंकंदरे याचे बागेत जाऊन भोजन केले आणि नवाडियात बसून यमुनेमध्ये सेर[१] करीत येऊन किले दाखल जाले. उपरी दुंदेखान बिसोलीत असेत. त्याकडून वकील शेखमहमद आशक व गणेश वेदांती येसे काही जिनस कस्तुरी व चवरे व शाल व काही कुत्री, बाज, घोडी येसे घेऊन येऊन फुरुकाबादेस पुरुषोत्तम महादेव याजपासी दाखल जाले. उपरी रतनसिंगजी(नी) परशरामगीर पलविला म्हणून जवाहीरसिंगाची मर्जी त्यावर फार क्रुध जाहली आहे. सिवनाथ बक्षी अटेरीकडेस गेला आहे. बुंदेलियाचे फौजेस दबाव, परंतु ती फौज सावध

---

१ सेर = सहल, पाहणी.

ठेवावी. प्रयागाकडील कांहीं फौज आलमचंदाचे सरादेस येऊन सात कोसावर उतरले असेत. नजीबखान रामडेयाचे घाटी असे. उपर मुलना मोसिंम व जैकिसनदास हे दोघे हाफीज रहमानकडून धुंदेखानानी पाठविले आहेत ते इटावियात असेत. तेहि पुरुषोत्तम माहादेव समागमे स्वामीजवळ येणार. नजीबखानाकडील डाक आगरे याहून पुढे स्वामीचे लस्करास गेला. हरसुख कटारे यासमागमे मोहबतसिंग जेपुराकडून येथे आले असेत. जोतपुरियाकडून वकील सिरपाव घेऊन आला होता, त्यासमागमे वकील देऊन जाटानी बिदा केले. रूपराम कटारे यास स्वामीकडेस रवाना करावयास मुकरा जाटानी केला असे. स्वामीचे पत्र सांडणीस्वाराचे हस्तें आले मंजे चरणाजवल येईल. त्याचा गुमास्ताच जैसुख स्वामीजवळ पुढेच आला आहे. जाणावे. उपरी सोमवारी जवाहीरसिंगानी डेरे येमुनेपार रामबागेत केले. गंगास्नानास जाणार. लस्कर समागमेचे पार उतरले. गंगाप्रसाद याजपासी आहेत, परंतु त्यावर यांची बेमर्जी आहे. नवलसिंग जाटाचा भाऊ भरथपुरास गेले. जवाहीरसिंग गंगास्नानास जाणार परंतु यांचे काही कळत नाही. मुडरायेलचे घाटी जाटाचे लोक नाकेयावर आहेत. जाणावे. मंगलवारी जाट कूच करून येमुनेपार उतरून सहादाबादेस गेले. जाणावे श्रुत होये हे विनंती. छ ६ साबान बुधवार मुकाम येमुनापार.

¶*Gopal Chakradhar in this letter reports movements of Jawahirsing Jat and gives full details of the situation.*

---

*No. 168*] *[1-1-1768 ?*

पौ छ ८ रमजान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विश्वासरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य चिंतो विठल व चिंतो अनंत व आबाजी माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १० साबान जाणोन स्वकीय लिहीत गेलें पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाला. हिंदुस्थान प्रांतीं फौजा लौकर रवाना होतील तरी उत्तम आहे; श्रीमतांस विनंती करून हें करावें म्हणोन लिहिलें तें कळलें. यैसियासी हिंदुस्थान प्रांतीं फौजा त्वरित पोंहचाव्या म्हणोन शिंदे होळकर यांचा कारभाराचा बंदोबस्त श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींनीं पुण्यांत करून त्यांचे रवानगीची तरतूद करविली

आहे, ते हिंदुस्थान प्रांतीं येणार आहेत. कळावें. सदैव पत्र पाठऊन तोषवीत जावे. पुणियाकडील वृत्त सविस्तर राजश्री गोविंद रघुनाथ व नारो नीलकंठ लिहितील त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें ? कृपेची वृद्धि करावी हें विनंती.

¶*Chinto Vithal and other Karbharis from Poona assure Vishvasrao Lakshman, who has been soliciting the Poona Darbar to take steps against the growing menace of the Jats and others, that forces under Sindia and Holkar would be despatched towards the North at an early date.*

---

*No. 169*] [*11-1-1767 ?*

**श्री**

**श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी**

विनंती शेवक विश्वासराव लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्ति. ताा छ १० माहे साबान मुाा किली झासी येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते छ १ साबानी किळे मजकुरी दाखल जालो. इकडील वर्तमान तर स्वामीचे कूच गोहोदचे मुकामी(हून) जाल्यापासून रांगड्यानी नजरा ( फिरविल्या. ) दुंडी आरंभिली. अष्टभया ओडसेकर यासी सिरोपस्थाई ठहरेलिकर पज्यनसिंग होऊन फारच धूम मांडिली. सरकार अमलाचे गाव रोज उठोन मारीतात. हिंदुपत डंगाईवाले आपल्या मेंड्यावर येऊन बसले. यानीहि बदनजर धरून अष्टभयास गुडघा देऊन बखेडा कारितात या प्रकारचे वतंमान आहे. आम्ही येका दो रोजी फौजेसह बाहेर निघोन याचे पारिपत्याची पैरवी करितो. स्वामींच्या पुण्यप्रतापे करून सर्व येथास्थित होईल. परंतु रांगडे कोतांदेसी आहेत. सदैव न्यून पाहून बखेडा करावयाच्या विचारांत आहेत. ठहरोलीकर सिरोपस्थाई होऊन महुराणीपुवऱ्याकडे गांव मारून धूम करीतो. त्याचे पारिपत्य जाल्याविना बंद बसत नाहीं. पेशजी राजश्री उभयेता सरदारांच्या फौजा या प्रांतात आल्या असतां ठहरोलीकरास कांही तंबी जाली नाही. अस्पर्शच राहून गर्वारूढ जाले. खंडणी वोडशेकरानी त्याजवर घातली. त्याचाहि निर्गम काही करावयाचे मानस नाहीं असा प्रकार आहे. याउपरी त्याचे पारिपत्याचे पैरवीत आहो. स्वामीचे प्रतापे-करून होईल तेथवर कस्त सरकारकामास करावयास अंतर होणार नाही. विदित जाले पाहिजे. सेवकास नित्य आज्ञापत्रेकरून संतोषवावयासी * * * करीत आसावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vishvasrao Lakshman to Dadasaheb, reporting the troubles created by the chiefs of Bundelkhand and his own efforts to put them down.*

No. 170] [12-1-1767?

पो छ १८ साबान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादा साहेब
स्वामीचे शेवेशी

विज्ञापना. उजनीस आल्यावर राजश्री महादजी सिंदे यांचें पत्र आलें तें बजिन्नस पाठविलें आहे. दुसरें पत्र त्याचें व होलकराचें आज शुा १३ त्रयोदशीस आले. त्यांत मजकूर इतकाच कीं तुम्ही लौकर आम्हाजवळ येणे. सिंध्याकडील अर्थ मनोदयानरूप आमचे सिध्धीस पावला यैसा अर्थ तुमचे बोलणियांत कलला तर जे होणे ते होईल; नाहीं तर समक्षच अर्थ कलेल. त्यास, येथें तूर्त कांहीं बखेडा न करितां उभयतां सरदारापावेतो एकदा जावे हा निश्चयेकरून येथून कूच केले. दरमजल जात असो. तेथें गेल्यानंतर जे वर्तमान होईल तो अर्थ सायंत विनंती केला जाईल. सांरांष मनसबा विलग पडल्यासारिखा खावंदानीं उपराला चांगला केल्यानेंच परिणाम लागेल. सरकारचा नक्ष राहील, तेच खावंद करतील. भरंवसा पूर्ण असे. श्रुत होय हे विज्ञापना.

पहिले त्याचा प्रकार तो होता; आतां केवल रुक्ष पत्रें लिहितात याचा अभिमान स्वामीस असावा हे विज्ञाप्ति.

¶*The writer informs Raghunathrao that he was proceeding to the camp of Sindia and Holkar and requests support in his project. The purport of the letter is not clear.*

---

No. 171] [17-1-1767?

पो छ १६ साबान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे शेवसी

विनंती सेवक आपाजी मैराळ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ १४ माहे साबान मुा कसबे दभुवा स्वामीचे प्रतापे कुशलरूप जाणोन स्वकीय कुशल-लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान सांप्रत जाटाची फौज काथ्यावर आली. कृपाराम पुरोहित तीन हजार फौज घेऊन दानसास मदत जाले. येथें दहा बारा हजार जाटाची फौज जमा जाली. रा गंगाधरपंताची फौज सडी

झाली आहे. दोन अडीच हजार स्वार आहेत. रात्रौ घोड्यावर जीन ठेऊन असतात. दिवसा अर्धी फौज तयार असते. पाहऱ्याप्रमाणे तयार असतात. जाटाची जबरदस्ती भारी आहे. पहूंजचा मेडा करूं म्हणतात. आपले सिंद्चा मेडा म्हणतात. याप्रमाणे भानगड न बनली तेव्हां जाट कूच करून पुढें आले. यार्णी जाबसाल केला कीं, जबरदस्तीनें घ्याल त्यास सुखरूप घेणे. आमच्याने लिखापढी करून देवत नाहीं. त्यावरते पुढें येणार ऐसे वर्तमान आहे. रा श्रीपतराव येथें आले होते. त्याचे रुो आम्हास देणे. त्याचा तगादा भारी केला. आम्ही त्याची खातरजमा बहुत प्रकारें केली. दंगा मिटल्यावर तुमचा सल्लुक करू ऐसे समाधान केलें. आज कूच करून गंगाधरपंताचे लष्करांत गेले. काल येथें बैराग्याचे शाळेंत राहिले होते. इकडील गाव दरोबस्त उजाड झाले आहेत. जाटाची दहशत भारी आहे. आपले ठाण्याची बंदोबस्ती चांगली आहे. महाराजांचे प्रतापें काही चिंता नाहीं. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति. काहारवाल्या राज्यानें दोन हजार प्यादा जमा केला आहे. लढावयाचा सरंजाम आहे. त्यांची फौज काहारेवर येणार. यावर जैसे वर्तमान होईल तैसे शेवेसी लिहून पाठवूं. सेवेशी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal to Vishvasrao Lakshman reporting the opposition of the Jats and the encounter which Gangadharpant Chandrachud had with them.*

---

*No. 172*] [*January 1767*

श्री

**राजश्री महिपतराव लक्ष्मण व सखाराम**
**हरि व कुकाजी सिवराम गो**

सुा सबा सितैन मयां व अलफ. भेलशाचे गावांत सरकारचे निशान दाखल जाले. तोफा वगैरे वस्तभाव समसेरखान नेऊ म्हणतात. त्यास तोफा दारूगोलीविसीं आज्ञा होईल त्याप्रों वर्तणूक करू म्हणौन लिा त्यास जे आज्ञा करणे ते सविस्तर नागोराव विठल यांजपासी केली आहे. ते सांगतील त्याप्रो वर्तणूक करणे. तोफासिवाय वस्तभाव त्यास नेऊं देणे. तोफाचा प्रकार तरी पठारी वगैरे तीन ठाणी आहेत ती सरकारचे लोकाचे हवाली होऊन कबजे आली म्हणजे तोफा घेऊन जाणे. ती तिन्ही ठाणी हस्तगत होत, कबजा येत तोपर्यंत तोफा देत नाही ऐसे सांगणें. परंतु ठाण्यास अडथळा न होय ते करणे. तिन्ही ठाण्याकरितां तोफा अटकवून ठेविल्या. वरकड काही गुंता नाही.

तिन्ही ठाणी सरकारांत दाखल जालियावर तोफास गुता नाही ऐसे त्यास भासेंसें करणे. तिन्ही ठाणी हस्तगत जाहालियावर तोफाविसी आज्ञा होईल त्याप्रो करणे. तोफा व चांगल्या जेजाला असतील त्या तिन्ही ठाण्याचे निमित्य करून अटकऊन ठेवणे. नागोराव विठल याजपासी जो प्रकार सांगितला आहे तो जाहिराणा होऊन न देणें. जाहिराणा जालियाने ठाण्यास हिसका बसेल ते फटकाल. याजकरितां ठाणे हस्तगत करून तोफा व जेजाला तिन्ही ठाण्याचे निमित्याने अटकावणे. नाकारी तोफा असेल त्यांस नेऊ देणे. दारू गोलीहि नेऊ देणे. चांगल्या तोफा असतील त्या मात्र लिहिल्याप्रों तिन्हीं ठाण्याचे निमित्याने अटकावणें. हा मंत्र गुप्त राखणे. तोफा नेऊ लागतील तेव्हां लस्करात वरकड ठाण्याचे निमित्याने अटकावणें. तोफा वगैरे बस्तभाव नेऊं देणे म्हणौन त्याचे मारफतीने तुम्हास पत्रें सादर होत आहेत. परंतु या पत्राप्रों वर्तणूक करणे. आंतून गुप्त पत्र पाठविलें हें किमपि जाहीर होऊं न देणे. सारांश ठाणे हस्तगत व्हावयास दिकत न पडता जितकी तजवीज तोफाविसी होईल ते करणे. दिकतच देऊ लागली तरी जाऊ देणे. सोमवार मध्यानरात्र.

¶*This is a confidential letter addressed to Mahipatrao Lakshman and Sakharam Hari asking them to follow the instructions contained in it in preference to those in other open letters regarding the disposal of other articles, but not the guns, which are to be retained.*

---

*No. 173*] [*26-3-1769*

पौ छ १७ जिलकाद

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री वासुदेवपंत-बापू व रा यादवरावभाऊ व राजश्री गोपाळराव-दाजी स्वामींचे सेवेसी**

पो गोविंद रघुनाथ व हरि चिंतामण सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल फाल्गुण वा दशमी जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. कासीदाबरोबर छ २९ साबानचे पाठविले ते छ ३ सवालीं पावले. सविस्तर वर्तमान विदित जाहाले. रा बाळाजी गोविंद यांनीं तर सोनेस मोर्चे लाऊन बसले. आपल्याकडील फौज रा यादो हरीस फौजप्यादे तोफा देऊन त्याचे कुमकेस पाठविले. सेवटी कार्य न होतां दानसा जाटाकडील सरदार याजकडे गढईवाल्यानें अनुसंधान लाऊन जाटाची फौज व गुजर कछवे वगैरे पांचसात

हजार फौज चालून आली. रा बाळाजी गोविंद उभयतां बंधु होते. जुजाचें तोंड लागतांच अधीच दहशत खालीच होती; पळाले; बुणगे लुटले गेले. मग यादवरावजीवर जुंज पडले. यानी च्यार घटका थोपून जुंज घेऊन तोफ व बाजार सर्व संभाळून मोटेस आले. माणूस फार पडले त्यामुळे मागती दुंडी जाहली. वसुलात खलेल जाहले. याजकरितां लिहिले कीं कसर रुो पूर्वी पाठविले. बावनी हजाराची वरात पाठविली. संकटे ते रुो देतो. राहिले अठेताळीस हजार ते माफ श्रीमंतास व मुत्सदियासी वर्तमान निवेदन करून करवणे. ऐसे करितां मर्जीस न ये तर तुम्हास यजमानानी पत्रे रा बाबाजी प्रल्हाद व रा अवचितराव व रा त्र्यंबकराव सिवदेव याजवरी दिल्ही आहेत. जरूर जाणून ज्याजपासून कार्य होईल त्याजपासून लागू होऊन करून सरकारची वोड वारणे. त्रिवर्ग कार्य न करीत तर मातबर तुम्ही तेथे कोण्ही सावकार करून लाख पनास हजार रुो वेसीत दे ऐसा करणे. आम्ही तुमचा बोज पार पाडूं. तूर्त येथें रुो नाहीं. सर्व सावकारापासून घेतले. कोण्ही राहिला नाहीं; याजकरितां लिहिलें. दुसरे फडणीस मजमदार याचे हाते कामकाज कचेपके घेतो. अजमास वगैरे सर्व हिसेब करविला आहे. पाठऊन देऊं. दरबारचा भरवसा तुमचा आहे. तुम्हास खर्चास पाठऊन देऊं. यंदा गुदस्तासहि जमा कमी पडते. दुंडीमुळे खर्च भारी, जमा थोडी. आजपावेतो कर्जासीच गाठ. न घ्यावे तर नक्ष राहत नाहीं. याजकरितां करणे जाहला. मोटचे ठाणे आपल्याकडे राहे ते करणे, खर्च पडला तर करणे, ठाणे खालसा राहे ते करणे म्हणून बहुत विस्तारें लिहिले. त्यासी रा बाळाजी गोविंद आपेशी ठाऊक असतां त्याची कुमक काशास केली? तुम्ही आपल्या ठिकाणी होतां तेव्हां तुमचा भ्रम बहुत होता. इतके करून फारच हलकाई जाहली. एक गोष्ट बहुत केली कीं भाऊनी तोफ व बाजार संभाळून मर्दुमीचे लढाई देता देतां घेऊन मोटेस आले, इतक्याने थोडाबहुत नक्ष राहिला. दरबारांत वर्तमान सांगितले. तोफ सांभाळून आणिले याजमुळे उपर राहिले. आता तर आब राखून जे करणे ते दूरवर दृष्ट ठेऊन करीत जावे. कोण्हाचा इतबार न धरावा. दानसा जाट थोरल्या जाटाचे विपरीत वर्तमान ऐकून कुंभेरीस जाणार म्हणून लिहिले. थोरला जाट+ वारल्यानें मोठी सुभेता जाहली. रोहिले गुजर वगैरे याचा त्याजइतका भारीपणा नाहीं. श्रीने शत्रु परभाराच विल्हे लाविला. आतांही कछवाधारांत जाल तर बहुत सावधतेने जावें. रा बाळाजी गोविंदानी दोनदा आपेश घेऊन पळाले. इतक्यानें त्याजला सरकारचा ऐवजाचा तगादा फारसा नाहीं. आपण आंगावर

+ जवाहीरसिंगाचा मृत्यु जुलै १७६८ त झाला.

कर्जवाम करूनच रुपये सरकारांतही दिल्हे. ठाणी राखिली, चाकरी केली, आब राखिला, ऐसे असतां पंनास हजार रुो माफ करा म्हटल्या रा बापूस बहुत दु:ख वाटेल. एक रुपया करारात कमी होणार नाही. वर्तमान सर्व ऐकिले परंतु कराराप्रमाणें भरा. ज्यासी ऐवज देविला त्यासी पावता करणे. मागती उत्तर केले कीं आज्ञेप्रो रुो देऊं, परंतु दोन महिने वागविल्यानें रुो देऊं, अंतर होणार नाहीं. तेहि गोष्ट न रुचली. बोलिले की रुो भरा मग सांगाल ते ऐकू. बहुत रदबदल जाहली. त्याचे मतें बाकीचे रुो वाइद्यास द्यावे मग श्रीमंत रा नाना व दादा उभयतां फडनिसास विनंती केली. बहुत मायेंत घेऊन केली. त्यानी उत्तर दिल्हे कीं माफीची गोष्ट श्रीमंत रावसाहेब ऐकणार नाहींत. निभाऊन घेणे येविशई विनंती श्रीमंतास करूं. परंतु रुो येजमानास लिहून सत्वर आणवावे. जेणेकरून दरबारांत यतोटी (सचोटी?) तुमची राहे, पुढें आमचे हाते मातबर कामकाज होय तो अर्थ केल्याने उत्तम. तुमचे मुलकांचे वर्तमान, दुंडीचा प्रकार, सर्व श्रीमंतास विदित आहे. परंतु रुा एक कमी न करावा. वाइद्याप्रो रुा द्यावे हेच श्रीमंताचे मानस. तथापि रदबदलीस चुकणार नाहीं. आपण लिहिले कीं जाबसालास लांब पंथ; दोन महिने पाहिजेत; याजकरितां तेथेंच रुोची तजवीज करून देणे. त्यासी रा अवचितराव पंचोपाल्यानी स्वाराचे पसतीस हजार रुो नेमणूक, दोन साले जाहलीं एक रुा न दिल्हा. दिल्हा असता तर तोच रुो तुम्हास अजी देतों. तुम्ही सालसी (?) राखिली. तथापि मी बेरोजगार, अतां येथें कर्ज कोण्ही देत नाहीं. या समई मजपासीं एक रुा नाहीं. बहुत विनंती केली परंतु पष्टच उतर दिल्हे. तैसेच रा त्र्यंबकराव सिवदेव यानी उत्तर केले कीं अखेरसाल आलें, आतां रुपयाची वोढ आहे. तूर्त कार्य होत नाहीं. आमचे मनांत रावजीचे कार्य करावें, परंतु संकटें उत्तर केले त्याचें कर्ज देणे. चाळीस हजार तुम्ही लिहिले. ते म्हणतात पंनास हजार आमचे देणे. आम्ही उत्तर केलें कीं वाजबी जे असेल त्याचा निकाल तीन वाइदे करून वर्षास एक वाइदा प्रो ऐवज भरूं. अतां तुमचा रुा ठेवीत नाहीं. तुमचे देणेची काळजी बहुत आहे. रावजीस सर्व प्रो भरवंसा तुमचा आहे. ऐसे बहुत प्रो ममतेत घेऊन जाबसाल केला. त्याचीही कृपा विशेष आहे. रा संक्राजीपंतहि बहुत ग्रहस्त त्यानेहि बहुत सांगितले. प्रस्तुत हात चालत नाहीं. पुढें आपल्या कार्यास अंतर करणार नाहीं. त्याजलाहि फेरांत श्रीमंती आणिले आहे कीं, तुमची जहागीर किती, चाकरी किती लोकानसीं करितां? हजरीं गणती तुमची काय आहे? जाहगिरीचा कचा आकार दाखवणे, ऐसे कितेक जाबसाल घातले आहेत, त्यामुळे श्रमी. चाकरी करून फलादेश श्रीमंती या प्रकारचा केला म्हणून श्रमी.

आणिखी येथें महिना पंधरा दिवस लागतील. रा बाजी लवाद (?) परगणियांत गेले. त्याची सावकारी खरी. परंतु सालमजकूरी पेचात आहे. दुसरे मातबर सावकार कोण होतो ? सर्व मातबरी तुम्हापासून, आम्ही किंमात्र. यंदाची सतोटी दरबारांत तुमची राहील. पुढें मामलत नेमस्त ठराऊन रसदेची एकदोन किस्त भरल्या मग लोकामध्यें मातबरी होऊन येईल. अतां तुम्हींच अवचितरावजीस लिहिले कीं इकडे हुंडी जाहली, ऐवजास ठिकाणा नाहीं, दरबारची सतोटी राहिली पाहिजे, तर तुम्ही पंनास हजार रुपये कर्ज दाखल देणे. त्यावरून रावजींनी निषेध केला कीं मजला रुपये मिळत नाहीं, तेव्हां आम्ही कोणत्या भिस्तीवर द्यावे ? पुढील सालीं देतील तर भरवसा पुढील सालाचा कोणास ? दरबार एक प्राच, ऐसे निषेधाचेच उत्तर केले. उदंड बोध केला. न ऐकिले. उतरहि दिल्हे आहे. बापू, येथील या प्रकारचे वर्तमान. वाइदा पौर्णिमेचा जाहला. द्वितीयेस वरात पंनासाहजाराची कामरसकर वगैरे सावकार याची छ १९ रमजानी दिल्ही ते त्यानी काल दाखविली. वाइदा जाहला, रुो द्या. तेंव्हां उत्तर केलें कीं, श्रीमंत नानाफडणीस यांसी विनंती केली. ते सांगतील महिना दोन महिनेयानीं वागऊन घ्याल तर रुो देऊं, ऐवज खरा आहे. त्यानीं उतर केलें कीं हे वर्तमान त्यासी सांगू, आम्हास दुसरे ठिकाणी देतील. रागे भरून गेले. काय जाबसाल होईल पाहावे. आमची अबरू कैसी राहील नकळे. हुंडीचा ऐवजाचा अद्यापि प्रथम दिवस आहे. त्या सावकाराचा तगादा. पंचमी जाहाल्यावरी सर्व येऊन तगादा करतील. ग्वालेरकरासी पंचमीचाच करार. तुम्ही लिहिलें कीं येथून ऐवज येणें नाहीं म्हणून तेथें देविला; त्याची हे गति. जर तुम्ही ऐवज पाठवीत नाहीं तर आमची भाते राहत नाहीं. आम्ही चाकर लोक एकदां फट म्हणल्या तुम्हांसच संकट. शत्रू उशा पायत्या लागले आहेत. आम्ही तो आपल्या वचनावर गोष्टी केली. अतां ऐसे लिहितां तेव्हां आम्हीच फजीत व्हावें हे तुमचे मानस आहे कीं काय ? दरबारखर्चास तर ठिकाणाहि नाहीं. त्याचे कांहीं लिहिलेच नाहीं. तुम्हास कासीद आतां पाठवायासी अनुकूल पडत नाहीं. दोन दोन महिने होतात तरी कासीद येत नाहीं ऐसे करिता एवढी मामलत; कासिदास हजार पाचसे रुो खर्च जाला तर भारी नाहीं. परंतु पंधरावे दिवसीं वर्तमान तेथील येथें, येथील तेथें ऐसें असिलें पाहिजे. याची तरतूद कांहीच नाहीं. तिळगूळ सरकारात जरूर पाठवणे म्हणून जोडी पाठविली; सनदा वगैरे पाठऊन दोन सवादोन महिने जाले; उतर

१ स्थित.

4296

न ये, तेथे वरकड गोष्टीची आशा काय? बापू हे तुम्हांस योग्य नाही. आमचा आब राहिलिया तुमचाच आहे. याउपरी बाकीचा ऐवज व ग्वालेरकराची बाकी राहिली. एकूण सदुसस्ट हजार रुाची हुंडी करून सत्वर पाठवणे. तुम्ही तेथील सावकारास खोक्यांविशयी ताकीत करीत नाहींत. रुपये भरले न भरले हेहि कळत नाहीं. चार पाच महिने जाहले; खोकी आणवीत नाहींत. काय म्हणावें! आतां खोकी आणणे, व्याज पैकियाचें घेणे. या उपरी त्याजवरी हुंड्या न करणे. लाखा रुाची एकावर हुंडी केली, काय म्हणावें! बटा लाखास पांच हजार किंवा सात हजार घेईल न कळे व तोटा काय पहावा! जर टाळाटाळ कराल, रुा गोपाळ रावजीची बुधी ऐसे वोढावेसें कढून न्यावे चालतच आहे. ह्या गोष्टी तूर्त चालेल परंतु पुढें मातबर कार्यास अपाय आहे. आम्हा लोकाची अबरू फार नाहीं. चाकर लोक जेथवर येजमानाचे कल्याण तेथवरी करीतच आहे. ऐसे पहिले लिहिले असते तर इतके काशास लागते! चाकरी केली, तुम्ही भूषणच देत आला, आतां हे लिहितां, तेव्हा आम्हीच निमकहराम, तुम्ही सर्व यजमानाचे * * माफ करावा म्हणतां आम्ही चाकरीत नाही. बापू, एकनिष्ट चाकरी करून हा शब्द पदरास येतो ऐसे दिसते. परंतु आम्ही एकनिष्ट वर्ततो यास श्री साक्ष असे. रात्रदिवस यजमानाचे अभीष्टचिंतन करून आहो. वासुदेव मुरार सावकार खोटा. रुा अद्याप न दिल्हा त्यामुळे येथें सावकारांत पत राहिली नाहीं. खोट्या हुंड्या ऐसे म्हणतात. शहरास कारकून पाठविला आहे. सरकारचीं ताकीदपत्रें व जोडी जासुदाची पाठविली आहे. येसें * * करितां काय होईल ते पहावें. सावकारी पती काहीसी केली होती हुंड्याचा रुा न आला त्यामुळें खोटे जाहलों. एक रुा कोण्ही देत नाहीं. याजकरितां ऐवज बाकीचा व दरबारी खर्चाचा सत्वर पाठवावा दोनदा करून पाठवावा. या उपरी आम्हावर शब्द न ठेवावे. सर्व तुम्हास खोढून लिहिले आहे. याउपरी तुमची इच्छा. माझी मातबरी तुम्ही राखाल. वाढवा तरी वाढेल; नाही तर कलतच आहे. तुमची थोर पथारी. शतृ भारी, याजकरितां जीवावरी कर्जवाम करून सरकारची सतोटी राखिल्या सर्व पार पडेल. इतके लिहिले, रागास न यावे. ज्यात कल्याण ते लिहिले. उतर पाठवणे हे विनंती.

¶*This letter contains details regarding the financial administration of certain districts in Bundelkhand and the reverse sustained by Balaji Govind against the Jats led by Danashah, brother-in-law of Nawalsing and regent after the death of Jawahir. (See No. 208 below.)*

---

१ हुंडीबरोबर असलेलें शिफारसपत्र.

*No. 174*] [*7-4-1768*

पौ छ १९ जिल्हेज प्रात:काल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विश्वासरावजी
स्वामीचे सेवेसी

पोष्य माहादाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ जिल्कादपर्यंत पुण्यात वर्तमान येथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन लिहिले वर्तमान कळले. पत्रीं लिहिलें की या प्रांती गडबड आहे, यामुळे मुलकांतील वसूल यावयासी दीसगत लागते म्हणोन लिहिले ते कळले. इकडून त्या प्रांतास सिंदे होलकर यांची रवानगी फौजसुधां जाहाली असे. लौकरच येऊन पोहचतील. वरकड इकडील सविस्तर राजश्री गोविंदपंत व हरिपंत लिहितील त्यावरून कळो येईल. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mahadaji Ballal informs Vishvasrao Lakshman that Sindia and Holkar have been despatched to the North to quell disturbances which the addressee had reported.*

---

*No. 175*] [*27-4-1767*

पौ छ १३ जिल्हेज
मुाा झासी

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद रघुनाथ साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल चैत्र वद्य १४ सोमवार मुकाम नागाझोकर जाणून स्वकीये लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. पधरा वीस रोज जाहाले आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, यैसें न पाहिजे. हुंडी आद्यापि आली नाही. रावजी तगादामुळे श्रमी, याजकरितां लिहिलें आहे. श्रीकाशीयात्रेहून वेदमूर्ति गणेशभट अणखी कितेक आले त्याचें साहित्य यथास्थित न जाहालें. त्याजला स्वार मिळाले नाहींत. त्यानी श्रीमंत बाबासाहेबास विस्तारें सांगितलें. त्यावरून मुत्छद्यासी म्हणाले

कीं विस्वासराव याजपासीं डोईजड खटपटा माणूस नाहीं. जातीनें मेहनती नाहींत. मातबर कारभार कैसा चालेल. याजबराबर दोन हजार फौज नेमून दिल्ही येसे तो रतवा व मोढूचे ठाणें गमावलें. त्याचा उपराला केला नाहीं. तेथें ठोक माणूस नित्य स्वारीसिकारी करी यैसा पाहिजे. त्याची योजना करा यैसें बहुत बोलिले. त्याजवरी काय परंतु रतव्यास मोर्च्ये लागून पंधरा वीस रोज जाहले. उपराला न केला. तेव्हां बोभाट आला. याजकरितां पांचसें स्वार त्याजबराबर येक मर्द माणूस देऊन मुलुकांत स्वारीसिकारी करून चार रूा पैदाहि करील. मुलकांत तापहि राहील. रावसाहेब हा समये चाकरी करून दाखवयाचा आहे. खावंद अल्पकर्णी, मुत्सदी व सर्व जी जी म्हणतात. फडनिसीचा नित्य बोभाट येतो त्यावरून रागें भरतात. आपल्यास लिहिणे कीं येक तरी अनुसंधान पुरतें राखिलें पाहिजे. दुसरें अखेरसाल आहे. पुढें मामलतीचा बंदोबस्त * * रूाखेरीज होत नाहीं. आपण म्हणतील मामलतीचा तह करावा. सनदापत्रें घेऊन पाठविल्या रुपयांची * * * पाठऊं. त्यासी दादा साहेबाचे घरची मामलत अर्धा रूा देतात. असो; याची तरतूद आपण केलीच असेल. सूचनार्थ लिहित गेलों. वडिलानी तर मामलत टाकिली. तुम्ही त्याचे ममतेंत असिल्या साहित्य करितील, यैसें मानस कालच्या बोलण्यावरून लिहिण्यावरून दिसतें. तुम्ही त्यांचेच अनुसंधानें असावें. मुख्य गोष्ट कोन्हीहि साहित्यास असों. रूा दोन तीन मोठे पाहिजेत. याची तरतूद करावी. वरचेवर वर्तमान लिहित जावें. मुलकांत स्वारीसिकारी जरूर करीत असावें. कोन्ही तुमची तारीफ लिहित अथवा कारकूनमंडली सालसी लिहित म्हणजे श्रीमंत संतुष्ट आहेत. त्यांचे मनांत दुसरा भाव नाहीं. तुम्ही सावधतेनें वर्तनूक करावी. तुमचा लौकिक असावा म्हणजे दादासाहेबांस परम संतोष. आपण लिहिलें होतें कीं सनदापत्रे घेऊन येणे. जो ठराव ठरा(वा)ल त्याप्रमाणें अस्विन मासीं रुपये पावते करूं. त्यासी रावजी येथें दरबारांत ताल नाहीं. आता बोलतील ते चौ घटिका नाहीं. धण्यास रूा पाहिजे, याजकरितां खोल्रून लिहिलें आहे. राजश्री सिदापासेहास बहुत ममतेचा कागद पाठवा. मुत्सदीयासीहि पत्रें पाठवावीं. अजुणहि वडिलाचा सर्वांस वसवस आहे. - तुम्ही रूा सिध केले आणि वडिलाचेच हाते बंदोबस्त केल्यानें बहुतच उत्तम होऊन येईल. राजश्री अवचितराव ममतेंत आहेत. ज्यात उत्तम दिसेल तें करावें. राजश्री गणेश संभाजी डोई हलवितात; परंतु त्यासी कोन्ही सांगत नाहीं. चार रूा अधिक उणे करावयासी मात्र उभे करितील; खोल्रून लिहिलें रागास न यावें. कारकुनाचें हाते कचेपके लिहिणें घ्यावें. नालबंदी वगैरे थोडे बहुत देऊन राजी

राखावें. त्याचें पत्र श्रीमंतास पाठवावें. राजश्री उमरावगीर गोसावी याजला श्रीमंत दादासाहेबीं कोच वगैरे सरंजाम देतों म्हणून बोलत असतां गोसावी यानी नानासाहेबाची आज्ञा घेऊन उदईक चालणार. सत्वरीच आपणापासी येतील. भेटीनंतर सर्व कलेल.

¶*Govind Raghunath exhorts Vishvasrao Lakshman to exert himself in the discharge of his duties in order that he might not incur the displeasure of the Peshwa.*

---

*No. 176*] [*27-4-1767*

पौ छ १३ जिल्हेज
सन सबा सितैन

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**यादोराव भाऊ व राजश्री बापू स्वामीचे सेवेसी**

पोष्य गोविंद रघुनाथ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ २७ जिलकाद मुकाम नगझोकर जाणून स्वकीये लेखन करीत जावें विशेष. सविस्तर वर्तमान मुख्य पत्रावरून कलेल. तीन च्यार महिने जाहले, महुराणीपुन्याकडेच कालक्षेप केला, दुसरेकडे समाचार घेतला नाहीं. रतवा वगैरे ठाणीं जाटानें घेतलीं त्याचा उपराला न केला. त्यामुळें सरदारांत नालस्ती जाहली, यैसें न पाहिजे. दोन च्यारशें स्वार पाठविले असते तर ठाणीं न जातीं. असो; या उपरी तरी पांचशें स्वार याजबराबर येक मर्द शाहाणा माणूस देऊन मुलकांत फिरे यैसें करावें. अवघ्यांनीं येकें ठिकाणीं बसोन राहावें उत्तम नाहीं. पुढीले बंदाबस्ताचा विचार द्रव्य पाहिजे; त्याची तजवीज थोडीबहुत अगोदर जाहाली पाहिजे. तुम्ही तरतूद करीतच असाल. माझें ज्ञान अधिक आहे ऐसें नाहीं. दुसरं कारकुनाचे हातें कचेंपकें कामकाज घ्यावें, त्याची दरबारांत मातबरी आहे. वडील करीत होते तो प्रकार आणखी तुमचा आणखी वडिलानी त्याचे हातें न घेतलें त्याचें फल दोन किले मागतात; तेव्हां हिशेबाची मखलाशी करूं यैसें वर्तमान आहे, याजकरितां वारंवार लिहितो. आम्ही येथें राहावें म्हणून आज्ञा तर कोणे रीतीनें राहावें त्याची सोय करून पाठवावी. कासीद जोड्या पांच चाकर ठेऊन पाठवावें. पुढें कागदपत्र पाठवावेयाचे काम बहुत आहे, याजकरितां लिहिलें. बहुत काय लिहिणें ! कृपा असों दीजे हें विनंती.

4300

राजश्री गोपाळराव स्वामीस साष्टांग नमस्कार लिा हे विनंती

विज्ञापना. राजकी वर्तमान राजश्री तुकोजी होळकर व राजश्री तात्या येऊन भेटले. दादीसाहेब नव मुलुक दिल्हा तो मागतात; पहिले मुलकावर नजर द्यावी यैसा जाबसाल घातला. त्यांनीं उत्तर केलें कीं नवाजुना सरंजामात येक खेडें द्यावयासी आनुकूल पडत नाहीं. नजरेबदल च्यार रुपये ठरवाल ते देऊं. जर आमचेनें चाकरी न होये हे परीक्षा पाहून मग अवघाच घ्या. आम्ही साहेबचाकरी करावयासी सिद्ध असतां आम्ही सरंजाम कैसा द्यावा?, याची त्याची बहुत अड पडली आहे. दादासाहेबीं त्याचे मुलकाचे जतीस येथून आयतोळे व राजश्री आनंदराव गोपाळ यैसे खरगोणबत्तिशी व खानदेश येथें पाठविले; त्यासी आनंदराव गोपाळ हंडेचे मार्गे गेला. आयतोळा सेंदुरडेचे घाटें गेला. लोकांनीं झामडाझामड थोडी बहुत केली, संभाळून गेले. खरगोण बत्तिशींत बनाजी मतकर व बुळेचे पथक आगोदरच आहिल्याबाईनें पाठविलें होतें. हें गेल्यावरी यांनीं जाबसाल घातला कीं दादासाहेबीं सनदा देऊन पाठविलें, तुम्ही मुलुक ठाणें खाली करून द्या; त्यावरून मतकर यांनीं उत्तर केलें कीं आमचे खावंदाचें लिहिणें आणा मग घ्या, तोंवर देत नाहीं. दुसरे दिवशीं तयारी करून त्याजवरी गेले. त्याचें याचें जुंज जाहलें. बुळ्यानी आयतोळा मोडला, जखमी जाहला; कोन्ही म्हणतो मृत्य पावला; हें वर्तमान ऐकून श्रीमंत बहुत क्रुद्ध. अहिल्याबाईनें तीन च्यार हजार पागा व पांच हजार प्यादा तोफखाना घेऊन इंदुरीं बसले आहेत. होळकर शिंदे भोसले सर्व येकवटले आहेत; याचें त्याचें रहस्य कैसें होईल तें पाहावें. इंदुरास जावें ऐसें श्रीमंत दादासाहेबाचें मानस आहे. अहिल्याबाई म्हणते येक रुपया मजपाशीं नाहीं. कारभारियास म्हणती मुलुक तुमचा, फौज तुमची; दरबार राखणें तर तुम्ही चित्तास येईल तें करा; दरबार राखा; मजला कशाचीहि आशा नाहीं. त्याच्या घरात दामुश्याणं+ आहे. नजर दाहा लाखापासून पंधरा वीस काल पंचविसापावेतों बोलिल परंतु ठरलें नाहीं. दादासाहेबाचें चितांत नवा मुलुक दिल्हा तो निश्चयरूप घ्यावा. शिवाय नजर मातबर घ्यावी. परस्परें चित्त शुद्ध नाहीं. शिंदेचेहीं सरदारींत खुल जाहालें आहे. केदारजी शिंदे यांसीं वस्त्रें दिल्हीं; फौज त्याजकडे, कारभारी त्याजकडे. माहादजी शिंदे यांनीं वडीलपणा मात्र असावी. राजश्री बाजी नरसिंह व राघोबा पागे माहादजी शिंदे हे येकत्र आहेत. माहादजी शिंदे होळकर येक. आता होळकरानी उजवी बाजू टाकून डावीकडे उतरले आहेत. पांच साहा हजार फौज आहे यैसें वर्तमान आहे. पुढें जें ठरेल ते मागाहून

+ द्वामुष्यायण = दुफळी.

लिा पाठऊं. फौज भारी; या मुलकाचा सत्यनास जाहाला. येथून येक दोन रोजां कूच होऊन इंदुरास जाणार. राजश्री अनंदराव गोपाल गेले. याचें बुल्याचे जुंज जालें. दोघेहि कायम राहिले, म्हणून कालपासून वर्तमान आलें आहे. आमचे खर्चाची अबाल आहे. जर आम्हास च्यार दिवस येथें ठेवणें तर खर्चाजी बेगमी करावी. मी आज्ञांकित, मजला उजूर नाहीं. मा। याचे मतें वडिलाचें ममतेंत मामलतीचा वगैरे सर्व बंदोबस्त होऊन येईल. दुसरा करील त्याला अंतर आहे. सविस्तर लिहिलें आपल्याकडील वरचेवर लिहित असिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हें विज्ञापना. दादासाहेबांपाशीं कोण्हाचाहि वकर[१] नाहीं; बहुतच मर्जी कठिण जाहली आहे. तुम्ही राजश्री श्रीपतराव याजकडील सायेर काहाडलें त्यामुळें परम विषम वाटलें. त्यासी वडिलांनीं लिहिलें आहे कीं तुम्ही आपल्या रुपयांची वाट रावजीपाशीं करून घेऊन येणें; येथें रुपये मिळणार नाही. पुढें रोजगाराची चिंता न करावी येसें लिहिलें आहे. तुम्ही त्याचें समाधान करून मायेत घेतल्या उत्तम आहे. च्यार माणसें पदरीं असिलें कार्याचीं आहेत. खंडोजी कोतवाल याजला तुम्ही ठेऊन नफा काय? त्याजवरी मोठा राग आहे; हे विज्ञापना.

¶*Govind Raghunath reprimands Yadavrao and Bapuji, two officers, for having lost two Maratha outposts to the Jat by their laxity and urges them to be more active. He further gives news about the disposal of jagirs of the Holkar and Sindia. Serious differences cropped up between Holkar and Raghoba as the latter demanded back the territory newly granted to Holkar. As regards Sindia's jagir, Kedarji has been invested with all powers and is to work under the nominal headship of Mahadji Sindia.*

---

*No. 177*] [*2-5-1767* ?

**श्री**

श्रीखंडोबा

साहेबाची शेवेशी. आज्ञाधारक तुकोजी होळकर कृतानेक विज्ञापना. साहेबानीं आज्ञापत्र पाठविले ते पावोन सिरसा वंदिले. राजश्री विठ्ठलराव सिवदेव उमदेतुल मुलुकबहादूर यांस माधोभयाच्या गढ्यांवर रवाना केले असे. तुम्ही फौजतोफखानासुद्धा जाऊन सांगतील त्याप्रमाणें सरकार कामकाज करणे

---

१ वजन.

म्हणून आज्ञा. त्यास राजश्री विठ्ठलराव तात्या आद्यापि येथें आले नाहींत. आलियावरी ते आम्ही येकत्र होऊन साहेबाचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक होईल. माधोभयाची पाहडगांउची गढीस आलो; येथें पाणी नाहीं म्हणून येलचे जवल वेत्रवती तीरी फौजेचा मुक्काम केला. गढी येथून दीड दोन कोस आहे. मोर्च्यास व तोफांचा लाग पहावयासी गेलो. राजश्री तात्या आलियावर सांगतील तशी तजवीज करूं. शेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Tukoji Holkar writes that he will join Vithal Shivdev's forces as soon as the latter arrives and proceed against the fortified posts of Madho bhayya.*

---

*No. 178*] [*2-5-1767 ?*

श्री

सेवेसीं जयवंतराव येशवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ ३ जिल्हेज दीड प्रहर दिवसपर्यंत स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. काल संध्याकाळीं पाहाडगावास येऊन पोहोंचलो. कालच तोफा लावणार होतों, परंतु रात्र जाहली याजमुळें लावल्या नाहींत. प्रात:कालींच तोफा लाऊन पेठ घेतली. ठाण्यास मोर्चे लाविले आहेत. राजश्री माहादजी सिंदे याची फौज दाहा हजार पा। म्हणोन लिा। त्यास फौज जलदीनें येऊन पोहचे येविसीं आज्ञा जाहली पाहिजे. गढी चुनेगची आहे. तोफाची मारगिरी केली आहे. गडी सर लवकरच होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jaywantrao Yashwant Panse requisitions Mahadji's forces in order to invest Pahadgam.*

---

*No. 179*] [*12-5-1767*

पो छ २६ जिल्हेज सन सबा

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वास-
रावजी साहेबाचे सेवेसी

पोष्य चिंतो विठल व आबाजी माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १३ जिल्हेज जाणोन स्वकीय लिहीत जावें विशेष.

---

* Near the river Betwa in Malwa.

4303

आपण पत्र पाठविलें तें पावलें. ते प्रांतीं फौजा जाटाच्या उतरल्याचें वगैरें वर्तमान लिहिलें तें कळलें. यैसियासी फौजा उतरल्या त्यांचें पारिपत्य (करावें) म्हणोन हजुरातून फौजाचे रवानगी(ची) (तर)तूद ठरली आहे. होळकर व आणीक फौज लौकर (येऊन) पावेल. वरकड मजकूर राजश्री गोविंदराव लिहितील त्यावरून सविस्तर कळेल. येका गोसावियामुळें पेंच पडला हें खरें. परंतु दुसऱ्या गोसाव्याची खातरजमा राजश्री नानांनीं करून घेऊन अजिंठेचा किला त्यास देविला आहे. मशारनिलेनी पका बंदोबस्त पाहिला असेल, तरी हे गोष्ट घडवली आहे. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत जावें. सरकार मर्जीचा आशय समक्षच आपल्यास कळलाच आहे व हालीहि मशारनिलेस सांगितला असे. हे विस्तारें लिहितील त्यावरून कळेल. सारांश खावंदाचे मर्जीप्रमाणें वर्तावें यांत सर्व प्रकारें श्रेयस्कर असे. बहुत काय लिहिणें कृपेची वृद्धि करावी हे विनंती.

¶*Chinto Vithal and Abaji Mahadev inform Vishvasrao Lakshman that schemes are being concerted and will soon be put into action to checkmate the activities of the Jats.*

---

*No. 180*] [*18-5-1767*

पौ छ ७ मोहरम
जेष्ठ मास वा।
जासूद जथे

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबक नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ माहे जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे व शहर बराणपुरचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. पेशजी आज्ञापत्र सादर जाहाले होते त्यांजवरून श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडील बातमीस डांक बसविली आहे तिचे वर्तमान छ १७ माहे मजकुरी डांकीची बातमी कलमवार बतपसील :

माहादजी सिंदे व केदारजी सिंदे या उभयेतात फूट पडोन केदारजी सिंदे दोन तीन हजार फौजेनसी

आंतरवेदीतील वर्तमान तर जाटाच्या फौजा व दुंदेखान रोहिले दि॥ नजीबखान याच्या फौजा येकून

अवचितराऊ कारभारी यैसे श्रीमंताजवल आलाहिदा राहिले. श्रीमंतानी सरदारीचे कामकाज केदारजी सिंदे यांचे निसबतीस लाविले. बाजी नरासिंह व राघोबा पागे व पोतनीस व रहिमबेग यांस आटकेंत ठेऊन माहा जेरतलब केले आहेत. काही रुपये घ्यावे हे मानस आहे. रहिमबेग याजकडे दोन ठाणी आहेत, ते सरकारात घ्यावी व काही पैका घ्यावा हा मनसबा आहे. पुढें कसा मनसबा ठरेल ते कलेल. येक दो रोजी जैसे वर्तमान येईल तैसे लेखन करू. कलम १

श्रीमंत राजश्री दादासाहेब खासा स्वारीसुधा माघारा परतोन सिरोंज पावेतो जावे; आणि जाटाच्या फौजा व रोहिले याच्या फौजा माघारा परतून गेल्यास होलकर यांस पुढे हिंदुस्थानांत रवाना करावे; आणि आपण खासा स्वारीनसी माघारा परतून बडव्याचे घाटीणे देसी यावे, यैसे मनसबा आहे. तत्रापि रोहिले व जाट माघारा न गेल्यास खासा स्वारी ते प्रांती जाऊन छावणी करावी हाहि मनसबा आहे. कलम १

वीस हजार सिवाये पायदेल येमुना उतरून आलीकडे गोहेदनजीक आले. ग्वालेरीस मोर्चे लावावे यैसे वर्तमान आले. त्याजवरून श्रीमंत राजश्री दादासाहेब देवासियाहून गुजराथेस जाणार होते, तो मनसबा येकीकडेस ठेऊन परतून हिंदुस्थानात जावे यैसा मनसबा करून कूच केला. येक मजल पुढें गेले. कलम १

पूर्वी विनंती पत्र लिहिले होते की तुकोजी होलकर यांस छ ४ जिल्हेजी वस्त्रे दिल्ही. नवी जागीर पौ सा माहाल सरकारांत घेऊन नजर दाहा लक्ष रुपये करार केले. त्या उपरी हाली मनसबा ठरला की गंगाधर येशवंत व विष्णु माहादेव या उभयताचे विद्यमाने नजर पंधरा लक्ष रुो द्यावे आणि दरोबस्त नवा जुणा सरंजाम पैकी सिरोंज व खरगोन व देवपूर तर्फ तीन माहाल सरकारात द्यावे. बाकी पूर्ववतप्रमाणे करार करावे. यैसे श्रीमंताजवल ठराऊन आहिल्याबाईकडे इंदुरास गेले. तेथून करार ठराऊन आले म्हणजे सदरहू लिहिल्याप्रमाणे ठरेल. पूर्वी जाले ते राहिले. कलम १

येकून च्यार कलमे सदरहू सेवेसी लेखन केली आहे त्याजवरून निवेदन होईल. पुढे डाकेचे वर्तमान जैसे येत जाईल तैसे सेवेसी विनंती लिहित जाऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Trimbak Narayan gives Vishvasrao Lakshman news of the movements of Raghunathrao.' The letter refers to the disagreement between Mahadaji and Kedarji Sindias, the investiture of Tukoji Holkar and other matters.*

4305

*No. 181*] [*21-5-1767*

पौ छ ७ मोहरम
सन समान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवा

विनंती सेवक गोविंद रघुनाथ सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल वैशाख वद्य ८ गुरुवार मुा ना जेपालपूर जाणून स्वकीये निजानंद लिहित असिले पाहिजे विशेष. आज्ञापत्र छ ३ जिल्हेजचे पाठविले, पावोन सविस्तर विदित जाहले. श्रीमंत नानासाहेबाचे होते ते त्यासी दिल्हे. ते समई बहुत बोलिले कीं आम्हास पत्र काशास लिहितो ? आम्ही कोण ते कोण; आम्ही वाचीत नाहीं. त्याचे आमचे नाते काय ? समई उतर येकनिस्ठेच करावे; परंतु रुचत नाही. समीप मकारपूर्वक यानी आज्य घेऊनच बसले आहेत. तैसेच उतर पत्राचे मागिता, परिछिन बोलले की मी त्याजला लिहित नाही. तेव्हाहि दाट रदलबदल केली. मर्जी बहुतच दिक जाहली. जाब न दिल्हा. साहित्यकारानी मर्जी आपल्याविशई बहुत पाषाणतुल्य केली. तिलमात्र द्रवाचा लेश नाही. नित्य अनुसंधान आपलेच. काल आम्हांस म्हणाले कीं बेहडाकरिता तुम्हांस ठेऊन घेतले होते. त्यासी बेहडा परभारा झासीस गेला, त्याचे उतरहि आले; तुम्हीं काशास राहाता ? तुम्ही जाणे; तथापि तुमचे येजमानाची आज्ञा असेल तैसे करणे. राहा अथवा जा; तुम्हांस आज्ञा दिल्ही. आम्हीं उतर केले कीं पहिले आपण ठेऊन घेतले हे रावसाहेबास लिा. त्यानी उतर लिहिले कीं नानासाहेबापासी असणे. आम्ही लिहू तेव्हा येणे. आता आपली आज्ञा यैसी जाहली त्यासी लिहितो. त्याची आज्ञा येईल त्याप्रों करीन. त्यानी आपल्यापासी राहा म्हटले तर आहे. बोलाविले तर आपले आज्ञा घेऊन जाईन. उतर केले कीं तुमच्या विचारास येईल ते करणे. दुसरे बेहडा परभारे गेला. नानासाहेबास दाखविला नाही. त्यामुले बहुतच श्रमी; इतके अवचितरायानें केले. दरबार खर्च बारा हजार का दिल्हे ? आम्ही पहिले पंधरा हजार देविले होते. मग हे काशास दिल्हे ? यैसी कर्मे तुम्ही परभारा करिता, यांत तुमचे बरे कसे होईल. आम्हांस बेहडा दाखविला असता तर त्यांतून काही गोळा घेतला नसता. आतां बेहडाचे द्रुपछनवे (?) जाहले. रावजीवर व तुम्हावरी बहुत श्रमी; तो विस्तार पत्री लिहिता येत नाही. पत्राचे उतर न दिल्हे. रा रावजीस पत्र दिल्हे, त्याचे उत्तर त्यानी लिहिले त्यावरून कलेल. रावजीस सिंदेची कारभाराची वस्त्रे जाहली. कारभार

करू लागले. हे परम वडिलास असह्य. रावजीनी घेतली तेव्हा त्यासी पुसोन जे केले ते केले. यैसे असता मनास येईल तैसे घरी बोलतात. तुमचा व * * चा नाद अस्टौ प्रहर आहे. परम संतापभूत होतात. दादासाहेबाची मर्जी दोन दिवस कायम आहे यैसे नाही. * * * * * * * * * * * नवे जाहले कोणते? राजश्री बाजी नरसिह व राघोबा पागेकरी व पोतनीस राघोबा त्रिवर्ग दादासाहेबापासी आहेत. त्यानी मुख्यासी बोलो घातली कीं पूर्ववतप्रो कारभार चालू द्यावा. माहादजी सिंदे याची सरदारकी जैसी आहे तैसी असावी. नजर मागतील ते आम्हास कबूल आहे. मुख्य म्हणाले की दाहा लाख रुपये देणे. त्रिवर्गानी मान्य केले. त्याची निशा पाहिजे, त्यासी त्रिवर्ग नानासाहेबापासी येऊन वर्तमान सांगितले. निशा आपण साहिबास द्यावी. आम्हीं रुो आपणास देऊ. यासिवाये अडीच लाख रुो तुमची बाकी आहे तेहि देऊं. दिवाणगिरीची वस्त्रे आपण घ्यावी. आपल्या तरफेने आम्हीं कारभार चालऊ. अकारपूर्वकास पटकी खामखा द्यावी. आपल्या निशा वेगळी दादासाहेबाची निशा होत नाहीं. तेव्हा नानासाहेबी कबूल केले. ते आपले घरास गेले. दादासाहेब तर मतलबी फार; रुो येतात ते घ्यावे, पुढे जे होणार ते हो, यैसा विचार घाटला आहे. हे वर्तमान रावजीसहि कळले आहे. येका दो दिवसात काय ठरेल ते पाहावे. मागाहून सविस्तर लिहू. दरबारात किमपहि (अपूर्ण.)

श्रीमंत दादासाहेबाचे पत्र रा मामाचे नावचे पाठविले ते घेऊन उतर पाठवणे हे विज्ञापना. सो पांडुरंग शंकर सा नमस्कार विज्ञापना.

¶*Govind Raghunath to Vishwasrao Lakshman, narrating the conversation he had with Nanasaheb (Naro Shankar) and the latter's displeasure with the conduct of the addressee. The letter contains disposals made by Dadasaheb regarding the affair of Mahadji Sindia.*

---

*No. 182*] [*7-6-1767*

छ ९ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री राऊ

साहेब साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक देवाजी शामराऊ निा माहादजी सिंदे सां नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना यैसीजे. श्वामीचा निरोप घेऊन श्वार जाहलों ते काा इंदापुरास

पावलों. राजेश्री गोविंद सिवराम तात्या निघोन पुढें हिंदुस्थानास गेले. त्याची आमची येका दो रोजाचे आंतर पडलें. आपणहि माघून त्यास आटोपून जातों. हिंदुस्थानचे वर्तमान तर राजश्री बाजी नरसिंहे याजकडून पत्रें आलीं; त्यांत मजकूर लिा कीं श्रीमंत राजश्री दादासाहेबानी केदारजी सिंदे तुकोजी सिंदे याचे पुत्र यासी सरदारीचीं वस्त्रें दिल्हीं; आणि दिवाण अच्युतराव गणेश व मुजमु विष्णु माहादेव यासी व कारभारी गणोजी कदम यैसे ठरले; व जुने मडळ माहदजी बावासुधा राहिले, यैसे वर्तमान जाहले. तेव्हा बाजी नरसिह याचे कर्ज बारा लक्ष रुा सरदारीकडे, तेव्हा केदारजी सिंदे यासी रुा मागो लागलें. तेव्हा श्रीमंतानी त्याजवर हला केली. त्यास त्याचा याचा जुजाचा प्रसंग मांडला. तिसरा प्रहर परियेत तट पडला. मग महिपतराऊ पानसे मधेंस्तीत येऊन बाजी नरसिंह यास श्रीमंताकडे घेऊन गेले. तेव्हां श्रीमंत बोलले की तुम्ही यैसा बखेडा मधे करितां तर उतम नाही; तुम्ही आम्हापासी आमच्या लस्करांत राहणें यैसे बोलिले. त्यावरून बाजी नरसिह आपल्या लोकासुधा श्रीमंतापासी राहिले आहेत; व राजश्री माहदजी सिंदेहि आपल्या डेरियात आहेत. याप्रमाणे वर्तमान जाहलें. पुढेंहि जे होईल ते वरचेवर सेवेसी लिा जाईल. होलकराचा मजकूर तर राजश्री तुकोजी होलकर यासी सरदारीची वस्त्रे दिल्ही. रा गंगोबा तात्याहि या मसलतीत आहेत. रुा काही थोडेबहुत दिल्हे याप्रोा वर्तमान जाहलें. लस्करास गेलियावर जाहले वर्तमान सेवेसी लिा जाईल. बाजी नरसिह याची मुलेमनुशें श्वामीचे आज्ञेवरून काा इंदापुरास घेऊन आलों होतो. त्यास आतां तिकडील प्रसंग तो या प्रकारचा यैकून त्यानी दहसेत खाली कीं पूर्ववतप्रमाणेंच होईल कीं काये, याजमुले ते येथून मागती जावयाचा प्रकार करणार. आपण त्यास सांगितले कीं श्रीमंताची आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करणे, म्हणून राहविलीं. त्यांस काये आज्ञा, राहावे किंवा येथून जावे हे दोहींतून येक आज्ञा करावी, त्याप्रो वर्तणूक करतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*Devaji Shamrao communicates to the Peshwa details about the investiture of Kedarji Sindia and Tukoji Holkar in their office by Raghunathrao. Baji Narsinh thereupon demanded from Kedarji the repayment of 12 lacs due to him. This action Raghunathrao resented and sent his forces against him. They were however reconciled by Mahipatrao Panse and Baji Narsinh was asked to remain with Raghunathrao in his camp.*

4308

No. 183] [14-6-1767

पो छ १६ मोहरम

सन समान जेष्ठ मास.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय लिहिणे विशेष. मालराव होलकर मृत्यु पावले त्यांचे दौलतीचा बंदोबस्त राजश्री तुकाजी होलकर यास सोपून त्यासच सरदारीची वस्त्रे येथे दिल्ही आसेत. जो बंदोबस्त होणे तो येथून जाला. तुम्हाकडून यांचे माहालास कोठे कोठे जफ्त्या गेल्या आहेत म्हणौन विदित जाले. यैसियासी याचे माहालास तुम्हाकडील जफ्ती गेली आसेल ती उठवणे. यांचे माहालास व गावखेडियास देखील मशारनिलेकडील कारकुनाचे गावखेडियास कोणेविसी उपसर्ग न करणे. जफ्त्या केल्या आसाल त्या उठवणे. याचे माहालास व याचे निसबतीचे कारकुनाचे गावास देखील उपसर्ग न करणे. जफ्ती केली असेल ते उठऊन नेणे. बहुत काये लिहिणे ? छ १ मोहरम हे विनंती.[१]

¶*Raghunathrao to Nana Fadnis, referring to the death of Malrao Holkar and the subsequent bestowal of the Sardarship on Tukoji Holkar. The writer asks the addressee to release the Mahals of the Holkar that may have been confiscated.*

---

No. 184] [21-6-1767

पौ छ १७ सफर

श्री

श्रीमंत राजश्री रावजी स्वामीचे

शेवेसी

पोष्य गणेश शंकर कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। जेष्ठ वद्य दशमी मु॥ आनंदवली सुखरूप असो विशेष. आपणाकडून पत्र येऊन समाचार वर्तमान कळत नाही तरी यैसे न करावे. येणारासमागमे पत्र पाठऊन

---

१ सबंध पत्र राघोबाच्या हातचें आहे.

सांभाळ केला पो॰ यानंतर खासा स्वारी मांडवगडावरून सिंदे होळकर यास निरोप देऊन मजल दरमजल जेष्ट वद्य दशमीस आनंदवलीस दाखल जाहाले. राजश्री अवचितराव यास सिंद्याची दिवाणगिरीची मुतालकी सांगितली. दिवाणगिरी राजश्री नानास दिल्ही. तीन किले नानाकडे आहेत पैकी सरकारात घ्यावा याप्रा करार ठरून वस्त्रे जाली. रावजी, आपले मामलतीविसी श्रीमंतास आर्ज केला की रसद आडीच लाख रुा घेऊन मामलत करार करून देवावी. त्यास श्रीमंतानी आच्युतरावजीस सांगितले की झासी व करेरा दोन्ही किलेयास सरकारचा लोक दोन दोनसे घ्यावे आणि मामलत करार करून देतो. त्यास अच्युतरावजी आडीच लाख म्हणत होतो. मग सिंद्यास निरोप जाहाला तेव्हा आच्युतरावजीसहि निरोप जाहाला ते गेले. राजश्री गोविंदरावजीस येथे ठेविले. दरबार खर्च पाठविला त्याजपैकी काही बहुत करून पावला. थोडा बहुत लोकाचा देणे आहे. मग राजश्री गोविंदराव व बाजीपंत फडणीस आम्ही कृष्णाजी गोपाल यैसे मिलोन मामलत करार करून घ्यावयाचे मसलतीमध्ये होतो. त्यास आम्हास श्रीमंतानी बोलाऊन सांगितले की साडे तीन लाख रसद करार करणे आणि लोक किल्यावर घ्यावे. याप्रो होत असिले तरी मामलत ठेऊं, नाही तरी दुसऱ्यास सांगू. त्याजवरून श्रीमंतापासी जाऊन तीन लाख रुा याचा करार केला. त्यास श्रीमंतानी आपले हाते याद लहोन तीन लाख, लाख श्रावण मास, लाख भाद्रपद, लाख आस्विन, तीन हफ्ते करार करून दिल्हे. साल गुा सिबंदी जाजती दिल्ही ती साल मजकूर करून दिल्ही. बेहड्याप्रो करार केली आणि किल्यावर लोक घ्यावे हा करार करून दिल्हा. लोकाविसी रावजींनी कबूल केलेच होते. न करावे तरी मर्जी रक्षत नाहीं. म्हणून करार * * मामलतीची सनद घेऊन पाठविली आहे तरी कराराप्रो यैवज मुदतीचे आधी येऊन पावता होय तो अर्थ करावा. नाही मामलत करवे तरी तैसेच लिहोन पाठवावे. दुसरा मामलेदार करितील. रा॥ गोविंदराव येथे येकले. त्याजपासी कासीदजोड्या चार पाच आसाव्या त्या नाहीत. व दरबारखर्च लोकाची बाकी गुाची व साल मजकूरची लोकासी बोलोन ठेविले. परंतु त्याचा यैवज व रसदेचा यैवज याप्रो लौकर पाठविल्याने आमची गोविंदराव याची पर्त राहेल किंवा जाबसाल काय तो करून सत्वर पाठवावा त्याप्रो करू. वरकड दरबारचा प्रकार तो आपणास विदित आहे. श्रीमंत राजश्री नाना आम्हावर बहुत क्रोधायमान जाहाले की माझी मामलतीची घालमेल केली. ती तुम्हीच केली यैसे बहुत आम्हावर श्रमी जाले. त्यास आम्ही

त्याजकडून तुटक. याजउपरी आमचा अभिमान आपणास आहे. रा नाना भालेगावास निरोप घेऊन गेले कलावे. श्रीमंत रावसाहेब कर्नाटकांतून स्वारी चांगली करून आले, पनास लाख रुो खंडण्या सस्थानाच्या व वीस लाखाचा मुलूक याप्रो स्वारी करून पुण्यास दाखल जाले. याच्या त्याच्या भेटी याउपरी होणार. कलावे बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे. रसदेची तरतूद सत्वर करून पाा हे विनंती.

¶*Ganesh Shankar reports the new arrangements made by Raghunathrao for the administration of Jhansi and the adjacent territory. He also adds that the Peshwa has returned to his capital after a most successful expedition into the Karnatak.*

---

*No. 185*] [*27-6-1767*

**श्री**

**चिरंजीव राजमान्य राजश्री अच्युतरावजी याप्रति**

विश्वासराव लक्ष्मण कृतानेक असीर्वाद उपरी. येथील क्षेम ताा छ २९ माहे मोहरम मुा झासी जाणोन स्वकीय लिहीत असिले पाा विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब व तीर्थरूपजी नर्मदा उतरोण मजल दरमजल देशासी चालिले. तुम्ही राजश्री गोविंदराऊ रघुनाथ याजला सरकारच्या मुतसदियांसी येकवाक्यता करून देऊन उभयेतापासून बिदा होऊण इंदुरच्या मुकामीहूण पत्र लिहिले ते पावले. वर्तमान सविस्तर कळूं आले. दरबारचा बंदोबस्त कांहीच न जाला. आमचा विश्वास तुमचे ठाई पूर्वीपासूण. तुम्ही सला दिधली कीं लस्करात राहूण काळहरण न करावे. त्यापेक्षा झासींत राहूण सरकार कामावर असल्या उतम आहे. वडिलाही मामलत सेर सालची आकारून ज्यास्त वराता केल्या. आनखी आजपर्येंत करीत जातात. कादार वराताच्या मारे पळत फिरतात. आम्हासी कोठे बोलावयासी ठिकाण नाही. झासीत येऊन फसलो. यास्तव आजपर्येंत कर्जवाम घेऊन किले फौज पोसून सरकारचा नक्ष राखिला. आम्ही रात्रंदिवस अर्थप्राणे कष्ट भोगूण वडिलाच्या मर्जीस येकहि प्रकार न आला. निरापराधी आसतां नाही त्या गोष्टी चितावर घेऊन आपण श्रमी होऊन आम्हासी श्रमदायेक पत्रे लिहितात. आम्हासी झांसीची मामलतीचे प्रयोजन कायें? येक तर प्राप्त नाही. कर्जदार जालो. दुसरे नावलौकिक की वडिलाचे मरजीप्रमाणे चालत नाहीत. हकनाहक जनापवाद करावा नाही. मामलत त्याची त्याजकडे असता येजमानसाहेबांसी वडिलांहि विनंती केली की झांसीची मामलत आम्हासी लागत नाही. अपुल्या अंगावरील वोझे उतरोन अम्हावर टाकिले. तेच मामलत करिते तरी आमचा अघ्रये नव्हता. आसो. तुम्ही अपुलासा येत्न

बहुत केला. थारेस गोष्ट न लागली. वडिलांची मरजी रक्षूण दिवाणगिरीची मुतलकी केली. बिदा जाले. दरबारी तुम्हाप्रमाणे आमचे ममतेचा दुसरा कोण आहे? असो. दैवयोगे जे होणे ते होईल. लाहनमोठे सर्वांही वडिलांची कृपा संपादिली. आम्ही झांसीस अल्यामुळे व्येर्थ बुडालों. धरभार (?) कोन्हासहि न जाला. तुम्ही या प्रांती सत्वर येणे. सर्व वाकीफ[1] जाल्यावर कळू येईल. परिहार कोठवर ल्याहावा? जाटरोहिल्यांची फौज या प्रांती आली. अनुपगीर सिमथरासी गुजराची पाठ निघाला. उमरावगीर झासीत ठेऊण घेतला. किल्याची सेज[2] केली. तो राजश्री बालाजी गोविंद याही वकील पाठऊन रोहिल्यासी तह केला की उभयेता गोसावियासी आम्ही या प्रांती राहू देत नाही. तुम्ही माघारे जावे. उभयेपक्षी वच्यनप्रमाण जाल्यावर रोहिले जाट माघारे स्वस्थळासी गेले. उपरांतिक आपण भदावर, कछवाधार गोसावियांची दूर करून रा बालाजीपंताचे नावे संदा पा. गोसावी बेइमानीस येऊन फौजबंदी करून गुजर वगैरे शामील केले. तेव्हा रा बालाजीपंती गुमाणसिंग व खुमाणसिंग व पुरनसानी नि॥ हिंदुपत ढंगाईकर जमा करून उभयेपक्षी युध्यासी अता सज्य जाले. आजउद्याकडे युध्यप्रसंग व्हावा. उमरावगीर गोसावी बंधूचा उत्कर्श पाहूण आम्ही जागीर देत होतो ती न घेता मवासी करून पोट भरावे. दुष्टासी दुष्टबुध्य उपजेल, सर्पासी दूध पाजल्या आमृत होत नाही. वडिलास यांचे गुणानुवाद ठाऊक असता आमचे जिदीमुळे[3] न करणे ते चितावर घ्यावे. अभिमान नकुंच्य[4] मानसाचा धरावा ते वडीलच आहेत. आम्हासी त्यांचे पायासी आंतर नाही. मागेहि केले नाही. पुढेहि करनार नाही. परिनामी वडिलास कळून ध्यानासी आनोन देऊ. आसो. उमरावगीर गोसावी आमचे अमित्र. आष्टभया व गुजर त्याही दुंदी करून मुलूक मारला. त्याचे येथे कुटुंबे ठेऊन आम्हासी स्पर्धा आरंभिली. बहुत प्रकारे समजाऊण सांगितले. अद्यापवर सांगतो. आम्हावर तुफान तुतियां करून वडिलासी पत्रे लिहितो. जाटरोहिल्याची फौज येकायेकी पिनाहट भदावरची जागा तेथे खासा जवाहीरमल आला. सब्या फौजा घाट उतरोन सिंदआल्याड आल्यावर अनुपगीर गोसावी नवाब सुजायेदवलापासी गेला. उमरावगिराचे पारपत्यासी जाटरोहिल्याची फौज रोहिरा झांसीपासून चोवीस कोसावर फौज आल्याची बातमी आली. उमरावगिरामुळे बुंधेलखंड प्रांत बुडाला. आम्हासी मिळोन राहत नाही. आमचे अमित्र त्यासी मिळोन आमचे आनहित करावे ऐसा वडिलाही मुदई करून पाठविला. याजमुळे मुलकाची जोत बुडाली. पुढे काये होणार ते पाहावे. जागीर घेऊण झासीत राहावे,

---

१ माहीत. २ तर्तूद. ३ आग्रह, भीड. ४ लहान. ५ खोटेपणा—तोतया.

4312

येक विच्यारे काम करावे, ते त्याजला अनकूल पडत नाही. मग जागीर आम्ही कोनासी द्यावी? प्रस्तुत मुल्क पडला. दंदींदंद करतो. ज्यन्मांतरीचा दोर उभा राहिला आहे. आम्ही झासीची आशा वडिलाचे रागामुळे राखीत नाही. मग मोटेची आशा कोणासी आहे? उमरावगीर बदमामलीस आला. मवासी करून जाटरोहिल्याचे धाके तोंड दडपीत फिरतो. आमचे नाव बद करितो हे अपूर्व. तुम्ही गोसावियांचा संग्रये केला म्हणजे बुंधेलखंड बुडाला. कछवा-धारेत गढ्या मात्र राहिल्या. वरकड मुल्क उज्याड जाला. जाटरोहिल्यामुळे झासीपर्यंत जागा उज्याड जाली. पायेरवा गोसावियाचा. होऊन चुकला. इत:पर डोळेझाक न करिता सिंदे होलकर या प्रांती येऊन बंदोबस्त करणे तो सत्वर करावा. मुख्य श्रीमंत रा दादासाहेबासी विनंतीपत्र लिहूण पाठवावी की अनुपगीर जात राहिला. उमरावगिरामुळे उपद्रव रात्रंदिवस आहे. याचा संग्रह करणे तो हुजूर ठेऊन करावा. या प्रांती उपयोगी नाही. आम्ही वडिलास पत्र ल्याहावे ते उलटे समजतात. यास्तव तुम्हासी लिहिणे ते ल्याहावे. तुम्ही वडिलाचे मरजीप्रमाणे लक्ष राखून अहात, यास्तव अनमान ल्याहावयासी कराल तर या प्रांतीचा दंगा मिटनार नाही. उभयेतां सरदार या प्रांती राहूण पारपत्य न जाले तर लवकिक नाही. गोसावियांसी बोलाऊण घेणे म्हणजे जाटरोहिले माघारे अपुल्या स्थळासी जातील. मुल्क वस्ती होऊन कमबेश जोर्त होईल. आज या मनसब्यासी चुकल्या या प्रांती वाट चालनार नाही. प्रस्तुत दंगल भारी आहे. उतम जानाल ते करणे. [अपूर्ण]

¶*Vishwasrao Lakshman to Achyutrao, the newly appointed Diwan of Sindia : writes a graphic account of the troubles that had arisen in Bundelkhand in consequence of the return of Raghunathrao having left behind many sources of disorder and the intrigues started by the Gosawi brothers with the help of the Jats and the Rohillas.*

---

*No. 186*] [*June 1767*

२

[पहिला बंद गहाळ आहे.]

तस्मात दिसूंन येते जे श्रीमंताचा विश्वास पाटीलबावाकडे ममता खचित आहे. आपल्याकडे बाह्यात्कारे बोलने दिसते. त्यास हरकूबाई व रा कृष्णाजी मुरार बोलले जे आसे होणार नाहीं. उभयेतां सरदाराच्या कामाकाजाच्या व बोलन्याचालन्याच्या कडसन्या सर्व श्रीमंताच्या ध्यानात आहेत. तत्रापि आपला निश्चेये सुभेदारापासून जे चाल आहे कीं श्रीमंताच्या पायांखेरीज आपले

---

+ लावणी.

दुसरे दैवतच नाहीं; तेच आपले खचित आसावें. यांतच आपले कल्यान आहे. आनीख कल्पना श्रीमंताच्या चितांत कीं बायेकांचा मनसबा कसा सेवटास जाईल; या आर्जीत तेथे विचार आसेल तर हरकूबाई बोलली जे हे संदह आपण घेऊ नयेत बाईकडून तेथील आज्ञेप्रमाणें वर्तणूक, घडेल हे त्यांच्या ध्यानांत आहे. मुख्ये येथीलहि लक्षे त्यांचे आज्ञेवरच आहे. आसीबाई व हरकूबाई व कृष्णाजी मुरार त्रिवर्गीची बोलनी जाली. तदोतर मींहि दरबारीच होतों. हरकूबाई व कृष्णाजी मुरार बाहेर येऊन मजला बोलाऊन बोलले जे दोणतीण पत्रे तुम्हीं आम्हीं बसून लिहिली; परंतु अद्याप त्या मजकुरांची उतरे काहींच आली नाहीत. येथे तों हे बोलायास आले आहेत. यार्णी तो सरकारच्या मर्जीचे धोरण धरून बोलले पाहिजे; आणि बाईचे मानस केवल सिंद्याच्या बोलन्यावर विश्वास खचित आहे आस नाहीं; आणि सिंद्यांकडील बालोराव[1] बोलायास मातबर आले आहेत, यांसी वांकून बोलतील हाहि खमीरे[2] येथील नाहीं. बाई ही सुबेदाराची सून होये. तुकोजीबावाहि तिचे हतचा बसविला होये. यार्णी हरयेकविसीं हेलना करावी आणि बाई करून घेईल आसें होणार नाहीं. येक श्रीमंताची मर्जी खचितपणे कसी आहे ते मात्र पाहावी. ते धणीं, त्यांचे ममतेने जे कर्तव्ये तें करावें. केवल सिंद्याच्या बायेकांस पाटीलबावानी जसे केले तसे करून घेणार हे नव्हेत. सिंदेहि आपले जागचे व हेहि आपले घरचे. श्रीमंताच्या पुन्येप्रतापेकरून शककर्ती कामेच यार्णीहि पहेले केली आहेत; आणि पुढेंहि मरेतोंवर तेच धारणा यांची आहे. केवल त्यांचे वोंजलीनें पाणी पितील आसे होणार नाहीं. येक श्रीमंताचे आज्ञेचे आंकित आहेत. आसीं बहुत प्रकारें कृष्णाजी मुरार यार्णी भाषणे केलीं. आपल्याकडील उतरान्वये यांसी बोलावे आसे याचे मानस; येविसीं पेशजीहि सेवेसी विनंती लिहिली आहे. उतर श्रीमंतास विचारून काये आज्ञा ते यावी. बाईसहि श्रीमंताचे व आपले पत्र यावें. कारभाऱ्यांपैकीं कृष्णाजी मुरार याचे ठाईं विश्वास बाईचा फार आहे. हरयेक येकांतीच्या सल्यामसलतीत मारनिले व हरकूबाई हे फार आसंतात. सेवेसी भृत्य होये. इतके श्रीमंताचे पत्रीं लिहिले नाहीं. आपण समजाऊन सांगतील. येकिले कचे वर्तमान सेवेसी लिहिले आसे. न्यून्ये पूर्ण करनार स्वामी समर्थ.

¶*This is a fragmentary but important letter addressed probably to Nana Fadnis reporting to the Peshwa at Poona the spirited attitude of Ahalyabai Holkar against the insinuations of Mahadji Sindia and possibly of Raghunathrao. Very possibly the question discussed in the letter refers to the instalment of Tukoji to the Holkar estate after the death of Malrao Holkar on 27th March 1767, setting aside his mother Ahalyabai.*

---

१ सिंधाचा कारभारी बाळाराव गोविंद. २ खंबीर=भरंवसा, निश्चय.

No. 187] [29-7-1767 ?

श्री

राजश्री रावजी स्वामीचे शेवेसी

विनंती. तागाईत छ २ रबिलौवल प्रहर दिवसपर्यंत वर्तमान यथास्थित असें विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. पथरगडपैकी शिलक रुपये होते :

६०००० महमदशाई
६०००० नजीबशाई
१२००००

येक लाख वीस हजार रुपये होते ते महमदशाईस दाहा रुपये व नजीबशाईस पांच रुपये येणेंप्रमाणें बटा करार करून बाळापा नाईक मिरजगांवकर यास दिल्हे. न्याहार गुजर यास निरोप दिल्हा. हत्ती अंबारीसमवेत दिल्हा. शिरपेंच दिल्हा. पहिली चिठी आपणांस पाठविली ते बाजीपंताजवळ असेल, व हल्ली ही चिठी आबरोबाचे जाबसालाविशी लिहिली आहे, त्याजवरून कळेल. नदीस येथील पाणी फार आलें. होळकर इकडे कूच करून आले. उदयिक कुचाचा मजकूर आहे. मैराल केशव याचा हिशेब दतियाचा आज विल्हेस लागावयास निघाला आहे. येकूण पन्नास हजार रुपायाची निशा करून दिल्ही म्हणोन गोविंद रायाजीनीं दादास सांगितलें. त्यांणीं तो कांहीं मला पुसलें नाही. मोघमच आहे. रोहिल्याचा जाबसाल येतो येतो असाच आहे. अझून सुज्यातदौल्यापासून हाफीज निघाला नाहीं. किर्दी तटल्याच आहेत. बहुत काय लिहिणें, लोभ करीत असिलें पाहिजे, हें विनंती.

¶*The paper addressed to Vishvasrao Lakshman refers to financial transactions in the Pathargad district and mentions how the negotiations with the Rohillas were being delayed.*

---

No. 188] [15-8-1767

पौ छ २० माहे राखर
सन समान

श्री

श्रीमंत राजश्रीरावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक चिमणाजी मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १९ रावल मंदवासर मो सागर स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. कृपापत्र सादर जाहाले तेथें आज्ञा कीं, वोडशास दोन दिवस राहिला ही गोष्ट उतम नाही. यैसियासी गुरुवारी रात्रौ पुजासमई स्वामीची आज्ञा घेऊन

भृगुवारी प्रात:कालीच निघोन वोडशास आलो. राज्याची भेट घेतली. तेच-समई त्यासी भाषण करणे ते करून मुसाहेब दाऊजी इजतराय व बाजपेई यैसे समागमे घेऊन आज मंदवारी सागरास आलो. राज्याचे बोलण्याचे प्रमाण नाही, याजकरितां रावराजे व दिवाण तीर्थराजपंत अजुर्दे आहेत. त्यास येथें सर्व मिलोन याचे विचारे करार ठरला की उभयतानी वोडशास सडे जावें. राज्याचे प्रमाण करून करार पट लिहून द्यावी, तुम्ही उभयता व चिमणाजीपंत यैसे कराल ते प्रमाण. आपण येथून कोणे गोष्टीची घालमेल करणार नाही. कोणास जागीर देणे आगर काढणे ते याच्या विचारें करावें, परभारे न करावे, यैसा विचार ठरला आहे. त्यास उदैक रविवारी आम्ही महूस जातो. हे उभयता सडे वोडशास जातील आणि सोमवारी तेथून बिदा होऊन आम्हाकडे येतील, याप्रा करार केला आहे. वोडशास गेल्यावर बोलल्याप्रा ठरले म्हणजे हजार दोन हजार जागीरदार वगैरे भीड घेऊन उभय सामील राहातील. दिवसगतीवर टाकले तरी स्वामीचे प्रतापें सेवकापासून जे सेवा होणे ते होईल. याची आमची सामीलता राहिल्यास उपयोगी आहे. सर्वासी दावा करणें तेव्हा यासी सूत राखावे. तहनामा उभय पक्षी मोहरा होऊन ठरेल त्याची नकल सेवकाकडे पाठवावी. ठाणें जागा सुटेल त्याचा तह पुर्ता बांधावा. त्या समई कजिया कार्याचा नाही. अष्टम्यापैकी लुधोरा व तोडी मात्र राज्याकडे, बिजना धुरबाई टहरोली व पाहाडी हे जागा आपल्या हिशात याप्रों हें सांगतात. याचा तह कागदी पत्रीं येथास्थित करावा. बिजना आपल्या हिशात आहे, राज्याकडे नाहीं. तहनाम्यात अष्टम्याचे ठाणे याचा झाडा लिहावा. राजेयासी स्वामीनी ताकीद लिहून रावराजे व तीर्थराजपंत याची बिदा सत्वर करीत ते करावे. उदैक रविवारी महूस पावल्यावर तिकडील सविस्तर सेवेसी लिहू. याचे राक्षसी मायेत येत नाही. सरकार मतलबास अनकूल पडेल तोच प्रकार होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Chimnaji Moreshwar reports to the Peshwa that he will succeed in effecting a treaty with the Raja of Orcha though he appears to be vacillating in his views.*

---

*No. 189*] [*10-8-1768*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वासराव जी**
**स्वामीचे सेवेसी**

पो बालाजी शंकर सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता अधिक श्रावण वद्य त्रयोदसी मुकाम पुणे येथास्थित असो विशेष. आपण पत्र छ १९

सफरचे पाठविले ते पावले. सविस्तर आर्थ कलला. येसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषवीत असांवे. यानंतर जाटाकडील फौज दानसा वगैरे फिरंगी येऊन आटेर व कछवा व धारे येऊन अमल बसविला. पुढे झासीकडे येणार. त्याचे आवाईने रांगड्यानी अमलास खलेल करितात व कितेक गुजर वगैरे भेटले म्हणून लिहिले ते कलले. श्रीमंतांसहि निवेदन केले. त्यास आज्ञा झाली की किल्याकोटाचा बंदोबस्त राखून सरकार चाकरी करून दाखविल्यास उतम आहे. याप्रो आज्ञा जाली आहे. त्यास आपण किले कोटचा बंदोबस्त करून सरकारचा नक्ष राखालच येविषई भरवसा आपला आहे. सरकारच्या फौजा हुजरात व सिंदे होल्कर याजला निरोपहि हिंदुस्थानात जावयासी दिल्हा आहे. ते लौकरच येऊन पोहोचतील. यानंतर सरकारची बाकी सालगुाची राहिली आहे ती व वराताची बाकी आहे ती आद्याप आली नाही व सालमजकुरची रसदहि आली नाही व कारकुनास रसदेच्या जाबसालाविसीहि कांहीं लिहिले नाही. येथे तो सरकारची निकड बहुत आहे व आपणास वारंवार पत्रे गेली. परंतु त्याचे काहीच उतर न आले, तरी येवज गुाची बाकी व सालमजकुरचे रसदेचा येवजाचा ठराव होऊन पैकी तूर्त येवज याप्रो दिल्यास पुढे बोलावयासी जागा होईल. तोंडचा जाबसाल आतापर्यंत जाहला. पुढे निभाव या जाबसालाने होणार नाहीं. तरी काये तजवीज ती करून सत्वर लेहोन पाठवणे. सालगुा वरात ग्वालेरकर याची पैकी बाकी साडेसत्रा हजार राहिली आहे. त्यासाठी रा गोविंदपंत व हरिपंत यास तीन रोज उपवासी बसविले होते. मग राजश्री नानाफडणीस याणी ग्वालेरकरांस सांगितले की श्रावणेपुर्णिमेपर्यंत पत्रे व येवज येणार आहे म्हणून मारानिले सांगतात, तोपर्यंत धीर धरणे. याप्रो सांगून त्यास उठविले. याप्रो येथें ताकीद आहे. तुम्हाकडून तो येवज येत नाही. कारकुनास उपद्रव याप्रो होत आहे. मागिल बाकीचा येवज व सालमजकुरचा येवज येईल तरी मामलत राहेल, नाही तरी येथे मामलतीवर उभे राहिले आहेत. मामलत तुमचे हातची जाईल येसे समजोन जे कर्तव्य ते करावे. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ असो दिल्हा पो हे विंनंति.

¶*Balaji Shankar writes to Vishwasrao Lakshman that the Peshwa expects him to hold his position against the encroachments of the Jat. He further requests him to carry out the stipulated financial agreement for the province of Jhansi lest the province be transferred to other hands.*

4317

*No. 190*] [*22 August 1767*

श्री

विज्ञापना. श्रीमंतास पत्र व मुत्छदियासी पत्रे पाठविली ते प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविली आहेत. सिंदे होळकर याचे घरात कजिया लागला आहे. तथापि याची ताकीदपत्रे वरचेवर जातात. दुसरे दतियवाले व वोडसेकर यासी खंडणीच्या येवजाविशई वगैरे ताकीदपत्रे घेऊन पाठविली ते पाहून त्यासी द्यावी. तैसेच हिंदुपत व गुमानसिंग व मानसिंग यासी दुरखुरवाला हटेसिंग याजविशई * * पत्रे घेतली येकूण पाच थैल्या व * * पत्रे येसे घेऊन पाठविले आहे. सावकार अनुपगीर गोसावी याने लुटला. त्यासीहि ताकीदपत्र की वस्तभाव * * * असेल ते माघारी देणे म्हणून घेऊन पाठविले. दुसरे कैलासवासी मल्हारजी होलकर याचे छत्रीस जाहगीर अधिक पडली ते सरकारातून तुम्हाकडे जतीस सांगितली आहे त्याची सनद व रा। तुकोजी होलकर यासी ताकीदपत्र येसी घेऊन पाठविली * सर्व पत्राची याददास्त अलाहिदा पाठविली *. पत्रे पाहून घेणे. तुम्ही लिहिले कीं कमावीसदार * * येत घेतले उतम आहे. कोन्हीहि प्राा दरबारात येवज थोडाबहुत पाठविल्या उतम आहे. किरकोळ दरबारखर्च करिता येवज थोडा बहुत जरूर पाठवणे. आपण म्हणतील कीं किरकोळ दरबार खर्च काशास पाहिजे, तर मजला कांही त्यात आशा नाही. माझी आशा आपल्या चरणापासी आहे. परंतु हे दरबार कालची माणसावर दृष्टि नाही याजकरिता जरूर जाणून लिहिले. आपणहि माहीतच आहेत. फार काय लिहू? राजकी वर्तमान, पहिले रा। गोविंद सिवराम याजला श्रीमंत रावसाहेबी श्रीमंत दादासाहेबाकडे पाठविले होते. मतलब की सातारा जुनर नगर वगैरे किले दादासाहेबकडे ते द्यावे. आपण पुण्यात येऊन कारभार करावा. श्रीमंत नानाप्राो आम्ही श्रीमंत भाऊसाहेब कारभार करीत होते त्याप्राो करू येसे मतलब घातले. त्यात याचे चितात येकंदर न आला. मग गोविंद सिवराम रावसाहेबाकडे गेले. तेथून चित्तशुद्धि उभयताची नाही. परस्परे विरुधाच्या गोष्टी. त्यासी श्रीमंत रावसाहेब श्रावण वद्य पंचमी मुहूर्ते बाहेर डेरेदाखल जाहले. फौज पाचसात हजार घेऊन इकडे येणार म्हणून येकून श्रीमंत दादासाहेबी वद्य सप्तमीस कूच करून गंगापार मुकाम केला. तेथे चार दिवस राहून तेथून पंचवटिकेस मुकाम केला. फौज धरितात. गाडदी पाचसात हजार ठेविले. तोफखाना बराबर घेतला. पंचवटीहून कूच करून नांदूर येथे मुकाम केला. तेथून काल कूच करून दारणासांगवी येथे मुकाम केला. रा।

गोविंद सिवराम मागती आला आहे. अद्यापि त्याची याची चित्तशुद्धि नाही. विस्वतोमुखी कटाक्ष वाढेल येसे आहे. काल बातमी आली की रावसाहेब चतुर्थीकरिता पुणेदाखल जाहले. यांचेहि दारणासांगवीवर दाहापाच मुकाम आहेत. याचा त्याचा कलह वाढेल येसे दिसते. याजला किला येकहि देणे नाही. पुढें वर्तमान होईल ते मागाहून लिहू पाठऊन. वडिलाकडील वर्तमान तर वडील मालगावी होते. दादासाहेबी येकदोनदा शागीर्द पाठविले कीं किला कबूल केला तो खाली करून देणे. ते गोष्टी त्यानी न येकिली. श्रीमंत रागें भरले त्यावरून मालेगावीहून कूच करून * * * स येऊन किले दाखल जाहाले. श्रीमंत रावसाहेबकडे * * लाविले. त्यानीहि याचे चार मतलब कबूल केले. येक किला द्यावा व तीन लाखाची जाहागीर द्यावी येसे कागदीपत्री केले. रावसाहेबाची यावयाची दाटी जाहली, तेव्हा दादासाहेबी रा चिंतोपंत तात्यासी वडिलाकडे पाठऊन * च मतलब जे असतील ते कबूल करून त्यासी घेऊन * * * तेव्हां मतलब कीं किले न मागावे. पहिली जाहागीर होती ते मागती सरकारात घेतली ते माघारी द्यावी. पूर्वीप्रा ममता करावी, रावसाहेब इतराजी होतील तो पेच आपण सोसावा, तुमचा त्याचा स्नेह जाहला तर पाहिल्याप्रो रावसाहेब ममता करीत यैसे करावे. दुसरे झासी प्रांती प्रतिनिधिबा जाहगीर आमची आम्हास द्यावी. रामसर जाहगीर आम्हाकडे बहाल, शंभरा स्वारानसी चाकरी हुजूर करू येसे मतलब घातले, ते सर्व कबूल करून यादीवर करार करून दिल्हा. मग तात्यासी घेऊन श्रावण वद्य त्रयोदसीस आणिले. दादासाहेबाची भेटी घेतली. दादासाहेब बहुत संतोश करून भेटले. रा दादाजीपंतदादा आम्ही रा बापूकडे गेलो. दादानी बहुत रदबदल केली. परंतु त्यानी पहिले बोलिले तेच सिध केले. आम्हास तीन लाख रा नारो शंकर देत असता आम्ही दोन लाख रुपये तुम्हापासून घेतो. मागती रदबदल करिता काय म्हणावे? पंचवीस हजार सूट घ्यावी म्हणून येक मास मोघम ठेविली. परंतु रदबदल न चालली. कबूल केले. रा मोरोबादादा फडनीस याचे विद्यमाने कबूल केले. त्याजला बहुत ममतेत घेतले आहे. स्वारीचा कारभार मोरोबादादाकडेच आहे. श्रीमंत नानाफडणीस याजकडे येथील कारभार, परंतु रा बाबाजीपंती नानाचे मनोधारण राखून त्याची आज्ञा की रा मोरोबादादाकडेच जाबसाल करणे. आता त्याचे विद्यमाने बोलत आहे. रुाची निशा सरकारात पाहिजे. त्यासी बाबाजीपंत दादानी सांगितले की रुा येतील, चिंता नाही. श्रीमंत रावसाहेब बोलिले कीं तुमची निशा आहे. त्यानी उत्तर केले की वाइद्यास रुपये येतील अंतर होणार नाही. तुम्ही बोलता करारप्रा रुा आणवणे. बाबाजीपंतदादानी साहित्य बहुत

केले याचे वचन प्रमाण माणून कागपत्राची आज्ञा जाहली, मखलासी जाहली, मखलासीच्या दोन यादी जाहल्या. येकावरी देणे जाहले. येका यादीवरी आज होईल, म्हणजे कागदपत्र दोती दिवसात करून घेतो. कारकुनाचा हिसका फडनीस व मजमदार व चिटनीस याचा पडेल. रा। आपल्यापासी नाही. श्रीमंत दादासाहेबाच्या दरबारापेक्षा हे दरबार भारी. सर्वास रा। पाहिजे. चार पाच जण कारभारी मातबरच. याजवेगले मुत्छदी दुसरे शागीर्दपेशा चोपदार वगैरे मामलत जाहल्यावरी ते पहिल्याप्रा। सर्वास पाहिजे. पंचवीस हजाराने पुरी पडेलसे दिसत नाही. श्रीमंत बापू प्रस्थान भारी. कोन्ही पाचापावेतो दिल्हे तर घेतच नाहीत. घेतले तर सरकारात देतात. त्याचे भारी प्रस्थान सर्व आपल्या ध्यानातच आहे. पनासा हजाराची वरात द्यावी म्हणून विनंती केली. रा। यावयासी दिकत फार पडती. झासी शहर जाटाच्या दंग्यामुळे उजाड. हुंडीची दिकत पडती. त्यावरून श्रीमंती पनासा हजाराची वरात रा। गोविंद शामराजकडे किले ग्वालेरीचे खर्चास देविले. ते पौष वद्य पक्षी द्यावे. बाकी येवज येथे भरवसा ठरला. बाबाजीपंत दादानी बहुत साहित्य केले येसे असता तुम्ही येकदा त्यासी न लिहिले त्यावरून तुमचे कार्यात सोबत असता त्याजला पत्र लिहिले नाही. ते बहुत श्रमी परंतु तुम्ही त्याचे बहुत प्रा। समाधान केले. तुम्हास येसे पाहिजे. तुम्हीच लिहिले की रा। चिमणाजी मोरेश्वर व माहादाजी नाइकास मोहुराणीपुरा व डाकरोण सांगितली. तुम्हावरच रसदेची येवजाची हुंडी घेऊन पाठवितो, तुम्ही सर्व प्रा। आगत्यवाद धरून कार्य करावे. येसे असता त्याची मामलत काहडिली ते रिकामे झासीस बसले. मागील निकाल करून न दिला म्हणून त्याचे प्रहस्तानी लिहिले होते. आपण तर पत्री काही लिहिले नाही. मग सत्यमिथ्य न कळे. बाबाजी-पंत हती माणूस मोठ्या कार्यास उपयोगी पडेल यात संदेह नाही. दरबारी सतोटी चांगली. आम्ही तुमच्या कल्याणाचे सोबती उत्तम जाणून सविस्तर लिहिले. रा। चिमणाजी मोरेस्वर व नाईक याचे हते कामकाज स्वरूपानुरूप घ्यावे हे उतम, नाही तर मागील फडशा चौघाप्रमाणे करून द्यावा. यातहि बाबाजीपंतदादाचे समाधान. येथें श्रीमंत नारोशंकर नानानी यासी सांगून दोनचारदा पाठविले की तुम्ही विश्वासराव याचे जाबसालात न बोलणे. तुमचा आमचा स्नेह बहुता दिवसाचा येसे असता हे गोष्टी योग्य नाही. यानी उत्तर केले की मजला त्याने झासीहून लिहिले दरबारात जाबसालात आलो, आता टाकून राहावे तर योग्य नाही. विश्वासराव याजकडील जाबसाल केला तरी तुमचाच आहे. रा। बाबाजी-पंतदादाची पद्धत या प्रकारची आहे. त्याजला बहुत ममतेने लिहिणे. रा। तुम्ही करार केला त्याप्रमाणे पावता करीन येसे लिहिणे पाहिजे. त्यानी मुजरद

अजुरदार जोडी करून पाठविली त्यास सर्व लिहिलेच असेल. ते जोडी अद्यापि आली नाही. याजकरिता त्याला बहुत ममतेने लिहिणे. सनदापत्रे घेऊन सत्वरीच रवाना करितो. रसदेचे येवजपैकी पनास हजार व दरबारखर्चा बाा पंचवीस हजार तूर्त पत्रदर्शणी रवाणा करावें. वरात पावल्यावर पनासा हजाराची रसीद पाठऊन देणे. राहिले पनास हजार ते माव सुध पर्क्षा येथे येऊन पोहोचे येसे करणे. सनदपत्र हातास आल्यावर हुंड्या बाा येवज भरावा लागतो. मागाहून सविस्तर लिहू. आपण खातरजमेकारण आपली ममता. दुसरे दतियाकडील येवजे घेणे अगत्य याजकरिता येतील. मधे काय ठरते पाहवे. रावजीस ममता बहुत आपली. तुम्हाकरिताहि त्याजवरी बहुत श्रमी. येसे असताहि त्याची निष्टेत किमपि अंतर नाही. जर उगेच मुख्यापासी असिल्या सर्वाध्यक्ष आहेत चिंता नाही. सुभेता जाहल्या रसदेची तजविजेत जरूर असावे. वरचेवर वर्तमानपत्रे श्रीमंत दादासाहेबास लिहीत जावी म्हणजे त्याजला फौजेचे वर्तमान कलेल. मुख्यास पत्र-व राा लक्ष्मणपंतभाऊ यासी पत्र लिहीत जावे. तेहि आपल्या ममतेत आहे. सिदापासेट यासीहि व राा आबाजी महादेव यासीहि बहुमानाचे पत्रे लिहीत जावी. वरचेवर वर्तमान लिहीत जावे. आम्हास काय आज्ञा याजबराबर देशास जावे कीं काय ? आम्हास देशास जाता कर्जदाराचा उपद्रव म्हणून आपले पाय धरून इकडे राहिलो. आता आपण आज्ञा कारितील त्याप्राा वर्तनुक करू. आपली आज्ञा ये तोवर जिकडे लस्कर जाईल तिकडे जाऊ. नानासाहेबासी आज्ञा दिल्ही कीं जा, वकालतीस ठेविले असिले तर राहा, आम्ही नको म्हणत नाही. सविस्तर वर्तमान लिहिले आहे. उत्तर सत्वर पाठवणे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

राा मोरो गंगाधर येथे आले. श्रीमंतास भेटले. त्याजला वर्तमान पुसणाराणी बहुत पुसिले. त्यानी उत्तर दिल्हे कीं ते मल्हूकडे गेले. आम्हावरी ममताच करीत होते. यानी उत्तर येसे केले कलावे. ग्रहस्तपणास अंतर नाही. राा गोविंद महादेव यासी पत्र ममतेचे जरूर लिहिणे. हे विज्ञापना.

( पुढील सुमारे १९ ओळी मजकूर गैरउपयोगी म्हणून घेतला नाहीं. )

¶*News-letter from the Peshwa's Court at Poona to Vishvasrao Lakshman by his agent with the Peshwa. The most important item is the growing dissension between the Peshwa and his uncle who has been asked to deliver the forts in his possession. The writer also mentions the names of Moroba Dada, Sakharam Bapu and Nana Fadnis as the Peshwa's confidential advisers.*

4321

No. 191] [Recd. 25-9-1767

पौ छ १ जमादिलौवल सन
समान सितैन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वास
रावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य चिंतो विठल कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. झांशी प्रांतीचा मजकूर लिहिला कीं, जाटाकडील फौज येऊन भिंडभदावरचा अमल उठविला याजमुळें तमाम रजवाडे यांणीं नजरा फिरवल्या आहेत. त्यास मातबर फौज आणिल्या बंदोबस्त होईल म्हणोन लिहिलें व सरकारची आज्ञा कीं, रसदेची तरतूद लौकरच करून पाठवितों म्हणऊन लिहिलें. यैशास सरकारांत यैवजाची वोढ आहे, तरी रसदेची तरतूद लौकर करून यैवज रवाना करावा. फौजहि तिकडे लौकरच येईल. श्रीमंताची स्वारी बाहेर निघाली. याउपरी तिकडे फौज लौकरच येऊन पोहचेल. तुम्ही रसदेची तरतूद लौकर करून यैवज पाठविल्यास श्रीमंताची मर्जी येथास्तित राहेल. शिंदे होलकर यांजला ताकीद जाली आहे हे लौकरच फौजसुधां त्या प्रांतास येतील; बंदोबस्त होईल. यैवजाची तरतूद जाल्यास तुमचा बंदोबस्त येथून राहील. सविस्तर राजश्री गोविंद रघुनाथ लिहितील त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें, लोभ करावा हें विनंती.

¶*Chinto Vithal from Poona writes to Vishvasrao Lakshman that forces would soon be despatched to the North to punish the Jats and others who are creating disturbances in Maratha territories. A request is made to send to Poona amounts of revenue due from the addressee.*

---

No. 192] [1-11-1767

श्री

सेवेसी धोंडो खंडेराव विज्ञापना ऐसीजे. राजकी वर्तमान वरचेवर इंग्रजाकडील व जाटाकडील व रोहिले व पठान व सुज्यातदौला वगैरे यांजकडील लेहून

पाठवावे, याप्रो सेवकास आज्ञापत्र आले त्यावरून सेवेसी तपसीलवार लेहून पाठविलें आहे. तपसील कलम सुमार

इंग्रज तूर्त मुख्य सरदार कलकत्यांत आहे. त्याचा नायेब तूर्त पातशाहापासी श्री प्रयागी कर्नाल बोंकर[1] म्हणोन मातबर सरदार आहे. आणखीहि लाहान मोठे सरदार बहुत प्रयागी आहेत. सर्व मिलोन पंधरा हजार गाडदी व गोरे मिलोन आहेत. पातशाहा त्याचे आज्ञेत आहे, पुढे जाऊ शकत नाहीत. अहमदखान पठाण आपले स्थलावर आहे. नजीबखान रोहिला दिली प्रांती आहे. सुज्यातदौला आपले फौजेनिसी अयोध्ये लखनऊ प्रांती आहे. इंग्रजासी दबून आहे. इंग्रजापुढें सांप्रत कांहीं नवाबाचे चालत नाहीं. इंग्रज सत्यवादी आहेत. जो सुज्यातदौलास मुलूक दिल्हा आहे तो घेऊन सुजातदौला उगाच आहे. राजे बलवंतसिंग कराराप्रो सुजातदौल्यास रुो देतात, परंतु नवाबास बहुत भीत असतात. नवाबाचा राग बहुत बलवंतसिंगावर आहे. बलवंतसिंग इंग्रजाचे बलानें आहे. इंग्रज सत्यवादी आहेत. स्वामीसी बहुत श्नेह करावा म्हणौन इच्छितात. आपल्यासी श्नेह करून पातशास पुढे घेऊन जाऊन दिलीस बसवावे हे इंग्रजाचे मनात बहुत आहे. याप्रो रा निलो गोपाल वकील यानी ठरविले होते, परंतु आपली स्वारी देशास गेली

जाट जवाहीरमल याने बहुत लबाडी केली. सरकारचा अमल कालपी व रायेपूर वगैरे बुंदेलखंड येथील अमल उठविला. काही फौज ये प्रांती (ठेऊ)नु खुद जाट अगऱ्यास गेला. सांप्रत जाटासी व माधोसिंग जयेपूरकरासी विरोध बहुत वाढला आहे. जाटाने सर्वांसी विरोध सांप्रत केला आहे. सरकारचे अमलात बहुत उपद्रव केला आहे. याचे पारपत्य येऊन सीघ्र करावे. हे कार्य जरूर आहे. सर्व कचे वर्तमान रा त्रिंबकराव विश्वनाथ पाहून गेले आहेत. ते सेवेसी निवेदन करतील. त्यावरून सर्व श्रुत होईल कलम १

रा त्रिंबकराव मामा आद्यापि छत्रपुरी आहेत हे ऐकिले त्यासी हे बहुत उत्तम आहे. स्वामीनी या प्रांती सत्वर यावें. सर्व बुंदले व आपली फौज मिलोन सहजामधे सलाबतीने मागती कालपी वगैरे अमल बसेल. पुढे रोहिले जाटाचे पारपत्य. त्यासी तूर्त माधोसिंगासी जाटाने सिकस्त खाली आहे. त्यासी माधोसिंगासी आपला सद्धख आहे. * * * तिकडून बलावावे. रा नारो शंकरासमागमे फौज देऊन माधोसिंगास ते प्रांतीहून जयेपुराहून जाटावर पायेबंद द्यावा, बुंदेलखंडांतून अमल बसवीत आपण

१ बेकर.

यास्तव तो विचार ते समई राहिला व आबदाली लाहोराहून माघारा काबलास गेला. सिखानी त्यासी बहुत हैरान केले. आबदाली क्षोपनिशेप विलायेतेस गेला यात संदेह किमपि नाहीं. श्रीमध्यें सावकारी बहुत लिहिली आली आहेत की, सिखानी त्यासी हैरान बहुत केले व त्यासीहि खबर गेली की, इंग्रज समागमे घेऊन श्रीमंत मजवर लडावयासी येतात हेहि ऐकोन व सिखानी हैरान केले व फौज न राही, सर्व पेचामुळे तो इलाइतीस गेला. तूर्त आबदाली ये प्रांती येत नाहीं. हे रान रिकामे आहे, यास्तव आपण सीघ्र कटी फौज व तोफखाना उत्तम घेऊन सत्वर येऊन फिरंगियासी श्नेह करून जाटाचे पारिपत्य उतम प्रकारे करावे. जाटाने बहुत लबाडी केली आहे. सर्वासी वैर केले आहे. नजीबखानासी व जाटासी पहिलेपासून वैरच आहे. फिरंगीयासीहि सांप्रत वैर केले आहे. फिरंगी म्हणतात की, आम्ही पातशाहास घेऊन दिलीस जाऊ. जाट म्हणतो की, येकटे पातशाहास पाठवा. तुम्ही फौज घेऊन न येणे. जर तुम्ही याल तरी लढाई होईल. यास्तव फिरंगी पुढे जाऊ सकत नाहीत. इंग्रज हे म्हणतात की जे समई श्रीमंत येतील ते समई तुम्हांस नेऊन दिलीस बसऊ. याप्रो सर्व इंग्रजाचे कारभारी बोलतात. यास्तव आपण प्रथम इंग्रजाकडे वकील खासास्वारीनिसी यावे. निलोपंतास पुढें इंग्रजाकडे पाठवावे. इंग्रजाची फौज पातशाहास घेऊन स्वामीपासी येईल. पातशाहास घेऊन जाटाचे पारपत्य करून पातशाहा दिलीस बसऊन मागती लाहोरपर्यंत गेल्यास पेंच नाही. मुख्य गोष्ट अबदाली येत नाहीं व इंग्रजासी श्नेह जालाच आहे. आपण सत्वर देशास गेले म्हणौन इंग्रजाच्या भेटी राहिल्या. नाही तरी आपले भेटीस मुख्य साहेब कलकत्याहून रा। निलोपंत घेऊन येत होते. मकसुदाबादेपावेतो आला. तेथे आपले वर्तमान गेले की, आपण दक्षेणेस गेले. त्यावरून तो मुख्य साहेब मागती माघारा गेला. तेसमई आबदाली येणार हेहि भये होते. शाहि स्वामीस इंग्रज देता, परंतु तो मनस(?) गेला. सांप्रत जाटाचे प्रथम पारपत्य करणे व पातशाहास दिलीस नेऊन बसवणे हेच गोष्ट आहे. याप्रो इंग्रज करावयासी तयार आहेत. स्वामीसी श्नेह करावयास इंग्रज तयार आहेत. जे समई आपण रा। निलो गोपाळ यांसी पाठवितील ते समई इंग्रजाची फौज आपल्यापासी येंईल, यांत किमपि संदेह नाही. रा। निलोपंत मात्र प्रथम इंग्रजाकडे पाठवावे. ये प्रांती इंग्रजाचे दरबारांत रा। निलोपंत बहुत आपले कृपेकरून मान्य झाले आहेत. यास्तव प्रथम आपण येणार ते समई पूर्वी मारनिलेस पुढे पाठवावे. मागाहून

रा निलो गोपाळ पाठवावे. त्याचे विद्यमाने पहिलेपासून करार याप्रो जाला आहे की श्रीमंतानी आम्ही येकत्र होऊन पातशाही बंदोबस्त करावा. त्याप्रो निलोपंत ठीक करतील. सांप्रत निलोपंत स्वामींकडे इंग्रजाची वस्त्रे व हत्ती घेऊन गेले आहेत. नागपूरचे मार्गे देशास गेले आहेत. त्यासी इंग्रजासी सर्व सलुखाच्या गोष्टी जाल्या आहेत. कळावे. कलम १

स्वामीची खासा स्वारी येई तो इतकियांत काळपीवर इंग्रजाची भेट करून पुढे त्या वाटेने जाऊन जाटाचे पारपत्य करावे. याप्रा सर्व इंग्रजाचे कारभारी व सर्व राजेरजवाडे म्हणतात. यास्तव सेवेसी लेहून पाठविले असे कलम १

तीन कलमे राजकी वर्तमान सेवेसी सुचले ते लेहून पाठविले आहे. याप्रा स्वामीचे मर्जीस येईल तरी बहुत उतम आहे. श्रीकासी व श्रीप्रयाग व श्रीगया सहजामध्ये आपल्यास येतील. जेसमई आपला व इंग्रजाचा श्नेह जाला तेसमई सहजामध्ये ज्याप्रो पूर्वी लाहोरचे साली हरिद्वार परगणा पातशाहापासून मागोन घेतला त्याप्राो पातशाहा आपल्यास त्रिस्थली देईल व इंग्रज आपल्यास त्रिस्थली देतील यांत किमपि संदेह नाहीं. मुख्य गोष्ट राजा बलवंतासिंग आपल्यासी बहुत येकनिष्ट आहे. हे वर्तमान सर्व वो रा धनराज दीक्षित सांगतील व रा निलो गोपाळ सांगतील. सुज्यातदौल्यास किमपि जोर राहिला नाहीं. नावमात्र नवाब आहे. जे फिरंगी सांगतील ते करील. त्यासी राजे बलवंतसिंगासी बहुत अकस बहुता दिवसापासून आहे व अंतरवेद तरी पातशाहास दिल्ही आहे. जेसमई पातशाहास आपण इंग्र(ज) मिळोन नेऊन दिलीस बसवितील तेसमई सहजच आपल्यास अंतरवेद येईल व किला इंग्रज आपल्यास देतील. याप्रो सर्व गोष्टी निलोपंतानी इंग्रजासी केल्या आहेत. त्रिस्थली कलमात लेहून दिल्ही आहे त्यावर इंग्रजानी करार केला आहे. जेसमई दिल्लीत आपण व इंग्रज जातील ते समई त्रिस्थली आपली जाली यांत किमपि संदेह नाही. परंतु स्वामींनी कटी फौज व तोफखाना घेऊन सत्वर यावे. हुजरात उतम घेऊन यावे. हुजराती सिवाये कार्यहोत नाही येसे सर्व म्हणतात व आपलेहि अनुभवास आले आहे. यास्तव जरूर हुजराती फौज फार घेऊन यावी व तोफखाना बहुत उतम घेऊन यावा. सारांश श्रीकासीतील मोठे थोर थोर तपश्वी हेच म्हणतात की, आपली फते व्हावी यास्तव श्रीकासीत धर्महि जरूर पाठवावा व अनुष्ठानें पाठवावी. सेवकास कर्जदार बहुत हैरान करितात ती आपती पत्री कोठवर ल्याहावी ? दररोज कर्जदार

धरणे बसतात. भोजनाची आपत्य आहे. आपण कृपाकरून जे जे रुो पाठवितात ते ते रुो ब्याजामध्ये जातात. मजवर प्राणसंकट आहे. यास्तव कृपा करून मजला कर्जापासून येकदा मुक्त करणार आपण समर्थ आहेत. सर्व अजमास वो रा व्यंकटराम शास्त्रीबावा समागमे पाठविला आहे व सर्व कचे वर्तमान ते सांगतील त्यावरून कळो येईल. येंदा श्रीगंगेस पूर बहुत आला. सरकारचे दोन्ही वाडे गंगातीरी. त्यासी श्रीगंगाजळ बहुत, चढले तेणेकरून श्रीगंगातीरी जे काम होते त्याचे मोठे मोठे पाथर निघोन गेले, त्याची मरामत जरूर केली पाहिजे व कर्जदार बहुत हैरान करितात व पोटखर्चाची आपत्य बहुत आहे, यास्तव कृपा करून सेवकास सकल संकटापासून दूर करणार स्वामीखेरीज मला दुसरे कोण्ही नाहीं. चिरंजिवास नवऱ्या येतात. यास्तव जे मर्जीस येईल ते चिरंजिवाचे लग्नास पाठवावे. आधी कर्ज वारावे मग लग्नास खर्च पाठवावा. कां? कर्जदार लग्न करूं देणार नाहीत. मर्जीस येईल ते करावे. रा कार्तिक शुध्ध १० रविवार हे विज्ञापना.

¶*Dhondo Khanderao writes to Dadasaheb from Benares describing the state of affairs in the North, particularly how the English were gradually coming into prominence, how they were desirous of having an alliance with the Peshwa, how it was possible to secure the three holy places of the Hindus to the Peshwa through the influence of the English, how Shuja's power was on the wane and how Ahmadshah, much disheartened, had left India for good. The writer tries to impress on Dadasaheb the necessity of deputing Nilo Gopal as Vakil to the English. Lastly he asks for money for his expenses at Benares.*

---

*No. 193*] [*Recd. 15-11-1767*?

छ २२ जमादिलाखर रविवार

श्री

सेवेसी+ विज्ञाति. राजश्री अंताजी माणकेश्वर याचे पुत्र राजश्री बहिरो अनंत फौजसुधा येथे आम्हासमागमे आहेत. त्यास यानी व याच्या लोकानी येक दोन वेला लडाई नजीबखान याची फौज प्यादे बाहेर निघाले होते ते समई

---

१ दुरुस्ती. + पत्र सिंधाकडील दिसतें.

4326

उतम प्रकारे केली. नजीबखान याचा मोड करून खंदकापावेतो घालविले ते समई रोहिल्याचे माणूस फार मारले गेले व याजकडीलहि लोक जखमी व ठारहि पडले. घोडी जखमी व ठार काही पडली. मारानिले समागमे माणूस फार चांगले आहे, त्याप्रो कामकाज उतम केले. स्वामीस विदित व्हावे याजकरिता विनंती लिहिली असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*A skirmish between Bahiro Anant and Najibkhan is described in this letter.*

---

*No. 194*] [*30-11-1767*

पौ छ ६ साबान

**श्री**

**श्रीमंत राजश्री रावसाहेब**
**स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक गोविंद रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल मार्गेस्वर सुध ९ नवमी सोमवार मुा पुणे जाणून स्वकीये निजानंद लिहीत आसिले पाहिजे विशेष. कासीदजोडी याजबराबर आज्ञापत्र छ १७ जावलचे पाठविले ते छ १८ जाखरी मुकाम मजकुरी पावले. सविस्तर वर्तमान विदित जाहाले. श्रीमंत दादासाहेबास व त्याजकडील मुत्छदीयासी पत्रे पाठविली ते पावली; ते श्रीमंताकडे आनंदवलीस रवाणा करावी त्यात यैवजाचा मजकूर म्हणून न पाठविली. कारण मामलतीचा जाबसाल श्रीमंत रावसाहेबाकडे लागला. त्याचे मनात विषम वाटेल कीं मागे यैवज न पाठविला, आता पाठविला म्हणून तैसीच ठेविली. त्यासी पत्रे लिहिणे ते आपली लीनता, त्याची स्तुति यैसी लिहीत जावी. आपण लिहितीलच. म्या ल्याहावे यैसे नाही. तुम्ही हुंड्या मुमार ७ येकूण रुपये साठ हजाराच्या पाठविल्या त्या पावल्या. त्यासी हुंड्या अवरंगाबादेच्या सरकारात यैवज येथे पाहिजे. येथे दोन सवा दोन रुा दर सेकडा हुंडणावल पडती. त्यासी हुंड्या येथे भुकणजी हरिपंत याचे दुकानी रा बाबाजी प्रल्हाद याचे मारफतीने दिल्हा त्या हुंड्या शहरास पाठविल्या. वासुदेव मुरार याजवर हुंड्या होत्या. त्यानी हुंड्या कबूल केल्या, परंतु उतर दिल्हे कीं येका महिनियात रुा देईन. वाइदा तुमचा जाहला खरा, परंतु वागऊन घ्याल तर देतो. तेव्हां कबूल करून हुंड्या ठेऊन रुा देईन, तेव्हा सकारन+ घेतल्या त्याचा जाब दोन दिवस जाहले आला. वासुदेव मुरार सावकार खरा, परंतु मातबरी थोडकी म्हणून चार दिवस अधिक म्हणतो. हुंड्या पुढे करणे त्या बहुत

+ स्वीकारून.

(शोध) * * करून करीत जाव्या. आपण लिहिले की यैवज पाठविला * * * * तिचा डौल कोणीकडे होतो, पुरता शोध मनास आणून आपली मामलतीची बलकटी करून मग देणे तर द्यावी. मुत्छदी मातबर साधवा की सेट सर्वोप्रा आपल्या ममतेत श्रीमंतापासी राहील यैसे कितेक तपसिले लिहिले. त्यासी उभयेता श्रीमंताचे रहश्य होऊन केलेले कराराप्रा श्रीमंत रावसाहेबाचे हस्तगत जाहले. पस्तीस लाखार्चा निश्या करून दिल्ही. दुसरे पाचा लाखाची जाहागीर दिल्ही. उभयताचे चित सुध होऊन श्रीमंत रावसाहेबी त्याची आज्ञा कार्तिक सुध नवमीस घेऊन त्रयोदसीस पुण्यास दाखल जाहले. आम्हास श्रीमंत दादासाहेबी आज्ञा केली की मामलतीचा जाबसाल केला तो तपसील अजुर्दा कासिदाबराबर पत्रे लिहून पाठविली ते पावलीच असतील. दोन लाख रुा रसद निदान द्यावी; तयात येक रुा कमी होत नाही. आम्ही तेथे उदंड रदबदल केली. सेवटी जावसाल तैसाच राहिला. श्रीमंत कूच करून पुणेस आले. आम्हींहि त्याजबराबर पुण्यास आलो. श्रीमंत सकारामपंत बापू त्रिंबकास गेले, ते परभारा सासवडास गेले. आनंदवलीस आमचे जाब-सालात श्रीमंत राजश्री मोरोबादादा फडनीस व गुरुजी होते. येथे आम्हावरी तुम्हीं पूर्वी रा बाबाजीपंत दादास लिहिले होते ते श्रीमंत रा नाना फडनीस यासी बोलत होते. आम्हीं येथे आल्यावर रा बाबाजीपंताची भेटी घेतली. त्याची स्थिति पाहिली तर आपल्याकडे ममता बहुत देखिली. दरबारातहि त्याची भीड व तोहि आधिक मातबर माणूस दरबारात सर्वास इतबार हे बोलतील ते प्रमाण. आपलीहि आज्ञा आम्हांस होती कीं तुम्हीं ते मिलोन जाबसाल करणे. त्यावरून त्याचे विद्यमानें श्रीमंत रा नानाची भेटी घेतली. आपल्या-कडील सविस्तर वर्तमान निवेदन केले. त्यानी येकांती बसोन सर्व यैकिले. नानाची ममता आपल्या ठाई बहुत देखिली. दोन लाखात काही कमी करावे यैसे रा बाबाजीपंताचे मानस, त्यानी नानास मायेत घेऊन सांगितले, त्यावरून नानानी श्रीमंत रावसाहेबास विनंती केली. त्यानी रा बापूचा उजूर केला तेव्हां नानानी उतर केले कीं बापूस येऊ द्या; रदबदल करून पाहू; नाही तर जाब साल ठरलाच * * * * कार्तिक वद्य त्रयोदसीस आले. दुसरे दिवसी सावकार तेथे आहे त्यासी हुंड्याचे खोकेचा तगादा सख्त करून खोकी आणून घेणे. हुंडीला दिकत कोठे पाहिली नव्हती; याजकारिता खोके+ जरूर आणणे. रुपये पदरी पडतील तेव्हा पावतीचा जाब पाठऊन देऊ. कलले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Govind Raghunath to Vishwasrao Lakshman from Poona, giving news of the surrender of Dadasaheb to the Peshwa and the complications about his settlement.*

---

\+ हुंडी दिल्यासंबंधीं सूचनापत्र.

No. 194A] [23-12-1767

पो छ ६ साबान
सन समान पौष

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बाजी गोविंद कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ १ साबानपावेतो वर्तमान येथास्तित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याणी पाणिपतचे स्वारीतून लाख रुपयाची वरात राजश्री नारोशंकर राजेबहादर यास गोविंद बलाल याजवर दिल्ही होती. त्यास राजश्री बालाजी गोविंद याजकडील मामलत विल्हेस लागली तेव्हा याचा फडशा कसकसा जाहाला आहे तो लेहून पाठवणे. त्यास राजश्री गंगाधर गोविंद यास लस्करात याणी तगादा केला तेव्हा त्याणी सांगितले, की ज्या येवजावर तुम्ही वरात घेतली तो येवज आम्ही दिलीसच भरणा केला होता. खर्च घालून का घेतले नाही येसे असोन आम्ही काही खर्च हिसेबी घालून सरकारातून मजुरा घेतले आणि तुम्हास देत नाही येसे नाही. याउपर सरकारातून देवितील तर नवी वरात सालमजकुरचे रसदेचे येवजी घ्यावी. वरातेप्रो येवज पावेल. याप्रो सालजाब करून येवज आपणाकडे लागू करू दिल्हा नाही, येसे वर्तमान आइकिले * * * * कारातून कांहींच फडशा जाहला नाही. वरकड हिंदुस्तान-देखील मालवा येथे नवे माहाल सरंजाम कोणास दिल्हे, बाकी माहाल सरकारात कोणते राहिले याचा झाडा आकारून लेहून पाठवणे. त्यास झासी व बुंदेलखंड हे तो दोन्ही बेहडे पहिलेच पाठविले आहेत. बाकी मालवापैकी महाल सोडविले त्याचा झाडा.

किता माहाल सरंजामास गेले.

२ पा भेलसे व बलखेडा खासगी-कडे

१ सिरोंज होलकराकडे

१ देवरी गौरझाबरे धोंडो दत्तात्रेय याकडे

१ उचाड सिवाजी विठल याकडे

१ अहीरवाडा दीड लक्षाची जहागीर नारोशंकर. झाडा अलाहिदाच आहे.

पा बासोदे सुनेरा वेंकाजी विस्वनाथ याजकडे आहे. सरंजाम बहिरोपंतास द्यावयाचा, करार मारनिलेचे फाजील पनास हजार त्या मामलतीवर आहे.

अहीरवाडेयापैकी येक लक्ष तेरा हजार राचे गाव याची मात श्रीधर बलाल याजकडे आहे. अमल नारोशंकर सुरलित चालो देत नाही. पंचवीस हजार रसद घेतली, पो दाहा-

१ चंदेरी पो फुटगाव कटोती बा तीस हजाराचे खासगीकडे

—

७

ता झासी पो येलंच माहालचे गाव नारोशंकर याजकडे दिल्हे. मोटेचे ठाणे आपणाकडे दिल्हे आहे येसे गैरवाका समजावितील तर दिल्हे नाही, तो तालुका निरालाच आहे. कलावे.

येणे प्रा हे विज्ञापना

हजार रदकर्ज दिल्हे. बाकीचे त्याचे फाजील व ठाणियाची सिबंदी अजमासे पंधरावीस देणेच निघेल. कलावे.

सदरहू प्रो कांहीं घालमेल जाहाली नाही.

¶*Assignment of territory in the North subsequent to the battle of Panipat is reported to Nana Fadnis by Baji Govind.*

---

*No. 195*] [*30-12-1767*

[ पहिला बंद गहाळ आहे. ]

बाधून दिल्ही. रुा नव दाहा लाख अकार करून दिल्हा. कमाविसदारापासून वसूल घेतला तोहि सर्व ध्यानात आहे. यैसे असता माझे वराताचे रुा देत नाहीत तर तुम्हांस रुा सुटतो यैसे नाही. तुम्ही सिबंदी मनमाने तैसी लिहिता. सर्व बातनी मजला तेथून आली आहे. चिंता काय? मजला तुम्हास फजित बहुत प्रा करणे आहे. रा आवचितराव याचे रुा नसता रुा खर्ची घातले, यावेगले पनास हजार रुा त्यासी अंतस्थ दिल्हे. त्यानी तुम्ही मिलोन माझे मात्र घर बुडविले आणि आपले स्वहित केले, परंतु मी जितक्यानी मौजा करून रुा मिलविला तो कदापि जिरू देणार नाही. ते काय भुलले आहेत. तुम्ही म्हणाल झासीचे किल्यात बसलो तर मनावरी धरीत नाही. जे दिवसी धरीन तेच दिवसी झासी घेईन. मजला अगाधी नाही. जर माझे वरातेचे रुा दिल्हे तर मजला तुम्हासी संमधहि नाही. मी दीढा कोसावरून गेलो. झासीकडे पाहिले नाही. यैसा कितेक मुदईपणाच्या गोस्टी बोलतात. करावयासी प्रसंगोपात चुकणार नाहीत. याजकरिता याचा विचार पोख्त करून जे कर्तव्य ते करावे. रा बालाजी शंकर हेहि बहुत आपल्या ममतेत आहेत. आपल्याकार्यास बहुत झोबतात. मुरबीच आहेत. याजला जे लिहिणे स्वकीये ते लिहीत जावे. आम्हावरी बहुत कृपा करितात. आपणहि ल्याहावे. तैसेच रा दादा फडनिसासहि स्वामीचे वर्तमान तपसिलवार लिहीत जावे. ते ममतेत घेतले आहेत.

आपण म्हणतील हुंडीपैकी दरबार खर्च जो केला त्यासी संकट जाणून रुा द्यावेसे जाहले. पहिले याद लिहिली तूर्त द्यायाची त्यासिवाये तीन श्रीमंतास अजि देणे आले. हुंडीचा यैवज आल्यावरी हे जाऊन बाकी सरकारात भरू. दरबार खर्चाचा यैवज मुबदला पडला तो यैवज सत्वर पाठविला पाहिजे. दरबारात सर्व मुसाहेब+, ज्यासी न बोलावे तोच शत्रस्थानी होतो यैसे वर्तमान आहे. सविस्तर महिपतराव सांगेल. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. सूध दशमी बुधवार.

¶*A mutilated letter, referring to affairs of Jhansi and complaining of the officials working in Bundelkhand. The handwriting appears to be that of Govind Raghunath whose letters have been printed above.*

---

*No. 196*] [*November 1767*

**श्री**

विज्ञापना. सनदपत्र रसद कबूल केल्यावर होईल; परंतु फडनीस मजमदार व कितेक मुत्छदी येकांतात पेश आहेत. त्याजला जैसा माणूस आपल्या ममतेत असेल त्याजला दिल्हे पाहिजे. याजकरिता दरबार खर्चास तूर्त दाहाबारा हजार रुा पाठऊन देणे. येंदा पंचवीस हजारावर दरबारखर्च पुरी पडणार नाहीं. राा सकारामबापू हे प्रस्तान भारी यैसे आहे, याचे पुर्ते मनन करून उतर पाठवावे; ये गोस्टीस हैगई न करावी. मी येकनिस्ठ, मजपासून अंतर पडणार नाही हे पूर्ण ध्यानात असो द्यावे. मजला मागणे तर मी आपल्यापासून हजारो घेईन. मजला कर्जापासून दूर करणार आपण समर्थ आहेत. आपल्या उर्जिताची नित्य इछा, दुसरे नाही. दरबार खर्चाची जरूर तजवीज करून पाठवावी. रसदेचा यैवज लाख रुपये आधी रवाना करावे, मग पत्र वाचावे. वरकड राा नारो नीलकंठ यानी लिहिले त्याजवरून कलेल. राा आपाजी गणेश याजकडे गुजरात सालमजकूर करार जाहली. तेथील रसद साडेच्यार लाख रुा येणे. त्यापैकी मागील कर्जात रुा दोन लाख देऊन, अडीच लाख रुा रसद ठराऊन, रुाची निशा करून घेतली. सनदा येका दो रोजा येतील. राा बाळाजी गोविंदाकडील मजकूर, प्रस्तुत त्याजला लुटले, याजकरिता तूर्त रसद मागत नाहीत. पुण्यास गेल्यावरी मागावी यैसे आहे. बाळाजी गोविंद गुमान खुमान वगैर तिकडील जमीदार मिळऊन कालपी प्रांते येणार. येथे श्रीमंतास लिहिले होते त्यावरून श्रीमंती तुम्हांस पत्र लिहिले आहे कीं तुम्हीं बालाजी गोविंदास सामील होऊन जाटानी सोडविली ठाणी ते माघारी घेणे म्हणून लिहिले. बालाजीपंत पाठवून देतील. तुम्ही उंडिणा वगैरे ठाणी कलेल तैसे करून हस्तगत करावी.

---

\+ मुसाहेब=सोबती, मित्र.

छत्रीबा जाजती गाव गेले आहेत, त्याची सनद घेऊन, गंगाजी जासुदाबराबर पाठविली ते पावलीन्न असेल. अमलात आल्या करावें. रा गंगाधरपंत तात्याहि त्या प्रांतास येणार. तूर्त जाटाची ठाणी असतील. च्यार दिवस तातड न करणे. मागाहून सविस्तर लिहीन. सनदेचे तावे सर्व आहेत. चिंता नाही. सूचनार्थ लिा. पाचा हजाराची पावतीची पोहच पाठविली, ते रा चिंतो विठल यांसी दिल्ही. पावतीचाहि कागद घेऊन पाठवितो. रा चिंतोपंत तात्या व चिंतोपंत दादा व आबा आपल्या साहित्यास उतम आहेत. आंम्ही त्याचे आर्जव टाकिले नाही. कळले पाा. आपल्याकडील व जाटाकडील वर्तमान सर्व लिहिणे. उभयेताचा श्नेह बाह्यात्कारे जाहला, अंतरयामी दिसत नाही. तूर्त जाहले ते खरे, पुढे होईल ते लिहू. राजेबहादरहि रावसाहेबाबराबर पुण्यास जाणार. पत्रे जरूर लिहित जाणे. हिसेब त्याजकडील पाठवणे. त्यानी हुजरून ताकीद व खिजमतगार काहडणार. हिसेब आम्हापासी असता तर जाबसालास कदापि न चुकतो. तथापि करीतच आहे. आधार पाहिजे. हिसेब जरूर लिहिण्यास पाठवणे. त्याचे जाहागिरीस वाटे न जाणे. येथून कमाविसदार पाठवणार. हे विज्ञापना.

¶*This is probably the second sheet of a letter giving news about the reverse of Balaji Govind and the aggression of the Jats in Bundelkhand.*

---

*No. 197*] [*14-2-1766* ?

### श्रीमंत राजेश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती पो खंडेराव रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ४ माहे रमजान मुाा उजेन साहेबाचे प्रतापेकरून सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान ताजे येसे जे. पादशाह अलीगोहर व सुजादवला वजीर हे व बिशनसिंग सरदार फिरंग्याचा बेचाळीस हजार फिरंग्यानसी समागमे आहे येसे जमयतनसी कोरडा जहानाबाद दाखल जालेत. पुढे मनसुबा येसा कीं येंदा तखतावर बसावे व अहमदखान यासी (पुढें एक ओळ मजकूर फाटला आहे.) अहमदखानापासी (अर्धी ओळ फाटली आहे.) नास हजार सीख बोलाविले. त्यास तेहि येऊन जाटाचे फौजेत शामील जाले व कोटपुतळी मारली व जुजास सिध जाला आहे व रा सुभेदार व रा माहादजी सिंदे हे गोहदेवर आहे. अद्यापि गढी हस्तगत जाली नाही व किला परंडाचा हस्तगत याचे हस्तगत जाला व तेथील किलेदारास धरले व किल्यातून येक लक्षाचे तर गला व येका

लक्षाची जिनसी येसी त्यांतून निघाली. पादशाहाचा याजकडे आला व फरमान अनला त्यात लिा की जर तुम्ही पादशाही चाकर * * * ऊन आम्हा शामील होणे, नाही तर

¶*Dadasaheb is informed that the Jats have been joined by the Sikhs and are reported to have sacked Kotputli. Gohad continues to be invested by Sindia and Holkar.*

---

*No. 198*] [*1767?*

श्री

विज्ञापना. राजश्री बालाजी गोविंद याजकडे गुलसराईच्या ठाण्यास तोफा कांहीं भेलशापैकीं देवाव्या म्हणून पेसजी किल्ल्यास असतां विनंती केली होती. त्यावरून आज्ञा जाहाली होती कीं दसरचा झाडा काढावा. पाहून देऊं. त्या वरून हल्ली भेलशाचे तोफाचा व झासीचे तोफाचा झाडा दसरचा आलाहिदा शेवेशी पाठविला आहे. पाहून आज्ञा करणे ते करावी. गुलसराई गाजुदीखान यास न द्यावी हे आपले मनातहि आहे व पत्रे गेली म्हणून सांगितले होते. त्यास हल्ली अपाजीपंत विनंती करितील. पत्रे द्यावयाची असतील ती द्यावी. हे विज्ञापना.

¶*This is a letter describing the artillery equipment for Gulsarai.*

---

*No. 199*] [*1769*

श्री

सेवेसी विज्ञापना चिठी पाठविली ते पावली. डिगेस उदईक तीन हजार फौज पाठऊन कोसाभरावर उभे राहोन पुढे राऊत पाठऊन बातमी राखवणे म्हणोन आज्ञेप्रमाणे प्रात:कालीच रवाना करीतो. आतां रातची चौकी पुढे पाठविली आहे. कहीबराबरीहि फौज पाठवावयाची तेहि पाठऊ. आज्ञेप्रमाणे बंदोबस्ती करितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Instructions, that a contingent of three thousand should march in advance for Dig are being given effect to, says the writer.*

4333

No. 200] [2-2-1768

पौ छ २८ सवाल सन समान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विस्वास रावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य बालाजी शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ १२ रमजान पावेतों मुकाम पुणें जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तरी राजश्री माहादजी सिंदे येथें आले. त्यास राजश्री बाजी नरसी व राघोराम याजकडे त्याचे डौलाचा कारभार करार जाहाला. या उपरी राजश्री तुकोजी होलकर व सिंदे यांसी निरोप जाहाला. येका दो रोजीं निघोन जातील. आपल्याविसीं श्रीमंतानीं उभयेतां सरदारांस व कारभारियास ताकीद समक्ष जाहाली आहे कीं, झांसी प्रांतीचा बंदोबस्त वगैरे उपराला करीत जावें याप्रमाणें सांगितलें आहे. यानंतरी तुमचे ठाई श्रीमंतांनीं ममता फार आहे. आम्ही तुमचेविषई येकांतीं बहुत प्रकारें समजाविलें आहे कीं हे येकनिष्ठ स्वामीचे पायापासीं आहेत. स्वामीखेरीज यांस दुसरा आश्रा नाहीं. त्यावरून श्रीमंत कृपावंत होऊन आपला खास पोशाख तुम्हांकारणें दिल्हा आहे. वरकड कितेक मजकूर राजश्री गोविंदपंत व हरिपंत यासी सांगितला आहे ते आपणांस सविस्तर लिहितील त्यावरून कळेल. त्यास प्रस्तुत राजश्री हरिपंत फडके व अच्युतराव व आम्ही त्रिवर्ग येकत्र बसलो होतों ते समई तुम्हांकडील मामलेतेची गोष्ट हरिपंतानी काढली कीं, फडणिसी व मजमुचीं वेतनें पेशजीचीं राहिलीं तीं देखील अद्याप येत नाहीं व आलीकडे काम काज फडणिसीचें व मजमूचें सुरलीत घेत नाहीं. येविशीं अच्युतरावजीस बहुत निषध केला कीं असे तुम्ही कितीक रोज कराल? येक दिवस तरी आमचा येईल. तेव्हां जें असेल तें समजून घेऊं. चिंता काय आहे? व आम्हासहि त्याणी शब्द लावला की, आम्हीं लग्नाचे गडबडीमुळें आठ पंधरा दिवस घरीं होतो ते समई परभारें राजश्री मोरोबा दादा व तुम्हीं मिलोन साल मजकुरीं कारभार विल्हे लाविला. बरें; बाजत बरसात पेस्तर घडोन येईल ते खरे. या प्रकारचीं त्याणी भाषणे केलीं त्यावरून आपणास जाहालें वर्तमान सविस्तर लिहिलें आहे. त्यास आम्ही तों सर्व प्रकारें तुमचेच आहें. परंतु येथें दरबारांत फडणिसीचें वळण भारीच आहे. प्रस्तुत कारभारी राजश्री नाना फडणीस यांजवर सर्व येकत्यार आहे. त्याणी जें सांगावें ते प्रमाण. यास्तव हरिपंत व ते येकच. दुसरा विचार किमपि नाहीं. यास्तव आपणांस सूचना लिहिली आहे. तरी जेणेकरून

फडणीस रजावंद राहे तो अर्थ करावा. मागील वेतन फडणिसीचे व मजमूचे राहिलीं आहेत त्यास मुा राजश्री अच्युतरावाचे विद्यमाने आपण कारारमदार केला आहे त्याप्रमाणें यैवज पावता करावा. मुख्य गोष्ट फडणीस व मुजमदार यासी राजी राखावें यांतच उत्तम आहे. विशेष लिहावेसें नाहीं. येविषई तुमचे कारकून लिहीतच असतील. राजश्री गोविंदपंत व हरिपंत हे उभयेतां आपल्याकडील कामाकाजास फार सावधपणें आहेत. राजश्री आपाजी माहादेव सफरे आपणांजवळ आहेत त्याचें सर्व प्रकारें चालवीत जावें. त्याचे घरीं खर्चाविनें हैरान आहेत. खर्चाची बेगमी करून दिली पाहिजे. लांबचा पला यास्तव सूचना लिहिली आहे. गणपतराव याचा आपला गुदस्तां करार जाला आहे, त्याप्रमाणें ऐवज वेतनाचा पाठऊन द्यावा. जरूर स्मरणपूर्वक पाठवावा. बहुत काये लिहिणें कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Balaji Shankar supplies Vishvasrao Lakshman news from the court of the Peshwa that it has been decided to send troops to the North to put down the rebels. He makes a suggestion to the addressee to keep Nana Fadnis contented as he has acquired great influence with the Peshwa.*

---

*No. 201*] [*15-2-1768*

पौ छ १२ सवाल मन
समान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विश्वासरावजी स्वामीचे शेवेसी

पोष्य बाळाजी शंकर साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ रमजान दोन प्रहर दिवस मुा पुणे वर्तमान यथास्थित असे विशेष. मोटेचा किला राजश्री नारो शंकर यास पेशजी देविला होता. या कामाबाा सरकारचे खिजमतगार दिल्हे आहेत. त्यास हली श्रीमंताची आज्ञा जाली कीं किला मार-निलेकडे न देणे. सरकारचे हुजरे तेथे गेले आहेत त्यास जाब देऊन माघारे पाठवणे कीं दुसरी आज्ञापत्र जालियावर देऊ म्हणोन लिहिणे. किला आपणाकडे असो द्यावा. या कामाबद्दल कासीदजोडी अर्जुरा[1] साठ रुो करून जलदीने सोळावे दिवसीं तुम्हाजवळ पोहचावे याप्रो पाठविले आहेत. तर लिहिल्या-

---

+ येथून पुढील अक्षर निराळ्या वळणाचें. १ मुद्दाम.

प्रमाणे करणे. निक्षूण आज्ञा जाली आहे. इकडील वर्तमान तर होळकर व सिंदे येथून रवाना जाले. रा। गंगाधर यशंवत व बाजी नरसी मागें राहिले होते तेहि आजी निरोप घेऊन गेले. तुम्हास कळावें. किला आपणाकडे जरूर ठेवणे. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती. राजश्री गोविंदपंत सविस्तर लिहितील त्यावरून कळेल. हे विनंती. तुम्हाकडे पनास हजार रुपये वरात पेशजी जाली आहे त्याप्रो। ते रुो. पावते करून कबज पाठवणे. दुसरी फाल्गुन वद्ये प्रतिपदेची वरात जाली. त्यास गोविंदपंत येथे आहेत त्याची अबरू राहणार नाहीं. तर ऐवजाची तर्तूद आधी करून पो। सरकारात करार प्रो। उतरावे, येणेकरून उत्तम आहे. सारांश ऐवजा(ची) तर्तूद आधी करावी हे विनंती.

¶*Balaji Shankar from Poona writes to Vishvasrao that the stronghold of Mot has been retained for the addressee. Sindia and Holkar have received orders to march to the North, adds the writer.*

---

*No. 202*] [*28-2-1768?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो देवजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता। छ ९ माहे शवाल मु॥ मलारगंज नजीक सेवढे प्रांत बुंदेलखंड येथे कुशलरूप असो. यानंतर आपणापासून भुपालचे मुकामीहून आज्ञा घेऊन श्रीउजनीस गेलो. तेथें राजश्री बालाजीपंतास आपली पत्रे देऊन सार्धपक्ष त्याजपासी होतो. यानंतर आम्हास कछवाधारचे फडणिसीचे ताकीदपत्र राजश्री विश्वासरावजीस देऊन प्रांत मारचे फडनिसीवर पाठविले. त्यावरोन फिरोन ये प्रांती आलो. झासीत येक मास होतो. सबब की राजश्री रावजीची फौज व राजश्री बालाजीपंत बाबाची फौज दानसाह जाटाकडील याचे सैन्याने परावृत केले, त्यामुळे रावजीकडील दोन तीनसे माणसे कामास आली. च्यारसे जखमी जाली. त्यानंतर फिरोन फौजेची उस्तवारी करोन भिंडभदावर कछवाहधार येथील अमल करावयासी फौज तीन हजार पाठविली. तेथे राजश्री बालाजीपंत बावा सैन्यासह आधीच आले. त्यानी

दखलगिरी केली. इतक्यात हेहि फौज पधंराविसा दिवसाचे अंतरे गेली. सनदा ताज्या व ताकिदी दाखविल्या. त्यासी त्यानी उतर केले की आमचा पैका या जागेवर आहे. जोपावेतो आमचा पैका वसूल जाला नाही तोपावेतो आम्ही दुसऱ्यास दखलगिरी करो देणार नाहीं. यैशा रदबदलीस वीस रोज जाले. इतक्यात श्रीमान राजश्री माहादजीबावा सिंदे यांची सनद राजश्री बालाजीपंतास आली व राजश्री विश्वासरावजीचे नावे ताकीदपत्र कीं, आमल याजला देणे. त्याजवरोन यानी अमल सुरलीतपणे त्याजला देऊन हे आपले झासीचे मुलकात आले. थोरला जाटाचा मोड जाला म्हणोन आमलहि चालीस लागला. देसचे फौजचाहि दबाव पडला आहे. सारांश आम्ही फडनिसीविषई राजश्री गंगाधरपंतास पुसिले त्यासी म्हणालेत की, राजश्री नानाचे पत्र आमचे नावे आणावे म्हणजे फडनिसीचे काम तुमचे हातून घेऊं, यैसी उतरे केली. तेव्हा त्याजपासी काय म्हणोन राहावे! विश्वासरावजीचे सैन्यातच आहो. खर्चाची आबाल फार आहे; तश्यातहि धण्याचे पुण्य समर्थ आहे. बरे; आपला जाबसाल ये तोपर्यंत तो देसी येता येत नाही. या उपरी जे आज्ञा येईल.—(अपूर्ण)

¶*Naro Devaji probably addressing Naro Shankar reports encounters in Bundelkhand against Jat Danashah, the regent of Bharatpur. See No. 173 above.*

---

*No. 203*] *[29-2-1768 ?*

पो छ १० सवाल

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीजीचे सेवेसी

आज्ञाधारक सीताराम गोपाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। फाल्गुण शुध ७ मु। बनगाव नं।+ छेत्रपूर जाणोन स्वकीय स्वानंद इछितो विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालो ते छत्रपुरास आलो. राजे हिंदुपत पर्णियात होते तेथे जात होते. त्यास राजश्री खरगराव दिवान गुदर गोपाळदासजी बनगावात राहतात. त्याचे घरी लग्न होते. येथे येऊन याची भेट घेतली. वर्तमान कुल सांगितले. पत्र देखून बहुत संतोष जाले. आठा दिवस परियेंत लग्नाचे उत्छावमुळे बोलने जाले नाही. सुटीत जाले तेव्हा गोष्टमात जाली. श्रीमंत नानासाहेबाच्या स्नेहाच्या गोष्टी बहुत सांगितल्या. बहुतच आप्तकी व घरोबा सांगितला. श्रीमंत दादासाहेब वैकुंठवासी याचे स्नेहाचा विचार व करारमदार सांगितला. त्याचा विस्तार पत्री कोठवर ल्याहावा! बहुत प्रमाणिक येकवचनी व हरिभक्त निष्ठा चांगली आहे व राजाहि याचा लेहणग्रस्त(?) आहे.

+ नजीक.

वडिलाचप्रमाणे यांची मर्यादा चालवीत आहे. याचा भाऊ केसरीसिंग त्यास मुसाहेबीचा किताब आहे. उभयेता बंधूचे श्वाधीन राज्य आहे. येसा प्रसंग पाहून यासच जाबसाल जो कर्तव्याचा तो केला. सरकारचे मतलबाची याद होती त्याची गोष्टमात ध्यानास आणून उभयेता बंधूंनी ठराव करून तहनामा सेवेसी पाठविला आहे. त्याचे मणन करून उतर पाठविले पाहिजे. याचप्रमाणे नकल राजे मजकुराकडे धनसिंग कुवर याचा त्याजपासी देऊन पाठविली आहे. राजे श्रीनगरचे पाहडात सिकारीस गेले आहेत. तेथ भेट गोष्ट उतम प्रकारे होत नाही म्हणोन मजला न पाठविले. आपणापासी ठेऊन घेतले. तिकडील उतर आले म्हणजे (अपूर्ण).

¶*Sitaram Gopal reports his visit to Kharagrao, Diwan of Raja Hindupat, and their friendly talks.*

---

*No. 204*] *[1-4-1766 ?*

पौ छ २८ सवाल मुा वोडसे

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना

छ २० रोजीं ढवलपूरची बातमी आली. ढवलपूर जवाहिरमलानें घेतलें. च्यारपांचसें घोडे व तीनच्यार हाती यैसें त्यास सांपडलें. राजश्री सुलतानजी लांबहाते हस्तगत जाले. याप्रमाणे बातमी आली व त्याच्या फौजा चंभळेपार उतरल्या. कांहीं सीक व कांहीं फौज त्याची यैसे आलीकडे उतरल्या आहेत. गोहदकर जाट सडेस्वारीनें जवाहिरमलाकडे गेला. त्याच्या याच्या भेटी जाल्या. त्यास त्याचा विचार दिसोन आला कीं, शहरावरी जाऊन आवई करावी व गड्या आमच्या सुटल्या आहेत त्याजवर जाऊन दंगा करावा. गोहदवाल्यानें परवांचे दिवसीं येक गांव आमच्या तालुक्याचा मारला. पुढेंहि त्याच्या चित्तांत दंगा करावयाची उमेद भारी आहे. त्यासी विनंती हेच की, खासा स्वारी इकडील शाहावरी सत्वर येऊन पोंहचल्यास त्याचा उपद्रव होणार नाही. ठाण्याची बंदोबस्ती जितकी करावयाची त्यास कांहीं चुकत नाहीं. परंतु आपला इकडील शह चुकला तरी रांगडे आवई घालून उपद्रव बहुत करितील; यास्तव वारंवार विनंती केली जाते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter reporting that Jawahirmal Jat has occupied Dholpur and Lambhate (Holkar's sardar) is taken prisoner.*

No. 205] [5-4-1768?

श्री

सेवेसी विनंती सेवक तुकाजी होळकर कृतानेक विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १७ जिलकाद मुकाम मौजे सांगवी गंगातीर परगणें चांदवड येथास्थित असे विशेष. स्वामीकडून पत्र आलें तें प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाला. जैपुरीहून रामचंद्र तुकदेव वकील याची पत्रें आलीं ते बजिनस पाठविलीं आहेत. जाटानें सीख मदत आणिले आहेत याजकरितां देशीहून फौजा जलद जाऊन पोंहचाव्या, तर तुम्ही दरमजल पुढें जाणें म्हणून आज्ञा व वाकिलाच्याहि पत्राचा भाव सर्व कळला. यैसियास स्वामीचे आज्ञेप्रमाणें आम्ही स्वार होऊन कान्होल्यास आलों. तेथून विनंतीपत्र सेवेसीं मार्गस्त केलें. त्याचें उतर आद्यापिवर आलें नाहीं. आनंदवलीस जावयाविसीं साहेबीं आज्ञा केली. त्यास राजश्री माहादजी सिंदे व राजश्री कृष्णराव आले पाहिजेत, यास्तव इकडून राजश्री माहादबास पत्रें गेलीं व राजश्री पंत मशारनिलेनिसीं स्वामीस विनंती पत्र पाठविलें आहे. तर साहेबीं उभयेतांस सत्वर मार्गस्त करून द्यावें. ते आले म्हणजे आनंदवलीस जाऊन तेथें श्रीमंत राजश्री दादासाहिबांची भेटी घेऊन पुढें जाऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Tukoji Holkar informs the Peshwa that he would start northwards as soon as Sindia and Krishnarao join him.*

---

No. 206] [18-5-1768

पौ छ २८ सवाल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
विश्वासराव स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १ रमजान पावेतों येथास्थित असें विशेष. तुम्ही राजश्री हरि चिंतामण याजबराबर पत्र पाठविलें तें पावलें व हल्ली येक पत्र आलें तें पाऊन सविस्तर वर्तमान कळों आलें, व पूर्वी राजश्री गोविंद विश्वनाथ येथें होते त्यांनीं सविस्तर मजकूर सांगितलाच होता व आपण जाटाचा व हुंडीचा व रसदेचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. ऐशियास रसदेचे करारमदाराविशी श्रीमंतांपाशीं बहुत रदबदल करून करार केला. वाइद्याप्रमाणें ऐवज सरकारांत पावल्यास

सचोटी वाढून श्रीमंतांची कृपा विशेष होईल; येविशीचा सविस्तर मजकूर उभयतां लिहितां कळों येईल. जाटाचा मजकूर तर श्रीमंतांचे प्रतापेंकरून पराभवातें पावला आहे. येथून सरदारांची रवानगी जाहाली आहे तेही मातबर फौजेनशीं लौकरच येऊन पोंहचतील. आल्यावर तुमचे प्रांताचा बंदोबस्त करून देतील. तुमचा बंदोबस्त करून द्यावा येविशी श्रीमंतांनीं सरदारांस रुबरू सांगितले आहे. पूर्वस्नेहाचें विस्मरण नसावें. बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हें विनंती.

*¶Balaji Janardan writes to Vishvasrao of Jhansi not to be remiss as regards payment of amounts due from districts under him. He further informs that troops have been sent to chastise the Jat.*

---

*No. 207]* *[7-6-1768*

पो छ २२ मोहरम

**श्री**

**श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक अपाजी मेराल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता २१ माहे मोहरम मुा ठाणे दभुवा स्वामीचे प्रतापे कुशलरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनज्ञा केली पाहिजे विशेष. जाटाकडील वर्तमान भिंडेस लागले होते. पाचच्यार सुरंग लावले. कारेगर न जाले. विटावियावर नवाब सुज्यात-दोलाकडून उमरावगीर गोंसांवी व आनुपगीर गोंसांवी वगेरे फौज वीज हाजार परियेंत आले. त्यामुळें भिंडवाल्यास हिमत आली. आधी गडबडले होते, परंतु हे फौज आली हे ऐकोण शाबुतीने उतम प्रकारें लढले. समरूस गोळी लागली, परंतु जिवंत आहे. त्यावर जाटानी पांचच्यार सुरंग आणखी चालवले. त्यांत तीन सुरंग कारेगर जाले. हला करून भिंड जाटाने घेतली. तदनंतर फौज तेथेच आहे. भिंडचा बंदाबस्त करतात. कांही जाटाचे स्वार घेऊन गौरे[१] इट्ठखीस आले होते. काध्याची गढी घेतली. काहारवाल्या राजास पत्रें आली कीं चाकरीस येणें. यांचा जाबसाल गेला कीं आम्ही आपले स्थळावर आहों. येथूनच जे चाकरी सांगाल ते करूं. राजा आपले शाबितीनें लढावयाचा सरंजाम करून आहे. नवाब सुज्यातदोला गंगा उतरणार, दिलीस जाणार. पातशहा तख्ती बसवून पातशाही बंदोबस्त करावा याच्या विचारांत आहेत.

---

+ येथून पुढील अक्षर खाशाचें. १ गौर = गवार = बंडखोर, पुंड.

विटावियावर फौज आली होती, त्यानी दोड करून जाटाची जागा पेरोजाबाद आग्र्याआलीकडे बारा कोस आहे, सुकराबादेपासून पांच कोस आहे. विटाविया-पासून अठरा कोसाची दोड करून शहर मारले. जाटास तिकडेहि उपसर्ग लागला आहे. आटेर भिंड दोन्ही स्थळे मातबर गेली. कहार सेवटें इकडे यावयाची अवाई दाट आहे. या उपरी काये वर्तमान होईल ते पाहावे. आम्ही आपले ठाणियाची बंदोबस्ती उतम केली आहे. स्वामीचा प्रताप समर्थ आहे. इकडील चिंता न करावी. किसनसिंग जाट फौज घेऊन या प्रांती येणार हे आवाई दाट आहे. त्यामुळे रयेत गांवावर टरत नाही. आधीच गांव तमाम पळाले होते. आम्ही आलियावर दाहापाच गांवची रयेत बोलावून खातरी करून बसविले. आज भिंडेचे वर्तमान यैकोन फिरोन गडबडलें. कांही केल्या धीर पुरत नाही. जोतपार्त+ करावयाचे दिवस चालले. गलबा या रितींच्या. गुजरानी दुंडी मांडलीच आहे. यांचा उपद्रव भारी आहे. याचा मजकूर पूर्वी स्वामीस विनंती लिहिली आहे, त्याची आज्ञा अलिया त्याप्रमाणे पेरवी करून सेवेसी लिहूं. वरकड वर्तमान धन्याचे प्रतापें येथास्थित असे. बहुत काय लिहिणे, कृपेची वृद्धि करावी हे विज्ञापना. दिवाण ध्यानतराव सेंवढियाहून कूच करून जाटाकडे काल गेले. कळावे. उडिन्यास व महुमोहनीस आम्ही पत्रें लिहिलीं आहेत. आपले खबरदारीने ठाण्याचा बंदोबस्त करावा. बातमी खबर वरचेवर परस्पर लिहीत जावी म्हणोन त्यास लिहिले आहे. हे विज्ञापना.

¶*Apaji Mairal to Vishvasrao Lakshman describing the attack on Bhind led by the Jats. He also reports the intention of Shuja-ud-daula to go to Delhi and to administer the territory of the Emperor. The writer intimates how the whole rural population was terror-stricken on account of an impending attack by Kisansing Jat.*

---

*No. 208*] [*8-6-1768*

पो छ २३ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक आपाजी मैराळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २२ मोहरम दोन प्रहर परियेंत स्वामीचे कृपाकटाक्षें कुशलरूप जाणून स्वकीय कुशल लिहावयासी आज्ञा केली पाहिजे विसेष. भिंडेस माणसें दोन होती ते

---

+ लावणी.

आज आलीं. तिकडील वर्तमान भिंडेस दाहा सुरुंग लागले होते त्यांत च्यार नासले, साहा कारेगर जाले. त्यानीं गढीच बसली. तेव्हां छत्रसाल याचे बहादरीनें आंतील लोक निघोन गेले. जाटाचे फौजेत सरदार दानसा व समरु व मोहकमसिंग वगैरे आहेत. त्यांचा सांडणीस्वार आपले माणसांचे रुबरू जवाहीरसिंगाकडे गेला की भिंड आम्ही घेतली. या उपरी आज्ञा होईल तरी काळपीकडे जाऊ. आण आज्ञा होईल तरी झासीकडे जाऊं. तिकडील जाबाची मार्गप्रतीक्षा आहे. गवार जाटाकडे चाकरीस हजर जाले आहेत. माहाराजसिंग जाऊन जाटाची भीड आणोन केथा व अमान दोही ठिकाणी ठाणी बसली. कांही भिंड सांप्रत फौज तीन होत्या एक उमरीस व दुसरी नद्रुखीस तिसरी टोळी इद्रुखीस या प्रमाणे तीन टोळ्या त्रिस्थळी आहेत. खासा दानसा सडा भिंडेहून पलीकडे आटेरीस गेला. तिकडून जाटाचा बंधु रतनसा आला आहे. त्यास पुढें घ्यावयास गेले आहेत. रतनसा आटेर व भिंड या दोही स्थळास पाठविले आहेत. याप्रमाणे वर्तमान तहकीक माणसे लस्करांत होतीं, आपले दृष्टीने पाहून आली त्याप्रमाणे सेवेसी लिहिले आहे. गोहदवाला राण्याची भीड हजार प्यादा व तीनसे स्वार माधोराम सरदार आहे. एकूण गोहदवाले व गौर त्यास मिळाले आहेत. प्रांत भिंडेपासून दरोबस्त उद्वश जाला आहे. फौज दानसा बरोबर भारी आहे. वसि तोफा आहेत. जाटाचे खातरेत कोण्हीच नाहीं, आण त्याप्रमाणेंच आहे. त्यास कोण्ही सन्मुख व्हावयास नाही. कहारेस स्वार आले होते ते कहारवाल्यानें काढून दिले. लढायाचा सरंजाम करून आहेत. यांजस यावयाची मोठी धमक आहे. कनरगडाचाही बंदोबस्त करीत आहेत. सेवढे उज्याड जाले आहे. आम्ही आपले ठाणियाचा बंदोबस्त उत्तम प्रकारे केला आहे. भीड चांगली जमा केली आहे. याहीवर आम्हास प्याद्याचे प्रयोजन लागेल तेव्हां सेवसी लिहूं. तरी पत्र पावतांच आमची कुमक से दोनसे माणसें पाठऊन करावी. धणी समर्थ आहेत, तेथे कुमकीस कमी काय आहे? सेवेसी सूचना लिहिली आहे. भिंडेकडून माणसें आली हें सांगतात की गोसावी याची फौज व कोण्हीच आले नाहीं ते वर्तमान अवघे खोटे दिसतें. आमचे माणूस गोसावीयाचे लस्करांत गेले आहे, त्यास च्यार दिवस जाले अद्याप आले नाहीं. तस्मात विटवियाजवर फौज आली नाहीं. तिकडून जाब माणसें आलियावर तथ्य खबर सुज्यातदौलाकडील कळेल तेव्हां सेवेसी लिहूं. यानंतर या तिही टोळ्यात बातमीस माणसें आहेतच. जैसे जैसे वर्तमान येत जाईल तैसे सेवेसी लिहूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Mairal reports to Vishvasrao Lakshman inroads of the Jats into the Maratha possessions of Bhind and others in Bundelkhand.*

·4342

No. 209]                                                                 [9-6-1768

पौ छ २९ मोहरम
सन तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक अपाजी मैराळ कृतानेक साां नमस्कार विज्ञापना ताा छ २३ मोहरम मुकाम दमुवा साहेबाचे प्रतापे कुशलरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गुजरानी या परगण्यात मोठी घूम मांडली आहे. स्वार प्यादे येऊन गावास उपसर्ग देतात. गाडे पाठऊन लाकडे भरून नेतात. इतके दिवस नदी उतरोन आलीकडे येत नव्हते. काल वीस पंचवीस गाड्या व शंभर प्यादे येऊन परेछास सरकारचा बाग आहे तेथील बोरी तोडून बागाची तसनस केली. तेथील माळी रडत अला व गांवकरी यांणींही खंगोर[1] पाठविला. त्यावरून येथून शंभर तुबकदार[2] पाठविले त्यांची कार्यसिधि होऊन गाडे जोतून[3] जात होते तो आपली भीड[4] पोहचली. त्याणी गाडे पाठीसी देऊन पुढें लढाईस उभे राहिले. आपली भीड भारी देखून गाड्याचे बैल सोडून नेऊ लागले. गाडे टाकोण दिले. तेथे तरवार चालली. दोन सिपाई गुजराकडील ठार पडले. कांही जखमी जाले. आपलीकडील एक जमातदार जखमी आहे. दोघे ठार पडताच गुजराची भीड निघाली. आपले लोकांनी बैल वळोन आणले. कांही बैल पळोन गेले. वीस बैल येथे आणले. बैल चांगले आहेत. बिसुनासिंगाचे घरू[5] आहेत. या दहशतीमुळें तमाम नदीअलीकडील पलीकडील गांव पळोन येथे आले व येथीलहि लोक पळून गेले, ऐसी त्यांची दहशत. असो जे जाले ते उत्तम जाले. यावर त्याचे पत्र आले अथवा कोणी भला माणूस आला तरी बैल द्यावे लागतील इतकाच नक्ष जाला. भय दाखऊन प्रीति संपादावी. याउपरी त्यांचा उपसर्ग फारसा होणार नाहीं. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. जाटाचे फौजेचे वर्तमान पयदरपय[6] सेवेसी लिहिले आहे त्यावरून ध्यानास आले असेल. सांप्रत इड्डुखीस जमाव आहे. काहारेस येणार. आज वर्तमान आलियावर सेवेसी लिहूं. यावर भीमसेन जमातदार खानदेशी जमातसुधां येथे आहे, यासी आज्ञापत्र सादर करावें की आपाजीपंताजवळ राहून ते सांगतील त्याचे आज्ञेप्रमाणें चाकरी कर्णे, याप्रमाणे जरूर चिठी लिहिली पाहिजे. येविसी कालहि विज्ञापना

१ खंगार = जळकी वीट, लक्षणेनें लाचारी. २ तुबक—बंदूख, बंदूकवाले. ३ जोडून.
४ जमाव. ५ घराऊ, घरच. ६ वारंवार.

लिहिली आहे कळावें. मल्हारनगरचे ग्रहस्थ स्थळ सोडून अन्यत्र स्थळीं गंतव्य केले म्हणोन रात्रौ ऐकिले. त्याचे शोधास माणूस पाठविले आहे. सत्य मिथ्या वर्तमान आलियावर लिहून पाठऊ. वरकड वर्तमान स्वामीचे कृपाकटाक्षे यथास्थित असे. स्वामीनी आपले साद्यंत सेवकास लिहून कृपोतरी तोषवावे. बहुत काय लिहिणे कृपेची वृधि करावी हे विज्ञापना.

माहाराजांचे सेवेसी आज्ञांकित शामराव नीळकंठ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. साहेबांचे प्रतापे ठाणे मजकुरी आनंदरूप असो. निरंतर आज्ञापत्रीं सेवकास. तोषवावें सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal reports disturbances created by the Gujars in the district of Dabhuva.*

---

*No. 210*] [*11-6-1768*

पौ छ २७ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आपाजी मैराल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ मोहरम अडीच प्रहर दिवसपरियेंत स्वामीचे प्रतापें कुशलरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनज्ञा केली पाहिजे विशेष. आज बिसुनसिंग गुजर स्वार होऊन फत्तेपुरास गेला. जाटाकडे जातो. दीडदोनसे स्वार व तीनसेपरियेंत बरकंदाज समागमे आहेत. कळावें. आज रो नानाजीपंत वगैरे मंडळी येथे आली. येथपरियेंत सुखरूप पावले. उदईक मऊस जातील. आम्ही रुपसा चोधऱ्यास बोलावून आणले होतें व येसाजीपंतासहि पत्र लिहिले होतें की तुम्ही सरकारचे लोक आले होते त्यांस गढीत न घेतले, गोली वाजविली हे उतम न केले. असो. याउपरी खावंदासी रुजू होऊन ठाणे गढीत घेऊन आपला हिसेब दाखवून वाजवी रुो यानी घेतला तो सरकारांत मागावा, सरकार देईल परंतु हे गोष्ट तुम्हापासून काही न जावी. त्यावर त्याणीं लिहिलें की आमचा हिसेब पाहून रुपये देवावे. मी ठाणें खालीं करून देतो. तूर्त सिबंदीच्या कैद्यांत मी आहे येसे कितेक प्रकारें लिहिले होते. त्यानंतर आज हे आले. बाळकृष्णपंत आले. याची व त्याची भेट करवून गढीतहि प्रवेश होईल. वरकड वर्तमान येथास्थित असे. जाटाचे बातमीचे पत्र प्रात:काली सेवेसी लिहिले आहे त्यावरून ध्यानास येईल. स्वामीची आज्ञा आली की वरचेवर जाटाची खबर उडीना व महु येथे पाववीत जाणे. त्यास आज्ञेप्रमाणे वरचेवर त्यांस वर्तमान लिहित आसों. त्यावर

गोसांवी पंधरा हाजार फौज घेऊन आले होते. आग्र्यास जाऊन बेगम तेथें होती ते वर्तमान स्वामीस विदितच आहे. तीस घेऊन गेले. गोसांवी यांचा ऐवज तेथें होता तो घेऊन गेले. पंधरा उंट खजाना वगैरे घेऊन गेले. हे वर्तमान आगऱ्याकडून शिपाई आले त्याणी सांगितले त्यावरून सेवेसी लिहिले असे. सत्यमिथ्या ईश्वर जाणे. गोसावी फिरोन माघारे गेले हे वर्तमान सत्य. याउपरी जाटाची फौज निश्चयेरूप या प्रांती येणार. सांप्रत जाटाचे खातरेत काल्पी, झाशी, ग्वालेर हे किले काहीच नाहीत. गर्व बहुत धरला आहे. ईश्वर गर्वाचे परमार्जन करणार समर्थ आहे. वरकड वर्तमान खावंदाचे कृपेनें येथास्थित असे. बहुत काय लिंहिणे कृपेची वृद्धि करावी हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal writes to Vishvasrao Lakshman, supplying him with news about the trouble created by the Jats.*

---

*No. 211*] [*16-6-1768 ?*

पौ छ १ सफर

श्री

विज्ञापना येथील वर्तमान छ ३० मोहरम गुरुवार प्रहर रात्र मागील मुा भांडर स्वाम प्रतापे यथास्थित असे. जाटाकटील वगैरे बातमी अगोधर दोनतीन वर्तमाने आली परंतु एकहि तथ्य न पडे म्हणोन सेवेसी न लिहिले ? सांप्रत दभवी याचें पत्र रातोरात बिल्हेटीस आले ते बजिनस पाा आहे त्याजवरून कळेल. गढीस जाजती माणसे पाा. आज्ञा कर्तव्य ते करावी. मरजी खावंदाची. दारू-गोळी वगैरे साहित्यही पाहिजे. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञाप्ति. भांडेरहि अगोधरच उज्याड जाहली, काजी पटा सर्व पळोन गेला. त्याचा भरवसा होता, त्याचा प्रकार तूर्त तैसा. येथें राहणे तर माणसे नाकेबंदीस व बातमीस पाा त्याची काय आज्ञा? जैसी आज्ञा तैसे केले जाईल. हे विज्ञाप्ति.

¶*The writer sends news about the Jats at Bhander.*

---

*No. 212*] [*25-6-1768*

पौ छ १० सफर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवेसी

सेवक गणेश माहादेव व बाजी विठल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन आपले कृपेकरून क्षेमरूप असो विशेष.

राजश्री गोपाल राऊ गणेश याची फौज इकडे येऊन तांडवच्या नाल्यावर मुकाम केला आहे. मौजे बामरोलीचीं पेवें वगैरे वस्तभाव नेली, आणिक येक दोन गांव लुटून गेले. छ ९ सफर मंदवारी मुकाम मजकुरीं येऊन याप्रमाणें लूट-मार केली. पुढें काये करितात हें कलत नाहीं. सेवेसी श्रुत होये. यानंतर मौजे पाहाडगाव येलचेकडील त्यास मौहकमसिंग माधवसिंगाचा भाऊ हा येऊन बिसनसिंगाची वगैरे भीड समागमें आणून मौजे मजकुरीं मोर्चे लाविले आहेत. बजिनस पत्र आलें यास्तव शेवेसी लिहिलें असे. बातमी मिथ्या नाहीं. पाहाडगांव व सेरसा व पुछ याजवर फार दांत आहे. उपद्रव करउतां चुकत नाहींत. सांप्रत पाहाडगांवास लागले आहेत. काय होईल तें पहावें. आपली खासा स्वारी अथवा फौजच येऊन मोर्चे उठऊन दिल्हास उत्तम आहे. या उपरि धन्यांचे मर्जीस येईल तें खरें. आपण न यावे. स्वारी पाठऊन मोर्च्ये उठवावे. उपराळा न जाला तर पाहाडगांव घेतात, यांत संशय नाहीं. पाहाडगाव त्याजला मिलाल्यास सेरस यास उपद्रव देतील. आम्ही खबरदारी करावयाची ते केलीच आहे; परंतु आपला उपराळा जाला पाहिजे, याजकरितां विनंती लिहिली असे. जाटाच्या लस्करची बातमी आजी शनवारीं आली. फौज परावरावर आहे. फत्तेपूरचा खंड जाला, तूर्त तीन हाजार रुपये घेतले. माधव गुजर त्यांजपासींच आहे. आमचे माणूस पाहून आले; दोन च्यार हजार फौज आणून ठाणी घ्यावीं या मतलबास गेला. जाटानी यांजला आश्वासन दिल्हे कीं फौज देतों, त्या आश्रयावर पाहाडगांवास लागला आसे. सारांश फौज पाठऊन मोर्चे उठऊन द्यावे, म्हणिजे दबाव पडोन दुसरा उपद्रव लागणार नाहीं, सेवेसीं कलावें. बहुत काय लिहिणें. राजश्री गंगाधरपंत सैदाच्या कोठड्यास आहेत. कृपा वृधीतें पावीजे हे विनंती.

¶*Ganesh Mahadeo and Baji Vithal give news about the raids effected by Gopalrao Ganesh, Muhkamsing and the Jat and ask Vishvasrao Lakshman to take measures to repel them.*

---

*No. 213*] [*28-6-1768*

पौ छ २२ सफर सन

तिसा

आषाढ

श्री

सेवेसी रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १२ सफर मुकाम आनंदवल्ली वर्तमान येथास्थित असें विशेष

तालुके पटा येथील च्यार किल्ले राजश्री रामचंद्र नारायण यांजकडे होते ते मशारानिलेनीं श्रीमंत राजश्री दादासाहेब यांच्या आज्ञेप्रमाणें आमच्या हवालीं केलें. कोणे गोष्टीविषयीं दिकत घेतली नाहीं. मशारनिल्हेस लोकांनीं तलबेकरितां आडविले याजकरितां तूर्त आम्ही रुपये ३५०० साडे तीन हजार दिल्हे आहेत. मशारनिले स्वामीच्या पदरचे आहेत. सेवेसी येऊन विनंती करितां अवगत होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramchandra Ganesh and Visaji Biniwale report that they have taken charge of forts in Taluka Pata from Ramchandra Narayan.*

---

*No. 213A]* *[30-6-1768*

छ १४ सफर तिसा आषाढ सनदा लिहिणें.

श्री

याद तालुके मोल्हेर तीर्थस्वरुप राजश्री दादासाहेबांकडे होता तो हाली सरकारांतून रा लक्षुमण विश्वनाथ याकडे सांगितला असे. सुा तिसा शितैन मया व अलफ किले बितपशिल.

१ मोल्हेर
१ चौलेर
१ न्हावा
१ पिसोला
१ भामेर
१ देहेर

६

येकूण साहा किले देखील किल्याचे जाहागिरी सुधा मारानिलेकडे सांगितले असत. यांचे हवाली करणे म्हणोन सनदा.

१ रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण
१ सर्वोत्तम शंकर व दिनकर माहादेव

२

दोन सनदा व मारनिलेचे नावाची यक यकूण तीन देणे[+].

येविशी जमीदारास पत्रें
१ जाहागीर किले मोल्हेर साल्हेर
१ जाहागीर किले न्हावा पिसोळा
१ जाहागीर किले देहेर
——
३

तीन पत्रें अमल सुरळीत देणे म्हणोन [+]देणे.

सदरहू ताळुक्याची मजमू व दिवाणगी धोंडो गोविंद यांस सांगितली असे. यांचे हातून कामकाज घेऊन चाकरी घेत जाणे. तैनात पेस्तर करार केली जाईल म्हणोन सनद देणे[+].

¶*The Peshwa Madhavrao transfers the administration of some forts released by Raghunathrao to Lakshman Vishvanath and issues sanads to that effect.*

---

*No. 214*] [*13-8-1768*

पौ छ १७ जावल तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्राधान स्वामी
चे सेवेसी

विनंती शेवक विश्वसराव लक्ष्मण कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ रावल मुा झांसी स्वामीच्या कृपाकटाक्षें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपाळु होऊन आज्ञापत्र शेवकास सादर केले ते उतमसमई पावोन सिरसा वंदिले. तेथे आज्ञा जे सालगुदस्त सन समान च्यार सदे पौ बाकी यैवज येणे राहिला तो पाठऊन देणे व वरातदारांचा बोभाट आहे तोहि यैवज पावता करणे. साल मार सन तिसा च्यार सदेचा ठहराव करून घेऊन भरणा करावयासी कारकून पाठवणे यैसी आज्ञा जाहाली. त्यास बाकीचा यैवज सेवेसी या पूर्वीच प्रविष्ट केला असता, परंतु इकडील प्रसंग आट आदीकरून शत्रूच्या दंग्याकरितां कठिण पडला, स्वस्थता नाहीं, यामुळें किले व ठाणी व मुलुकाचे संरक्षण करितां प्रयास मातबर. फौजा या प्रांती नाहीत यामुले प्रांतातील पैका सुरलीत येऊ पावला नाहीं. रुपयांची वोढ विशेष पडली यास्तव सेवेसी

---

+ ही सर्व याद नाना फडणिसाच्या हातची असून शेवटचा 'देणें' हा शब्द खुद्द माधवरावाच्या हातचा आहे.

यैवज न पावला. वरातदारांचाहि यैवज शेष बाकी या प्रकाराकरितांच राहिला. येथील प्रसंग ल्याहावा असा आर्थ नाहीं. संकटावर संकटेंच प्राप्त, उपाय कोणता करावा? तशांत राजश्री गोपालराव गणेश आले, याणी मुलुकाची खराबी बहुत केली तो विस्तार कोठपर्यंत ल्याहावा? या प्रकारें दंगा गतवर्षापासून आजपर्यंत पुरवला. शेवकापासून जेथपावेतो बंदोबस्त होऊन आला त्यासी अंतर केले नाहीं. मोठ्या अरिष्टास येत्न नसे. येविसीचे साद्यंत सेवेसी पहिल्यापासून गोविंद रघुनाथ व हरि चिंतामण निवेदन करीत गेले आहेत. साल मारच्या रसदेविसी आज्ञा जाहाली, त्यास येथून कारकून शेवेसी पाठविले आहेत. सत्वरच पोहचतील. कितेक विज्ञापना करावयाची ते निवेदन करून खावंदाची आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करितीऊ. मुख्य अर्थ स्वामीनी शेवकावर कृपालु होऊन इकडील प्रसंगानरूप रसदेची आज्ञा करून ठहराव करून देविला पाहिजे. त्या प्रो यैवज शेवेसी हफ्तेबंदीप्रो प्रविष्ट करून देऊ. बाकीच्या यैवजाचा भरणा करावयासी कारकुनासी सांगितले आहे तोहि यैवज भरतील. वरातदारांची कबजे कारकुनाबराबर पाठविली आहेत. शेवेसी प्रविष्ट होतील. सर्व प्रकारे शेवकाची निष्ठा स्वामीचरणा सिवाय नाही. कितेक विनंती करणे ते शेवेसी उभयता वकील करितां विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vishvasrao Lakshman explains to the Peshwa his difficulties in realizing the estimated revenue of his districts.*

---

*No. 215*] *[23-9-1768?*

स्वदस्तुर खुाची नकल छ ११ जमादिलावल

## श्रीमसुदा

स्वामीचे कृपाळु होऊन स्वहस्ताक्षरें शेवकास आज्ञापत्र लेखन केले ते सुसमई सादर होऊन सिरसा वंदिले. बहुत आनंद जाला. रसदेचा करार सरकारातून करून दिल्हाच आहे. विजयादशमीच्या मुहुर्ते डेरा दाखल होऊन खास स्वारी हिंदुस्थानांत सत्वर येणार, हरामजादगी करीत असतील त्याचे पारपत्य केले जाईल, तुम्ही खातरजमा राहोन आमल करणे म्हणोन आभयेयुक्त आज्ञा. यैसियासी मामलियेतीचे वृत्त तरी स्वामीची आज्ञा घेऊन झासीस आलो. मामलियेतीचे हार्द पाहतां भदावर कछवाधार दोनी प्रांत गेले. त्यामुळे मुलूक हलका राहिला. तोहि उभयतां सरदाराच्या फौजा झासी घ्यावयास मिळाल्या होत्या तेव्हां आगदीच बेचिराख जाहला. त्याची लावणी व्हावी यानिमित्य

बीजेखवाई[१] देऊन लावणी केली. तथापि आकार पहाता जमेपेक्षा खर्च भारी. त्याहीमध्यें जाटाच्या दंग्यामुळे मुलकाची खराबीच होत आली. खासा जवाहीरमल जाट आला तेव्हां राजश्री बाळाजी गोविंद याजकडून काल्पी वगैरे मुलुक गेला. तसाच या मामलियापैकी दतिया शेवट याचे वाटणीपैकी माहाल ठाण्यासुधा गेले. दंग्यामुळे जाजती सिबंदी व जकिरा करावा लागला हाहि खर्च भारी पडला. दुसरे सालगुदस्ता कमाविसदाराकडून तीर्थस्वरूप राजश्री नारोपंत नाना याणी रदकर्जाचे येवजी वसूल घेतला यामुळे कर्जे वगैरे काढून फौजेस वगैरे खर्च करावा येवंच सालगुदस्ताचे हिसेबी फाजील पडले आणि येथील प्रसंग तरी जाटानें व्यापिलें व उपराळ्यास सरदाराची उपेक्षा. येशा संकटातहि आज्ञेचे सरक्षण करावे, पुढे निभावणी करणार धणीच आहेत, हे जाणोन राजश्री गोविंद रघुनाथ याजला लिहिले आहे. त्यास मानी रसदेविसी आर्जे करितील ते ध्यानारूड करून शेवकाचा तराणोपाय होये ते करणार स्वामी खावंद आहेत. वगवसील स्वामीचे पायाखेरीज दुसरा नाही. खासा स्वारी हिंदुस्थानात आलियावर सरकारचा मुल्क राहोन राजेरजवाडे सरकारात खंडण्या देतील. सरकाराची फौज आल्याखेरीज प्रांतातील आमल राहाणार नाही. चहूकडून रजवाड्यानी व जाटानीं व्याप्त केले आहे. तथापि गेली ठाणी सोडवाल याचे प्रयेत्नास व किले ठाणी याचे संरक्षणास आर्येप्राणे सेवककाडोन अंतर होणार नाही. सर्व प्रकारें सेवकाचे संकट परिहार करून पालण करणार धनी समर्थ आहे.

¶*Vishvasrao Lakshman reports the serious situation in the North resulting from the inroads of the Jats.*

---

*No. 216*] [*22-10-1768?*

**श्री**

**राजश्री हैबतराव मुलिक**
**गोसावी यांस**

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो विसाजी कृष्ण आसीर्वाद सुा तिसा सितेन मया व अलफ. आमचा कार्तिक शुध्ध चतुर्थी रविवारचा मुकाम रांजण-

---

१ बीज व खावटी, पेरायला व खाण्याला धान्य.

गांवचा आहें. तेथून दुसरे दिवसी सोमवारी कूच करून मजल दरमजल पुढे जाणार आहों. तुम्हीं सामानसुधां तयार व्हावें. रविवारीं रांजणगावचे मुकामी येणें. घडीचा दिरंग न करणें पत्र पावतांच येणें. याजउपरि विलंब लाविल्यास कार्यास येणार नाहीं जाणिजे. छ १० जमादिलाकर बहुत काय लिहिणें.

मोर्तब
सुद.

श्रीसिद्धेश्वर-
चरणीं तत्पर
विसाजी कृष्ण
निरंतर

¶*Visaji Krishna on his way to the North orders Haibatrao Mulik to join his army without delay.*

---

*No. 217*] [*12-11-1768*

पौ छ १ रजब

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामींचे सेवेसी

विगंती सेवक आपाजी मैराळ, कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ६ जमादिलाकरपावेतो मुक्काम कसबे विजपूर स्वामींचे कृपाकटाक्षें आनंदरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. इकडे गुजरानें गांवगांव माणसें पाठऊन गांवास उपद्रव माडला. यास्तव आम्हीं मऊकडून येथें आलों असों; यावर जाठाची फौज भिंडिस आली. तें वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले होतें, त्याजवरून ध्यानास आलें असेल. हाल्लीं हजार स्वार इंद्रुखीस आले, पुढें कहारेस येणार त्या दहशतीनें चहूंकडे चौधे लबाडीस प्रवर्तले आहेत. त्यास कृपावंत होऊन राजश्री भाऊंची रवानगी इकडे सत्वर केली पाहिजे. विनाफौजेखेरीज इकडे बंदोबस्त नाहीं. दतियेवाल्यानीं गांव दाबले आहेत. गुजर गडबड करीतच आहेत. सांप्रत जाठांचेहि सर्वांस वारें लागलें आहे. तरी भाऊंस

सत्वर पाठवावें. कंचे कपेवर पैसा घेतला पाहिजे. परभारें वसूल चालला त्यास येक दोन वेळ सेवेसी विज्ञापना लिहिली. याउपरी क्षेपनिक्षेप फौज पाठवावी. बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ती.

¶*Appaji Mairal solicits succour from Vishvasrao Lakshman in order to check the activities of local jamindars and the Jats.*

---

*No. 218]* *[19-11-1768?*

पो छ १२ रजब

श्री

श्रियाविराजित राजमान्य राजश्री
आपा स्वामींचे सेवेसी

पोष्य सदासिव बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा कार्तिक सुध १० माा सिरसा येथे आसो विशेष. आपले येणे झासीस जाले यैसे यैकोन परम हर्ष जाला तो श्री जाणे. येथील वर्तमान तपसिले पूर्वी श्रीमंताचे पत्री लिाा आहे व हलीचे पत्री लिाा आहे त्यावरून विदित होईल. कल्याणाने बहुतच सरकारी जागियासी कजिया आरंभिला आहे. सिरसा व गिदोसा दोनी गाव जाळिले. लुटिले. अकरासे दरगावी रुाा दंड घेतले. आशाढ मासी गुरे नेली ते सोडिली नाहीत. आमखेड्यात व बंगल्यात सालमारी जमीन दाबली. शंभर रुपयाची खरीपाची सिवाये उजारी पेरली आहे, जमीन पंच्याहतर बिघे या प्राो करून सांप्रत दंडिली आरंभिली आहे. आम्हांपासी फौज नाही जे त्याचे पारपत्य करावे. त्याची पत्रे आली त्याची नकल व असेल+ पेसजी पाा होती व हली राजश्री गंगाधरपंताचे पत्र आणून त्यास पाा त्याची नकल पाा आहे. स्वामी आले आतां आम्ही काळजी करीत नाही. त्याचे पारपत्य आपण करितील. तूर्त अमल बंद जाला आहे. भीडा जमा करितो. आमखेड्यात येऊन अर्धा कोसावर राहिला आहे. शंभर स्वार आहेत, माणूस चारसे आहे. कळावें विदित जालें पाहिजे. हगामात हा दंगा केला आहे. हरामखोर जाट रोहिला हाच आहे. फतेपुरास आम्ही पत्र भीडेकरिता राजश्री जनार्दनपंत आपास लिाा त्यांचे उत्तर आले ते पाा आहे, त्यावरून विदित होईल. कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

---

\+ अस्सल.

राजश्री यादोराव भाऊ स्वामीस सां. नमस्कार. सविस्तर येजमानाचे व राजश्री आपांचे पत्री लिा आहे त्यावरून कलेल. आपण वराता केल्या, काम चालीस लागले तो हा प्रकार यैसा जाला. कलावे लोभ असो दिजे हे विनंती. पत्राचा मार्ग पाहतो हे विनंती.

¶*Sadashiv Ballal complains to Appa about the marauding activities of Kalyan in the districts belonging to the Peshwa. Yado Rao Bhau is mentioned above in letter No. 173.*

---

*No. 219*] [*25-11-1768*?

पो छ २८ रजब कार्तिक

**श्री**

**राजश्री रामचंद्रपंत गोसावी यांसी**

[1] अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित तुकोजी होलकर दंडवत विनंति उपरी. येथिल कुशेल जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन लेखनान्वये अवगत जाला. सांप्रत आपलेकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. प्रस्तुत मुक्काम कोठे, नर्मदातीरी कधी जाणार, आम्हीही कार्तिक पोर्णिमेस गंगा उतरोन दरमजल येत असो. आमची भेटी जालियावरी हिंदुस्थानांतील मातबर मनसबे राजकारणे कर्तव्य ते आपले आमचे विचारे होतील, तिकडील नवल विशेष वर्तमान आले आसेल ते ल्याहावे म्हणोन लिहिले. यैसियासी आम्ही वाफगांवीहून स्वार जालियावरी श्रीतुलजापूर दर्शनास गेलो. तिकडून परभारे रेवापार जावे, परंतु राजश्री नारो शंकर याजकडील इंद्राईकर किल्लेदारानीं चांदवडाआसपास गडबड केली होती त्यामुळें फिरून तेथें येणे लागले. तेथील बंदोबस्ताकरितां कांहीं मुक्काम ते स्थली होते. तदनंतर कूच करून दरमजल थालनेरपर्यंत येऊन दाखल जालो. फौजहि जमा जाली. राहिलीसाहिली येत आहे. आठा चोरोजांत लोक सर्व जमा होतील. येथून लौकरीच महेश्वरी जातो. तेथून तीर्थरूप मातुश्री बाईची भेटी घेऊन पलीकडे मालवे प्रांतीं जावयाचे करितो. तोपावेतो आपणहि येतील. आपली आमची भेटी जालियावरी हिंदुस्थानांतून उचित मनसबे तेच योजना होईल. तिकडील राजेरजवाडे यानीं आपलाले जागा जमाव करून मजबूद आहेत.

---

१ शिक्का तुकोजीचा येथें आहे.

तिकडे गेल्यावरी ज्यानी जैशा वर्तणुकी केल्या आस्तील ते आपलाले आचरणा-(न)रूप फलही श्रीसतेने पावतील. सर्वदा पत्रीं संतोषवीत असावे. रवाना छ १४ माहे रजब बहुत काय लिहिणे हे विनंति.

मोर्तब
सुद.

¶*Tukoji Holkar to Ramchandra Ganesh: writes that he would soon be marching to take up his command in the North.*

---

*No. 220*] [*5-12-1768*

छ २६ रजब सन
तिसा

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवशीं

विनंति सेवक आपाजी मैराळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. कार्तिक वा। १२ इंदुवासरपरियेंत स्वामीचे प्रतापें दमुवियांत कुशलरूप जाणोन स्वकीये निजानंदलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान राजश्री गंगाधर गोविंद सुपें कछोरकर बुणग्यांत होते. सडी फौज पुढें एक मजल होती. गौराचे गांव मेहरा वगैरे जाळले लुटले. त्यासी परस्परें गांवांतून लढाया जाल्या. त्यावर गौरानी जमाव केला. दोन हाजार फौज जाटाची इदरुखीस आली. वरकडहि हजारबारासें जमा जाले आहेत. तीन हजार परियेंत इंदरुखीस जमाव जाला, त्यामुळें गंगाधरपंत बुणग्यासुद्धां माघारे कोचेस आले. सडी फौज पुढें आहे. पहावें; त्यांचा यांचा मुकाबला[१] होईल किंवा मोघमच राहातील. मुकाबला होऊन परमेश्वरें यांसी येश दिल्हिया उत्तम आहे. कदांचित माघारे पाय दिल्हा तरी मोठे कठिण आहे. गवार गर्दी करावयास चुकणार नाहींत. इतक्याच वर्तमानेंकरून तमाम हरामखोरांच्या नजरा फिरल्या. गुजराचे गांव प्यादे स्वार येऊन धूम करितात. महते(?)धरून नेतात. यैसा विचार

---

१ युद्ध, लढाई, झुंज.

4354

आहे. आपल्यास वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें असे. महाराजांचे प्रतापें सर्व अरिष्टें निर्शण होतील. गकारपूर्वक माघारे आले, येणेकरून फार गडबड आहे. आपलीकडील गढ्याचा बंदोबस्त येथास्तित आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Appaji Mairal's letter describing how the Jat's activities against the Marathas encourage local tribes, such as the Gujars and Gavars, to rise against Maratha rule.*

---

*No. 221*] [*6-12-1768*

नकल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव बल्लाळ यासी माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. पा नेवासे पो देहे बितपसील

२ सखुबाई सिंदी याजकडे सरंजामास देहे
 १ मौजे वाघाली दरोबस्त
 १ मनेरे चिंचोली जागिरीचा आमल
 —
 २

३ भागिर्थीबाई व सगुणाबाई सिंदी यांजकडे
 १ मौजे करंदी दरोबस्त.
 १ मौजे भाके जागिरीचा आमल
 १ मौजे दडगाव स्वराज्याचा आमल खाो जागीर करून
 —
 ३

—
५

येकूण पाच गाव येथील सदरहू आमल सरंजामास चालत आहे. त्याची जसी सालमारी सरकारात करून कमावीस तुम्हास सांगितली असे. तरी पाच गावचा आमल सदरहू लिहिल्याप्रमाणे चौकसीने करून कचा आकार होईल तो सरकारात पावता करून जाब घेणे. जाणिजे छ २९ रजब सुाा तिसा सितैन मया व आलफ बहुत काय लिहीणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa orders the confiscation of villages assigned to the ladies of the Sindia family and makes them over to his brother.*

*No. 222*] [*21-12-1768*

पौ छ १३ साबान सन तिसा.

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री राऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक आपाजी मैराळ, विज्ञापना. येथील वृत्त तागायत छ ११ साबान गुरुवासर ठाणें दभुवा कुशलरूप असो विशेष. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. तेथं आज्ञा जे:—सिंदे, होळकर उज्जनीस आले. लौकरीच या प्रांतासी येणार. सर्व बंदोबस्त करून दिल्हा जाईल म्हणोन आज्ञापिलें, उत्तम असे. इकडील वर्तमान तरी जाठाची फौज इंदुरखी आलीकडे पार होऊन आली. कहारेहून दोन कोसावर गोपालपूरचे बडेगाऊ म्हणोन आहे तेथें आली. राजश्री गंगाधरपंताचा जाठाचा कोसाचा तफावत आहे. जाठाचा गंगाधरपंताचा सल्लक एकदोन रोजांत होणार. जाठाचे वकील गंगाधरपंताचेथें आहेत. गंगाधरपंताचे वकील जाठाचे लष्करांत आहे. भानगड लागली आहे. सल्लक लौकरीच होईल. दुसरें वर्तमान ऐकितों जे, बाळाजी गोविंद यांचा सल्लक जाठांनीं केल्यावरी झांसीच्या मुलकांत धामधूम करावी हा मसनबा आहे म्हणोन ऐकितों. सत्यमिथ्य न कळे. दभुव्याहून जाठाची फौज सहा कोसावरी आहे. जाठाच्या दहशेतीनें झाडून गांव उज्याड जाले. एक गांवांत वस्ती राहिली नाहीं. तेव्हां रुपया पैसा वसूल होणें कळतच आहे. आम्ही ठाण्याठाणेचा बंदोबस्त केला आहे. नवीन शिबंदी ठेविली असे. माणसें बातमीस पाठवि(ली) आहेत. वर्तमान आलियावरी सेवेसी लिहून पाठऊं. फौज पांच सहा कोसावरी आहे. कोणे वेळेसी काये होईल न कळे. आमची खबर बखर घेत जावी. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो द्यावी हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal reports from Dabhuva the aggressive activities of the Jats in the vicinity of his district and the conciliatory attitude entertained by Balaji and Gangadhar Govind.*

---

*No. 223*] [*30-12-1768*

पौ छ २२ साबान सन तिसा.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री रावजी स्वामीचे सेवेसी.

पोष्य सदासिव बलाल सां। नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ता। छ २० साबान मो। दरावर येथे राजश्री गंगाधरपंत बाबा याचे लस्करात आसो विशेष. आपले आज्ञेवरून येथे आलो त्यास च्यार रोज येथे होते. रूपराम कटोर याचे

पत्र व राजश्री गगाधरपंत बाबाचे पत्र येसी दोनी पत्रे आपण पाा त्यास रूपराम तो आगोदर येक रोज काथाबोहत येथे गेला. त्यास समागमे राजश्री आपाजी लक्षुमण यास घेऊन गेला जे दानसाजवल ठहराऊ. त्यास त्याजकडे पत्र स्वामीचे पारसी पाा आहे. उतर आले नाही. जाटानी तमाम गांवगना स्वार पांच पांच पाा आहेत जे पोली वेऊन येणे. आमलात बखेडा केला होता. आमचे गावीहि स्वार आले होते. उठवावे तरी तहात तफावत पडेल व जाटाची फौज काथ्यावर पडली होती त्यास आजी छ मारी दानसा कूच करून इंद्रुखीस गेला. समागमे आपाजीपंत यास रूपराम घेऊन गेला आहे. ठहराव आद्याप जाला नाहीं, परंतु सैंध नदीची हद ठरेल येसे दिसते. दुसरे वर्तमान त्याचे आहे जे राा गिरमाजीपंत यास कछवाधार येथे ठेवावे, तहसील त्याणी कछवाधारची करावी. राा आपाजीपंतास रूपरामाने घेऊन भरथपुरास जावे, तेथे ठहरेल त्याप्राा त्याणी याणी चालावे, याप्राा रूपराम करार करून गेला आहे निर्वेध जाले नाही. दुसरे वर्तमान उठले आहे जे नजीबखान व सीख यांची लडाई जाली. नजीबखान मोडिला येसे वर्तमान आहे. दानसाहि सडा भरथपुरास जाणार येसे वर्तमान आहे, पाहावे. फौज इंद्रुखी व भिंड येथे सोडून जाणार. आगोधर स्वामीस पत्रे लिाा त्याच दिवसी जाटाचे स्वार गावगना आले. त्याच दिवसी आम्ही लस्करात रात्री आलो. त्यास येथील वर्तमानासाठी पत्रे न पाठविली. हे वर्तमान याप्राा जाल्याचे लिाा आहे. आम्ही उदईक सुक्रवारी सिरशास जातो. स्वार त्याचे उठवितो. जेथवर पैसा उगवेल तेथवर उगऊन स्वारास देतो. आजपर्यंत जाट व रामपुरेवाला पुरविला आहे. आमचा आपराध नाही. स्वार कजिया करितील तरी काम सरकारचे नासेल. त्यास पत्र साफ लिहावे जे जो पैसा उगवेल तो घेणे. रोजमरेयाविसी व वराताविसी कजिया न करणे. जर काम करून देतील तरी उठोन येतो. बेआबरूचे आम्ही सोसणार नाही. सरकारी काम होईल ते करून देऊ, बिगाड करणार नाही. फतेपुरास राजा रघुनाथसिंग यास उतम प्रकारें ताकीद येथून घेऊन राा गुंडोपंताकडे पाठविले आहे. आपली फौज आद्याप तरी बाहेर काढून परगणेयात फिरावें, फौजेचे पोट भरेल. रिणाईत स्वरूपी फौज ठेऊन काय उपयोगी आहे? स्वामीनी आम्हास पत्र लिाा त्यास उतम मातबर किताब देऊन पत्र लिाा. आपले दरबारी आल्यास किताब मातबर मेलविला. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*The raiding activities of the Jats are reported by Sadashiv Ballal to Vishvasrao Lakshman. Attempts are being made to patch up an understanding with them making the River Sindh as the boundary line.*

*No. 224*] [*2-3-1769*

पौ छ १७ जिल्काद.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वासराव स्वामींचे शेवेशी.

पोष्य कृष्णराव बल्लाळ, साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. जाटाचा मजकूर लिहिला तो कळला. दानसा जाट यानें फौजबंदी करून, मुलखात धुंदी फार करितो. याजकरितां फौजा येऊन पोंहचल्यास उत्तम आहे म्हणून लिहिलें. येशास श्रीमंतांनीं तमाम सरदार यांच्या रवानग्या केल्या आहेत. सत्वरीच येऊन पोंहचतील. आम्हीं सर्व प्रकारें आपले असों. तिकडील वर्तमान वरच्यावर लिहीत जावें. रवाना छ २१ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे. हे विनंती.

¶*Krishnarao Ballal informs Vishvasrao Lakshman that the sardars Sindia and Holkar have been despatched to put an end to the Jats' activities.*

---

*No. 225*] [*1768 ?*

श्रीगणराज

राजश्री गंगाधरपंत तात्या स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. आपणांकडील गोष्टी निर्गमांत येत नाहीं यास्तव श्रीमंतानीं बहुतां प्रकारें रागें भरून सांगोन पाठविले होते. आम्ही विनंति सांगोन पाठविली जे. आजी यावे (फाटलें) आपण क्षमा केली तसी आजीचा दिवस क्षमा करावी. आजीचे दिवसांत निर्गम करून देवितों म्हणून सांगोन पाठविलें आहे. आपणासहि ज्यापक्षी श्रीमंतांची मर्जी रक्षिणे त्यापक्षी दिवसगत लाऊन फाइदा काय ? यास्तव आजीचे दिवसांत निर्गम होय ते करावें. आपण उतर लिहितील त्याप्रमाणें श्रीमंतास विनंति करूं. बहुत काय लिहिणें हे विनंति.

¶*Gangadhar Yashwant Chandrachud is advised to have his affair settled without delay as the Peshwa was most insistant on the matter.*

---

*No. 226*] [*1768 ?*

श्री

स्वामीचे शेवेसी विज्ञापना. जाटाचे फौजेचे वर्तमान आलें. भिंडेसच आहे. भिंड अद्यापि खाली जाली नाहीं; आणि सुजादौलाची फौज अनुपगीर उमरावगीर वगैरे दाहा हजार फौज जाजमऊचा घाट उतरून कनोजेस येऊन आगऱ्याचे रोखे कूच केला. मग कोठेहि जात. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is a report about the conjoint movements of the Jats and Shuja-ud-daula into Maratha territory.*

No. 227] [1768?

पुरवणी श्रीमंत बापू स्वामी.

शहर खराब; जाटाणी जातेसमई निराश्या जाणून लुटिलें. यास्तव लहान थोर रयतीची दिलबारी करून सत्वरीच कौले लाऊन माहालानची ठाणी .बसवावी लागतात. स्वामींचे प्रतापेकडून सर्व कार्यभाग होईल. परंतु राजश्री रामाजीपंत व रामजीराऊ थोरात खटे जाले; म्हणतात कीं आम्ही खावंदाचे कार्यभागास रात्रंदिवस मेहनत करितों की श्रमसाहये खावंद कृपाळु होऊन करतील. आम्ही श्रमेकरून स्थळें घेतो त्याचें कामकाज आमच्या हातून घेऊन लौकिकास अधिकोत्तर वाढवितील. ते आम्ही मरावे मारावे आणि भलताच मामिलत करून रसद देतो. खावंद त्याजवर कृपा करितात. त्यास त्यांचा हेत आहे कीं च्यार रुपये माहालचे घेणे जाले तरी आम्हांसच आज्ञा केलिया सरकारकिफायेत आणि साहेब नक्षहि ऐसी दोन्ही कार्ये करीत जाऊं. ऐसा अम्हाजवळ उभेयतानीं परिहार सांगितला तो सविस्तर सेवेसी श्रुत होय. थोरातांचे पथक केवळच थोडे. उभयेतांचे सामान समानपक्ष असते तरी फार मुलूक सुटला असता. या प्रांती दर ठाणियास जाटाकडील वगैरे मवासे ठाणीं याणी मातबर जमाव व सरंजाम पोख्ता. त्याजकरितां इलाजें तजविजेणे कार्य करावें लागते. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*A mutilated paper addressed to Sakharam Bapu describing the troubles created by the Jats.*

---

No. 228] [1768

श्रीमार्तंडभैरव

स्वामीचे सेवेसी सा। नमस्कार विनंती उपर श्रीमंत राजश्री माहादजी बावा सिंदे यानी श्रीमंत मातुश्री सकुबाई सिंदे यास श्रीगोंदियात स्वहस्ताक्षरी करार करून येक लक्ष सवा सततीसा रुपयेची नेमणूक गाव करून दिल्हा व त्याची याद सेवेसी पाठविली आहे हे पावलियाचे उतर पा। हे विनंती.

¶*Mahadaji Sindia assigns a village in pargana Shrigonda towards the maintenance of Sakhubai Shinde, wife of Jayappa.*

No. 229] [30-1-1769

पौ छ २ जिल्कांद तिसा
फाल्गुन सदरहू प्रो पत्रे
लिहिणे

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बाळाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

पो. माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. राघो राम हे राजश्री माहादजी सिंदे याचे चाकर असोन त्याजवरच फौज घेऊन चालोन आले. त्यास लढाई होऊन राघो राम मारले गेले. त्याजकडे महादजी सिंदे याचा हिसेब व पैका येणे व हरामखोरी केली सबब

| | |
|---|---|
| बाबूराव कासी व राघो राम याचे घर बागणीनजीक इसालमपुरी आहे. कलम १ | नानाजी विठल पालेकर याचे घर चांभारगोंद्यांत आहे कलम १ |

येकूण दोनी घरें पत्र पावतांच जफ्त करवणे. सदरहू दोही घरातील वस्तभाव जरा+बाजरा कोठे तफ१रीक होऊ न देणे. दोहो घराची जफ्ती जलदीनें करणे. जाणिजे छ २१ रमजान सुा तिसा सितैन मया व अलफ बहुत काय लिहीणे हे विनंती.

¶*Peshwa Madhavrao orders the confiscation of the property of Ragho Ram who marched against Mahadji Sindia, his master, but suffered death in the affray.*

---

No. 230] [4-2-1769

पोष्य छ २८ सवाल
तिसा सितैन माघ मास

श्री

श्रीमंत राजश्री बाळाजीपंत नाना स्वामीचे सेवेसी

पौष्य विश्वासराव लक्ष्मण सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २६ रमजान मुा झासी वर्तमान येथास्थित असे विशेष. आलीकडे स्वामीकडून पत्र येऊन सांभाल होत नाहीं तेणेकरून चित सचिंत असे. तरी याप्रो निष्ठुरता न करावी. आम्हास सर्वप्रकारे आधार स्वामीचा दुसरा अर्थ आपल्यासीं नाहीं. सर्वस्वे आमची बाजू दरबारी आपण राखिली, त्याचा विसर पडेल येसे

+ यत्किंचित्. १ अफरातफर.

होणार नाही परंतु समयोचित पैका तेथे न्यावयाकरितां गैरमर्जीचा अर्थ ध्यानात असलिया क्षमा करून पार पाडणार आपणच आहेत. पैक्याटक्याची तजवीज येक दोन वेळ केली तितक्याच संधींत जाट वगैरे शत्रू याची दुंडी मागती साल मारी होऊन प्रांतात गडबड जाहाली. राजेरजवाडे यानी फितूर करून अमलांत खलेल पाडली. फौजा या प्रांती आज दोन अडीच वर्षे न आल्या. यामुले मवास वगैरे याणी दंगा करून हा प्रकार केला तो अर्थ लिहितां विस्तार दिसतो. फौजाची मार्गप्रतीक्षा करितां दिवसगत लोटली. अद्यापहि विलंबच दिसतो. येकवेल फौजासहित सरदार येऊन मवासाचे पारपत्य होते तरीच स्थित राहाती. धामधुमेमुळे खर्चाखाले कर्जाच्या पेचात बहुत आलो. रसदेच्या येवजाच्या रवानगीस येशी नानाप्रकारे संकटे पडत गेली. वोडसे दतियेकर याजकडून-हि खंडणीचे येवजी पैकाटका आला नाही. वोडसेकर राजे हाटेसिंग सरदारानी स्थापिले होते त्यास अष्टभया त्याचे भाऊबंद याणी गमनीपण करून राज्यास न दबता ग्रहभेदेकरून हटेसिंग राजियास काढून देऊन वोडशाची जागा बलाविली आहे. पाचसात हजार बरकंदाज व काही स्वार येसे जमा करून दुसरा राजा स्थापणार. येशा रांगडियाच्या नजरा फिरोन गेल्या आहेत. दक्षणी फौजाची दहशत नाहीं यामुले मनमानेसारिखी वर्तणूक करितात. देशाकडील फौजाची वरतन पाहाता आपसामध्ये राज्ये वाटू लागले. नाही तर पहिल्यापासून येथील इतल्याखेरीज राज्याची स्थापना होत नव्हती. येथून वोडसे दोकोसावर, तेथील प्रकार या रितीचा. हटेसिंग पलोन दतियास गेला. त्याणे दतियेकर सामील करून दंगा करावा या विचारात आहे. वोडशांतील नूतन हरामखोर हेहि धामधुमेस चुकणार नाहींत. सांप्रत समीपच्या दुंडीमुलें रात्रंदिवस जपावे लागते. हे येक प्रकार अधिकोतरच जाला. येसी संकटावर संकटेच आहेत. फौजाची रवानगी या प्रांतास न होये या गोष्टीस आमचा (दुसरा बंद गहाळ).

¶*Vishvasrao Lakshman pleads his inability to send amounts of revenue from his province owing to the ravages of the rebellious Bundela Chiefs. He makes an appeal to Balajipant Nana to send troops and restore order.*

---

*No. 231*] [*21-3-1769*

पौ छ २७ जिलकाद फालगुन मास

**श्रीशंकर**

श्रीमंत राजश्री नाना स्वामी-
चे सेवेसी

पोष्य रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १२ जिलकाद मुाा मौजे पंचगूस गोदा उतरतीर यथास्थित

असे विशेष. श्रीमंतानी आमचे स्वारीकडील लोकास खर्चास चालीस हजार रुा देविले आहेत. त्याची वरात आलाहिदा तोफखाने याजकडील कारकुनाबरोबर पाठविली आहे. त्यास सदरहू यैवजपैकी तोफखान्यास वीस हजार रुो देविले आहेत त्याप्रो त्यास द्यावे. बाकी वीस हजार रुो राहिले ते रा सिदापासेट वीरकर यास उच्चापतीचे यैवजी देविले आहेत त्यास द्यावे. येणेप्रो चालीस हजार रुा तूर्त पावत ऐसे करावे. वहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Ramchandra Ganesh and Visaji Krishna request Nana Fadnis to make payments due to the arsenal and to Sidapaset Virker out of the sum allotted by the Peshwa for their campaign.*

---

*No. 232*] [*19-4-1769*?

छ १४ जिल्हेज

## श्रीशंकर

यादी गोहदकर राणा छत्रसिंग यास ताकीद पत्र कीं, कपूरसिंग गुजर जमीदार सरकारचा आमल सालबसाल ता राजश्री सिवाजी विठलराऊ व राजश्री बहिरो अनंत याजकडील आमलाचा पैका सरकारांतून देऊन रुजू असतां तुम्ही सन समानांत राजश्री बहिरो अनंत याजकडील तालुके नुराबाद वगैरे मुलुक जबरदस्तीनें घेतला, तेव्हां गुजर मजकूर यांसी दबाऊन इमान प्रमाण देऊन नुराबादेस भेटीस बोलाविलें. त्यास त्याणें आपला पुत्र गोपालसिंग व रामपंत दिवाण यैसा भेटीस पाठविला त्यास तुम्ही दगा करून धरिलें. पागा वगैरे सरंजाम त्याचा सर्व लुटून घेतला, दोघास कैदेत घातलें, त्यास रामपंत कारभारी कैदेंत मृत्य पावला. त्याचे पुत्रास तसदी देतां यैसें हुजूर विदित जालें. यैसियास कपूरसिंगाकडे तुमचा लांछर्या काये असे! हालीं हें पत्र सादर केलें असे व या कामास राजश्री कारकून व हुजूरे पाठविले आहेत. तरी कपुरसिंगाचे पुत्रास वस्तभाव, घोडीं, उंटें वगैरे सुधां सोडून देणे. फिरोन बोभाट येऊं न देणें म्हणून पत्र द्यावें.

छ ११ जिल्हेज.

¶*Orders are issued to Rana Chatrasing of Gohad to release from custody the son of Kapursing Zamindar of Nurabad.*

---

+ भानगड.

No. 233] [14-5-1769

पो छ ८ रबिलावल

सन सबैन

श्रीभाप्रसन्न

श्रीमंत राजश्री बालाजी पंतनाना

स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिंबकराव शिवदेवें मुकाम भोवरासे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ ७ माहे मोहरम जाणून स्वकीये कुशललेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत दिवस जाहाले स्वामीचे पत्र येऊन सांभाल जाहला नाहीं, यास्तव चित्त उदास आहे तर ऐसे नसावें. सदैव पत्रद्वारें आनंदविलें पाहिजे. यानंतर दोनच्यार पत्रें सेवेसी लिहिलीं परंतु येकाहि पत्राचे उत्तर आलें नाहीं हें अपूर्व आहे. आम्ही तों आपलें ध्यान निरंतर करीत आहों. सर्व प्रकारें आमची चिंता तुम्हास आहे. वरकड इकडील वर्तमान तर शिंदे होळकर उदेपुराकडे आहेत. उभयतांचे चित्त शुद्ध नाहीं. इतक्यांत राजश्री रामचंद्रपंत तात्या आले तर उभयताचें रहस्य होऊन सरकार कामें होतील. जाट देवाज्ञा जाहाला, कळावें.[1] आम्ही च्यार मास या प्रांतें राहून गुदस्तां अहिरानी व बुधले यानीं दुंडीकरून हरामखोरी केली होती त्यांचें पारपत्य करून ठाणीं बाधोन व दतिया वगैरे घेऊन राजश्री धोंडो दत्तात्रय यांचे जाहगिरीचीं होतीं तीं त्याचे कमाविसदारांचे स्वाधीन केलीं. फौजा या प्रांतांत आल्या म्हणजे आम्हीहि त्यांस सामल होऊं. उपरांतिक होईल प्रकार तो सेवेसी लेहून पाठऊं. सदैव आलिया माणसांसमागमें पत्रद्वारें सांभाळ केला पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हें विनंती.

¶*This letter of Trimbak Shivdev refers to the differences between Sindia and Holkar and the death of Jawahirmal Jat.*

---

No. 234] [16-5-1769

पो छ ७ रावल

सन सबैन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बालाजीपंत नाना

स्वामीचे सेवेसी

पोष्य माधरोव[2] सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ताा छ ९ मोहरम मुकाम किले मल्हारगड नजिक कुरवाई येथें आपले

---

१ ओढेकर. २ ओढेकर.

कृपेंकरून संतोषरूप जाणून, स्वकीये कुशल लेखन करीत असावें विशेष. मालवे प्रांतीं आलों तों येथें माहलोमाहलीं भिला भुम्याचे व रागडे गिराशे यांचे दंगे यामुळे दरोबस्त माहालांची खराबी. कांहीं दिवस माहली राहून बंदोबस्त केला. तीर्थस्वरूप राजश्री त्रिंबकराव नाना अगोधरच भोवरासे प्रांती आले होते. इकडेहि आहीर व बुंधेले मवास यांचा दंगा, गुदस्तापासोन दुंडी करून मुलकाची खराबी केली. यास्तव तीर्थस्वरूपानी आम्हास बोलाविले, तेव्हां हे प्रांती आलों. येथे आल्यानंतर दोन्ही पतके येकत्र होऊन मवासांचे पारपत्य केले. दोन गढ्या मातबर अडचणींत होत्या त्या घेऊन, मुकाम मजकुरास आलों. राजश्री माहादजी सिंदे राणे रतनसिंग याचे साह्यास उदेपुरास गेले. मागाहून राजश्री तुकोजी होलकर दोन च्यार हजार फौजेनसी गेले. वरकड त्यांची फौज व राजश्री नारो गणेश खेचीवाड्याचे मेडावर आहेत. राजश्री रामचंद्र गणेश नर्मदातीरास आल्याचे वर्तमान आहे. हे प्रांतीं आले म्हणजे त्यांसी जाऊन सामील होऊन स्वामीकार्ये करून. सरदारी वोढगस्त. भिला भाबराचे दंग्यामुळें माहाल खराब. यैवजास ठिकाण नाहीं. कर्जावामासी गाठ आमचा सर्व प्रकारें निर्वाह करणार आपण आहेत. सर्व प्रकारें भरवसा आपला आहे. वरकड दादोबा विनंती करतील, त्यावरून कळो येईल. सदैव पत्रीं सांभाळीत जावे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*In this letter referring to the chaotic conditions in Malwa and Bundelkhand where Maratha officers found it difficult to collect revenue Madhaorao Shivdev reports Sindia to have gone to Udaipur to assist the Rana where he was later to be joined by Holkar.*

---

*No. 235*] [*21-5-1769*

नकल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारयणराव बल्लाळ यासी माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. सखुबाई व सगुणाबाई व भागार्थीबाई सिंदी यांचा सरंजाम जफ्त केला. भागीर्थीबाई आपली वाटणी घेत नाही यास्तव भागिर्थीबाईची तक्षीम जफ्तीत राखून सखुबाई व सगुणाबाईचा सरंजाम तक्षिमे प्रा मोकला करून मोकलिकीची पत्रे आलाहिदा सादर केलीच आहेत. तरी सखुबाई व सगुणाबाईचे तक्षिमेच्या

सरंजामाची तुम्ही वसूल काय घेतला असेल तो सिलेदाराचे रुजुवातीने हुजूर लेहून पाठवणें. जाणीजे छ १४ मोहरम सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

*¶Madhavrao Balal issues instructions to his brother to restore to Sakhubai and Sagunabai their confiscated property. Sagunabai was the wife of Jotyaji and Bhagirthibai of Dattaji Sindia.*

---

*No. 236]* *[27-5-1769*

पैाा छ १४ सफर सबैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती शेवक जगंनाथ नारायण मुकाम किले आसेर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ २० माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेवरून सेवकाचे व किलेमजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साल मजकुरी सव-गाईची आफत पडली येणेकरून रयेत खराब व सालाबाद आबराईच्या निमे भाग तीन हजार सरकारांत येतो त्या प्रोाच तीन हजार रयेतीस हिसा येतो त्यास साल मजकुरी आंबराई बिलकूल गेली. हे आफत रयतीचे माथा पडलियानंतरी राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री विसाजी कृष्ण यांजसमागमें हुजरून फौज देऊन हिंदुस्थानांत रवानगी केली. त्यास मारनिले आसेर परगण्यात येऊन बारा मुकाम करून (पहिले प्र) * * * बहादरपुरातर्फेत त्रिवरतापीतीरीचा * * * * * * * पधरा अठरा हजार * * * * * * * जे ते जैनाबादरावेर आसेर * * * * * * * * कही करून येणार त्यास बहादरपुरा * * * * रयतीनें कडबी झाडून विकली. दाहा वीस पुले बैलाकरितां ठेविली ते नेल्याने आवतीचे बैल वाचत नाही. तेव्हां रयेत तजावजा होईल. पेस्तर सालची लावणी बुडेल, याकरितां चिठ्या कराव्या त्या आम्हावर कराव्या म्हणोन विनंती केली. त्या प्रोा कबूल करून चिठ्या केल्या तेव्हा शहराहून कडबी विकत घेऊन दिल्ही. पागा व तोफखाना मिळोन अडीच हजार दिल्ही. तेथून कूच करून लालबागात राहिले. येक मुकाम करून पुढे जावे त्यास राजश्री नारोशंकर वगैरे किरकोल मिळोन दोन तीन हजार फौज मागे राहिली. त्याविसी पांच मुकाम लालबागांत जाले. तेथून चिठ्या जाल्या त्याप्रोा दोन हजार अडीच हजार विकत घेऊन दिल्ही. तेथून कूच करून व सिराबाद बोरीवर गेले तेथे जंगल यास्तव जैनाबादेवर

कही केली. तेथून सिवलेवर मुकाम केले. तोफखान्याचे बैलास कही नाही याकरितां बैलास कडबीची तर्तूद करून ठेविली होती. फौज मुकामावर येताच चिठ्या मनस्वी जाल्या. तोफखाना व पागास किरकोल किरकोल दिल्ही व फौजेने गावगना आसपासचे गावची कडबी होती ते झाडून आणिली असतां दुसरा मुकाम करून सिवलेवर राहिले. गावात रयेतीचे घरांत सिरोन कडबी व भूस जे असेल ते जबदस्तीने न्यावें हा मनसबा केला तेव्हा आम्ही तेथून निघोन किल्यास आलो. मागाहून रात्रौ चिठी गावची आली की घरांत सिरोन कडबी व भूस होते ते नेले. याखेरीज फौजेचा मुकाम जेथे जाला तेथून दोही बाजूस तीन तीन कोसी गांव होते. त्यास रखवालीस राऊत आणिले. त्यास दररोज दरावती खुराक रुा अर्धा व रोज रुा येक येणे प्राो हा खर्च व भेटी बिनी व पायेमाली मौजे सिवल मातबर बागायेत तेथे बागात फौजेचे मुकाम जाले, तेणेकरून दरोबस्त बागायेत लुटली गेली * सालमजकुरी सर्व प्राा रयतीची हलाखी आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Jagannath Narayan describes to Nana Fadnis the woeful condition of the ryots in his district as a result of the passage of Maratha troops marching northward under Visaji Krishna and Ramchandra Ganesh and Naro Shankar.*

---

*No. 237*] [*31-5-1769*

पो छ १२ रबिलावल सबैन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामींचे सेवेसी

पोष्य शिवाजी विठल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल तागायत छ २४ मोहरम मुकाम ग्वालेर जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे. बहुत दिवस पत्र येऊन सांभाल होत नाहीं तरी ऐसें नसावें. सदैव पत्र पाठऊन सांभालीत जावें. यानंतर इकडील वर्तमान आम्ही या प्रांते आल्यास दीड वर्ष जाहालें. ग्वालेर प्रांतीं जमीदार लाहाण थोर यानी बहुत लबाड्या केल्या, त्यांचीं थोडींबहुत पारपत्यें केलीं. परंतु विना गोहदकर जाट व चमलेपारचे थोरले जाट यांचे पारपत्य केल्याखेरीज इकडील बंदोबस्त होतो ऐसे नाहीं. रतनसिंग जाट वारला, तेसमई सरदार मालव्यांत आले होते ते समईहि होतों. आम्ही बहुता प्रकारें लिहिले परंतु येणें न जाहालें. आम्ही थोडीबहुत खटपट आपल्या सामानानरूप केली, परंतु मागून उपराळा न होयें ऐसें जाणून सद्धक

करून माघारें चमलेपार लाविले. प्रस्तुत आम्ही ग्वालीरीस आलों असो. राजश्री रामचंद्रपंत तात्या फोजेसह आले आहेत. अत:पर मातबरच कामें होऊन येतील. समीप आल्यास आम्ही त्याजकडे जाऊं. परंतु येक छावणी आमची जाहाली. आतां यांचे आगमनामुळें दुसरी छावणी करणें प्राप्त जाहाली. छावणीमुळें बहुत पेंचांत आलों. पूर्वीपासून सरदारी वोढगस्त. कर्जासी समध आहे हें सविस्तर आपणांस निवेदन केलें आहे. पूर्वीपासून या सरदारीची उभारणी आपले घरची आहे हें आपण जाणतच आहे. पुढेंही सर्व प्रकारें आश्रा आपलाच आहे. उपरोधिक ल्याहावेसे नाहीं. आणकईचे मसलतीची मखलासी आपले हातची आहे. सा महिनियानी रुपये द्यावयाचा करार त्यास दीड वरिष जाहालें. कर्जदारानी बहुत गवगवा केला आहे, यास्तव तो ऐवज सत्वर देविला पाहिजे. •वरकड कितेक विनंति करणे ते राजश्री लक्ष्मण खंडेराव व अनंदराव विनायेक करितील ती मान्य करावी. माहालसमधी वगैरे जावसाल देसचे बहुत आहेत, त्याजविसी विनंति मान्य करून सर्व बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. सर्व सरदारीचा अभिमान आपणास आहे, विस्तारे ल्याहावेसें नाहीं. सदैव पत्रद्वारें सांभालीत असिले पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंति.

*¶Shivaji Vithal Vinchurkar to Nana Fadnis, writing from Gwalior, reports the aggressions of the Jats and the consequent embarrassment of his finances.*

---

*No. 238]* *[3-6-1769*

श्री

राजश्री रामचंद्रपंत व विसाजीपंत गोसांवी
यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो तुकोजी होळकर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें विशेष. आम्ही कोट्याकडे गेलो, सिंदे उदेपुरास आले, हे तपसिले वर्तमान पेशजी लिहिलेच आहे. येथे आल्यावर राजश्री माहादजी सिंदे यांसी सांगितले जे तुम्ही अद्यापि मोरचे लाविले नाहीत, दिवस पावसाला आला. पुढे जाटाचे राजकारण उपस्थित जाले तर दोन हजार फौज तुमची व दोन हजार आमची येथे ठेऊन कूच करून जाऊ. उदेपुरचा घासदाणा मना जाला म्हणजे सहजात काम होईल, मुल्क जमींत येईल. राजश्री रामचंद्रपतहि आले. ते व आपण येकत्र होऊन जाऊ यैसे

सांगितले, ते त्यांच्या चितास आले नाहीं. तुम्हीं इकडे याल, जबरदस्तीने देखाल ते कराल यैसे मनांत आणून व यैवजास ठिकाण नाहीं व आमचा भाऊपणा राखावा, येअर्थी आम्हास सांगितले जे अरिसिंहाचे राजकारण करावे. आम्ही सांगितले जे तुम्ही राजश्री त्रिंबकजी इंगले यांचे विद्यमाने बेलभंडार आरिसिंहास दिल्हा त्याचे विद्यमाने करावें, अथवा मिरजा रहिमबेग याचे विद्यमाने मामलत केली त्यास सांगून करावे. तेव्हा आणप्रमाण केली जे ते गोष्ट राहिली. तुम्ही करणें. तेव्हा आम्हापासी वकील त्याचे होते ते गावांत पाठऊन जाबसाल आणविला. तेव्हा सिंदे यानी करारयाद करून दिल्ही. पंचवीस सरकार व दाहा सरदार येकूण पसतीस ठरले. यादी आम्ही गावात पाठऊन करार केला. मागती बदलले. दुसऱ्याने पुन्हा आणखी मुदा घातला त्याचीहि तडजोड केली, त्यास कायेम जाले नाहींत. येक गोष्ट येक घटका नाहीं. तो विस्तार पत्री कोठवर लिहावा? निदान त्याचे आमचे कोणे तरेने ठीक पडले नाही. मग आम्ही वैशाख वद्य १३ त्रयोदसीस कूच केले. मजल दरमजल आपले फौजत येतो. आपण कोणे ठिकाणी आहेत, भेटीचा योग कोठे होईल हे तपसिले लिहावे. दोन जोड्या येथून पाठविल्या आहेत परंतु येकहि जाब येत नाहीं. तर तपसिले ल्याहावे. रा छ २७ माहे मोहरम बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Tukoji Holkar writes to Ramchandra Ganesh Kanade and Visaji Krishna Binivale, communicating his plans and expressing his disagreement with Mahadji Sindia, with whom he finds himself unable to co-operate. Trimbakji Ingle is the father of Ambaji.*

---

*No. 239*] [*8-6-1769*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

पोष्य दादो मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाइत ज्येष्ट शुद्ध ९ जाणोन स्वामीचे कृपेकरून येथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान तर शिंदे उदेपुराकडे गेले. होलकर कोट्याकडे गेले यास्तव सिंदे श्रीमंतास लिहीत गेले, त्याजवरून आज्ञापत्रें येत गेलीं जें उभयेतां येक

करणें. त्याजवरून होळकर यास येथें आणिलें. बहुत प्रकार सांगून पाहिलें परंतु कोणेंहि प्रकारें ठीक पडलें नाहीं. तूर्त सरकारचा ऐवज येत होता तो घेणें त्याचे मर्जीस आला नाहीं. येविषयीं तपसिलें वर्तमान श्रीमंतांचे पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल, व चिरंजीव राजश्री गबाजी सांगेल त्याजवरून कळेल. सारांश आम्ही स्वामीचे आहों. सर्व प्रकारें भरवसा स्वामीचा आहे. तर सर्वदां पत्रीं सांभाळ करावा. व चिरंजीव तेथें आहे. परामृश केला पाहिजे. तेथून पत्रें वरचेवर स्वामीस येतीं परंतु श्रीमंत वराड प्रांतीं; तिकडे प्रसंग पडला. पुण्याकडे कोणी आले नाहीं. चिरंजीव विनंती करतील तें श्रीमंतांची मर्जी पाहून समजाऊन सांगून उत्तर पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हें विनंति.

¶*Dado Malhar reports to Nana that the differences between Sindia and Holkar have not yet been made up and that Sindia was encamped near Udepur.*

---

*No. 240*] [*11-6-1769*

पो छ २० सफर जेष्ट मास नकल

छ मजकूर

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव बल्लाळ यांस माधवराव बल्लाळ प्रधान आसार्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिंहिणे विशेष. मौजे करदी पा नेवासें दरोबस्त भागिरथीबाई सिंदे याजकडे पेशजीपासोन आहे. त्याची जप्ती गुदस्त केली होती ते मोकळी करून पत्र लिहिले आहे. तरी मौजे मजकुरची जप्ती उठवणें. जप्तीमुळे वसूल घेतला असेल तो याचे गुजारतीने रुजू करून लिहिणे. याजउपरी मौजे मजकुरी दखलगिरी न करणे. जाणिजे. छ ६ सफर सुा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहीणे हे आसीर्वाद.

¶*Madhavrao Ballal restores the village of Karadi to Bhagirthibai Sindia, wife of Dattaji.*

---

*No. 241*] [*12-7-1769*

पौ छ ११ जाखर सबैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना फडनीस स्वामीचे शेवेसी

सेवक धोंडो दत्तात्रय सां नमस्कार विनंती येथील क्षेम ता आषाढ शुध्द ९ मुकाम नजीक भवरासे जाणन स्वकीय कुशललेखन करावयासी आज्ञा केली

पाहिजे विशेष. बहुत दिवस जाहाले परंतु आपणाकडून पत्र येऊन सांभाल होत नाही. तरी येसे नसावे. सदैव पत्र पाठऊन परामृश करीत आसिले पो. यानंतर इकडील राजकी वर्तमान तरी भुपालची खंडणी जाहाली व रातगडची खंडणी जाहाली. प्रस्तुत कुरबाईचे बोलणे लागले आहे. होलकर नजीक आले आहेत. याच्या भेटी जाहालियावर मनसबा होईल तो लिहून पाठऊ. सिंदे उदेपुरास आहेत. सेवेसी कलावे म्हणोन लिहिले आहे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ करीत असिले पाहिजे हे विनंती.

¶*Dhondo Dattatraya reports that the work of realizing tribute was being pushed on. Sindia is encamped near Udaipur while Holkar is soon expected, writes he.*

---

*No. 242*] [*25-7-1769*

छ २१ रबिलोवल आषाढ सन सबैन.

**श्री**

यादी भुपालकराकडील ताकीदपत्रे सुा सबैन मया व अलफ.

१ रामचेंद्र गणेश व विसाजी कृष्ण यास पत्रे की तुम्हास तीन पत्रे पाठविली त्याप्रा भुपालकराचा तालुकियात उपद्रव केला नसल. घेतला वसूल माघारा दिल्हा आसल. सांप्रत समसरखान हजुरून तुम्हाकडे पाठविले आहेत. मारनिलेनी हजूर नजरणा ठराऊन ऐवज सरकारात दिल्हा आहे. तुम्ही कोणे गोष्टीचा उपद्रव न देणे. ऐवज घेतला आसल तो क्षेपनिक्षप माघारा देणे म्हणून पत्रे.

भुपालकराचे तालुक्यास उपद्रव न लावणे म्हणून पेशजी तुम्हास येक दोन पत्रे सादर केली आहेत. हाली समसेरखान तुम्हाकडे आले आहित तर कोणेविसी उपद्रव न लावणे म्हणून पत्र.

१ नजरणाचा ऐवज सरकारात पावला म्हणून भुपालकरास पत्रें. समसेरखान मा आलीयारखान याजकडून येकेवीस हजार रु. पोता पावले म्हणून पत्रे.

येकवीस हजार रुपयाचे कापड सरकारात घेतले त्याचा जाब द्यावा.

येकूण दोन पत्रे देणे.

¶*The Peshwa sends instructions to Ramchandra Ganesh and Visaji Krishna to return the amounts recovered from the territory of the Bhopal State as the prince had readily paid the tribute levied.*

No. 243] [27-7-1769

पो छे २८ राखर
सबैन श्रावण.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती शेवक गणेश विश्वनाथे[१] व विनायक मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ताा छ २३ रोवल मुकाम टक प्रांत खेचीवाडा स्वामीचे कृपावलोकनें शेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी उभयेता सरदार हुसंगाबादेस नर्मदा उतरोन भूपालच्या तालुक्यांत आले. भूपालची खंडणी एक लक्ष जाहली. रातगडची खंडणी पंचवीस हजार जाली. एकून दोनी मिळोन सवा लक्ष खंडणी जाहली. वसूलहि आला. तेथून दरमजल कुरवाईस आले. कुरवाई-कराकडे बाकी येणे होती त्याचा वसूल श्रीमंत राजश्री दादासाहेब याणी राजश्री त्रिंबकराव सिवदेव याजकडे द्यावयाचा करार करून त्रिंबकराव सिवदेव याजपासून ऐवज सरकारात घेऊन वोली त्याचे हवाली केल्या होत्या, त्या वोली आजपावेतो त्रिंबकराव याजवल होत्या. त्यास त्याचे बाकीचा फडशा करून वोली सोडाव्या ऐसा ठराव जाला आहे. राजश्री बाळाजी गोविंद बुंदले सेर मोहुच्या मुकामी भूपाल तालुक्यांत येऊन भेटले. अद्याप मामलतीचा ठराव जाहला नाहीं, परंतु लवकरच मामलतीचा फडशा होईल. रसद सात लक्ष पावेतो सरकारचे बोलण्यात आहे. ठरता कोठपावेतो ठरेल ते पाहावे. तेहि पाच पावेतो बोलतात. राजश्री तुकोजी होळकर याणी सोपारास खेचिवाड्यात नारोगणेश याजवळ फौज ठेऊन आपण दोन हजार फौजेनसी सडे उदेपुरास गेले होते. त्यास तेथे तुकोजी होळकर याणी राजे आरसी आतील याचा पक्ष धरला व महादजी सिंदे याणीं बाहेरील राजे रतनसिंग याचा पक्ष धरिला. तेव्हां उभयेतां सरदाराचे न बने. याजकरितां तुकोजी होळकर तेथून निघाले. दरमजल येऊन भवरासे येथील मुकामी भेटले. नारो गणेश सोपारासच फौजसुधा आहेत. त्याणी खेचीचे खंडणीचा ठराव केला होता, परंतु वसूल न होय याजकरितां सरदाराची छावणी खेचिवाड्यांत होईल. खेचीचे पारपत्य जाहलियावर पुढे जाटवाड्यांत होळकर सिंदे सुधा जावे हा मनसबा आहे. महादजी सिंदे उदेपुरासच आहेत. हली ऐकण्यात आले आहे कीं राजे आरसी याजकडे उदेपूरची खंडणी चौसष्ट लक्ष करार जाली. याखेरीज रतनसिंगास सवा लक्षाचा

---

१ पैवस्ती नाना फडणिसाच्या हातची. २ बेहेरे.

पटा व महादजी सिंदे यास पाच लक्षाचा पटा द्यावा या प्रमाणें करार जाहला म्हणोन वर्तमान आले आहे. परंतु सरकारांत लिहिले आले नाहीं. येथून कारकून पाठविला आहे त्याचे लिहिले आलियावर लेहून पाठऊं. फौजेची खडी गणती छ २४ सफरी रातगडचे मुकामी घेऊन उभयेतां सरदारानी श्रीमंताचे लाखोट्यांत घाळून आलाहिदा तेरजे पाठविली आहेत त्यावरून विदित होईल. मागाहून होईल ते लेहून पाठवीत जाऊं. आज्ञेप्रमाणें वर्तणूक होईल. राजश्री विश्वासराव लक्ष्मण याचे कागद झासीहून आजच आले. आठाचोहो दिवशी येऊन भेटतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ganesh Vishvanath and Vinayak Moreshwar send to Nana Fadnis a detailed report of the activities of Sindia and Holkar after they had crossed into Malwa. Bhupal, Ratgad and other minor places have, the writer says, agreed to pay the tribute and that unpleasantness has marred the cordial relations between Sindia and Holkar, the two having espoused the cause of rival claimants to the Udaipur Throne, from whom a tribute of sixty-four lacs was fixed to be recovered.*

---

*No. 244*] [*30-9-1769*

पौ छ ६ जाखर आस्विन

**श्रीशंकर**

**श्रीमंत राजश्री तात्या व बाबा**

**स्वामीचे शेवेसी.**

पौ कासी नरसी कृतानेक साष्टांग नमस्कार विनती. येथील क्षेम जाणौन स्वकीये कुशललेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. सरकारात हुंडी पहिली पाठविली होती त्यामध्ये आगरेयाची हुंडी रुपये १३९१ तेरासे येक्याणव होती. ते चोरीस गेली. त्याची पेटा आणून सेवसी पाठविली आहेत. रुपये तेरासे येक्याणव रुपये घ्यावे. वीस पत्रे व कासीद सागरास च्यार महिने पाठविले तेव्हा मोठे संकटे आली. कलेले पाहिजे. झासी प्रांते मोठी धूम लुटावयाची हाकिमाने माडिली आहे. याचप्रमाणे सर्व जागां आहे. कोणास इतबार नाही. मामलत न राहे. आंतरवेदीत पठाण रोहिले याणी निकडीने वसूल घेत आहेत. आधा रुपया खरिफाचे जमिनीस घेतला. मोठी धूम सर्व जाहाली आहे. काये

आंतरवेद काये यापार येकसेच जाहाले आहे. त्रिंबक राम पावलेच आसतील. पहिला यैवज पाठविला आहे. उतर अद्याप न आले. बहुत काये लिहावे? कृपा करीत जावी. मिती आश्विन सुध १ हे विनंती.

¶*Kasi Narsi in forwarding the amount of his charge describes the general disorder created by the Pathans and the Rohillas in the Doab.*

---

*No. 245*] [*2-10-1769*

पौ छ १२ रजबू
सन सबैन.

**श्री**

सेवेसी गणेश विश्वनाथ व विनायेक मोरेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १ जमादिलाखरपर्यंत मुा। राघोगड पा। खेचीवाडा वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविले ते पावले. पत्री आज्ञा की, वरचेवर पत्रे पाठवीत जाणें. ऐश्यास, च्यारपाच पत्रे पेशजी शेवेसी रवाना केली आहेत. आताहि आज्ञेप्रो। आठादाहा दिवसी पत्रे रवाना करीत जाऊं. इकडील वर्तमान राघोगडास मोरचे लाविले आहेत. मोर्चे लाविल्यानंतर पाचसाहा दिवसी राजा होलकराकडे आला आहे. सल्याचा मजकूर पडला आहे. लवकरच सला होईल. राजश्री तुकोजी होलकर फौजसुधा बरोबरच आहेत. येथील कारभार उरकला म्हणजे जाटवाड्यांत जाणार. राजश्री माहादजी सिंदे उदेपुरास होते, त्याणी तेथील खंडणी करून, कूच करून, इकडे यावयास निघाले. खंडणी साठ लाख रुपये केले ऐसे ऐकिण्यात आहे. मागाहून सविस्तर खंडणीचा मजकूर लेहून पाठऊ. रा। बालाजी गोविंद बुंदेले याची मामलत विल्हेस लागली. पावणेसात लाख रुपये रसद घेतली. श्रीमंत राजश्री दादासाहेब याणी बेहेडा करून दिल्हा होता त्यापैकीं दोन अडीच लाख रुपये खर्च कमी करून बेहेडा सालमजकुरी करून दिल्हा, त्याची नकल आलाहिदा सरकारात पाठविली आहे त्याजवरून सर्व कलेल. मातबर कार्य येकाधे अद्याप जाहाले नाही. स्वारीसंमंधे येक लाख रुपये भुपालची खंडणी व पंचवीस हजार रातगडचीं खंडणी व सां। चंदेरी येथील पंधरा हजार रुपये इतकी कामे मात्र जाहाली. याचाहि यैवज घेतला हा सालाबादचाच आहे. नवाच असे काही नाही. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Ganesh Viswanath and Vinayak Moreshwar communicate that the Maratha forces have besieged the fort of Raghogad. Settlement of the tribute to be collected from the Raja of Udaipur and other chiefs are other matters alluded to.*

---

१ इकडील (यमुनेअलीकडील) पार.

No. 246] [3-10-1769

पो छ २ जाखर सबैन

श्री

सेवेसी नारो नरसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील वर्तमान ताा छ २९ राखरपर्येंत येथास्थित असे विशेष. इकडील सविस्तर वर्तमान कचपक लिहीतच असतो, त्याजवरून सेवेसी श्रुत होत असल. हाली येथील वर्तमान येणेप्रमाणे आहे.

आंतरवेदीत उतरून आले याजकरिता जाटाचे मामलतीस हिसका बसोन हाताचे पायावर घालोन समग्र च्यार मासपर्येंत बोलतच येत आहेत. परंतु काहीच आमलात पैका सरकारात येता दिसत नाही. हा कालपर्येंत मामलेतीस जागा नाही. ज्या कारभारात बंडाल ती गोष्ट काही सुधरत नाही. सर्व धण्याचे पुण्येकरून होऊन येईल हे प्रमाण कलम १

नवलसिंग जाटान तो सर्वासी आंतरयामी आनुसंधान बांधोन मामलतीचे बोलण दीर्घसूत्रावर पाडले आहे. नजीबखान आदीकरून पारचे रोहिले पठाणाची सुत्रे आहेत जे सर्वांनी येकत्र होऊन येक वेला दक्षणियासी लढाई द्यावी, त्यात जे ठरल ते पुढे पाहोन घ्यावे, येसा तो मनसबे घाटीत आहेत. सध्या यमुनेच घाट दक्षण तीराचे राखून जाट आहे. कलम १

पेशजी राजश्री माहादजी सिंदे याणी साफच सांगितले होते जे जाटाची मामलेत करून उपरात आंतरवेदीत उतरणे. जोपरयेंत जा-

येकदेसी मनसबा करून येकल्या सरदाराचे समत घेऊन नजीबखानाचे येकोन आंतरवेदीत आले, तेणेकरून जाटाची मामलतहि जाली नाही आण जवल कशाब(?) होता तो राहिला. याजकरिता फारच गोष्ट मनसब्यास कमी पडली. येक गायास दरशेन नाही. येणेप्रमाणे कलम. १

अंतरवेदीत उतरलेसारखे सर्वांनी येक विचार करून जाटाचे मुलुकाची जफ्ती करून मातबर ठाणी तीन च्यार होती तीहि घेतली नाहीत. बाबूराव हरि बराबर फौज देऊन जफ्ती करविली. त्यास जफ्तीचा येवज आजपर्येंत लाख दोन लाख रुपये आले नाहीत. जफ्तीचा मजकूर तर या रितीचा जाला. येणेप्रमाणे कलम १

पारचे रोहिले व आहमदखान पठाण याजकडून पेशजी वकील आले होते त्याचे बोलणेत काही थोडाबहुत पैका देऊन सरकारचा मुलुक दाबला आहे तो सोडावा, आण स्नेह करून सर्वतोपरी दोस्तगिरी करावी म्हणून त्या वकिलाबरोबर सरकारचा कारकून व होलकराकडील व सिंदेकडील बालाराव

टाची मामलत होत नाही आण तुम्ही पैलकडे जाल तेव्हा सर्व गोष्टीने मनसब्यास धका बसल आण कोणा-वरच दाब बसणार नाही. उपरांत प्रस्ताई पडाल. हाली त्याच गोष्टी रूपास आल्या. विनाजाटाची मामलत जालेखेरीज दुसरा कोणी बदत नाही. ज्यापक्षी हे जाणून न केले याचा दोश कोणास लावावयाचा? आन्वय खावंदाचे मर्जीस आलाच असल. कलम १

गाजुदीखान आले होते. सरकार काजकामात पडोन काही आपला बंदोबस्त करून घ्यावा. परंतु सध्या नजीबखानाचे व त्याचे आंतरयामी चुरस, आण सरकारकाम तरी याणी काय करणे आहे हे जाणून त्यास निरोप दिल्हा. ते फर्काबादेस पठाणाकडे जाणार. कलम १

रणजितसिंग जाटहि आजपर्यंत समागमे आहेत. पेशजी बोलत होता जे आपले जीवारामाचे बरोबर पाचसात हजार फौज व तोफा देणे. आपण अंतरवेदींत उतरून मुलुकाची जप्ती करून आमल बसऊन दाहापंधरा लक्ष रुपये मेलऊन देतो. परंतु ती गोष्ट कोणीच मान्य न केली. जलदाई करून आंतरवेदींत उतरले. याजकरिता सर्व गोष्टी बिवाडात गेल्या. कलम १

सुज्यातदौला याजकडून उमरावगीर गोसावी दोन तीन हजार व दोन कारकून येसे त्या त्रिवर्गाकडे रवाना केले. आधीं पारच्या रोहिल्याकडे गेले. तो मागाहून कोणाकोणाची पत्रे व नजीबखानाचे लिहिले गेले जे तुम्ही हारयेक गोष्टीचा तहरह न करणे. तूर्त काही चिंता नाही. दम धरून केलिया सर्व गोष्टी तुमचे मनोदयानुरूप होतील, यैसे वरचेवर लिहिले जाते. याजस्तव तिकडेहि काही गाठ पडली नाही. रोहिले व पठाण यानी साफच स्वाल-जाब केला जो सर्वानी तुमचा मुलुक दाबला आहे. त्यास आम्हीच काही आधी मुलुक सोडणार नाही. नजीबखान वगैरे यानी मुलुक दाबला आहे तो सोडतील तेव्हा आपणहि सोडू, तोपरयंत केवळ आम्ही मुलूक सोडू आथवा खंडणी देऊ ही तो गोष्ट घडणार नाही. येसे बोलोन बालाराव वगैरेयास निरोप दिल्हा. ते येथ येऊन दाखल जाहाले. पाहता अंती नजीबखानाच्या या रितीच्या कटकव्या आहेत. याचे विचारे सरकारात पैका तो न यावा म्हणजे सहजच आवघ्या गोष्टी साधतील. या रितीचे मनसबे आहेत. कलम १

सद्या सरकारफौजस पोटास नाही. कर्जहि मिलत नाही. आजपर्यंत पाचसात लक्ष रुपये कर्ज करून चालविले. बुंदेलचे मामलेतपोो तूर्त कर्जदाखल कासी नरसी याजकडून दोन लाखांच्या चिठ्या आणविल्या आहेत. परंतु त्या चिठ्या पटून पैका येता दिसत नाही. पोटाचाहि गवगवा आहे. कलम १

पलटणे फिरंगियाची येत आहेत म्हणोन वर्तमान आहे. परंतु इकडे येतो किंवा पठाणाकडे जातो हे पाहावे. येणेप्रमाण वर्तमान आहे. कलम १

तूर्त मनसबा नजीबखानाचे विचारे करून केला आहे. ज्यापक्षी जाटाची मामलत होत नाही आण आंतरवेदींत पैकाहि मिलत नाही, तेव्हा येथून दाहा बारा हजार परयेंत तुम्ही फौज पाठवणे व आपलीहि पाच सात हजार फौज दिलीस आहे ती समागम देऊन जाटाचे मुलुक दिलीपासोन आसपास आहे तो जप्ती करून जाटास जकड बसल म्हणजे सहजच मामलेत करून तहरह करील आण चौहूकडे कुफराणाहि करणार नाही, येसा इत्यर्थ करून हुजराथ पथके आनंदराव गणेश निा नारो शंकराचे व शिंदे होलकर मिलोन पाच साहा हजार फौज रवाना करीत आहेत. दिलीजवल येमुना उतरावी येणेप्रमाणे सध्या ठरावले आहे. याचा परिणाम काये लागतो पाहावा. कलम १

नजीबखान जोपर्यंत आहे तोपर्यंत पैका मिलत नाही आण कोणी सरकारस्नेहहि करीत नाहीत. हा मोठा मनाचा खोटा आहे. सर्वंकड चालकपण करीतच आहे आण होतोनाही लागलेच आहे. कलम १

जाटाचे लढाईची गोष्ट मोठी ईस्वर दिली असता मनसब्यास कोताई करून कशास जागा नाहीसा केला? जरीकरिता मानमार्ग पाहून जाटासी मामलेत केली असती म्हणजे सर्व गोष्टी सुधरत्या आण पैकाहि कार्याकारण येऊन फौजची उस्तवारी होती. आण दुसरा पोख्त मनसबा करून पैकाहि मेलता. तो मजकूर काहीच येथ नाही. राजकारणेची सुत्रे येथ अधिक आगले मसलतीस दिसत ते सेवेसी लिहीत जातो. केवळ मी आपले शाहापण दाखवीत नाही. यात सर्व पुण्ये धण्याचे कलम १

जसे वर्तमान येथे दृष्टीस पडते ते सेवेसी लिहीत असतो. त्याहीमधे स्वामीची आज्ञा सिरसा जाणून कार्याकारणच वृत लिहितो. कोणाची नालेशी लिहीत नाही. परंतु ज्यापक्षी मनसब्यात पडत जाते तेव्हां बातनी सविस्तर लिहिणे त्याची गोष्ट सहजच तपसील येतो. परंतु आज्ञा आपली मानून संकलितच मोघम आतां लिहीत आहे. याजउपरी आधिक आगले वर्तमान होईल ते सेवेसी लिहीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Narsi sends to the Peshwa a detailed report of the Maratha expedition in the North. He expresses his apprehension that the course of action pursued by the Generals on the strength of the advice of Najibkhan is misleading and ruinous. It was, he says, impolitic to penetrate into the Doab before finally crushing the Jats' power.*

No. 247] [19-10-1769?

पौ छ २९ जाखर

श्री.

शेवेसीं माहादाजी बलाल[+] साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १८ जमादिलाखर मुकाम कसबे चामारी वर्तमान येथास्थित असे विशेष. आपण पत्र छ ३ जमादिलाखरचें पाठविलें तें छ १९ रोजीं पावलें. लिहिला मजकूर कळला " तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याणी परगणे नेमावर वगैरे पंच तालुके राजश्री माहादजी सिंदे यास सरजाम दिल्हा. त्याची सनद छ २१ रबिलाखरीं नारो बलाल भुसकुटे याचे नांवें दिल्ही. त्याणी आपले तर्फेनें संताजी वाबले यास दिल्हे, त्याजकडून स्वार व प्यादे व कारकून छ १३ जमादिलावलीं माहालीं दाखल जाहले, म्हणोन नारो बलाल याचीं पत्रें येथें आलीं. ऐशास तुम्ही तेथें आहां. सरदार सर्व प्रकारें इकडील लक्षांत निखालस, म्हणोन तुम्ही वरचेवर लिहीत असतां, हे माहाल त्यानी दिल्हे कसे? व सिंदे याणी घेतले काय म्हणून? माहली आमलदार जाईतों तुम्ही याचा बंदोबस्त केला नाहीं काय निमित्य? कदाचित तुमचें कोणी न आइकत असे म्हणावें तरी तुम्ही तेथें राहून करितां तें काय? तुमचें कांहींच न चालतें, व वर्तमान वरेचवर लिहून हुजूर ल्याहावें तेंही तुम्ही न लिहिलें; तस्मात हे गोष्ट तुम्हांस कलली नाहीं. सरदारानी तुम्हांस न कलतां पत्रें घेतलींसें दिसतें. उघड माहालची गोष्ट तुम्हांस कळली नाहीं, तेव्हां ते आंतून बारीक राजकारणे करीत असतील ते कलतील कसी? त्याणी मनस्वी वर्तणूक करीत असावें, त्याचे वर्तमान लिहो नये, तेव्हां तुम्ही तेथें राहून करणे काय? असो सिंद्यानी माहाल घेऊन अमलदार पाठविले कसे याचे त्यासी बोलून माहालीं कोणी गेले आहेत त्यास माघारे आणवणे आणि जाहाल वर्तमान लेहून पाठवणे. मनस्वी वर्तणूक करावी, तुम्हास कलों नये, याचें त्याजवळ बरे रीतीनें बोलून बंदोबस्त करणें. तुम्हांस बंदोबस्त न होय असें असल्यास हुजूर लेहून पाठवणे, येथून बंदोबस्त केला जाईल, म्हणोन आज्ञा केली. यैशास नेमावर पंच माहालच्या सनदा याणी घेऊन वाबले यास पाठविले. आम्हास कलतांच आम्ही पाटीलबावासी प्रसंग केला की, अशा गोष्टी करितां तेव्हां तुम्हांजवळ राहाणें यांत आमचें स्वरूप नाहीं. त्याजवरून अमलसे गलबलले. तेव्हा बोलिले कीं, नेमावर पंच माहाल पहिल्यापासून सरंजाम आमचा. गोहदेचे सालीं दादानी आमचे गळां पडून खासगत स्नानसंध्येसाठीं नर्बदातीरचे माहाल

---

[+] फडके.

मागून घेतले ते आम्ही दिल्हे. आमचे मते याजवर त्याची सता आहे. याज-करितां ज्यास दिल्हे त्याजपासून मागोन घ्यावे हा अर्थ चितांत आणून मागोन घेतले. आतां तुम्ही धोडपेचे सालापासून पूर्वपीठिका सांगितली ते कळली. हें आम्हांस समजलें नाही. म्हणून तात्काळ त्याणी वाबल्यास सोडचिठ्या दिल्ह्या. त्या नारो बलाल याकडे पाठऊन दिल्ह्या व वाबले याकडील कोणी गेले होते त्याणी वाबले याचे पत्राचा आक्षेप केला. त्यावरून नारोपंतानी आम्हास लेहून पाठविले त्यावरून आम्ही सांगून पाठविले कीं, वाबल्याकडील प्रहस्त आले असतील त्यास आधीं समजून सांगणें, पाटीलबावाचे पत्र दाखिवणे, नच आइकत तर बेलाशक गोली वाजिवणें. त्यावरून त्याणी गोली वाजविली. वाबल्याकडील येक ब्राम्हण व दोन च्यार सिपाई जखमी जाले. त्याजकडीलहि दोन तीन जखमी जाले. सेवटी वाबल्याकडील उठोन आले. आम्ही त्यास बरे रीतीनें माकूल[१] केलें. पाटील-बावानी पत्र दिल्हें असतां तुम्ही कां लबाडी केली? बहुत प्रकारें बोललों. पाटील-बावानी वाबल्यास फजित केलें. याहून अधिक काय करावें? आम्ही आपले सामर्थापेक्षां स्वामीचे पुण्येकडून फार करितो. चुकीच्या गोष्टी म्हटले तर आमच्या पदोपदी आहेत. न चुकों येविसीं प्रतिज्ञा नाहीं. हें वर्तमान कललें तेच समई जाबसाल होऊन गेले. हालीं स्वामीचें पत्र आलें त्यावरून जाला प्रकार लिहिला असे. चुकेल ते वरचेवर आज्ञा करीत जावी. येथाज्ञानें होईल त्यास अंतर करणार नाहीं. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Balal writes to the Peshwa that Mahadaji Sindia has agreed to forego his claims to Nemawar district and has instructed his officers to that effect. The paper contains a strong reprimand from the Peshwa, and makes it clear that the Peshwa was now able to exact implicit obedience from powerful Sardars like Sindia.*

---

*No. 248]* *[October 1769*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
निलोबा गोसावी यासी

श्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक आसीर्वाद विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें

---

१ माकूल केले—समजूत घातली.

ते पावले. राजेश्री प्रिथ्वीसिंगजी यास टिका गुदराणिला. लाला चेनराय यांचे बोलणे सदासिवभटजीसी जाहाले. घरसोड करून जाबसाल करितात. समक्ष जाबसाल जाहालियावर बोलण्याचे भाव लेहू व लौकरच येऊ म्हणून व दबाव जयनगरप्रांते यावयाचा घातल्यासी फौजेचा व काही नख्तीचा जाबसाल बनेल, पत्रेहि राज्यास व कारभारी भटजी व जसवंतसिंग यास पाठवावयाविसीं विस्तारें लिहिले ते अवगत जाहालें. ऐसियास टिका गुदराणिला उतम केलें. फौजेचा व स्वारीचे खंडणीचा जाबसाल तुम्ही बोललांच असाल. त्यास खंडणी त्याणी पोख्त द्यावी व फौज कनिष्टपक्षी दाहा हजार तरी येक मातबर सरदार बरोबर कुमकेस पाठवावी व टिक्याची नजर पोख्त करार करावी म्हणून श्रीमंताचे पत्र आम्हास आले आहे तर टिक्याची नजराणीहि पोख्त करार करावा. याप्रो तीनहि मजकूर त्याचे कारभारियासी बोलून पके करून सदासिव भटजीस समागमे घेऊन यावे. * * * * जाबसाल * * * * विदित करून * सदर * उतम घडे ते करावे. * * * न जाबसाल न करावा आमचीहि स्वारी सत्वरच तिकडे येत असे. तुमचे बोलण्याप्रमाणे सदरहू तीनहि जाबसाल अमलात लौकर आणिले तरी उतम. दिरंगावर घातल्यास आमची स्वारी त्याचे प्रांतात येऊन मुलकास तसदी भारी होईल हे त्यास स्पष्ट सांगणे. इकडील वर्तमान तरी खेचीकडील कामाचा फडचा जाहाला. दोन लक्ष पासष्ट हजाराचा मुलूक अरुण टंक बारखेडे वगैरे ठाणी सरकारात घेतली. सवातीन लक्ष नख्त द्यावे त्यात काही मुलूक पट लाऊन घ्यावा व काही भरणा हती घोडे वगैरे व कांहीं नख्त या प्रो जाहाले. निशापाती जाहाली. अतपर येथून कूच करून दरमजल तिकडे चमेल उतरून येत असो. तुम्ही सदरहूप्रमाणे बोलोन सदासिवभटजीस घेऊन लौकर यावयाचे करणे. येथून कूच होऊन जयनगर प्रांतेच येण्याचा निश्चय जाहलियावर मागाहून सविस्तर लेहून पाठविला जाईल. राजे प्रिथ्वीसिंगजी व सदासिवभट व जसवंतसिंग यांस पत्रे पाठवावी म्हणून लिा त्याप्रो पत्रे पाठविली असेत.

¶*Ramchandra Ganesh and Visaji Krishna write concerning Prithvising and Chenrai of Jainagar and the settlement of their monetary affairs.*

---

*No. 249*] [*1769 ?*

श्री

पुरवणी राजश्री विस्वासराव रावजी स्वामीचे सेवेसी

राजश्री सदासिव गंगाधर अन्याबा जयेपुरीहून करोलीनजीक गेले. बरोबर शामसिंग होता. आम्हासहि पत्र लिा कीं तुम्ही फौज घेऊन येणे. आम्हाकडे

तुम्हास पत्रे लिा म्हणून पत्र लिा होते. त्यासी पत्रे सा महिने लिहीत गेलो; परंतु ते गर्भश्रीमंत. त्याचे ध्यानात आमचा मजकूर कोठे असे. त्यासी उतरे लेहून पाठविली. ते कूच करून जाटाचे फौजेत सामील व्हावया गेले. जाटाची फौज जावली डीग याचे मध्ये असें. हे संकट जाणून पत्र लिा असे. पंत मारनिले विनंती करून आमचे कार्यास विलंब लागणार नाहीं. चौ दिवसाचे कार्य असे यास्तव फौज आम्हाकडेच जाटाचे मुलकात उतरावी. दोनच रोज आमचें कार्य होऊन येईल. मग आपला उदेग करावा. विस्तारे काये लेहून! पूर्वीपासून आपण साहित्य करीतच आले. असो; आणखी कोण्हास ल्याहावें? आम्हीहि साहस करावयाचे ते करून आठ महिने हेहि ढकलिले. याजउपर आपले मरजीस विचारास येईल तेप्रमाणे असे. सेवटी सिमतर गुजराचे ठीक जाले तरी तो व आणखी कांही फौज इकडे निदान रवाना करावी. आधी उतम पक्ष आम्ही विनंती लिा तेच करावी. फौजेस आपले गुंता पडणार नाही. बहुत इकडे कळले पाा. लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती. स्वामीनी आमची विनंती मान्ये खामखा करून आपसामध्ये कजिया एकंदर न करावा. राजश्री बाळाजीपंतासहि आम्ही लिहिले आहे व स्वामीसहि लिा असे. उभयेतां कजिया करून कोणाचे हातीं काही लागणार नाहीं. त्याचाहि पैका मामलतीवरीलच आहे. त्याचा निर्गमाचा विचार करावा. आपण बंदोबस्त करावा. रुो येणे हेहि मुस्कीलच असे. जमीदारापासून त्यांसी फौज जाटाचे पारपात्यस्तव इकडेच पाठवावी. हे महद कार्य असे. अविलंबे गुंता उरकेल येविसी विस्तारे कोठवर लेहून? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Letter addressed to Vishwasrao Lakshman from some of his subordinates, reporting how Sadashiv Gangadhar was coming in the way of the writer.*

---

*No. 250*] [*1769?*

श्री

सेवेसी पुरवणी. फौजा येकत्र जाल्याचे वर्तमान आल्यानंतरी आम्हास बहुत आग्रह करून नवलसिंगानी राहाविले व मानसरूपहि येथून परवाचे दिवसी भरतपुरास बोलाऊन नेला आहे. तोहि उदईक येथे येईल आल्यानंतरी सर्व कळेल. सर्वतोमुखी दक्षण्यास थोडे बहुत द्यावे, न दिल्ह्यास सारे सरदार येक जाले आहेत, पारपत्य करितील यसी दहशत बालगितात. पाहावे, जाटाचा कारभार लबाड. मानसरूप आल्यावर सर्व कळेल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer says that on getting news of the advance of the united forces of the Maratha generals the Jat has expressed willingness to make liberal concessions.*

No. 251] [1769

श्री

विनंती उपरी. श्रीमंताची पत्रे व आपली चिठी पाठविली ती पावली. पत्रे पाहून आमचे ठेऊन आपले पाठविले आहेत. चिठीत मजकूर लिहिला की सुज्यातदौलाकडे येका खाशाने सडे जावे. वर्तमानासारिखे सर्वांनी मागून जावे उतम आहे, म्हणून लिहिले. यैसियास आगऱ्याचे मुकामी पलीकडे आम्ही सुचविले होते की, आधी फरोकाबादेकडे सेह द्यावा. हे गडबडले होते. भेटून गुंज फोडून मग दिलीकडे येतो. तूर्त तीन मजली इकडे आलो. अता * हिला ते भारी जाले आसो. उद्याचे मजलीहून जो विचार करणे तो करून जनाने पुढे जावे. आगाऊ बालाजी गोविंदास पत्रे पाठऊन ते फौज सर्व आणवावी. जो जाईल त्यास सामील * * * * * काये लिहिणे हे विनंती.

¶*Visaji Krishna reports the moves and the counter-moves in his campaign in the North.*

---

No. 252] [Recd. 8-2-1770 ?

छ ११ सवाल सबैन माघ+

हा महमद हुसेन सांडणीस्वार

श्री

सेवेसी विज्ञापना माहादजी सिंदे याचे व रामचंद्र गणेश यांचें बनत नाहीं. मसलतींत पेंच पडतात. यास्तव माहादजी सिंदे याजकडे येथून गणोजी कदम यास रवाना केले. त्याणी जाऊन माहादजी सिंदे यास भेटून कबूल करून मारवाडाकडे गेले आहेत त्यास माघारे आणून रामचंद्र गणेश याचें व होलकराचें व सिंदे याचे ठीक करून द्यावें आणि त्रिवर्गानी काम बनवावें या डौलानें पाठविले आहेत. धोत्रजोडे पुण्यांतील आले होते ते मर्जीस न पडत यास्तव निमोणे देऊन जनोबा दामले यास पैठणास रवाना केला, याणे तेथें राहून धोत्रजोडे पाठवावे. नव्या तोफा वोतवावयासी बाला

¶*Owing to a disagreement with Ramchandra Ganesh, Mahadji left the main army and marched towards Marwar. An attempt is being made to harmonize their differences in order that they may act in concert. (The paper is mutilated.)*

---

+ पैवस्ती नाना फडणीसाच्या हातची.

No. 253] [9-4-1770 ?

श्री

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब व राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

पोष्य आबाजी रघुनाथे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत चैत्र शुद्ध १४ जाणून स्वानंदवैभव लेहावयासी लेखकास आज्ञा करणार धणी समर्थ आहेत विशेष. प्रां मजकूरचें वर्तमान तर राजे गुमानसिंगजी यांच्या शरिरास वेथा पांच च्यार महिने जाली. कांही उपाय चालिला नाहीं. त्यांचा काल जाला. त्याज करितां नजरेचे रुपये पांच हजार यावयासी विलंब लागला. राजेमजकुरांचा काल जालियावर त्यांचा पुत्र वडील महाराऊ उमेदसिंग राजीं बसला. वर्षी बाराचा आसे. त्यानें पूर्वी राजश्री भोपतसिंग मामा फौजदार होते त्यांस दूर करून हाली फौजदारी राजश्री जालमसिंगजी झाले यांसी सांगितली आहे. त्यावरून त्यासहि नित्य तगादा करितां आतांसी रुपयांची निशा त्यांनी देविली आहे. रुपये पांच हाजार रोकड करून राजश्री विष्णुपंतबाबा याचे गुमास्ते राजश्री यादवराव तुकदेव याच्या मारफतीनें खेतसी धरमसी यांचे दुकानीं जमा केले आहेत. बहुत दिवस लागले म्हणून रागास न यावें. येथें आणिक उपाय नाहीं, त्याजकरितां आंतर पडलें, ते माफ करतील. चिटी द्यावयाची आज्ञा करवितील. सर्व प्रकारें आज्ञांकित आहों. सेवेसी श्रुत व्हावें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा हे विज्ञप्ति.

¶*Abaji Raghunath explains that the delay in sending the Nazar of Rs. 5,000 from Gumansing was due to his death and the subsequent disorder in his Court.*

---

No. 254] [28-4-1770

पौ छ २९ सफर
ईहीदे

श्री

सेवेसी बाबुराव केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १९ मोहरम मुा को सोनई प्रा अंतरवेद वर्तमान येथास्थित असे विशेष. नवलसिंग जाटाचे लडाईत

१ सिंद्यांचा चिटणीस काय ?

जखमी व ठार जाहाले त्याचे तेरीज आलाहिदा सेवेसी रवाना केले आहे. त्यावरू(न) सर्व विदित होईल. हुजरातचे नाव(नि)सीवार व पथके याचे याचे मोघम लिहिले आहे. उभयता सरदाराकडील याखेरीज आहे ते मागाहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baburao Keshav submits a list of casualties in a battle with Navalsing Jat.*

---

*No. 255]* *[4-5-1770*

पौ छ १२ सफर सन इहिदे

## श्रीशंकर

सेवेसी नारो नरसी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता ७ मोहरम जाणौन मुा हासियागंज आंतरवेद नजीक मथुरा येमुना उतर तीर येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान वरचेवर तपसीलवार लिहीतच असतो. हलीचा मनसबा सिंदे होलकर व उभयेता हुजरात फौज व नजीबखानसुदा आंतरवेदीत आहेत. पुढे जाटाचा मुल्लक जफ्त करावा व बंगस व रोहिल याणी सरकारचा मुल्लक दाबला आहे तोहि जफ्त करावा यैसे ठराऊन जफ्तीस बाबुराव हरि व गणेश विठल हजारपर्यंत फौज देऊन आठ दाहा कोशाचे अजमाने पुढे जफ्ती बसवीत जावी मागाहून आपणहि जावे येणेप्राणे तूर्त निछेये केला आहे. जाठाची मामलेत होऊन श्नेह होवे यैसे जाठाचे मानस आहे. परंतु हे जारी भारले आहेत. मामलेत करीत नाहीत. ज्यापक्षी मामलेत न करीत तेव्हा केवल जफ्तीनच पैका फार मिलल हेहि कललेच आहे. सर्वाचे मतेकरून जाटासी श्नेह करून तूर्त पैका देईल तो घ्यावा म्हणजे फौजेची उस्तवारी होऊन येईल आण मनसब्यात बलहि पडेल. ते न करिता होलकर याचे मनसब्यास लागोन नजीबखानास विचारून मसलत केलिया कार्य सिधीस जाईल हे कलतच आहे. येका नजीबखानाच्या भेटीमुळे सर्वा लहानथोराकडील राजकारणे तुटली. तेव्हा पुढील मोठ्या मनसब्यास जक बसल यैसे दिसते. त्याहिमध्यें सर्वतोपरी धणियाचे पुण्ये आहे. प्रस्तुत सर्वाचे मते जाठाची मामलेत करून येमुना दक्षणतीरीच असावे. सर्वाची राजकारणे राखावी. पुढे बाजतबरसात जाहालेवर ज्या रीतीने सोईस पडल ते करून आंतवेदीतील मुल्लकहि सोडवावा. या मनसब्यास वहाली

करीत आहेत. यास विरोध पडत जात आहे. परिणामास काय जाईल हे न कळे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. येथिल वैराट आवर्धा सर्व आनन्वित. पूर्वीप्रमाा रंगास आली आसे दिसते हे विज्ञापना.

*¶Naro Narsi communicates that armies of Sindia and Holkar have advanced into the Doab where they are accompanied by Najibkhan. While most of the Generals are inclined to treat favourably with the Jat, Holkar under the influence of Najib has rejected the proposal and is contemplating a plan of action which is ill-advised and holds no chance of success.*

---

*No. 256*] [*17-5-1770*

पौ छ २९ सफर इहिदे

**श्रीशंकर**

**श्रीमंत राजश्री नाना**
**स्वामीचे सेवेसी**

पो रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान ताा छ २० मोहरम ( मुकाम सोनई पौ जबार प्राा अंतरवेद येथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिला मजकूर कळो आला. मकरसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते पावले. अत्यादरें स्वीकारिले. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

*¶Ramchandra Ganesh and Visaji Krishna acknowledge to Nana Fadnis the customary present of sesamum seeds.*

---

*No. 257*] [*17-5-1770*

पो छ २९ सफर इहिदे

**श्री**

सेवेसी विज्ञापना ताा.छ २० मोहरम स्वामीचे कृपेकडून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान नाजिबखान समागमे आहेत. जाठाकडील मामलतीचा मजकूर

---

१ परगणे.

आजपर्यंत ठीक नव्हता. त्यास सांप्रतकाली जाठानेच मामलत करावी असे त्याचे चितांत येऊन कृष्णसिंग वकील, च्यार महिने येथे होता त्याणे बलोन चालोन येथील मजकूर आइकोन डिगेस गेले आहेत. आज उद्या येतील. यैसी लक्ष खंडणी व मुल्लक नवा घेतला आहे तो सोडावा वगैरे किरकोल जाबस्वाल याची याद लिहून दिल्ही ते नेली आहे. त्यास तेथे नवलसिंगानेहि मान्य केले आहे. साठ पासष्ट लाख देखील दरबारखर्च करार व्हावे * * * (मुलु)क सोडावासा ठरेल असा मजकूर आहे. करार होईल त्याप्रमाणे सेवेसी लिहून पाठऊ. करारहि जालियास सेवटास जाणे फार कठीण. सरदाराचे नित्य नवे हिस्के फार बसतात. होळकराचे मते मामलत करू नये. सिंद्यांचे मते करावी * * * हुजूर आहेत. सरदारांसी बोलत नाहीं. असे आहे. नित्य रुसवे नित्य समजावीस. याप्रो दिनच्यर्या जात आहे. तिनी सरदार यांत. पैक्याची वोढ भारी, पैसा नाही. यामुले मात्र सेवटास जाईलसे आहे. जाठाचे मुलकाची जप्ती कांही जाली आहे. परंतु पैशाचे ठिकाण नाहीं. गाजुदीखान न बोलवितां भेटीस आले. समागमे आहेत. नजिबखान होळकराकडे, गाजुदीखान सिंद्याकडे आहेत. जाठाचे खंडणीपैकी चौथाई नजिबखानास द्यावी लागेलसे दिसते. हे काम जालियावर सरकारचा मुल्लक पठाणानी दाबला आहे तो सोडवावयाचा आहे. पठाणाचे वकील आले आहेत. सलुखाने सोडिलियास फार उतम. नाहीतर झुंजावे लागेल. सुज्यादौले याजकडे रा। पुरुषोतम माहादेव गेले होते. त्याचे वकील त्रिंबकदास घेऊन आले आहेत. पुढे त्यांचीहि भेट व्हावीसी इरादा आहे. त्याची भेट जालियास गंगापारचे रोहिले पठाण मुलूक सहजेच सोडून देतील असाहि मनसबा आहे. पुढे होईल त्याप्रमाणे लिहून पाठऊं. छावणीहि अंतरवेदीतच होईलसे दिसते. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Terms to be granted to the Jat are discussed. While the Marathas demand eighty lacs Navalsing is ready to concede sixty-five. After the Jat is disposed of, the Maratha army is to march into Rohilkhand.*

---

*No. 258*] [*30-5-1770*

पो छ २९ रोवल इहिदे.

श्री

सेवेसीं बाबूराव केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ ४ सफर मुा प्रो सोनई प्रांत अंतर्वेद स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान जाटाचे खंडणीचा करार पासष्ट लाख देखील

दरबारखर्च मिळून जाला आहे. हासेबंदीचा ठराव होणें थोडासा राहिला आहे. तीसपर्यंत दोनतीन महिन्यांत येतील. वरकड पुढे मुदतीप्रमाणे घ्यावे असा एक दोन रोजांत निश्चय व्हावासा आहे. परंतु सरकारांतून मामलत जालियामुळें होळकर अंजुर्दे आहेत, ते काय बोढतील परिणाम कसा होईल हें पाहावें. सिंदे याचें मत मामलत करावयाचें आहे. हें कार्य जालियावर पठाणाकडील पहिले महाल सलुखानें सोडावेसे आहेत. पुढें होईल तें सेवेसी लिहून. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baburao Keshav Thakur reports that the Jat who has been reduced to submission agrees to a levy of sixty-five lakhs on his territory. The Maratha army is now heading towards the Rohilla country.*

---

*No. 259*] [*15-6-1770*

बंद २

## वर्तमान अवरंगाबाद

ता। छ २० सफर

वार्ता आली आहे श्रीमंत माधोराऊजीस हयेदर नायेकाचे पत्र आले की सुला केलिया उतम आहे. हयेदर नाइकाचे लशकरांत माहाग फार जाले आहे म्हणऊन सुला करनार आहे. काही अगत्य जाणून पैका कबूल करील.

या दिवसांत अवरंगाबादेचे अधिकारी यानी फार दरवाजियावर ताकीद केली आहे व पत्रे लशकरची हरकारे आनितात त्या खतास रोबरो आपले नेऊन वर्तमान मनास आनितात. येथून कोन्ही खतपत्र लशकरास किंवा नासकास लिहितात, त्याजला जाऊ देत नाही. अवघी साहुकार लोकास व हरकारी यास ताकीद केली आहे की लशकरचे वर्तमान नासकास कोन्ही न लिहीत जाणे. लशकरात अवघे वकिलास ताकीद जाली. वर्तमान नवाब साहेबाचे दरबारचे न लिहीत जाणे. कदांचित जाहीर जाले तर प्रतिस्टा राहणार नाही. यावरून गरीब लोक फार भये वागवीत आहेत. दिलीकडील वर्तमान छ १ सफरचे आले. जाटाने सिखासी करारमदार केला की तेवीस लेक्ष रूपये याचा मुलुक त्याजला आपले जागिरीतून द्यावा. त्याही आपले फौजेनसी येऊन दिलीत नजीबखानास मारावे. त्यावरून सिख दिलीपासून चालसा कोसावर आपले फौजेनसी आले आहेत. नजीबखानाने दोन फौजा केल्या आहे. येक फौज व आपण सिकाचे तोंडावर उतरला. येक फौज लेकास जाटाचे वाटेवर पाठविले.

¶*News from Aurangabad and also from the North about the skirmishes between the Jats and the Sikhs is communicated to the Peshwa. A treaty between the Peshwa and Haidar is also referred to.*

---

१ शिख.

No. 260] [16-6-1770

पौ छ २३ रावल इहिदे

## श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नानाफडनीस स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो नरसी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागाईत छ २१ सफर जाणून मु॥ रामगड प्रां अंतरवेद कृपाकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान वरचेवर तपसीलवार सेवेसी लिहीतच असतो. त्याजवरून श्रुत होत असल. हालीचे वृत जाटाचें मामलतीचा मजकूर ठराव पासष्ट लक्षपर्येंत होऊन कबुलात याददेखील जाली आण सरदार येकंदर होऊन निशापत्री करावयाचे वेलेस कृष्णसिंग वकील बोलो लागला जे जफ्तीमुले वसूल व पायेमली रुो वीस लक्ष वजा करावे, पंधरावीसपर्येंत सा महिन्याचे मुदतीने घ्यावे; बाकी राहेल तो येवज सालेसाल नवलसिंगाचे जातीवर पुढे घ्यावा. येणेप्राो बोलताच ही गोष्ट कोणाचे चितास येईना. पेशजी बोलोन ठराव जाहाला येक आण करारसमई याप्रमाणे बोलो लागला तेव्हा मामलेतिचा तह सहजच राहिला आण या मामलेतीस मातबराकडील कारभारियाणी गुडगा दिला म्हणोन ही गोष्ट विलग पडली. येवडे मामलेतिची ही गोष्ट जाहली. पैका सद्या येत नाही तेव्हा वरकड मजकूर कललाच आहे. येथील कारभार सर्व लाहानथोर येणेप्रमाणे आहे. प्रस्तुत जाटाचा मुलुक आंतरवेदीतील याची जफ्ती करीत आहेत. वीस माहालपर्येंत नजीबखानाचीच खासगत जफ्ती आहे. वरकड मुलुक पेंढारी याणी लुटला. तमाम वसाडी मुलकाची आहे. जफ्तीमुले पैका यावयाचा कलतच आहे. सद्या नारो गणेश व बाबूराव यादव याचे नादी लागोन नजीबखानाचे मसलतीने चालत आहेत. पुढे काये परिणाम लागल तो पाहावा. येकव्या नजीबखानाचे विचारे सर्व आणुसंधाने तुटत आहेत. येसे आसोन नजीबखानामुळे सरकारात काही नफाहि नाही. ज्यास असल त्यास आसो येथे मातबर लोक वर्तमान जे बोलतात ते मी कार्यकारण आज्ञेप्रमाणे लिहीत असतो. कोणाचे गुणदोश लिहीत नाही. सर्व जे होणे जाणे ते धणियाचे पुणेकरून होते. सविस्तर वृत श्रीमंतास विनंती पत्री लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Narsi writes that the Jat prince who had originally agreed to a tribute of sixty-five lacs now declines to accede to it on various flimsy grounds. He further complains that affairs are being unduly protracted owing to the mediation of Najibkhan who is interested in frustrating Maratha designs.*

No. 261] [Recd. 2-7-1770

पौ छ ८ रबिलोवल इहिदे.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पांवले. राजश्री विष्णु माहादेव याजकडील ऐवजाविशी लिहिलें त्याचा जाब अलाहिदां पत्रीं लिहिला आहे त्याजवरून कळेल. ईकडील वर्तमान नवलसिंग जाट यांची आमची लढाई जाहाल्याचे वृत्त तपशिलवार पेशजीं लिहिलें आहे त्याजवरून कळलेंच असेल. अलीकडे आम्ही मथुरेवर येऊन यमुनातीरीं मुकाम केला. नवलसिंगाकडील वकील येऊन खंडणीचा प्रकार बोलत होता; तत्रापि जाबसाल सोईचा न करी यास्तव येमुना उतरोन अंतरवेदींत आलों. मुलकांत जफ्तीस फौज पाठविली तेव्हां पनास पंचावनलक्षपर्यंत बोलों लागले. त्याजवर आम्ही सरकारतर्फेचा करार पाऊण करोड ऐन खंडणी व सरकारचा मुलुक सोडणें वगैरें कलमें ठराऊन याद करार करून वकिलाबा पाठविली आहे. त्याचें तर्फेनें रदबदली आहे. दोचहूं दिवसांत तेथून वकील येऊन पका करार होईल आणि अमलांत येईल तें मागाहून लेहून पाठऊं. नजीबखान व गाजुदीखान आमचे समागमेंच आहेत. सुज्याअतदौला व पातशाहा यांजकडील वकील आले आहेत, भेटी लौकरच होतीलसें वाटतें. दुंदेखान व आफज रहमतखान व अहंमदखान बंगस यांजकडीलहि वकील आले आहेत. प्रस्तुत प्रजन्यकाळ नजीक आला आणि मोठमोठे मनसबे करणे. दिवस थोडके राहिले. यास्तव या प्रांतीं येंदा छावण्या करावया लागतात. पुढें श्रीकृपेनें घडणें तें घडेल. आंपल्यास कळावें यास्तव लिहिलें असें. बहुत काय लिहिणें? लोभ करावा हे विनंती.

*¶Ramchandra Ganesh and Visaji Krishna report their activities in the Doab after having overcome the Jats' resistance. Envoys from the Rohilla chiefs are pouring in Maratha camp with solicitations for peace and friendly understanding*

---

No. 262] [7-7-1770

पो छ ११ जोवल इहिदे.

श्रीवरद

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पो पुरुषोतम माहादेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ १२ माहे रोवल मु॥ फरुकाबाद श्रीभागीरथीतीर जाणोन स्वकीये लेखन

करीत असिले पाो विशेष. बहुत दिवस जाले आपणाकडील वृत कलत नाही म्हणोन चित सचिंत असे. तर आलिया मनुशाबराबर सदैव पत्री अनंदवीत असावे. इकडील वर्तमान तर प्रस्तुत सरदार त्रिवर्ग परगणे कोल प्राां अंतरवेद येथे छावणी करणार. जाटाकडील मुल्क तमाम उज्याड केला. मामलत आद्याप जाली नाही. होईल ते वृत मागाहून लिहू. तूर्त आम्हास नवाब सुज्यातदौले यांकडे पाठविले आहे. त्याचा वकील राये त्रिंबकदासहि समागमे आहे. श्रीगंगापार लखनऊस जाऊ. येथे फरुकाबादेस नवाब आहमदखान याचीहि भेट घेऊन जाऊ. काही सरकार कामे उपयोगी असतील ते करून मागती लौकरीच लस्करास सरदारापासी येऊं. ते वृत सविस्तर लिहू. आहमदखान व हाफीज रहमतखा व दुंदेखा हे येकत्र जाले आहेत. नजीबखान आपले फौजेस शामील आहे. शुजाऊदौले पातशाहा फिरंगी हेहि सूत्र आपलेकडेच आहे. श्रीकृपेने सरकारकामे उतम होतील ते सविस्तर लिहू. विस्तारे विनंतिपत्रे श्रीमंत स्वामीचे साो पाठविली आहेत त्यावरून विदित होईल. उतरी सनाथ करीत असावे. सेवक पदरचे जाणून सदैव पत्रामृती कृपा करून परामृश केला पाहिजे. पूर्वी पत्रें वरचेवर पाठविली. परंतु उतरी सनाथ न केले. तर ऐसे न करावे. सरकारचेहि पत्रोतरी कृतार्थ करणार अपण समर्थ अहेत. स्वामी-सेवा केली व पुढें करूं ते परस्परें श्रीमंताचे मनी बिंबेल व कृपा होईल तो सुदिन. सविस्तर चिरंजीव देवराऊ साो विनंति करील. दर्शनलाभ होये तो सुदिन. कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Purushottam Mahadeo informs Nana Phadnis that the Jat's power has been broken and negotiations with other chiefs of the North have been opened.*

---

*No. 263*] [*18-2-1771*

**श्री**

**श्रीमंत राजश्री नाना श्वामी-**
**चे सेवेसी**

पाो रामचंद्र सामराज साां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा फाल्गुण शुध्ध चतोर्थी चद्रवासर मुाा सिराले[1] येथे श्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष अलीकडे श्वामी कृपालु होऊन पत्र येऊन साभाल होत नाही.— याजउपरी यैसे न

---

१ सुभेदार सिरवल.

करावे. सदैव पत्र पाठऊन सेवकाचा साभाळ केला पा। विशेष. चिरंजीव राजश्री रघुनाथराव बापूकडून गालियेरीकरून पत्रे वरचेवर येतात की अगर सारभोम याने घेऊन ठाणे बसविले. मथुरा येथे नवलसिंग जाटास मोडोन तेथे बदोबस्त पाताशाहानीं केला. इटावे घेतले. अतरवेदींत कुरा जाहनाबाद कुल अमल सुज्यातदवलियाने बैसविला. मेरट पा। सरकारचा घेतला. गोहदकर जाट पाहातशाहास जाऊन भेटला. काही नजर देऊन गोहद गालियेर प्रांत येथील जाहगिरी परवाने पातशाही घेऊन आला. दाहा हजार फौज पंचवीस हजार तुफकदार[१] जमा होऊन सिकरबार तुवरधार गालियेरी नजीक दंगा माडला आहे. नुराबाद व कुलथ पाहाडीगाव नजीक गालियेरपर्यंत ठाणी बसविली आहेत. दतियेकर राजे यानी उच्याड प्रा। ठाणी घेऊन अमल बसविला. पंच-माहाल उद्वस, या दहशतीने जाले. आमचा किला मात्र रक्षोन जिवावर चिरंजीव राजश्री रघुनाथराव आहेत. दक्षणेंतून फौज राजश्री तुकोजी होलकर व माहादजी सिंदे जाऊन उपराला करून चमेलीअलीकडे तऱ्ही बदोबस्त राखावा ते काही घडोन येत नाही. किलियास नेमणूक बेहाडा येक लक्ष पाच हजार त्याजपैकी इसनेपासून सलास अर्बापावेतो दरसाल तीस हजार रुो अताजी माणकेश्वर याचे जफ्तीपैकी तीस हजार रुो अकार बाकी सवा दोन लक्ष रुो लोकाचे बेगमीस नाही. लोकानी गवगवा केला आहे. श्वामीखेरीज आम्हास त्राता कोण आहे. याजस्तव राजश्री होलकर व सिंदे त्याजला पत्रे आपले नावे द्यावे की, गालियेर प्रांते उभयेता सरदार येकदिल होऊन गोहदकर जाटाचे पारपत्ये करणे यैसे पत्र द्यावे की, झासीकडे उमरावगिरी गोसावी याचा दगा तिकडे माडिला आहे. तेथेहि जाऊन उपराला करून गोसावी यांचे पारपत्ये करणे यैसे पत्र द्यावे की, राजश्री रघुनाथ रामचंद्र गालियेर किलियावर आहेत. त्यास तुम्ही खासा उभयेता जाऊन उपराला करून गोहदकर जाट व दतीयेकर राजियांचे पारपत्ये करून सरकारचा नक्ष झासी प्राते गालियेर प्रातेदेखील राजरजवाडियाचे करून सेवा येकनिस्टेने करून दाखवणे यैसे दिल्हे पा। श्वामीनी श्रीमंत असताना राजश्री लक्षुमण नाईक चाबुकश्वार याजकडे वरात लक्ष रुपयांची चैत्र मासचे बाइदियाची आपणच श्रीमतास विनती करून देविली होती या मजकुरास राजश्री सखारामपत बापू वाकिफा आहेत. आपण नेट धरून कार्य केले येविसी लक्षुमण नाइकास रुबरू ताकीद पुणियात आम्ही सनिध असता ताकीद केलीच होती. यैसियास चैत्र मास च्योवीस दिवस राहिला. यैसियास आपण येविसी

---

१ बंदुखवाले, तुफंग = A Musket.

ताकीदपत्र राजश्री लक्षुमण नाईक चाबुकश्वार यांस देविले पा. तो यैवज राजश्री रघुनाथ रामचंद्र याजला त्याचे पिते रामचंद्र सामराज याजकडे यैवज देणे यैसे पत्र ताकीद देविली पा. येणेकरून येथे कर्जदारापासी आबरू राहील. श्वामीनी मनावर घेतलियाने आमची स्थित राहील. याजस्तव दया करून. ताकीदपत्र पाठविले पा.. आणीख कितेक विस्तारे कोठवर पत्री ल्याहावे? सिरवल येथे असो परतु उभीयाने अन्न खाते. सर्व प्रकारे आमचा निभाव करणार श्वामी समर्थ आहेत. चिरंजीव राजश्री सिदोपत जबानी वर्तमान सागता विदित होईल. चिरंजीव रघुनाथराव बापू आमचे लेक गालियेरीस आहेत याजलाहि हिमत धरून कामकाज किले मजकूरचे करीत जाणे यैसे पत्र दिले पा. मी सेवक पदरचा असे. उतर पा. कृपा असो देणे. हे विनंती.

¶*Ramchandra Shamraj communicates to (Nana Fadnis) Nanasaheb the import of letters that he received from Raghunathrao Bapu from Gwalior, dealing with the activities of the various powers in the North including Navalsing Jat, Shuja-ud-daula and the Emperor. He further requests the addressee to write to both Sindia and Holkar requesting them to help Raghunathrao Bapu at Gwalior against the Northern powers which he regrets they have not rendered up till then.*

---

*No. 264*] [*15-3-1771*

पौ छ २७ जिलकाद फाल्गुन
इहिदे सबैन

**श्री**

**श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत तात्या**
**तथा राजश्री विसाजीपंत दादा**

* * * * * * * *

तेथे तोफा चांगल्या आहेत * * * तोफा होत्या त्या सुज्यातदौला याणी किल्ला घेतला तेसमई नेल्या. येथे तोफा आहेत त्या चागल्या नाहीत याजकरितां दोन तोफा चांगल्या दलदार पंचरसी सवा सवा मणाचे गोल्याच्या घ्यावयाची परवानगी जाल्यास तेथून आणवू. परगणे सोगनपूर नगदपटी व ता भरे ह * * गापूर चक्रनगर व सहसो येविसी विनंती करावयासी राजश्री दवाजीपंत आहेतच तोफाचे * * * * * * यास्तव लिहिले. यावर आपली मर्जी. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Artillery is requisitioned from Ramchandra Ganesh and Visaji Krishna to invest a fortress. The paper is mutilated.*

---

१ याच मजकुराचें सखाराम बापूच्या नांवचेंहि पत्र आहे.

No. 265] [17-3-1771

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य महादाजी बलाळे साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत चैत्र शुद्ध १ जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं ऐसे नसावें. निरंतर पत्रीं कुशलाल्य वृत्त व राजकीय लेहून संतोषावाप्ति करीत जावी. सांप्रतचें वर्तमान राजश्री विसाजीपंत दादा व महादजीबावा शिंदे वगैरें सरदारांनीं सनदा करून दिल्ली घेऊन बंदोबस्त केला. हें दादांचें पत्र सरकारांत आलें व आपलें पत्र घरास आलें त्यावरून कळलें. हें यश मोठें आलें. श्रीमंतांचें मानसहि ऐसेंच होतें म्हणून वारंवार पत्रीं आज्ञा जात होती, असें असतां राजश्री रामचंद्रपंत तात्यास अनुकूल पडलें· दादाच या यशाचे विभागी होते. मुख्य साहेबकामावर निष्ठा सुदृढ तेथेंच यश; पुढें पातशाही बंदोबस्त होणें अमीर उमराव साबिकदस्तूर आपआपले पदावर आरूढ होऊन पुर्ता बंदोबस्त जाहला. त्यांत सरकारकिफायेत द्रव्य व मुलकाचा लाभ तोहि मनसबा करितीलच. कधीं कधीं पत्रद्वारां आपणांकडून वर्तमान कळत जावें, विदित असें. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. आपलें घरचीं मनुष्यें समस्त सुखरूप आहेत. वरकड वृत राजश्री लक्ष्मणपंतीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजें हें विनंती.

¶*This letter of Mahadaji Ballal Guruji refers to Maratha victories in the North and compliments Visaji Krishna and others on their brilliant achievements.*

---

No. 266] [17-3-1771

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बाबुरावजी स्वामी–
चे सेवेसी

पो रामचद्र शिवदेव सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता चैत्र शुध १ जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण गेल्यादारभ्य पत्र-

---

१ ठाकूर. २ गुरुजी करकरे.

द्वारा साभाल होत नाही तरी यैसे नसावें. घरी पत्र येतच आहेत त्याजबरोबर स्मरण पुरस्कर आमचाहि परामर्श करावा उचित आहे. राजश्री विसाजीपंत दादा यानी व श्रीमंत राजश्री माहादजीबावा सिंदे याणी सारे सरदार मतांत मेळऊन येक विचारे दिलीचा बंदोबस्त किल्यासुध्रा केला म्हणौन कळले. तर ही महत्कृत्यें खावंदाची सेवकाचे हाते घडावी हे फल स्वामी सेवेवर येकनिष्ट तिकडे आहे. पुढें पातशाही बंदोबस्त होऊन पातशाह स्थापून येक्या सूत्रें सारे मंडल वर्तऊन सरकारकिफायत करणे ह्या गोष्टी खावंदाचे प्रतापे घडून यश येकनिष्ट सेवका-कडेच आहे. वरचेवर कृपापत्री संतोशवीत जावे. बहुत काये लिहीणे लोभ कीजे हे विनंती.

¶*The writer Ramchandra Shivdev notes with delight the success achieved by Visajipant and Mahadji Sindia and the capture of Delhi.*

---

*No. 267*] [*1-5-1771 ?*

श्री

सेवेसी विनंति सेवक भवानीशंकर जनार्दन करद्वये जोडून सा। नमस्कार विनंति विज्ञापना. तां। छ १९ माहे मोहरम रोज बुधवार पावेतो मु। आलकचंद भागीर्थीतीर येथे नवाबाच्या लस्करात आसो. यानंतरी आजचे वर्तमान तरी प्राथःकाली महमद इलचखान पातशा याजकडे गेले होते. साहींकाली नवाबाची स्वारी पातशायाच्या डेऱ्यास गेली. मेजवानी होऊन तमाशा जाला. दोन प्रहर रात्री फिरोन आपल्या डेऱ्यास आले. प्राथःकाली सोळावे तारखेस पेशखा-न्याचे डेरे पातशायाच्या पेशखान्याच्या डेऱ्याचे पुढे सज्यातपुरानजीक पा। व तोफखान्याचेहि कूच जाले. उदईक उभयेताचे कूच आहे. कोरड्याचा रोख धरला आहे. समागमे फिरंगी व इनायेतखान वगैरे सर्व आहेत या उपरी जे वर्तमान ठरल ते लेहून पाठऊ. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Bhavanishankar Janardan, a news-writer, sends information from the Emperor's camp about the Emperor and Inayetkhan and their departure for Delhi.*

---

*No. 268*] [*16-5-1771*

श्री

श्रीमत राजश्री विसाजीपंत

दादा स्वामीचे सेवेसी

साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ ३० मोहरम गुरुवार येथील सवा प्रहर दिवस मुक्काम पलवल येथास्थित असे विशेष. स्वामीनीं

4393

बुधवारची चिठी तिसरे प्रहराची लेहून पावते आज सकाल चौ घटिका दिवसा पावली. त्यासी येथील वर्तमान फरिदाबादेचे मुक्कामीहून सोमवारी. रात्रीं पत्र लेहून आपले कासीद जोडी दोन पत्रे घेऊन आली त्याबराबर पाठवावे असे. ते काल तिसरे प्रहरपर्यंत न पावले, अपूर्व असे. दोन जोडी कासीद होते. त्याज उपर काल आम्ही मुद्दाम मवेती जोडी पत्र लेहून दोन प्रहरा बुधवारीं रवाना केली * * म्हणून ताकीद करून येथील वर्तमान सविस्तर लिहिले असे. त्याजवरून वर्तमान कळले असेल. त्याजवर आपली जोडी आणखी मंगलवारची पत्रें घेऊन आली. त्याजबराबर रात्री काल पत्र लेहून उत्तर पाा असे त्याजवरून विदित होईल. येथें सुलतानजी लांबाते व भिऊबा नाना होलकराची पथके स्वार च्यारहजार अला असे व सिंदेयाजकडील बहिरजी ताकपीर व कुशाबा व आणखी सरदार कदीम सर्व चार हजार फौज आली असे. तात्यासी माघारे घेऊन जावे हाच निश्चय असे. राजश्री तात्यानीं बहुत सालजाब केले. तुम्हासी कजिया आमचा काये असे? राजश्री विसाजीपंत आम्हास सरकारचे पत्र न देतां देसास येणें. आमचे ठायीं निक्रशच करून आमची रवानगी केली ते येऊन घेऊन जातील तरी येऊन उभयतां सरदारानीं व दादानीं यावे हे साल, जाब केले. कालही मुा करीत नव्हते परंतु लांबाते याकडील सकाल कारकून पत्रें आम्हास घेऊन आले त्या नकला सेवेसी पाठविल्या असेत त्याजवरून मुा केला. सुलतानजी लांबाते व ताकपीर चार घटिका दिवसांत सकाल आले. कदम व भिऊबानाना वगैरे काल दो प्रहरा आले. तात्पर्य उभयेता सरदारानीं येथें यावे यासीं घेऊन जावे हा करार ठरला असे. येथें आमचा येत्न काये असे ! आम्ही मात्र अटकून राहिलो. मुलुक उजाड करितात. पलवल कसबा लुटला. राजा तुलसीराम जाटाकडील उदेक जातो म्हणतो. आम्हांसहि निरोप देईनांत. मार्गाचे कठीण. बुनगे बहुत असे. रात्री रोजचा रोज घोडी चोर नेतात * * राजश्री धोंडो दत्तात्रय याजकडील स्वार अगदी. न * त्रिंबकराव नानाकडील स्वार आले ते कोठें राहातात कळत नाहीं. त्यासी चिठी त्याची पाठवावी. गोविंदपंतास धवलपुरास पावून येणें व आणखी सेंभर स्वार चांगले नेमून पाठवावें. येथून सुटो तेव्हां पुढें जाऊंन निभाव भगवंत अधीन असे. यासी सरदार घेऊन येत असेत. स्वामीही सर्वज्ञ असेती. कालगती ध्यानास आणून सर्व आपले आज्ञेत वर्तेत याप्रमाणें योग बनलिया सौरस घडोन स्वामीकार्ये होऊन ये तेच स्वामी करतील. विस्तारे काये लेहूं. लोभ असो दिला पाहिजे हे विनंति.

¶*The letter refers to a squabble among Maratha generals.*

No. 269] [23-5-1771

पौ छ १९ रोवल
इसने

श्रीशंकर

शेवेसी नारो नरसी कृतानेक सां नमस्कार विनंती यैसी जे. येथील वर्तमान ताा छ ७ सफरपर्यंत मुा हिंडण नदी येथास्थित असे विशेष. इकडील वरचेवर सविस्तर वृत सेवेसी लिहीतच असतो. त्याजवरून * * * * रामचंद्रपंतास हुजूर पाठवीत होते. यैशास सिंदे व होलकर याणी तूर्त ठेऊन घेतले. माारनिले दिलीपासोन वीस कोसी हुजूर यावयाबाा आले होते; परंतु तेथून उभयेता सरदारानी आणिलें. याजकरितां विसाजीपंत रुष्ट होऊन दिलीहून हुजराथ फौजसुदा कूच करून हिंडण नदीवर दिलीपासोन सातआठ कोसी आले आहेत. आपआपलेत फूट प्रत्येक्ष लौकिकात आली. उभयेता म्हराठे सरदार यासींहि बिघटली आण दिलीचा शाह सोडोन आले; याजकरितां जफ्ती सुक्रतालाचे आसपास होती ती जाबतेखानाने उठविली. पुढे मनसब्यास गोष्ट अवघड पडल. सद्या पातशा येतां दिसत नाही. सुज्यायेतदौला तो माघारा गेला. आपला पुत्र पाच हजार फौजेनिसी दिला आहे. इंग्रजानेहि आपला सरदार येक दिला आहे. सारांश तो काही जलद येता दिसत नाही. दुमेरपर्यंत आला तरी उतम. हे उभयेता म्हराटे सरदार ज्या कारभारात नाहीत, तेव्हा परिणाम काही विसाजीपंताच्या केल्यावर लागत नाही, यैसे मनसबेचे वतीने जन बोलतात. सारांश भावविना सिंदे होलकर याचे खेरीज कोणी लहानमोठा काही बोलत नाहीत. रामचंद्र गणेशाकरिता या उभयेतांसी विरूध विसाजीपंतानी धरलिया फळ नाही. विसाजीपंतास तूर्त ग्रहस्तानी पाच च्यार जण आहेत यानी चुकविले आहे; याजकरिता मनसबा नासतो म्हणोन संकलित श्रीमंता व स्वामीस लिहिले आहे. सेवटास कारभार नासतो आण बदनक्ष होतो. आजपर्यंत याच ग्रहस्तानी येकमेकास आपरोक्ष चडी लाऊन नाश केला. कश्यासच जागा नाहीसा केला; आण पुढेहि तैसेच कर्तव्य करीत आहेत हे सेवेसी कलावे म्हणोन लिा आसे. याचा विस्तार फारच आहे; परंतु नालिशा वारंवार मी कशास लेहू. येवडी थोरपणे धणियानी ज्यास दिली आहेत ते अवेवस्त कारभार मनसबा करितात. मी तो बातमी लिहिणार, परंतु बातमी लिहिणे तेव्हा सहजच सर्व आर्थ आधिक आगले जसी करणीत येतात ते लिहिलेच पाहिजेत. सेवकास समाधान वाटत नाही. चेरण ज्या दिवसी द्रिष्टीस पडतील तोच दिवस मजला धन्य आहे. घरी मुलास वालवेकर थोरात तसदी देतो म्हणोन घरचे पत्र

मजला आले. यैशास ते कोणी पुण्यात आसले तरी माहाराजानी आज्ञा करून आथवा येक ताकीदपत्र वाल्वेस सादर करऊन मुलास कोणी काडीमात्र उपसर्ग न देत ते करणार महाराज समर्थ आहेत. निक्षूण ताकीदपत्र सादर वाल्वेस करवावे जे नारो नरसी कुलकर्णी मौजे बाहे हे सरकार चाकर याच्या घरी मुलाबालास कोणते येक गोष्टीचा उपद्रव केलिया कार्यास येणार नाही. तरीच घरचा बच्याव लेकराचा होईल, निदान जाणून सेवेसी विनंती केली असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Narsinh Kulkarni, the Peshwa's agent at Delhi, reports recriminations among Maratha Generals and expresses fear that this would lead to a complete failure of the expedition.*

---

*No. 270*] [*Recd. on 12-6-1772*

पा छ १० रबिलावल ज्येष्ठ सन सल्लास

पु॥ सेवेसी विज्ञापना

श्री

शाहाकडून नवाब इसामुदाखान व सुजादवल्याकडून येलजखान व अनुपगीर गोसावी आले आहेत. ते त्रिवर्ग पातशाहनी पाठविले आहेत. रा दादोंचे व त्याचे बलणे जाहले. त्याजवर तोफाहि देशाकडे रवाना जाहल्या. पातशाहाहि येका दो रोजानी कूच करून येतील. सुजादवलेयाजकडे भहिरजी ताकपीर व बालाराव गोविंद गेले होते तेहि आले. समागमे गोसावी व येलजखान आणिले आहेत. आद्याप निश्चये ठरला नाही. जापतेखानाची मुलेमाणसे तेथेच आहेत. जापतेखान फाहाडात आहे. हाफीज व दुंदेखान याचे वाकिल आले आहेत त्यां(चें) बोलणेचालणे जाहाले नाही. थोरले काम वजिराकडून निश्चये कामाकाजाचा करार जाहलियावर किरकोळी सर्व होऊन येतील. दौ चौ रोजात काय तो मनसबा होईल. परंतु स्नेहाचा प्रकार आहे. रा पाटीलबावा व सुजादवले पगडीभाई जाहले. येथे (प)गडी पाठविली होती. सरदचो सुभा पातशाहानी मोगल ओलीस दिल्हा आहे. पथरगडची वस्ताभाव निघाली ती निमे पातशाहास दिली. बाकी राहिली ती सरकारात निम व निमे सरदाराकडे दिली. हाती व नगदी व जवाहीर हे राहिले आहे. पातशा रुपये मागता(त)

---

१ विसाजी कृष्ण. २ सरहिंदचा.

त्यासहि दो लाख रुपये द्यावेसारिखे करार जाहला आहे. माहाराजाचे प्रतापे-करून सर्व गोष्टी हा कालपर्यंत चांगल्या आहेत, पुढेही उ(त)मच होतील. वरकड बारीक मोठे वर्तमान वकील शेवेसी लिहीत असतील त्याजवरून श्रुत होईल. रा पाटीलबावास रा राघो महार यास सरकारची पत्रें येवजाविसी ताकीद पाठ(वा)वी व सिष्टाचारी येक पत्र राघो मल्हार यास. ते म्हणतात की आम्ही चाकरी करितो परंतु धण्याचे पत्र कधी येत नाही. याजकरितां आगत्य कृपा करून पत्र पाठवावे. सर्व कारभार तेच करितात. पाटीलबावा व दिवाणजी येकरूप आहेत. येवजाचा करारमदार देतो म्हणू(न) त्याणीच केला आहे. याजकरीतां पत्र अगत्य पाठवावे. येवज पाठऊन देणे व नरसिंगराऊ राम याची रवानगी करून पाठवणें म्हणून समाधानार्थ पत्र पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. मजला आज्ञा कराल ती रागे भरूनच केली पाहिजे तरी काम होईल. येथील वर्तमानें परभारे कळतच असतील. परंतु आपले आज्ञेखेरीज कोणी नाही. हिंदुस्तानांतहि दबाव माहाराजाचा भारीच आहे. व सरदाराचाहि दबाव चांगला आहे. कोणेविसीची फिकीर नाही. हुंड्या पावलियावर कृपा करून उत्तर पाठवावयास आज्ञा जाहली पाहिजे. वरचेवर ताकीद पाठवावी म्हणजे येवज हातास येईल. तेथील ताकीद आल्याखेरीज येथे कोणी बोलणार नाही. स्वामीचा पायासिवाय दुसरीकडे चित्त नाही. परंतु लढल्याचे [१]डोही पडलो आहे. स्वामी सेवा होऊन धण्याचे पाये दृष्टीस पडतील तो सुदीन असे. हुंडीच्या चिठ्या १० दाहा आहेत. हिंदवी तीन व गुजराथी सात येकून दाहा चिठ्या पावतील. कासीद उद्या घेऊन सेवेसी येतील. यास काही इनाम द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. चोवीसा रोजाचा करार आहे. कराराप्रमाणे पावतील. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*An important letter, the first sheet of which is unfortunately missing, mentions that envoys from the Emperor, from Shuja-ud-Daula and Hafiz Rahmat and other Rohilla chiefs have arrived in Maratha camp to negotiate terms of peace. Spoils from Pathargarh have been divided between the Emperor and the victors. The writer makes a special reference to the valuable services of Mahadaji Sindia. The writer appears to be a co-officer of Visaji Krishna Binivale.*

---

१ डाही=डाव, डाही पडणें, संकटात पडणें.

No. 271] [15-6-1771

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजीपंत दादा स्वामींचे सेवेसी

पो भास्कर बलाल सा नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता छ १ रावल मुा पा इस्लामनगर यथास्थित असो विशेष. रा उमाजीपंतासमागमे पत्रे पाठविली ती पावलीं व ताकीदपत्रें पा तीहि पावली. आपले लिहिल्याअन्वयेच वर्तणूक करीत आहो. राजेश्वरास पा त्यास पूर्वीच पा असते तरी हरयेक जागा ठेंविला असता. प्रस्तुत आम्हाजवळच आहे. इकडील वर्तमान तर सांप्रत इकडील होलकर सिंदे याजकडील चारणकस पथके तमाम इकडे आली त्याणी लुटून पस्त केले आणि गंगातिरी चालले व तमाम घाटोघाटी उभयतांकडील पथके आली आहेत व आपल्या फौजा संभलेवरून गणमुक्तेश्वरचे सुमारे जाणार. होलकराची फौज गंगातिरी पोहोचली येसी वर्तमाने नानाप्रकारची रांगडे उठवितात. कोणी पैसा येक देत नाही. अतःपर इकडे गर्दीचा प्रसंग दिसतो. इकडे राहोन नफा दिसत नाही. यास्तव आपणास ताबडतोब लिा आहे. आपण लिा होते की रोहिलेयाची मामलत बिघडली. येशास मामलत जाल्याखेरीज तिनहि लस्करे पार उतरतील कीं काय? कोणी म्हणतात की राजश्री दादो मल्हार सुजातदौले याजकडे जाणार येसेहि बोलतात. त्यास कसे काये ते पत्र पावतांच लेहून पाठवावे त्यासारिखे करू. बरेलीकडील आमची बातमी आली त्यात लिा आहे की च्यार हजार फौजेनसी वीस दिवस जाले जाबतेखान सुजातदौलेयास भेटलाच होता. हाफीज रहिमत येक हजार फौजेनसी भेटावयास येतो हे वर्तमान कलल्यावर शाबादनजीक शाजाहापूर येथून कूच करून गोपा महूस सुजातदौले गेले. तीन रोज राहिले. हाफीज रहिमत येऊन लस्करात मुा केला आणि राहिले आहेत हे बातमी आणऊन बेइलाज जाणून माघारे लस्करात आले. भेटी जाल्या. परंतु चित्त शुद्ध नाही. जाबतेखानास सांगितले की पादशाचा व आमचा मिलाफ जालियावर तुझे कबिले सोडऊ याप्रो सांगितले. रोहिले हानिमध्येच आहेत. रोजदररोज सेदीडसे मरतात. याजमुले कोणी त्याजवल चाकर नोकर होते तेहि पलोन फरकाबाद वगैरे जागाजागा आले. कोणी आहेत त्यास दुखणी लागली आहेत येसे वर्तमान आहे. आपणाकडील वर्तमान कळावे यास्तव मुजरद लिहिले आहे. पत्र पावताच उतर देऊन मार्गस्त करावे त्यासारखे आम्हीहि गंगापार उतरून जाऊ अथवा महिनापंधरा रोज मुरादाबादेस मुकाम व्हावयाचे असिले तरी तैसेच ल्याहावे किंवा छावणीचा प्रकार असला तरी तैसेच ल्याहावे. त्यासारीखे वर्तणूक करू. पा मझोला (?) वगैरेविसी पादशाही

4398

सनदा आल्या आहेत व सरकारचेहि पत्र आले त्यास राजारामपंताचे गर्गशामुळे ठाणेहि जागाजागा बसलीच नव्हती व होळकर सिंदे याणी जबरदस्तीने दाखला मोकाबेलाहि दिल्हा नाही. यास्तव नि:कारण श्रम जाणून त्यांचे हवाले केले. सिबंदी कांहीं मागत होतो. त्यास ते हरामजादे प्रसंग पाहोन देत नाही येसे भाषण केले. होळकर सिंदे याच्या सनदा आल्या नाहीत. त्याही एकादो रोजी येतील. खलस पडलियास्तव येक पैसा वसूलहि कोणी देत नाही, या रितीचे वर्तमान आहे. कळावे बहुत काय लिाा? आपले पत्र येईल त्याप्राा वर्तणूक करू. कृपालोभ करावा हे विनंति.

साा बाबाजी जगन्नाथ साा नमस्कार विनंती लिाा परिसोन लोभ असो दीजे.

*¶Bhaskar Ballal reports the victorious advance of Sindia and Holkar on Ganamukteshwar thus forcing the Rohilla chiefs to fall back upon Farukabad. The Rohillas being thus defeated and disheartened cannot agree to a united plan of action.*

---

*No. 272*]  [*11-8-1771* ?

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री बाबूरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्ये राघो शंकर कृतानेक साा नाा विनंती. येथील कुशल ताा छ २९ राखर मुाा पुणे क्षेम असो विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन सांभाळ होत नाही तरी यैसे नसावे, सदैव पत्रद्वारे सांभालीत असावे. यानंतर इकडील वर्तमान तर श्रीमंत कटेरेयास गंगातीरी स्वामीसंनिध आहेत. प्रस्तुत प्रकृति चांगली जाहे. वरकड हिंदुस्थानची पत्रें होळकर व सिंदे यांची श्रीमंतास आली की राजश्री रामचंद्र गणेश यास सर्व फौज सरदार राजी हो * * याजकडे आले साा जरीपटका व सिकेकटार याजकडे दिल्हे. त्यावरून श्रीमंताही कटेरेयाहून सरदारास पत्रे पाठविली आहेत की राा विसाजी कृष्ण याजकडे जरीपटका व कटार असता तुम्ही फिरोन त्याजकडे दिल्ही हे गोष्ट काये? याउपरी रामचंद्र गणेश याणी हुजूर यावे, विसाजीपंत दादाही तेथें असावे याप्रोा येथे सर्व कारभारियाचे व श्रीमंताचे चित आहे. येविसी हलीहि येथून पत्रे गेली आहेत, मग काये ठरते ते पाहावे. आम्ही श्रीमंतापासी * * * * * * आहो परंतु काही योग घडोन येत नाही. येथील हुजूरचा प्रकार आपणास विदितच आहे. याजकरितां पेशजी राजश्री लक्ष्मणपंत बर्वे गेले त्याजबाा येणार

होतो. परंतु तीर्थस्वरूप राजश्री तात्याही आज्ञा केली की तूर्त दसरापर्यंत काये ठरेल त्याप्रो रवानगी करू. यैशास चाकरीची उमेद कितेक कामकाज करून होणे ते पूर्ववयातच घडते, वडिलाचे विचारे दुरंदेश घ्यावा यात काये तरी येथील प्रकार समजलाच आहे. मग दुसरा अर्थ कोण * यास्तव वडिलास लिहिले आहे. तरी वडीलपणे काये आज्ञा ती लेहून पाठविली पाहिजे. माझा हेत फारच आहे कीं आपणाकडे येकवेळ यावे. त्यास येविशीची सोये वडिलासिवाये नाहीं. तरी तेथील डौलाप्रमाणे काय ते आज्ञा पाठविली आहे, मार्ग लक्षीत आहो. पत्राचे अन्वयाप्रो येथून तीर्थस्वरूपापासून येण्याचा विचार करू. बहुत काय लिा कृपालोभ असो द्यावा हे विनंति.

¶*Ragho Shankar writes to Baburao about the Peshwa not approving of the action of Sindia and Holkar of handing over the flag and the seal to Ramchandra Ganesh. The Peshwa is inclined to recall Ramchandra Ganesh while leaving Visaji Krishna in the north to carry on the expedition.*

---

*No. 273*] [*13-11-1771*

[ घडणी रुमाल
नं. ९१२ बिनीवाले ]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री विसाजी कृष्ण स्वामी
गोसावी यासी

पो माधवराऊ बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे विशेष. सरकार ग्वालेरपैकी माहाल बहिरो अनंत याजकडे सरंजामास होते. त्याची जफ्ती पेशजी करून गोविद सामराज याजकडे कमावीस सागितली होती. त्यासी ते मृत्य पावले. सबब त्याचे नातू राजश्री गोपलराऊ नारायण याजकडे कमावीस बहाल केली आहे. तरी तुम्ही मनास आणून सिबंदीची नेमणूक करून देणे. बाकी यैवज राहील तो किल्याकडे नेमून देणे. जाणिजे छ ५ माहे साबान सुा इसने सबैन मैया आलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Visaji Krishna is informed by the Peshwa of the assignment of kamavisi to Gopalrao Narayan, a grandson of Govind Shamraj, and is asked to arrange for his equipment.*

No. 274] [18-11-1773 ?

पो छ २३ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामींचे सेवेसी

सेवक विसाजी गोविंदे साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत मार्गसर शुद्ध चतुर्थीपर्यंत सागर प्रांतीचें वर्तमान येथास्थित असें विशेष. कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. रजवाडे यांसी थैल्या पाठविल्या त्या त्यांजकडे रवाना केल्या आहेत. अलीकडील वर्तमान गोसावी (एक ओळ फाटली आहे.) आहे. रोज लढाई किल्याशी होत आहे. * * सिंग गीर गोसावी गुलसराईस आहे. गुजर वगैरे सडी स्वारी त्यां(णीं) आपली फौज, ते झांशीस गेले. यास्तव कालपीकडे येऊन जागा जाळली लुटली, याजमुळें सडी स्वारी त्याची याचे मुकाबल्यास करून खांसा किल्ल्याशीं लढाई करीत आहेत. अशांत तिकडून पांच हजार स्वार आल्यास स्थळें राहतात, नाहीं तरी स्थळें राहतां दिसत नाहीं. उभयेतां सरदारांकडून कांहीं मदत दोन हजार स्वार रवाना जाल्याचीं पत्रें आज आलीं. येथील कारकून त्याजकडे पाठविलें त्यांचीं लिहिलीं आलीं, त्यासी थोडें सामान आल्यानें दबाव बसणार नाहीं, यास्तव सेवेसी विनंती लिहिली आहे. इकडील रजवाडे सर्व जाऊन सामील जाले. कुमक आली त्याचे वस्तु कांहीं न जाल्यास हा प्रांतहि राहणार नाहीं. तूर्त धासत मानितात जे सरदार नजीक आहेत. उपराळा होईल. त्यांसी थोडे सामान आल्यास शिवाय उपद्रव दिसतो. राजे हिंदुपत व राजे गजसिंग व खुमानसिंग अद्यापि तिकडे * * * गुमानसिंग जाऊन * * हें * सविस्तर वृत्त सेवेसी लिहिलेंच होतें त्यावरून त्रिवर्गास पत्रें आलीं त्यावरून त्यांणींही जमयेत करीत आहेत. हुजुरची लिखोट मागतात. तेथून मसुदा त्याचा आला आहे तोच सेवेसी पाठविला आहे, त्याप्रमाणें तेथून हुजूरचें पत्र शिकामोर्तबनिशी पाठवावें. पुढें फौजा याप्रांती आल्यास उपद्रव आम्हांस होईल. हा संशय धरून लिहिलें मागतात; त्यासी जसा प्रसंग तसें केल्यास चिंता नाहीं. प्रस्तुत सरकारकार्यास हे आल्यानें च्यार दिवस शत्रुस दबाव बसोन पारपत्य होईल. याजकरितां मुजरद जोडी पाठविली आहे. त्रिवर्ग राजे यांसी पत्रें निरनिराळीं जें फौज रवाना जाली आहे. तुम्ही सामील होऊन गोसावी याचें पारिपत्य करावें. लिखोट पत्र निराळें राजे हिंदुपंत याचेंच नांवचें पाठविलें पाहिजे; हे

---

१ चांदोरकर.

सामील जाल्यास पत्रें त्याजला देतील, न जाल्यासी पत्रें देणार नाहींत. राजे हिंदुपत यांसी पोशाख सांत चिठी पत्र लिहोन देवावी. पोशाख येथून द्यावयासी येईल. सागर प्रांतीं (जमी)दारांनीं गडबड बहुत केली, त्यासीं राजे हिंदुपत याजकडून कांहीं फौज आणून येक दोन पारपत्यें केलीं; पुढें अद्यापि ते आम्हांकडे आहेतच. तिकडून फौज येत तों यासी स्नेह करून च्यार दिवस टाळ टाळ करीत आहों. विनाफौजा आल्याशिवाय बंदोबस्त होत नाहीं. सेवेसी श्रुत सविस्तर व्हावें यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें ? कृपा असो दिली पाहिजे हें विनंती

¶*Visaji Govind writes to Holkar's Diwan about disturbances in Bundelkhand.*

---

*No. 275*] [*12-5-1772*

[घडणी रुमाल
नं. ५१२ बिनीवाले]

पौ छ ३ राखर आ-
षाढ सन सलास बा
कासीद जोडी जथे रायेमल

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**विसाजी कृष्ण स्वामी यांसी**

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. राजश्री माहादजी सिंदे याजकडे सरकारचा यैवज येणे बीा रुो

६०१२८५ बाबती सरदेशमुखी प्राा मालवा वगैरे इाा सन समान सितैन ताा सन इसने सबैन पांच साला

७५००० रहीम बेग याजकडे सन समान सितैनात नजरेचा यैवज करार केला. त्याचा हवाला माारनिलेनी घेतला ते

५००००० माारनिलेकडे नजरेचा यैवज करार दाहा लक्ष पौ निमे वसूल बाकी निमे राहिले ते

---

१ संबंधांत (?)

११७००० कर्जदादन सन समान व तिसात रोख यैवज मारनिलेस हुजुरून दिल्हा तो.

४१३६२ सोमाजी कापसे याजकडे किले पुरंधरचे नालबंदी-संमंधे येणे त्याचा हवाला मारनिलेनी घेतला ते

४००० चिंतो अनंत यांचे गावाबाबत

१४८१६३।≡ किता

९८८६१॥≡ अचितराव गणेश याजबाबत

४९७४०॥ बाजी नरसीकडे

९२०० चिंतो विठल पौ

४०५४०॥ गंगाधर येशवंत याजबाबत सेवगावचे

---

४९७४०॥

३९६१। केशवराव कृष्ण याजकडे चिंतो विठल याचे कर्ज येणे. त्याचा यैवज मारनिलेकडे येणे.

---

१४८१६३।≡

---

१४५६८१०।≡

येकून चौदा लक्ष छपन हजार आठसे दाहा रुो तीन आणे यैवज येणे. त्याविसी त्यास हुजुरून पांचच्यार पत्रे सादर केली परंतु यैवज पाठविला नाही व या यैवजाचे वसुलास नरसिंगराव राम कारकून यास मारनिलेकडे पाठविले आहेत. त्यास जाऊन च्यार वर्षे होत आली. तथापि त्याच्यानेहि काही जाहाले नाही. सुस्त होऊन बसले आहेत व येविसी तुम्हासहि पूर्वी लिहिले होते कीं कारकून मारानिले याच्याने यैवज वसूल होत नाही याजकरितां त्यास हुजूर पाठविणे आणि तुम्ही यैवजाची निकट त्यास करून वसुलात येई ते करणे. या प्राो दोन तीन वेला लिहिले तत्रापि त्याप्राो घडोन न आले. सरकारकामास तुम्हाकडून आलस न व्हावयाचा असतां जाहाला. याजवरून अपूर्व वाटले. त्यास यैवज भारी मुदती टलोन सालाची साले गुदरली तथापि सरकाराचा यैवज त्यास द्यावासा वाटत नाही. ही गोष्ट ठीक नव्हे. मालकाचा यैवज परभारा सालाचे सालास माहालाकडून देविला असता म्हणजे तितकेच त्यास हलके पडते. तेहि त्याणी न केले. असोत सरकाचा यैवज तरी परिछिन घेतला पाहिजे. त्यास तर येविसीची कालजी नाहीच. याजकरितां तुम्हास लिहिले आहे तरी

तुम्ही त्याची भीड न धरतां निक्षूण ताकीद करून यैवज घेऊन हुजूर पाठविणे. खंडण्याबाबत वगैरे वाटणीचा यैवज त्यास द्यावयाचा तह आहे. तो यैवज झाडियानसी तुम्ही परभारा त्याचा संकोच न धरितां वजा॰ करून घेऊन. हुजूर पाठवणे व बाकी राहील तो त्याजपासून निकडीने घेऊन रवानगी करणे. +जाणिजे छ ८ सफर सुा इसने सबैन मया व अलफ बहुत काय लिहीणे हे विनंती.

¶*The Peshwa enumerates the amounts due from Mahadaji Sindia and asks Visaji Krishna to recover the amount from him without any delay.*

---

*No. 276*] *[29-5-1772*

पौा छ २६ रोावल
सन सलास

**श्री**

सेवेसी नरसिंगराऊ राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा वैशाख वद्य द्वादसी मुाा नजीक मुरादबाद प्रांत रोहिलखंड येथे स्वामीचे कृपावधी करून सेवकाचे वर्तमान यथास्थित आसे विशेष. येथील वर्तमान पेशजीचे पत्री सविस्तर सेवेसी लिहून पाठविले होते त्याजवरून श्रुत जाहालेच आसेल. हालीचे वर्तमान तरी राा माहादजी सिंदे सुजादवल्याकडे जावयाकरितां निघाले होते; परंतु राा विसाजीपंताचे व सिंद्याचे करारमदार जाहाले होते, त्यात काही अंतर पडले याजमुले राहिले. सुजादवले याजकरून आनुपगीर गोसावी व येलजखान आले होते ते पाटीलबावापासी आहेत, तेहि निरोप घेऊन जाणार. जापतखान सुजावदवले यांजपासी गेला. हाफीज व दुंदेखान हेहि जाऊन मिलाले. विसाजीपंतास सुजावदले म्हणतात कीं सर्व मामलत आमचे हाते घ्यावी. पातशाहा रोहिले जाट आदिकरून मामलतीचा फडशा करून देऊ; परंतु छावणी रोहिलखंडात करावी. रोहिलखंडचा रुपया येईल तो तुम्ही घ्यावा. रस्त आम्ही पोचाऊन देऊ. रोहिल्याचे पारपत्य पुरते करावे यैसे कितेक करारमदार जाहाले. इमानप्रमाणे पाटीलबावानी जाऊन सुजावदवले यास घेऊन यावे यैस करार जाहाला. पथरगडाहून कूच करून च्यार मजली आले. मग येथे राा विसाजीपंती व राा दादोपंत वगैरे याणी हाफीज दुंदेखान याची मामलत

---

+ 'तेरीज' नाना फडणविसाचे हातची. 'बहुत काय लिहिणे' मुजूमदाराच्या हातचें, 'हे विनंती' नारायणरावाची.

च्यालीस लाखावर ठराविली. सिंद्याखेरीज, व आणखीहि काही कामाकाजात उणे-आधीक पाहिले तेव्हां माहादजी सिंदे जाणार होते ते राहिले. विसाजीपंताकडे पाटीलबावा जात नाही. जागजागा मनसबे होऊ लागले याजकरितां मनसबा बिगडतो यैसा दिसतो. गंगेस पाणी फार आले, उतार नाही. देशहि दुर्घट आहे. सरदार येक विचारे नाहीत. येथील आवस्ता घरोघरच्या मनस्वी आहेत. यात ईश्वर परिणाम लावील किंवा धण्याचे पुण्य समर्थ आहे; नाहीतरी सर्व बरेच आहे. सर्वास आहंता फार जाली आहे. लोक देशास जावयाकरिता घाबरे फार आहे. काये घडेल ते खरे. येथील प्रकार दृष्टीस पडला तो सेवेसी विनंती लिहिली आहे. वरकड सिंद्याकडील यैवज येणे त्यापैकी दोन लाखाच्या हुंड्या करून रा। सदासिव नाईक भावे व रामदास रघुनाथदास याचे दुकानच्या पाठविल्या त्या पावल्याच असतील. हाली येथून पेठा पाठविल्या आहेत याहि सत्वर पावतील. पावलियावर कृपाळु होऊ उतर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. मितीप्रमाणे यैवज निकडीने द्यावयासी आज्ञा केली पाहिजे. बाकी यैवज राहिला तो श्रावण आखेरपर्यंत आठा लक्षाचा भरणा करून देतो म्हणून आणशपत करून राहाविले आहे. हातास येतील तेव्हा खरे; परंतु वरचेवर सरकारची ताकीद कीं यैवज जलदीने पाठऊन देणे. रा। राघो मल्हार यासहि ताकीद की सरकारच्या यैवजास बहुत दिवस जाहाले अद्यापि यैवज पाठवीत नाही; तरी लौकर पाठऊन देणे म्हणून सरकारची ताकीद आली पाहिजे. पातशाहा येथून दो मजली मागे आहेत. ते आलियावर येथून कूच होईल. पातशाहाहि आपले जागा खटे आहेत. करारात अंतर पडले म्हणजे सर्वास वाईट वाटते. येथील ग्रहस्ताची रीत काईम नाही यैसी दिसते. मजला जितके वर्तमान दृष्टी पडते तितके सेवेसी लिहून पाठवितो. आज्ञा होईल तरी लिहीत जाईन. ता। वकील सेवेसी लिहीत आसतील त्याजवरून श्रुत होईल. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ केला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Narsingrao Ram reports to the Peshwa that Mahadji Sindia and Visaji Krishna hold different views on the details of an agreement to be made with Shuja-ud-daula.*

---

*No. 277*] [*9-5-1772*

पो। छ १० रोवल जेष्ठ
सनवार संध्याकाळ सलास

**श्री**

सेवेसी नरसिंगराऊ राम साष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील क्षेम ता। वैशाख शुध ७ सतमी मु॥ नगिना प्रांत रोहिलखंड येथे माहाराजाचे कृपेकरून

सेवकाचे वर्तमान यथास्थित आसे विशेष. येथील वर्तमान पेशजीचे पत्री पथरगडचे मुकामीहून सेवसी लिहून पाठविले होते त्याजवरून श्रुत जाहालेच आसेल. हालीचे वर्तमान माहाराजाची आज्ञापत्र आले होते की पत्रदर्शनी उठोन येणे. त्याजवरून आज्ञेप्रमाणे लस्करातून निघोन पातशाहाच्या लस्करात आलो. तेथून निघोन देशास चाललो. तेव्हा सिंद्याकडून कारकून येऊन रा। विसाजीपंतदादास सांगोन राहाविले. दोन लाख रुपये सध्या देतो म्हणून करार करून राहिलो, त्यास तीन महिने सिंद्याचे लस्करातून बाहीर राहिलो होतो. येक महिना पातशहाचे लस्करात व रा। विसाजीपंताचे लस्कराजवळ दोन महिने राहिलो. दोन चार वेला समजाऊन घेऊन जावे याजकरितां आले परंतु गेलो नाही. दोन लाख रुपये दिल्हे तरी येऊ, नाही तर येणार नाही. तेव्हा कटकट करिता दोन लाखाच्या हुंड्या हातास आल्या. बाकीच्या येवजाचा करार केला आहे की श्रावणआखेरपावेतो आठा लक्षाचा फडशा करून देतो म्हणून रा। राघो मल्हार याणी आणशपत हातावर हात मारिला आहे. सरकारचाकरी होऊन यावे याजकरितां मेहनत करितो परंतु येथे लटक्याचे परवत आहेत. यातून निभाव होऊन हातास येईल ते खरे. भुकेबाग आहेत. लाखाचे लाख गडप होतात. परंतु इतकियाउपरांतिक लटके बोलनार नाही म्हणून करारमदार केला आहे. सध्या सर्व कामकाज सिंद्याचे हाते होते याजमुले सर्व त्याचे सलुखात आहेत. माझ्ञ येकल्याचे चालो कोण देतो ? परंतु माहाराजाचा प्रताप भारी च्यार आधिक उणे लागतील परंतु कार्य केलियाखेरीज येणे होणार नाही. सध्या दोन हाताच्या हुंड्या पाठविल्या आहेत. लाखाची रा। सदासिव नाईक भाव्ये याचे दुकानची तेथे पावलियावर पंचेचालीस रोजाचे वायद्याची व दुसरी रामदास रघुनाथदास याचे दुकानची येक लाखाची येकावनी दिवसाची येसी दोन लाखाच्या पाठविल्या आहेत. सेवसी येऊन पावतील. हुंडीप्रमाणे रुपये सरकारात घ्यावे. पथरगडचे येवजापैकी काही येवज देतो म्हणून करार केला आहे. तरी हातास आले तरी पाठवितो. आद्यापि येवज सरकारचे जामदारखान्यात आहे. मागाहून पेटाहि पाठऊन देतो. वरकड वर्तमान होलकराची व रा। दादाची येक्यता जाहाली. सिंद्याचे घरी भहिरजी ताकपीर याचे लग्न वैशाख शुध त्रितीयास जाहाले व नारायणराव जाधव याचे. हे उभयता पाटीलबावाचे भाचे, देसीहून नवऱ्या आणिल्या होत्या. रा। तुकोजी होलकर व त्याची स्त्री उभयता आहेर करावयास आली होती. लोकसुधा भोजनास आले होते संध्याकाली. सर्व विचार बराच आहे. पातशाहा आम्हापासून बारा कोशावर पथर-

गडावर राहिले आहेत. काही रुसवा आहे. रुपयाची वाटणी मागतात व पथरगडच्या तोफा आपल्याकडे मातबर आल्या आहेत त्या घेऊन जाऊ नका म्हणतात व आणखी काही मुलकी जाबसालात तफावत पडते याजमुळे रुसवा आहे. कळावे पात-(अपूर्ण)

¶*Narsingrau Ram, Peshwa's auditor with the Northern army, camplains how he is being put off in recovering the Peshwa's debts from Sindia. He incidentally refers to the reconciliation of Holkar and Visajipant.*

---

*No. 278*] [*20-4-1773*

पौ छ ३० सफर सलास सबैन

श्री

विनंती सेवेसी रघुनाथ हरि साष्टांग नमस्कार विनंती ताा छ १७ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान नवाब सुज्यातदौला व फिरंगी वगैरे जथले आहेत. आपणाकडील राजश्री विसाजी कृष्ण आदिकरून फौजा सड्या जाल्या. तोफखाना व बुणगे ग्वालेर (पाव)ती पाठविलें. युध्धप्रसंग होणार. दुसरे झांसी प्रांती पर्जन्यामुळे आफत आहे. हा प्रकार पूर्वी येक दोन वेळ शेवेसी लिहिलाच आहे. सांप्रत आखेर साल होत आले. हिसेब आकारून पाठवितों त्याजवरून ध्यानास येईल. दर्शनास बहुत दिवस झाले. याजविशी येक दोन वेळ लिहिले. परंतु उतर आले नाहीं. त्यास उतराची प्रतीक्षा करीतो. आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करूं. बहुत काये कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Raghunath Hari communicates that Suja-ud-daula and the English have mobilized their forces. Visaji Krishna has broken up his camp and sent back heavy guns and other baggage.*

---

*No. 279*] [*1762 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे
सेवेसी

विनंतीपत्रें लिहिल्यावर पत्रें आलीं. झाशीचे किल्ल्यास मोर्चे लागले. खांसा मीरचगीर झांशीस, शिंगगीर गोसावी गुलसराईस आला. याप्रमाणें वर्तमान

आलें आहे. दोन्ही स्थळें गेल्यास पुन्हा मेहनत बहुत करणें लागेल, अशांत मदत जाल्यास स्थळें राहतील. उभयेतां सरदारांकडे कोणी पाठऊन उपराला होय ते आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हें विनंती.

¶*A supplement to the preceding letter giving the news that siege batteries have been erected by the enemy for an assault on the fort of Jhansi.*

---

*No. 280*] [*21-11-1773?*

श्री

सेवेसी विनंती. सेवक कृष्णाजी नरसी कृतानेक सा। नमस्कार विनंती विज्ञापना. ता। छ ६ माहे रमजानपावेतो मु॥ वजिराचे लस्कर नजीक लखनौ गंगाउतरप्रांत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशष. रोहिल्यासी व वजिरासी सलुख होऊन फैजुलाखान वगैरे रोहिल्यास सोळा लक्षाचा मुल्क रामपूर माहाल दिल्याचे छ १ माहे साबानी कासिदाबरोबर सरकारांत विनंतीपत्र तपसीलवार पाठविले आहे. पाऊन वृत श्रृत जालेच आसेल. पंधरा लक्षाचा मुल्क रामपूर वगैरे खानमा।र याचा जागा पंधरा लक्षाचे माहाल दिल्हे त्यांत गुजराण होईल ति(त)के रोहिले राहावे, वरकड गंगा उतरून गेले. खानमा।र रोहिला यापासून पंधरा लक्ष रुपये नख्त घेतले. फिरंग्याचे विद्यमाने तह ठरला. पांचसा लाख रुपये खानमा।र रोहिला यापासून फिरंगी घेतले. रोहिल्याचे पारपत्य होऊन रोहिले खंड हस्तग(त) जाल्यास चाळीस लक्ष रुपये फिरंग्यास वजिरानी देऊ केले होते. त्या यैवजाचा भरणा फिरंग्यास करून देतात. हजार बारासे गोरे व सा हजार पुरबिये प्यादे तेलंग म्हणतात व वीस तोफा येवढ्याने फिरंगी आहे. त्यास तीन लाख दाहा हजार रूपये दरमाहे देतात. फैजुलाखान रोहिल्यास पंधरा लक्षाचा मुल्क दिल्हा. त्यासिवाये जाबतेखानाचा मुलुकासुधा पांसष्टी लक्षाचा इजारा तिघास दिल्हा. त्याचे आकरा हप्ते केले. येक हप्ता घेतला. रोहिलखंडचा सुभा मा।द हासीरखान यांस सांगितला. खानमा।र यांस झालरदार पालखी होतीच. सुभा सांगून साहेबनौबत व काही मरातब दिल्हा. खानमा।र यांजपासी पांच हजार राऊत व दाहा हजार प्यादे आहेत. पथरगडाकडे खानमा।र जमियेत सुधा राहिले. बिसोलींत च्यार हजार प्यादे व पांचसे परियेंत राऊत व आवळ्यांत च्यार पांच हजार प्यादे व पांचसेपरियेंत श्वार व बरेलींत च्यारपांच हजार प्यादे व साहेबजादा व मुर्तुजाखान व गोपालराव वगैरे तीनच्यार हजार राऊत यैसे रोहिलखंडात ठेविले. आनुपगीर गोसावी यांस आंतरवेद येकावन लक्षास इजारा दिल्हा.

त्याचे आकरा हत्ते केले. गोसावी मार यास साहेबनौबत व हती समरे वगैरे मरातब व फौज ठेवायाची मुख्तियारी देऊन छ २४ माहे साबानी आंतरवेदीत रूकसेत केले. महिना दोन महिन्यातले दक्षेणेत आपसचा फितूर तसाच राहिल्यास येमुना उतरायाची आज्ञा गोसावी मार यांस जाली. गोसावी मार यांचाहि दुराग्रह येमुना उतरून बुंदेलखंड इयासी वगैरे मुल्क घ्यावा. बुंदेले यांचे पारपत्य करावें म्हणौन हेत बहुत आहे. सर्व आंदेशा दक्षेणेत आपसचा फितूर दूर होऊन राज्याचा बंदोबस्त कसा होतो याची बातनी राखितात. दक्षेणेत राज्याचा बंदोबस्त होईल, तिकडील संधान पाहून येमुनापार उतरायाचे महिना दोन महिन्यानी करितात. मुल्यास बंद होऊन शरीरास समाधान नाही याकरिता सदरी लिहिल्याप्रों रोहिलखंड व आंतरवेदीचा बंदोबस्त करून दरकूच अयोध्यास चालले. चौपांचा दिवसांत आयोध्यास पोहचतील. महिना दीडमहिना निदान दोन चवदा दिवसात येत आसती. चौहूकडील डांक आहे. दरमाहे आठरा हजार रुपये डांकचा खर्च आहे. त्या संधानावर चालतात. सेवक आज्ञापत्राची मार्गप्रतीक्षा करितो. मागील देणेदाराचा तगादा पुढे नित्य कृत्य चालणे कठीण. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Narsi gives an account of the Rohilla war waged by Nawab Shuja-ud-Daula with the help of the English. The letter shows how Maratha cause suffered owing to the murder of Narayanrao Peshwa.*

---

*No. 281*] [*11-11-1773*

पाो[1] छ १ जिल्काद

श्री

विनंती सेवेसी रघुनाथ हरि सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ साबानपावेतो आपले कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. सांप्रत कृपापत्री सांभाल न जाहाला. तरी सदैव पत्री परामर्ष करीत असावें. यानंतर इकडील वर्तमान हा कालपर्यंत परजन्यामुले मवास वगैरे आपले जागा बसले होते. विजयादशमी जाहाली. यानंतर जागा जागा जमाव करू लागले आहेत. दतियात खेतसिंग सरकार सलुखी होता तो राज्यानें मारिला. त्यामागे राजापासी कोणी शाहाणा माणस सरकार सल्लुक राखोन राज्य चालवी येसा नाही. राजा अविवेकी आहे. पवार धंदेरे त्याचे स्वकीयच आहेत. तेच कारभारी केले

---

१ निरोप.

आहेत. सरकार तालुखियांत उपद्रव करीत आहेत. खासा बाहेर निघोन नरवराकडे गेला होता. तिकडून येतेसमई करेचा तालुकियांतील दोनच्यार गांव लुटिले. वरकड गांवचे जमीदार धरून दतियास नेऊन रुपये घेतले. पूर्ववत-प्रमाणे सलूख सरकारात राखितील येसे दिसत नाही. वोडशांतील प्राणसिंग पजनसिंग वगैरे हटेसिंगास वोंडशे दतियेकर याचे विद्यमाने दिल्हे. याजकरितां उभयतां सरकारचे तालुखियांत दंगा करीत आहेत. गुदस्तां महूराणीपूर वगैरे येथील वसूल रबीचा झाडून मीरन इमाचे दंग्यात घेतला. यंदाहि दुंडी करावी म्हणोन जमाव करूं लागले आहेत. खरिफाचा हंगाम वसूल घेतात. मवासाचे वर्तमान याप्रमाणे आहे. वजिराकडील वर्तमान आश्विन शुध्ध ६ चे पत्र वकिलांचें आलें. त्यांत मजकूर रोहिल्याचा व वजिराचा सला जाहाला. फिरंगी-यांचे मारफतीने मामलत ठरली. पंचवीस लक्ष रुपये नवाबास दिल्हे व दाहापंधरा लक्ष रुपये फिरंगियास देऊं केले. नवाबानें रोहिल्यांस कबिले ठेवावयास रोहिलखंडांत रामपुरा वगैरे पंधरा लक्षाची जाहागीर दिल्ही. वरकड इसमास इटावे वगैरे अंतरवेदीत जाहागीर द्यावी येसा तह ठरला आहे. दसरा करून कूच होणार. गंगा उतरून हस्तनापुरास येणार. तेथे नजफखान ते येकत्र होऊन जो मनसबा करणे तो करावा. नजफखानाची व वजिराची येकवाक्यता गुदस्तां इटावे याचे मुकामी जाहालीच आहे. मीरन इमना मोहोरम होऊन गेला म्हणोन वजिराचे चितात विषमता बहुत आली आहे. त्यास इकडे सरकारच्या फौजा मासपक्षात न आल्या तरी खामोखां इकडे दंगा होतो. दसरा जाहलियानंतर फौजेची रवानगी करीतो म्हणोन पत्री आज्ञा पेशजी आली होती. त्या भरव-सियावर दम धरून आहो. वजीर इकडे येतो येसी आवई पडली म्हणजे दतियेकर वगैरे त्यांचे सूत्रांत आहेत त्यांजकडे वकीलहि यांचे गेले आहेत. त्यास इतकियांत थोडीबहुत फौज या प्रांती रवाना होत्ये तरी उतम आहे. नाही तरी आमचे वस्तु फौज ठेऊन बंदोबस्त करावा येसा आवांका राहिला नाही. गुदस्ताचे दंग्यामुले खर्चाचे पेचांत बहुत आलो. त्याचा अजमास मागाहून सेवेसी पाठवितो त्यावरून ध्यानास येईल. सारांश सरकारचे किलेकोट व प्रांत आमचे स्वाधीन आज-पर्यंत येथास्थित आहे. येसा असोन स्वामीचे दर्शन देसी येणे होऊन होय तो आर्थ करणार आपण आहेत. त्यांतच उतम आहे. नाही तर उतम नाही. सरकारनामोशी आमचे शिरी. ज्ये ते गोष्ट जाहाली पाहिजे. फौजेस दिरंग देशच्या बंदोबस्तामुले असिल्यास आम्हास काय आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. त्याप्रमाणे केलियास आम्हाकडे दोष येणार नाही येसे करावे. गुदस्ताचा समय वैवाटला त्याप्रमाणे यंदा वैवाटेल येसे नाही. याजकरिता वारंवार विनंती लिहीत

आहो. फाजील बहुत जाहाले. याजमुळे साहुकारी वोढ बहुत जाली आहे ते विस्तारे लिहून काय? त्यांत जलोदचे फाजील कृपा करून देविले पाहिजे. चौकडून वोढ जाहालियास स्थित राहाणे कठीण आहे. येविशी चिरंजीव सिवराव सेवेसी विनंती करितील. आम्ही सर्वस्वे आपले आज्ञेचे लक्ष धरून वर्तणूक करीत आहो. आमचा परिणाम स्वामीचे हाती आहे. बहुत लिहिल्याने पाल्हाळ दिसतो. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Raghunath Hari to the Peshwa, reporting Shuja's victory over the Rohillas and his aggressive designs in Bundelkhand and requesting military help.*

---

*No. 282*] [*12-12-1773*

पौ छ १ जिल्काद
पौष.

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

पो रघुनाथ हरि सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २७ रमजानपावेतो आपलें कृपेकरून यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान वजीर सुजातदौले याणी रोहिल्याची मोहीम सर करून रोहिल्याचा मुल्क पथरगडसुधा घेऊन त्यास चाकर ठेऊन त्यास जाहागीर कोंच वगैरे यमुनेआलीकडील त्यांस द्यावयाचा करार करून वीस हजार फौज त्यांची समागमे घेऊन आपण गंगेवर रामघांटास आले. गंगेस पूल बांधोन अंतरवेदीत गोसावी व रोहिले व फिरंगी मिलोन प्याद व स्वार पनास साठ हजार फौज देऊन रा केले ते इटावियास येणार. गोसांवी दाहापंधरा हजार फौजेनिसी इटावियांस आले आहेत. यमुनेस पूल तयार होत आला. आलीकडे उतरावयाची त्वराच दिसत्यें. मासपक्षांत हरोलीस फौज आली आहे. इकडे उतरलियानंतर खासा मागाहून इटावियास येणार. इकडील राजेरजवाड्यास त्याची पत्रे आली आहेत की मराठियास आमल न देणे. त्यावरून प्रांत मजकुरी जमेदारानी दुंडी केली आहे, गुजर वगैरे यांणी तो मर्यादा सोडिली. सरकारचे जाग्यात गाव लुटीतात, मारीतात. तालुके मोट येथील बोल वगैरे येकदोन ठाणी गुजरानें घेतली. तेथे कमाविसदार आहेत त्याजकडेसच ते स्थल आहे. तरी स्थलासच आपाय दिसतो. हे वर्तमान तपसिले कोठवर लिहावे; आजपर्यंत स्वामीच्या कृपेकरून किले कोटाचे संरक्षण जाहालें आहे. परंतु पुढें प्रसंग भारी दिसतो. आमचे वस्तु जीवन्ये जितके होईल तितकी स्वामीशेवा

करावयासी अंतर करणार नाही. परंतु शत्रुचे बल विशेष. यास्तव मदत जाहाली पाहिजे. इकडील वर्तमान याप्रकारचे आहे. राजश्री बालाजी गोविंद व ग्वालेरकर सरकारांत लिहीतच असतील. येसे असोन लोकाचे लिहिल्यावरून रसदेची आज्ञा होत्ये. त्यास आमचे वृत सेवेसी विदितच आहे. पहिले फाजील सरकारात येणे व सलास आर्बाचे फाजील मसलती व आपतीमुळे बहुत राहिले. सालमजकुरचा प्रसंग तो या रितीचा. पैशास ठिकाण नाही. इतके असोन तूर्त स्थलाचे संकट पडिले आहे. यास्तव विनंती लिा आहे. सालमजकुरी रसदेची आज्ञा होते त्यास येथील पैसा उत्पन्न होईल तो येथे खर्चास पुरत नाही. यास्तव सालगुदस्ता वैशाख मासी विनंती लिहिली होती व आतांहि हेच विनंती आहे. हुजूर रसद कोणी देत असल्यास सरकारकाम करून घ्यावे. भ्रमाने नवा कोणी तरी रसद देईलच, इतकियाने सरकारकिफायत होऊन किलेकोट सरकारच्या स्वाधीन होऊन आमचा गला मुक्त सरकारच्या कोटकिल्याविषी होतो. चार वर्षे आम्हाकडे मामलत राहिली. आम्ही यथाज्ञाने यथाशक्ति जाहाली तितकी मेहनत केली. परंतु हे जागा बखेड्याची, उत्पन्न थोडके, खर्च बहुत, याजमुळें सरकारच्या प्रत्ययास सेवा येऊन किफायत नजरेस येत नाही व आम्ही कर्जदार बहुत जाहालो, याउपरी सावकारातहि पैसा मिलत नाही. स्वामीची आज्ञा सिबंदी न वाढविता बंदोबस्त राखावा. येथे स्वार अडीच हजार व प्यादे तीन हजार पावेतो आहेत. तरी बंदोबस्त होत (नाहीं). यास्तव स्वामीस विनंती लिा आहे. कृपा करून या संकटापासून मुक्त करणार स्वामी समर्थ आहेत. तपसिले लिहिल्याने मामलेदारी किसा दिसतो. परंतु फौजा येऊन लौकर उपराला होतो तर उतम आहे. लोकांचे लिहिल्यावरून उपेक्षा जाहालियास कलतच आहे. चिरंजीव सिवराव सेवेसी विनंती करितील. आज्ञा करणार खावंद आहेत. चिरंजिवाचे वस्तु रसदेची सरबरा होणार नाही. आम्हासच आज्ञा जाहालियास येथे कारकून ठेऊन सेवेसी येऊन समक्ष विनंती करू. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Raghunath Hari Newalkar of Jhansi to Sakharambapu, complaining of the disturbances created by Shuja-ud-Daula and the Rohillas, owing to which the writer pleads his inability to send in the yearly dues from his districts.*

---

१ तक्रार, संशय.

4412

*No. 283*] [*19-10-1768*

राजमंडळ

रोजकीर्द

तिसा ( सितैन मया व अलफ )

स्वारी राजश्री पंत प्रधान

माहे जाखर विा रामचद्र गणेश

तेरीख ७ रोज आश्विन शुध्ध नवमी सौम्यवासरे शके १६९० सर्वधारीनाम संवत्छरे मुा मौजे हडपसर हवेली पुणे

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंत प्रधान सुा तिसा सितैन मया व अलफ छ ७ जाखर

जमा रुाो

० सिलक

१९०००० जमा छ मजकूर पुणेपैकी स्वारी-कडे यैवज खर्च पडिला आहे त्यापैकी जमा रुाो

तेरीख १६ ( जाखर )

जमा जामदारखाना

कमाविस भेट बाा नारो कृष्ण चिंतो कृष्ण फडणीस याचा भाऊ दिाा सखूबाई सिंदे गुाा हरजी मता खिजमतगार सनगे येकूण किमत रुाा

[ तपसील ]

तेरीख २० ( जाखर )

जमा जामदारखाना

कमाविस भेट बाा सुलतानराव निंबालकर याचे घरी मिरजगावी स्वारी गेली तेथे आली ते गुाा हरजी मता खिजमतगार सनगे येकून

[ तपसील+ ]

तेरीख २२ ( रजब )

३ जमा छ मजकूर कमाविस भेट मौजे आबे कानबईचे बाा वेंकाजी पाटील गुाा सिवजी ठुबा खिजमतगार

१ रामचंद्र गणेश यास

+ तपशील गाळला आहे.

२९२

१ विसाजी कृष्ण यास
१ माधवराव रामचंद्र[1] यांस
—
२
—
३

[7-4-1769

जिलकाद

तेरीख २९ रोज चैत्र शुध प्रतिपदा भृगुवासरे शके १६९१ विरोधीनाम संवछरे मुकाम मौजे टाकली पो कलबरे

छ मजकुरी हिदुस्थानचे स्वारीची रवानगी जाहाली.

जिल्हेज.

तेरीख २

जमा रुा

९०७ सिलक रोज गुा जमा नख्त

१५००९९ जमा छ मजकूर रुा

१५०००० दुबेर्जी जमा खासा स्वारीपैकी यैवज खर्चास दिल्हा तो जमा

बाा याद रुो

९९९९९ होन हैदरी २२२२२ दर ४॥

५०००१ नख्त

१५००००

९९ ताा गुणाजी बहिरट जामदार पौ खर्चमुले जमा होन हैदरी नाणे २२ दर ४॥ प्रो रुा

१५००९९

१५१००६

१ रामचंद्र गणेशाचा पुत्र.

4414

तेरीख ४

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किंमत रुा

७० राजश्री विसाजी कृष्ण यास बाा फैज महमदखान रोहिले साा भूपाळ याणी समसेरखान वकील याजबाा पाठविली ते जमा गुाा भिवजी वाडेकर खिजमतगार दिाा मजकूर सनगे येकूण किमत रुाो

[ तपसील ]

तेरीख ६

जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत

१३० राजश्री रामचंद्र गणेश यास गुाा मल्हारजी भालेराव खिजमतगार

७० नारो शंकर याचे डेन्यास गेले तेथे आली ते

| | | |
|---|---|---|
| २० | तिवट पैठणी | १ |
| ५० | जाफरखानी पौ | १ |
| ७० | | २ |

६० बाा वकील समसेरखान पठाण भूपाळकर फैज महंमदखान रोहिले याजकडील [ तपसील ]

१३०

६९ विसाजी कृष्ण यांस नारो शंकर याचे डेन्यास गेले तेथे आली ते जमा गुाा मल्हारजी भालेराव खिजमतगार [ तपसील ]

१९९

[24-5-1769

मोहरम

तेरीख १७

जमा रुा

१० जमा छ मजकूर कमाविस भेट बाा जैतराम वकील दिाा गोहदकर जाट गुाा बालोजी माणकर खिजमतगार रुा

५ राजश्री रामचंद्र गणेश यास

५ राजश्री विसाजी कृष्ण यास

१०

२९४

सबैन मया व अलफ

रबिलोवल

५०००० जमा छ मजकूर

३५००० खंडणी सां भूपाल निा फैज महंमदखान रोहिले याजकडे स्वारीमुले येक लक्ष रुा घ्यावयाचे करार केले त्यापैकी तूर्त घ्यावे ते जमा गुा बापूजी नाईक दिा सिदापा सेट वीरकर रुा

१५००० कमाविस मेजवानी सां रातगड व करेन्हा (?) आंबपाणी निा सुलतान मााखान पठाण याजकडे पंचवीस हजार रुा घ्यावयाचे करार केले त्यापैकी जमा गुा बापूजी नाईक दिा सिदापा सेट वीरकर रुा

५००००

[7-8-1769

तेरीख ४ :— राखर

दफाते

गोविंद शामराजे[१] याचे नावे सनद हुजुरून नवे गोले तयार करावयाबदल रा राघो सखदेव व मैराल बाबुराव कारकून पाा आहेत. त्यास तुम्हाजवल सरकारचे गोले ठेविले आहेत त्यापैकी मााारनिलेजवल गोल्याचे फर्मे आहेत त्या फर्म्यास गोले लागतील ते देविले असेत. तरी मााारनिले फर्म्यास गोले लागतील ते घेतील. त्याप्रमाणे तुम्ही गोले देणे आणि कबज घेणे म्हणोन सनद

१

१ ग्वाल्हेरचा किलेदार.

4416

तेरीख ५

सरकारात तोफाचे गोल्याचे प्रयोजन आहे याजकरिता तुमचे तालुकियात गोले नवे तयार करावयाबदल हुजुरून राघो सखदेव व मैराल बाबुराव कारकून सिलेदार यास पा असे तरी मारनिले-जवल गोल्याची फर्म्याची याद अलाहिदा तपसीलवार दिल्ही आहे. त्यास तुम्ही गोल्याचा कारखाना लाऊन मारनिलेचे विद्यमाने गोले सत्वर तयार करणे. गोले जलद तयार करून लस्करांत पोहचाऊन देणे. याचा यैवज होईल तो तुम्हांस सरकारातून दिल्हा जाईल म्हणोन सनदा

२ सिपरी वगैरे जागा कारखाना लाऊन गोळे तयार करणे म्हणौन दिा जाधवराव यास सनदा

१ रामचंद्र शामराज यास

१ राघो मल्हार यास

—

२

२ गालेरीस धुव्यास (?) कारखाना लाऊन गोले तयार करणे म्हणौ सनदा

१ सिवाजी विठल यास

१ गोविंद शामराज

—

४

च्यार सनदा पा रुबरू

तेरीख ६

दफाते

सरकारांत दारूचे प्रयोजन आहे याजकरिता हुजुरून बापूजी गुंडो कारकून सिलेदार पा असेत तरी याचे विद्यमाने दारू जलद पक्के ५ पाच खंडी सरस जलद तयार करणे. दारू तयार जाहालियावर हुजूर लेहून पाठविणे; येथून आणविली जाईल. दारू मात्र जलद तयार करणे म्हणौन नारो रघुनाथ कादार पा शाहाडौरा याचे नावे

सनद १

पा रुबरू

4417

[10-8-1769

छ ७ राखर खर्च पोतापैकी रुाो

पागा व सिलेदार रुाो

३१ सिलेदार ठाणे बारखेडा येथे जखमी जाहाले त्यास खर्चास रसानगी याद रुा

[ तपसील ]

[13-9-1769

माहे जाावल

तेरीख १२

१००००० जमा छ मजकूर प्राा बुदेलखड वगैरे माहाल निा बालाजी गोविंद काादार याजकडे सालमजकूरचे रसदेचा यैवज करार केला त्याप्राो तूर्त घ्यावे ते जमा गुाा कासी नरसी.

२६०९० छ २७ राखर श्रावण वद्य १४

---

१०००००

सदरहूचे व्याजास सरासरी मिती छ १ जाावल भाद्रपद शुध्य द्वितीया जाबत लाऊन दिल्ही असे.

जामदारखानापैकी

दिाा बालाजी गोविंद कमाविसदार प्रांत बुंदेलखंड यास मामलत सांगोन वस्त्रे रुबरू दिल्ही.

सनगे आख

३४९ खासा बालाजी गोविद [ तपसील. ]

४९२ दिाा कासी नरसी

२४५ खासा [ तपसील ]

२०७ पुत्र असामी २ [ „ ]

७५ माहादाजी आपाजी मजमदार निाा त्रिबक कृष्ण [ तपसील ]

५३।. त्रिंबक राम फडणीस कालपी सुभा आख

२१७ विसाजी गोविंद [ तपशील ]
१०० चिंतो केशव [ „ ]
६० आनंदराव माधव कारकून [ „ ]
७४ गंगाधर गणेश खरे [ „ ]
७६। नीलकंठ शामजी निा चिटणीस रुजू गंगाधर राम चिटणीस

[4-10-1769

माहे जमादिलाखर

तेरीख ३

१० जमा छ मजकूर कमाविस भेट बाा परसादीराम वकील दिाा नजिबखान गुाा अनाजी जांबूलकर खिजमतगार
५ रामचंद्र गणेश यास
५ विसाजी कृष्ण यास

१०

तेरीख १५

२ जमा छ मजकूर कमाविसभेट राजश्री रामचद्र गणेश यास बाा बिजेराम वकील दिाा नजिबखान रोहिले गुाा हरजी मत खिजमतगार रुाा

तेरीख १६

दफाते

दिमत पागा हुजूर येमाजी भोइटे सिलेदार निाा गणेश विठल याजबाा घोडी कुमैत जखमी राघोगडचे मोर्च्यात जाहाली ती सरकारात घेऊन ठाणे अरुण येथे पाठविली असे; तरी तिची निगादास्त चागली करणे [ वगैरे ].

[3-11-1769

माहे रजब

तेरीख ३

खासुदगी

बाा देणे पुरुषोतम माहादेव वकील यास सुज्यातदौले याजकडे राा केले साा खर्चास राा याद १०००

[ कोठून कसे द्यावयाचे त्याचा तपसील ]

तेरीख ६

जामदारखानापैकी

दिा आलीगोहर पातशाहा सां दिली यास पुरुषोत्तम माहादेव हिंगणे याजबाा पोशाक पाठविले सनगे आख

[ तपसिल ]

तेरीख २० रजब

दफाते पत्रे

माहादाजी सदासिव याचे नावें सनद की बलीभद्रसिंग खेची प्राा खेचीवाडा याजकडे सालदरसाल सरकारचे खंडणीचा यैवज येणे त्याजबाा सालमजकुरापासून मुलूक सरकारांत घेतला. माहाल बीतपसील देहे

१९ ताा आरूण किलासुधा
८० पाा देहरी कला (?)
१९ पाा देहरी खुर्द
२९ पाा झाझोण (?) ठाणे सुधा
७६ पाा खैराड किले मदसूधनगड सुधा

२१९

३ किता फूटगाव
१ बरखेडा गढीसुधा
१ नटाईमढी पौ गढीसुधा
१ भादोर

३

२१८

येकूण दोनसे अठरा देहे याची वसुली बेरीज २६४९९६ दोन लक्ष चवसष्ट हजार नवसे शाहाणव रुा याचे सदरहू देहे सरकारात घेतले त्याची कमाविस सालमजकुरापासून तुम्हास सांगितली असे. तरी इमानेइतबारे वर्तोन अमल चौकसीने करून

कचे आकारमुळे ऐवज होईल तो सरकारांत पावता करीत जाणे आणि जाब घेणे, तेणेप्रमाणे मजुरा पडेल. तुम्हास माहालमजकूर नेमणूक सिबंदीची सालिना रुा

२९३०० स्वार

२०००० किता स्वार १०० दर २०० प्रो रुा

९३०० वासुदेव नारायेण

३०० जातीस

९००० स्वार २९ दर २००

९३०० १२९

२९३००

२७४०० प्यादे अकरमाही आकार

२६४०० किता ६०० दर ४ प्रो दर माहा

२४०० प्रो अकरमाही रुो

१००० किता प्यादे दर आसामीस तीन रुा प्रो अकरमाही

२७४००

*[22-11-1769*

तेरीख २२

दफाते पत्रे

माहादाजी सदासिव कादार पाा आरूण वगैरे माहाल प्राा खेचीवाडा याचे नावे सनदा की विक्रमाजित खेची व बलीभद्रसिंग खेची याणी वगैरे ब्राह्मण व भाट व बैरागी यास इनाम गाव व जमिनी देऊन पत्रे करून दिल्ही आहेत व तांब्रपट आहेत त्याप्रो सरकारांतून करार करून देऊन चालविले पाहिजे म्हणौन [ वगैरे ]

तेरीख २९

जमा जामदारखाना

कमाविसभेट सनगे येकूण किमत रुो बाा नारो गणेश दिवाण दिाा तुकोजी होळकर सनगे येकूण किमत रुो

१४० राजश्री रामचंद्र गणेश यास

[ तपसिल ]

१३० राजश्री विसाजी.कृष्ण यास

[ तपसिल ]

२७०

[14-12-1769

माहे साबान

तेरीख १५

१३४१६ जमा छमजकूर खंडणी सां खेचीवाडा निा बली-भद्रसिंग खेची याजकडे साल गुा सन तिसा सितैन-पर्यंत खंडणीचा यैवज तीन लक्ष पंधरा हजार तीनसे रुो येणे त्यापैकी जमा गुा विष्णु माहादेव रुो

९१२३ छ १ साबान

४२९३ छ ९ साबान

१३४१६

तेरीख १६

१०००० जमा छमजकूर कमाविस घासदाणा सा कोटे निा गुमानसिंग याजकडे स्वारीमुळे घासदाण्याचा यैवज रुो २५००० पंचवीस हजार रुो घ्यावयाचे करार केले त्यापौ जमा गुा आपाजी नारायण कारकून सिलेदार रुो

५८०० गुा आपाजी नारायण

४२०० गुा सिदापासेट वीरकर

१००००

तेरीख २९

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत बा बिजेसिंग स्रा जोतपूर प्रा मारवाड गुा भित्रजी गुजाल खिजमतगार सनगे येकूण किमत रुो

[ तपसिल ]

[31-12-1769

माहे रमजान

तेरीख २

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत बा। किरतसिंग ठाकूर झिलाई-
कर गुा। सुभानजी धुला खिजमतगार सनगे रुो

तेरीख ८

जालमसिंग झाले दिा। गुमानसिंग कोटेवाले याणी पेसजी भटवडे याचे लडाईत पाणिपतचे साली कामकाज चागले केले सा। तीर्थरूप कैलासवासी मल्हराजी होलकर याणी सिंदे-सुधा मौजे - येथील अमल दुतर्फा करार करून दिल्हा आहे त्याप्रो। स्वामीनी

तेरीख १२

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत रुो सा। प्रिथ्वीसिंग राजे सा। जयनगर याणी सहजासिंग वकील याजबरोबर पाठविली ती जमा गुा। सुभानजी धुला खिजमतगार सनगे येकूण किंमत रुो

[तपसील]

तेरीख २०

जमा जामदारखाना

[मुा। मौजे वलकडे पा। जयनगर]

कमाविस भेट सनगे येकूण किमत बा। चिंतो कृष्ण फडनीस माजी सिंदे याचे घरी भोजनास गेले तेसमई आली ती जमा गुा। आणाजी जाबूलवर खिजमतगार सनगे
किमत रुो

४५ राजश्री रामचंद्र गणेश [तपसिल]
४२ राजश्री विसाजी कृष्ण यास [ ,, ]

८७

तेरीख २८

खासुदगी

बापूजी माहादेव हिंगणे वकील देशास जातात सा खर्चास
रा यादी दोन रु

१००० किता देणे बापू माहादेव

१००० तूर्त सरदाराचे नावे लिहून सरकारातून
दिल्हे. पुढे सरदाराकडील यैवजी
घ्यावे येणेप्रो करार रु

५०० तुकोजी होलकर

५०० माहादजी सिंदे

१०००

२०००

[कोठून द्यावयाचे त्याचा तपसिल]

[30-1-1770

माहे सवाल

छ २

देणे परदरबार खर्च किसनसिंग व हरि नारायेण जाटाकडून
वकील आले आहेत त्यास मेजवानी रा याद रु
२००

[कोठून द्यावयाचे त्याचा तपसिल]

[काही पागांच्या सरदाराचीं नावे]

| सरदाराचे नाव | तैनात | स्वार | आठवडा<br>रोजमुरा+ |
| --- | --- | --- | --- |
| सोमाजी काले | सिलेदार | २२४ | ६९५॥। |
| पागा दि॥ गणेश विठल | २७८ खासा<br>१५० जातीस<br>१०० पालखीस<br>२८ शागिर्दपेशा | ४१ बारगीर | दुमाही<br>रोजमुरा |

+ या महिन्यांत लुटीमुळें एक रोजमुरा दिला नाहीं.

4424

१०० भिकाजी विठल
६६ कारकून [आसामी ३]
८७९ बारगीर ४१
२३३ बाजे लोक ३९
पागा हुजूर दिा गोविंदराव सदासिव १८२ खासा
९० जातीस
१०८ पालखी
८ दिवट्या अफदागिरा
१६ पोरें

पागा दिा धनसिंग
पागा दिा आपाजी पायगुडे
पागा दिा बालाजी खंडेराव
" " भिकाजी सिंदे

*[1-2-1770*

तेरीख ४

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यास सनगे येकूण रुो

६३ बाा देवाजी त्र्यंबक वकील दिा माहादजी सिंदे गुाा सुभानजी घुला खिजमतगार [तपसील]

६० बाा तुलसीपाल राजे साा करोली वकिलाब(रा)बर पाठविली ते जमा गुाा भिवजी गुंजाल खिजमतगार सनगे येकूण रुो [तपसील]

१२३

तेरीख ७

६ जमा छमजकूर कमाविस भेट गुाा बालोजी माणकर खिजमतगार रुो

२ बाा नैनसुख वकील साा करोली

४ बाा महंमदखान खोजे [वकील] दिा गाजदीखान

गाडदी दिमत हाय यास रमजानचे आकारपैकी तूर्त मोघम रसानगी याद

| | |
|---|---|
| १००० | दिा सेखलाल |
| ३०० | दिा सेखबुलण |
| ३९२ | दिा साहेबखान |
| ३०० | दिा पैसूलाबेग |
| ८ | भवानसिंग भालदार ८ |
| २००० | |

[ तपसील ]

तेरीख १०

खासुदगी

देणे दिा बाबुराव हरि सिलेदार खास पथकाचे स्वार ७५ यास रोजमरा येक माही रसानगी याद * * * ची रुपये ७५०

[ तपसिल ]

[8-2-1770

तेरीख ११

खासुदगी

देणे भगवंत गोविंद जाटाकडे वकिलीस आहेत त्यास खर्चास रसानगी याद रुा

५००

[ तपसिल ]

तेरीख १४

खासुदगी

परदरबार खर्च सा चंदेरी निा अनुरुधसिंग याजकडील खंडणी स्वारीमुले चुकविली त्यास बहुमान द्यावयाचे करार केले ते रसानगी यादी काररची रुा

| | |
|---|---|
| २५०० | राज्यास हतीबदल |
| ३०० | वकिलास |
| २८०० | |

[ तपसिल ]

तेरीख १९

जमा पोता रुा

कर्ज गुा साहुकार याजकडे येक लक्ष रुा द्यावयाचे करार केले त्यापौ जमा रुा

| | | |
|---|---|---|
| २७९।· | गुा चिंतामण नाईक वोंकर | [ तपसिल ] |
| ९०० | गुा आबाजी नाईक टंकसाली | [ ,, ] |
| ६३०९ | गुा बलवतराव गोविंद वाकडे | [ ,, ] |
| ८००० | गुा वलभसुंदर | [ ,, ] |
| ६९० | गुा लामण उतमचंद | [ ,, ] |
| ४०४८ | गुा नरसापा नाईक बेटगिरी | [ ,, ] |
| २००० | गुा रामेश्वर नाईक | [ ,, ] |
| २००० | ,, रघुनाथदास | [ ,, ] |
| १००० | ,, बालापा नाईक मिरजगावकर | [ ,, ] |
| १६७२ | ,, विष्णु माहादेव | [ ,, ] |
| २९३०८।· | | |

[15-2-1770

तेरीख १८ [सवाल]

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यास बा सिवाजी विठल याचे डेन्यास गेले. तेथे आली ती जमा सनगे गुा बालोजी माणकर खिजमतगार

[ तपसिल ]

[8-3-1770

माहे जिलकाद

तेरीख ९

खर्च जवाहिरखानापैकी

रणजितसिंग जाट कुंभेरकर भेटीस डेन्यास आले सा बहुमान सदरेस दिल्हे जडाव दागिने

[ तपसिल ]

तेरीख १६

खासुदगी

ता। हरि उमाजी कारकून सिलेदार यास कामगारीस इंग्रेजाकडे रा। केले आहेत त्यास कापड व जवाहीर वगैरे संरजामाबदल पेशजी बलवंतराव गोविंद वाकडे याजकडून कासीत देविले होते ते हाली देविले. रसानगी याद रुा।

१०००

[ तपसिल ]

खासुदगी

बदल देणे तुकोजी होलकर यास सा। जय जयनगर नि। प्रीतिसिंग यांजकडील खंडणीचे वाटणीचे यैवजी रा। याद रुा।

३९०००

[ तपसील )

[6-4-1770

माहे जिल्हेज.

तेरीख ९

४ जमा छ मजकूर बा। त्र्यंबकदास वकील दि। सुज्यातदौले गु। सिवजी ठुबा खिजमतगार रुो

तेरीख १०

जमा जामदारखाना

कमाविसभेट सनगे येकूण रुो

२२९ बा। तुकोजी होलकर याचे डेरियास गेले होते सा।

१२९ रामचंद्र गणेश यास गु। गणेश बलाल [तपसिल]

१०० विसाजी कृष्ण यास गु। मघाजी दिघा खिजमतगार दि। मजकूर [तपसिल]

तेरीख ११

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण रुा राजश्री रामचद्र गणेश व विसाजी कृष्ण यास [नवलसिंग] जाटाची लडाई फते जाहाली सा सरदारांचे डेरियास गेले तेथे पोशाख आले ते जमा गुा खंडोजी फुगा खिजमतगार व बालोजी माणकर रुा

| | | |
|---|---|---|
| ७५ | बाा कृष्णाजी व जिवाजी पवार | [तपसिल] |
| १४७॥ | बाा सिवाजी विठल | [ ,, ] |
| ९० | बाा आपाजी बाजीराव | [ ,, ] |
| २४० | बाा धोंडो दत्तात्रय [नायगावकर] | [ ,, ] |

तेरीख १२ /

दफाते पत्रे

गोविंद शामराज याचे नावे सनद की सरकारांत तोफखान्याकडे बाणाचे प्रयोजन असे तरी हे सनद तुम्हांस सादर केली असे त्या(स) बाणाचा कारखाना लाऊन बाण सुमार १००० येक हजार चागले जलद तयार करून लस्करांत पोहचाऊन देणे. बाणाचा पैका वाजबी होईल तो तुम्हास मजुरा पडेल. बाणमात्र जलद तयार करणे म्हणौन सनद

१

राा कृष्णाजी नारायेण
कारकून दिा तोफखाना

तेरीख २२

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण राजश्री रामचंद्र गणेश यास बाा नजिबखान रोहिले याचे डेऱ्यास गेले. तेथे पोशाख आले जमा गुा बालोजी माणकर खिजमतगार रुो

[तपसिल]

तफाते पत्रे

बाबुराव हरि याचे नावे सनद की तुम्हाकडे मथुरा वृंदावन वगैरे माहाल प्राा अंतरवे(द) येथील जप्ती सरकारांतून तुम्हास सांगितली आहे. त्यास तेथील आकार होईल त्यापैकी रणजितसिंग यास सिबंदीखर्चाबदल दर सेकडा पंचवीस रुा देऊन बाकी

राहील यैवज त्या यैवजी समाईक धर्मादाव माहाली असेल तो वजा करून बाकी यैवज राहील त्यापैकी सेकडा रुो २३।– तेवीस रुो पाच आणे वाटणी राजश्री तुकोजी होळकर यास देत जाणे म्हणौन सनद

१

पाा रुबरू

[ याच प्रो माहादजी सिंदे यासहि द्यावे म्हणून पुढल्या तारखेस सनद बार आहे तींत जादा मजकूर आहे तो ]

याचे इतल्याखेरीज तुम्हीच कारभार करिता म्हणौन याणी विदित केले. यैशास हे व तुम्ही मिळोन कामकाज करीत जाणे म्हणौन सनद

रा माहादाजी नीलकंठ
कारकून दिमत लवे

माहे मोहरम (सबैन)

*[11-5-1770*

तेरीख १४

१९८६ जमा छ मजकूर कमाविस

जमा रुो

३ कमाविस भेट

१७ राजश्री रामचंद्र गणेश यास

४ बाा किरपाराम वकील दिाा हफीज रहिमतखान रोहिले [तपसिल]

१३ बाा वकील दिाा अहमदखान व दुंदेखान गुाा बाळोजी माणकर

—

१७

तेरीख १९

जमा जामदारखाना

३२० बाा रणजितसिंग जाट कुंभेरकर याचे डेरियास गेले. तेथे पोशाख आले ते जमा [ तपसिल ].

छ १८

रवासुदगी

दिमत पागा हुजूर नजरेबाा घोडे आले ते जमा रास

२

⌣——दोन घोडे कमाविस नजर आले ते जमा बाा जाब पागा

मजकूर घोडी रास

१ राजश्री विसाजी कृष्ण यास बाा बिजेसिंग राजा साा जोतपूर प्राा मारवाड घोडा कुर्डा नर रास

१ विनायेक केशव फडणीस दिाा महिपत विस्वनाथ यास नजीबखान रोहिले याचे डेऱ्यास गेले तेसमई मारनिलेस दिल्हा तो घोडा बोर रास

—

२

⌣ —सामान लगाम.

२

तेरीख १९

रवासुदगी

परदरबार खर्च देणे वकील यास

मेजवानीबदल रसानगी याद रुा

३०० दिाा अहमदखान बंगस याजकडील चौघे मुतसदी यास

२०० दिाा हफीज रहमतखान

१०० किसनदास

१०० कृपाराम

———

२००

१२५ दिाा दुंदेखान आा २

७५ ५०

१२५ दिाा कासम आलीखान आा २

७५ ५०

———

७५०

[तपसिल]

[17-5-1770

तेरीख २०

१९१६२॥। जमा छ मजकूर

१८ कमाविसभेट गुा भिवजी गुंजाल खिजमतगार

१९ राजश्री रामचंद्र गणेश यास

९ बाा हिंमतसिंग बेटादेवाला

९ रतनसिंग मेढूवाला

९ शामलाल नजिबखानाकडील

तेरीख २३

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण बाा नजिबखान रोहिले याचे डेऱ्यास राजश्री रामचंद्र गणेश गेले ते आली ते गुा बालोजी माणकर खिजमतगार शाल फर्द ४ योा दर ६० प्राा रुा

२४०

---

No. 284] [9-6-1770

इहिदे

सबैन मया व अलफ

सफर (जेष्ठ शके १६९२)

तेरीख १४

जामदारखानापैकी खर्च

नजिबखान रोहिले डेऱ्यास आले साा रुबरू पाहून दिल्ही सनगे येकूण आख [तपसिल]

राजमंडळ

स्वारी राजश्री पंत प्रधान विद्यमान राजश्री रामचंद्र गणेश जफ्ती प्रांत अंतरवेद माा गणेश विठल व बाबुराव् हरी

३११

खासुदगी

बदल देणे सिलेदार यास समाईक ऐवजी ठाणे
अर बाा तूर्त खर्चास रुो

२०० माहादजी सिंदे यास छ १८ मोहरम
२०० तुकोजी होळकर यास छ १९ मोहरम

४००

[तपसिल]

माहे रावल (आषाढ शके १६९२)

राजश्री गणेश विठल व बाबुराव हरि
गोसावी यासी

सुा इहिदे सबैन मया व अलफ. कारकून सिलेदार जदीद तुम्हांकडे जतीचे कामास पाठविले आहेत. याच्या हातून लिहिण्याचे कामकाज वगैरे घेऊन यास रोजमरा दुमाही जतीपैकी रुा

३९ वेंकाजी सिवदेव
३९ भिकाजी वेंकटेश

७०

येकून दोन आसामीस सतर रुो रोजमरा देणे. जाणिजे छ १४ सफर

बार

माहे रबिलाखर (इहिदे सबैन)

तेरीज २७

खासुदगी

बदल देणे परदरबार खर्च उमरावगीर गोसावी दिा सुज्यातदौले
मेजवानी बाा राा विठोजी तुकोजी जथे भिकाजी नाईक रुा

१०००

[तपसिल)

माहे जाावल (इहिदे सबैन)

[15-9-1770

तेरीख २४

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण रुा राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यास बाा हाफिज रहिमतखान रोहिले [तपसिल]

तेरीख २९

खासुदगी

बदल देणे सिलेदार वगैरे यास रसानगी

यादी रुो

५० परदरबार खर्च फिरंगियाकडील प्रयागाहून वकील आले त्यास मेजवानी बाा खर्च

५० परदरबारखर्च याकुब आलीखान याजकडील वकिलास मेजवानी खर्च

३०० परदरबार खर्च नजिबखान रोहिले याजकडील शागिर्द-पेशास वगैरे इनाम रसनागी याद रुा

[तपसील]

*[14-12-1770*

माहे साबान (इहिदे सबैन)

तेरीज २६

जमा रुा

२९ जमा छ मजकूर कमाविस भेट, इटावे किला सर जाला सा लोकानी नजरा केल्या त्या जमा गुा अणाजी जांबूलकर खिजमतगार

९ राजश्री रामचंद्र गणेश यास

[तपसील]

२० राजश्री विसाजी कृष्ण यास

[तपसील]

माहे रमजान (इहिदे सबैन)

*[24-12-1770*

तेरीख ६

लढाई खर्च इटावे प्राा अंतरवेद हफिजखान रोहिले याजकडे होते ते मोर्चे लाऊन सरकारात घेतले त्यास सेख कबीर रोहिल्याकडील किल्यात होता त्याणे सल्लख केला दारू गोली दाणा वगैरे जिनस होता त्याची किमत व सिबंदी मिलोन गणोजी कदम व

कासी नरसी याचे गुजारतीने सेखमजकूर यास द्यावयाचे करार केले ते रसानगी याद रुा

५००००

तेरीख ११

दफाते पत्रे

पाा शाहापूर अकबरपूर प्रांा अंतरवेद येथील अमल पठाणाकडे होता. तो सरकारात जप्त करून कासी नरसी यास कमाविस सांगितली असे. तरी यासी रुजू होऊन पाा मजकूरचा बंदोबस्त अमल वसूल सुरलीत देणे म्हणौन जमिदाराचे नावे सनद

रसानगी याद

तेरीख १३

सिलेदार पुरुषोतम माहादेव वकील याजबरोबर सुज्यातदौले याजकडे कामगारीस राा केले आहेत. त्यास पेशजी बेगमी करून दिल्ही होती. हाली दुसरियाने रोजमरे आठवडे दुमाही मिलोन रसानगी याद रुा

[तपसील]

तेरीख ३०

दफाते पत्रे.

अहंमदखान बंगस याजकडील प्रांत आंतरवेदी येथील माहाल व गाव सरकारात जप्त करून तुम्हांस जप्ती सांगितली होती ते हाली मोकली केली असे तरी बंगस याजकडील अमल करून जप्ती उठऊन हुजूर येणे म्हणौन जप्तीदारस पत्रे

१ राणोजी गाईकवाड यास पाा कडसा नावनिसी

---

१३

२ उभयता सरदारस की प्रांत अंतरवेद येथील सरकारचे माहाल अहमदखान बंगस याजकडे होते ते सरकारात घेऊन त्याजकडील

माहाल प्रात मजकूरचे सरकारात जफ्तीत आले होते त्याची
जफ्ती मोकली केली असे तरी बंगसाकडील माहाल तुम्हाकडे
जफ्तीत आले असतील ते सोडून देणे म्हणौन पत्रे

१ तुकोजी होलकर यास

१ माहादजी सिंदे यास

—

२

—

१५

येकूण पंधरा पत्रे चिटनिसी दिल्ही असेत

[शाहाजानाबाद ऊर्फ जुनी दिली]

[19-2-1771

माहे जिलकाद (इहिदे सबैन)

तेरीख ३

रवासुदगी

देणे दिा महंमद कासम नगरकर सिलेदार यास रोजमरे आठवडे
सर्वाबरोबरचे देणे राहिले ते हाली. पाा रुबरू रुो

१२३॥। दसरियाचा चौ रोजा

२४७॥ पालपडतालाबदल रोजमरा येक

८३ मुसलमान लोकास रमजानचे इदीबदल पक्षाचा चौ
रोजा मराठ्यास पावला त्यात मुसलमान वजा केले
साा इदीबदल सर्वास दिल्हे त्याप्रो यास द्यावयास
राहिले ते.

४५४॥

[कोठून दिले त्याचा तपसील]

[10-3-1771

तरीख २२

रवासुदगी

लडाई खर्चे किले दिली मोर्चे लाऊन सरकारात घेतला. त्यांत
जाबतेखानाकडील सेख कासम होते त्यास सिबंदी वगैरे मिलोन
बालाराम दिा माहादजी सिदे याणी द्यावयाचे करार केले ते
हाली देविले रसानगी याद रुा

११०००

[तपसील]

तेरीख २८

दफाते पत्रे

फतुनिसा बेगम गाजुदीखान याची बहीण याजकडे पेशजी पातशाहीपासून पाा मजकूरपैकी वगैरे जाहागीर चालत आहे त्याची जफ्ती सरकारात केली आहे. त्यास हाली जफ्ती मोकली करून ही पत्रे सादर केली असे, तरी नजिबखानाचे अमलात चालत आल्याचा भोगवटा मनास आणून चालत आल्याप्रो चालवणे. रबीपासून अमल देणे म्हणौन जफ्तीचे कादाराचे नावे पत्रे [तपसील]

[26-3-1771

माहे जिल्हेज (इहिदे सबैन)

तेरीख ९

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किंमत बाा वलीहद जवाबक्ष शाहाजादे शाहाअलम पातशाहा याचे पुत्र याणी विसाजी कृष्ण यास खिलत दिल्ही ते गुाा बालोजी माणकर खिजमतगार सनगे रुाा

[तपसील]

खर्च पोतापैकी

किरकोली रुाा

९ इनाम खर्च स्वारी दिलीस वलीहद याचे मुलाजमतीस विसाजी कृष्ण गेले होते त्यास नावेत उतरले साा रसानगी सभाचंद्र चोपदार देणे नावाडी यास रुाा

२७१।।। वलीहद जुवाबक्ष शाहाजादे याचे स्वारी जिल्हेजचे इदीबदल इदगास जावयास बाहेर निघाले त्याचे हमराह विसाजी कृष्ण गेले होते तेथे खर्च जाहाला तो गुाा गुणाजी बहिरट जामदार रुाा

२४० परदरबार खर्च साा दिली नजर मोहरा नाणे रुाा

७९ बेगम जिनतमाहाल शाहा अलम पातशाह यांची आइस मोहरा नजर नाणे ९ दर १९

रुा

१६९ जुवाबक्ष शाहाजादे शाहा अलम याचे पुत्र यास नजर मोहरा नाणे ११ दर १९

२४० १६

३०॥। खैरात खर्च देणे फकीर दिलीचे

१ इनाम खर्च माली तुरे हार घेऊन आला त्यास

२७१॥।

२७६॥।

[तपसील]

माहे जिल्हेज (इहिदे सबैन)

जमा जामदारखाना

तेरीख ११

कमाविस भेट सनगे येकूण किमत रामचंद्र गणेश यास बाा पातशाहजादे सांं दिली यानी पोशाक पाठविला तो जमा गुाा मावजी हाडा खिजमतदार सनगे येकूण रुा

[तपसील]

तेरीज १८

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत राजश्री विसाजी कृष्ण यांस बाा माधवराव सिवदेव दिाा खंडेराव पवार याच्या डेन्यास मेजवानीस गेले तेथे वस्त्रे आली ते जमा गुाा सिवटी ठुबा खिजमतगार सनगे येकूण किमत रुा

[तपसील]

११ जमा छमजकूर कमाविस भेट विसाजी कृष्ण दिलीस गेले होते तेसमई सुज्यातदौले याची

हवेली पाहावयास गेले तेथे लोकानी नजरा केल्या त्याचे नावे लागले नाही गुा बालोजी माणकर खिजमतगार रुो

तेरीज २६

दफाते पत्रे

जागीर पेशजीपासून आहे त्याची जफ्ती सरकारात करून तुम्हाकडे सागितली होती ते हली मोकली करून हे पत्रे तुम्हास सादर केली असे; तरी तुम्ही सदरहू जागिरीची चौकसी करून नजिबखान रोहिले याचे अमलात चालत आल्याप्रमाणे आमल चालवणे. गावचा अमल रबीपासून चालवणे म्हणौन कादार माहालनिहाय याचे नावे पत्रे.

२ मलका जमानी याजकडे गाव बाा याजविसी वगैरे पत्रे

[तपसील]

२ मेहिदीकुलीखान याजकडे गाव बीाा वगैरे पत्रे

[तपसील]

२ सफिया सुलताना बेगम याचा भाऊ व बहीण याजकडे गाव

[तपसील]

९ मजितुदौले याजकडे गाव वगैरे

[तपसील]

२ +कासमअलीखानाचे लेकाकडे वगैरे गाव

[तपसील]

३ याकूब अलीखान याकडे गाव

[तपसील]

[याशिवाय आणखी नावे आहेत तीं]

१ बहेरमखान १ नौरंगखान १ हयातुनिसा बिबी १ हफिज इसफखान खोजे १ अमिरल निसा बेगम खानदौरा याची लेक

---

+ बंगालचा मिरकासम.

[21-4-1771

माहे मोहरम (इहीदे सबैन)

तेरीख ९

खासुदगी

तसलमात गोविंद शामराज यास ग्वालियेरीस तोफखान्याकडील गोले व बाण करावयाबदल तूर्त सामानाबदल रा याद रुा १००००

[तपसील]

तेरीख १०

खासुदगी

रदकर्ज गुा सिवाजी विठल सरंजामी सिलेदार हे सन तिसा सितैनांत हिंदुस्थानात आले. त्यास अहीरवाडा वगैरे ठाणी उठली. सरकार अमल उठला. सा मारनिलेनी भगवंतराव कदम सिलेदार दिा होलकर यास समागमे घेऊन ठाण्याचा वगैरे बंदोबस्त केला. त्यास खर्चास काही सरकारचे माहालचा येवज जमा जाहाला व बाकी यैवज कर्ज घेऊन खर्च केला व भगवंतराव कदम यास यैवज खर्चास दिल्हा त्यामुळे कर्ज यैवज जाहाला. त्याचा हिशेबाचा फडशा जाहाला आहे. त्या यैवजी तूर्त रदकर्जी देविले. रसानगी याद रुो

५०००० किता
११००० नारो शंकर राजे बाहादर याचे घेतले ते.

६१०००

[तपशील]

तेरीख २८

दफाते पत्रे

बालाजी गोविंद उपनाम गलगलेकर गोत्र काश्यप वास्तव्य हाली उजनी याणी दिलीचे मुकामी येऊन विनंती केली की आपले तीर्थरूप गोविंद तमाजी यास संवस्थान जयपूर येथील वकिली सरकारातून सांगितली होती. त्यास जयपुरी होते तेथे माधोसिंग याणी दंगा करून जिवे मारिले. (पुढील मजकूर गैरउपयोगी सबब घेतला नाहीं).

4440

[4-6-1771

माहे सफर (इहीदे सबैन)

तेरीख १९ छ मजकुरी घटका रात्रीस मृग निघाला.

खासुदगी

माहादजी सिंदे यास तूर्त उसने खर्चाची निकड आहे सा. पुढे येकदर वाटणीचे यैवजी वजा करून घ्यावे येणेप्रो करार करून रसानगी याद रुा

४००००

[कोठून घ्यावयाचे त्याचा तपसील]

---

No. 285] [18-6-1771

माहे रबिलोवल (इसने सबैन)

तेरीख ४

खासुदगी

देणे मजुरीखर्च पातशाहाकडून दोन लाख रुा सरकारात आले त्याच्या हुंड्या विकिल्या त्यास दलालास मजुरी दर सदे रुा ८÷ प्रो रसानगी यादी रुा

१२९

[तपसील]

तेरीख ६

खासुदगी

देणे परदरबार खर्च सा दिली पातशाहा यांजकडून साहेबराव वकील येथे आहे त्यास खर्चास पा रुबरु रुा

९०

[तपसील]

दफाते पत्र

दिलीचा किला सरकारातून तुमचे स्वाधीन केला आहे. तो हली माहादजी सिंदे याजकडे दिल्हा असे. तरी मारनिलेकडून कोणी येईल त्याचे स्वाधीन किला करून पावलियाचे कबज घेणे म्हणौन माधवराव सिवदेव याचे नावे सनद

१

पा रुबरु

4441

तेरीख ११

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किंमत रामचंद्र गणेश सिलेदार लोकाचे घरास गेले तेथे वस्त्रे आली ते जमा गुा मानाजी तरवडा खिजमतगार छ ९ रोजी आली सनगे सुमार

३॥ अनंदराव गणेश दिा नारो शंकर राजेबाहादर सनगे
२ त्र्यंबक भास्कर दिा सखाराम भगवंत
२ मीरखान टोके.

[4-7-1771

तेरीख २०

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किमत बा कटियेल फिरंगी कलकतेकर याणी हरि उमाजी याजबराबर पाठविली ते जमा

[ तपसील ]

तेरीख २३

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किंमत बा चेतसिंग वकील कासीकर याणे आणिली बलवंतसिंग राजे याजकडून [ तपसील ]

तेरीख २९

जमा छ मजकूर —————————— रु

४९४ कमाविस भेट बा हाय रामचंद्र गणेश यास देशास जातेसमई मार्गी आले ते जमा बा हिसेब रुो
४०० बा नवलसिंग जाट याणी नजर केले ते

रुा

माहे रबिलाखर (इसने सबैन)

तेरीख २९

दफाते पत्रे

किल दिली सरकारात होता तो हाली सैफुदी महंमदखान पातशाहाकडील याजकडे देविला असे तरी खान मजकूर याचे हवाली किला करून पावलियाचे कबज घेणे म्हणौन गणेश विठल याचे नावे सनदा

३

रसानगी याद

[22-9-1771

माहे जमादिलाखर (इसने सबैन)

तेरीख १२

जामदारखानापौ

राघो मल्हार यांस माहादजी सिंदे यांची दिवाणगिरी सांगितली सा सदरेस वस्त्रे सनगे येकूण आख

[तपसील]

तेरीख १८

खासुदगी

बदल देणे रसानगी यादी रुा

१००० तुकोजी होळकर यास पुत्र जाहाला सा बारशाचे दिवसी उसने दागिने घेऊन दिल्हे त्याची किमत दागिने

[तपसिल]

तेरीख १९

दफाते पत्रे

सरकारचे माहाल गाव असता रोहिल्यानी व जाटाने अमल उठऊन दाबिले होते ते हाली सरकारांत घेऊन भास्कर बलाल याजकडे कमाविस सांगितली असे. यासी रुजू होऊन माहालचा व गांवचा अमल दरोबस्त देणे व साल गुाचा यैवज बाकी राहिला आहे तोहि वसूल देणे म्हणौन जमिदाराचे नावे

सनदा

[तपसील]

[4-12-1771

माहे साबान ( इसने सबैन )

तेरीख २६

जामदारखानापौ ( खर्च )

दिमत नारो शंकर राजेबहादर यांस झांसीस रवाना केले सा निरोपसमई सदरेस वस्त्रे सनगे येकूण आख

२१२ अनंदराव गणेश

[ तपसील ]

९३ लक्ष्मण राहुजी

[ तपसील ]

[30-12-1771

माहे रमजान ( इसने सबैन )

तेरीख २३

रवासुदगी

देणे राघो मल्हार दि॥ माहादजी सिंदे पातशाहाकडून आले. त्याजसमागमे माणसे होती स्वार वगैरे त्यास खर्चास पा॥ रुबरू

रु॥

२००

[ तपशील ]

तेरीख २६

जमा जामदारखाना

जमा कमाविस भेट सनगे येकूण किमत राजश्री विसाजी कृष्ण यास गु॥ बाळोजी माणकर खिजमतगार सनगे येकूण किंमत रुो

४३० बा॥ अलीगौर पातशाहा याचे भेटीस गेले तेथे पोशाक आला तो जमा सनगे यो रुो

[ तपसील ]

२८९ बा॥ माहादजी सिंदे याच्या डेन्यास गेले तेथे वस्त्रे आली ते जमा सनगे.

[ तपसील ]

तेरीख २९

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण रुो बाा तुकोजी होळकर याच्या डेऱ्यास राजश्री विसाजी कृष्ण गेले तेथे पोशाक आला तो जमा

[ तपसील ]

माहे सवाल ( इसने सबैन )

दफाते पत्रे

पातशाहाकडील माहालांची जप्ती सरकारांत करून अमल तुम्हाकडे सांगितला होता. त्यास हाली माहाल पातशाहाकडे देविले असेत तरी तुम्ही आपले तर्फेच्या अमलदारास ताकीद करून आपलेकडील अमलदार उठऊन हुजूर आणवणे दिकत कोणेविसी न करणे म्हणौन पत्रे

१ माधराव सिवदेव यास की हवेली जाहाजानाबाद वगैरे माहाल प्रांत दिली याजविसी.

१ आबुराव विठल याचे नावे

१ पाा सोनपत

१ पाा पाणिपत

१ पाा गणोर

१ पाा खवरखोदा ( ? )

१ पाा सबलका

—

५

पाच माहालाविसी पत्र.

—

२

चिटणिसी

•

[24-1-1772

तेरीख १८

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किंमत स्वारी दिलीस पातशाहाकडे गेली तेथे आलीं ते जमा सनगे येकूण रुो

[ तपसील ]

4445

माहे जिलकाद ( इसने सबैन )

दफाते पत्रे

माहालानिहाय गंगापार येथील जाबतेखान रोहिले याजकडील अमल सरकारांत जप्त करून जप्ती महंमदखान रंझड यास सागितली असे, तरी यासी रुजू होऊन खोो हाफिज रहिमतखान व दुंदेखान रोहिले याजकडील दरोबस्त अमल सुरळीत देणे म्हणोन जमिदाराचे नावें सनद

१

महंमदखान रंझड यास की तुम्ही जमियेत सुधा गंगापार जाऊन तमाम मुल्ख(क) जाबतेखानाचा जप्त करून अमल करणे आणि आकार होईल तो सरकारांत पावता करणे आणि सरकारा बंदगीत हाजीर राहाणे. हाफिज रहिमत व दुंदेखानाचा मुल्क मात्र जफ्त न करणे म्हणौन १ सनद

—

२

रसानगी याद

तेरीख २८

२३ जमा छ मजकूर कमाविस भेट सडी स्वारी जाप्तेखानावर लडाईस गेली तेथे आली ते जमा गुाा बाळोजी माणकर खिजमतगार रुाो

[ तपसील ]

तेरीख २९

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण किंमत बाा अलीगौर पातशाहा याणी रोहिल्याचे लढाई फते जाली साा पाठविली ते गुाा बाळोजी माणकर खिजमतगार शाल फर्द २ दर ६२॥ प्राा किाा रुाो

१२५

[6-3-1772

माहे जिल्हेज ( इसने सबैन )

तेरीख १

२९८॥ जमा छ मजकूर कमाविस भेट गुाा बाळोजी माणकर खिजमतगार रुाो

२३७॥ दिा जाबतेखान पथरगडातून भेटीस आले सा मोहर नाणे

१० पत्र

४ सुलतानखान याचा पुत्र

२ शामलाल मुनसी

---

१६

१२० नजिबशाई ८ दर १५

१०१॥ मुरादाबादी ७ दर १४॥

१६ दिली सिका १

---

२३७॥ १६

४५ किता नख्त

७ जमातदार पथरगडातील

५ किसनसिंग दिा मेहरीसिंग जाट

२ भोलानाथ दिा जाबतेखान

२५ बा कृष्णदास राजा हस्तनापूर

१ गोमाशा सौदागर

१ दिनानाथ साहुकार

२ मा बलवंतराव वाकडे

२ गुा भिवजी वाडेकर नाव लागले नाही [ नाण्याचा तपसील ]

---

४५

१६ बा अली यादखान वकील दिा राजा गुा

---

२९८॥ राणोजी गुलवा मोहर दिली सिका

4447

खासुदगी

देणे माहादजी सिंदे यास वाटणीचे यैवजी तूर्त रसानगी याद रुा
१०००००

— येक लाख रुपये कर्ज गुा बलवंतराव गोविंद वाकडे याजकडे कर्जाचा यैवज करार केला तो देविला.

तेरीख २९

खासुदगी

सिलेदार वगैरे यास राजश्री रामचंद्र गणेश फुटोन निराले दिलीवर सितारामचे सराईजवल राहिले होते तेव्हा लोकास खर्चास व नालबंदी वगैरे यैवज दिल्हा तो बाा यादी रुो

[तपसील]

[17-4-1772

माहे मोहरम (इसने सबैन)

तेरीख १३

जमा जामदारखाना

कमाविस भेट सनगे येकूण रुा गुा बालोजी माणकर खिजमतगार सनगे येकूण किमत रुा

| | |
|---|---|
| ६३ | बाा अलीगौर पातशाहा यांचे डेन्यास छ १० जिल्हेजी स्वारी गेली ते समई पोशाक आला तो जमा सनगे योा रुा<br>[तपसील] |
| ७९७॥ | बाा हिसामुदीखान दिाा पातशाहा यांचे डेन्यास गेले तेथे बहुमान वस्त्रे आली ती जमा सनगे याा रुा<br>[तपसील] |
| ८६०॥ | |

---

**No. 286]** [18-6-1772

माहे रबिलावल (सलास)

तेरीख १६

११८ जमा छ मजकूर कमावीस मेजवानी बाा नजफखान दिाा पातशा याजकडून आली ते [तपसील]

तेरीख २८

खासुदगी

बदल देणे खडेराव पवार यास वाटणीचे यैवजी रुा
१००००

[तपसील]

माहे रबिलाखर (सलास सबैन)

जमा जामदारखाना

कमावीस भेट सनगे येकूण किंमत

१८॥ बाा अलीगौर पातशाहा यांचे डेन्यास गेले. तेथे वस्त्रे आली ती जमा किमत रुो

[तपसील]

१९९ बाा नारो अनंदराव दिाा तोफखाना याणी मेजवानी केली साा वस्त्रे दिल्ही ते जमा.

[तेरीख १३]

खासुदगी

देणे भवानीशंकर जनार्दन कारकून सिलेदार सुज्यातदौले याजकडे बातमीस आहे त्यास छ १ राखरचा दुमाही रोजमरा राा याद रुा [तेरीख १३]
३०

तेरीख १०

२१३९९ जमा छ मजकूर

२०००० खंडणी साा दिली साल गुाा खडणीचा यैवज करार केला त्या यैवजी गंगाराम सुकलाल साहूकार याणी हवाला घेतला त्यापो जमा.

खासुदगी

देणे तुकोजी होलकर यास रेवाडीचे वाटणीचे यैवजी रसानगी याद रुा
१००००

‿—दाहा हजार रुा खंडणी साा रेवाडी येथील साल गुाा खंडणीचा यैवज करार केला त्यापैकी सिदो माहादेव याजकडून देविले

[27-7-1772

तेरीख २९

खर्च पोतापैकी

२९७। पागा दिा भिकाजी सिंदे यास चरिंदा लागवड कामगारीमुळे खो केले त्याची किंमत वा रसानगी यादी २०९॥ श्रीभागीरथीस ठाणे फुटज खेडा येथे पूल बांधावयास रोहील-खंडातून पुढे पाठविले होते तेव्हा इा छ २७ सफर सन इसने ता छ १० रावल रोज १२ यो जिनस रुा

४३॥।=। फतरगडचे किल्यात रखवालीस ठेविले तेव्हा लुटीचा दाणा मिळा त्याखेरीज लागली ते चंदी वगैरे रुा

८ हरिद्वारास कुंभपर्वी श्नानास गेले तेथे दुरोजा चदी घेतली

२९७॥=।

[ तपसील ]

तेरीख २९

१९७९३॥ जमा छ मजकूर

४२ कमाविस भेट खुर्ज्याचे ठाणि-यास मोर्चे लाविले होते ते फते जाले सा लोकानी नजरा केल्या त्या जमा गुा बालोजी माणकर [ तपसिल ]

[22-8-1772

जमादिलाखर (सलास सबैन)

तेरीख २२

माहाल प्रांत अंतरवेद येथील जाटाकडील अमलाची जफ्ती सरकारात करून अमलदार पाठविले आहेत. यासी रुजू होऊन अमल वसूल सुरलीत देणे म्हणौन चौधरी व कानगो याचे नावे [ तपसील ]

रसानगी यादी.

माहे रजब ( सलास सबैन )

रत्नशालेपैकी खर्च

हरी बावाजी यांस पागा व मामलत सांगितली सा बहुमान सदरेत बा भेट पातशाहा माल मोत्याची समेत पदक घाट मिनेगार शहत सुमार [ तपसील ]

[28-10-1772

साबान [ सलास सबैन ]

तेरीख १

खासुदगी

देणे गाडदी दिमत हाय यास वीस रोजा व नेबाद मिलोन रुा

—— पंधरा हजार पाचसे अकरा रुा देविले रुा

११४९० कमावीस किले फतरगड जाबतेखान रोहिल्याकडील सरकारात घेतला त्यात त्याजकडील महमदखान किलेदार वगैरे आसामी २३ होते ते कैदत ठेविले होते. त्याजपैकी आसामी तीन पलाले. बाकी वीस आसामी राहिले त्याचा खंड केला. बा करार याद रुा

१०००० यैन खंड

२००० दरबार खर्चाचे

१२०००

पैकी वजा पोता जमा जाहाले रुा ५९० बाकी राहिले ते देविले [ तपसिल ]

[7-12-1772

माहे रमजान (सलास सबैन)

तेरीख ११

जामदारखानापैकी

जाबतेखान रोहिले यांस डेन्यास आले ते समई सीतकालाबदल पोशाख सदरेस सनगे आख [ तपसील ]

तेरीख १९

रवासुदगी

बा। देणे भवानीशंकर जनार्दन कारकून सिलेदार नवाब सुज्यातदौल याजकडे बातमीचे कामास आहे. त्यास खर्चास रसानगी यादी रुा

[ तपसील ]

माहे सवाल (सलास)

तेरीख ३

जमा जामदारखाना

कमावीस भेट सनगे येकूण किमत बा। आलीगौर पातशाहा यांचे भेटीस गेले तेथे पोशाख आला तो जमा. गु।। बालोजी माणकर खिजमतगार सनगे येकूण रुा

[ तपसील ]

तेरीख २१

दफाते पत्रे

माहाल प्रांत अंतरवेद येथील पातशाहाकडील अमल सरकारांत घेऊन रघुनाथराव बलाल याजकडे जसी सांगितली असे तरी यासी रुजू होऊन पो मा।राचा दरोबस्त अमल वसूल याजकडे सुरलीत देणे म्हणौन जमिदारास सनदा [ तपसील ]

तेरीख २८

२२०१८१ जमा छ मजकूर

२००० खडणी बा। अमेराहा पौ नजबखान याजकडून आला तो गु।। कुबेर वाणी बरेली सिका रुा

६८००० खंडणी बा।। हाफिज रहिमतखान रोहिले याजकडे गंगापारचे खंडणीचा ऐवज येणे त्यापौ तूर्त जमा गु।। तोताराम बरेली रुा

११९६९० खंडणी बा। लोहरीसिंग जाट याजकडे
खंडणीचा ऐवज करार केला. त्यापौ
तूर्त पाच लक्षाचा हवाला हरसेट वीरकर
याणी घेतला त्यापौ जमा गुा। बापूजी
वामन दि। मजकूर चलनी

[1-3-1773

माहे जिल्हेज (सलास)

तेरीख ७

खासुदगी

देणे नजबखान मोगल यास रोजा बा। रा। येकंदर यादीपौ रुा।
४०००

[ तपसील ]

तेरीख ११

देणे रामचंद्र तुकदेव वकील जयपुरी बातमीस आहेत त्यास
खर्चास बा। वरात पुणे रुा १००० पैकी पेसजी पावले २००
बाकी हाली रा। याद रुा।
८००

[ तपसील ]

तेरीख २४

खर्च पोता पौ पागा व सिलेदार

६००० पथक दि। मानाजी सिंदे जदीद छ २९
जिल्हेजापासून करार करून ठेविले त्यास
दरमाहा तैनात करार

७००० खासे आसामी

२००० भगीरथराऊ सिंदे
३००० मानाजी सिंदे
१००० रघुनाथराऊ सिंदे
१००० नारायेणराव सिंदे

७००० ४

तेरीख २९

खर्च पोता पौ पागा व सिलेदार रुा

१० सांडणीस्वार महंमदखान बक्षी हफीज रहिमतखान रोहिले याजकडील यास मोडल्याची बातमी घेऊन आले साा इनाम राा बेणीराम चोपदार रुा

९ पीरमहंमद दिाा पागा हुजूर

९ ताजमहंमद दिाा पागा हुजूर

निाा गोविंदराव सदासिव

१०

[5-5-1773

माहे सफर (सलास)

तेरीख १२

३०६६२ जमा छ मजकूर बरेली सिका रुा

३०९०० खंडणी बाा हाय याजकडे गंगापार फौजा जाऊन तुकोजी होलकर यार्णा घेऊन आले. त्याजकडे खंडणीचा ऐवज करार केला त्यापौ तूर्त जमा गुाा चेतराम वकील दिाा जाबेतखान रोहिले भरणा रुो

२३९०० बाा अहेमदखान बक्षी दिाा हाफिज रहिमतखान रोहिले रुा

७००० कानर्जीमल चौधरी पाा मुरादाबाद

३०९००

तेरीख १६

जामदारखानापैकी

जाबतेखान रोहिले यास निरोपसमई सदरेस वस्त्रे सनगे आख

[ तपसील ]

तेरीख १७

खासुदगी

देणे मैराळ केशव कारकून सिलेदार जाफ्तेखानाकडे खडर्णांचे वसुलास पाठविले सा। दुमाही छ १ सफरचा रा। माहादाजी निलकंठ लबे रुा। १००

[ तपसिल ]

तेरीख २१

जामदारखानापैकी

दिा। तुकोजी होळकर यास निरोपसमई सदरेस

| वस्त्रे | | आख |
|---|---|---|
| ७२७ | खांसा | [ तपसील |
| ४९९॥ | नारो गणेश | [ „ ] |
| ५५९॥ | बापूजी होळकर पुतणे | [ „ ] |
| २३९॥ | सुलतानजी लांबहाते | [ „ ] |
| १२० | भिवाजी रणसोड | [ „ ] |
| २६३ | पाराशर दादाजी | [ „ ] |
| १०० | गिरमाजी व्यंकटेश | [ „ ] |
| ९७ | पाडुरंग शंकर | [ „ ] |
| ५०॥ | निळकंठ तुकदेव चिटणीस | [ „ ] |
| १२०॥ | महिपतराव नि। फडणीस | [ „ ] |
| ५० | त्र्यंबकराव सित्रदेव सिकेनीस | [ „ ] |
| ३८। | लक्ष्मण नरहर सबनीस | [ „ ] |
| ११८ | मकाजी गिते | [ „ ] |
| २१२॥ | खंडो जगदेराय | [ „ ] |
| ६०४। | भले माणूस आ। १९ यो | |

२ श्रीनिवास पुरुषोत्तम
२ निंबाजी होळकर
२ हिदायत मोदीखान
२ शास्तेखान
२ महादजी सिंदा
२ हटेसिंग

२ खडोजी आंधळे
२ हजरत काजी
२ खैरातीखान
२ दावेदारखान
२ बापू जामदार
२ सैद इमाम
२ रायाजी होळकर
२ लक्ष्मणजी बगाडे
२ सजणाजी जोगारे

---

३०

---

आख

[ तपसील ]

७९ कृष्णराव गोविंद

तेरीख २३

दफाते पत्रे

सा जयपूर येथील मागील खंडणीचा यैवज येणे. त्यापैकी शाहा दुबुला (?) याचे मारफतीने रुा १५०००० दीड लाख रुा वलभ सुंदर साहुकार याचे गुजारतीने सरकारांत जमा जाहाले असेत. खंडणीत मजुरा पडतील म्हणौन खुशालीराम दिवाण सा मार याचे नावे जाब

१

रा घनःशाम नरहर कारकून सिलेदार

[12-4-1773

माहे मोहरम ( सलास सबैन )

तेरीख १९

दफाते पत्रे

पो मेरट वगैरे माहाली गव्हारानी गर्दी फार केली त्यास नवी सिबंदी करार करून दिल्ही पाहिजे म्हणौन माहादाजी नीलकंठ याणी विनंती केली. त्याजवरून नेमणुकेसिवाय जाजदी प्यादे आा १५०० दीड हजार ठेवावयाची आज्ञा केली असे, तरी सदरहू

प्यादे ठेऊन माहालाचा बंदोबस्त करणे. गर्दी दूर जाहालियावर हे प्यादे दूर करणे म्हणौन धोंडो गोपाल कमाविसदार याचे नावे सनद

१

रा माहादाजी निलकंठ दिा लबे.

तेरीख २६

खासुदगी

देणे रूपचंद कारकून सिलेदार दिलीप पातशाहाकडे नेहमी बातमीस आहे. त्यास दुमाही छ १ सफर रा याद रुा

४०

[ तपसील ]

---

*No. 287*] [*7-6-1773*

आर्बा सबैन

माहे रबिलोवल

तेरीख १९

खासुदगी

देणे दिा रामचंद्र दामोदर सरंजामी यास रा सिंदो माहादेव कारकून सिलेदार रुपये

३६०० पेसजी घोडी लडाईत पडली त्याची किमत रा यादी

१२०० निंबाजी भाड याची घोडी पातशाहाचे लडाईत पडली त्याची किमत

१८०० धुलोजी पवार याची घोडी इटावेयावर पडली त्याची किमत करार रुा

६०० मुरारजी सिंदे याचा घोडा जाफ्तेखान रोहिले याचे लडाईत गोली लागोन गंगेत बुडाला त्याची किमत करार रुा

---

३६००

माहे जमादिलौवल (आर्बा सबैन)

तेरीख १९

दफाते | पत्रे

हिंदुस्थानचे स्वारीचा तोफखानापैकी तोफा वगैरे कारखाना भेलसे यास ठेविला आहे त्यास बेगमी बीतपसील कलमे

तेरीख २०

जामदारखानापैकी

दिा नवाब गाजुदीखान यांस निरोपसमई सदरेस वस्त्रे सनगे यौ आख

१९४ मुर्दा हुसैनखान वकील
[ तपसील ]
४० त्रिंबक गिरमाजी [ „ ]
३९॥ सिवराम खंडेश्वर [ „ ]

विस्वासराव कासी कारकून सिलेदार नवाब गाजुदीखांन यांजकडे कामगारीस आहेत. सा निरोपसमई सदरेस वस्त्रे सनगे यो आख
[तपसिल]

तेरीख २१

दफाते | पत्रे

बालाजी गोविंद याचे नावे सनद की नवाब गाजुदीखान यास जाहागीर बुंदेलखंडपौ तुम्हाकडून देविली. त्याचे बंदोबस्तास विस्वासराव कासी पाठविले आहेत. त्यास जाहागीर तुम्ही नेमून द्याल त्याच बंदोबस्त होई तोपरियेंत हे तेथे राहातील. त्यास रोजमरा दीड माही पेस्तर साल सन खमस सबैनापासून रुा १०० शंभर देविले असते. छ १ रावलपासून दीड माहीचे तेरखेप्रो प्रांत बुंदेलखंडपौ देत जाणे म्हणौन सनद
१
रा याद

छ २२

खासुदगी

बा देणे किले ग्वालेर निा गोपाळराव नारायण यास सन आर्बा सबैन किले मजकूरचे बेगमीबा तूर्त रसानगी यादी रुा
३२०००

4458

तेरीख २८

रवासुदगी

बा देणे पागा दिा आपाजी पायगुडे यास रसानगी यादी रुा

४४५० पडल्या घोड्याची किमत मारनिलेनी पागा मजकुरी खंडली ते इतबाराने करार करून हाली रा यादी दोन रुा

२५०० रोहिल्याचे लडाईत व पथरगडावर पडली ते

[ तपसील ]

१९५० रामघाट फिरंगी याचे लडाईत पडली रुो

२१५ हत्यारे वगैरे लडाईत मोडली त्याची किमत रसानगी यादी रुा ४१ शेरमहूचे बारीत्र.

*[15-9-1773*

माहे जमादिलाखर

तेरीख २७

खासुदगी पागा वगैरे याजकडे पथरगडपैकी घोडी

१६६१ हिसेदारास वाटणीपौ येकंदर घोडे २२९८ निघाले त्याची वाटणीप्रो द्यावी त्यापैकी दिल्ही आहेत ती. रास

१०४३ पातशाहा सा दिली वाटणी ११४९ पौ

२४१ तुकोजी होलकर वाटणी प्रो

२४१ माहादजी सिंदे वाटणी प्रो

१३६ खंडेराव पवार वाटणी १३८ पौ

१६६१

[19-9-1773

माहे रजब (सुा आर्बा सबैन)

छ १ रजब जमा पोता

जप्ती पथरगड बाा जाफ्तेखान रोहिले किल्याची जप्ती करून नख्त घोडी उंटे वगैरे वस्तभव आणिली त्यापैकी नाणेवार यैवज अमानत जमा धरावयाचा राहिला होता तो हाली जमा बाा झाडे अलाहिदा रुो

३७८२९४।= सोने तोळे येकूण रुा

४९८१॥१ दागिने येकूण वजन

[ दागिन्याचा तपसील ]

१७८८७॥।॥ मोकळ चुरा

२२८६९८१॥

रुा

२०९९१६ प्राा तोळे १२३४८ दर १७ प्रो हिसेदाराचे वाटणीचे रुो

१६८३३८।= प्राा वजन तोळे

१०५२१८१॥

दर १६ प्रो पथरगड पौ सोने निघाले त्याची वाटणी यैन जिनसच हिसेदारास दिली परंतु वाटणीचा होलकराचा हिसेब जाला तेव्हा सत्रा रुपयानी दर लाऊन वाटणीस धरिला बाकी सरकारात सदरहू सोने राहिले त्यास पुणियास आलियावर शागिर्दपेशास वगैरे नख्त यैवजी सोळाचे दराने सोने दिल्हे साा खर्चाप्रो जमा

३७८२९४।=

१८४९६० रुपे वजन तोळे

१९९७८८॥१ प्राा तोळे समाईक हिसेदार सुधा

९५८३९। दागिने

६३९४९।१ मोकळ

१९९७८८॥१

१९५६४॥ अमानत दागिने ठेविले होते ते मोडून चादी केली ते जमा वजन तोळे

छ ४ जाखर सलास

[ दागिन्याचा तपसिल ]

२९८= दागिने निसबतीस होते ते आले त्याचे वजन तोळे

७८= विसाजी कृष्ण याजकडील तरवारेस अबनाल व तहनाल होते ते.

२२ कानाली हतीची २

९०॥ छ १४ रमजान मुा पुणे दागिने [ दागिन्याचा तपसिले ]

१७९४७३

७ रुपे रुपये भार

१७९४७३ यैन वजन तोळे

१४३५८ बडती दर सदे रुपये ८ प्रा भाराची

१९३८३१

पैकी वजा छ १७ जिल्हेज सन सलास पोता जमा गुा मुरार नाईक रुपे भार ८८७१ बाकी राहिले ते हाली भार

४३७४४९ मोहरा नाणे येकूण रुो

२२६७५ नजिबशाई

२९०० पंचभेल

४४६ महंमदशाई

१११ भाऊशाई

४५ बटाम (!)

२२८ फाशाच्या

६८ गैरसाल

१६ फुटक्या

१ औरंगाबादी

१३ शाहाजानी

२९१६३

७ दर सरासरी १५ प्रो

रुपये

4461

९८०० पलंग रुप्याचे सुमार १७ पैकी वजा मोडून चादी केली. चादीकडे जमौदागिने ७ बाकी दागिने सु १० येकुण किमत जमा रुा

२७०० होलकर ३

१००० सिंदे २

७९० पवार २

९०० पातशाहा

८९० सरकारांत

४९० बालाजी खडेराव याजकडे १

९०० बलवंतराव वाकडे यास दिल्हा होता त्याची किमत घेतली ते जमा

८९० २

९८०० १०

१००६४९९।=

पैकी वजा सरकार हिशाचे यैवजापैकी रुो

४४९।।।= जल सोन्या रुपयाची लाख व रेसीम होते सा जाळून नीट केले. त्याची जल नेली तें वजन रुो

[ तपसील ]

७।= जाजती बारा दागिन्याचे वजन चौऱ्यासी तोले असता कसरसुधा पावणेयेक्याणव तोले जमा धरिले वजन रुा

६।।। यैन वजन

।।= कसर भाराची

७।=

४९३।.

बाकी रुो

३७८०३८।= सोने तोले १२८९९।।१।।। [ तपसील ]

१८४७२२।।। रुपे रुपये भार

4462

४३७४४९ मोहरा नाणे २९१६३ दर १५ प्रो
९८०० नख्त पलंगाची किमत

१००६००६८=

रवासुदगी

देणे पेसजी खंडणीपैकी यैवज वगैरे पावला आहे त्याचा जमाखर्च हाली बा खंडणीचे कराराची याद रुा

२६००० नजबखान मोगल चाकर ठेविला होता त्यास चाकरीचे यैवजी रोजा खेरीज नख्त रुो

५०० कुसाजी महिपत दिा माहादजी सिंदे यास वाटणीचे यैवजी.

१३२०० दिा पागा हुजूर

२०० जीन १ येकूण किमत

१३००० घोडी रास ५०

१३२०० किमत

१५००० दिा पिलखाना हती नग ६

किमत रुपये

१००० दिा उष्टरखाना उट नफर ९

किमत

५५७००

पंचावन हजार सातसे रुो खंडणी आबरो हा पैकी नख्त किमत मिळोन जमाखर्च करून देविले.

देणे खंडेराव व कृष्णाजी जिवाजी पवार यास वाटणीचे यैवजी सन इसनेत दिलीचे मुकामी दिल्हे होते ते खर्च पडले नव्हते सा हाली रा याद रुो

२५०००

पंचवीस हजार रुपये खंडणी सा दिली येथील खंडणीचा यैवज करार केला त्यापैकी बलवंतराव गोविंद वाकडे याजकडून देविले

[20-9-1773

तेरीख २

नजर बा। जाफ्तेखान रोहिले यास पातशाहाकडून बक्षीगिरी व जाहागीर व गंगापार मुल्क सुदामत देविला. सा। सदरहूची साडे दाहा लाख रुपये दरबार खर्च सुधा नजर घ्यावयाची करार केली. त्या यैवजी जडाव दागिने मा।रनिलेनी दिल्हे ते जमा दागिने

[तपसिल]

बदल देणे रसानगी यादी दोन

९०० हिसामुदीखान दि। अलीगौर पातशाहा यास पेसजी पावले होते ते.

रदकर्ज गु। हरशेट वीरकर यास पाणिपतचे स्वारीचा मा।र-निलेचा यैवज देणे आहे. त्याची वरात स्वारीत दिली आहे. त्यापैकी रा। यादी रु।

९०००

देणे माहादजी सिंदे यास वाटणीचे यैवजी पेसजी संन इसनेत पातशाहास घेऊन दिलीस येतेसमई छरा भामोरी येथील खंडणी दादो मल्हार याचे गुजारतीने साठ हजार करार केली त्यापो निमे तीस हजार पातशाहा वजा होऊन बाकी तीस हजार सरकार समाइक यैवज राहिला त्या यैवजी परभारा वसूल घेतला त्याचा जमाखर्च जाला नवता तो हाली रु।

१००००

⌣——दाहा हजार रु। खंडणी छरा भामोरी प्रा। अंतरवेद नि। मोतीराम सावतसिंग याजकडून आदा जाले. त्याचा जमाखर्च हाली करून सदरहू रु। देविले.

वि। राजश्री रामचन्द्र गणेश संन इसनेत दिलीहून पुणियास येतेसमई मार्गी खर्च जाहाला तो इ। छ १ जाखर ता। २३ साबान पावेतो. रा। बा। हिसेब रु। [तपसील]

रवासुदगी

देणे परदरबार खर्च वजीर सुजातदौले याजकडे पेसजी त्र्यंबकराव सिवदेव व नारो आनंद यास पाठविले होते त्यास खर्च तेथे

जाहाले ते खर्च उगवले नाहीत सा त्याचा हाली जमाखर्च करून देविले रा याद रुा

[तपसील]

देणे गुा गणेश विठल सा दिलीचे किल्याचे रखवालीस सन इसनेत पो होते. त्यास तेथे खर्च जाहाला. त्याचा जमाखर्च उगवला नवता तो हाली बा हिसेब इा छ १८ रावल ता छ १ जावलपावेतो जाहाला तो रुा

[तपसील]

दिा तोफखाना याजकडे पथरगड पौ जिनस आला तो जमा बा याद कारखाने मजकूर

वजन पके

२६८॥१ दारू
१०८।• ताग
८॥७॥ सूत
८।॥ कात्र
•॥= लोखंड घाट
•।=॥२ खेडी पोलाद
१९।३।९। लोखंड
•।•॥ रुई
८१८२॥ तांबे
———
९६॥।१॥८।

सुमारी सुमार

७ जंबुरे
  ५ लोखंडी
  २ पंचरसी
  —
  ७
६ दुराब्या
७ धमामे
१०० बाण
१८४१ पोलका बाणाच्य
१८४२ गोले तोफा
२ जेजाला
३६ गोले गरनाली
३ तोफा थोर
  १ फते लस्कर
  १ मुल्क जफ्त
  १ चांदबिबी
  —
  ३
५ हलाल मार्तंडी
७ फादचर्मी

4465

१ चर्सा चर्मी
१०० बदरे चर्मी

——पावणे सतावन खंडी दीड मण सवा आठ सेर वजन पके तीन हजार नवसे सतावन सुमारी जप्ती किले पथरगडपैकी पेसर्जा आणिली त्याचं जमाखर्च हाली करून देविले.

दफाते पत्रे

तुकोजी होळकर याचे हिसेबाचा फडशा स्वारीत जाहाल तेव्हा मारनिलकडे खंडण्याचे वगैरे वाटणीचे यैवजी यैवज पावला त्यापौ फाजील यैवज जाहाला त्यायैवजी रदकर्ज गुा हरसेट वीरकर यास पाणिपतचे यैवजी पुणियाहून वरात जाहाली त्या यैवजापौ रुपये ६०००० साठ हजार देविले असेत तर तुम्हाकडे फाजील यैवजापौ पावते करून कबज घेणे म्हणौन वरातेत लिहीत असे. येणेप्रा सनद

१

रसानगी यादा येकदर

सदरहू यैवज पावेल न पावेल याजमुळे जमाखर्च केला नाही. यैवज आदा जालियावर जमाखर्च करणे असे.

---

*No. 288*]

याच स्वारीच्या कीर्दीतील खर्चाच्या बंदांतील उतारे

ता. १२-६-१७७० पासून ता. १९-४-१७७३ दरम्यानचे

| | | |
|---|---|---|
| इहिदे (सबैन) | सफर १७ | (१२-६-१७७०) ठाणे बहेरा येथील गढीवर जखमी जाहाले त्यास खर्चास |
| इहीदे (सबैन) | मोहरम ३ | त्रिंबकदास वकील दिा सुज्यातदौले यास निरोपसमई सदरेस वस्त्रे |
| ,, | ,, ६ | इटावे येथील मोर्च्यात जखमी जाहाले त्याणी पाणी घेतले सा वस्त्रावाा |
| ,, | ,, ११ | कद्धमद्धखान नबिबखानाचे बेटे याजकडून कासीद पत्रे घेऊन आले त्यास इनाम |

| | | |
|---|---|---|
| इहिदे (सबैन) | मोहरम २३ | सिलेदार विा बाबुराव हरि यास जवारचे गढीवर जखमी जाहाले त्याणी जखमेचे पाणी घेतले सा वस्त्राबाा |
| ” | ” २५ | सिलेदार गोलगडाचे छबिन्यास जखमी जाहाले त्यास खर्चास |
| ” | ” २६ | जानराव बलाल गोविंद सामराज याचे पुतण्ये यास निरोपसमई सदरेस [वस्त्रे] |
| सलास (सबैन) | जाखर १ | जाफ्तेखान याजकडील लोक कैदेत ठेविले होते त्यास निरोप दिल्हा. |
| इहिदे (सबैन) | जिलकाद ५ | सुज्यातदौले याजकडील बिलाल महमदखान वकील यास निरोपसमई सदरेस वस्त्रे |
| | | अहमदखान पठाण फरकाबादवाले. आंबाजी गोविंद रोडे निा बहिरो अनंत यास निरोपसमई वस्त्रे |
| ” | ” २९ | गणेश विश्वनाथ बेहरे यास पागा दिल्ही सा वस्त्रें सदरेस |
| ” | ” ३० | मेहरबानखान वकील दिा अहमदखान बंगस फरकाबादवाले यास निरोपसमई बहुमान |
| | | दादो मल्हार सिलेदार यांचे पुत्र त्रिंबकराव |
| | | माहादाजी बलाल रानडे कारकून सिलेदार |
| | | येसाजी बळाल वकील दिा माहादजी सिंदे |
| ” | जिल्हेज १२ | परदरबारखर्च सां दिली वलीहद जुवाबक्ष शाहाजादे याजकडून चोपदार चिठी घेऊन बोलावयास आले होते सा इनाम |

| साल | महिना तेरीख | |
|---|---|---|
| सलास (सबैन) | साबान १९ | परदरबारखर्च दिा जाफ्तेखान रोहिले याजकडील बाळ गोविंद चेतराम याचा पुत्र यास भेटीस आला सा सदरेस सनगे [तपसील] |
| | | बापूजी रामाजी चिटणीस दिा बाळाजी गोविंद बुंदेले |
| ,, | ,, ३० | छ ११ रोज तुकोजी होळकर व जाबतेखान रोहिले डेऱ्यास आले. |
| ,, | रजब ७ | हरी बावाजी यास पागा दिल्ही. |
| ,, | ,, ८ | परदरबारखर्च गोपाळनाथ राजे रामनाथ याचा पुत्र दिा पातशाहा यास निरोपसमई सदरेस वस्त्रे |
| ,, | ,, १२ | सिलेदार निा धनसिंग रा कामगारी जाफ्तेखानास आणावयास पाठविले. |
| ,, | ,, १४ | परदरबारखर्च जोधराज दिा लोहरीसिंग जाट भेटीस डेऱ्यास आले. |
| ,, | ,, २४ | जाफ्तेखान रोहिले भेटीस डेऱ्यास आले. |
| ,, | ,, २९ | जाफ्तेखान रोहिले याचे डेऱ्यास स्वारी गेली होती. |
| | | शाहकपूर पीर दरगा कसबे ग्वालियेर |
| ,, | ,, २८ | हफिज रहमतखान रोहिले भेटीस डेऱ्यास आले. |
| सबैन मया व आलफ | जाखर ९ | नरसूभाई रिकीबदार दिा पागा हुजूर यास राघोगडचे मोर्च्यात जखम लागली होती त्यास पाणी घेतले सा सदरेस वस्त्रे. |
| ,, | ,, १७ | सिलेदार बरखेड्याचे गढीवर जखमी जाहाले होते त्याणी पाणी घेतले सा वस्त्रे. |

4468

| | | |
|---|---|---|
| सब्बैन मया व अलफ | रजब २४ | जखमी सिलेदार अरुणचे गढीवर जाहाले होते त्याणी पाणी घेतले सा। वस्त्राबा। |
| सब्बैन मया व अलफ | जा।वल २ | खिजमतगार पुणियाहून बहिरो अनंत याचकडील ठाणे गडबई सरकारात घेऊन भवानराव शामराव याजकडे अमल बसऊन द्यावयास आले होते त्यास माघारा पुणियास जातात सा। खर्चास |
| ,, | ,, १४ | बालाजी गोविंद का।सदार वा। बुंदेलखंड यास मामलतीची वस्त्रे दिल्ही. |
| ,, | ,, २८ | दि।। तोफखाना राघोगडास तोफा लाविल्या आहेत तेव्हा तोफ पुढे ठेविली. |
| सबैन मया व अलफ | रा।खर ३ | रसूलखान पठाण बारगीर पागा दि।। गणेश विठल ठाणे बारखेडा येथे मोर्च्यात ठार जाहाला सा। गौर कफनास खर्चास |
| ,, | ,, १३ | जखमी सिलेदार ठाणे बारखेड्यावर हल्यावर जाहाले त्यास खर्चास |
| सबैन मया व अलफ | रा।वल २१ | इनाम खर्च सलाबतखाना सोधा याने ठाणे भोमारे येथे निशाण हला करतेसमई बुरजावर चढविले तेसमई जखमी जाहाला सा। खर्चास इनाम दाखल |
| ,, | ,, ,, | दि।। तोफखाना कारखाने मजकुराकडील गाडदी व दर्यावर्दी गोलंदाज वगैरे याणी ठाणे भोमारे येथे हला करतेसमई जखमी जाहाले व ठार जाहाले व ठाणे टंक येथे जखमी जाहाले त्यास खर्चास. उमरखान नगारची पागा दि।। गणेश |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विठल याजकडून कुचाचा नगारा करविला त्यास कूच महकूफ जाहाले सा। इनामदाखल देविला. |
| | | | फैजमहमदखान रोहिले सां भूपाल यास बहुमान कृष्णराव रामचंद्र याजबा। पाठविला. |
| सबन मया व अलफ | साबान | २४ | हरमतखान पठाण कुरवाईकर यास निरोपसमई वस्त्रे. |
| तिसा सितैन | जिलकाद | २ | सिलेदार ठाणे मोटापली येथील गढीवर जखमी व ठार जाहाले त्यास खर्चास. |
| सलास ( सबैन ) | मोहरम | ७ | नरसिंगराव थोरात सिलेदार नि। बाबुराव हरि सुज्यातदौले याचे लडाईत जखमी होऊन ठार जाला सा। कफनास. |
| ,, | ,, | ,, | आपखान सिलेदार दिमत खंडेराव दौलत पातशाहाच लडाईत जखमी होता त्याणे पाणी घेतले सा। वस्त्राबा।. |
| . | ,, | ११ | गणेश वेदांती कमाविसदार दि। तुकोजी होलकर यास निरोपसमई सदरेस वस्त्रे. |
| ,, | ,, | १६ | २१००० दि। नजबखान मोगल सिलेदार यास रोजबाचे इ। छ १२ जिल्हेज ता। छ १८ मि। दररोज ३००० प्रमाणे रसानगी याद बरेली रु। |
| ,, | २६ (१९-४-१७७३) | | १९ इनामखर्च नजफखान मोगल याजकडील लोकानी फिरंगी गोरा धरून आणिला सा। गु। मालोजी माणकर खिजमतगार रु.<br>९ फिरंगी गोऱ्यास दिल्हे.<br>१० प्यादे दि। नजफखान यास<br>—<br>१९ |

१ बाबुराव विश्वनाथ मराठे
१ कृष्णराव रामचंद्र भुसकुटे
१ माधवराव कृष्ण भिडे
१ समसेरखान पठाण
दिा फैजमहमदखान रोहिले
भूपाळकर
१ आपाजीराव कदम दिा
तुकोजी होळकर
१ गोविंद कल्याण दिा
तुकोजी होळकर
१ यशवंतराव खाडे सिलेदार
दिा संताजी लांबहाते
१ निजामशाहा राजे गढे मंडले.
१ रघुवंसराय वाजपेय वकील
दिा निजामशा मंडलेकर
१ रामचंद्र कासी. कासी नरसी
याचे पुत्र.
१ सिदी महमदखान कोतवाल
शहर दिली

16-II

# INDEX

## Selection No. 29

### A

**Abaji Mahadev**—11, 142, 167, 179, 190.

**Abaji Naik Tanksale,** banker—283.

**Abaji Raghunath Chitnis**—253.

**Abhaysing**—desires to help the Marathas in regaining the power in the North 39.

**Achutrao Ganesh**—99, 102, 105, 127, 275.

**Ahilyabai**—176, Tukoji's investiture 180.

**Ahmad Khan Bangash**—98, 99, 117, 128, 192, 246, 261, 262.

**Ahmadshah Abdali**—8, 24, receives presents from the Peshwa 54, 165, 192.

**Ajitray**—151.

**Ala Jat**—99.

**Ambadas Ballal**—62, 64, 69.

**Anandrao Ganesh**—in the service of Naro Shankar 246.

**Anandrao Gopal**—176.

**Antaji Mankeshwar**—193, 263.

**Antaji Ram**—Kamavisdar of Edlabad 77.

**Anupgir Gosavi**—in the service of Shuja—52, 164, 185, 190, 207, deputed by Shuja to negotiate peace with the Marathas 270, 280.

**Appaji Ganesh**—9, exposes the treacherous conduct of Gopalrao Barve 125, 130, 196.

**Appaji Lakshman**—223.

**Appaji Mairal**—12, writes about the preparations of Danasa 166, 171, 207, 208, 209, 210, asks for succour 217, 220, reports the predatory activities of the Jats 222.

**Appaji Mahadev (Sapre)**—reports disturbances in Bundelkhand 82, 147, 200, 209.

**Appaji Narayan**—113.

**Appaji Paygude**—287.

**Appajipant Nasikkar,** Diwan of Jagjivanrao Pawar—58.

**Arisinha**—238.

**Asibai**—186.

**Atmaram Rangnath**—110, 111.

### A—contd.

**Avachitrao**—59, 78, 96, 130, 173, 175, appointed Diwan of Kedarji Sindia 182, 184, 195.

### B

**Baba Moghe**—112.

**Babaji Pralhad**—173.

**Baburao Hari**—246, 255.

**Baburao Kaka Kher** (brother of Govindrao)—6.

**Baburao Kasi**—his property at Islampur confiscated 229.

**Baburao Keshav Thakur**—submits a list of casualties in a battle with Navalsing Jat 254, 258, 265, 266.

**Baburao Konher**—12, 22, 32, 37, hands over the fort of Karhera 94.

**Baburao Ram**—112, 123.

**Baburao Sadashiv**—148.

**Baburao Yadav**—260.

**Badrinath**—son of Raja Keshavrao—imprisoned by Baburao Konher 22, 23, describes affairs in the North 24 writes of an interview between the Emperor and [illegible] Rahmat 138, describes the affairs at the Emperor's court 143.

**Bahirji Takpir**—nephew of Mahadji Sindia—270, 277.

**Bahiro Anant**—son of Antaji Mankeshwar—150, 193, 232, 288.

**Baji Anant**—132.

**Baji Ballal**—80

**Baji Govind**—194a.

**Baji Narsinha**—Mahadji's Karbhari—78, 87, 96, 122, 124, 176, 180, 200, 275.

**Baji Vithal**—212.

**Bajipant Fadnis**—184.

**Baker, Col.**—192.

Bk Ca 73—46

B—contd.

**Bakhatsing**—128.
**Balaji Baburao**—148.
**Balaji Bajirao** *alias* **Nanasaheb**—5, 10.
**Balaji Govind**—5, tries to restore order in the Doab 6, 8, 10, 16, 17-21, 24, his skirmish with Shuja 32, 37, 40, 46, 49, 51, 52, 75, 84, 111, 135, 145, 149, 150, sends sanads for Bhilsa 156, 173, 185, 196, 198, 215, 222, 243, 251.
**Balaji Govind Galgalekar**—son of Govind Tamaji, Peshwa's agent at Jaipur—282, 283, 284.
**Balaji Janardan** *alias* **Nana Fadnis**—1, 52, 54, 76, 82, 164, learns of the investiture of Tukoji Holkar 183, 194, 194a, 200, 202, 206, 229, 230, 231, 233, 236, 237, 256, 261, 263.
**Balaji Krishna**—134.
**Balaji Shankar**—189, 195, 200, 201.
**Balaji Vishvanath**—130.
**Balapa Naik Mirajgaonkar**—187, 283.
**Balaram** *alias* **Balju Jat**—12.
**Balarao Govind**—186.
**Balibhadrasing Khechi,** of Khechivada—283.
**Balkrishnapant**—210.
**Bal Mukund**—84.
**Balvant Govind Vakde**—banker—283.
**Balvantrao Gopal Shenvi**—2.
**Balvantsing,** of Benares—110, 111, 192.
**Banaji Matkar**—176.
**Bapuji Mahadev Hingne**—283.
**Bapuji Narayan**—45, 46.
**Bhagvant Vishnu**—13.
**Bhagirthibai Sindia**—villages confiscated by the Peshwa 221, 235, her village restored by the Peshwa 240.
**Bhalerao Holkar (?)**—158.
**Bhaskar Ballal**—271.
**Bhatner, Raja of**—99.
**Bhavanishankar Janardan**—267.
**Bhimsing**—47.
**Bhivaji Ranchod**—286.
**Bhojraj Shankar**—110, 111.
**Bhopatsing**—253.
**Bhupalsing**—165.
**Bijeram,** envoy of Najib Khan—165, 283.

B—concld.

**Bijesing**—17, 27, 29, 75, 81, 99, 107, allianc against the Marathas 162.
**Bisunsing Gujar**—209, 210.
**Budhsing Dhandere** of Ambar—151.

C

**Charassing**—107, 165.
**Chenray Lala**—248.
**Chhatrasal**—208.
**Chhatrasing**—Rana of Gohad—asked to desist from molesting the Maratha Officers 232.
**Chhatrasing Chavan**—167.
**Chimabai Sindia,** mother of Mahadji—4, requests Raghoba to assign her a jagir 59.
**Chimnaji Moreshwar**—14, 35, 49, 151, 188, 190.
**Chimnaji Rangnath**—detained in the camp of Ganesh Sambhaji 7, 41.
**Chintaman Naik Onkar**—banker—283.
**Chinto Anant**—45, 46, 142, 167, 275.
**Chintoba** (in the service of Jankoji Sindia)—2, 11.
**Chinto Krishna**—283.
**Chinto Vithal**—8, 142, informs Vishvasrao Lakshman that succour is being sent to him against the Jats 168, 179, 191, 196, 275.
**Chitko Malhar**—113.

D

**Dado Malhar**—reports the differences between Sindia and Holkar 239, 271.
**Dado Udhav**—148.
**Damaji Gaikwad**—76, ordered to send his contingent 93.
**Danasa,** a Jat general 166, 167, 208, 223.
**Dargah Kuli Khan**—58.
**Dasasing**—121.
**Dattaji Sindia**—65.
**Datia, Raja of**—12.
**Daulatsing Chatrabhujot**—deputed to the Emperor by Madhosing 19.
**Daudkhan,** Nawab of Jafarabad—99.
**Devaji Shamrao** (in the service of Mahadji Sindia)—182.

D—contd.

**Devaji Trimbak**—envoy from Mahadji Sindia—283.
**Devising** of Orchha—151.
**Devrao (Mahadev ?)**—262.
**Dhanraj Dikshit**—192.
**Dhansing**—27.
**Dhondji Sindia** of Satara—148.
**Dhondo Dattatraya Naigaonker**—32, 37, 233, realises the tribute 241, 283.
**Dhondo Govind**—113, 213a.
**Dhondo Khanderao**—Peshwa's agent at Benares—seeks Raghoba's protection 86, describes the plight of the pilgrims to Benares 110, asks for more money 111, 192.
**Dhondo Padmaji**—75.
**Dinkar Mahadev**—213a.
**Diwakar Purushottam**—97.
**Dulerai Bakshi**—102.
**Dundekhan Rohilla**—5, 128, 167, 180, 261, 262, 270, 283.
**Dyanatrao**—Diwan of Datia—152.

E

**Emperor Ali Gauhar**—5, crosses the Jumna 45, his part in the battle of Buxar 50, 52, 99, 102, 107, 110, 111, 117, 127, solicited by Hafiz Rahmat not to seek the protection of the English 138, 143, 197, 261, 263, 266, mobilising forces 278, dress presented by the Peshwa 283.
**English**—movements against Shuja-ud-daula 86, Shuja's futile attempts to check their advance 98 ; 107, 110, 111, 143, 163.

F

**Faizulla Khan**—280.
**Fatesing**—death 60.
**Fatunnisa Bagum**—sister of Ghaziuddin—283.
**Fauz Mohommad Khan Rohila**—288.

G

**Gabaji**—son of Dado Malhar—239.
**Gajsing**—274.
**Ganesh Mahadev**—writes about the raids of Gopal Ganesh 212.
**Ganesh Sambhaji**—7, 8, 22, 37, 45, 46, seeks Raghunathrao's favour 161, 175.

G—contd.

**Ganesh Shankar**—reports the changes made by the Peshwa in the administration of Jhansi 184.
**Ganesh Vedanti**—167.
**Ganesh Vishvanath Behere**—reports the Maratha activities in the North 243, 245, 288.
**Ganesh Vithal**—148, 255.
**Gangadhar Govind**—tries to restore order in the Doab 6, 49, 117, 166, 171, 220, 222, 223.
**Gangadhar Yashvant** *alias* **Tatya Chandrachud**—5, 8, 10, 22, 48, 49; 78, 98, 117, 118, 122, 124, 128, 129, 137, 157, 180, 201, 225, 275.
**Gangaprasad**—85.
**Gangapuri Gosavi**—74.
**Ganoji Kadam**—appointed Karbhari of Kedarji Sindia 182, 252.
**Ghaziuddin**—8, 10, 28, 133, 138, 198, 246, 257, 261, 287.
**Girmajipant**—151, 223.
**Gohad, Rana of**—160, alliance against the Marathas 162, 208, 263.
**Gopal Chakradev**—gives a report detailing the activities of the Rohillas and the Jats 165, reports the movements of Javarsing 167.
**Gopal Keshav**—writes to the Peshwa about the Jats 12, 74.
**Gopal Mukund**—Peshwa's agent at Jaipur—complains against Dhondo Govind 113.
**Gopalrao Bapuji**—12.
**Gopalrao Daji**—173.
**Gopalrao Ganesh**—tries to re-establish Maratha influence at Delhi 8, 93, asked to pay off the dues to Vishvasrao Lakshman 116, his treacherous conduct 125, 132.
**Gopalrao Narayan**—273.
**Gopal Ravji**—173.
**Gopal Sambhaji**—22.
**Gopal Shankar**—2.
**Gopalsing**—son of Kapursing Gujar—232.
**Govind Ballal**—41, 194a.
**Govind Bhikaji**—83.
**Govind Dadaji**—110, 111.
**Govind Kalyan**—43.
**Govind Krishna**—81, 107, 115.
**Govind Raghunath**—57, 162, 168, 173, 175, 176, reports his conversation with Naro Shankar 181, 185, 191, 194, 215.

G—concld.

**Govind Ram Mahant**—27.

**Govind Ravji**—184.

**Govind Shamrao**—keeper of Gwalior fort—145, 163, 190, 273, asked to manufacture ammunition 283.

**Govind Shivram**—proceeds to North 182, 190.

**Govind Tamaji Galgalekar**—Peshwa's agent at Jaipur—murdered by Madhosing 284.

**Govind Vishvanath**—206.

**Govind Yadav**—58.

**Gulam Kadarkhan**—50.

**Gulraj**—ambassador from the Abdali—42.

**Gumansing**—185, 190, 195, 253, 283.

**Gundo Kasi**—writes about the Sindia affairs 2, 3, 4, 11.

**Gundopant**—223.

H

**Hafiz Rahmat Khan**—5, 98, 117, 128, tries to dissuade the Emperor from seeking English protection 138, deputes two envoys 167, 187, 261, 262, 270, 271.

**Haibatrao Mulik**—asked to join Visaji Krishna 216.

**Haidar**—sends his envoy to Nizam Ali 58, 259.

**Haidaryar Khan**—58.

**Halchand**—55.

**Hanmantrao Tamaji**—112.

**Hari Chintaman**—173, 189, 200, 206.

**Hari Narayan**—Vakil from the Jat—283.

**Haripant Phadke**—120.

**Harkubai**—186.

**Harmalkhan Pathan**—288.

**Harsukh Katare**—167.

**Hatesing** of Orchha—82, 190, 230.

**Hemraj Kaver**—55.

**Hindupat**—Bundela chief—tries to throw off Maratha allegiance 7, 190, 274.

I

**Inat Khan Shuja Khan**—43, 267.

**Isamudakhan**—deputed by the Emperor to the Marathas to negotiate terms of peace 270.

J

**Jafar Ali Khan**—73.

**Jafar Mahammad Khan**—Subha of Bengal—52.

J—contd.

**Jagannath Narayan**—236.

**Jagannath Ravji**—102.

**Jagatset**—52.

**Jagatraj**—45, 46.

**Jagjivanrao Pawar**—Jagir granted 58.

**Jaikisandas**—deputed by Hafiz 167.

**Jaising**—143.

**Jalamsing Zale**—in the service of Guman sing of Kotah 253, 283.

**Janardan Vithal**—150.

**Janghaj Khan**—71.

**Jankoji Sindia**—his pretender reported to be at Malkapur 2, 11, 30, 31.

**Janoba Damle**—252.

**Janoji Bhonsle**—10, 13, 83, 58, asked by Raghunathrao to join him in his Northern campaign 97, 102, 121.

**Janoji Nimbalkar**—11.

**Janrao Ballal**—nephew of Govind Shamraj—288.

**Janrao Wable**—87.

**Jasvantsing**—248.

**Javahirsing (Jat)**—son of Surajmal—54, 55, 72, prepares for a struggle with Najib-ud-daula 73, 99, 102, his battle with Madhosing 105, 108, 117, 119, 121, 126, encamps with his army on the Chambal 128, sends troops against Balaji Govind 149, 152, sends envoy to Naro Shankar 158, makes alliance with Bijesing, etc., against the Marathas 162, 164, 165, his movements reported 167, 185, 192, captures Dhavalpur 204, 215, negotiating peace with Gangadharpant 222.

**Jaychand**—102, 121.

**Jayavantrao Yashvant Panse**—requisitions Mahadji's forces to invest a fortress 178.

**Juwan Bakth**—Emperor's son—proclaimed heir-apparent 89, 284, 288.

K

**Kamaruddin Khan**—39.

**Kapursing Gujar Jamidar**—232.

**Kasi Narsi**—reports the disorder in the Doab 244, 246, writes about Narsinggarh affairs 45, 46.

K—contd.

**Kedarji Sindia**—66, 70, 77, 78, the rights of the fief assigned to him 130, 176, disagrees with Mahadji 180, receives the fief from Raghoba 182.

**Kesarsing**—Raja of Badhwai—132, 203.

**Keshavrao Harkare**—22.

**Keshavrao Krishna**—275.

**Keso Govind**—148.

**Khanaji Jadhav**—102, 105, 107, 127, 128.

**Khanderao Ballal**—108.

**Khanderao Pawar**—287.

**Khanderao Raghunath**—writes about a scuffle between Mahadji and his Divan Kakde 96, 197.

**Khandopant**—35.

**Khansama**—102.

**Kharagrao Divan**—203.

**Khetsing Bundela**—tries to throw off Maratha supremacy 7, death 281.

**Khetsi Dharamsi**—a banker—253.

**Khumansing**—185, 196, 274.

**Kiratsing Thakur** of Zilai—283.

**Kiratsing Khechar**—captures the fort of Ghazipur 40.

**Kirparam**—Vakil from Hafiz Rahmat—283.

**Kirparam Purohit**—167, helps Danasa 171.

**Kisansing**—Vakil from the Jat, 283, 207.

**Kisanprasad**—in the service of Umravgir Gosavi—130.

**Konherbhat Ayachit**—111.

**Krishnaji Gopal**—184.

**Krishnaji Jivaji Pawar**—287.

**Krishnaji Murar**—186.

**Krishnaji Narsi**—gives an account of the Rohila war 280.

**Krishnarao Ballal**—155, reports the dispositions of the Maratha armies against the Jats 224.

**Krishnarao Bhaskar Harkare**—73.

**Krishnarao Gangadhar**—140.

**Krishnarao Govind**—22, 41, 124, 133, 140, 144.

**Krishnarao Parasnis**—112.

**Krishnasing Vakil**—257.

**Kukaji Shivram**—172.

**Kusaji Mahipat**—287.

**Kuvarman**—45, 46.

L

**Lakshman Digambar**—130.

**Lakshman Konher**—69.

**Lakshman Vishvanath**—213a.

**Laman Uttamchand**—banker—283.

M

**Madhavrao**—son of Naro Shankar (?)—74.

**Madhavrao Ballal Peshwa**—23, 24, 27, learns of a skirmish between Balaji Govind and Shuja 33, 37, 39, 41, the arrival of the Abdali's envoys communicated 42, 57, transfers the rights of Mahadji and Kedarji to Manaji 70, 103, 115, 149, 153, 154, 165, returns from Karnatak 184, 214, 221, 225, 229, 238, 240, 243, 245, 246, 247, 273, 275, 283.

**Madhavrao Ramchandra**—son of Ramchandra Ganesh—283.

**Madhavrao Shivdev Odhekar**—89, 234.

**Madhavrao Vyankatesh**—22.

**Madhosing**—17, 21, 22, 23, 36, 55, 60, battle with Jats 84, 99, 102, secured Maratha aid in the contest with Javahirmal Jat 105, 108, 121, 127, 128, defeats Javahirmal 153, 165, 192.

**Mahadaji Ballal Guruji Karkare**—174, 247, 265.

**Mahadaji Govind Kakde**—48, 65, scuffle with Mahadji Sindia and his death 96.

**Mahadaji Narayan**—son of Naro Bapji—3.

**Mahadaji Naik**—190.

**Mahadaji Sadashiv**—Kamavisdar of Arun—283.

**Mahadaji Vishvanath**—writes about an expedition against the Bundelas 63.

**Mahadji Sindia**—11, informs the Peshwa of the arrival of Abdali's envoys 42, 45, 46, 48, Sakhubai's complaints 53, 59, his march Northwards 62, 64, 65, 70, 77, 78, 94, scuffle with his Divan Kakde 96, 101, 102, 104, 105, 108, 110, 111, 122, 124, 127, 128, 130, meets Malharrao Holkar 131, goes to Bhander 139, asked to proceed to the North 142, promises help to Raghunathrao 146, 164, 173, 174, 176, his help requisitioned 178, disagrees with Kedarji 180, 181, 185, 186, 197,

M—contd.

**Mahadji Sindia**—*contd.*
200, 202, 204, grants a Saranjam to Sakhubai 228, disagreement with Ramchandra Ganesh 252, 258, 259, 265, 266, 269, 270, 276, 283.

**Mahipat Shankar**—149, writes about Shuja's movements 163.

**Mahipatrao Chitnis**—7, congratulated on his safe return 9, his Saranjam confiscated by the Peshwa 112, 148.

**Mahipatrao Govind**—44.

**Mahipatrao Lakshman**—172.

**Mahipatrao Vishvanath**—95.

**Mairal Baburao**—clerk in the ammunition factory at Gwalior—283.

**Mairal Keshav**—187.

**Makaji Lambhate**—126.

**Malharrao Holkar**—5, 8, 10, 12, 21, 22, 23, defeats the Kachhawa army near the Chambal 27, 28, goes to Ujjain 29, appoints Vishvasrao Lakshman at Malwa 30, 31, 33, 34, 35, 36, 37, 40, 41, 47, 73, 82, treaty with the English 88, 96, 100, 101, 102, 104, 105, 107, 108, 109, 110, 111, 117, 121, 122, 123, 124, 127, ill at Gwalior 128, encamped at Keneche Sarai 129, meets Mahadji Sindia 131, 133, 136, proposed meeting with Raghunathrao 137, goes to Bhander 139, asked to proceed to North 142, 190.

**Malhar Tukdev Purandare**—81.

**Malji Holkar**—108, arrives at Ujjain 144, 157.

**Malkazamani**—283.

**Manaji Sindia**—48, 65, 70, promises help to Raghunathrao 150.

**Mansing**—190.

**Manikrao Makaji**—128.

**Manulal**—167.

**Mayasing**—165.

**Mehedi Kuli Khan**—283.

**Mir Kasam Ali Khan**—defeated, seeks support from Shuja 52.

**Mirjagir**—164.

**Mirza Rahimbeg**—238.

**Mohabatsing**—167.

**Mohakamsing**—151, 208.

**Mohommad Hasirkhan**—280.



M—concld.

**Mohommad Ilachkhan**—267.

**Mohommad Khan Khoje**—envoy from Ghaziuddin—283.

**Mohommad Ali Yarkhan**—242.

**Mohommad Khan**—115.

**Moro Baburao**—writes about the tribute from the Rana of Gohad 160, 190, 194, 200.

**Moro Gangadhar**—190.

**Moropant Dada Fadnis**—103, 190.

**Mulna Mosam**—165.

**Murad Khan**—58.

**Musavi Khan**—despatched by the Emperor against the Shikhs 143.

**Muse Khan** of Farukhnagar—165.

N

**Nagarmal**—24, 71, 121.

**Nago Ram Bhagvat**—111.

**Nagorao Vithal**—172.

**Najib Khan**—5, 8, 10, meets Daulatsing deputed by Madhosing 19, 24, 28, 36, 55, 71, 72, 87, 98, 99, 102, 117, 119, 121, 126, 127, 138, attacked by the Sikhs 143, 165, 167, 180, 192, defeated by the Sikhs 223, 246, 255, 261.

**Nanajipant**—210.

**Nanaji Vithal Palekar**—229.

**Nandlal**—20.

**Nandram**—envoy from the Abdali—42.

**Narayanrao Ballal**—receives the Kamavis of the villages assigned to the Sindia's ladies 221, asked to restore to Sakhubai and Sagunabai their confiscated property 235, 240, murder 280.

**Narayanrao Jadhav**—nephew of Mahadji Sindia—277.

**Narba Shenvi**—Diwan—11.

**Narharsing**—102, 117.

**Naro Anandrao**—serving in the artillery department—286.

**Naro Ballal Bhuskute**—247.

**Naro Ganesh Shauche**—in the Holkar's employ 243, 260, 282.

**Naro Krishna**—brother of Chinto Krishna—in the service of Sakhubai Sindia 283.

N—contd.

**Naro Narsi Kulkarni** of Bahe, Peshwa's agent at Delhi—gives a report of the Northern expedition 246, 255, 260, 269.

**Naro Shankar**—283.

**Narsappa Naik Bettigiri**—banker—283.

**Narsingrao Ram**—275, 276, 277.

**Narsingrao Ram**—Kamavisdar of Udaipur—narrates the difficulties in collecting the dues 87.

**Narsingrao Vithal**—son of Vithal Shivdev—114.

**Navalsing Jat**—283.

**Naro Ballal Bhuskute**—reports about Mahadji's march on Badhvai 67, reports the administration of Nemavar 101, 132.

**Naro Bapji**—3.

**Naro Krishna Darve**—Subhedar of Burhanpur—instructs his officer to circumvent Mahadji's march 62, 64, 69, 77.

**Naro Nilkanth**—163, 196.

**Naro Shankar**—22, joins Holkar 33, 34; 35, 36, 37, 38, 43, 49, 65, 74, 78, 95, 102, 108, 115, 116, arrives at Mogalsarai 123, 124, 134, 136, 137, 146, friendship sought by the Jats 158, 164, 181, 190, 192, 194a, 201.

**Naro Shivdev**—writes to the Peshwa of Abhaysing's desire to help the Marathas 39.

**Naro Shriniwas**—reports the occupation of Maratha outposts by the Jats 61, 147.

**Narwar, Raja of**—12.

**Navalsing Jat**—105, 246, 250, 257, 263.

**Nayansukh**—Diwan of Madhosing—127, 128.

**Nilkanth Mahadev**—death 112.

**Nilo Gopal**—192, 248.

**Nimbabai Sindia**—wife of Ranoji—2, 3, 4, 11.

P

**Padamsing**—151.

**Pahadsing**—41.

**Pahilsing**—151.

**Pandurang Shankar**—38.

**Parashar Dadaji**—286.

**Parashramgir**—167.

**Parsulaji**—son of Hemraj Kaver—55.

P—contd.

**Parvatibai**—wife of Sadashivrao Bhau—9.

**Pratapsa Misra**—134.

**Prasadiram**—envoy of Najibkhan—283.

**Prananath Puranik** of Benares—his journey to Kalpi arranged 75.

**Pransing** of Ludhora—14, 82.

**Prithising**—10, 248.

**Punjaji**—26.

**Purushottam Mahadev Hingne**—54, 167, 257, 262, deputed to Shuja-ud-daula 283.

R

**Ragho Malhar**—asked to act as Diwan of Mahadji Sindia 285, 270, 277.

**Ragho Nilkanth**—52.

**Ragho Sakhdev**—clerk in the ammunition factory at Gwalior—283.

**Ragho Shankar**—272, 96.

**Ragho Ram**—96, 200, killed in a battle with Mahadji Sindia 229.

**Ragho Vishnu**—41.

**Raghoba Page**—176, 180.

**Raghoba Potnis**—87.

**Raghunath Bajirao** *alias* **Dadasaheb**—2, 11, 16, 17-21, the affairs in the North reported 24, learns of the Narsinggarh affair 45, 46, battle of Buxar reported 56, 52, receives complaints from Sakhubai Sindia 53, 54, 57, 58, requested by Chimabai Sindia to grant her a jagir 59, 66, 67, 68, learns of the preparations of war 73, receives money for his army expenses 77, 83, his protection sought 86, requested to send troops 94, learns of a scuffle between Mahadji Sindia and his Divan 96, asks Janoji Bhonsle to join him in his Northern campaign 97, 100, 101, 109, 111, 114, 117, interviews with the Nizam 120, 121, 123, learns of the treacherous conduct of Gopalrao Barwe in Gujarat 125, 128, 129, 132, 133, 134-136, proposes meeting with Malharrao Holkar 137, 138, learns of Malharrao's illness 140, 141, learns of the affairs at the Emperor's court 143, 144, gets assurances of help from Mahadji Sindia 146, 148, 150, 155, Malharrao Holkar

R—contd.

**Raghunath Bajirao** *alias* **Dadasaheb**—*contd.* promises help 157, 158, his favour sought by Ganesh Sambhaji 161, his attack on Gohad 164, learns of the Bundela risings 169, 170, 175, his letters intercepted 180, 181, grants Sardarki to Kedarji Sindia 182, grants Sardarship to Tukojir Holkar returning South 185. 194, 204, 213, 213a, 247.

**Raghunathdas**—banker—283.

**Raghunath Hari**—278, reports aggressive designs of Shuja-ud-daula 281, 282.

**Raghunathsing Raja**—223.

**Raghunath Ramchandra**—263.

**Rahim Beg**—275.

**Rahimbeg Mirza**—87, 180.

**Rajsing Chavan**—81, 127.

**Rajsing Hamirdev Thakur**—102, 105.

**Rajaram Govind**—51.

**Rajarampant (Govind)**—271.

**Ramchandra Basvant**—93.

**Ramchandra Daroge**—26.

**Ramchandra Ganesh**—takes charge of the fort in Taluk Pata 213, 213a, 219, 231, 238, instructs not to trouble Bhopal 242, 248, disagreement with Mahadji Sindia 252, 256, 261, 264, 269, 271, 272, 283.

**Ramchandra Jadhav**—58.

**Ramchandra Shamraj**—75.

**Ramchandra Shivdev**—266.

**Ramchandra Baba Sukthankar**—132.

**Ramchandra Shamraj**—Subhedar of Shirval—263.

**Ramchandra Trimbak**—148.

**Ramchandra Tukdev**—Peshwa's news-agent at Jainagar—99, reports the political situation in the North 102, reports an account of the battle between Javaharmal and Madhosing 105, writes about Najib's defeat by the Sikhs 121, reports a battle between the Jats and the Marathas 126, reports the activities of some Chiefs in the North 128, 204.

**Ramchandra Narayan**—charge of the forts taken from him 213.

**Ramdas Raghunathdas**—banker—276.

**Ramajipant**—227.

**Ramjirao Thorat**—227.

**Rameshwar Naik**—banker—283.

R—concld.

**Rampant**—Diwan of Kapursing Gujar—232.

**Rampur**—Raja of—166.

**Ramsing**—7, 128.

**Ramkisan**—Munshi of Madhosing—55, 102.

**Ram Kisan Mahant**—73, reports impending hostilities between Javahirmal and Najibkhan 85, 155.

**Ranjitsing**, Jat of Kumbher—283, 246.

**Ranoji Sindia**—132.

**Ranoji Sindia**—Havaldar of Satara fort—148.

**Ratansing**—165, 167.

**Ratansing**—brother of Anirudhsing—99.

**Ratansing Jat**—102, 121, 237.

**Ratansing** of Udaipur—87, 243.

**Rupram Katari**—54, deputed by Javahirsing to negotiate peace with the Peshwa 160, 166, 223.

**Rupray**—captures the fort of Ghazipur 40.

S

**Sabaji Sindia**—working in the North 11.

**Sadashivrao Ballal**—22, 115, 218, reporting the marauding activities of the Jats 223.

**Sadashivji Bhat Raje**—in the employ of Madhosing 128, 248.

**Sadashiv Chimnaji** *alias* **Bhausaheb**—21, 194a.

**Sadashiv Naik Bhave**—276.

**Sadashiv Gangadhar**—writes about a setback given to the Maratha arms by the Jats 122, 131, 133, reports the illness of Malharrao Holkar 140, 157, 249.

**Sadashiv Govind**—160.

**Sadashiv Khanderao**—9.

**Sadashiv Krishna**—Kamavisdar of Siurdurbag—31.

**Sadashiv Ramchandra**—2, 58.

**Sagunabai Sindia**—villages confiscated by the Peshwa 221, 235.

**Saifudin Muhammad Khan**—89, 102.

**Sakharam Bhagvant** *alias* **Bapu Bokil**—190, 194, 196, learns of the troubles created by the Jats 227, 263, 282.

**Sakharam Hari**—172.

S—contd.

**Sakhubai Sindia**—48, complains against Mahadji Sindia 53, 68, meets Mahadji Sindia 96, 221, gets a Saranjam from Mahadji 228, 235.

**Salabat Khan**—115.

**Sampatrao Trimbakrao**—82.

**Samsherkhan Pathan**—envoy of Fauz Mohommad Khan of Bhopal—283.

**Samsherkhan**—242.

**Samru**—167, 208.

**Sams-ud-daula**—83.

**Santaji Wable**—94, despatched against the Jats 126, 247.

**Sardarsing Naruke** of Uniyar—81.

**Sarvottam Shankar**—213a.

**Satvoji Jadhavrao**—agrees to escort Nana Fadnis back to the Deccan from Panipat 1.

**Sayaji Gaikwad**—56.

**Setyaji Aitole**—158.

**Shah Alam**—22.

**Shah Vali Khan**—receives presents from the Peshwa 54.

**Shaikh Muha[illegible]nad Ashak**—Vakil of Dundekhan—167.

**Shamrao Ni[illegible]**—207.

**Shamsher [illegible]han**—115.

**Shamsing Hamirdev**—102, 121, 249.

**Shankrajipant**—173.

**Shivappa**—134.

**Shivaji Vithal**—asked to manufacture ammunition 283, 122, 194a, 232, 237.

**Shivbhat Sathe**—posted at Cuttock by the Bhonsle—110.

**Shivba Shenvi**—killed at Panipat 4.

**Shripatrao**—171, 176.

**Shuja-ud-daula**—5, goes to Lucknow 8, goes to Benares with the Shahajada 13, 22, 23, 24, his advance upon Jhansi 32, 36, 37, crosses the Jumna 45, 46, his part in the battle of Buxar 50, 52, 86, futile attempt to check the advance of the English army 98, 99; 102, 107, 110, 111, his movements against the English 163, 187, 192, 197, 207, 208, learns of the movements of the Jats 226, 246, 251, 257, 261, 262, 263, 264, 269, 270, 271, 276, mobilising forces 278, his aggressive designs reported 281, 282, 288.

**Shuja Khan**—74.



S—concld.

**Shuja Kali Khan**—died in the battle of Buxar 50.

**Sidappa Shet**—130, 231.

**Sitaram Gopal**—203.

**Somaji Kamse**—275.

**Sultanji Lambhate**—Holkar's Sardar—286, 126, wounded 127, 158, taken prisoner by Javahirmal 204.

**Sultanrao Nimbalkar**—283.

**Surajmal Jat**—1, 5, 10, 23, 29, 60.

**Suratram**—17.

**Suphia Sultana Begum**—284.

T

**Tarasing**—121.

**Tavji Kadam**—122.

**Tirthajipant**—14, 15.

**Trimbakdas**—envoy from Shuja-ud-daula—262.

**Trimbakpant Aba**—96.

**Trimbakrao Avchitrao**—38.

**Trimbak Bhaskar**—95.

**Trimbak Ram Fadnis**—Subha of Kalpi—37, 244.

**Trimbak Krishna Kanitkar**—47, 119.

**Trimbak Narayan**—instructed to circumvent Mahadji Sindia 62, 64, 180.

**Trimbak Ram Fadnis**—Subha of Kalpi—283.

**Trimbakji Ingle**—238.

**Trimbak Sadashiv** *alias* **Nana Purandare**—12.

**Trimbakrao Shivdev Odhekar**—173, 233, 234, 243.

**Trimbak Vithal Malpurkar**—banker—70.

**Trimbak Vishvanath**—reports disturbances in Bundelkhand 14, 15, 25.

**Trimbakrao Vishvanath Pethe**—151, 163, 192.

**Tukoji Holkar**—49, 176, intends to join Vithal Shivdev 177, his investiture 180, 182, 183, 186, 190, 200, proposes to start for north 204, 219, expedition in Rajputana and disagreement with Mahadaji Sindia 238, 239, 243; 245, 246, 257, 258, 263, 269, 283.

U

**Umajipant**—271.

**Umedsing**—Bundela accession 253.

U—contd.

**Umrao Gir Gosavi**—155, 164, 175, 185, 207, 226, 246, 263, 283.
**Urmulnamasing**—167.

V

**Valabh Sundar**—banker—283.
**Vasudev Murar**—173.
**Vasudevpant Bapu**—173, 176.
**Vasudev Sambhaji**—brother of Ganesh Sambhaji—32, 37.
**Veni Bahadar**—Shuja-ud-daula's Diwan—50, 110, 111.
**Venkaji Vishvanath**—194a.
**Vinayak Moreshwar**—243, 245.
**Visaji Govind Chandorkar**—274.
**Visaji Krishna**—120, takes over the charge of the forts in Taluk Pata 213, 213a, 216, 231, 237, 238, instructed not to trouble Bhopal 242 ; 248, 256, 261, 264, 265, 266, 268, 269, 270, 271, 272, 273, 275, difference with Mahadji Sindia on the agreement to be effected with Shuja 276, 277, 278, 283.
**Vishnu Mahadev Kamavisdar**—reports the appointment of Vishvasrao Lakshman to the Subha of Jhansi 30,
**Vishnu Mahadev**—122, 123, 124, fixes a meeting between Mahadji Sindia and Malharrao Holkar 131, 137, reports the illness of Malharrao 140, 146, 180, appointed Mujumdar of Kedarji Sindia 182, 253, 261, 283.
**Vishnupant Babaji**—104, 122.
**Vishvasrao Kasi**—in the service of Ghaziuddin 287.
**Vishvasrao Ganesh**—son of Ganesh Sambhaji—100.
**Vishvasrao Lakshman** *alias* **Raosaheb**—learns of the disturbances in Bundelkhand 14, 15, 24, appointed Subhadar of Jhansi 30, 31, 33, 34, 36, 38, 47, 49, 57, 63, 75, 83, requests

V—contd.

**Vishvasrao Lakshman** *alias* **Raosaheb**—*contd.*
Raghoba to send reinforcements 94, 105, 116, 142, 145, 147, 148, 150, 163, learns of the preparations of Danasa Jat 166, assured of help from Poona against the Jats 168, reports the troubles of the Bundelas to Dadasaheb 169, 171, 174, 175, 179, 180, 181, writes a graphic report of the troubles in Bundelkhand 185, 189, 191, 200, 201, 202, 203, 205, 207, 208–211, 214, 220, learns of the predatory activities of the Jats 222, 223 ; learns of the movements of the armies of Sindia and Holkar against the Jats 224, pleads his inability to remit the revenue dues 230, 243, 249.
**Vithal Hari**—148.
**Vithal Janrao**—94.
**Vithal Shivdev**—hands over Salbai to the Raja of Narvar 12, proceeds to the South from Gwalior 29, 47, 49, 57, reports his victory over the Rana of Gohad 60, 74, 103, 105, 112, pleads his inability to undertake an expedition owing to unfair treatment 114, 145, gets help from Tukoji Holkar 177.
**Vyankatram Shastri**—192.

Y

**Yakub Ali Khan**—24.
**Yashvantrao Wable**—87.
**Yadavrao Bhau**—47, 173, 176.
**Yadavrao Tukdev**—253.
**Yado Hari**—173.
**Yelaj Khan**—envoy from Shuja to the Marathas to negotiate peace—270.
**Yesajipant**—210.

Z

**Zabeta Khan**—son of Najib Khan—89, 99, 102, 288, 270.



BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.